# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें
## वार्षिक इतिवृत्त शके १८३७

अध्यक्ष महाराज आणि इतिहासप्रिय सज्जन सभासद हो !

मंडळाला सातवें वर्ष चालू आहे. वहिवाटीला अनुसरून मंडळाचा शके १८३७ चा अहवाल सादर करतों. या सालीं वैशाख अधिक असल्यामुळें वर्ष १३ महिन्यांचें गेलें. त्यामुळें पाक्षिक सभा एकंदर २५ झाल्या. या सर्व सभांच्या वेळच्या सभासदांची हजिरी सरासरी १० पडते. एकंदर टांचणें सुमारें २२२ दाखलीं गेलीं; म्हणजे दर सभेला ९ टांचणें अजमासें पडलीं. टांचण वाचणाऱ्या सभासदांची वर्गवारी येणेंप्रमाणें निघते:—

| | | | |
|---|---|---|---|
| रा. राजवाडे | ४६ | श्री. मुजुमदार | ४५ |
| रा. पां. न. पटवर्धन | १७ | रा. द. वा. पोतदार | २४ |
| रा. गो. का. चांदोरकर | १७ | रा. कृ. वि. आचार्य | १४ |
| रा. स. मा. दिवेकर | ८ | रा. त्र्यं. ग. जावडेकर | ५ |
| रा. द. वि. आपटे | ४ | रा. वि. ल. भावे | ३ |
| रा. ल. रा. पांगारकर | ३ | रा. शं. श्री. देव | ३ |
| रा. वा. दा. मुंडले | २ | रा. पां. वा. काणे | २ |
| रा. शि. म. परांजपे | २ | रा. भा. रा. भालेराव | २ |
| श्री. ना. य. मिरीकर | १ | रा. सरज्योतिषी | १ |
| रा. गो. बा. पोतनीस | १ | रा. चिं. वि. वैद्य | १ |
| श्री. म. मो. फडणीस | १ | | |

या दोनशें बावीस टांचणांचें पृथक्करण केलें तर असें दिसून येईल कीं, यांतील कित्येकांचे द्वारा अनेक नवीन कवींची आपल्यास ओळख जाहली आहे. कित्येक ओळखीच्या कवींची लहानमोठी, संपूर्ण अगर त्रुटित कविता उपलब्ध झाली आहे. कांहीं कवींच्या चरित्रावर अधिक प्रकाश पडला आहे. कित्येकांच्या वंशावळी वगैरे मिळाल्या आहेत. महाराष्ट्रसारस्वताच्या इतिहासरचनेला ही सर्व सामग्री बहुत उपयोगाची आहे व या च दृष्टीनें तिची किंमत आहे. या कार्याबद्दल प्रयत्न करणारांत श्री० मुजुमदार, व रा० गो. का. चांदोरकर यांची कामगिरी विशेष

नमूद करण्यासारखी आहे. मानभावी ग्रंथ 'लीळासंवाद' याच्या आधारें रा० जावडेकर यांनीं हि वरी च मनोरंजक माहिती मंडळास सादर केली आहे.

हे सारस्वतविषयक शोध एकाएकीं कित्येकांच्या मनांत भरत नाहींत. त्यांचें महत्त्व त्यांस प्रतीत होत नाहीं. कवी हे समाजाच्या नेतृवर्गांत मोडतात. त्यांच्या उपदेशानुसार व उद्गारांनुसार त्यांच्या अनेक अनुयायांच्या मनोरचनेची बनावट होत असते. वेदांतांतील समतेचा कवी उपदेश करील तर उपदिष्ट समाज तद्रूप होऊं पाहील. 'विवेकी जाणते घेती सारासारविचारणा' असा 'समर्थ' विचार तो पसरवील तर त्याचा च पुरस्कार त्याचा अनुयायीसमाज औत्कट्यानें करील. असा कवींचा दर्जा मोठा असल्याकारणानें विशिष्ट कालांतील लहानमोठे कवी अगर पद्यकर्ते काय पसारा मांडीत होते, कोणत्या भावना उद्दीपित करीत होते, समाजांतील कोणत्या अवयवांवर त्यांची कसकशी क्रियाप्रतिक्रिया चालली होती वगैरे मुद्यांचें सोपपत्तिक, साधार व सप्रपंच विवेचन केल्याशिवाय कोणचा हि इतिहास कच्चा च राहील. विशेषेंकरून पूर्वकालीन महाराष्ट्राचें पुढारपण-विचाराचें पुढारपण-पुष्कळांशानें कवींकडे असल्यामुळें तेथें तर ही चिकित्सा विशेषच अगत्याची आहे. शिवाय महाराष्ट्रांत कवी व साधु यांचें बव्हंशीं सामानिधिकरण्य असल्यामुळें व त्यांच्या मताचा महाराष्ट्रावर जबर पगडा बसला असल्यामुळें एतद्विषयक चिकित्सेला येथें निराळी च किंमत आहे. ही दृष्टी ठेवून या शोधांकडे पाहिलें म्हणजे त्यांचें महत्त्व समजेल.

या शोधांकडून दृष्टि काढून आपण इतर टांचणें पाहूं लागलों तर समाजाच्या विविध अंगांस तीं स्पर्श करीत असलेलीं आपल्या दृष्टीं पडतील. सामाजिक, राजकीय, यौद्धिक, चरित्रात्मक, धार्मिक, नैयायिक, तात्त्विक वगैरे समाजाच्या अनेकविध अंगांविषयीं कांहींना कांहीं अधिक स्पष्टीकरण करणारीं अनेक कागदपत्रें, बखरी, महजर, सनदा, आज्ञापत्रें, इत्यादि साधनें आधारास घेऊन लिहिलेलीं टिपणें यंदा चर्चेस आलीं. रा. राजवाडे यांचें सर्वगामि संशोधन सोडून दिलें तर रा. पां. न. पटवर्धन, रा. दिवेकर, रा. आचार्य वगैरेंनीं या बाजूनें विशेष प्रयत्न केलेला आढळतो. रा. पटवर्धन यांची प्राप्ति नांवाजण्यासारखी आहे.

ताम्रपट, शिलालेख वगैरे इतिहाससाधनांचा हि यथावकाश परामर्ष घेण्यांत आला आहे. रा. मुंडले यांनीं लोककथां ( Folk-lore ) कडे पूर्ववत् लक्ष्य ठेविलें आहे.

या सर्व विवेचनावरून दिसून येईल कीं, भारतइतिहाससंशोधकमंडळांतील संशोधकांचें त्यांच्या उद्देशांनुसार संस्कृत, प्राकृत, सारस्वत, प्राचीन व अर्वाचीन इतिहास या सर्व बाबींवर लक्ष्य आहे. त्यांचें कार्यक्षेत्र फार अफाट आहे. वेदकालापासून, किंबहुना वेदपूर्वकालापासून तहत गेल्या क्षणापर्यंत जो कालखंड

पडतो त्यांत या भारतवर्षीय समाजाच्या ज्या काय हालचाली झाल्या त्या सर्वांचा परामर्ष घेण्याची महत्त्वाकांक्षा मंडळाला आहे. त्या च धोरणानें त्यांतील संशोधक काम करीत आहेत. म्हणून च पाणीनीच्या कालाचा येथें विचार होतो; पुण्याच्या राष्ट्रकूटीच ताम्रपटाचा आदर केला जातो, मानभावांच्या वाङ्मयाची परीक्षा केली जाते, तुकारामाच्या अभंगांचा अस्सल पाठ शोधला जातो, वाग्भटाची जुनी प्रत पुढें मांडली जाते, गंगाधरशास्त्रयाचें आत्मचरित्र वाचिलें जातें, शब्दांची व्युत्पत्ति निर्णीत होते, अथवा महाराष्ट्र व्यवहारनिर्णयपद्धतीचा प्रपंच केला जातो. भारतीय समाजाच्या चरित्रांचा सामग्रयानें विचार करणें हें मंडळाचें ध्येय आहे; अर्थात् एका विशिष्ट शाखेचा च विचार करण्याचें मर्यादित धोरण त्यानें स्वीकारिलें नाहीं.

जसा विषयांमध्यें संग्राहकपणा राखला आहे तसा च सभासदांसंबंधीं हि आहे. येथें पक्षभेदाला बिलकुल थारा नाहीं. पुराव्यानें तर्कशास्त्राला धरून जो बोलेल त्याच्या बोलाचा व पुराव्याचा मंडळ सादर स्वीकार करील. मंडळ कोणत्या च मताचें अभिमानी नाहीं; त्याला अभिनिवेश नाहीं. इतिहासशास्त्राच्या सर्वांगाचा परिपोष भारतवर्षाच्या चरित्रानुबंधनानें करावा हा मुख्य हेतु. पुरावा पुढें आणावा; त्याची मातब्बरी ठरवावी व त्याच्या आधारानें अज्ञात इतिहासाचा प्रांत होईल तितका संकोचित करावा. सर्व विद्वानांचें व इतिहासाभिमान्यांचें हें काम आहे.

मंडळाचे सभासद या सालीं २१६ होते. कर्तव्यक्षेत्राचें प्राचंड्य व सभासदांची ही संख्या दोन्ही एकत्र विचाराला घेतली तर समाधान वाटण्यांत आपली फसणूक आहे. आपल्याला या देशांत इतस्ततः पसरलेली संडोगणती सामग्री निदान एकत्र जतन करून ठेवण्याला एक 'सरस्वतीमंदिर' बांधावयाचें आहे. तत्प्रीत्यर्थ गुदस्तां जागच्या जागीं ११ हजार रुपयांचे आंकडे हि पडले आहेत. पण सदर मंदिर कार्यक्षम करावयास हजाराचा हिशेब कामीं यावयाचा नाहीं; लाखानें मोजण्याजोगी रक्कम उभी राहिली पाहिजे. जमविलेले रुपये मंदिराकरितां लागणाऱ्या बसलीच्या खरेदीला हि पुरत नाहींत. मग त्यावर अग्निबाधाविरहित मंदिर सिद्ध करण्यास एवढीशी रक्कम कशी पुरी पडेल ? चालू महायुद्धामुळें सर्वत्र मोठी हलाखी झाली आहे खरी. गुदस्तां वाटलें कीं, युद्ध लवकर संपेल व मग झोळी फिरवायला योग्य समय येईल. आपलें मंदिर सिद्ध करण्याचा हेतु तर अगदीं स्थापनेपासून अगर त्याच्या हि पूर्वीपासून आपले सर्वांचे मनांत उत्कटत्वानें वास करीत आलेला आहे. पण युद्धाकरितां थोडी कळ सोसून कांहीं आतां भागणार नाहीं. शत्रूचा पुरा मोड होण्याकरितां आतां आपण फार चिकटपणानें झगडलें पाहिजे. हें युद्ध आतां War of Attrition झिजवणुकीचें युद्ध झालें आहे. इकडे इतिहाससाधनांची तर इतकी विपन्नावस्था आहे कीं, एक एक क्षण जसजसा जाईल

तसतसे कित्येक चिनमोल कागद, कैक बखरी, पोथ्या इ० कांहीं कसरीच्या भक्ष्यस्थानीं, कांहीं वाण्यांच्या दुकानांत, कांहीं अग्नीच्या मुखात अशा वाटल्या जाऊन कित्येकांचें रूपांतर पतंगवावड्यांत होईल ! तिसगांवमठांतील संग्रहाचें काय झालें ? गोविंद्राव काळ्यांच्या दप्तरांतील भाकऱ्यांचें वर्णन कोणीं वाचलें नाहीं ? असें जर आहे, तर आतां सवडींत सवड करून आपण इतिहासाच्या कार्याला साहाय्य केलें पाहिजे. इतिहास हा पाया आहे. पायावर च वरली इमारत उभी राहावयाची. मागील इतिहासाच्या बळावर च पुढच्या उड्या ! तेव्हां तो सर्वांआधीं जतन केला पाहिजे. सरस्वतीमंदिराची उभारणी जितकी सत्वर तितकी आपण अवश्य केली पाहिजे.

जगांतील नामांकित इतिहासमंडळें ज्या प्रगतावस्थेंत आहेत तसली स्थिति आपणाला प्राप्त करून घेण्याला सरस्वतीमंदिर च नुसतें उघडून चालावयाचें नाहीं. इतिहासशास्त्र व इतिहासकथा व तदनुषंगिक शास्त्रें यांजबद्दलचीं सर्व पुस्तकें आपणास जमा करून त्या पुस्तकालयाची जोड सरस्वतीमंदिरास दिली पाहिजे.

अशी तयारी झाल्यावर जमविलेल्या साधनांच्या प्रकाशनाची सोय आपणास करावी लागेल. हा मात्र फार मोठा व्याप आहे. कित्येक मासिकें कित्येक वर्षें चालतील असा संग्रह आज च उपलब्ध आहे। तो प्रसिद्ध करण्यास एखादा स्वतंत्र विजेचा छापखाना लावला तरी त्याला कैक वर्षें काम पुरेल ! जमविलेली सामुग्री प्रकाशनाला तयार करण्याला लेखकवर्गाची जोड पाहिजे. कुशल लेखक-वर्गाची प्राप्ति करून घेणें कष्टसाध्य आहे. तो ठेवण्याला जरूर लागणारा निधी हि आपणास जमवावा लागेल. फोटोचें सामान, शिलालेखछायाचें सामान, वगैरे इतर उपकरणें उपलब्ध करून घ्यावयाचीं म्हटलीं तर छाती दडपून जाण्याजोगा हा बोजा आहे खरा ! पण कष्टानें साध्य नाहीं असें काय आहे ? जगांत इतर ठि-काणीं जें होतें तें आपणाला कां घडवून आणतां येणार नाहीं ?

मंडळाच्या कार्यप्रसाराकरितां यंदां पुण्यास ज्या दोन प्रांतिकसभा झाल्या त्यांत १७ व्या परिषदेंत रा. रा. टिळक यांच्या अध्यक्षतेखालीं रा. शंकरराव देव यांचें भाषण झालें. रा. ब. साने, श्री. मुजुमदार वगैरे मंडळाचे सभासद या प्रसंगीं हजर होते.

१५ व्या प्रांतिक परिषदेंत सभा करण्यास कामाच्या गर्दीमुळें परवानगा मिळाली नाहीं; तेथें हस्तपत्रकें वगैरे वांटलीं.

या दोन्ही प्रयत्नांचे योगानें सभासदांचे संख्येंत भर पडली. या मदतीबद्दल दोन्ही सभांच्या चालकांचें मंडळ आभारी आहे.

शके १८३७ च्या जमाखर्चाचा तक्ता

**जमा**

| रु. आ. पै. | |
|---|---|
| १४१०–७–१० | मागील शिल्लक |
| १६३५–०–० | वर्गणी वसूल |
| ६४–८–० | पुस्तकविक्री |
| ३०३–०–० | इमारत–निधि |
| ३४१२–१५–१० | एकूण |

**खर्च**

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ३९९–०–० | द्वितीय संमेलनवृत्त छपाई |
| ३९३–४–० | श०१८३६ इतिवृत्त–छपाई |
| ३३–२–० | सभा |
| ८५–१४–० | किरकोळ छपाई |
| १९–०–० | टाइप् राइटिंग |
| १०१–०–० | चांदोरकर–सूचि |
| ३८–१३–० | लेखक व लेखनसाहित्य |
| १५४–४–० | संशोधन खर्च |
| १००–०–० | कपाटें ४ |
| २०–०–० | खुर्च्या भाडें |
| १९–८–० | गाडी भाडें |
| ८३७–०–० | आत्माराम छापखाना हिशोबाचे पोटीं जमा |
| ७७-१२-९ | टपालखर्च |
| ७६–७–० | पुस्तकखरेदी |
| एकूण २३५७–०–९ | |

मिती वैशाख वद्य ११
शके १८३८.

**खं. चिं. मेहेंदळे**
**द. वा. पोतदार**
चिटणीस

शके १८३७ सालीं खालील गृहस्थ मंडळाचे सभासद होते—

**( अ ) आश्रयदाते सभासद**

१ श्रीमंत सर परशरामराव भाऊसाहेब पटवर्धन, के. सी. आय्. ई.
सं. जमखंडी — जमखंडी

**( आ ) हितकर्ते सभासद**

२ श्रीमंत नारायणराव गोविंद ऊर्फ बाबासाहेब घोरपडे,
सं. इचलकरंजी — इचलकरंजी

३ श्रीमंत सरदार विनायकराव धुंडिराज ऊर्फ बाबासाहेब चिवलकर — मुंबई

**( इ ) सभासद**

४ श्री. रा. वामन श्रीधर आपटे — मुंबई

५ रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्. एल्. बी. — पुणें

| | | |
|---|---|---|
| ६ | श्रीमती कृष्णाबाई खरे बी. ए. | पुणें |
| ७ | श्री. दाजी आबाजी खरे | मुंबई |
| ८ | रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर बी. ए. | पुणें |
| ९ | श्री. रा. गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे | उमरावती |
| १० | श्री. रा. मार्तंड त्र्यंबक गद्रे, इनामदार | पुणें |
| ११ | श्री. व्यंकटराव तात्यासाहेब गुजर, जहागिरदार | नागपूर |
| १२ | रा. रा. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे बी. ए. एल्. एल्. बी. हायकोर्ट वकील | मुंबई |
| १३ | रा. रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर बी. ए. एल्. एल्. बी. | धुळें |
| १४ | नामदार महादेव भास्कर चौबळ बी. ए. एल्. एल्. बी. | मुंबई |
| १५ | रा. रा. मुकुंद रामराव जयकर एम्. ए. बार ॲट. लॉ. | ,, |
| १६ | रा. रा. बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल्. एल्. बी. | पुणें |
| १७ | प्रो. बळवंतराय कल्याणराय ठाकोर एम्. ए. | पुणें |
| १८ | श्रीमंत रामराव अमृतराव ऊर्फ आबासाहेब डफळे, सं. जत | जत |
| १९ | रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव बी. ए. एल्. एल्. बी. | धुळें |
| २० | श्री. रा. पंजाबराव बाजीराव देशमुख | सेंदुरजना |
| २१ | श्री. रा. विनायक नीळकंठ नातू, इनामदार | पुणें |
| २२ | रा. रा. अनंत विनायक पटवर्धन बी. ए. | ,, |
| २३ | श्री. सरदार गोविंदराव बळवंत शास्त्री पटवर्धन | सावली |
| २४ | रा. ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. | पुणें |
| २५ | रा. रा. दत्तो वामन पोतदार बी. ए. ( चिटणीस ) | ,, |
| २६ | रा. रा. अनंत सखाराम फडके | भुसावळ |
| २७ | रा. ब. नरहर गदाधर फडके बी. ए. एल्. एल्. बी. | पुणें |
| २८ | रा. रा. सदाशिव रामचंद्र बखले बी. ए. एल्. एल्. बी. हायकोर्ट वकील | मुंबई |
| २९ | श्रीमंत सरदार परशरामराव कृष्ण चिवलकर | आलिबाग |
| ३० | रा. रा. नारायण मल्हार बेदरकर बी. ए. एल्. एल्. बी. | उमरावती |
| ३१ | रा. रा. भास्कर वामन भट, हायकोर्ट वकील | धुळें |
| ३२ | रा. रा. विनायक लक्ष्मण भावे, बी. एस् सी. | ठाणें |
| ३३ | रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी एम्. ए. | अकोला |
| ३४ | श्री. सरदार गंगाधरराव नारायण मुजुमदार | पुणें |
| ३५ | श्री. सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे बी. ए. ( चिटणीस ) | पुणें |
| ३६ | रा. रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे बी. | ,, |

३७ श्रीमती रमाबाई रानडे पुणें
३८ रा. रा. चिंतामण विनायक वैद्य एम्. ए. एल् एल्. बी. कल्याण
३९ ना. रा. ब. गणेश कृष्ण साठे, सी. आय् ई., वकील सोलापूर
४० रा. ब. काशिनाथ नारायण साने बी. ए. ( अध्यक्ष ) पुणें

## ( ई ) साधारण सभासद

४१ रा. रा. बळवंत रामचंद्र अनगळ, ॲडव्होकेट उमरावती
४२ रा. रा. जयराम केशव असनारे बी. ए. बी. एल् ,,
४३ रा. रा. सदाशिव खंडो आळतेकर, वकील कऱ्हाड
४४ रा. रा. नारायण रंगनाथ अळेकर, बी. ए. एल्. एल्. बी. नागपूर
४५ रा. रा. परशुराम सदाशिव आपटे अहमदनगर
४६ रा. रा. गोपाळ नारायण उकिडवे सांगली
४७ रा. रा. श्रीधर बाळकृष्ण उपासनी बी. ए. एल्. एल्. बी. धुळें
४८ श्री. सरदार मोरेश्वर चिंतामण ओंकार पुणें
४९ रा. रा. अनंत रामचंद्र कवडे अहमदाबाद
५० वैद्यपंचानन कृष्णाजी नारायण कवडे बी. ए. पुणें
५१ रा. रा. मनोहर विष्णु काथवटे बी. ए. एल्. एल्. बी. सातारा
५२ रा. रा. दत्तात्रय बळवंत काळसेकर शिराळें
५३ रावसाहेब रावजी रामचंद्र काळे बी. ए. एल्. एल्. बी. सातारा
५४ प्रो. वामन गोविंद काळे एम्. ए. पुणें
५५ श्री. नामदार केशवराव वकील हैद्राबाद
५६ रा. रा. श्रीनिवास व्यंकटेश कौजलगी बी. ए. एल्. एल्. बी. विजापूर
५७ रा. रा. पी. व्ही. कृष्णस्वामी नाईक तंजावर
५८ रा. रा. गणेश सखाराम खरे, एंजिनियर पुणें
५९ रा. रा. लक्ष्मण जनार्दन खरे एम्. ए. एल्. एल्. बी. उमरावती
६० रा. रा. अनंत हरि गद्रे पुणें
६१ रा. रा. विनायक गोपाळ गाडगीळ सांगली
६२ रा. रा. गोपाळ रावजी गोगटे, वकील भुसावळ
६३ रा. रा. दामोदर विश्वनाथ गोखले बी. ए. एल्. एल्. बी. पुणें
६४ रा. रा. हरि गणेश गोडबोले बी. ए. पुणें
६५ रा. यशवंत अनंत गोडबोले आय्. सी. एस्. सब्-डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट मऱ्हा
६६ रा. रा. हरि केशव गोळे बी. ए. पुणें

| | |
|---|---|
| ६७ श्री. रा. नरहर रामचंद्र घुडे | कारंजा |
| ६८ रा. रा. नारायण गोविंद चाफेकर बी. ए. एल्. एल्. बी. | अलिबाग |
| ६९ रा. ब. गणेश कृष्ण चितळे बी. ए. एल्. एल्. बी. | अहमदनगर |
| ७० रा. रा. विनायक बळवंत चौकर बी. ए. एल्. एल्. बी. | ” |
| ७१ रा. रा. रामकृष्ण रावजी जयवंत बी. ए. वकील. | उमरावती |
| ७२ रा. रा. विश्वनाथ गणेश जावडेकर बी. ए. एल्. एल्. बी. | धुळें |
| ७३ रा. रा. रघुनाथ कृष्ण जोशी बी. ए. | जुन्नर |
| ७४ रा. रा. मंगेश रामचंद्र टाकी | मुंबई |
| ७५ रा. रा. अनंत विश्वनाथ टिळक बी. ए. एल्. एल्. बी. | धुळें |
| ७६ रे. नारायण वामन टिळक | अहमदनगर |
| ७७ रा. रा. रामचंद्र उमाकांत टमढेरे | बडोदें |
| ७८ रा. रा. यशवंत स्वामीराव तिळगुळकर बी. ए. एल्. एल्. बी. | विजापूर |
| ७९ रा. रा. हरि विठ्ठल तुळपुळे बी. ए. एल् एल्. बी. | पुणें |
| ८० रा. रा. सीताराम केशव दामले बी. ए. एल्. एल्. बी. | ” |
| ८१ रा. रा. हरि श्रीकृष्ण देव एल्. एम्. एस्. | ” |
| ८२ रा. रा. सदाशिव महादेव दिवेकर | कल्याण |
| ८३ श्री. रा. नरसिंगराव कोन्हेर देशपांडे | सुळेभावी |
| ८४ रा. रा. यशवंत गोविंद देशपांडे बी. ए. एल्. एल्. बी. | उमरावती |
| ८५ रा. रा. बाबुराव हरि नाईक एम्. ए. | इंदूर |
| ८६ रा. रा. गजानन घनःश्याम नाडकर्णी, ॲडव्होकेट | मुंबई |
| ८७ श्री. रा. विनायक मोरेश्वर नातू, इनामदार | पुणें |
| ८८ रा. रा. दत्तात्रय रामचंद्र पटवर्धन एम्. ए. एल् एल्. बी. हायकोर्ट वकील | मुंबई |
| ८९ रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन | पुणें |
| ९० रा. रा. हरी केशव पटवर्धन बी. ए. एल्. एल्. बी. | अहमदनगर |
| ९१ श्री. रा. गणपतराव हरिहर ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन | मंगळवेढें |
| ९२ प्रो० शिवराम महादेव परांजपे एम्. ए. | पुणें |
| ९३ रा. रा. वासुदेव गोपाळ परांजपे एम्. ए. एल्. एल्. बी. | पुणें |
| ९४ डॉ० गोपाळ सदाशिव बकसुले एल्. एम्. एस्. ( Nt. ) | पुणें |
| ९५ रा. ब. विठ्ठलराव नारायण पाठक एम्. ए. | सातारा |
| ९६ रा. रा. केशव आपा पाध्ये बी. ए. एल्. एल्. बी. | ठाणें |
| ९७ रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए. | पुणें |

| | | |
|---|---|---|
| ९८ | रा. रा. विनायक चिंतामण पांडे बी. ए. एल्. एल्. बी. | उमरावती |
| ९९ | रा. रा. श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर बी. ए. बार ॲट लॉ. | ,, |
| १०० | रा. रा. दत्तात्रेय शिवराम पुसाळकर वकील | एरंडोल |
| १०१ | रा. रा. रघुनाथ जगन्नाथ पेंडसे | ,, |
| १०२ | रा. रा. गोविंद नारायण पोतदार बी. एस्. सी. | मुंबई |
| १०३ | रा. रा. वामन विष्णु फडके एम्. ए. बार ॲट लॉ. | मुंबई |
| १०४ | रा. रा. गणेश बल्लाळ फणसळकर वकील | सातारा |
| १०५ | रा. रा. नरहरि रघुनाथ फाटक | इंदूर |
| १०६ | श्री. स. आनंदराव भाऊसाहेब फाळके | ग्वाल्हेर |
| १०७ | रा. रा. गोविंद बजाजी बक्षी बी. ए. | तंजावर |
| १०८ | रा. रा. रामकृष्ण वासुदेव बर्वे बी. ए. | मुंबई |
| १०९ | रा. रा. मुकुंद वामनराव बर्वे, जज्ज स्मालकॉज कोर्ट | इंदूर |
| ११० | रा. रा. केशव वामन ब्रह्म बी. ए. एल्एल्. बी. | उमरावती |
| १११ | रा. रा. सखाराम केशव भवाळकर, वकील | सावनेर |
| ११२ | रा. रा. विष्णु काशिनाथ भागवत, वकील | अमळनेर |
| ११३ | रा. रा. राजाराम रंगनाथ भालेराव | पुणें |
| ११४ | रा. रा. दामोदर केशव भावे | मुंबई |
| ११५ | रा. रा. नारायण बळवंत भिडे बी. ए. एल्. एल्. बी. | पुणें |
| ११६ | रा. रा. बळवंत सखाराम भुसारी | पुणें |
| ११७ | रा. रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर एम्. ए. एल्. एल्. बी. | पुणें |
| ११८ | श्री. रा. नारायणराव ऊर्फ रावसाहेब राजे भोसले जिंतीकर | ग्वाल्हेर |
| ११९ | रा. ब. काशिनाथ बाळकृष्ण मराठे बी. ए. एल. एल, बी, | पुणें |
| १२० | मि. डोसाभाई माणिकजी, वकील | सातारा |
| १२१ | श्री. रा. नारायण यशवंत मिरीकर, वकील | अहमदनगर |
| १२२ | रा. रा- वासुदेव दामोदर मुंडले | इस्लामपूर |
| १२३ | रा. रा. श्रीपती शंकर मुळे, बी. ए. | भिंगार |
| १२४ | रा. ब. कृष्णाजी बळवंत मोघे, कारभारी | जमखंडी |
| १२५ | रा. रा. महादेव विष्णु मोडक बी. ए. एल्. एल्. बी. | नंदुरबार |
| १२६ | रा. रा. विनायक कृष्ण राजवाडे, वकील | आकोले |
| १२७ | रा. रा. नागनाथ लक्ष्मण रानडे बी. ए. एल्. एल्. बी. | अहमदनगर |
| १२८ | रा. रा. अनंत दिनकर रास्ते | नाशिक |
| १२९ | रा. रा. शंकर रामचंद्र राजे | पुणें |

१३० प्रो० विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए. तळेगांव–दाभाडे
१३१ डॉ० मोतीराम बाळकृष्ण वेलणकर एल्. एम् ॲन्ड एस्. मुंबई
१३२ नामदार रा. ब. नारायण त्र्यंबक वैद्य मुंबई
१३३ रा. रा. गोविंद पंढरीनाथ शिदोरे बी. ए. पुणें
१३४ रा. रा. वासुदेव विष्णु शिदोरे, वकील धुळें
१३५ श्री. रा. पांडुरंग केशव शिराळकर कऱ्हाड
१३६ प्रो. शेख अबदुल कादर सरफराज एम्. ए. मुंबई
१३७ डॉ० दिनकर धोंडो साठ्ये एल्. आर. सी. पी. मुंबई
१३८ रा. रा. सदाशिव धोंडो साठे, एल्. सी. ई. बडोदें
१३९ रा. रा. अच्युत सिताराम साठे एम्. ए. बी. एल्. अकोलें
१४० रा. रा. भालचंद्र गणेश साठे, बी. ए. एल्. एल्. बी. धुळें
१४१ रा. रा. रामचंद्र धोंडदेव साठे, बी. ए. एल्. एल्. बी. कुंदगोळ
१४२ रा. रा. महादेव विष्णु साने, पुणें
१४३ रा. रा. रामचंद्र गणेश सोमण वकील सातारा
१४४ रा. रा. विनायक कृष्ण सोहोनी बी. ई. माळशिरस

## ( उ ) सहानुभविक सभासद

१४५ रा. रा. द. वि. आपटे बी. ए. पुणें
१४६ रा. रा. पांडुरंग वामन काणे एम्. ए. एल्. एल्. एम्. मुंबई
१४७ रा. रा. केशव बाजीराव संत, कुळकर्णी इंदापूर
१४८ रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर बी. ए. एल्. एल्. बी. खामगांव
१४९ रा. रा. वासुदेव वामन खरे शास्त्री मिरज
१५० रा. रा. रघुनाथ हरी गद्रे वकील नाशीक
१५१ रा. रा. दत्तात्रय परशुराम चिंचाळकर बी. ए. एल्. एल्. बी. अमळनेर
१५२ प्रो. महादेव मल्हार जोशी एम्. ए. जुनागड
१५३ रा. रा. वामन दामोदर तळवळकर, वकील पुणें
१५४ रा. रा. महादेव गंगाधर दामले बी. ए. एल. एल. बी. उमरावती
१५५ रा. रा. माधव त्रिमलराव देशपांडे हुन्नर
१५६ रा. रा. रामचंद्र विनायक पटवर्धन, बी. ए. एल्. एल्. बी. पुणें
१५७ रा. रा. निळकंठ पांडुरंग पाटणकर बी. ए. एल. एल्. बी. नासिक
१५८ रा. ब. दत्तात्रेय बळवंत पारसनीस सातारा
१५९ श्री. रा. महादेव मोरेश्वर फडणीस ( भानू ) इनामदार पुणें

| | |
|---|---|
| १६० रा. रा. हरी रघुनाथ भागवत बी. ए. | पुणें |
| १६१ प्रो. चिंतामण गंगाधर भानू बी. ए. | पुणें |
| १६२ रा. रा. विनायक नारायण मनोहर बी. ए. एल् एल्. बी. | खांडवा |
| १६३ रा. रा. माणिकचंद किसनदास मुथा बी ए. एल्. एल्. बी. | अहमदनगर |
| १६४ रा. रा. वामन परशुराम मेहेंदळे | औंध |
| १६५ रा. रा. दामोदर सांवळेराम यंदे | मुंबई |
| १६६ प्रो. हरी गोविंद लिमये एम्. ए. | पुणें |
| १६७ रा. रा. विष्णु नारायण वर्तक एम्. ए. एल्. सी. ई. | माळशिरस |
| १६८ रा. रा. विनायक रामचंद्र सरज्योतिषी | गोंवे |

## ( ऊ ) चहाते सभासद

| | |
|---|---|
| १६९ रा. रा. विष्णुबोवा अक्कलकोटकर | अक्कलकोट |
| १७० रा. रा. कृष्णाजी विष्णु आचार्य कालगांवकर | पुणें |
| १७१ रा. रा. दामोदर वैजनाथ आठल्ये बी. ए. | पुणें |
| १७२ मि. शिकंदर लाल आतार, शिक्षक | वाळवें |
| १७३ रा. रा. गोविंद विनायक आपटे | वाई |
| १७४ रा. रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. | इंदूर |
| १७५ रा. रा. हरी नारायण आपटे | पुणें |
| १७६ रा. रा. जनार्दन विनायक ओक एम्. ए. | पुणें |
| १७७ रा. रा. जनार्दन सखाराम करंदीकर बी. ए. एल्. एल्. बी. | पुणें |
| १७८ रा. रा. रघुनाथ पांडुरंग करंदीकर, हायकोर्ट वकील | सातारा |
| १७९ रा. रा. हरी नारायण किरपेकर | पुणें |
| १८० डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर एम्. ए. पी. एच्. डी. | उमरावती |
| १८१ रा. रा. माधव विष्णु खरे, वकील | एरंडोल |
| १८२ रा. रा. रामचंद्र जनार्दन गोखले बी. ए. | पुणें |
| १८३ प्रो. विष्णु दत्तात्रेय गोखले एम्. ए. | पुणें |
| १८४ प्रो. विनायक सखाराम घाटे एम्. ए. | पुणें |
| १८५ रा. रा. पांडुरंग मार्तंड चांदोरकर | जळगांव |
| १८६ रा. रा. मल्हारराव राघोबा जाधव | नेवासें |
| १८७ रा. रा. वामन मल्हार जोशी एम्. ए. | पुणें |
| १८८ रा. रा. शंकर नारायण जोशी | पुणें |
| १८९ रा. रा. शिवराम निळकंठ जोगळेकर | त्र्यंबक |
| १९० रा. रा. राजाराम दामोदर देसाई एम्. ए. | पुणें |

१९१ रा. रा. रामचंद्र मार्तंड देशपांडे — अहमदनगर
१९२ रा. रा. नीळकंठ वामन नगरकर — पुणें
१९३ रा. रा. सी. ल. नाडकर्णी — इंदूर
१९४ नामदार प्रि० रघुनाथ पुरुषोत्तम परांजप्ये, बी. ए. बी. एस्. सी. — पुणें
१९५ रा. रा. नरहर नारायण पटवर्धन — वांई
१९६ रा. रा. हरीहर सदाशिव पटवर्धन — पुणें
१९७ रा. रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर — पुणें
१९८ रा. रा. गणेश लक्ष्मण पागे — मुंबई
१९९ श्री. गोपिनाथ बाळकृष्ण पोतनीस — पुणें
२०० रा. रा. भास्कर विष्णु फडके बी. ए. — माटुंगा
२०१ रा. रा. वासुदेव रामकृष्ण फडके — सांगली
२०२ रा. रा. अनंत वासुदेव फडणीस ( सांडेकर ) — पुणें
२०३ रा. रा. भास्कर रामचंद्र भालेराव — पुणें
२०४ रा. रा. विनायक महादेव भुस्कुटे — पुणें
२०५ रा. रा. शंकर अनंत भोसेकर — मालेगांव
२०६ रा. रा. नारायण विठ्ठल मावळणकर — पुणें
२०७ रा. रा. गणेश सखाराम मराठे एम्. ए. ए. आ. ए. ( आक्च्युअरी ) — पुणें
२०८ रा. रा. गोविंद कृष्ण मोडक — पुणें
२०९ रा. रा. रामचंद्र गोपाळ राइरीकर — पुणें
२१० रा. रा. काशिनाथ कृष्ण लेले — धार
२११ रा. रा. सदाशिव कृष्ण वैशंपायन, वकील — सांडवा
२१२ रा. रा. शिवराम विनायक शेवडे बी. एस्. सी. — तळेगांव–दाभाडे
२१३ रा. रा. गणेश श्रीधर साठे — पुणें
२१४ श्री. रा. भार्गव माधव साठे, इनामदार — वाई
२१५ रा. रा. शंकर रावजी सोनार — मुंढवें
२१६ रा. रा. कृष्णाजी त्र्यंबक हसबनीस — पुणें

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १ | अनामक कविकृत भागवत दशम स्कंधाचे दोन अध्याय मराठी | वि. का. राजवाडे | १ |
| २ | सूर्यनारायणाची कहाणी व सूर्यव्रत | ,, | १ |
| ३ | विष्णुदास नामा–कृत बावण–आक्षरी | ,, | ७ |
| ४ | जोतिरामकृत माणकोजी बोधला धामणगांवकर याचें चरित्र | ,, | १३ |
| ५ | चिंतामणि पंडितकृत रमलदीपिका-कलिका | ,, | १४ |
| ६ | नरसिंहकृत करपंचांग | ,, | १५ |
| ७ | दास–लाल–कृत सोळा सोमवार कथा | ,, | १५ |
| ८ | नरसिंहकृत सामुद्रिक ओंवीबद्ध | ,, | १६ |
| ९ | भोळारामकृत प्रेमकळाग्रंथ | ,, | १७ |
| १० | शंकर दैवज्ञकृत तिथिनिर्णयरत्नमाला मराठी गद्य | ,, | १७ |
| ११ | घुसुमेश माहात्म्य अर्थात् घृष्णेश्वरादि | गो. का. चांदोरकर | १८ |
| १२ | शिवलिंगाचें डफगाणें | ,, | १९ |
| १३ | सुज्यातांचें एक पद | ,, | २० |
| १४ | योगिनागाचें पद | ,, | २१ |
| १५ | शिवानंदाचें पद | ,, | २१ |
| १६ | विश्वेश्वरकृत अश्वचिकित्सा | ,, | २२ |
| १७ | तुकारामाचा अभंग–चोखामेळाचरित्र | ,, | २५ |
| १८ | रघुकविकृत ब्रह्मोत्तरखंड | ,, | २६ |
| १९ | शंकरदासकृत शिवरात्रिकथा | ,, | २९ |
| २० | यशवंतसुतकृत सीता व द्रौपदीस्वयंवर | ,, | २९ |
| २१ | ( मराठी ) रसक्रिया | ,, | ३० |

| अनुक्रमांक नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|
| २२ शंकरदासकृत निरंजन–चरित्र | गो. का. चांदोरकर | ३१ |
| २३ श्रीगोरक्षविरचित अमरनाथ-संवाद | ,, | ३२ |
| २४ नृसिंहकृत हृदयनिवास | ,, | ३३ |
| २५ शंकरदासकृत गणपतिस्वयंवर | ,, | ३४ |
| २६ शंकरदासकृत गणपति–कार्तिकस्वामी भांडण | ,, | ३५ |
| २७ शातलिंगकृत कर्णहस्तिकी | ,, | ३६ |
| २८ मध्वनाथकृत गुरुचरित्र | ,, | ३९ |
| २९ रंगनाथ-(रामराय)कृत स्वानुभवामृत | गं. ना. मुजुमदार | ४० |
| ३० तुकेशसुत चैतन्यनाथविरचित स्वरूपविवरण | ,, | ४१ |
| ३१ तुकाविप्रकृत एकनाथावरील श्लोक | ,, | ४३ |
| ३२ शिवदिनकेसरीचें एक ऐतिहासिक पद | ,, | ४४ |
| ३३ विष्णु काशिनाथ (गणेशयोगीशिष्य) | ,, | ४५ |
| ३४ सखानंद ( परनामंद शिष्य ) | ,, | ४६ |
| ३५ काशिराजसुत गणेशदासकृत गणेश-गीता–टीका | ,, | ४७ |
| ३६ रामगीता ( वामनी ) | गो. का. चांदोरकर | ४९ |
| ३७ रामराज विरचित मुद्गलाख्यान | गं. ना. मुजुमदार | ५० |
| ३८ नाथशिष्य रत्नाकरविरचित एका-दशीमहात्म्य | ,, | ५१ |
| ३९ इयबतरावकृत एक वेदांतप्रकरण | ,, | ५२ |
| ४० शालिवाहनाच्या तेराव्या शतकांतील एक मानभावी ग्रंथ | वि. का. राजवाडे | ५३ |
| ४१ श्रीचक्रधराची दिनचर्या | ,, | ६१ |
| ४२ चक्रधराची प्रसादसेवा | ,, | ७४ |
| ४३ मानवभावांच्या ब्रह्मविद्येची स्थूल तत्त्वें | ,, | ७८ |
| ४४ ज्ञानेश्वरकालीन गोमांतकी मराठी ताम्रपट | द. वि. आपटे | ८३ |

| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ४५ | मठांची देशमुखी | वि. का. राजवाडे | ८६ |
| ४६ | भट ( पेशवे ) यांची वंशावळ | ,, | ९१ |
| ४७ | शिवाजीच्या एका नवीन हकीकती बखरीचीं तीन पानें | ,, | ९७ |
| ४८ | पटवर्धन सरदारांवरील एक प्रशस्ति | ,, | १०० |
| ४९ | धनगराची ओंवी ६ वी | वा. दा. मुंडले | १०२ |
| ५० | जुनीं मराठीं गीतें | ,, | १०४ |
| ५१ | संभाजी राजाचे पंडितराव | कृ. वि. आचार्य कालगांवकर | १११ |
| ५२ | केदारलिंगाचें अष्टक | म. मो. भानू फडणीस | ११३ |
| ५३ | रत्नाकराची गीतेवरील टीका | शं. श्री. देव | ११६ |
| ५४ | वडगांव मठाची परंपरा | कृ. वि. आचार्य कालगांवकर | ११८ |
| ५५ | श्री० रघुनाथराव यांचें समाधीस्थान व दहनभूमि | पां. न. पटवर्धन | १२२ |
| ५६ | मलिकंबर याचें मृत्युस्थान | ,, | १२३ |
| ५७ | श्रीमन्नृसिंह सरस्वतींचा काळ | चिं. वि. वैद्य | १२३ |
| ५८ | आनंदीबाईचा दुसरा एक पुराणीक | वि. का. राजवाडे | १२४ |
| ५९ | मुठींतील पदार्थ ओळखण्याचे मराठी श्लोक | ,, | १२६ |
| ६० | देवदासकृत वेंकटेश स्तोत्राची नवी प्रत | ,, | १२७ |
| ६१ | शकुनवंति संस्कृत | ,, | १२७ |
| ६२ | असमसाहस | ,, | १२९ |
| ६३ | कूट प्रश्नोत्तर | ,, | १३० |
| ६४ | शिवानंददासकृत पद | ,, | १३१ |
| ६५ | रामनवमीसंबंधीं श्लोक | ,, | १३१ |
| ६६ | कृष्णदयार्णवशिष्यकृत श्लोकाष्टक | ,, | १३२ |
| ६७ | भागवत पुराणाविषयीं दोन शब्द | पांडुरंग वामन काणे | १३३ |
| ६८ | व्याडीचा संग्रह | ,, | १३४ |
| ६९ | शाहाजी महाराजांचें वृंदावन व निधनतिथि | पां. न. पटवर्धन | १३५ |
| ७० | भोंसल्यांच्या वसतींच्या गांवांची यादी | ,, | १३८ |
| ७१ | रामचंद्र गणेश कानडे यांची वंशावळ | ,, | १४१ |

| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ७२ | गोविंद भगवंत पिंगळे | पां. न. पटवर्धन | १४२ |
| ७३ | संभाजी व शेचुन्निसा | ,, | १४३ |
| ७४ | खुरशेटजी जमशेटजी मोदी | ,, | १४६ |
| ७५ | पेशव्यांच्या स्तुतिपर काव्य | ,, | १४६ |
| ७६ | हणमंते यांची एक सनद व वंशावळ | ,, | १५४ |
| ७७ | श्रीएकनाथांचा वंशवृक्ष | ,, | १५७ |
| ७८ | श्रीशिवदिननाथांचा वंशवेल | ,, | १६० |
| ७९ | अनंत कविकृत श्रीमन्मध्वस्तोत्र | कृ. वि. आचार्य कालगांवकर | १६१ |
| ८० | गोपाळनाथांचे कृष्णलीलेचे अभंग | ,, | १६५ |
| ८१ | जिजिया पट्टीसंबंधांत औरंगजेबास पत्र कोणीं लिहिलें ? | पां. न. पटवर्धन | १६६ |
| ८२ | औरंगाबाद येथील मुकबेऱ्यावरील फारसी लेख | ,, | १७० |
| ८३ | पंचोपाख्यान : महालिंगदासकृत | विनायक लक्ष्मण भावे | १७१ |
| ८४ | देवरकी | कृ. वि. आचार्य कालगांवकर | १७२ |
| ८५ | शाहाणवे पद्धति | वि. रा. सरज्योतिषी | १७२ |
| ८६ | नाथनारायणांची संतमाळ | गो. का. चांदोरकर | १७४ |
| ८७ | जीवनकृत श्रीरामस्तोत्र | ,, | १७५ |
| ८८ | जीवनकृत चंडिकाष्टक | ,, | १७६ |
| ८९ | कासिरामकृत शांतिरस नाटक | स, म. दिवेकर | १७७ |
| ९० | मध्व शब्द कोठें आहे ? त्याचा अर्थ काय ? | कृ. वि. आचार्य कालगांवकर | १७७ |
| ९१ | वडगांव मठाची माहिती | ,, | १७८ |
| ९२ | पंडित कविकृत विक्रमचरित्र | ,, | १८० |
| ९३ | विसदेओ | वि. का. राजवाडे | १८४ |
| ९४ | उपाहाणो | ,, | १८५ |
| ९५ | नरहरि मोरेश्वरांचें उद्योगपर्व | स, म, दिवेकर | १८६ |
| ९६ | जव्हार संस्थानचा राजशक | ,, | १८८ |
| ९७ | दक्षिणी वैश्यांचीं गोत्रें व प्रवर | द. वि. आपटे | १९० |
| ९८ | मराठ्यांच्या इतिहासांतील कांहीं स्त्रिया | पां. न. पटवर्धन | १९१ |

| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ९९ | चिंतामणकृत शिवादिनाष्टक | शं. श्री. देव | १९५ |
| १०० | शिवगुरुदास पीतांबर | ,, | १९६ |
| १०१ | अनंतकृत दामाजीची रसद | कृ. वि. आचार्य कालगांवकर | १९७ |
| १०२ | शंभर वर्षापूर्वी तुकारामबोवा देहूकर यांच्या योग्यतेबद्दल तंटा | वि. का. राजवाडे | १९९ |
| १०३ | कृष्णदास तानाकृत महाबळभट कथन | गो. का. चांदोरकर | २०० |
| १०४ | लीळासंवादांतील संकेत | ,, | २०२ |
| १०५ | विष्णुदासनामा | ,, | २०४ |
| १०६ | श्री. कान्होबा–मढी | ना. य. मिरीकर | २०५ |
| १०७ | कुमठे येथील राणे भोसल्यांची हकीकत | पां. न. पटवर्धन | २१४ |
| १०८ | आनंदराव काशी कोतवाल | ,, | २१७ |
| १०९ | त्रिपुटीचे गोपाळनाथ | ,, | २१८ |
| ११० | दाभाड्यांची अहमदनगरावर स्वारी | ,, | २१९ |
| १११ | वाकोजी ढमढेरे | ,, | २२१ |
| ११२ | बहादुरगड | ,, | २२३ |
| ११३ | पिंपरी येथील मोकाशांची सनद | ,, | २२४ |
| ११४ | साताराचे गुजर | ,, | २२६ |
| ११५ | सोलापूर किल्यासंबंधीं कैफियत | ,, | २२८ |
| ११६ | तुळशीबाग | ,, | २३३ |
| ११७ | लिंब गोव्या शेजारील जाधवांच्या वाड्यांत सांपडलेला एक मराठी ताम्रपट | स. मा. दिवेकर | २३७ |
| ११८ | कविजंग व पेशवे | पां. न. पटवर्धन | २४० |
| ११९ | गोव्याचे भाषेंतील पद | द. वा. पोतदार | २५७ |
| १२० | गोविंदतनयगिरिकृत व्यंकटेशाची जयंती | वि. का. राजवाडे | २५९ |
| १२१ | गर्गाचार्यकृत शकुनावलि | ,, | ,, |
| १२२ | पांडुरंगकृत नवा अभंगाची विनंति | ,, | ,, |
| १२३ | सिद्धपाल केसरीकृत मल्हारिमाहात्म्य | ,, | ,, |
| १२४ | तांब्याच्या पऱ्यांवर खोदलेल्या मेहरपी | ,, | २६० |
| १२५ | दत्तकवीकृत श्लोक | ,, | २६१ |

| अनुक्रमांक नांव | लेखक | पृष्टांक |
|---|---|---|
| १२६ बाबूनाथ कवी | ,, | २६२ |
| १२७ रामा जनार्दनकृत आरती अनंतभुजाची | ,, | २६३ |
| १२८ ललिताचीं पद्यें | ,, | ,, |
| १२९ दासबाळाकृत कबीराख्यान | ,, | ,, |
| १३० आनंदकृत माधवानलकथानकं | ,, | २६४ |
| १३१ शामसुंदरकृत अनसूयाचरित्र | ,, | २६४ |
| १३२ लोलिंबराज व रत्नकलाचरित्र | द. वा. पोतदार | २६४ |
| १३३ माधवनंदन | ,, | २६६ |
| १३४ रामजोशीकृत सुभद्रेचा पवाडा | ,, | २६७ |
| १३५ त्रुटित उदाहरण | ,, | २६८ |
| १३६ मातृकानिघंट | ,, | २६८ |
| १३७ सच्चिदानंदाचा स्वात्मबोध | ,, | २६९ |
| १३८ रामकृष्णकाव्यम् | ,, | ,, |
| १३९ सोमाजी सकलकळ्या | ,, | ,, |
| १४० दार्जीराव देशपांडे कोळेवाडीकर ऊर्फ नारायणस्वामी यांचें अभंगचरित्र | ,, | ,, |
| १४१ कृष्णलीलेची एक लावणी | ,, | २७० |
| १४२ गोपीनाथकवीचा नारळीप्रसाद | ,, | ,, |
| १४३ श्रीधरकृत उदाहरण | ,, | २७१ |
| १४४ बहिणाबाईची गुरुपरंपरा | ,, | ,, |
| १४५ मध्वनाथकृत कृष्णजन्म | ,, | २७५ |
| १४६ सायंदेववंशज साकरेकृत अनुसेय आख्यान | ,, | २७५ |
| १४७ गणेशदासकृत भूचंद्राख्यान | ,, | २७५ |
| १४८ लावनी | ,, | २७६ |
| १४९ दीनकविकृत पंचीकरण | ,, | २७८ |
| १५० अलमखान गुरु नागेश्वर | गं. ना. मुजुमदार | २७९ |
| १५१ मारश्वरसुत काशी | ,, | २८० |
| १५२ गिरिधर गुरु दिगंबर | ,, | २८० |
| १५३ राजाराम | ,, | २८१ |

| अनुक्रमांक | नांव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १५४ | रेवणसिद्ध | " | २८२ |
| १५५ | विठा गुरु रेणुकानंदन | " | २८३ |
| १५६ | संतुबाई | " | २८४ |
| १५७ | अनंतकृत गर्भगीताटीका | " | २८५ |
| १५८ | भगवंतशिष्य शिवदास | " | २८६ |
| १५९ | भिका–भिक्षु मुनि | " | २८७ |
| १६० | केसरिनाथ शिष्य महिपति | " | २८९ |
| १६१ | ज्ञानदेवाचा सच्चिदानंदास लाखोटा | " | २९० |
| १६२ | देवदासकृत भगवद्गीता टीका | " | २९२ |
| १६३ | नागेशात्मज विठल (वामनाचा शिष्य) | " | २९३ |
| १६४ | जनार्दनसुत | " | २९३ |
| १६५ | गोविंदसुत नंदन | " | २९४ |
| १६६ | वामनकृत भीष्मप्रतिज्ञा | " | २९५ |
| १६७ | अथर्वण गंगाधर | " | २९५ |
| १६८ | पंडित | " | २९६ |
| १६९ | हरिहर | " | २९६ |
| १७० | मातुश्री येसूबाईसाहेब यांचें एक पत्र | पां. न. पटवर्धन | २९८ |
| १७१ | तकरीबखान कां मुकरबखान ! | " | २९९ |
| १७२ | राजगुरु दादाजी कोंडदेव यांची वंशावळ | " | ३०० |
| १७३ | हरभटबाबा पटवर्धन यांची समाधी | " | ३०२ |
| १७४ | बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार | " | ३०२ |
| १७५ | श्रीसाखी | वि. का. राजवाडे | ३०३ |
| १७६ | श्रीवरस्पानी नाझरेकर यांचा समाधी-काल व परंपरा | पां. न. पटवर्धन | ३०५ |
| १७७ | श्रीधरस्वामीकृत संतमाळा व संप्रदायपरंपरा | का. ना. साने | ३०८ |
| १७८ | जयरामस्वामी वडगांवकर यांचे मठासंबंधीं कांहीं कागद | सं. चिं. मेहेंदळे | ३१३ |
| १७९ | चिमणाजी दामोदर मोघे ( रिंगणगांवकर ) | " | ३१८ |
| १७९(अ) | पालकरांचें एक पत्र | का. कृ. लेले | ३२८ |

| अनुक्रमांक | नाव | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १८० | मानभाव व त्यांचे पंथासंबंधीं महाराष्ट्रसारस्वतांतील उल्लेख | सं. चिं. मेहेंदळे | ३२९ |
| १८१ | जुन्या ज्ञानेश्वरी-संहितेच्या संशोधनाची आवश्यकता | ,, | ३३२ |
| १८२ | आई आदिपुरुष व श्रीसमर्थ | द. वा. पोतदार | ३३७ |
| १८३ | कान्हो पाठकाचा गुरू | ,, | ,, |
| १८४ | जयराम स्वामी | ,, | ,, |
| १८५ | शामाराध्य कवि | वि. ल. भावे | ३३९ |
| १८६ | विष्णुदासनामा | गं. ना. मुजुमदार | ३४० |
| १८७ | प्रेमदास | ,, | ,, |
| १८८ | शामदासविरचित गरुडाख्यान | ,, | ३४१ |
| १८९ | स्वरूपानंदविरचित गर्भगीताटीका | ,, | ,, |
| १९० | वडवाळसिद्धाची अष्टपदी | ,, | ३४२ |
| १९१ | गोपाळ रघुनाथविरचित चंद्रावळी आख्यान | ,, | ,, |
| १९२ | ग्रंथांची एक जुनी यादी | कृ. वि. आचार्य | ३४३ |
| १९३ | कृष्णराव खटावकर यांची माहिती | ,, | ३४९ |
| १९४ | कारस्कर | वि. का. राजवाडे | ३५१ |
| १९५ | पेशव्यांचें पंचांग | वि. रा. सरज्योतिषी | ३५२ |
| १९६ | वडूथ येथील शंकुतेश्वर | पां. न. पटवर्धन | ,, |
| १९७ | नगरचे किल्ल्यासंबंधानें कांहीं नवीन माहिती | ,, | ३५४ |
| १९८ | नरहरी मोरेश्वराचा गुरु कोण ? | ,, | ३५८ |
| १९९ | महिपती उज्जनीकर | भा. रा. भालेराव | ३५९ |
| २०० | खंडेराव हरींची छत्री | ,, | ३६० |
| २०१(अ) | कांहीं शब्दांच्या व्युत्पत्त्या | शि. म. परांजपे | ३६३ |
| २०१(ब) | व्युत्पत्त्या | वि. का. राजवाडे | ३८५ |
| | सूची | | |

भा. इ. सं. मंडळ पुणें

# शके १८३७ चें वार्षिक इतिवृत्त

## १ अनामककविकृत भागवत–दशमस्कंधाचे दोन अध्याय मराठी

या अध्यायांच्या प्रारंभीं किंवा समाप्तीस कवि आपलें नांव देत नाहीं. त्या वरून ग्रंथ कोणीं केला तें कळण्यास मार्ग नाहीं. ओंवी ज्ञानेश्वराच्या धर्तीवर आहे, म्हणजे चवथ्या चरणांत प्रास नाहीं व चवथा चरण चार किंवा पांच अक्षरांचा आटपशीर आहे. भाषे वरून दिसतें कीं कवि एकनाथकालीन निःसंशय आहे. सबंध ग्रंथ सांपडता तर ग्रंथसमाप्तीस कर्त्याचें नांव प्रायः येतें. सदर प्रत कऱ्हाडास सांपडली असून, ती त्रिंयकजी जाधव चिखलखेडकर याची आहे व यानें च नकल केलेली आहे.

॥ हस्ताक्षर त्रिंबकजी जाधव कीलेदार हरिहर येथें लीहिलें ॥

असा मुखपृष्टा वर शेरा आहे.

॥ कोन्ही अभीलाशु नका ॥

असा निषेध हि केला आहे. शक १६९३ विरुतींत नकल झाली. शक १६९३ ला विरुत वर्तमान आहे, गत नाहीं.

वि. का. राजवाडे

## २ सूर्यनारायणाची कहाणी व सूर्यव्रत

१ सूर्यव्रताची प्रक्रिया हेमाद्रि इत्यादिंच्या व्रतग्रंथांत आहे. ती संस्कृतांत आहे. महाराष्ट्रांतील स्त्रियांनीं ती मराठींत कहाणीच्या रूपानें प्रचलित ठेविली आहे. ही काहणी संस्कृतांतील मजकुराचा तर्जुमा आहे; पण हींत हा विशेष आहे कीं हा तर्जुमा कोण्या शास्त्रीपंडीतानें केला नसून कोण्या स्त्रीनें केला आहे. तर्जुमा करणारी स्त्री कोणी तरी एक च होती. कारण नागपुरा पासून गोंव्या पर्यंतच्या

साऱ्या महाराष्ट्रभर ह्या कहाणींचें रूप पुढें दिल्या प्रमाणें एक च एक आढळतें. क्वचित् लहानसहान फेरफार असतात; परंतु कथेची भाषा सर्वत्र एकसारखी असते. असा च पाठ साऱ्या देशभर प्रचलीत व्हावयाचा म्हणजे तो कोण्या तरी एका प्रतिष्ठित ग्रंथकर्त्यानें केला असला पाहिजे.

२ सूर्यनारायणाची कहाणी, सोळा सोमवाराच्या कहाण्या, पिठोरीची कथा, वटसावित्रीची कहाणी, या कहाण्या पूर्वीं व आतां हि श्रीमंताच्या घरीं भिक्षुकांच्या बायका चांगल्या सुरानें व ठेकेदार आवाजानें म्हणत व म्हणतात. पांचपंचवीस बायका बसतात व मध्यें म्हणणारीण बाई बसते व ती ह्या कहाण्या योग्य हावभाव करून शांत व गंभीर स्वरानें म्हणते. वटसावित्रीची कहाणी अशा बाईच्या तोंडून ऐकतांना ऐकणाऱ्या स्त्रियांच्या नेत्रांना अश्रुधारा लागलेल्या मीं पाहिल्या आहेत. व्रतें, उद्यापनें, स्त्रीधर्म, इत्यादींचें शिक्षण पूर्वकालीं या कहाण्यांच्या रूपानें स्त्रियांस मिळे.

३ प्रस्तुतच्या सूर्यनारायणाच्या कहाणीचा उगम संस्कृतांतून आहे, हें स्पष्ट आहे. मूळ संस्कृतांत ही कथा व हें व्रत केव्हां सुरू झालें तें नक्की सांगतां येत नाहीं. सूर्याची पूजा वैदिक आहे. तेव्हां वैदिक काला पासून ही कथा ऊर्फ कहाणी भारतवर्षांत असण्याचा चांगला च संभव दिसतो. तें कांहीं असो, ही कहाणी लोककथांचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. व्रत केलें असतां व काहणी ऐकिली असतां काय होतें व व्रत न केलें व काहणी न आइकिली तर काय होतें, हें अन्वयव्यतिरेकन्यायानें कहाणींत स्पष्ट केलें आहे.

४ सारस्वताचा काहाण्या म्हणून जो एक भाग आहे तो पूर्वकालीं तोंडीं च प्रचलित होता, लेखनिविष्ट झाला नव्हता, असा माझा आजपर्यंत समज होता; परंतु ह्या प्रस्तुतच्या कहाणीची पोथी कऱ्हाडास एका भिक्षुकाच्या पोथ्यांच्या गळाठ्यांत जेव्हां मला आढळली, तेव्हां माझ्या चुकीच्या समजांत मला फेरफार करावा लागला. अधिकमाहात्म्य, सत्यनारायणाची कथा, अनंतव्रताची कथा, वगैरेंचीं संस्कृतांतून मराठींत शास्त्र्यांनीं केलेलीं भाषान्तरें माझ्या आढळांत आलीं होतीं. पण कहाण्या लिहून काढिलेल्या मीं आजवर पाहिल्या नव्हत्या. प्रस्तुत कहाणी बरी च शुद्ध लिहिली असून बाया जशी ती म्हणतात तशी च उतरली आहे. पोथी केवळ बायांच्या च उपयोगाची आहे. कारण, त्या च ह्या कहाण्या म्हणतात ; प्रायः पुरुष म्हणत नाहींत. तेव्हां, असें एक अनुमान करणें रास्त दिसतें कीं, पूर्वकालीं महाराष्ट्रांतील भिक्षुकांच्या कांहीं बायांना वाचतां येत असावें. सरदारांच्या बाया तर वाचीत हें जगजाहीर आहे, पण भिक्षुकांच्या हि बाया वाचीत ह्याला प्रस्तुत पोथी प्रमाण आहे. पोथी मंडळाच्या संग्रहाला ठेविली आहे.

वि. का. राजवाडे

॥ श्रीगणेशाय नमः ॥

## ॥ अथ सूर्यव्रतं ॥

आईका परमेश्वरा सूर्यनारायणा तेतीस–कोटी–देवा ब्राह्मणा माझी काहणी आईका ॥

मार्गशीर्षमास येर्याल । सदणे पास येईल । सूर्य न उगवे माणसाने उठावें । गंगेस जावें । स्नान करावें । बारा रेघांचें मंडल काडावें । बारा अक्षतीं पूजा करावीं । १२ अक्षतीं १२ अर्घ्यी १२ देवीं काहणी करावी । बारा तातू सुताचे । तेरावा पाटाचा । तेरा गांठीं द्याव्या । हळदीन घोळावा । डावे हातीं बांधावा । ६ गांठीचा गळेंत बांधावा । मनचीं मनकामना झाली म्हणजे पाटचा करावा १३ गांठी देऊन उजवे हातीं बांधावा । चा म्हैने चाळावा । सा म्हैने फाळावा । वैशाखमहिन्यांत उद्यापन करावें । उद्यापनीं १ शेर तूप १ शेर साखर ३ शेर मैदा । तेरा लाडू करावे । ६ ब्राह्मणास ६ देवास १ कन्याकुमारीस वाण द्यावे । ऐसे केल्या काय होय । निर्धना धन होय । निपुत्रिकां पुत्र होय । हरपलें सांपडें । न–भेटलें भेटे । दूरा देशींचा सुदी येई । मेलेचा तारी उठे । ऋणाचा पांक फीटे । अंत काळीं महाविष्णूची भेट होय ।

---

दुबळासा ब्राह्मण होता । त्याच्या घरांत खायास नाहीं । बाईल म्हणते मोठ्या शारांत जा ना । काइ मिळवोन आणा । हातीं काठी खांद्यावर धाकेटा गेला । तई इंद्राची इंद्राणी चंद्राची रोहिणी नळाची दमयंती ईश्वराची पार्वती चौघी मिळोन गंगे गेल्या । स्नान केल्या । बारा रेघांचें मंडल काडलें । तेथें काहणा आईकिली । बारा तांतू सुताचे । तेरावा पाटाचा । तेरा गांठी द्याव्या । हळदींत घोळावा । सूर्यनारायणाच्या पाईं ठेऊन डावे हातीं बांधावा । मनींची मनकामना झाल्यावर उजवे हातीं बांधावा । साहा महिने चाळावा । साहा महिने पाळावा । वैशाख म्हैन्यांत उद्यापन करावें । उद्यापनी शेर तूप शेर साखर तीन शेर मैदा । तेरा लाडू करावे । साहा देवास साहा ब्राह्मणास (एक) कन्याकुमारीस वाण द्यावे । ऐसें केल्या काय होय । निर्धना धनें होंति । निपुत्रिकां पुत्र होय । न भेटलें भेटे । हरपलें सांपडे । दूरा देशींचा शुद्धि होय । मेलेचा तारी उठे । ऋणाचा पांक फीटे । अंतकाळीं महाविष्णूची भेट होय । अर्धी काहणी जाहाली । अर्धी धोकटी भरली । सगळी काहणी जाहाली । धोंकटी भरोन डुचंब-ळली । घरीं गेला । बायको बायको धोंकटी उतर । कोणाचें चोरून आणिलेंस । कोणाचें पळवून आणिलेंस । कोणाचें चोरून नाहीं आणिलें । कोणाचें पळवून नाहीं आणिलें । इंद्राची इंद्राणी चंद्राची रोहिणी नळाची दमयंती ईश्वराची पार्व-ती । चौघींची कहाणी आईकिली । काहणी ऐकिल्यानें एवढें फळ । व्रत घेतल्यानें केवढें फळ । जा पुसोन या । मार्गशीर्षमास येईल । इ० इ० इ०

---

मुली दोघी नवऱ्या होत्या । बाहीर जावूं नको । फीरो नको । राजा देखेल । प्रजा देखेल । चटकी करील । दासी करील । त्या मुली खेळायास गेल्या । त्या गावचे राजे शिकारीस आले होते दोघे। त्याणी देखल्या । या मुली कोणाच्या । भटा भिक्षुकाच्या । जावुन सांगा । येक राजास द्या । येक प्रधानास द्या । एक म्हणतो । भटा भिक्षुकाच्या मुली घेउन काय कराल । दासी कराल । चटकी कराल । येक म्हणतां २१ गेलें ।५ म्हणतां २५ गेले । ब्राह्मणास बलावून त्याला गादी बसायास दिली । मुडा टेंकायास दिला । फुलांचा शेला दिला । हाती विडा दिला । ब्राह्मणा भियो नको । कापों नको । येक मुल राजास दे । येक प्रधानास दे । बरें म्हटलें।त्या च मुहूर्ते डाळी सळी दळों घातल्या । रथ घोडे भंडरें नगारे निशाणं वाजत गाजत लग्न लावले । आपण बसले हस्तीवर । राण्या बसल्या सुखासनावर। ऐशा घरास गेल्या । ब्राह्मण घरास गेला। बाईको म्हणते जा पाई । मुली गेल्या त्या पाई । तुम्ही कां जा ना बरें । जातो तर । काय घ्यावें । चोळी घ्यावी । कुंकू घेवे । जातो तं वांळला पिंपळ पडलाहे । पिंपळा पिंपळा काहणी आईक । तुजी काहणी कोठे आईको । आइकेन म्हटल्या शाखा नाहीं । पाहीन म्हटल्या पल्लव नाहीं । बेर ! तु माझी काहणी आईक । आईकल्याने शाखा येती । पल्लव येती । बारा अक्षता त्याला दिल्या । बारा अक्षता आपण घेतल्या । चित्तमनें काहणी सांगीतली । चित्तमनें काहणी आईकली । अर्धी काहणी जाली । शाखा आल्या । पल्लव आले । पुर्ती काहणी जाली । पिंपळ उठोन सळसळों लागला । ब्राह्मणा तुझी काहणी आयीकल्या येवढें फल । व्रत केल्या केवढें फळ । व्रत सांगतों । मार्गशीर्ष–मासी इ. इ. इ.

~~~~~~~~

चांदणे पासीं काहणी जाली । तेथून उठला । पुढां गेला । तं वाळली विहीर पडली आहे । तेथे जावून उभा राहिला । विहिरी विहिरी काहणी आयीक । आईकेन म्हटल्या जल नाहीं । पाहेन म्हटल्या स्थळ नाही । आईकेन म्हटल्या जल येयील । आईकेन म्हटल्या स्थळ होईल । बारा अक्षता विहिरीत टाकल्या । बारा अक्षता आपण घेतल्या । चित्तमनें काहणी सांगीतली । चित्तमने काहणी आईकली । अर्धी काहणी झाली । विहीर अर्धी झाली । काणी संपली विहीर भरोन डुचंबळो लागली । काणी आईकल्याचे येवडें फळ । व्रत घेतल्याचें काय फळ । व्रत सांगतो । मार्गशीर्ष–महिना इ. इ. इ.

~~~~~~

तेथून उठला । पुढें गेला । गळत–कोष्टा ब्राह्मण पडला आहे । ब्राह्मणा ब्राह्मणा काहणी आईक । तुजीं काहणी कोठें आईकों । आईकेन म्हटल्या कान नांही । पाहेन म्हटल्या डोळे नांही । बरें तु माझी काहणी आईक । आईकेन म्हटल्या कान येत्याती । पाहीन म्हटल्या डोळे येती । पुसला वासला बसला गेला । बारा अक्षता चोंबीवर

ठेवल्या। बारा अक्षता आपण घेतल्या । चित्तमने काहणी सांगीतली । चित्त देवून काहणी आयीकली । अर्धी काहणी झाली । कान आले । डोळे आले । पुर्ती झाली । झटकर उठला । उभा राहीला । १६ वर्षाचा राजकुमार झाला । ब्राह्मणाचा चरणीं लागला । काहणी आयीकल्या येवडें फल । व्रत घेतल्या केवडें फळ । व्रत सांगतो मार्गशीर्ष महिना इ. इ इ.

तेथून उठला । पुढें गेला । वाण्याचें दुकानी उभा राहीला वाण्या वाण्या काहणी आयीक । तुजी काहणी कोठें आयीको - आयकेन म्हटल्यास माजा घरात खायास नाही । जेवायास नाही । सवदा सुत विकत नाहीं बरें तुं माझी काहणी आयीक । काहणी आयीकल्या जेवायास होयील । खायास होयील । सवदा सुत विकेल । बारा अक्षता त्याला दिल्या । बारा अक्षता आपण घेतल्या । चित्तमने काहणी सांगीतली । चित्तमने काहणी आयीकली । अर्धी काहणी झाली । सवदा सुत विको लागला । पुर्ती काहणी झाली । ब्राम्हणा तुझी काहणी आयीकल्याचें येवढें फळ । व्रत घेतल्याचें काय फळ । व्रत सांगतो मार्गशीर्ष— मासी इ. इ. इ.

तेथून उठला राजाचे पाणवठी उभा राहिला । राजाच्या दासी पाण्यास आल्या होत्या । अग दासी कोणाच्या । आम्ही राजांच्या । राजाचे राणीस सांगा । तुमचा बाप आला हाय । कैसा आहे । फाटकें नेसला आहे । फाटकें पांघुरला आहे । बरें ! म्हणुं लागली । मागेल दारानें घेऊन या । मागेल दारे आणली न्हाणला माखला एक पितांबर नेसायास दिला । एक पांघरायास दिला । संड्स पक्वान्नें केलीं । बाबा गा जेव । बाई ग जेवूं कसीं । जाचा नावाने खातो जेवतो । त्याची चार अक्षरें पढलो नाही । त्याची स्तूत केली नाही । तर तु जा। लुटपुट सगळा दिवस संपेना । राजा देखेल। काय करते टाणा करते टोमाणा करते अळणी भात कोठें गिळूं कळाव्या कांकणा पुढें । पिवळा दोरा कोठें बांधु । मर मर पापणी । मर मर चांडाळणी । तो उपास बापा पडला । सूर्यनारायणा पडला ।

तेथून उठला दुसरे लेकीचें घरी गेला । प्रधानाचे वेशी उभा राहिला । प्रधानाच्या दाशी पाण्या आल्या । अग दाशी कोणाच्या।प्रधानाच्या । प्रधानाचे लेंकीस सांगा । तुझा बाप आला बापजी बापजी । तुमचा बाप आला। कसा आला । फाटके नेसला तुटकें पांघुरला हस्ती घोडे पाठवून वाजवीत गाजवीत घरास आणला । न्हाणला माखला एक पितांबर नेसायास दिला । एक पांघरायास दिला । संड्स

पक्वान्नें केलीं। बाबा गा जेव बाई गे जेउं कसा ज्याचा नांवे जेवितों ज्याचा नावे खातो त्याची चार अक्षरें पढलों नाहीं। त्याची स्तूत केली नाहीं बरे कर। ताट भरून भंडारा आणला। ताटभर मोत्या आणली बार मोत्या त्यास दिली बारा आपण घेतली। चित्तमनें काहणी सागीतली चित्तमने काहणी आयीकली बापा जेवूं खावूं घातला। मायीस चरखें दिली। वाजत गाजत पाठवुन दिला वड़ले लेकींचीं लेंकरे म्हणतीं। बाईगे खायास दे लोकाचे आजे येतात आंगीं कुंचडी शिवोन देतात त्याणें घेवून अवदसा दौली। तुमची मावशी गावी नांदतें। तिचे पाशी खायास मागा। वडिलें लेक उठला प्रधानाचा पाणीवटेस उभा राहिला। तिच्या दासी पाण्यास आल्या। अग दासी कोणाची प्रधानाची प्रधानाचे बाईकोस सांग तुजे बहिणीचा मुळ आला। कसा आहे फाटके नेसला तुटके पांघुरला मागे दारे आणला न्हाणला माखला जेवूं खावूं घातला। एक विडा हाती दिला। जा म्हटले पैक्याचे बांधून दिले। वाटेने जाताना सूर्यनारायणें चोराचे सोंगाने लुटून नेले। घरी गेला आईस सांगितले। देवाने (दिले) कर्माने नेले। अजाचा श्राफ फलास अला। दुसरा मुलगा वुठला मावशीचा पाणवशीस उभा राहिला। दासी पाण्यास आल्या अगे दासी तुम्ही कोणाच्या प्रधानच्या प्रधान-बायकोस सांगा तुमचा बहिणीचा मुलगा आला कसा आला फाटके नेसला तुटके पांघरला मागील दरवाजान आणला नाऊ घातला जेउ खाऊ घातला विडा दिला कावाळ्या पोखरून पैका भरून दिला। सूर्यनारायण माळ्या रूपानें घेऊन कावाळें नेलें। रडत घरी गेला। देवाने दिले कर्माने नेले। अजाचा श्राप फळास अला। तीसरा मुलगा उटला। मावसी—घरास आला पाणवथेस उभा राहिला। दासी पाण्यास आल्या। अगे तुम्हि कोणाच्या। आम्हि प्रधानच्या प्रधान—बायकोस सांगा तमचे बहिणीचा मुलगा आला। कसा आला। फाटके नेसला तुटके पांघरला। मागले दरवाजाने आणला। नाऊ धोऊ घातला। जेऊ घातला। विडा दिला। काटी पोखरून पैका भरून दिला। वाटेने जाताना सूर्यनारायण गुराखेचे रूपाने घेऊन काटी निली। घरात रडत गेला। देवाने दिले कर्माने नेले अजा श्राप फळास अला। मग थोरली बहीण आली। पाणवथ्यास उभी राहीली। दासी पाण्यास आल्या। अगे दासी तुम्हि कोणाच्या। अम्ही प्रधानच्या प्रधानाच्या बायकोस सांगा। तुमची बहीण आली। कसी आली फाटके नेसली तुटके पांगरली मागील दरवाज्याने आणली। नाउ घातली जीऊ घातली बहिणीस म्हणते। बाप आला तुला राजलक्ष्मी दिली। मला दरिद्र दिले। अग तु त्यांची काहणी ऐकीली नाहिस। म्हणून दरिद्र आलें आतां कसें करूं आतां सूर्यनारायण काय कर्तोय आणि त्यांची आई आदित्या करिते हे पाहून तिचे पाय धर। मग ती राणी उटून सूर्यनारायणाकडे गेली। आदित्या होती। कोणी बायका आदित्यवारी नाऊन विंचरल्या। तो केस तिचे तोंडास गेला। ती बोलली। कोणी पापीणीने विंचरले

इतक्यांत राणीने पाय धरले अग कोण तूं मला शिवलीस विटाळ केलास ईचे मोटकुळे ईच्या विहीरीत टाका । इतके सांगीतलेवर दासीने मोटकुळे विहीरीत टाकले । मग ती पाणी भरून उचमळोन गेली । मग लोकानी माळ्यास सांगीतले की मळ्यात जाना की नाही । मळ्यात जाऊन काय करावयाचे आहे । विहीरीला पाणी नाही । पीक नाहीं । बगून या । मग माळी मळ्यात आला । बागेत बगीतले ते प्रफुल्लीत जाली आणी विहीर उचमळून गीली । बगतोय तोय मोटकुले वाहात येतेई । राणी म्हणाली की अरे माळ्या मला काड । मी भूत नाही । केत नाही मी राजेयाची राणी आहे । मग त्याने काडले । मग ती बहिर्णीचे घरी आली । बहीणीला सागीतले की जाऊन आदित्याचे पाय धरले । तिने माझे मोटकुळे विहीरीत टाकले । मग बहिर्णीने तीन मोती तीज जवळ ६ मोती आपण घेतलि । आणी काहणी चित्तमने सांगीतली । चित्तमने आइकली । नेसाया पितांबर दिला । जेवायास घातली । सांगीतले की काम सागीतल्या अन्न घेउन जाऊ नको । मग तीथून निघाली । वाटेने येतान माहरीण मोळी घेऊन भेटली । अगे माहरीणी काहणी ऐक । तुझी काहणी ऐकेन म्हटले तरी माझा मुलगा डोहात गेला । एक सर्पा खालला । बरे काहणी ऐक । तिज जवळ ६ आपण ६ मोती घेतली । चित्तमने काहणी सांगितली । चीत मने ऐकली । इतक्यात डोहात मुलगा गेल्याला सर्पाने खाल्याला आला । चंद्नाचि मोळी काहणी ऐकल्या एवडें फल । व्रत केल्या काय फल । पुडे गेली । कुष्टा ब्राह्मण आला । ब्राह्मणा काहणी ऐक ६ मोती ब्राह्मणास दिली । ६ मोती आपण घेतली । चित्तमने काहणी सांगितली । चित्तमने ऐकली । ब्राह्मणाचा गळत कुष्ट जाऊन ब्राह्मण चांगला जाला । सूर्या नारायण माळ्याचे व गुराखाचे व वाण्याचे रूपाने येऊन नारळ काटी कावाळे मसकरीने तुमचे मुलापासून घेतली । ती आपली घ्या । मग ती घेऊन घरास येत होती । इकडे राज्यलक्ष्मी आली । आणी राणीस मेणे पालख्या हाते घोडे सामोरी आली । मग राणी पालखीत बसून घरास आली । आणी राज्यलक्ष्मी भोगू लागली । तसी तुम्ही भोगा ॥ काहणी समाप्तः ॥ श्रावण पहिले आदित्यवारची ।

## ३ विष्णुदास-नामा-कृत बावणआक्षरी

१ विष्णुदास नामा शक १५१७ त झाला, हें इतिहासमंडळाच्या १८३३ च्या इतिवृत्तांत नमूद केलें आहे. याची ही बावनाक्षरी कऱ्हाडास सांपडली. पहिल्या तीन ओंव्या प्रास्ताविक आहेत. त्यापासून आठ सुद्धां ओंव्यांत ॐ नमः

सिद्ध हा पंचाक्षरी मंत्र साधिला आहे. नऊपासून चोविस सुद्धां ओव्यांत सोळा स्वरें आद्य साधिले आहेत. पंचविसाव्या ओवींत प्रथमाध्यायाची समाप्ती केली आहे. दुसऱ्या अध्यायांत व्यंजनांची मिसल लाविली आहे.

२ आद्याक्षरांत मंत्र गोंवायची संवय मोरोपंताला फार पण त्याच्या पूर्वी दोनशें वर्षे विष्णुदास नाम्याला हि हा छंद सूक्ष्मपणें होता असें दिसतें.

३ न अक्षर आद्यस्थानीं आणतांना नामदेवाचा उल्लेख विष्णुदास नामा करतो:—

" नामदेवा चें पवीत्र नाम उच्चारी आखंडीत"

असें ओव्यर्ध आहे. एकनाथकालीन विष्णुदास नामा ज्ञानेश्वरकालीन नामदेवाहून निराळा व दोन अडीच शें वर्षे अलीकडला आहे, या विधानाला खुद्द विष्णुदास नाम्याची च ही साक्ष उपलब्ध झाली आहे.

४ नामदेवा प्रमाणें च हा विष्णुदास नामा जातीचा शिंपी होता. याला प्रमाण खालील अभंग कऱ्हाड एथील एका बाडांतील आहे:—

अमंगळु भूमी सी । उगवल्या तुळसी । अपवित्र तया सी । म्हणूं न ये ॥ १ ॥
कागा विष्टा मधीं । उगवला पिंपळु । तया सि अमंगळु । म्हणूं न ये ॥ २ ॥
लोखंडा चा वाळा । परिसा लावीला । मागलिया मोला । मागूं न ये ॥ ३ ॥
दासीचिया पुत्रा । राज्यपट आला । मागली उपमा । देऊं न ये ॥ ४ ॥
विष्णुदास नामा । विठ्ठलीं मिळाला । सिंपी सिंपी त्याला । म्हणूं न ये ॥ ५ ॥

नामदेव व विष्णुदास नाम हे दोघे जातीनें शिंपी पडल्यामुळें व दोघे हि विठ्ठलभक्त उर्फ विष्णुदास पडल्यामुळें, त्या दोघां चे हि अभंग एका च व्यक्ती चे समजून छापले आहेत.

वि. का. राजवाडे

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥
॥ श्रीगुरुभ्यौ नमः ॥ श्रीदत्तात्रेयाय नमः ॥
ज्ञानरत्ना चा दिवा । हृदयेंघरा माजि लावावा ।
तरीं आंधारीं सांपडे ठेवा । पूर्वसंचिता चा ॥ १ ॥
पूर्वि म्यां केलीं गुरुभक्ति । म्हणौनि मज येव्हढि ज्ञानमति ।
तरीं बुदबावणी चि स्तुती । सांगेण आतां ॥ २ ॥
आतां श्रोते सावधान । बुदबावणी सांगेण ।
फीटे आज्ञानआंधकारपण । या मुर्खमना चें ॥ ३ ॥

ॐविवे शंभु गाईजे । वोखटे मनि नाधरीजे ।
वोळखी पडों नदीजे । तया तस्करा चि ॥ ४ ॥
नमन किजे गोविंदा । न लागीजे कवणा चीया झकवादा ।
न किजे निंदा । साधुजना चि ॥ ५ ॥
मनि दृढ होईजे । माहाविघ्न चुकाविजे ।
मति तर्क घेईजे । वडिला चा ॥ ६ ॥
सीव सीव म्हणीजे । सीवा सीं शरण जाईजे ।
सीकविलें किजे । मायबापा चें ॥ ७ ॥

धर्ममति करावि । धर्मकिर्ति वाढवावि । धुमाळी न घालावि । राणीवसा॥ ८ ॥
अवगुण सांडिजे ।अपशब्द न बोलिजे ।आशाभंगु न किजे । याचका चा ॥९॥
आवभाव किजे ।आप्तवर्गा मानु दिजे।आला आवस्वरु वोळखीजे।जाणतयानें॥१०॥
इछा वोखटि मोडिजे ।ईश्वरु ध्याईजे ।इछादान देईजे ।लक्षुमी आसतां ॥११॥
ईश्वरु सेविजे । ईछीली वस्तु घेईजे । ईछाफळ मागीजे । परमेस्वरीं ॥ १२ ॥

उसीरा न चालीजे मार्गु। उणीया सीं न किजे संगु ।
उपशांति न कीजे रागु । स्त्रीबाळका चा ॥ १३ ॥
ऊधार मैत्रा सीं न दीजे । ऊजागरपणें आसीजे ।
ऊणीं गोष्ट न बोलीजे । सभे माजि ॥ १४ ॥
रीता हातिं गुरुसीं न भेटिजे । रीणा चा संग्रह न किजे ।
+ + + + + + + + जाणतयानें ॥ १५ ॥
रीतराहाटिं आसीजे । रुषिवर्गा मानु दिजे ।
रीण आधमा चें न घेईजे । जाणतयानें ॥ १६ ॥
लिळाविणोदें आसीजे । लीखीतपत्रिका वाचीजे ।
लीहितां आळस न किजे । जाणतयानें ॥ १७ ॥
लिहुं चांगलें जाणिजे । लीखीत दुडदुडा वाचिजे ।
लिन होउनिं आसीजे । जगा माजि ॥ १८ ॥
ऐशवंत होईजे । एशकीर्ति जोडीजे ।
एकभाव धरीजे । देवचरणीं ॥ १९ ॥
ऐसा भाव धरीजे । ऐश्वर्ये सीं राहिजे ।
ऐक्यतत्विं वर्तिजे । विष्णुभक्ति ॥ २० ॥
ओस पुर जाणेजे । वोडि समर्था सीं न कीजे ।
वोजे राहिजे । जना मजि ॥ २१ ॥
औक्रिया सांडिजे । औगुण न कीजे ।
औदशा आलियां वोळखीजे । आप्तवर्गा सीं ॥ २२ ॥

आंतरीं निर्मळ आसीजे । आंसील पाहोणीं परणजि ।
आंतर न दीजे । सज्जना सीं ॥ २३ ॥
आपपरु वोळखीजे । आतीता सीं भजिजे ।
आतिराग सांडिजे । जाणतयानें ॥ २४ ॥
ईति श्री वोनामा । सांगे विष्णुदासनामा ।
येकाक्षरी सांगेण तुम्हां । श्रीगुरुप्रसादें ॥ २५ ॥

॥ राम ॥

॥ प्रथमो प्रसंग ॥

॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥

कल्पणा वोखटि मोडिजे । कळि जवळी उभें न राहिजे ।
कळावंता मानु दीजे । धुरे देखतां ॥ १ ॥
खरें खोटें जाणीजे। खरें गांठि बांधीजे ।
खळाळें नदी न उतरीजे । जाणतयानें ॥ २ ॥
गर्व बहुत न किजे । गंभीर होउनिं आसीजे ।
गमन किजे । चतुरा संगे ॥ ३ ॥
घणवटपणें आसीजे । घडे ते चि काम किजे ।
घडी भरी न राहिजे । पापीया संगे ॥ ४ ॥
णाणा विद्या आभ्यासीजे । नास फुडा होउं न दीजे ।
नावं राखीजे । वडिला चें ॥ ५ ॥
चंचळ चित्त न किजे । चळलीया जवळी उभें न राहिजे ।
चटपट न बोलिजे । सभे माजि ॥ ६ ॥
छळदीवस सांडिजे । छेत्रु तें न विसंबिजे ।
शब्द तो किजे । मायेबापा चा ॥ ७ ॥
जनन्नाथ सेविजे । जगीं परउपकार किजे ।
जन्म वायां जाउं न दीजे । जाणतयानें ॥ ८ ॥
झकवादा न लागीजे । झगडा वायां विण न किजे ।
झांसा न बोलिजे । भल तिया गोष्टी चा ॥ ९ ॥
या देवा सीं भजिजे । या देह्रा सीं रखीजे ।
या दुष्ट गोष्टीं नाईकीजे । घडी भरी ॥ १० ॥
टकटक न किजे । टसीन शब्द न बोलिजे ।
टपकरी कीजे । काम वडिला चें ॥ ११ ॥
ठसा नावां चा किजे । ठेवा जतन ठेविजे ।
ठाव न दीजे । कुसंगा सीं ॥ १२ ॥

डंबप्रपंच न किजे । डसत्या सर्पा सीं न खवळिजे ।
डगळपणें आसीजे । लोका माजि ॥ १३ ॥
ढंळों भाके न देईजे । ढळले मंदीरीं न बैसीजे ।
ढाळें चालिजे । काळा चेनी ॥ १४ ॥
नादलुब्ध न होईजे । न्याय रूपणा चा न किजे ।
नास चुकविजे । धर्म आचरतां ॥ १५ ॥
तप तिर्थ कीजे जाण । तिर्थ–दान पुण्य स्नान ।
तीर्थशुद्धमानसीं कीजे भजन । जाणतयानें ॥ १६ ॥
थोंथांड घेतां मोडिजे । थाक पाहोनिं चालिजे ।
थारा न देईजे । कुसंगा सीं ॥ १७ ॥
दरुषणा मानु दीजे । दंदी बहुता चा न होईजे ।
दान सुपात्रिं देईजे । जाणतयानें ॥ १८ ॥
धनवंता चा संग किजे । धर्मवंत होईजे ।
धड गावं वसविजे । वस्ती लागीं ॥ १९ ॥
नामदेवा चें पवित्र । नाम उच्चारी आखंडित ।
नामें होय हरिहारभक्त । नामाप्रय गोविंदा ॥ २० ॥
पंचवगत्र बोळगीजे । पवित्र साधु तो सेविजे ।
पाप न लाविजे । भल तिया गोष्टि ॥ २१ ॥
फावे तें चि बोलिजे । फळतें फुलतें झाडें तोडिजे ।
फड न पाडिजे । सोचीया चा ॥ २२ ॥
बरळ न बोलिजे । बाळका सीं संग न किजे ।
बहुत बडबड न किजे । जाणतया पुढें ॥ २३ ॥
भक्ति ते आराधीजे । भक्तिभावीं भीजे ।
भवसागरु तरीजे । साधुसंगति ॥ २४ ॥
मानु वडिला चा वाढविजे । माता पिता वंदीजे ।
मानुनिं चालीजे । जाणतयानें ॥ २५ ॥
या म्हणोनीं मानु दिजे । यश येईल तें बोलीजे ।
येकलें न जाईजे । भल तिया ठाया ॥ २६ ॥
रसाळ तें गाईजे । रमाणिके ठाईं वसीजे ।
रागें वैराग्य न कीजे । जाणतयानें ॥ २७ ॥
लळा स्त्रीबाळका सीं न दीजे । लाधलें त्याचा आळस न कीजे ।
लक्षण जाणीजे । सर्वशास्त्रा चें ॥ २८ ॥

वसुदेवीं भजिजे । वाउर विधुर न बोलिजे ।
वाफधान्य पेरीजे । जाणतयानें ॥ २९ ॥
सद्गुरु सेविजे । सत्वधीर होईजे ।
संपती वाढविजे । जाणतयानें ॥ ३० ॥
खेवो ये तें न बोलीजे । खवळला भुजंग न पाहिजे ।
खोटें न राहिजे । गोत्रजा मध्यें ॥ ३१ ॥
शास्त्रविद्या आभ्यासीजे । साच शब्द बोलिजे ।
सांकडें पडो न दीजे । स्वामी काजिं ॥ ३२ ॥
हाळवटपणें नसीजे । हारी सीं शरण जाईजे ।
हांसोनि मानु दिजे । साधु जना सीं ॥ ३३ ॥
आलें उत्तर शुद्ध बोलिजे । आलें यश भलतिया सीं न देईजे ।
आळस न किजे । भलतिया गोष्टी चा ॥ ३४ ॥
ळळित शब्द बोलिजे । ळंकार लागे तें न किजे ।
ळंपट नसीजे । परस्त्रीये सीं ॥ ३५ ॥
क्षमारुपिं आसीजे । क्षत्रधर्म न सोडिजे ।
क्षुधे सारीखें जेविजें । जाणतयानें ॥ ३६ ॥
ऐसी हे बुदबावणी । सांगितलिया वचानिं ।
त्या धरीजेति आंतःकरणीं । सदा सर्वदा ॥ ३७ ॥
जो ऐसीया बुधी वर्तेल । तो प्रत्यक्ष साधु होईल ।
तया सीं प्राप्त होतिल । सर्व सीधी ॥ ३८ ॥
म्हणौनी हे बुदबावणी । नित्य ऐकावी श्रवणीं ।
पठण करीतां नित्यानिं । सर्वज्ञान होईल ॥ ३९ ॥
ईति श्री येकाक्षरी । संपूर्ण जाली बावणआक्षरी ।
ते परीसावि चतुरीं । ह्मणे विष्णुदास नामा ॥ ४० ॥

॥ राम ॥

॥ द्वीतीयोध्याय ॥ २ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ शुभं भवतु ॥

॥ श्रीरस्तु ॥

# ४ जोतिरामकृत माणकोजी बोधला धामणगांवकर याचें चरित्र

१ माणकोजी बोधला धामणगांवकर याचें कालस्थलादि प्रसिद्ध आहे हा बालेघाटच्या धामणगांवचा पाटील; याच्या बायकोचें नांव ममताई, मुलाचें नांव यमाजी व सुनेचें नांव भागीरथी. याचें आडनांव जगताप. याचा ज्योतिराम किंवा जोतिराम नांवाचा एक शिष्य होता; त्यानें याचें आख्यान, कीर्ति, वगैरे लिहिल्या आहेत. जोतिराम लावण्या, कटाव, अभंग वगैरे करीत असे. कन्हाडास एका वाडांत जोतिरामकृत बोधल्याचें आख्यान व कीर्ति लिहिलेली आढळली. पैकीं कीर्ति येथें मासल्याकरितां देतों. बोध, बोधराज, बोधला, अशीं याच्या नांवाचीं रूपें आहेत.

॥ श्रीबोधराजकिर्ती आर्या ॥ श्रीसद्गुरुबोधराजाय नमः ॥
बोधराज महाराज छत्रपति गरिबनवाज धणी गाजी ॥
गाजी राजी आहो तुम्हा जी चरित्रि त्याच्या मन राजी ॥ १ ॥
संत महंत योगिजन वर्णिति किर्ति अचाट चमत्कारा ॥
पाय नमूनि विनंती मम हे किर्तनरंग अपार करा ॥ २ ॥
वाळुवंटि पिट वोटि बोधला काटिकरी दृटित भजल्या ॥
विठल रुक्मिणि येउनि भाकरि करुनि भक्षुनी वाटियल्या ॥ ३ ॥
होउनि माळी विठलरुक्मिणि मार्गासि मळा निर्मियला ॥
बोधराज नेहुनियां तेथ फळें जळें संतोशविला ॥ ४ ॥
बोधराज पंढरिच्या यात्रकन्या हाति सेत लुंटविले ॥
थोटिया ताटासी आणितो कणसें तयासि आठविलें ॥ ५ ॥
धामणगावी पांडुरंग होउनि म्हार चावडी गेला ॥
सात वराइ रसद् गुदरली नागाइ सावकार बुडला ॥ ६ ॥
राळेरासी कुणबीण हासी वारकरी धामणगावीं ॥
बोधराज उद्धार करितो विठलरूपासि ते मिळवी ॥ ७ ॥
कुटिळ मिळोनि किर्तनांत शव बोधल्याचिया बैसविलें ॥
नामस्मरणे टाळी वाजवी विठल विठल गर्जिनलें ॥ ८ ॥
बोकडाचें शिर केलें मारुनि चैलासि बोधराजानें ॥
म्हार असत् सिष्य मारितां हि दे सोडुनी संतराजानें ॥ ९ ॥
दुकळी यात्रकन्या बिज वाटुनि कडुभोपळ्यासि पेरियलें ॥
पिकली अठरा धान्ये तयात हि बोधराये कौतुक केलें ॥ १० ॥

पांडुरंग भिक्षुकसोंग धरि परोपरी वरि रंग बहु ॥
बोधराज भागिरथी–सुनेसी दानासि दिली ते गाउ ॥ ११ ॥
बेदरि स्वारी करी बोधला पादशाहा सन्निध बसले ॥
गोमांसाची फुले दारुवेचे दुध करूनी दाखविले ॥ १२ ॥
धन्य धन्य बहु धन्य बोधला अवतार सद्गुरु स्वामी ॥
शड्गुण–ऐश्वर्याचा टाळ धरी जोतिराम तो मी मी ॥ १३ ॥

॥ इति श्रीबोधराजकिर्ती ॥

॥ शुभं भवतु ॥

जोतिरामानें बोधराजाच्या आख्यानाचे एकंदर अकरा लहानलहान अध्याय लिहिले आहेत. सभेच्या संग्रहास बाड ठेविलें आहे.

वि. का. राजवाडे

---

## ५ चिंतामणि पंडित कृत रमलदीपिकाकलिका

१ हा ग्रंथ पैठणा जवळील शेवगांव येथील मुळे यांचे घरीं सांपडला. याची पहिलीं २५ पानें नाहींत. पुढील २६ पासून ३७ पर्यंत पानें आहेत. समाप्ति अशीः–

॥ इति श्रीचिंतामणिपंडितकृता रमलदीपिकाकळिका समाप्ता ॥ श्रीशके १६३१ विरोधिनि आश्विन कृ. १३ बुधे श्रीमत्सासवडग्रामस्थिताचार्यवंशोद्भवेन श्रीपातिज्योतिर्विंत्तनयेन मल्लारिणा लिखितेयं रमलकळिका समाप्तिमगमत् ॥ छ ॥ छ ॥

ग्रंथाची नकल मल्लारिदैवज्ञानें शक १६३१ त केली. तत्पूर्वी चिंतामणि या नांवाचा एक ज्योतिषी शंकर दीक्षित उल्लेखितात. तो प्रसिद्ध सूर्य ज्योतिषाचा बंधू. सूर्य ज्योतिषी शक १४३० त जन्मला त्या च सुमारास चिंतामणि जन्मला असें धरल्यास व त्यानें प्रस्तुत रमलदीपिकाकलिका ग्रंथ तिशीपस्तीशीच्या सुमारास लिहिला असें धरल्यास, प्रस्तुत ग्रंथाचा रचनाकाल शक १४६०–१४७० येतो. हा ग्रंथकार महाराष्ट्रीय आहे. म्हणून त्याच्या ग्रंथाचें टिपण मुद्दाम सभेस सादर केलें आहे. कारण, महाराष्ट्रांतील महाराष्ट्रीय ग्रंथकारांनीं संस्कृत, प्राकृत, मराठी, फारसी, हिंदी, इत्यादी कोणत्या हि भाषेंत ग्रंथरचना केली असली तत्रापि तिचें टिपण व नोंद करावयाची असा आपल्या मंडळाचा हेतु आहे. त्याशिवाय महाराष्ट्रांतील विचाराच्या व विकाराच्या प्रदर्शनाचें पूर्ण रूप निदर्शनास येणें शक्य नाहीं. ग्रंथ मंडळाचे संग्रहास ठेविला आहे.

वि. का. राजवाडे

## ६ नरसिंहकृत करपंचांग

१ हा ग्रंथ पैठणा जवळील शेवगांव येथील मुळे यांचे एथें आढळला. सामोद्रिक नांवाचा मराठी ग्रंथ ज्यानें केला त्यानें च हा हि ग्रंथ केला. अर्थात् हा ग्रंथ शक १५४०।१५५० च्या सुमारास झाला असावा. प्रस्तुत करपंचांगग्रंथांत आरंभवर्ष शक १५१२ घेतलें आहे. प्रारंभः—

गजास्यं गिरं देशिकं ब्रह्मरूपं । प्रणम्याऽथ पंचागसिद्धिं प्रवक्ष्ये ।
शिशुज्ञानवृद्ध्यै पुरो रत्नतुल्यां । चतुःपक्षसुंवाद्भाजं सुबोधां ॥ १ ॥
शकः सूर्यबाणेंदु १५१२ हीनो रविघ्नो

समाप्ति अशीः—

सुराद्रिवासी नरसिंहनामा । प्रोत्साहितो भट्टजनार्दनेन ।
चकार हस्तस्थितवस्तुतुल्यं पंचांगपत्रं हृदि संनिविष्टं ॥ २३ ॥
॥ इति करपंचांगं समाप्तं ॥

सुराद्रि म्हणजे देवगिरि.

ग्रंथ मंडळाच्या संग्रहास ठेविला आहे.

वि. का. राजवाडे

---

## ७ दास-लाल-कृत सोळासोमवार कथा

१ हा ग्रंथ पैठणा जवळील शेवगांव येथें सांपडला. ह्याच्या एकंदर ९६ ओंव्या आहेत. याची समाप्ति अशीः—

सोळा-सोमवाराचें व्रतकथानक । जो श्रवणपठण करिता देख ।
त्यासि प्रसन्न कैलासनायक । निश्चयेसि जाणिजे ॥ ९३ ॥
दास लाल विनवि श्रोतिया प्रति । हे व्रत पूर्वापर निश्चिति ॥
चतुरे +++++++ । ++++ गजानन धरावि ॥ ९४ ॥
शालिवाहनशके सोळासे । एक्यानव आगलि वर्षे ॥
संवछर वीरोधी नाम ऐसे । दिनप्रमाण चालतसे ॥ ९५ ॥
कार्तिकवद्य एकादशी । भृगुवार ते दिवासि ॥
दासविरचित कथा ऐसि । जे शुभदायक सर्वदा ॥ ९६ ॥
इति श्रीसोळासोमवारव्रतकथा संपूर्ण ॥ १ ॥ ७ ॥

या वरून दिसतें कीं ग्रंथ दास लाल यानें शक १६९१ त रचिला. दास-लाल हा बहुशः पैठणप्रांतीचा आहे. या व्रतकथा निरनिराळ्या प्रांतातील पुराणिकांनीं

निरनिराळ्या गद्यांत किंवा पद्यांत रचिल्या आहेत. सामान्य शालोपयोगी सटर-फटर पुस्तकें जशीं सध्यां प्रांतोप्रांतीं क्षुद्र मास्तर लोक रचतात त्याप्रमाणें च हीं सामान्य व्रतांचीं सामान्य वर्णनें गद्यांत व पद्यांत तत्तत्प्रांतीय क्षुद्र पुराणिक कशीं-बशीं रचित.

वि. का. राजवाडे

## ८ नरसिंह कृत सामुद्रिक ओंवीबद्ध

१ ह्या ग्रंथाच्या दोन प्रती पैठणा जवळील शेवगांव येथील मुळे ज्योतिषी यांच्या एथें सांपडल्या पहिल्या प्रतींत सुमारें अर्धा ग्रंथ प्रारंभा पासून लिहिला आहे. दुसऱ्या प्रतीचें फक्त पहिलें पान नाहीं. ग्रंथाच्या एकंदर २४७ ओंव्या आहेत. दोन्ही प्रतींची सांगड घालतां ग्रंथाचा आद्य असा:—

मानसउल्हासिचें सार । रत्नकोकींचें गहीवर
तें सांगेन मनोहार । सामोद्रिकें ॥ १ ॥

समाप्ति अशीः—

ऐसें बृहस्पतीचें बोलणें: । तें म्यां अल्पवाचा सांगितलें वचनें :
परोपकारा कारणें : मऱ्हाटिया बोलिलो : ॥ ४३ ॥
सकलीक मार्गलक्षणें : सांगितली श्रोतिया कारणें :
हे जाणावी सुजाणें : सामोद्रिकें : ॥ ४४ ॥
मनुष्यलक्षणाचि स्तुती : सामुद्रिकाची वित्पत्ती :
सांगीतली अल्पमती : नरसिंह म्हणे : ॥ ४५ ॥
इति सामोद्रिकें : जाली समाप्तें :
श्रोतिया कारणें : ज्ञानकथन श्रुत केलें : ॥ ४६ ॥
सामोद्रीकलक्षणें : संपूर्ण समापता :
वाचिता परीसतां : विजयो होय तत्वता : ॥ ४७ ॥
॥ शुभमस्तु ॥

हा सामुद्रिककार नरसिंह दैवज्ञ होता, असें पैठणप्रांतांतील लोक सांगतात. शंकर बाळकृष्ण दीक्षित नरसिंह दैवज्ञाचा जन्म १५०८ त देतात. ग्रंथ तिशी-चाळिशीच्या बेतास केला असल्यास प्रस्तुत ग्रंथाचा काल शक १५४०।१५५० सुमार येतो. भाषेवरून व ओंवीच्या रचनेवरून पहातां ग्रंथ त्या सुमाराचा दिसतो. २४७ वी ओंवी चोंभा कवीच्या ओंवी सारखी नियमक दिसते. आणख

हा ग्रंथ मानसोल्लास व रत्नकोक किंवा कोकरत्न या दोन संस्कृत ग्रंथांच्या आधारें मराठींत रचिला असें ग्रंथकर्ता म्हणतो. म्हणजे ग्रंथकाराला संस्कृत येत होतें हें स्पष्ट आहे. हा नरसिंह दैवज्ञ गोळेगांवचा रहाणारा दोन्ही प्रती मंडळाच्या संग्रहास ठेविल्या आहेत.

वि. का. राजवाडे

## ९. भोळारामकृत प्रेमकळाग्रंथ

१ हा ग्रंथ पैठणा जवळील शेवगांव येथें सांपडला. रामदासांचा शिष्य भोळाराम नामें होता त्यानें हा ग्रंथ केला. ग्रंथांत एकंदर ४०४ अभंग किंवा ओंव्या आहेत. ह्याची फक्त ६ पाठपोट पानें सांपडलीं आहेत. समाप्ति अशीः—

गुरुरुपा शर्ते । च्यारी चौ आगळीं ।
पुर्ण करी भोळी । भक्ति राम ॥ १०४॥
॥इति श्री प्रेमकळा ग्रंथ चतुर्थ प्रसंग समाप्तमस्तु ॥

अर्थात् ग्रंथाचे चार प्रसंग आहेत. पहिल्या तीन प्रसंगांच्या प्रत्येकीं शंभर शंभर ओंव्या व चवथ्या प्रसंगाच्या एक शें चार.

वि. का. राजवाडे

## १० शंकरदैवज्ञकृत तिथिनिर्णयरत्नमाला मराठी गद्य

१ हा ग्रंथ पैठणा जवळील शेवगांव येथील ज्योतिषी जे मुळे त्यांच्या येथें सांपडला. पानें २४ पैकीं पहिलीं १६ नाहींत. ग्रंथसमाप्ति येणें प्रमाणें:—

मऱ्हाटे भाषे णे लिहिला म्हणऊन पंडिति बोल न ठेवावा ॥ जो निर्णय लिहिला अहे तो निबंध पाहून लिहिला जरि कांहि अधिक उणे असेल ॥ तरि शुद्ध करणे ॥ म्यां तो बरा शोध करूनि लिहिला अहे ॥ १ ॥

इति शंकरदैवज्ञविरचिता तिथिनिर्णयरत्नमाला समाप्ता ॥ शके १७०८ पराभव नाम संवत्सरे ॥ आश्विन वद्य १३ गुरुवासरे इ. इ. इ. ॥

शंकर बाळकृष्ण दीक्षित लिहितात कीं शंकरदैवज्ञ शक १६८८ त हयात होता. तेव्हां तत्कृत ग्रंथाची नक्कल शक १७०८ त झाली तें रास्त च आहे. असंस्कृतज्ञ लोकांना व विशेषतः ग्रामजोश्यांना या ग्रंथाचा त्या कालीं बहुत उपयोग होत असावा. ग्रंथ मंडळाच्या संग्रहास ठेविला आहे.

वि. का. राजवाडे

# ११ घुसुमेश माहात्म्य अर्थात घृष्णेश्वरादि

ज्यास आज वेरूळ, एलोरा, म्हणतात, त्याचें पूर्वीचें नांव इला अगर एलापूर असें होतें हें सर्वश्रुत च आहे. तेथें असलेल्या श्रीघृष्णेश्वराच्या ज्योतिर्लिंगाची आदि काय हें आणण्याची जिज्ञासा सहज च होते. ती मत्स्यपुराणांत दिली आहे असें वर दिलेलें महात्म्यवर्णनकार बापुशास्त्री—इलापुरस्थ-म्हणतात; व त्या पुराणाचा आधार घेऊन त्यांनीं १३५ आर्यांचें एक चरित्रवर्णन केलें आहे. आर्या बऱ्या आहेत.

कवि अलिकडील असल्यानें त्यांचे संबंधी लिहिण्याचा माझा मानस नाहीं परंतु श्रीघृष्णेश्वराची आदि सहज श्रोत्यांचे कानीं यावी ह्मणून थोडें लिहीत आहें.

सह्याद्रि पर्वताच्या निकट एक सुधर्म नांवाचा विप्रवर राहात असे. त्याची पत्नी सुदेहा. पतिच्छंदानुवर्तिनी ही सुदेहा अपत्याभावानें कष्टी असे. कांहीं दिवसांनीं, कीं जेव्हां स्वतःस संतति होण्याची आशा खुंटली तेव्हां, तिनें आपल्या बंधूची कन्या घुसुमा नामें होती तिला परिणीत करून घेण्यासाठीं आपल्या पतीचें मन वळविलें. उपदेश करून हि आपली पत्नी आपला आग्रह सोडीत नाहीं इतकें च नाहीं तर निर्वाण करण्यास ही तयार झाली असें पाहून सुधर्म्यानें द्वितीय संबंधास रुकार दिला. यथाकाल विवाह होऊन तिघें आनंदानें नांदूं लागलीं. कांहीं कालानें 'घुसुमेस' एक दिव्यदेह असा पुत्र झाला; तेव्हां साहजिक च त्याचे मातेवर सुधर्म्याची विशेष प्रीति बसली. हें पाहून प्रथम पत्नी सुदेहा इला मत्सर होऊं लागला व तो वाढतां वाढतां विकोपास गेला. मुलगा मोठा झाल्यावर त्याचें लग्न सुधर्म्यानें केलें व एके दिवशीं स्नुषा आणि पुत्र यांस जवळ प्रेमानें घेऊन त्यांचें त्यानें कौतुक आरंभिलें, हें सहन न होऊन सुदेहेनें त्या रात्रीं पुत्र व स्नुषा एकत्र निद्रिस्त असतां पुत्राचा देह खड्गानें द्विखंड केला.

घुसुमा ही तिचा विवाह सुधर्म्याशीं झाले दिवसापासून पार्थिवार्चन करीत असे व लिंगार्चनानंतर तीं लिंगें जवळ निर्जल अशा एका गर्तेत टाकीत असे. त्या च गर्तेत सुदेहेनें पुत्राच्या शरीराचीं केलेलीं शकलें नेऊन टाकिलीं. दुसरे दिवशीं पुत्राचे शयनागारांत सर्वत्र रक्त पाहून व तो नाहींसा झालेला पाहून स्नुषेनें एक च आकांत केला. त्या वेळीं सुधर्मा व घुसुमा हीं प्रातःस्तवनांत व लिंगार्चनांत गुंतलीं होतीं. ही दुःखद वार्ता ऐकून दोघांचे हि मनांस विकार झाला नाहीं. सुदेहा मात्र दुःखवेगानें मोहित झालीशी दिसली. घुसुमेनें आपलें लिंगार्चन शांतमनानें करून नेहमीं प्रमाणें त्या गर्ते संनिध लिंगांचें विसर्जन करण्यास आली व तेथें हर हर शब्द करून लिंगांचें विसर्जन करून जों परतते तों पुत्र भागून तिजला हाक मारीत

बाहेर आला. नंतर श्रीशंकर तेथें प्रकट झाले व त्यांनीं 'वरं ब्रूहि' म्हणतां माझे नांवानें तुम्हीं या स्थळीं प्रसिद्धीस यावें असा घुसुमेनें वर मागितला व त्या च गर्तेत त्या दिवसापासून तीर्थ हि उत्पन्न झालें.

ही श्रीघृष्णेश्वराची आदि बापू शास्त्र्यांनीं दिली आहे.

हे बापुशास्त्री

राहणार वेरूळिचा राघवशास्त्री सभासदा मान्य ।
शुक्लोप–नाम त्याचें देवी शेषांबिका सुरामान्या ॥

तत्पुत्र बापु

यांनीं

श्री शालिवाहन सत्रासें ६ पनांत जय अब्दिं
या आर्या केल्या. शके १७५६ ला जय संवत्सर आहे.

गो. का. चांदोरकर

## १२ शिवलिंगाचें डफगाणें

निरंजन गाणपत्य–काशिराजशिष्य–यांचा शिष्य याचीं नांवें शंकरदास, शिवदास, काशिनाथ अशीं आतां पावेतों उपलब्ध होतीं; आतां आणखी एक नवीन नांव दिसतें. शिवलिंग, हें नांव शंकरदास किंवा शिवदासाचें कां !

पहिलें कारण असें कीं, निरंजनाचें चरित्र लिहिणारा, शिवरात्रीकथाकार, किंवा गणपतिस्वयंवर रचणारा, शिवदास यांचे व शिवलिंगाचे ग्रंथ एके च ठिकाणीं उपलब्ध झाले आहेत.

दुसरें कारण असें कीं, या शिवलिंगांनीं आपले गुरूचें नांव शिवदासा प्रमाणें निरंजन च दिलें आहे.

प्रभु निरंजनरूपेनें । म्यां गायिलें डफगाणें ।
साधुसंत जाणति खुण । शिवलिंग म्हणे ॥ ४८ ॥
प्रथम नमीन निर्गुण । जो गुणातीत निरंजन ।
मग गाईन डफगाण । गुरुप्रसादें ॥ १ ॥

या दोन कारणांखेरीज आणखी हि इतर साम्य या दोघांत म्हणजे गणपति-स्वयंवरांतील गणपतिवर्णन व येथील यांचे रूपकाचे गोडीचें दोहोंतील साम्य, १७ वे शतकांतील सरणी, इतकें पुरेसें आहे.

आतां प्रश्न असा येतो कीं यांनीं स्वतःस शिवलिंग जें म्हणविलें त्याच कांहीं कारण आहे कीं उगीच ' दासा 'चें'लिंग' केलें. जंगम तर नव्हत ! निरंजन गाणपत्य त्यांचा शिवलिंग जंगम कसा ? शांतलिंगाचे कृष्णाप्पा व त्यांचे समर्थ पंचायतनांतील जयरामस्वामि वडगांवकर कसे ?

या शिवलिंगाचा किंवा जयरामस्वामींचा खरा इतिहास उपलब्ध झाला तर मला वाटतें शक ११११ च सुमारास जो जंगमांस सुसाट प्रसार मिळाला तो, महाराष्ट्रधर्मांत त्यांचा अंतरर्भाव करून घेऊन १७ वे शतकारंभीं बहुतेक संपुष्टांत आणला असावा.

डफगाण्यांत शाहीरांच्या पद्धतीप्रमाणें प्रश्न विचारले आहेत.

कांहीं प्रश्नांचे मासले:-

ॐ काराची उत्पत्ति कोठून, इंद्रियांचा स्वामि कोण, प्राणांचा स्वामि कोण, पूर्वपश्चिममार्ग कोणते, जीवशिव कोठें असतात, बावन्न मातृका कोणत्या, अजपा कशी, दश देह कोणते, चार अभिमानी कोण, इत्यादि.

सिद्ध शाहीर म्हणावे । त्याने याचे उत्तर द्यावे ।
नाहीं तरी ठेऊनि जावें । डंभ डफ ॥ ४७ ॥

गो. का. चांदोरकर

## १२ सुज्यातार्चे एक पद

नवल देखिलें । मात डोळियात ।
नवल देखिलें । साहान ॥
सुईचा छिद्रापरिस साहान ।
त्यामध्ये मुंगी रींग करूनि येत जात ॥
त्या मुंगीचे माथा तळें । त्या तळ्यांत पांच कमळें ।
हीरवे निळे आणि पिवळें । लाल श्वेत ॥ न० ॥
पांच कमलें पांच रंगीं । येक चि दैठ तयाचां अंगी ।
तिन मुळ्या तया लागी । फकड्या सात ॥ न० ॥
आतां असो परते नवल । सांगतां फार विस्तारेल ।
सद्गुरु रामलिंग कोपेल । म्हणे सुज्यात ॥ नवल० ॥

यावरून गुरु रामलिंग. यांचा काल कोणता ?

गो. का. चांदोरकर

## १४ योगी नागाचें पद

वरद नागेश, वडवाळ सिद्ध नागेश असे दोन योगी आपणांस माहित आहेत. ( अज्ञान नागेश हे च वरदनागेश ). हे योगी नागेश कोण तें माहित नाहीं. वडवाळ अथवा वरद यांपैकीं कोणी असल्यास त्यांचें पद माझे पहाण्यांत अद्याप नाहीं तें देतों.

पद

कायापुरीं भटी चढविली मद होतसे कैसा ।
चित्त चैतन्य मन मोह पचरोनिया दिला ॥ धृ ॥
दमुनि इंद्रिये जाळिल कामक्रोधाच्या मुळ्या ।
आशा मनीशा त्या हि जाळिल्या कल्पना हि सकळा ॥
इडा पिंगळा ह्या परियेसी दोन नळ्या भट्टिशीं ।
प्रेमाचा पोचारा फिरविला पाहे ब्रह्म रसासीं ॥
औट गोल्हाट अवघि येक चि कळा ।
समान धार ती येतसे ब्रह्मरस केवळ ॥
सत्रावी कळा लीन बाइये भरुन देतसे प्याला ।
त्याही मदीं भुलीला दत्त गोरख बाला ॥
अवचित त्याला हा लाधला योगी नागा भुलला ।
सांडुनि या द्वैतपणाला त्याचे मिळणीं मिळाला ॥

गो. का चांदोरकर

## १५ शिवानंदाचें पद

ऐका बा नों पंथ येक सुगम । जेणें नासेल अज्ञानतम ।
तें सांगेल वर्म । धारणेसी ॥ १ ॥
जाळंधराचा-पडदा फोडून वर । उघडोनि मध्यमेचें विवर ।
वेंधोनि सुषुम्नेचे अग्र । विंहगमाचा मार्ग लक्षावा ॥ २ ॥
तेथुनि वरति पश्यंतीची वाट । चढोनि गोल्हाटदुर्गीचा घाट ।
क्रमोनि मीनमार्ग अचाट । चढावें ऊर्ध्व ॥ ३ ॥
मग परेचिये उपर । अपार वाद्याचा गजर ।
पिपीलिकामार्ग येकसर । भेदुनि जावे ॥ ४ ॥

देखा सहस्रदळींची खूण । कोटी भास्कर गेले लपोन ।
तेथ साधोन कपीचें उड्डाण । व्हावें स्वतःसिध ॥ ५ ॥
पुढें ब्रह्मरंध्र पवित्र । जेथ उन्मनीचे अखंड सूत्र ।
शेषमार्ग स्वतंत्र । अनुभवी जाणती ॥ ६ ॥
ऐसी योगाची हातवटी । जाणोनि पश्चिमेचि उलटि ।
योगी बैसे साम्राज्यपटीं । म्हणे शिवानंद सदानंदाचा ॥ ७ ॥

यावरून गुरु सदानंद. योगाची इतकी माहिति दिली आहे यावरून हे सदानंद रंगनाथ निगडीकर यांचे गुरुपरंपरेंतील असावेत. परंपरा अशीः—

श्रीदत्त–सदानंद–केमयानंद–विलयानंद–सदानंद.

हे सदानंद च या शिवानंदांचे गुरु असावेत. शके १६३२ मध्यें हयात असलेले धरणिधरग्रामाचे हे सदानंद नसावेत. कारण कांहीं देतां येत नाहीं.

गो. का. चांदोरकर

## १६ विश्वेश्वरकृत अश्वचिकित्सा

### ( एक जुनें बाड )

संस्कृत श्लोकांवर यांत मराठी टीका केलेली आहे. तिची भाषा जुनी आहे म्हणून मासल्यादाखल देतों. ग्रंथ अगदीं त्रुटित आहे व अत्यंत जीर्ण आहे. बहुतेक शाई उडालेली आहे. तेव्हां जसा व जितका लागला तेवढा व तसा देतोंः—

संस्कृत देत नाहीं; कारण बरोबर वाचतां न आल्यानें कदाचित् अशुद्ध च लिहिलें असेल अशी वृथा समजूत होईल.

### पान २०

आतां बोळिया सांगेन ॥ श्रावणु । भाद्रपदु । हेवर्षा रीतु म्हणीपे ॥ आश्वीनु कार्तिकु तो शरदु । मार्गशिरसु पुसु तो हेमंतु । माघु फाल्गुनु शिसीरु । चैत्र वैशाखु वसंतु ॥ जेष्ट आषा × ग्रीष्मु ॥ या रीतु म्हणीपति ॥

### पा २० । २ री बाजू

× × ×

तेयाचि षटी हेमंति शीतळ वात पीत्त उपशमे ॥ हेमंति वातान्नें धि ( द्वि ! ) दळान्नें सेवितां श्लेष्मा संचितु होये ॥ तथा शिसीरीं वसंति श्लेष्मा प्रकोपे । तो ग्रीष्मी उपशमे । या सा रीतु होति ।

× × ×

आतां ऋतुपचारु सांगैन । छ ॥

वर्षा रुतुसी निर्वात स्छान किजे ।

× × ×

भोजनीं घृतेसीं मुग दीजति । लोण दीजति । येकांतरेन गुगुळु सुठी पिंपळी मिरा दीजे ।

सांवयाचि × लसति घापे ॥

गुगुळ कल्पु ॥ कल्प करविजति ॥

नीरु हांदि अधीवासन दीजे ॥

× × ×

शरदीं अति शीतळ स्छान किजे ।

रात्रिं चंद्ररस्मी घेओ दीजति ।

बहुत श्रमु न कीजे । घृत मुंद्रा

सी × × × दीजे । मन्यजा कोष्टजा

तालुजा या सी × दीजे ॥

× × ×

हेमंति अति सैत्य भुमि किजे ।

नवे तिलेल । नव उडीद हें सेवनी

दीजे ॥ नदिपाणि वर्जीजे । प्रति

पान त्रिफळा सैधव गुळ सुंठी पींपळि

येणें संपादिजे । निर्गुडी निंबु आडु

ळिसा लोणेंसि चौथां दी दीजे ॥

यानंतर सामुद्रिक व रोग यांचें वर्णन आहे.

## ( २९ वें पान )

पातळ अशोकाचेया पल्लवां सारीखी

× × ×थानाचीया सारिखि

येसी जीह्वा ॥ सुस्निग्ध दंत । मृदु

स्यक्वा ( शिस्न ? ) ॥ लघु कर्ण ।

शीथीळ ( ल नव्हे ) उभे कर्ण ।

हरीण हंस परेवकों चा टीटीवा

वृषभु ॥ येसेया सारीखे डोळे ॥

दीर्घ वाकुडि ग्रीवा । विस्तीर्ण

आसन । समांस पाशाळ । दीर्घ
दांडि । दिर्घ निर्मांस कळाविया ।
विस्तीर्ण उरु बह्वा यैसिया
कुसी ॥ लघु पुष्टिका । लघु मेहन ।
मृदु केसर । शुक्ष्म रोम । सुस्निग्ध
आंग । कठोर मुख । सत्व बळ ।
जवोपन्नु । बतिसीं दोषां विवर्जितु ।
शुभ्र वर्णु । शुभ गति । शुभावर्त युक्त ।
श्र ( अ ? ) स्छि सारु । यैसा ( जो अथवा तो )
× × जोपवाह म्हणीपे ॥
इति विश्वेश्वरपंडित लि × ×

**( ३० वें पान )**

× × × × वैद्यकसारे
लक्षण स्छानं समासम् ॥
आतां बोळिया सांगैन ॥
माघु पातलया चणेया अलरवति
दिजे । ते चतुर्विध । वातपूर्णा ।
शाखांत । पक्क । ( येथें तीन च दिले
आहेत, मग वात, पूर्ण असे दोन सम-
जावयाचे कीं काय ? ) तें कैसें ॥
पूळा सांडौनु । चरपूट दंटे होति ।
तो वातपुर्णू । अर्ध भरले घांटे
होति तो आंधे । सासी × ×
फोडाणा होये तो शाखासारु । पीव-
ळा होये तो पक्क ॥

अनेक रोग दिले आहेत असें दिसतें आणि त्यानंतर औषधि, आणि त्यानंतर कल्प सांगितले आहेत.

यांत भाषा जुनी आहे अशाबद्दल तर शंका नाहीं च. प्रश्न इतका च कीं हे विश्वंभर संस्कृत अश्वचिकित्साकार, कीं टीकाकार. कीं दोन्ही त्यांनीं च केलीं आहेत ! तसें च यांचा काल वगैरे कांहीं समजत नाहीं.

गो. का. चांदोरकर

# १७ तुकारामाचा अभंग–चोखामेळा चरित्र

रा. विष्णुपंत जोग यांनीं तुकाराममहाराजांचे अभंग छापले आहेत. सांप्रदायांत ( वारकरी ) खुद्द तुकारामांचे म्हणून जे गणले गेले आहेत ते च छापण्याचे श्रम आपण घेतले आहेत असें पुढें जें त्यांनीं 'क्षेपक' अभंगांचें एक प्रकरण दिलें आहे ह्यावरून सिद्ध केलें आहे.

मी जो एक अभंग खालीं देत आहें तो तुकारामाचे 'अस्सल' अभंगांत हि नाहीं व ' क्षेपक ' अंभगांत हि नाहीं; तेव्हां त्याची वासलात कशांत लावावयाची तें मंडळानें ठरवावें.

## अभंग

श्रीगणेशायेनः ( ' नमः ' पाहिजे ) । चोखामेळीयाने पाजीयले दहि ॥ पडो दीले नीही ( नाहीं ) उणे त्याचे ॥ १ ॥ साधन द्वादसी आली यके वेळी ॥ उठोनी प्रातःकाळी काय बोले ॥ २ ॥ उठी उठी कांता स्दयपाक करी ॥ आतां यतिल हरि पारण्यसी ( ण्यासी ) ॥ ३ ॥ व्होते ( होते अथवा व्हो तें ) यके ( येक ) ब्राह्मणाने अयकीली मात ॥ तेणे दीवाणात सागीतले ( अनुस्वरांचा जणूं विटाळ च आहे ) ॥ दीवाणानी दुत धाडीले तयासी ॥ ह्मणे चोखीयासी धरुनी आणा ॥ ५ ॥ यउनीया दुत कर आसडीले ॥ ह्मणे चोखामेळा काय जाले ॥ ६ ॥ वीटोबाला दही पाजीत आसता ॥ कारे माझ्या हाता आसडीले॥७॥ रुसोनीया वीटो गेला म्हणउनी ॥ रडे दीर्घ ध्वनी करुनीया ॥ ८ ॥ सभचे (सभेचे) म्हणती रडतोसी कारे ॥ तो ह्मणे वीच्यार अैका माझा ॥ ९ ॥ वीटोबाला धयी पाजीत आसता ॥ याणी माझ्या हाता आसडीले ॥ १० ॥ म्हणती या माहाराने देव बाटवीला ॥ जीवे मारायाला जुंपा बैल ( जू वर अनुस्वार आहे ! ) ॥११॥ याधोनीया ( बां ) मोट हाकीती बैल ॥ धरुनी सीवाळ वीटो उभा ॥ १२ ॥ तेव्हा त्याच्या कांता कळली हे मात ॥ तुझे चोखीयात ( ते ? ) मारीताती ॥ १३ ॥ तेव्हा त्याची कांतां तेथे येउनीया ॥ ह्मणे देवराया हात काडा ॥ १४ ॥ हात काढी आतां न करी करुणा ॥ पतीतपावना कळलासी ॥ १५ ॥ सादीले जेवीले त्याचा हा उपकार ॥ दुबळींचा भ्रतार मारु पाहासी ॥ १६ ॥ सभेचे म्हणती बोलती कोन्हासी ॥ ती म्हणे तुम्हासी न कले कांहीं ॥ १७ ॥ अनत ब्रह्माड जयाचे उदरी ॥ त्यान चहु करी धरीयेले ॥१८॥ मारीणीचे बोले दीधले दरुशन ॥ तेण समाधांन ( ' धा ' वर अनुस्वार ) चोखामेळा ॥ १९ ॥ दीनाहुनी दीन बोलती ब्राह्मण ॥ म्हणती नारायण दावी आम्हा ॥ २० ॥ तुका म्हणे देव भक्ताचा कैवसा ( ? ) ॥ पावतो भरवसा भक्तालागी ॥ २१ ॥

गो. का. चांदोरकर

# १८ रघुकविकृत ब्रह्मोत्तरखंड

शके १४९३ मध्यें श्री एकनाथानीं रुक्मिणीस्वयंवर रचिलें. त्या च सुमारास किंवा किंचित् नंतर पूर्णानंदांनीं ' शिवपार्वतिपरिणय' ग्रंथ लिहिला. या दोन ग्रंथांचा कथाभाग भिन्न खरा परंतु स्वरूप एक च. दोन्ही ग्रंथ पौराणिक खरे परंतु तो कथाभाग अध्यात्मावर नेलेला आहे. ही १६ वें शतकाची गोष्ट.

१७ वें शतकांत याहून कांहीं निराळी च चमत्कृति दृष्टीस पडते.

श्रीमत् दासबोध २० दशकांचा, याची टीका च केवळ असा जयरामांनीं २० हजारांचा व वीस अध्यायांचा 'जयबोध' म्हणून ग्रंथ केलेला आहे. हा ग्रंथ श्रीदासबोधाची केवळ टीका म्हणून च आहे असें वर सांगितलें; परंतु जो प्रसाद व जो अधिकार मूलग्रंथाचा त्यांतील कोणता हि गुण या टीकेंत नाहीं.

असा एक च ग्रंथ आजपर्यंत माहित होता. आज त्या च मासल्याचा आणखी एक ग्रंथ रा. राजवाडे यांच्या 'कऱ्हाड' येथील संग्रहांत आढळला. प्रथम हा श्रीधरांचा 'शिवलीलामृत' असावा असा भास झाला परंतु दोहोंचे अध्यायांत व क्वचित् कथेंत हि फरक् आढळून आला. 'शिवलीलामृताचे अध्याय १४ असून याचे २५ आहेत. पुढें जोडलेल्या यादीवरून विषयांचा बोध होईल च. अध्याय अधिक खरे परंतु ओंवी ( रघुकवींच्या ) श्रीधरांच्या ओंवींच्या जवळ जवळ निमे आहेत.

श्रीधरानीं 'बारामतीस आपला शिवलीलामृत ग्रंथ शके १६४० मध्यें संपविला. रघु–राघो अप्पाजी कुळकर्णी–यानें चाफळ नजीक माजगांव डेरवण येथें शक १६६४ मध्यें ब्रह्मोत्तरखंड संपविलें. एक दुसऱ्याची वाढविलेली आवृत्ति आहे. कवित्व दोघांचें हि सारखें च आहे. क्वचित् रघुकवींचें वर्णन मला सरस वाटतें. परंतु या शतकांत हा काय चमत्कार आहे ! आज असे दोन च ग्रंथ सांपडले, कोणास ठाउक आणखी किती असें ग्रंथ अद्याप अनुपलब्ध आहेत ! १७ वे शतकांत अखेर अखेर महाराष्ट्रीय कवींच्या बुद्धीस मांद्य आलें म्हणावें तर मोरोपंत, अमृतराय अशांची व्यवस्था काय ?

गो. का चांदोरकर

ब्रह्मोत्तरखंड हें शिवमाहात्म्य आहे. याचा थोडासा सारांश देतोः—

१–यांत शिवपंचाक्षराचा महिमा वर्णिला आहे. नमः शिवाय हा मंत्र वर्णावर्णभेद न ठेवतां वाटेल त्यानें जपावा.

२–इक्ष्वाकु वंशांतील मित्रसह राजाच्या कथेनें बिल्वदळाचा महिमा वर्णिला आहे. (कल्मशपाद) यांत मित्रसहाची भार्या केवळ गुरुमंत्रानें पुत्र प्रसवते. मित्रसहाची व गौतमाची भेट होऊन गौतम गोकर्णमाहात्म्य वर्णन करतो.

३-यांत गौतम-महाबळेश्वर-माहात्म्य वर्णन करतात.

४-सौमुत्री नामें चांडाळीची कथा. ही पूर्वजन्मीं ब्राह्मणी होती. विधवेपणीं कुमार्गगामी झाली.

५-मागील अध्यायींची ब्राह्मणी शूद्रगृहीं राहिली. मद्यपानानें धुंद असतां बोकड म्हणून गोवत्स मारला व नंतर शिव ! शिव ! असें पश्चात्तापानें उद्गारली. नंतर मरण पावून जन्मांध कुश्चली झाली. अन्नाकरितां भिक्षा मागत असतां प्रदोषसमयीं एकानें एक बिल्वदळ दिलें तें भक्ष्य नाहीं म्हणून तिनें फेंकून दिलें तें चुकून शिवलिंगावर पडलें. तेणें मुक्ति झाली. या च अध्यायांत शिवलोकवर्णन आहे.

६-यांत कुमुद्वतीचे मागील सात जन्म तिचे नवऱ्यानें तीस सांगितले.

७-भद्र नामें शिवगणानें चंद्रसेनास चिंतामणी दिला. तो घेण्याकरितां इतर राजांनीं त्याचेवर स्वारी केली. तो महाकालेश्वरास शरण गेला. तो पूजा करीत असतां एका गौळ्याचे मुलानें पाहून आपण हि तसें च केलें. त्यास श्रीशिवदर्शन.

८-वर वर्णन केलेला गोपीसुत हा नंदाचा ८ वा पूर्वज.

९-महाव्रताचें आख्यान. त्याचें रणांत मरण. त्याची भार्या वनांत प्रसूत होते व मरते. एक विधवा ब्राह्मणी तें बाळ घेते. प्रदोषसमयीं शिवालयीं गेली असतां शांडिल्यमुनीनें शिवपूजेचें महिमान सांगितलें.

( यांत शेवटीं गत कलीं ४८४१ संवत्सर दुंदुभी दिला आहे. )

१०-मागलि कथा पुढें चालू. कोणी एके दिवशीं त्या ब्राह्मणीचे मुलास सुवर्णपूर्ण कुंभ सांपडला.

११-ती ब्राह्मणी दोघांत तें द्रव्य वाटीत असतां तो राजकुमर तें घेईना. पुढें एके दिवशीं वनांत खेळत असतां त्या दोघांस कित्येक युवती तेथें दिसल्या. स्त्रीनिंदा. अंशुमति नामक गंधर्वकन्या राजपुत्राची भार्या होते. त्यास राज्यप्राप्ति.

१२-चित्रवर्मा राजाची कन्या सीमंतिनी इची कथा. चंद्रांगदास तक्षकदर्शन व त्याचें पाताळविवरगमन.

१३-पाताळांतून चंद्रांगद परत येतो व राज्य मिळवितो. येथें पुनर्विवाह चंद्रांगदाचा व सीमंतीनीचा वर्णिला आहे.

१४-वेदमित्र ब्राह्मणाची कथा. वेदमित्राचा मुलगा सुमेधा व वेदमित्राचा मित्र शाश्वत त्याचा पुत्र सामवान् हे दोघे हि आचारवान विद्यासंपन्न झाल्यावर विदर्भराजाकडे गेले. धनाची याचना करतां त्यानें एकानें स्त्री व दुसऱ्यानें पति अशीं रूपें घेऊन सीमंतीनीकडे जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें गेले

असतां सीमंतीनीनें ओळखून किंचित् हास्य करून शिवपार्वतीरूपानें त्यांची पूजा केली तेव्हां सामवान् स्त्री झाला. पुढें त्या दोघांचा विवाह.

१५-मंदरब्राह्मणाची कथा ( पिंगलेची कथा ). एक शिवउपासकाची सेवा दोघांनीं केली व पुढें मेले. मंदर राजाचे पोटीं गेला. परंतु रोगग्रस्त झाल्यानें मातेसह त्यास वनांत सोडलें ( फार उत्तम वर्णन आहे ). पुढें एका नगरांत गेल्यावर तेथें ऋषभ भेट होऊन मृत पुत्रास जीवंत केलें व निरोग केलें.

१६-मागील भद्रायु कुमाराची कथा. सीमंतीनीची कन्या. भद्रायूस उपदेश.

१७-उपदेश चालू. शिवकवच शिकविलें, एक शंख दिला, व खड्ग दिलें. पित्याची मुक्तता. सीमंतीनीचे मुलीशीं लग्न.

१८-भद्रायूविहार (वर्णन फार चांगलें). त्यास शंकरदर्शन ( व्याघ्रवेषानें ).-येथें भाद्रपद वा। ७ लिहिलें आहे.

१९-वामदेवकथा. विभूतिमहिमा.

२०-सनत्कुमारप्रश्न. त्रिपुंड्रमहिमा. राक्षसतनु टाकून दुर्जय राजा मुक्त होतो. त्रिपुंड्रानें वाटेल त्या पापाचें क्षालन होतें.

२१-सिंहकेत राजपुत्राची कथा. त्याच्या परिचारकास एक भग्न लिंग सांपडलें. त्यानें चिताभस्माकरितां पत्नीसह गृह जाळतां पुनः स्त्रीसह घराचा लाभ त्यास झाला.

२२-वेदरथ ब्राह्मणाची कथा. वेदरथाची कन्या शारदा पद्मनाथ ब्राह्मणास दिली. तो मेला. शारदा विधवा होऊन घरीं आली. नैधृव ऋषी घरीं आले असतां ते पुत्राचा आशिर्वाद देतात. विधवा जाणून शिवव्रत सांगतात.

२३-शारदाकथा चालू. यांत शारदेचा पूर्व जन्मीचा भ्रतार अंबादर्शन झालें त्या स्थानापासून ३६० कोस लांब जन्म घेतलेला होता, त्याच्याशीं इनें स्वप्नांत रतिसमागम करावा म्हणजे इला पुत्र होईल. त्याप्रमाणें 'शारदायु' पुत्र झाला. पुढें यात्रेस जात असतां विष्णु नामें ब्राह्मण हा च स्वप्नगत भ्रतार म्हणून तिनें ओळखिला. त्यानें हि तीस स्वप्नगत भार्या ओळखिली. शारदेस घेऊन तो स्वग्रामीं गेला. तेथें मरण पावल्यावर ती सहगमन करते.

२४-रुद्राक्षमाहात्म्य. महानंदेचे कुर्कुट मुर्कुट यांची कथा. (राघो अप्पाजी कुळकर्णी माजगांव डेरवण सन्निध चाफळ शके १६६४ दुंदुभि माघ वद्य चतोर्दशी शीवरात्री समाप्त).

२५-तो कथाप्रसंग.

॥ श्री ॥

## १९ शंकरदासकृत शिवरात्रीकथा

ही कथा सारी ३७ ओंवींची आहे. शेवटची ओंवीः—

छत्तीस तत्वांची माळा । अर्पिली निरंजन–चरण–कमळा।
तरला काशी भवजळा । पासूनिया शिवरूपे ॥ ३७ ॥

येथें प्रश्न असा कीं काशी असें स्पष्ट येथें नांव असतां मीं शंकरदास हें नांव वरती कां दिलें आहे. याचें कारण इतकें च कीं हीं दोन्हीं नावें एका च व्यक्तीचीं आहेत व शंकरदास या नांवानें ती व्यक्ति प्रसिद्ध आहे याचा पुरावा हा पहाः—

निरंजनाच्या चरणास । दूर्वा अर्पिल्या एकवीस ।
सुखी काशी शिवदास । गुरुरूपे जाहला ॥ २१ ॥

ही ओंवी शंकरदासांचें एक २१ ओंवींचें 'गणेश–चारित्र' आहे त्यांतलि आहे. तसें च या च बाडांत एक गुरुपरंपरा दिली आहे ती अशीः— श्रीशंकराचार्य—भास्कर—लयानंद—सहजानंद—सिद्धानंद(कदाचित् एक च)— लक्षानंद—परमानंद—काशिराज—निरंजन.

याचे पुढें श्लोक आहे तो असाः—

शिवदास गुरुं काशीनाथस्वामिनं ।
नमोनमः.

यावरून काशिनाथ हे च शिवदास किंवा शंकरदास आहेत असें मीं गणलें आहे. तशांत पद 'काशीशिवदास' असें आहे.

गो. का. चांदोरकर

## २० यशवंतसुतकृत सीता व द्रौपदी स्वयंवर

रा. राजवाडे यांच्या 'कऱ्हाड' येथील संग्रहांत एक बाड मिळालें त्यांत या वर दिलेल्या कवींचीं हीं दोन प्रकरणें आहेत.

सीतास्वयवंराचे ८६ श्लोक आहेत व द्रौपदी स्वयंवराचे ६५ आहेत. काव्य भिकार आहे. कवि आधुनिक दिसतो व कदाचित् ब्राह्मणेतर असावा.

गो. का. चांदोरकर

# २१ ( मराठी ) रसक्रिया

जुन्या पोथ्या अगर इतर जुने कागदपत्र पहातानां कित्येक बाडें अशीं सांपडतात कीं त्यांच्यांत मंत्र ( जादु टोणे ), यंत्र अगर धातुशोधन यांचा च पुष्कळसा भरणा असतो. या लिखितांस सरसकट ' कुचकामाचें ' म्हणून शेरा मारणें साहसाचें होईल; कारण यांचा बरा च भाग अनुभवसिद्ध असावा असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं, तशांत पदार्थांच्या गुणधर्मांचा व भिन्न पदार्थांच्या मिश्रणांच्या गुणधर्मांचा अंत कोणीं पाहिला आहे काय ! यावरून अंधविश्वास असावा असें मत प्रतिपादन करण्याचा माझा हेतु नाहीं, परंतु हें हि अनुभवजन्य ज्ञान आहे व त्याचें शोधन होणें जरूर आहे. या च एका दृष्टीनें खालीं दिलेल्या स्वरूपाची माहिती जेवढी मिळेल तेवढी एकत्र करणें हें संशोधकमंडळाचें कर्तव्य जाणून मासला म्हणून थोडें देत आहें.

॥ श्रीगणेशायनमः ॥ तिवसबीजाचे तेल काहडून ॥ ताम्रपत्राचा कलंक शोधून त्याजवर टाकून हेम होय ॥ १ ॥ पांढरी सुपारी माकासह देवी गोरोचन याचा तिलक लाविजे सर्वजन वश्य होय ॥व०।१। चुनखडा निंबूरसात विझविजे ॥ त्यामध्यें पारा घालिजे । मूस मडकीयात ठेविजे । वर लेपन कीजे । त्याखाले मंद अग्नि दीजे प्रहर ४ मग वरता कलंक होय तोळ्या तांब्यास रति ऐक देन शुभ्र होय २ केळीच्या कंदाची मुळी कटीशीं बांधिजे पडता गर्भ राहे । १ । हरताळ तोळा वजन चार पैसे निंबुरस पक्का शेर १ ऊसपुंडा अथवा काष्ठारस पक्का १ शेर भार ४ हे समभाग पारा चार भार ४ हिंगुळ पैसे ४ हे समभागे घेउन कोरफडीच्या रसात मुकरा वजन शेर पक्का १ हे तिन्ही रस मिळोन खलावे रोज १३ मग तांब्याच्या पत्रास लेप देणे त्यावरी माती कापड लेप ३ देणे राणशेणीचा अग्नी देणे प्रहर १२ ताम्रभस्म होय । तोळा तांब्यास जाळ १ देणे हेम होय ॥ ४ ॥ वांग कोरूण त्यांत हरताळ घालून त्याचे तोंडि त्याचा खाकोस घालून मग मडकीयात घालून तोंडी खापर देणे वर मातीचे कापड देणे गोवरी राणशेणी पाटीभर त्यात अग्नि देणे शुभ्र होय ५ गंधकक्रिया । गंधक तोळे ६ बारीक वाटून बोकडाचें मूतात धालून मुरगीचे अंड्यांत भरून मग ते आंडी मग येरंडेल तेल शेर येक १ पक्का, मडकीयांत घालून त्यामधें अंडी अधर घालावी तेलाचे वाफेन गंधकाचे तेल अंडीयांत उतरे अग्नी मधुर देणे. ते च तेल ताम्रपत्रास देणे हेम होय ६ प्रकार पारा व सोमल सम भाग रिंगणीचे फुलाचा रस काहाडून खलिजे घट्ट करणे मग पोलादी वाटियामध्ये रुयीचे पान ठेवून त्यावरि तो गोळा ठेवून मग झांकण तांबियाचे करून मात लेप कापडाचा देणे मग चुलीवर अग्नि देण घटिका

४ पारा उडून वरिल्या झाकणासी लागतो घेऊन मग तोळ्या तांब्यास मासा १ देन रुप होय ॥

गो. का. चांदोरकर

## २२ शंकरदास कृत निरंजन-चरित्र

निरंजन नव्हे देहरंजन । सज्जनजनमनोरंजन ।
तेणें ग्रंथ करविला निरंजन । चरित्र नाम ग्रंथाचें ॥ ३५० ॥

'निरंजन चरित्र' हें जरी या ग्रंथाचें नांव आहे तरी त्यांत निरंजनाचें चरित्रवर्णन नाहीं. नेहमींचे पद्धतीस अनुसरून अध्यात्मवर्णन आहे. मधून मधून एकादा दुसरा संस्कृत श्लोक घेउन त्याची टीका हि दिलेली आहे. हें वर्णन संपल्यावर श्रीशकरांचार्यांचें 'निरंजनाष्टक' घेऊन त्यावर टीका केलेली आहे. सर्व 'चरित्र' ओंवीबद्ध आहे. बरें आहे.

पहिल्या १३५ ओंवी या श्री शंकराचार्यांचे ॐकाराष्टकावर टीका आहे व पुढील सर्व ग्रंथ निरंजनाष्टकावरील टीका आहे. 'निरंजन' नामसादृश्यानें ग्रंथाचें नांव 'निरंजनचरित्र' ठेविलेलें दिसतें.

शंकरदासांनीं जी गुरुपरंपरा दिली आहे ती अशीः—

आदि गुरु श्री आचार्य शंकर । पुढें जाला योगी भास्कर ।
लयानंद विश्वेश्वर । अरूप तरि रूपा आला ॥ १३ ॥
सहज सिद्ध वंदाया कारणें । योग्य जाला संसारा तारणें ।
परमानंद पुढें म्हणणें । विश्वउपकार करावया ॥ १४ ॥
काशीराज महामति । निरंजन निरंजनीं योगी रमति ।
रत्नाकर वंशपद्धति । भगवंत साक्षात् पौत्र त्यांचा ॥ १५ ॥
तयाची आज्ञा प्रमाण । ग्रंथ लिहिला स्वानुभव सुजाण ।
जाणावया सहज समाधान । शंकरदास कृपा त्याची ॥ १६ ॥

या वरून शंकरदास हे भगवंत याचे आज्ञेनें हा ग्रंथ रचितात असें दिसतें.

निरंजनाची समाधि शक १६४९ मध्यें.

या ग्रंथाचे अखेर शक १६८२ विक्रम संवत्सर असें दिलें आहे. प्रथम तो लेखनशक असावा असें वाटलें परंतु तो रचनाशक असणें असंभवनीय नाहीं. ग्रंथ फाल्गुन वा। ११ गुरुवारीं जेजुरीस समाप्त झालेला आहे. ओंवी एकंदर ३६८.

गो. का. चांदोरकर

# २३ श्री गोरक्षविरचित अमरनाथसंवाद

श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं ज्यांना 'योगाब्जिनी सरोवरू । विषयविध्वंसैकवीरू '। अशीं अशीं विशेषणें दिलीं आहेत त्या श्री गोरक्षनाथांचे कांहीं ग्रंथ उपलब्ध आहेत व कांहींचीं नांवें अवगत आहेत. त्यांपैकीं संस्कृतांत च बरेचसे आहेत.

'गोरक्षनाथ' हें खरोखर मूळचें नांव कीं सांप्रदायिक नांव, यांचें मूलस्थान कोणतें, यांचा जन्म कोणते कुलांत झाला, भिन्न भिन्न स्थलीं पीठें स्थापण्यांत यांची दृष्टी कोणती होती, यांचा वास्तविक काल कोणता, यांचें जीवनचरित्र कसें, त्यानीं खरोखर ग्रंथ किती, कोणते केले वगैरे प्रश्नांचीं उत्तरें देतां येतील अशी स्थिति आज नाहीं. त्यामुळें पुढें जें मी देत आहें तें साशंक मनानें देत आहे.

मला बऱ्याचशा लहान आकाराचीं १५ पंधरा पृष्ठें उपलब्ध झालीं आहेत. तीं १६ वे पृष्ठापासून ३२ पावेतों ( दोन्ही धरून ) परंतु मधील एक पृष्ठ २६ वें गहाळ झालें असल्यानें तीं एकंदर १५ च आहेत.

पृष्ठें जुनीं आहेत असें स्वरुपावरून दिसतें. अक्षरांची मोड हि जुनी आहे. मात्रा क्वचित् मागें आहे. परंतु इतकें कशास ! पुढें दिलेल्या भाषेवरून च पोथीचें पुराणत्व सिद्ध होईल.

विषय विविध दिसतो. या १५ पृष्ठांत जे विषय आले आहेत ते असे:—

१ श्रीगोरक्षनाथविरचिते अमरनाथ संवादे कथयंति ! निजविचारे ॥ छ ॥

२ श्री ... ... ... ... चंद्रसूर्यांचा विवेकू कथयंति ... ...

३ श्री ... ... ... ... देहविवेकू ...

४ श्री ... ... ... आत्मज्ञानकथनं ...

५ श्री ... ... ... सायोज्यतालक्षण ...

येथें २६ वें पान गेलें

६ श्री ... ... ... गुरुशिष्यलक्षण ...

७ श्री ... ... ... राजयोगुलक्षण ...

८ श्री ... ... ... ज्ञानविवेकु ... ...

या वरून विषय विविध आहेत परंतु एकंदर ग्रंथाचा विस्तार अजमावण्यास आधार कांहीं नाहीं इतकें च कीं वर दिलेल्या विषयानुक्रमणिकेवरून असें वाटतें कीं योग, कर्मांचें आध्यात्मिकदृष्टीनें विवेचन व ज्ञान या त्रयींचें विवेचन या ग्रंथांत केलें असलें पाहिजे

थोडासा मासला म्हणून एका प्रकरणाचा उतारा देतो:—

वृक्षाची पानें झडति : आणि माघौति नीगति : परि तें चि म्हणुं नयेति किं : दिवेयां पासौनि निघालिया काजळी : त्याचा पोटीं काई आणिकी षाणि असे : । मग निगालीये नदी उदके अनित्यें : परि प्रवाही नित्य जाणावी किं : ॥ तैसा दृष्यु प्रपंचु पदार्थु अनित्यु :॥ परि त्या प्रवाहो नित्यु जाणावा :।केळिचा गाभा उकलितां काई लाभु असे : आणि फळपानिचें निकें पिकलें : पिकतयाचा उन्हौचि पाहतां बरवां दिसें स्वप्निचें सुष स्वप्नी चि बरवें : मग निर्धारितां तेथें काही असे : तै संसारिचे सुष दिसे : निकें ॥ सेंषी सुरस नव्हे । ऐसें ज्ञानें जाणावें । आकाश कुसमीं जरि परिमळु भे ( लाभे किंवा भेटे ) । नातरि नाथलीये वांझेचें लेकुरुं त्रिभुवनभोगी : ससेंचेयां सींगे : तिषटें हें बालणें चि लटिकें: । तैसा दृश्यु प्रपंचु : असत्य चि लटिका असे : । मृगजळ जळीं नाही : परि म्रुगासि जळभ्रमु असे । कुसममाळेचां नाथिला भोगिया आभासे : शुक्तिचां ठांई रजतबुद्धि लटिकी: तैसा दृश्यु प्रपंचु लटिका चि: परि दिसत( ता ) असे : हा संसारु दुःखरूप ऐसा : त्याची जया आपुली उन्ळषि नाहि : हें साकार पंचधा म्हणत खेउ० : तिये गोडीचीए रुचि : सांडौनि काई तिषट होती असे: हा उष्ठ वांकुडा दिसे : परि त्याचा रसु गोडियेची सोए न संडित : वांकुडपणीं परि रसीं नाहीं : कि हे कस्तुरी काळी दिसे : परि तिचिया परिमळाचें सौरभ्य पण अणले किं । एवढीये सृष्टीचे अढाल : जेयाचेनि चालें : त्यातें उ०ळखे : तो या संसारा आतु सुखदुःखी लिंपें ना : जैसे पद्मिणीचें पत्र उदकां भितरि आसौनि अलिपत ( अलिप्त ) तया जन्माचें आणि कर्म्मभक्तिचें फळ तें किं : जैं आत्म ज्ञानं जाणिजे : । ७ ॥ श्री गोरक्षनाथविरचिते अमरनाथ ( संवादे ) आत्मज्ञान कथंति निजविचारें । ७ । ११ ।

रेखालील द्वित्त अक्षर, मागील मात्रा व अनुस्वार, आणि जुनीं रूपें यावरून या लेखनाचा, अथवा आंतिल ग्रंथाचा काल ११ शें फार तर १२ शें शकांतील असावा असें अनुमान काढणें गैरशिस्त होणार नाहीं.

या ग्रंथाचें यथार्थ नांव काय व त्याचा काल आणि विस्तार यांचा योग्य शोध लागल्यास केवढी मौज होणार आहे !

गो. का. चांदोरकर

## २४ नृसिंहकृत हृदयनिवास

शांतालिंग—कृष्णाप्पा अथवा श्रीकृष्ण—जयराम स्वामी वडगांवकर—आत्माराम—नृसिंह.

या परंपरेवरून हे जंगम-सांप्रदायी होते हें उघड आहे.

या 'हृदयनिवासा' चीं प्रकरणें ५ पांच आहेत. प्रथम प्रकरणीं प्रश्न जीव, शिव, मीपणा ( अहंकार ! ) यांचे संबंधीं शिष्यानें केला, त्याचे उत्तरानें पांच हि प्रकरणें अडविलीं आहेत. नाद् बिंदु कला, यांचें त्यांत विवरण आलें आहे. शेवटचे प्रकरणीं परमपुरुषाचें विवरण ( ! ) केलें आहे.

नरसिंह हे जयरामशिष्य च असावे अशा वर्णनाच्या दोन तीन ओंवी आहेत. आत्माराम हें कदाचित् रूपक असावें.

ग्रंथांत विशेष कांहीं नाहीं.

गो. का. चांदोरकर

## २५ शंकरदासकृत गणपतिस्वयंवर

याचीं एकंदर ६ प्रकरणें आहेत.

| | |
|---|---|
| प्रथम प्रकरण— | १११ ओंवी |
| द्वितीय प्रकरण— | २९ ओंवी |
| तिसरें प्रकरण— | १५ ओंवी |
| चौथें प्रकरण— | १३ ओंवी |
| पांचवें प्रकरण— | ८३ ओंवी |
| सहावें प्रकरण— | ३३ ओंवी |
| | २८४ एकूण |

प्रत्यक्ष काव्याबद्दल विशेष लिहिणें नको. नेहमीचे पद्धतीप्रमाणें रूपकात्मक स्वयंवरवर्णन आहे. ओंवी आटपशीर आहे.

सहावे प्रकरणाचे शेवटीं थोडी हकीकत आली आहेसें वाटतें. तेवढी देतों:—

दोन वर्षें रुसलों म्हणउनि । जिवाजी शिवदेव दिधले पाठउनी ।
आइप स्वयंवर सिद्ध करूनि । यावें सत्वर हातोहात ॥ ३१ ॥
स्वयंवर जालें तदाज्ञया । मंगळमूर्तीची पूर्ण दया ।
म्हाळसाकांत साह्य तया । अध्यात्म रसाळ श्रोते श्रवणीं ॥ ३२ ॥

येथें जिव शिव हीं नांवें आल्यानें रुपक आहे असें वाटतें व दोन वर्षें कवन मुळीं च केलें नाहीं म्हणून श्रीगणपतींनीं च ही स्फूर्ति दिली असें म्हणण्याचा भावार्थ असल्यास नकळे. कदाचित् जिवाजी शिवदेव कोणी मनुष्य हि असूं शकेल. पण मग 'तदाज्ञया' हें पद जिवाजीस पाठविणाराची आज्ञा त्यास उद्देशून असलें पाहिजे परंतु त्याचें तर पूर्वी कोठें हि नांव आलेलें नाहीं, मग 'तत्' कसें. असो.

एके ठिकाणीं 'सहज सद्गुरू प्रसादें' असें एक पद यांत आलें आहे. भगवंताचें ( निरंजनाचे नातू ) नांव सहजानंद तर नव्हतें !

मागचे लेखांत गुरुपरंपरा आली च आहे. निरंजनाची ही परंपरा आहे व निरंजन हे गाणपत्य होते तेव्हां शंकरदासांनीं गणपतिस्वयंवर करणें योग्य च आहे. शेवटची ओंवी अशी आहे:—

शंकरदासी मंगळमूर्ति । निर्विकार स्मरण वाचास्फूर्ति ।
गणेशपुराण पूर्णपूर्ति । मार्तंड भैरव सद्गुरुबोधें ॥ ३३ ॥

ही गणेशपुराणाची पूर्ति जी शंकरदासांनीं केली ती स्वतःच्या गणेशपुराणाची कीं आपणांस विदित असलेल्या निरंजनकृत गणेशपुराणाची !

तसेंच मार्तंड भैरव सद्गुरु म्हणजे काय ! मागच्या काव्यानंतर दोन वर्षें असल्यास हे १६८४ मधील.

गो. का. चांदोरकर

---

## २६ शंकरदासकृत गणपतिकार्तिकस्वामिभांडण

हें मोठें गोड काव्य आहे. लहान आहे. सारीं १३७ कडवीं आहेत. चाल ही रम्य आहे. थोडा मासला देतों.

सज्जना । परिसा अनुभवखुण रंजना ॥
सहजीं सहज नमन त्यासीं । उरणें कैचें शंकरदासीं ॥
विवरुं अखंड रायीयासी ॥हो सज्जना ० ॥
पार्वतीची स्फुरली स्फूर्ति । तो चि सर्वेश्वर चिन्मूर्ति ॥
आख्या जाली मंगलमूर्ति ॥ हो सज्जना ० ॥
षण्मुख प्रत्यग्वस्तूठायीं । आनंदादिक षड्विध पाहीं ॥
यास्तव षण्मुख येसें गायी ॥ हो सज्जना ० ॥

---

जननी गे । सांग त्याला उचित पाहोनि ॥
माझा आखु विष्णु झाला । शबल तत्पद अनुभव पहाला ॥
नपुंसक मयूरवहाने । त्याला गे जननी ॥
बोधक इंद्र मयूर माझा । पिछें प्रियकर श्री महाराजा ॥
साधू न शिव शबल । जा जा रे वग्गना ॥
करिसी मिथ्या तुझी कल्पना ॥

गणेश भेणें जो पळाला । ब्रह्मा विष्णु रुद्र जाला ॥
सेखीं सिद्धटेंका आला रे ॥ संताची ० ॥
मयूर कपाट गुप्त स्वामी । विश्व तैजस प्राज्ञ धामीं ।
जाला कार्तिकस्वामि नामीं रे ॥ संताची ० ॥
मारा धरुनि येका हातें । दोघे म्हणति न पळों म्यातें ॥
टक टक पाहतां न लगे पातें । गे.।
निजमाये । मजला न मरि धरितों पाये ॥

गो. का. चांदोरकर

## २७ शातलिंगकृत कर्णहस्तिकी

जयरामस्वामी वडगांवकर हे समर्थ पंचायतनापैकीं एक होते हें सर्व-प्रसिद्ध च आहे. यांचे गुरु कृष्णाप्पा, त्यांचे शांतलिंग. शांतलिंग हे जंगम होते असा उल्लेख सांपडतो; परंतु आज पावेतों त्यांचा ग्रंथ उपलब्ध नव्हता. तो रा. राजवाडे यांच्या 'कऱ्हाड' च्या संग्रहांत मिळाला.

लिंगाईत धर्मी शांतलिंग होते याबद्दल या ग्रंथांत प्रत्यक्ष पुरावा आहे.

मग शांत विज्ञप्ति करीं । जी बसवादि परमंयनाभीतरी ।
चेनबसवेश्वरें गर्भा अंतरी । बोलिला कर्णहस्तिकी ॥ १४ ॥

गुरूजवळ करुणा भाकीत असतां त्यांनीं काय पाहिजे म्हणून विचारतां वरील उत्तर शिष्यानें दिलें आहे. या ग्रंथाचें निरूपण व्हावें अशी शिष्याची इच्छा. हा ग्रंथारंभ, ग्रंथान्त असा च आहे.

चनबसवेश्वरोक्ति । वरि म्या बोलिलि अनुभूति ।

या वरून बसवमतानुयायी ` शांत (लिंग) होते यांत संशय नाहीं.

आतां हे शांत म्हणजे शांतलिंग कशावरून असा एक प्रश्न उत्पन्न होतो; त्यास एक पुरावा आहे. शांतलिंगास परंपरेंत शांतलिंग न ह्मणतां शांत म्हणत असत. हे जयरामस्वामि वडगांवकर आपल्या 'अपरोक्षानुभूति'(टीका ) मध्यें असें ह्मणतातः—

असो स्वानंदसुखाचा दाता । तूं चि येक सद्गुरू शांत ।
श्रीकृष्ण रूपावंत । चरणीं माथा अनन्य ॥ अ ४१ X ७३.

तसें च

श्रीशांत सद्गुरु सदाशिव ।
शंकराचार्य महादेव ॥

यावरून हे शांत म्हणजे जयरामस्वामीचे गुरुपरंपरेंतील आहेत यांत शंका नाहीं.

यांचा गुरु कोणी नीलकंठ नामें असावा असें दिसतें. कदाचित् त्यास उद्देशून च 'सदाशिव' असें अर्थसादृश्यावरून म्हटलें असावें असें वाटतें. प्रस्तुत ग्रंथाचे शेवटीं अशी एक ओंवी आहेः—

चनबसवेश्वरोक्ति । वरि मी बोलिलि अनुभूति ।
प्रीति पावो विद्वत्पारंगति । म्हणे शांत नीळकंठ ॥

आंरभीं हि

श्री गुरुपरंपराय नीलकंठाय नमः । असें- आहे, तेव्हां कदाचित् नीळकंठ नांवाचे कोणी यांचे गुरू असतील. तेव्हां जयरामस्वामीची गुरुपरंपरा व त्यांचा काल असा ठरतो.

नीलकंठ (श. १४५०)
|
शांतलिंग (श. १५००)
|
श्रीकृष्णाप्पा (श. १५४५)
|
जयरामस्वामि वडगांवकर. (स. श. १५९४)

यावरून शांतलिंग हे एकनाथांचे समकालीन होते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## कणहस्तिकी किंवा हस्तकी

चनबसव हा गर्भात असतां कर्णहस्तकी बोलला (?) अशी शांतलिंगांची समजूत होती. गर्भात बोललेल्या शास्त्राचें उद्घाटन करण्याकरितां या ग्रंथाची प्रवृत्ति आहे हें उघड आहे. तेव्हां या ग्रंथांत काय आहे तें थोडक्यांत पाहूं; म्हणजे जंगमांचें मत हि सहज कळेल.

निर्गुण ब्रह्मावर ॐकाराची उत्पत्ति झाली. यांत अ उ म कार होते (अर्धमात्रा व बिंदु यांचा उल्लेख नाहीं). हे च नाद् बिंदु व कला. हा प्रणव च संसारतरु (अथवा ज्यास श्रीमद्गीतेंत अश्वत्थ म्हटलें आहे तो).

चारे निजब्रह्मीं उठिला ॐकारु । तो अवतरला ब्रह्मांडतरु ॥

याचें प्रथम विवरण केलें आहे. म्हणजे अकार उकार व मकार हें च स्वरूप पंचतत्वांचें तीन अवस्थांचें, तीन देवतांचें व तीन वेदांचें. यानंतर ब्रह्मदेवाच्या पांच तोंडापासून पंचतत्वोत्पत्तिकथन आहे. या पंचतत्वांचे गुणधर्म, कर्म, वर्ण व देवता यांचें विवरण आहे. नंतर शिवतनूचें वर्णन आहे. ही अष्टधा —पंच भूतें, सूर्य, चंद्र, व चैतन्य—आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हा सर्व शिवतनूचा पसारा आहे.

यानंतर पंचभूतांचे अंशांश यांचें वर्णन दिलें आहे, ( पंचीकरण ). नंतर इडा, पिंगळा, सुषुम्ना, गंधारी, हस्तजिव्हा, पूषा, पयस्विनी, ( यशस्विनी ? ) अलंबुका, लकुला, शंखिनी, अशा या दहा नाड्यांचें वर्णन आहे. यानंतर 'अष्टात्मे' ( जीवात्मा, अंतरात्मा, परमात्मा, निर्मळात्मा, शुद्धात्मा, ज्ञानात्मा, भूतात्मा, आणि महात्मा ) यांचें विवरण केलें आहे. यापुढें अष्टतनु ( स्थूल, सूक्ष्म, कारण, निर्मळ, चिन्मय, आनंदघन, चिद्रूप, आणि शुद्ध) सांगून अष्टपदाकडे ग्रंथकार वळले आहेत. यापुढें अष्टपाशांचें वर्णन आहे; ते अष्टपाश असेः—घृणा, शंका, लज्या, भीति, जीवगुछा ( जुगुप्सा ) ,कुळपाश, शीलपाश, व्रतपाश. यानंतर क्रमानें अष्टमूर्तिपद, अष्टपुरी, सप्तधातु, सप्तव्यसनें ( तन, मन, धन, राज्य, विश्व, उत्सव, व सेवक—मोह ), सप्तावरण, यांचा उल्लेख व वर्णन देऊन नंतर षडूर्मी, षड्रिपु, यांचें विवरण करून षड संभ्रमांकडे वळले. हा संभ्रम जाति, वर्ण, आश्रम, कुळ, गोत्र व नाम यांबद्दलचा उद्भवतो. पुढें षड्भाव, षड्कोश ( हे जड देहाचे अस्थिमांसादि ), पंचक्लेश, पंचकोश, चतुष्टयपंचक ( उन्मत्त, उद्योग, उदासीन, उच्छिष्ट ) यांचे स्पष्टीकरण केलें आहे. चतुष्टयपंचकांत मनुष्याचे आयुष्याचे २५ प्रमाणें चार भाग कल्पून त्या त्या भागांत उन्मत्तादि अवस्था गणिली आहे, १ ले पंचविंशींत उन्मत्त, २ रींत उद्योग, ३ रींत उदासीन ( विरामि ) व ४ थींत उच्छिष्ट( कारण येथें 'गात्रं क्षरति' ). यानंतर शरीराच्या ( स्थूल ) कोणते भागांस अंग, प्रत्यंग उपांग, सगांग, म्हणतात तें दिलें आहे.

या पुढें त्रिगुण वर्णन करून मग तनुत्रय सांगून त्यांच्या अवस्था व अभिमानी सांगितले आहेत. यांत 'महाकारण' देहाची गणना केलेली नाहीं. पुढें आधिभौतिक,—दैविक, व आध्यात्मिक या तापत्रयाचें विवरण आहे.

या पुढें जीवात्मा, अंतरात्मा, व परमात्मा या तीन आत्म्यांचें विवरण दिलें असून पुढें भावत्रयाचा विस्तार केला आहे. येथें ज्ञानविकृतीची व्याख्या अशी दिली आहेः—

> वेदान्तश्रवणें दृश्यमिथ्या ।
> ह्मणे अहं ब्रह्मास्मि वाग्देवता ।
> या जडवासनेनें तिष्ठता ।
> तो ज्ञानविकृतिभाव ॥ १९ ॥

या वरून ज्ञान ह्मणजे 'शब्द व याक्त यांनीं झालेला ब्रह्माचा निश्चय' येवढें च घ्यावयाचें असें दिसतें. हा ज्ञानाचा अर्थ 'श्रेयो हि ज्ञानमभ्यासात्' या श्रीगीतावचनाचा केलेला आहे. असो.

पुढें सद्भावत्रय ( प्रकाशन, प्रवर्तन, व मोहन ) याचें वर्णन आहे. भावत्रयांतील अनुभवाचा कमीपणा यांत भरून काढलेला आहे.

प्रकाशन–गुरूपदेशानें ब्रह्म स्फुरणें

प्रवर्तन=ब्रह्मा प्रीत्यर्थ व्यापार ( क्रिया ). यावरून,हें नैष्कर्म्य.

मोहन=सुखीं लोलुप होउन कर्म करणें = फलेच्छेनें केलेलें कर्म.

यानंतर मनत्रय, कर्मत्रय ( कायिक, वाचिक, मानसिक, व प्रारब्ध संचित, क्रियमाण ), पंचाग्नि ( उद्राग्नि, मद्राग्नि, शोकाग्नि, कामाग्नि, वडवाग्नि = नेहमीं अतृप्ति ), ईषणात्रय यांचें वर्णन आलेलें आहे.

अखेर जीवतनुचतुष्टय ( येथें महाकारण तनु गणिली आहे ) सांगून ईश्वरतनुचतुष्ट्याचें विवरण केलें आहे; व ग्रंथ संपूर्ण केला आहे.

या वरील विवरणा वरून वर्णाश्रमास या मतांत स्थान नाहीं इतकें च नाहीं तर त्यांस षड्संभ्रमांत गणलें आहे.

गो. का. चांदोरकर

## २८ मध्वनाथकृत गुरुचरित्र

अद्वयग्रंथ गुरुचरित्र । अति रसाळ पवित्र । श्रवण करिती त्याचे श्रोत्र । अधिक अध्यात्म ऐकिती ॥

हें गुरुचरित्र म्हणजे योगाचें वर्णन आहे. प्रथम प्रणवाची उत्पत्ति दिली आहे, नंतर अजपावर्णन, त्यानंतर देहचतुष्टयविचार, तेथून पुढें चार वाचा व चार अवस्था सांगितल्या आहेत.

ऐसी हे ब्रह्मांडीची कथा । सांगो पिंडाची वार्ता ।
अवधान यावें चित्ता । येथिचें विवरणीं ॥ ६२ ॥

पिंडांत मुखापासून मुर्ध्नि पावेतों प्रणवाधार इंद्रियें आहेत. यानंतर षड्चक्रांचा विचार आहे. ओघानें च 'द्विमुखसर्पिणी' कुंडलिनीचें वर्णन आहे. यानंतर मुद्राप्रकरण लागलें. अशा रीतीनें 'योगस्थ' झालेला पुरुष

ऐसा तो ब्रह्मपुरूष । परमात्मेयाचा अंश
जिवा रहित विश्वेश । मध्वनाथ आनंदला ॥ ५९ ॥

यानंतर श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं सहावे अध्यायांत ( श्रीभावार्थदीपिकेच्या) जी योग्याची स्थिति वर्णन केली आहे ती दिली आहे.

अशा तऱ्हेचें हें विलक्षण गुरुचरित्र आहे. या ग्रंथाचा कर्ता मध्वनाथ आहे असें वर आलें च आहे. यांनीं 'येकाजनार्दना' चा गुरु म्हणून उल्लेख केलेला आहे.

येका जनर्दना कथा रसाळ । ब्रह्मनिरोपण केलें सगळें ।
अमृतवल्लि फळें सुफळ । फळिली निजात्म निजफळीं ॥
त्याचीं कृपा द्रविली हा ग्रंथ । सुवर्णकोंदण तैसा अर्थ ।
रत्नाखालता मध्वनाथ । लाखरूप पैं जाला ॥ ७२ ॥

यावरून श्रीएकनाथांच्या कृपेचें फळ तो हा ग्रंथ आहे असें उघड होत आहे. मध्वनाथांचे गुरु एकनाथ जर तर त्यांची (मध्वनाथांची) समाधि शक १६५६ मध्यें हें कसें ! कां मध्वमुनी व मध्वनाथ हे भिन्न ! कां श्रीएकनाथ हे गुरु च परंतु प्रत्यक्ष नाहींत ! हें कोडें आहे.

गो. का. चांदोरकर

## २९ रंगनाथ-(रामराय) कृत स्वानुभवामृत

हें प्रकरण वे० रा. रा. गोपाळ कृष्णशास्त्री कंदकुर्तीकर श्रीक्षेत्र बासर, यांजकडून मिळालें. याचीं पृष्ठें ७१ असून अध्याय ११ व ओंवीसंख्या ७०१ आहे. रचनाकाल दिलेला नाहीं. लेखनकाल "श्रावण वद्य ५ गुरुवार प्रथमप्रहर. छ ६ रमजान सन १२६४ हिजरी" याप्रमाणें आहे. यांत शिष्यानें गुरूस प्रश्न केला कीं, पृथ्वीवर अनेक देवदैवतें आहेत. जो तो आपाआपल्यापरी मोठा दिसतो. त्यामुळें कोणास भजावें ! जगांत मोठा कोण आहे ? याप्रमाणें शंका विचारल्यावरून गुरूनें शिष्यास तूं कोण ह्मणून विचारलें. शिष्य गोंधळला आणि विनंती केली कीं, याबद्दल च मला सविस्तर विवरून सांगावें. त्याप्रमाणें गुरूनें मूळ उत्पत्तीपासून अखेरपर्यंत वर्णन करून शेवटीं दिव्य दृष्टीनें स्वस्वरूप शिष्यास दाखविलेलें आहे. एकंदर विवरण अगदीं सरळ व सोप्या भाषेंत स्पष्ट केलेलें आहे.

या रंगनाथाचें मूळ नांव रामराय असें होतें. सखाराममहाराज नांवाचे कोणी ब्रह्मनिष्ठ पुरुष होते. त्यांनीं या रामरायास भक्तिमार्गाचें पिसें लाविलें व त्याजकडून श्रीज्ञानेश्वरकृत अमृतानुभव वगैरे ग्रंथ वाचविले. परंतु त्यांचा अर्थ नीट समजेना ह्मणून सखाराममहाराजानीं "शीघ्रानुभव" नावाचा सुगम ग्रंथ रचिला. मरणसमयीं सखाराममहाराजांनीं शंकर अवतार घेऊन येतील व ते तुझा उद्धार करतील असें रामरायास सांगितलें. त्याप्रमाणें नीळकंठमहाराज यांची भेट होऊन त्यांनीं रामरायावर कृपा केली. त्या कृपेच्या योगानें अकस्मात् एके दिवशीं भाग्यनगरास बाळकृष्णमहाराज यांची भेट झाली. त्यांनीं रामरायास ज्ञानोपदेश करून

आपल्या निजरंगांत पूर्ण रंगून गेले म्हणून त्यांचें नांव रंगनाथ असें ठेविलें. रंगनाथांचें कुळदैवत श्रीलक्ष्मीवेंकटेश.

यांनीं आपली गुरुपरंपरा पुढीलप्रमाणें दिली आहेः—
नारायण—कमलासन—वसिष्ठ—पाराशर—व्यास-शुक—गोविंदाचार्य—शंकराचार्य— पद्मपाद, हस्तामलक, तोटक, वार्तिक-सुरेश्वराचार्य— विद्यारण्य — शंकरानंद—रामानंद —कैवल्यानंद — कृष्णयोगी—नीळकंठ — पुष्कराय —जयराम—शंकर ( यांचा मठ दोमकुंड येथें )—बालकृष्ण ( यांचा मठ श्रीक्षेत्र इंदूर येथें ) रंगनाथ ( रामराय ).

आदिः—

ॐ नमोजी गजानना । ज्ञानाच्या ही निजज्ञाना
करिता तूझी प्रार्थना । निजभक्ता स्वपद देशी ॥ १ ॥

अंतः—

पुन्हा श्रीगुरुचे वर्णावे कीर्ती येश
तरी वाचेचा नाही स्वरूपी प्रवेश ॥
ह्मणोनि वाचांश लक्षांश
श्रीगुरुचरणार्पण केला ॥ ६७ ॥
स्वस्ति श्रीस्वानुभवामृतग्रंथ
निजबोधे श्रीगुरुसमर्थ ॥
केले रंगनाथा कृतार्थ
श्रीसद्गुरुपरंपरास्तवनोन्नाम येकादशोध्यायः ॥ अ० ११ ॥

वर उल्लेखिलेला सखाराममहाराजांनीं केलेला "शीघ्रानुभव" ग्रंथ शोधला पाहिजे.

ग. ना. मुजुमदार

## ३० तुकेशसुतचैतन्यनाथविरचित स्वरूपविवरण

हें प्रकरण श्री० दादासाहेब ओंकार यांच्या संग्रहापैकीं आहे. याची ओंवीसंख्या २४० असून तुकेशानें आपला शिष्य चैतन्यनाथ यास उपदेश दिल्यानंतर स्वरूपाचा अनुभव कसा झाला तो सविस्तर सांगण्यास आज्ञा केल्यावरून चैतन्यनाथानें आपला अनुभव यामध्यें सांगितलेला आहे. प्रकरणाचा आरंभ असाः—

जय जय अकळ गणराजा । तयासि नमस्कार माझा ।
म्हणोनि नमीलासि योना । सिधराजा ॥ १ ॥

तु सच्चिदानंद गणेशु । लंबोधरा स्वयंप्रकाशु ।
तुझा समस्तासि विश्वासु । श्रीचिंतामनी ॥ २ ॥

गणपतीचे व सरस्वतीचे वंदनानंतर गुरूस वंदन येणेंप्रमाणें केलें आहे:—

आतां नमु श्रीगुरु कृपाळु । जो प्रसन्न होता न लगे वेळु ।
तो नमस्कारू कृपाळु । श्रीगुरूनाथ ॥ १६ ॥

मग श्रीचरणासी नमस्कार केला । प्रदक्षिणाकरुनि उभा राहिला ।
श्रीतुकेशे अभयवर दीधला । आनंदेसी ॥ १७ ॥

तुकेश चैतन्यास आज्ञा करितात:—

मग श्रीतुकेशे पुसे चैतन्यनाथाते ।
तुज अनुष्ठान दाखविलें होतें ॥
तरि कैसे देखिले स्वरूपाते ।
सांग चैतन्यनाथा ॥ १८ ॥
ते स्वरूप तुज कैसे कळले ।
ते श्रीतुकेशे पुसो आदरिले ॥
अनुभवाते सांग पा वहिले । चैतन्यनाथा ॥ १९ ॥

मग श्रीतुकेश म्हणे शिष्याते । तुवा सांगितले दृशेते ।
मनासि आले निरुते । आपरोक्षगति ॥ १०७ ॥

तरि तुवा उपकार करावा । महंतासि उपदेश सांगावा ।
हा संप्रदाय चालवावा । जडजिव तारावया ॥ १० ॥

अनुभव सांगितल्यानंतर शेवटचा भाग:—

श्रीतुकेशाचेनि कुमरे । सांगितलि अनुभवाच उत्तरे ।
हे देखोनि नेत्रद्वारे । चैतन्यनाथे ॥ २३३ ॥

हा श्रीदत्तात्रयाचा आनंद । बोलिला स्वरूपाचा विनोद ।
या ज्ञानाचा न करावा भेदाभेद । ह्मणे चैतन्यनाथ ॥ २३४ ॥
या जतन करावे परमार्थासी । हे शास्त्र द्यावे ज्ञात्यासि ।
जे जानति आत्मस्वरूपासी । ह्मणे चैतन्यनाथु ॥ २३५ ॥

हे शास्त्र आले अद्वैतापासुनि । श्रीदत्तात्रेयापासुन ।
ह्मणे अनुसयानंदन । चैतन्य तुकेशाला ॥ २३६ ॥

ऐसा हा परमार्थु । यासि आधिपते दत्तात्रे अवधुत ।
म्हणे चैतन्य सुतु । तुकेशाचा ॥ २३७ ॥
हे शास्त्र जे होति वाचते । अथवा होति ऐकते ।
ते पुरुष दत्तात्रयाते । पावति जाणा ॥ २३८ ॥

हा श्रीदत्तात्रयाचो आनंदु । जग शहाने करु आरंभिले विनोदु ॥
तेणे जाहला माहा आनंदु । चैतन्यनाथ तुकेशाचा म्हणे ॥ २३९ ॥
ईति श्रीस्वरूपाविवरण । परोपकारपरिपुर्ण ।
निराकार निर्गुण । शुभं भवतु ॥ २४० ॥
इति श्रीआनंद चैतन्यरुत श्वरूपाविवरण ग्रंथ संपूर्णमस्तु ॥

तुकेश अथवा चैतन्यनाथ यांचा काल माहित नाहीं. या प्रकरणांत हि याबद्दल कांहीं च उल्लेख नाहीं. हा तुकेश व चैतन्य हे आनंदसंप्रदायी होते हें वरील उताऱ्यावरून स्पष्ट च होतें.

या चैतन्यनाथाच्या शिष्य परमानंदचैतन्य यानें हि वरीलप्रमाणें आपला अनुभव गुरूच्या 'तारकब्रह्म' नामक ३१२ ओंवीसंख्या असलेल्या प्रकरणांत ग्रथित केला आहे. हें प्रकरण तंजावरच्या सरस्वती महालांत आहे (भा. इ. सं. मंडळाचा शके १८३५ चा वृत्तांत पान ६-७).

गं. ना. मुजुमदार

## ३१ तुकाविप्रकृत एकनाथावरील श्लोक

॥ अथ श्रीएकनाथ महाराजाचे नमस्कार प्रारंभ ॥ श्लोक ॥

॥ श्रीमद्विठ्ठल भति(?) कारणकुळी तो भानुदास स्वये ।
जाचा आत्मज चक्रपाणी भजने तारी जडा नीश्चये ॥
झाला त्यासि सुपुत्र सूर्य मन हे तत्पादकंजी रमो ॥
त्यापासूनि जगग्दुरू प्रगटला त्या एकनाथा नमो ॥ १ ॥

अधिश्टान जे ते प्रतीष्टान देशा । तेथे जन्मला तो गुणातीत एका ॥
तयाचेनि नामे चुके जन्मवेथा । नमस्कार माझा सग्दुरु एकनाथा ॥ २ ॥
नदी दिव्य गोदातटीचा निवासी । सदाप्रीय जो सज्जना वैष्णवासी ॥
जयां वर्णिता प्रेम अल्हाद चित्ता । नम० ॥ ३ ॥
स्वये भानु जो भानु आराधियेला । तयाचे कुळी दीपकू दिव्य झाला ॥
हरीभक्ति लागुनि तारी समस्ता । न० ॥ ४ ॥
चरित्रे विचित्रे पवित्रे अपारे । मुढे पामर तारिलें सूविचारे ॥
जयांचे कृपेने समाधान चित्ता । नम० ॥ ५ ॥
लिळाविग्रही सर्व ही निर्मियेलें । जिवीजीवना साधना योग्य केले ।
अनन्य युक्ती भक्ती (?) जो मुक्तिदाता । न० ॥ ६ ॥
जयाचे जगी कीर्ति विस्तारिलीसे । जयाचेनि नामें महा दुःख नासे ॥
जयाचे नियोगे घडे सर्व सत्ता । न० ॥ ७ ॥

जेणे अर्चिले द्वीज देवासी नेमे । जेणे तारिले विश्व हे रामनामे ॥
सदा सेवि जो सद्गुरू मोक्षदाता । न० ॥ ८ ॥
जया नाम ना रूप ना गुण कांहीं । जया देहवीदेहताभास नाहीं ॥
बहू तारिले हस्त ठेऊनि माथा । न० ॥ ९ ॥
जगीं येकला सद्गुरू एकनाथु । ऐसे बोलती सर्व ही विश्व मातु ।
जया ऊपमा हो नये एक देता । न० ॥ १० ॥
कवीनायकू दायकू सौख्य रासी । महाज्ञानसिंधू असे नाम जासी ॥
जयाचो जगीं वर्णिता कीर्ति गातां । न० ॥ ११ ॥
अनंता गुणाचा नये वर्णिताहो । सदा दास तो शामवर्णी पहा हो ॥
जयाचे मुखे नाम रूचे समस्ता ॥ न० ॥ १२ ॥
महा संत साधू प्रतिष्ठानवासी । स्मरा एकनाथा पदा मूक्ति राशी ॥
जयाचे गृही कृष्णजी कार्यकर्ता ॥ न० ॥ १३ ॥
सद्भानुवंशीकुलदीप योगी । जनार्दनाचे निजसौख्य भोगी ॥
तया एकनाथा स्मर एक भावे । होशी जगी पावन तू स्वभावे ॥ १४ ॥
श्रीएकनाथा घरि आवडीने । पाणी आणि श्रीहरि कावडीने ॥
धोत्रे धुतो गंध उगाळुनीया । पाणी आणी श्रीहरि गाळुनीया ॥ १५ ॥
श्रीभानुदासाकुळी एकनाथ । ही विष्णुमूर्ती उघडी कळींत ॥
दिसे जना मानव शुद्ध भोळा । वदे तुका विप्र अभंग लीला ॥ १६ ॥ समाप्त

गं. ना. मुजुमदार

## ३२ शिवदिनकेसरीचें एक ऐतिहासिक पद

रा. विष्णु रामकृष्ण घुगरी, माजी दिवाण संस्थान श्रीशिवदिन-केसरी, पैठण, यांच्याजवळील एका बाडांतील हें पद आहे. पानिपतच्या घनघोर रणकंदनानंतर देशामध्यें कशी स्थिति झाली याबद्दल हुबेहूब चित्र या पदांत रेखाटलें आहे. सामान्य बखरकारापेक्षां साधुसंतांनीं दिलेली ऐतिहासिक माहिती जास्त विश्वसनीय मानली पाहिजे. कारण त्यांचे मनांत स्वपरभाव मुळीं च नसल्यामुळें निःस्पृहपणानें सत्य गोष्ट ते सांगतात. यांत श्रीमंत भाऊसाहेब, नानासाहेब व दादासाहेब पेशवे यांचा उल्लेख आहे.

पद

सोळाशतें चौऱ्यासित झाली धूलधानी
द्वैतराज्य दुष्टबुद्धि नासिले प्रधानी ॥ धृ० ॥

क्यांसी न्यांसी गेले भाऊ नाना दोनी
तैसी कोनी कोणाची हि मानींना नीदार्नी ॥ १ ॥
सारा दाणा जप्ती पट्टी द्रव्य गृह खाणी
पंचासित लुटालूट मांडिली तापत्रय दुःखानी ॥ २ ॥
देश ग्राम वस्ती ओस पाडिल्या पेंढाऱ्यांनीं
तस्कर पुस्कर पापी उद्धी आणिले खिंडाऱ्यांनीं ॥ ३ ॥
हाहाःकार तो फाराचि केला राघोबा वाघानीं
... ... ... ... ... ... ॥ ४ ॥
उरली सुरली ग्राम अहंता बुडविलि द्वेषानी
तिर्थे क्षेत्रे गाई ब्राह्मण फार कष्टली क्लेशानी ॥ ५ ॥
भक्त विरक्त साधु संत त्राहि बोलति वाणी
शिवदिन केसरि भगवंता तू यासि पाव निर्वाणी ॥ ६ ॥

ग. ना. मुजुमदार

## ३३ विष्णु काशीनाथ ( गणेशयोगीशिष्य ).

श्री. दादासाहेब ओंकार, पुणें, यांचे संग्रहापैकीं बाडांक २ यांत विष्णु काशीनाथ यानीं गणपतिपर मयुरेशजन्म, हेलकरी, पाळणा, जावळ, नामकर्म, जन्मपत्रिका, भट, मुंज्या, पांगुळ, कैकाडीण, जंगम, वासुदेव, बाळसंतोष, चोपदार, महार, गस्त, भूपाळी, कांकडआरति, वगैरे विषयांवर श्लोक, अभंग, ओंवी, पदें वगैरे रचलेलीं आहेत. हा कवी गणेशयोगी यांचा शिष्य आहे. कवितेचे कांहीं मासले खालीं देत आहे:—

### पद

सर्वाही पुजीला । सर्वा वरदु जाला ॥ धृ० ॥
ऐसा माझा स्वामी । नांदे निजस्वानंदधामी ॥ १ ॥
विघ्नकरा विघ्नहरा । पाई विरुदाचा तोडर ॥ २ ॥
स्वाधिन सकाळिक । नाम ज्याचे विनायेक ॥ ३ ॥
ज्याचा पारु नाही । लंबोधर वेदु गाई ॥ ४ ॥
सिधिबुधीकांत । ध्याई विष्णुकासीनाथ ॥ ५ ॥

### माहार

माहार आम्ही जातिचे माहार ॥ धृ० ॥
माया अविद्या हारिलि । म्हणउनि माहार हे बोली ॥ १ ॥

न्याय अन्यायाचा मार्गु । नीवडुनि निजयोगु ॥ २ ॥
गणेशयोगीयाचा लेक । विष्णु ऐसा अनामीक ॥ ३ ॥

### जंगम

तो येक जंगमरे ॥ जानी गुनाचा रुंगम ॥ धृ० ॥
चिंतामनी मनोलिंगा । पूजुनि टाकी बाह्यकुलिंगा ॥ १ ॥
त्रीकुटावरि मट केला । ब्रह्मपतिचे बोधि नी माला ॥ २ ॥
गणेश योगी अया । विष्णु शरण अनन्ने पाया ॥ ३ ॥
॥ तो यक जगम रे ॥ ७ ॥

## ३४ सखानंद (परमानंदशिष्य)

पुणें येथें जुन्या बाजारांत मिळालेल्या एका बाडांत सखानंद यानें आपल्या गुरूचें अष्टक केलेलें आढळलें. हा सखानंद केव्हां होऊन गेला याबद्दल कांहीं च गमक नाहीं. मात्र "शके १६९८ दुर्मुखनामसंवत्सरे महिना वयशख वद्य यकादसी बुधवार ते दिवसी संपूर्नमस्तु" असा शेरा बाडांत च या अष्टकापुढें लिहिलेल्या लघुचाणाख्य संस्कृत लोकांच्या शेंवटीं लिहिलेला आहे. त्यावरून सखानंद हा शके १६९८ च्या पूर्वीं होऊन गेला असें म्हणतां येईल.

### अष्टक

जेठा सुंदर शोभति मोळी मुगुट बरा
श्रवणीं कुंडल भाळीं टीळकचंद्रकळा ॥
विभूत चर्चुन आनन शोभिसि पाहवें ।
त्या गुरुवर्या परमानंदासि भजाव ॥ १ ॥
कंठी सुंदर माळा रुद्राक्ष मण्याच्या ।
त्याहीवरत्या आणिक माळा पुष्पाच्या ॥
ऐसें ध्यान हें हृदयीं अखंड धरावें ।
त्या गुरुवर्या०     ॥ २ ॥
भगवा शेला मुरडुन टाकी जो खांदी ।
कौपिनधारी ब्रह्मचारि रुप आनंदी ॥
पायि पादुका देखुनि भक्ती त्या वंदावे ।
॥ त्या गुरुवर्या०...     ॥ ३ ॥
तरणोपाया जडजीवाचा नररूपी ।
अवतारी हा आला शिवसांब स्वरूपी ॥

पतीतपावन मोद हे सत्य करावे
त्या गुरुवर्यां०...      ॥ ४ ॥

शिष्यालागीं अखंड जो ध्यान च बोधी
वेदशास्त्रे पाहुनि अर्थाते शोधी ॥
त्याचे दृष्टीं पडता सायुज्य वंदावे
त्या गुरुवर्यां०...      ॥ ५ ॥

कृपादया ज्यावरि जाली ते पूर्ण च जाले ।
उघडुन दृष्टी स्वस्वरूपिं मिळाले ॥
घेउन वरदा छळकाते बोधावे ।
त्या गुरुवर्यां०...      ॥ ६ ॥

ज्यासि पाहतां सहस्रनेत्र लाजयला ।
स्तविता शषमुख वेद मग तो राहीला
तेथे मशक म्या काय त्यासि वदावे ।
त्या गुरुवर्यां०      ॥ ७ ॥

हे सद्गुरुस्तुतिचे अष्टक जो नेमे वाची ।
पावे संतत भक्ती मुक्ती तो सहजाची ॥
सखानंद जोडून हस्तासि असावे ।
त्या गुरुवर्यां परमानंदासि भजावे ॥ ८ ॥
॥ इति अष्टक संपूर्ण मस्तु ॥ छ ॥

बाडांत अष्टक अतिशय अशुद्ध असून तसें च तें येथें देण्यास विशेष कारण कोणत्या हि दृष्टीनें नसल्यामुळें शुद्ध करून दिलें आहे. बाड मजजवळ आहे.

गं. ना. मुजुमदार

## ३५ काशीराजसुत गणेशदासकृत गणेशगीता–टीका

हा ग्रंथ श्री० दादासाहेब ओंकार यांच्या संग्रहापैकीं आहे. हा कवी व त्याची ही कृति नवीन उपलब्ध झालेली आहे. या टीकेचा कर्ता गणेशदास यानें आपली गुरुपरंपरा खालीलप्रमाणें दिलेली आहे:—

ऐसा गणेश संवाद वरेण्याचा । तैसाची व्यास सुताचा ।
आमां ऐक परंपरेचा । आचार्यांचा अनुक्रम ॥ ६७ ॥

मूळ गुरु शंकराचार्य देख । त्यापासुन हस्तामल्ळक ।
तत्सीष्य भाष्कर पुण्येश्लोक । त्याचा सम्यक लयानंद ॥ ६८ ॥
लयापासुन सहज सिद्ध । सीद्ध लक्षीतां आनंद ।
आनंद लक्षी परमानंद । पाहातां अभेद मूळिंच ॥ ६९ ॥
तारक ब्रह्म आभेद । ऐसी उपदेसी स्वस्त सीद्ध ।
श्रीकासीराज अनंदकंद । तो निजबोधदायेक ॥ ७० ॥
कासीराज सद्गुरू । मुमुक्ष साधकांचें माहेरु ।
भक्तांलागीं दीनोद्धारू । धरामर जाहला ॥ ७१ ॥
ब्राह्मणवेशें समर्थ । सद्गुरू कासीराज वीख्यात ।
तेणें मस्तकीं ठेवुन हात । गीताग्रंथ लिहीवीला ॥ ७२ ॥

ग्रंथरचनेचा काल दिला आहे तो असाः—

अंगीरा नाम संवछर । श्रावण शुद्ध भोमवार ।
येकादसी द्वितीये प्रहर । स्वातीसार नक्षत्र ॥ ७४ ॥
सीद्धयोग पंढरपुरीं । गीता मान्हाष्ट्रभासे बरी ।
येसवीली प्रीतीपुष्करीं । नरनारी पाहावया ॥

वर दिलेला संवत्सर, महिना, पक्ष, तिथि व वार इतके योग शके १५५४ सालीं बरोबर जमतात. म्हणून गणेशदासानें ही टीका शके १५५४ मध्यें रचली हें उघड होय. टीका ओंवीबद्ध असून अगदीं सुबोध अशी आहे. या उपलब्ध झालेल्या ग्रंथाचीं पानें १५७ आहेत. त्यांपैकीं १–८, १३८–१४४, व १५०–१५१ इतकीं पानें गहाळ आहेत; व १५७ च्या पुढें हि १।२ पानें गहाळ असावीत. नवव्या पानावर ३८ व्या ओंवीचा असा आरंभ आहे:-

लोकानुग्रहकारणे । जालें अंगापुरिं राहाणे ।
जींकिला क्रोध करणे । भेढा धोडा सोने समान ॥ ३८ ॥

तिसऱ्या व नवव्या अध्यायाच्या शेवटीं अनुक्रमें पुढीलप्रमाणें ओंव्या आहेतः—

गणेशदास म्हणे संतीं । अवधान द्यावें पुढती ।
संन्यासयोगस्थिति । यथामती वर्णीन ॥ ११८/३ ॥
गणेशदास संतजना । प्रती मागे वरदान ॥
दया करून अ(नु)संधाना । निजमना लावावें ॥ १६०/९ ॥

अध्यायवार ओवीसंख्याः—

| | |
|---|---|
| १— ९७ | ६— ३१ |
| २— ६४ | ७— ५५ |
| ३—११९ | ८— ४६ |
| ४— ४९ | ९—१८१ |
| ५— ४१ | १०—पानें गहाळ असल्यामुळें समजत नाहीं. |
| | ११— ,, ,, ,, |

शेवटील पानें गहाळ असल्यामुळें ग्रंथाचा लेखनकाल समजत नाहीं. तथापि लिखाणावरून ही पोथी सुमारें १५० वर्षांपूर्वी लिहिलेली असावी.

गं. ना. मुजुमदार

## ३६ रामगीता ( वामनी )

रा. भावे यांचे यादींत वामनी ग्रंथ जे दिले आहेत त्यांत 'रामगीता' दिलेली दिसत नाही. काव्यसंग्रहांत वामनी ग्रंथांत प्रसिद्ध झालेली माझे पहाण्यांत नाहीं. तेव्हां हा ग्रंथ नवीन च आहे असें वाटतें.

ही टीका समवृत्ति असून इचे एकंदर श्लोक ६२ असून शेवटचें एक अनुष्टुप् ६३ वें आहे.

हें प्रकरण 'वामनी' आहे याबद्दल पुरावा काय तो फक्त लेखकानें 'वामनी श्लोक' एवढें लिहिलें आहे हा च काय तो. परंतु टीकाकारांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें स्वतःचें नांव कोठें हि त्यांनीं या प्रकरणांत घातलेलें दिसत नाहीं. उलट शेवटचें अनुष्टुप् असें आहे—

श्रीरामे वर्णिली गीता । लक्ष्मणास सु तत्वता ।
भावुनीं प्राकृतार्थानें । केली अन्वर्थ भाउनें ॥

हे 'भाऊ' कोण ! वामनांचें नांव भाउ तर नव्हतें !

श्लोकांचा मासला थोडासा देतों म्हणजे त्यावरून कदाचित् कांहीं अटकळ बांधण्यास सांपडेल.

एकांतिं बैसूनि निवृत्तइंद्रयीं । जिंकोनि अंतःकरणास सन्नयी ।
विभाविजे एकमने सुसाधनीं । विज्ञानदृष्टी स्थित आत्मबोधिनी ॥
हें विश्व सारें परमात्म दृक्पथे । लावी स्व आत्मीं मग पूर्णता जिथें ।
तिथें चिदानंदमय स्वरूपता । बाह्यांतरा जाणिल काय तत्वता ॥

गो. का. चांदोरकर

# ३७ सामराजविरचित मुद्गलाख्यान

ही पोथी माझे मित्र रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांस कोल्हापुरास मिळाली ती त्यांनीं मला दिली. पृष्ठें ५२ असून श्लोकसंख्या २६० आहे. यांत आरवी-मुद्गल क्षेत्राचें वर्णन व माहात्म्य आहे.

आदिः—

वंदूनिया पाय गजाननाचे । जे सिंधु कल्पद्रुमकाननाचे ॥
जे वंदिल्या विघ्न पळोनि जाति । स्फुरेत हि ( ऐ तेधा) फार कवित्वजाति॥१॥
वंदूनि चंढि(डी)पद्पंकजाला । मदीय मोहांबुधि पंक जाला ॥
देईल आतां मज शुध्ध वाचा । प्रवाह जेथून रसा नवाचा ॥ २ ॥

गणपतीचे वंदनानंतर, शारदा अथवा गुरु यांस नमन नसून कुलदैवत मुद्गलास नमन केलें आहे. या क्षेत्राचें नांव आरवी कसें पडलेंः—

पवित्र हें कानन काळिकेचें । येथून वाढेल महत्व याचें ॥
होईल हे क्षेत्र पुढें रवीचें । धरील जें नाम हिं आरवीचें ॥ १२३ ॥
भीमा नदी येईल ये च वाटे । होतील सोमादिक यज्ञ मोठे ॥
त्यानंतरें आश्रम मुद्गलाचा । होणार हे आइक सत्य वाचा ॥ १२४ ॥
निस्तेज दक्षें दिननाथ केला । ह्मणोनि कालीविपिनास आला ॥
तेथील म(मा)हात्म्य मनांत जाणें । मार्तंड तेथे रविकूप खाणें ॥ १२९ ॥
स्वमंडळीं जें चिरकाळ सांची । न जाणतो ज्यांस कधीं विरि(रिं)ची ॥
कूपांत तें ठेउन तीर्थजातें । आरंभिलें मज्जन भानुम(मं)नें ॥ १२९ ॥
मग तप तपनानें साधिलें त्या च रूपें । त्रिभुवनगततेजें जिंकिलीं आत्मरूपें ॥
अनुपम रचनेनें क्षेत्र तें स्वीय केलें। सकळमुनिकुलांला सद्म दे वेगळालें॥१३०॥
जेथें जगच्चक्षुनिधान राहे । तें आरवीचें अभिधान लाहे ॥
सानंद नांदे मग काळरात्री । जे सकटि(संकटीं) वाचवि भूतधात्री ॥१३१॥

आख्यानाचे शेवटीं कवीनें आपलें गोत्र, बाप, आई, बहीण व कुलदैवत यांचा उल्लेख केलेला आहेः—

शाकल्यान्वयसागरीं जनि असे ज्याची महाशुद्धता ।
आल्हादि द्विजराज लक्ष्मण सुधी जाणा जयाचा पिता ॥
काशी हे विमत्ला जयास जननी मंदाकिनी सोदरा (री)।
केली मुद्गलदैवतस्तुति पाहा त्या सामराजें बरी ॥ २५९ ॥

यापुढें

ऐसा च हा मुद्गल देव आहे । म्हणोन याला जन सेविताहे ॥
श्रीशामराजें स्तुतिभाग केला । सप्रेमचित्तें मग म्यां लिहीला ॥ २६० ॥

हा श्लोक आहे तो कवीचा नसून लेखकाचा असावा असें दिसतें. आख्यानाचा रचनाकाल अथवा लेखनकाल दिलेला नाही. 'महाराष्ट्रकवी' मासिकामध्यें सामराजानें रचिलेलें रुक्मिणीहरण काव्य छापलें आहे. त्यांतील व या मुद्गलाख्यानांतील श्लोकांची सरणी अगदीं एक च दिसते. यावरून तो व हा सामराज एक च असावा असें अनुमान निघतें. एक च समजल्यास त्याचा काल शके १६६६ हा ठरलेला आहे च.

आरवी—मुद्गल क्षेत्र दौंड स्टेशनापासून सुमारें ४ कोसावर व बोरीबेल स्टेशनापासून २ कोसावर भीमा नदीचे कांठीं आहे. सातारच्या गजोपाध्यांकडे येथील जोसपण व कुलकर्ण आहे. ज्याप्रमाणें श्रीक्षेत्र गाणगापूर, नरसोबावाडी, औदुंबर वगैरे ठिकाणीं देवाच्या सेवेस राहतात त्याप्रमाणें येथें हि सेवेकरी असतात. पिशाच्चबाधा हि येथें नाहिशी होते.

गं. ना. मुजुमदार

---

## ३८ नाथशिष्य रत्नाकरविरचित एकादशीमाहात्म्य

रामानंदशिष्य रत्नाकर हा सर्वांस परिचित आहे. परंतु नाथशिष्य रत्नाकर हा बहुतेक माहीत नसावा असें वाटतें. ही पोथी मला येथें जुन्या बाजारांत मिळाली. अध्याय ६ असून ओंवीसंख्या ४९६ आहे व पृष्ठें ४३ आहेत. ग्रंथरचनेचा काल दिलेला नसून स्थल मात्र दिलेलें आहे.

शिवनंदाचे तीरी । कनकावती नाम नगरी ।
ग्रंथ केला निर्धारी । परमार्थाकारणें ॥ ११०/६ ॥

आदिः—

ॐनमोजी गणनाथा । हार भवानीचीया सुता ॥
सांगेन पवीत्र (कथा) । तुझेनी प्रसादें ॥ १ ॥
तुझी रुपा घेडे । तरी ज्ञान होये रोकडे ॥
फीठे जन्माचे साकडे । ईछामात्रे ॥ २ ॥
आतां रुपादृष्टी पाहावें । मज रुपादृष्टी बोलावें ॥
बोल वो नीववावे । जीवी जीवा ॥ ३ ॥

याप्रमाणें गणपति, सरस्वती यांचें नमन झाल्यानंतर गुरूस वंदन असें केलें आहे:—

आता वंदु जो श्रीगुरु । जो ज्ञानसागर दिगांचरु ॥
जेणे मस्तकी ठेवीला करू । कथे विस्तारू पे जाला ॥ ९ ॥

नमु तो श्रीगुरुराव । जो सकळ जीवाचा जीव ।
व्यापोनीया सर्व । राहीला आसे देखा ॥ १० ॥

सकळ शृष्टीचा चाळणा । सर्वे मात्र करी जाणा ।
नमन तयाचीया चरणा । साष्टांगेसी ॥ ११ ॥

येथे नाथ ची कर्ता । नाथ ची श्रोता वक्ता ॥
नाथ ची घेता देता । प्रेमसुखा ॥ १२ ॥

नाथाचेनी बोलती उत्तरे । ते अैकावी च्यातुरे ॥
मनोभावें कृपाभरे । अैकावी कथा ॥ १३ ॥

अंत:—

हे कथा पुन्य पावन । नाथाचे रुपे केले कथन ।
विनवीतसे कर जोडुन । रत्नाकर ॥ $\frac{१०९}{६}$ ॥
शीवनंदाचे तीरी । ...... ( ही ओवी वर दिली आहे ) ॥

ईती श्रीमद्भागवते दशमस्कंदे येकादशीमाहात्मकथनोन्नां शष्टमोध्याय संपूर्णमस्तु ॥ १११ ॥

पोथीचा लेखनकाल हि नसल्यामुळें कवीचा काल ठरविण्यास कांहीं च गमक सांपडत नाहीं. याची भाषा प्रौढ असून प्रसन्न आहे.

गं. ना. मुजुमदार

## ३९ हयग्रतरावकृत एक वेदांतप्रकरण

हें प्रकरण श्री. दादासाहेब ओंकार यांच्या संग्रहांतलि आहे. मागें मंडळापुढें हयबतरावकृत "सोहंसुदर्शन" प्रकरणासंबंधी टांचण वाचलें आहे. त्या प्रकरणाचा कर्ता व आजच्या प्रकरणाचा कर्ता हयबतराव एक च असावा असें वाटतें. या प्रकरणाच्या आरंभीं देवास, गुरूस, वगैरे नमन नसून एकदम विषयास सुरुवात केली आहे.

आदि असा:—

पैलतुर्येचे तेमेरि । नयनातुन नयन हेरि ।
सर्वांक्षि समोरि । परब्रह्म असे ॥ १ ॥

पैलतुर्येचे ठाइ्ं । औठपिठासेजारी ।
अर्धमात्राचे माहाद्वारि । निजरूप उभे असे ॥ २ ॥

तुर्येचे वरुते । भ्रमरगुफेचे खालते ।
समसमान सरते पुरते । चहुकडे ॥ ३ ॥

अंत असा:--

वैखरी सोहंबीज सापडले । परेचे पाठारि पेरिले ।
पस्यंति ज्ञान फापावले । मध्यमे पीक पीकले अफाट ॥ ३४ ॥

पाहोनिया अनुभव । सद्गुरुरूपे बोले हायेबतराव ।
निरंतर चरणीं दृढभाव । अखंड स्मरणी विठल देव ॥ ३५ ॥

एकंदर ओंवीसंख्या ३५ असून कवीनें आपल्या गुरुचें नांव कोठें हि दिलेलें नाहीं. रचनाकाल हि नाहीं. प्रख्यात वारकरी हयबतराव पवार हे च या प्रकरणाचे कर्ते असावेत असे वाटतें.

गं. ना. मुजूमदार

---

# ४० शालिवाहनाच्या तेराव्या शतकांतील एक मानभावी ग्रंथ

१ धुळें येथील रा. रा. गोविंद काशिनाथ चांदोरकर यांना हा ग्रंथ उपलब्ध झाला. प्रायः मानभावी पोथी ह्मटली ह्मणजे तिचें एक कांहीं विशिष्ट रूप असतें त्या वरून इतर पंथांच्या शेकडों पोथ्यांतून केवळ नजरेनें अमुक पोथी मानभावी आहे, हें ओळखतां येतें. प्रायः मानभावी पोथ्यांची पानें सुटीं नसतात. सुट्या पानांची पोथी मानभावां जवळ क्वचित् च आढळेल, मानभाव बांधीव पोथ्या ठेवतात याला एक कारण आहे. हे लोक सदाप्रवासी ह्मणजे सदा फिरते असतात. त्या मुळें सुट्या पानांच्या पोथ्या, एक च पोथी नव्हे तर दहा पांच पोथ्या पाठीशीं बाळगणें व रानांत वाऱ्या वादळांत सुरक्षित ठेवणें शक्य नसतें. तेव्हां बांधीव पोथ्या ठेवण्या खेरीज त्यांना गत्यंतर च नसतें. पोथ्या बांधण्याची त्यांची तऱ्हा हि अगदीं एकी सारखी एक असते. खडाचा कागद घेऊन त्याच्या अष्टपत्री षोडषपत्री किंवा द्वात्रिंशत्पत्री घड्या पाडतात आणि ग्रंथ ज्या प्रमाणानें लहान मोठा असेल त्या प्रमाणानें कागद कमी जास्ती घेऊन त्या घड्याचे इष्ट आका-

राचे तुकडे एका वर एक रचतात आणि ते सर्व तुकडे मधोमध शिवतात. ग्रंथ फार च मोठा व विस्तीर्ण असेल, तर असे दोन दोन चार चार दुंडे प्रथम पृथक् पृथक् मधोमध शिवून काढून, नंतर शिवलेले निरनिराळे दुंडे दुंड्याच्या बाहेरच्या शिवणी एकमेकांत गुंतवून एकजीव करतात. आधुनिक पुस्तकयांध्ये प्रत्येक फर्मा निराळा मधोमध टांचून नंतर ते सर्व फर्मे एकत्र टांचतात, तसा प्रकार मानभावांच्या ग्रंथबांधणींत नसतो. ते शंभर दीडशें पानांचा एकएक फर्मा ह्मणजे दुंडा करून ते दोन चार दुंडे एकत्र टांचतात. दुंड्यांच्या बेसुमार जाडीमुळें, ग्रंथबांधणींत एक दोष उत्पन्न होतो. दुंड्यांच्या वरच्या वरच्या पानांच्याहून आंतील आंतील पानांचीं अग्रें सर्व दुंड्यांची एकत्र दुमोडघडी घातल्या मुळें, पुढें पुढें येतात व पहिल्या पाना मध्यें व मधल्या पानां मध्यें दोन चार बोटें अंतर, ग्रंथाच्या कमी जास्त जाडी प्रमाणें, लहान मोठें पडतें. एणें प्रमाणें ग्रंथ टांचून झाल्यावर त्याला फडक्याचें आस्तर घालतात किंवा चिकटवितात. या आस्तराच्या कमावणींत हि एक विशेष असतो, त्या वरून हि मानभावी पोथी नुसत्या नजरेनें हजारों इतर पोथ्यांतून निवडून काढतां येते. खादीचें, खारव्याचें, चिटाचें किंवा रेशमाचें कापड बेतून घेऊन तें चिंचोक्याच्या खळीनें गाहेरून मढवितात. चिंचोक्याच्या सालीच्या रंगा प्रमाणें कापडाच्या बाहेरच्या आंगाचा रंग काळा–तांबडा–गहिरा असा दिसतो. चिंचोक्याच्या खळींत एक गुण आहे. त्या खळीनें कापड मऊ पडतें व त्यांत भेगा पडत नाहींत. मढवलेलें आस्तर शिवून किंवा चिकटवून झाल्यावर, पोथीच्या कमरेला मऊ सुतळी किंवा फीत किंवा जाड दोरा बांधतात. हे सर्व संस्कार झाले ह्मणजे नमुनेदार मानभावी पोथी तयार झाली.

२ ज्या पोथीचा परिचय आज आपणास करून द्यावयाचा आहे, तिजकडे नजर फेकिली असतां, जुन्या मानभावी पोथीचा नमुना म्हणजे काय व कसा असतो, तें दिसून येईल. वर वर्णन केलें तें जुन्या मानभावी पोथ्यांना सर्वस्वीं व नव्या मानभावीपोथ्यांना अंशतः लागू आहे. नव्या मानभावी पोथ्यांत आतां इतकी करामत दिसून येत नाहीं. खुडाच्या कागदा ऐवजीं, मानभाव लोक अलीकडे फ्रेंच कागद हि वापरूं लागले आहेत व आस्तरें व मढवणीं हि फारशीं करीत नाहींत. तत्रापि जुन्या काय आणि नव्या काय, कोणत्या हि मानभावी पोथ्या घेतल्या, तरी त्या साऱ्यांची रूपरेखा एका परंपरागत ठराविक नमुन्याची असते. त्यांत चूक नाहीं. कोणी हि आस्थावाईक मानभाव भेटला कीं त्याच्या जवळ दहा पांच पोथ्या ह्या असावयाच्या च आणि त्या अस्ताव्यस्त पडलेल्या किंवा गाबाळपणानें गाठोड्यांत चुरडलेल्या कधीं हि दृष्टीस पडावयाच्या नाहींत. आस्थावाईक मानभावाच्या पोथ्या भगव्या, पिवळया, काळ्या किंवा पंचरंगी पांच चार वेष्टनांत घट्ट गुंडाळलेल्या असावयाच्या हा नियम. असा हा आस्थेनें बाळ-

गिलेला रुमाल गांवाबाहेर मानभाव जेथें वसती करतील तेथें रिकाम्या वेळीं उघ-डून वाचीत असलेले किंवा निरूपण करीत असलेले आढळतात. निरूपण प्रायः गांवढळ व अशिष्ट भाषेंत चालतें व संस्कृत भाषेचा उच्चार अतिशय अस्पष्ट झालेला ऐकूं येतो. तरी, एवढें खरें कीं मानभावाला आपल्या पोथ्यांची व रुमालाची पराकाष्ठेची आस्था असते.

३ प्रस्तुत पोथींत एकंदर दोन दुंडे आहेत. पहिल्या दुंड्याची एकंदर १२८ पानें म्हणजे २५६ पृष्ठें आहेत. दुसऱ्या दुंड्याचीं एकंदर १२४ पानें म्हणजे २४८ पृष्ठें होतीं; पैकीं शेवटलीं ७ पानें म्हणजे १४ पृष्ठें-फाटून नष्ट झालीं आहेत. अर्थात्, सध्यां पोथीचीं फक्त ४९० पृष्ठें शिल्लक राहिलीं आहेत. पोथीचा प्रारंभ शाबूत आहे, परंतु शेवटील १४ पृष्ठें गेल्या कारणानें समाप्ती उपलब्ध नाहीं. दर पृष्ठाला प्रायः १४ ओळी आहेत आणि दर ओळींत सरासरी २५ अक्षरें आहेत. संबंध ग्रंथ सांकेतिक लिपींत लिहिलेला असून, अक्षरांना, मानभावांच्या सार्वत्रिक पद्धतीला अनुसरून, माथ्याच्या रेघा नाहींत. मानभावी सांकेतिक लिपींत लिहि-लेला ग्रंथ ओळखण्याची ही एक खूण आहे. प्रस्तुत पोथींतील अक्षरसंकेत एणें-प्रमाणें. [हा अक्षरसंकेत मागें दिलेल्या एका संकेता सारखा च प्रायः आहे. तत्रापि, क्वचित् भेद आहे म्हणून तो सबंद पुनः एकवार येथें नमूद करतों.]

## अक्षर-संकेत

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | क=य | ट=त | प=च | ष=इ |
| | ख | ठ=थ | फ=छ | स=अ |
| इ=ह | ग=ल | ड=द | ब=ज | ह=उ |
| | घ=व | ढ=ध | भ=झ | ळ=ग |
| उ | | ण=न | म=स | |
| ऊ | च=प | त=ट | य=क | |
| ऋ=र | छ=फ | थ=ठ | र=ख | |
| | ज=ब | द=ड | ल=ळ | |
| ए=ए | झ=भ | ध=ढ | व=घ | |
| ऐ=ऐ | ञ=म | न=ण | श=श | |

* व्यंजनाला उकार ऱ्हस्व जोडावयाचा असल्यास त्याच्या खालीं टिंब देतात.

* मानभावी लिहिण्यांत एक विशेष आढळतो. वारंवार येणाऱ्या शब्दाचे एकेका अक्षरांचे ते संक्षेप करतात. उदाहरणार्थ, तरि बद्दल तै, नंतर बद्दल नै, मग बद्दल ञ, चरणु बद्दल न्, असे शेकडों संक्षेप मानभावी लिहिण्यांत येतात. आणि ज्या लोकांना अति नक्कल करणें भाग पडतें ते लोक संक्षेपानें लिहिण्याचा

सहज उपयोग करतात. इंग्रजींत ज्याना फार लिहावें लागतें ते असे संक्षेप करतांना आपण पहातों, जसें, Which = Wh, et cetera = &c, And = &, therefore = ∴, इ, इ.

* पोथींतील कांहीं अक्षरांचें वळण तेराव्या शतकांतील आहे. अक्षरांची मोड सतत अभ्यासानें परिचयाची होते, हें सांगावयाला नको च.

४ प्रस्तुत ४९० पृष्ठांच्या पोथींत एक च ग्रंथ आहे. दोन वर्षांपूर्वी लीळासंवाद नांवाचा ग्रंथ सभासदां पुढें मांडला होता. त्या च धर्तीचा हा हि ग्रंथ आहे. कदाचित् तो च हा ग्रंथ असेल, अशी शंका येते. यांत चक्रधराच्या लीळा वर्णिल्या आहेत. लीळासंवादाचा जो प्रारंभ आहे, तसा प्रारंभ या ग्रंथाचा नाहीं. त्या वरून असें म्हणणें युक्त वाटतें कीं प्रस्तुत ग्रंथ लीळासंवादाहून निराळा आहे. **लीळासमुद्र** म्हणून हि एक विस्तीर्ण ग्रंथ मानभावांत असलेला ऐकतों. तो च हा असेल कीं काय तें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कारण ग्रंथप्रारंभीं ग्रंथाचें नांव नाहीं आणि समाप्तीस कदाचित् असलें तर समाप्तीचीं १४ पृष्ठें नष्ट झालेलीं आहेत तेव्हां कोणी मानभाव माझें हें लिखाण पाहून ग्रंथाचें नांव सांगे तों पर्यंत किंवा या ग्रंथाची दुसरी एक संपूर्ण प्रत सांपडे तों पर्यंत ग्रंथनामासंबंधानें आपलें अज्ञान रहाणार हें उघड आहे.

५ प्रस्तुत ग्रंथांत ५२८ लीळा दिल्या आहेत. ५२९ व्या लीळेच्या प्रारंभीचीं " तथा वटपत्रनयेनी शिक्षापण " एवढीं च अक्षरें उपलब्ध आहेत, कारण पुढील पानें फाटून गेलीं आहेत. पहिल्या लीळेचा प्रारंभ असा:—

" श्रीपरेसाय न्मा : ॥ छ ॥ खडकलीय अवस्थान : भटां अनुसरण: ॥ ञ ॥ भटोबासा सीं : ज्ञा ( =सर्वज्ञा ) : ची आपार आवडी संचरली : २ : "

६ आतां ह्यां ५२८ पैकीं दोन लीळा सांकेतिक लिपींतून बालबोधलिपींत मासल्या करितां उतरून घेतों. हे उतारे देण्यांत हेतु असा आहे कीं या सबंध ग्रंथाची भाषा ज्ञानेश्वरकालीन आहे. ग्रंथाचीं एकंदर पृष्ठें ४९० आहेत म्हणून मागें सांगितलें त्या सर्व पृष्ठांत एक हि रूप असें नाहीं कीं जें ज्ञानेश्वरकालीन नाहीं. एथून तेथून अथ पासून इतिपर्यंत भाषा तेराव्या शतकांतील आहे. क्वचित् हलगर्जीपणानें अशुद्ध रूपें पडलीं आहेत, परंतु तीं तशीं आहेत, हें तेव्हां च ओळखतां येतें. मूळ कथा चक्रधर होऊन गेल्या नंतर त्याच्या साक्षात् शिष्यांनीं सांगितलेल्या भक्त लोकांनीं उतरून घेतल्या. अर्थात्, चक्रधराच्या प्रयाणानंतर त्या लवकर च नमूद झाल्या असल्या मुळें, त्यांची भाषा ज्ञानेश्वरकालीन होती, हें उघड आहे. चक्रधर महादेव यादव व रामदेवराव यादव यांच्या वेळीं होऊन गेला. अर्थात् ज्ञानेश्वराच्या पूर्वी कांहीं वर्षे तो हयात होता. चक्रधराचे साक्षात् शब्द

जसेचे तसे शिष्यांनीं उतरले व पुढें मूळ प्रतीवरून जशाच्या तशा नकला झाल्या. कारण प्रभूचे शब्द प्रभूच्या तोंडून जसे निघाले तसेचे तसे पठणास मिळण्यांत महत्पुण्य आहे, अशी मानभावांची अद्याप हि समजूत आहे. त्या मुळें मूळ भाषा अद्यापपर्यंत हि मूळच्या प्रमाणें जुनाट च राहिली. प्रस्तुत ग्रंथाची नक्कल सुमारें तीनशें वर्षांची जुनाट असावी असा अंदाज आहे.

## उतारा पहिला

### १

### वसीस्ट–लवणाक्षकथन :

मसें : पुराण आइकों गेली होति : तेथ लवणाक्षपुराण आइकीलें : मग : येउनी : चक्रधरें: पूसीलें: बिा(जिजी) : पुराणीं वसीष्टलवणाक्षपुराण आइकीलें : हें साच जी : ७ : आती : बा : ए : साच : बा : तें तुम्हां सीं कळौनि सांघाजैल: बा : लवणराओ सीहांसनी बैसला होता : लाघवी आला : (तो सभे आंतु आलां : तो पींसं भवडौनि गेला : ) इतुकेनि राया सी नीद्रा आली : प्रधानाचीं मांडीं उसीसें केलें : आणि तो देखो ची लागला : तो पारधी नीगाला : तो आवघेन वन्हां नेसी नसीं जातु असे : तवं : मोरू पूढां नीगालां : तो राओ मोरा पाठीं पडीला : परिवार एककडे पडीला : पूढां मोरु जातु असे : घोडा पाठीं सीं लागतु असे : तें मोरें येकी झांसीं घातलें : आणि घोडा प्रतला : तो घोडा राया सीं आवरे ना : मग : तेणें येका वृक्षांचीं खांदी धरीली : घोडा नीगौनि गेला :(तो तेया वृक्षा खाली राहीला : ते रात्री जाली : आनेगी परीची क्रूरें सावजें बोबाति : तो रात्रीं भेओं लागला : उदेया ची उठीला : वाटा जातु असे : तो तान्हैला भूकैला : तवं : माहारा चीं आंडोरें डोइये पाणीयाचा करा : ते पाणीया जाती असे : तेणें : म्हटलें : ) मज पाणी पेओं घाली कां : तीया म्हटलें : मीं माहाराची : होसी ना कां माहारी : तीया : म्हटलें : माझा वरेंत् होसीं : तरि मीं घालीनं : तेणें : म्हटलें : होइनं : मग : तीया पेओं घातलें : ते पूढां : मागां : मग : तेया माहारवडेया सी घेउनीं आलीं : आवुगेया मायेबापा तें : म्हटलें : बां मीयां आपणेया सीं वरु जोडीला : तेहीं : म्हटलें : तू दैवाचि : भाग्याचि : तुआं आपणेयां सीं वरु जोडीलां : मग : तेयां चां सेजारीं घर बाधलें : मग : तीयां सीं तीघें लेंकूरुवें जाली : तेथ बारा वरीखें होति : मग : दुकळ पडीला : तींयें तेथोनि नीगालीं : तवं : वाटे येकू लेकरू सरलें : तें तेथ संसकारीलें : मग : पूढारीं नीगालीं: तवं : दूसरें सरलें : तें तेथ संसकारीलें: मग : पूढारीं नीगालीं : तवं : तें तान्हैलीं : म्हटलें : आगा : मीये तान्हैलीयें : मग : तो पाणीया गेला : करा भरूनी घेऊनी आला : तवं : तींयें दोघें सरलीं : मग : तो दुख करू लागला : मग : सरण रचीलें : तीयें सरणा

भा. इ.–८

वरी घातलीं : मग : राओ दुखें आरंभलैला : मग : तेणें : म्हटलें : इयें आवघीं चीं सरलीं : मा मा जीउनीं काइ करीन : मीं आसौनी काइ करीन : म्हणौनि : सरणां वरी घालावेया : तयां आतु घालावेया : आंग तुकावीलें : आणि प्रधानें थापटीलें : आणि जागा जाला : डोळे उघडीले : मग : तेणें : म्हटलें : येयां देखीलें तें साच : कीं हें साच : प्रधानें : पूसीलें : तें काइ: मगः अवघी गोष्टी प्रधाना पूढें सांघीतली : पाहाति : रायाचीये : थिती : चा घोडा नाहीं : मग : रायें : ह्मटलें : चाला ते ठाये तुम्हां पूढें दाखवीनः मग : राओ मुख्य करूनी अवघा परीवारू लोक पाहावेया नीगाले : या वाटा गेलों : या वाटा मीं पडीलों : येथौनि मोरू नीगाला : येणें चि ठाये नीगाला : ये झांसी मोरें घातलें : येथौनि घोड प्रतला : या वृक्षा ची खांदी मीया धरीलि : येथौनि घोडा नीगौनि गेला : या वाटां मीं नीगालां : येथ माहाराची आंदोरी भेटली : येथ बारा वरीखें होतां : सर्व : तो माहारु बाहीरिं नीगाला : माहारी बाहीरीं नीगाली : ऐ : तो म्हातारा : ह्मातारी बाहीरिं निगालीं : तेयातें प्रधानें पूसीलें : मग : तीहीं : म्हटलें : आमचे जावाइ एथ होते : ते दुकळाचां वरीखीं गेले : तेया सारीखे होते : ह्मणौनि : राया कडे दाखवीलें : मग : तेथौनि नीगाले : मग : येक लेंकूरू येथ संसकारीलें: तेथौनि नीगाले : मगः येक लेंकरूं येथ संसकारीलें : मगः तीयें दोघें येथ संसकारीलीं : मग : सरणा आतु उडी घालावी : तवं : तुआ चेववीलें : मग : ७ : संसारु : म्हणजे : हा दीर्घ स्वप्न कीं : बाइ लवणराओ वसीष्ट लाघवी : ऐ : सभे आंतु लाघव मांडीलें : दुष्टबंधु केला : अवघी सभा मोहीली : लाघवें अनेगें खेळों लागला : ७ : जा : तो वियावंतु : मग : राओ प्रसन जाला : तेया सीं उर्चातें बहुतें पडों लागलीं : तथा उर्चातें बहुतें पडीलीं : बरवा त्यागु जाला : मग : नीगतां पीसें भवडौनि गेलां : आणि राया सीं नीद्रा आली : आणि तो देखों ची लागला : सेवटी तो घोडा : तो आवगु : कडीयाळें : ऐसा सपलाणी घोडा ची नाहीं : मगः तेयासी : पूसीलें : जी : तो घोडा काइ जाला : ७ : बा : तो वीप्रहो अक्षा करूनी गेला : ॥ ३०३ ॥

## उतारा दुसरा

डांगरेया देहआवसान ।। येकू दी : चक्रधरा :क्षों : ।। : मग : सपूजीतः स्थानीः उपवीष्ट असाति : भवतें आवघे भक्तिजन बैसले असाति : ऽं : (=सर्वज्ञें किंवा गोसांवीयें): नीरोपण केलें : तें प्रेमसाधनपूर्वक भक्ति नीरोपीली : हें कव्हणां जीवां घडे ना : तें तुह्मां सी येथौनि दीजत असीजे गा : जे सन्निधानीं असती : तें सतें सहस्त्रा गेलेया नव्हे गाः या वरी भक्तिजनी : ह्मटलें : बि : ऐसी भक्ति आह्मां सि काइसेन होववेल जी : आह्मीं असौनि गोवींद गोवींद ह्मणतें : ऐ : आम्हीं आसौनि आपुलेयां : ३ों : स्मरतें : आणि भगतिही : ३ां । : ची घडवावी जी : ७ : पोरें हों हें आवघें येथौनि

ची घडवावें : तरि तुम्हीं येथ आसौनी काइ करावें असें : आणि हे ची आवघे करीत असे : जे ऐसेया मायापुरातें स्वीकरूनि : १ : कर्मभूमी अस्तीता : मनुक्ष-देहयोक्त जीवां : ज्ञानपर्यंत आपूला संबंध देति : येकां प्रेम संचरीति : प्रेम बोलीजे : भगति बोलीजे : ३ : प्रेमसंचारमात्रें : वीकारू : वीकल्पु : स्वभाओ : यें तीन्हीं उछेदुनी जाति : ४ : भगताचें सकळै ही सन्यधानी चरीतार्थ होए : भगतासी श्रीमुर्ति वरी साध्यसाधन : प्रतीतिप्रापकू बोधु : ६ : ऐसें नीरोपण केलें : मग : ७ : ज्ञानेंमोक्षु : तेया मोक्षाचा हेतु : रा : नाहीं : कव्हणां कव्हणीं वेसन : येथ जीव उधरावेयाचें वेसन : ते प्रेमाची हेतुकी गा : भक्ति : म्हटलें : येथचें सेवादास्य : आवडीपूर्वक दुखें सीं करी : हें भगतीप्रेमातें देति : ज्ञानें कोरडी क्रीया कीजे : तें मोक्षातें दे : मग : भगतीजनी : जी हें आम्हा असेख : आणि आटक : ७ : तुम्ही आवघे येथौनि जा गा : येथचीये प्रवृत्ती सी वीखो न व्हा : येथ असतां सतंसंभवीं नर्क ची जोडीत असां : ऐ : तुम्ही तरि येथचीये प्रवृत्ती सी विखो होऊं जाणा नाः तुम्हीं असतां सतसंभवीं आनीष्ट ची घडत असेंः तरि तुम्हीं आवघे येथौनि जा गा : हो कां जी : म्हणौनि : भक्तिजनीं : अवघे उठौनि गेले : डांगुरेसु बैसले होते : ७ : डांगरेया तुम्हीं येथौनि जा गा आणि ते उठिले : श्रीचरणा भवंती प्रदक्षीणा केली : चतुर्धरां : प्रदक्षीणा केली : आणि नीगाले : नीगतां चौकीचीया दारवठेया पासी आरोळी दीधली : आणि गेले : तेथ दारा उतरे ओहोळु : तेथ देह ठेविलें : पन्हेयां आंतु मसव सोवीलें : तवं : दुपाहाराची वेळे अघवे भक्तिजन आले : चतुर्धरां : देखीलेंः श्रीचरण नमस्करीलें मग : ७ : हा गां तुम्हीं आवघे ची आलेति डांगुरेस न येति ची ते काइ : जी तो गेला आसैल कव्हणी कडे पोट भरावेया : लागी : ७ : तैसा नव्हे गा : जा सुधी करा : मग : भटो : स मुख्य करूनी आघवे भक्तिजन गेले : भटो : स तेया ओवळ पासी गेले : तवं : तेया चें देह गेलें देखीलें : मग : सांघावेया आले : मग म्हटले : जी जी : डांगुरेसीं देह ठेविलें जी : ७ : आतां तेथ गेलेया वीण न सरे : मग चक्रधर तेथ आले : तेयां पासीं उतराभि : मे : पुढां डांगुरा : मग : म्हणाले डांगुरेया डांगुरेया : म्हणौनि : श्रीकरे स्परी(सी)ले : जैसी माये बाळकातें स्परीसे : तैसें स्परीसीलें : मग : भटो : सां करवीं गुफा करवीलि : नीक्षेपु केला : मग : म्हटलें : तुम्हां पम्क वरी हें सूणें चांग गा : जें येथीचेनि वीयोगें जेओं न सके ची : मग : चक्रधर : आले : ॥ ६२ ॥

६ या दोन उताऱ्यांत वैशिष्ट्यानें लक्ष्यांत ठेविण्यासारखीं रूपें म्हटलीं म्हणजे खालील होतः—

१ आती=आथि
२ लाघवी=मांत्रिक
३ सभे ( षष्ठी ) आंतु
४ पींसं=पिच्छानि
५ भवडौनि=भ्रामयित्वा
६ उसीसें=उसें
७ तवं
८ तें=तेन
९ झांसी=झुडुपांत
१० तेया
११ आनेगी=अनेकी
१२ बोबाति=ओरडती
१३ उदेया=उदयीं
१४ आंडोरें=स्त्री
१५ करा=घडा
१६ तीया=तिनें
१७ वरैतु=नवरा
१८ म्हारवडेया
१९ आवुगेया
२० मीयां
२१ आपणेया
२२ लेंकुरुवें
२३ तेथौनि
२४ सरलें=मेलें, संपलें
२५ पुढारीं
२६ मीये
२७ दोघे
२८ आरंचळैला
२९ इयें
३० मा
३१ जीउनीं
३२ घालावेया
३३ येयां
३४ सांघीतली
३५ थिती
३६ मुख्य करुनी
३७ पाहावेया
३८ घोड
३९ नीगालां=निर्गतवान्
४० होतां=भूतवान्
४१ तेयातें
४२ तुआ
४३ अनेगे=अनेक
४४ आवगु
४५ गेलेया
४६ होववैल
४७ आपुलेयां
४८ करावें असे
४९ ऐसेया
५० यें=हीं
५१ सकळे
५२ उधरावेयाचें
५३ वीखो=विषय
५४ उठौनि
५५ डांगरेया
५६ चौकीचीया
५७ दारवठेया
५८ पन्हेयां
५९ मसव
६० असैल
६१ देह ( नपुंसक )
६२ सांघावेया
६३ चांग
६४ जेओं=जगण्यास

अशीं रूपें या सबंध ग्रंथांत शेकडों नव्हे हजारों आहेत. प्रत्येक लीला-कथेंत दोन चार शब्द असे आढळतात कीं त्यांच्या वरून ज्ञानेश्वरींतील शब्दांचे अर्थ विशद व्हावेत. ह्या ग्रंथाच्या आणिक दोन चार जुन्या प्रती मिळाल्यास, तो आपल्या मंडळानें सशास्त्र संपादून प्रसिद्ध करण्या सारखा आहे. खरें पहातां इतिहासमंडळाचें हें काम नव्हें. जुन्या ग्रंथांच्या जुन्या प्रती यथामूल छापून काढण्याचें काम पुण्यांत जर एखादें भाषाशास्त्रसंशोधक मंडळ असतें तर त्याच्या विद्यमानें प्रसिद्ध होणें युक्त झालें असतें. देशांत साहित्यसभा आहे तिचें जर लक्ष्य असल्या जुन्या ग्रंथांच्या प्रकाशना कडे गेलें, तर तिनें हि आपलें कर्तव्य केल्या सारखें होईल. तदभावीं, आपल्या मंडळानें असले ग्रंथ प्रकाशिले असतां त्यांत कांहीं वावगें आहे असें म्हणतां येणार नाहीं. इतकें स्पष्ट आहे कीं, मानभावादिकांच्या प्राचीन सारस्वताचा इतिहासाला पराकाष्ठेचा उपयोग व्हावा असा अंदाज दिसतो. कांकीं, कृष्ण यादव, महादेव यादव, रामदेवराव यादव यांच्या राशियतींतील लोकस्थितीवर, धर्मस्थितीवर, ग्रामनामांवर, देशविभागांवर, भाषेवर, आचारावर, चालीरीतींवर, इत्यादि अनेक प्रकरणांवर मानभावांचा आद्यगुरू जो चक्रधर त्याच्या संबंधाच्या कथांच्या परिशीलनानें किती का होईना, मुळीं च नाहीं तो थोडा तरी प्रकाश पडेल, यांत काडीमात्र संशय नाहीं. प्रस्तुत ग्रंथांतील चरित्रें व लीलाकथा घेऊन, प्रकाश कसा पडतो, तें संक्षेपतः दाखविण्यास दुसऱ्या एका निबंधाचा आश्रय करणें विस्तरभयास्तव प्राप्त आहे.

वि. का. राजवाडे

# ४१ श्रीचक्रधराची दिनचर्या

१ रामदास, अक्कलकोटचे स्वामी, गोविंदराव काळे, इत्यादि अलीकडील तीनशें वर्षांतील प्राचीन व अर्वाचीन ऐतिहासिक स्त्रीपुरुषांची दिनचर्या आपणास कमीजास्त प्रमाणानें माहीत आहे. पैकीं माझ्या संग्रहास गोविंदराव काळे यांची वर्षांवर्षांची दिनचर्या आहे. मेणवली येथील दप्तरांत सवाई माधवरावाच्या बालपणच्या दिनचर्येचे कांहीं कागद आहेत. ह्या दिनचर्यांवरून त्या त्या कालच्या लोकांच्या रोजच्या कौटुंबिक हालचालींचें ज्ञान आपणांस होतें. असलें ज्ञान तीनशेंवर्षां पलीकडील व्यक्तींचें झाल्यास तें हि आपणास म्हणजे इतिहाससंशोधकांस हवें आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, श्रीपादश्रीवल्लभ, जनीजनार्दन, विठारेणुकानंदन, वगैरे तीनशें वर्षांपलीकडील व्यक्तींची दिनचर्या कशी होती तें कळल्यावर आपली दृष्टि तत्कालीन आचारां संबंधानें जास्त खुली होईल हें उघड आहे.

पैकीं गुरुचरित्रा वरून श्रीपाद्श्रीवल्लभांची दिनचर्या कळते. व संतलीलामृत वगैरे चरित्रग्रंथां वरून तीनशें वर्षां पलीकडील साधुसंतांच्या दिनचर्येचें ढोबळ ज्ञान आपणास होण्या सारखें आहे. परंतु, ज्ञानेश्वराच्या किंवा एकनाथाच्या एखाद्या साक्षात् शिष्यानें आपल्या गुरूची नित्यदिनचर्या जर लिहून ठेविलेली आपणास उपलब्ध होती, तर तिच्यापासून जशी तपसीलवार माहिती आपणास मिळण्याचा संभव होता तशी तपसीलवार माहिती उपलब्ध चरित्रग्रंथां वरून होत नाहीं. ह्या करितां ज्ञानेश्वरादि संतश्रेष्ठांच्या दिनचर्येच्या तपसीलवार हकीकती शोधण्याकडे प्रवृत्ति होते. दिनचर्येच्या अशा तपसीलवार हकीकती पूर्वापर कालापासून लिहून ठेवण्याचा आपल्याकडे परिपाठ होता, यांत तर संशय च नाहीं. सध्यां माहानुभावांचे कांहीं ग्रंथ मला उपलब्ध झाले आहेत. त्यांत माहानुभावांचा मूलोत्पादक जो श्रीचक्रधर त्याच्या दिनचर्येची तपसीलवार हकीकत ज्यांत आहे अशा दोन पोथ्या आहेत. ह्या पोथ्यांत चक्रधराची फक्त एका दिवसाची दिनचर्या दिली आहे. शिवाय ह्या दिनचर्येंत विशेष असा आहे कीं तिची भाषा साहाशें वर्षां पलीकडील मराठी आहे. आतां इतकें खरें कीं ह्या भाषेंत नकलांच्या नकला होतां होतां कांहीं रूपें आधुनिक घुसडलीं गेलीं आहेत, परंतु, तज्ञ जे आहेत त्यांना ही घुसडा-घुसड कोठें व कशीं झाली आहे, हें पाठान्तरांवरून कळून येण्या सारखें आहे. चक्रधराची दिनचर्या त्याच्या साक्षात् शिष्यांनीं सांगितली व ती आसपासच्या भाविक जनांनीं उतरून घेतली, अशी माहानुभाव लोकांत व माहानुभावी ग्रंथांत वचनें आहेत. अर्थात् चक्रधरा नंतर पांचपंचवीस वर्षांच्या आंत ही दिनचर्या उतरलेली आहे, असें म्हणावें लागतें. चक्रधराच्या ह्या दिनचर्येंत मौज काय आहे, ती संक्षेपानें आपल्या सध्यांच्या मराठी भाषेंत सांगण्यांत स्वारस्य नाहीं; मूळ भाषेंत जशी ती लिहिली तशी ची तशी ती वाचकां पुढें असणें युक्त आहे. शिवाय, इतकी जुनी म्हणजे सहाशें वर्षां पलीकडील व्यक्तीची तपसीलवार दिनचर्या तत्कालीन मनुष्यानें तत्कालीन भाषेंत लिहिलेली नवस करून हि मिळण्या सारखी नाहीं. हा केवळ कपिलाषष्ठीचा योग आहे. तेव्हां, ह्या दिनचर्येचा संक्षेप, सारांश, त्रोटक उतारे, वगैरे न करितां, ती जशी ची तशी येथें नमूद करतों. त्यांतल्या त्यांत ह्या दिनचर्येंत विशेष असा आहे कीं ती आपल्या सुदैवानें बरी च विस्तृत आहे. शिवाय, ह्या दोन्हीं पोथ्या नकल करून आज सुमारें तीनशें वर्षें झालेलीं आहेत. म्हणजे रामदासांच्या कालीं ह्या पोथ्या लिहिलेल्या आहेत. चक्रधरापासून रामदासा पर्यंत सुमारें साडे तीनशें वर्षांचा अवधि लोटतो. त्या तीनशें वर्षांत नकलांच्या नकला करतांना मूळांत काय फेरबदल झाला असेल तो असेल. ह्या हि दृष्टीनें पोथ्यांचें महत्व वर्णनीय आहे. अशी अनेक तऱ्हेनें ही दिनचर्या वाखाणण्या सारखी आहे. दिनचर्येच्या ज्या दोन पोथ्या आहेत, त्यांतून ज्यास्त जुनाट पाठ प्रमाण धरला आहे. दिनचर्या एणें प्रमाणें:—

॥ श्रीपरेशाय नमः ॥ : नीत्यदीनी लीला : कव्हणी कव्हणे ठाइं बोलति : कव्हणी कव्हणे ठाइं बोलति : कव्हणी ठाइं कांहीं वीसेखु : कव्हणी ठाइं कांहीं वीसेखु : ते (थ) अवघे वीसेख डोंबेग्रामीं : म्हणौनि : बाइदोबासीं (म्हाइंदेव व्यास) नित्यदीनी लीला : डोंबेग्रामीं बोलति : डोंबेग्रामीं तीनि मठ : एकू पूर्वाभिमुख : एकू उतराभिमूख : एकू दक्षीणाभिमूखः तीये दक्षीणाभिमूखे राजमठीं : सर्वज्ञास अवस्थान : रीगतां डावेया हाता : पसीमीली भींती सीं : उतरदखीण ओटा : तया ओटेया वरि : सर्वज्ञास : पहुडु होए : नागाम्या : उपाणहौ पालवें गुंडौनि : आपूले उसीसां : कां आडवांगीं ठेवितिः पाइतेया कडे खालि नीजेति : पस्यातपाहारीं : सर्वज्ञा : उपहुड होए : लोंबतां श्रीचरणी आसन होए : इखीति खांकरिति : नागाम्बे : सूजगरें होति : साउमीं एतिः श्रीचरणा लागति : श्रीचरणीं उपानौ ओळगवीति : दुसरेया श्रीचरणा लागति : श्रीचरणी उपानौ ओळगवीति : नागाम्या : पूढें जाति : कवाडा चिया खीळी फेडीति : कवाड उघडीति : चक्रधर : बीजे करीति : तवं भटोबास उंबरा उसीसें करूनि : वीसंबले असति : स्यालेया चे चान्ही मास भीतरि नीजति : उंबरा उसीसें करीति : उन्हाळे पाउसाळे बाहीरि नीजति : उंबरा उसीसें करीति : सर्वज्ञ दोन्ही दारसंका दोहीं श्रीकरीं धरूनि एकू श्रीचरणु ( भट्टाचेया ) वक्षेस्थलावरि ठेवीतिः एकू उंबरवंटा वरि ठेवीति : उपानौ परीत्यजौनि ठेवीति : उपानौ सहीत ठेवीति : भटोबासां जाड्य आलें असेः चक्रधर : श्रीचरणी चेनि आंगुठेनि वक्षेस्थळ दाटीति : भट जागे होति : श्रीचरण हृदइं सीं धरीति : आळंगीति : ललाटा वरि ठेवीति : नमस्करीति : मोमे देति : दुसरा श्रीचरणु मागथि : हृदइं सीं धरीति : आळंगीति : ललाटा वरि ठेवीति : नमस्करीति : मोमे देति : ऐसे वीळास करीतिः भटोबासां सिं सूख थोर होए : तया सूखा परिमाण कव्हणी चि नेणति : तेया सूखा परिमाण भटोबास चि जाणति : श्रिचरणु कांहीं केलेयां सोडुं न सकति : चक्रधर : वाड वेळु एकें श्रीचरणें उभे असति : आणि परिश्रया ची प्रवृति म्हणौनि सोडीति : कदाचीति : नागम्या : म्हणाति : सोडि सोडि नागदेया : बाबा सिं उसीरू होतु असे : मग : सोडीति : आधीली दीसीं भटोबासीं टोले दोनि आणुनि ठेवीले असति : ते सरीसे घेति : जगती चा दारवठा दखीणाभिमुख : त्या पसिमीली कडे परिश्रयस्थान : चक्रधर : उतरदखीण परीश्रया बैसति : भटोबास टोले पासि ठेउनि : इतुकेया दुरि जाउथि बीदी बैसति : एरीकडे : नागंचे दीपू उजळेति : मढु झाडीति : ओटेया वरि सयनासन असे : तें पद्मासन रचीति : उस्णोदका ची तांबतोली : बहीरवासा ची घडी : घेउनि दारवंठां उभीं असति : चक्रधर : परीश्रयो सारुनि उभे होति : भटोबास साउमे एतिः नागंचा : भटोबासां चा हातीं उस्णोदका ची तांबतोली बहीरवासाची

घडी देति : भटोबास : चक्रधरा : ओळगवीति : कदाचीत भटोबासां जाड्य-आलें असे : तरि : नागंबे : चि ओळगवीति : चक्रधरा : उस्णोद्का विनि-योगु होए : चोखटु बहीरवासू वेढीत वेढीत भीतरि बीजें करीति : आसनी उपवीष्ट होति : बाईसे पालवें श्रीचरण परिमार्जीति : आसना वरि : ठेवीति : दुसरा श्रीचरणु पालवें परिमार्जीति : आसना वरि ठेवीति : चक्रधर : स्वासनी उपवीष्ट होति : तवं एकीकडे भटोबासां जाड्य आलें असे : तें परीहरे : चक्रधरा तें : नेद्खति : आणि धावं घेति : शब्द्रा पासि शब्दु थोरु : बाइ बाइ : चक्रधर : येथ बीजें केलें असे : ना० म्हणति : हें काइ गा नागदेया एव्हडेया वेळा बाबा तें केंवि वीसंवलासि : आणि धावं घेति : पाहावेया नीगति: चक्रधर : म्हणति बाइ रात्रि वडील असे : एवढेया वेळा बापुडें वानरें कें जाइल:बोलावा आरौता : ऐसा: चक्रधरां : चा शब्दु आइकति आणि एति :कदाचीति बाइसें म्हणति : ये नागदेया बाबा येथ आले असति : कदाचीत : चक्रधर : म्हणति : या गा वानरेया : हें येथ आलें असे : भटोबास एति: श्रीचरणा लागति : पासि बैसति : समस्त भक्तजनें एति : श्रीचरणां लागति : पासि बैसति : सर्वज्ञास नीरू-पणा ची प्रवृति असे : तरि : चक्रधर : नीरूपण करीति : ना रात्रि वडील असे : तरि पहुडु होए : ना तरि आसनी नीश्चळु बैसति : माणसें प्रस्नु करीति : जी जी आम्हीं : चक्रधरा तें : चींतु : चक्रधर: काइ चींतीति : चक्रधर : म्हणति बाइ हें सकल जीवां तें चींती : कदाचीत : बाइसे : प्रस्नु करीति : बाबा आम्ही बाबा तें चींतु : बाबा काइ चींतीति : बाइ हें श्रीप्रभु ची थापु चींती । : हे खांडणी पस्यात पाहारीं आठवावी : तवं: अरुणोदयो होए: आधीली दीसीं भटोबासीं सीलीका दोनि आणुनी ठेवीलीया असति : आंबीया चीया । जांबुळी चीया : कदाचीत बोरी चीया : त्या दोन्हीं : चक्रधरां : चा श्रीकरीं ओळगवीति : चक्रधर : एकि जानु वरि ठेवीति : एकी दंतधावन करीति : दंतधावन करूं सरे : ते परीत्यजीति : दुसरी घेति : ते डावीये श्रीकरीचेया आंगुठेया चेनि नखें : चीरूनि दोनि फोडि करीति ! एकि आंगुळीयां मध्यें धरीति : एकि धनुषाकार वळीति : त्या जीव्हामळ आकर्खीति: जीव्हामळ आकर्खू सरे : आणि परीतेजीति : दुसरी घेति : ते ही धनुषाकार वळीति : जीव्हामळ आकर्खीति: जीव्हामळ आकर्खू सरे : आणि परीत्यजीति : बाईसे पालमंडें उस्नोद्काची तांबतौली आणीति : मग : चक्रधरा : सौंदरा श्रीकरीं गुर्जरा परी : गुळळा होए : श्रीमूखप्रक्षालन होए : श्रीकर प्रक्षाळीति : श्रीकरीं सपूरु दाटणा ओळग-वीति : श्रीमूख परमार्जीति : श्रीकिर परमार्जीति : बाइसे श्रीचरण प्रक्षाळीति : पालवें परमार्जीति : आसना वरि ठेवीति : दुसरा श्रीचरणु प्रक्षाळीति : पालवें परमार्जीति : आसना वरि ठेवीति : चरणोद्क असे तें समस्तां भक्तजनां प्रसादु होए : तेथ उद्का चे बींद बींदु पडले असति : ते पालवे परमार्जीति : तेथ दोनि पद्में रेखीति :

बाइसें बाहीरि जाति : हात पाए धूति : तोंड धूति : सूवेळें (सोवळें !) वस्त्र वेढोनि : भटोबास गोपीचंदन उगाळीति : बाईसें गोसांवीयां चां भालप्रदेसीं गोपीचंदना चा उर्धपौड्रटीळा रेखीति : कोण्हीं उपाधीस्थूळ आले असाति : तरि : चक्रधर : चि आपूलेया पवीत्रा आंगुळीया करुनि रेखीति : दोन्हीं रेखा सरसीया चि एति : आधीलां दीसीं पूष्पें आणुनि : धागरी वोलां दाटणां गुंडुनि ठेवीलीं असाति : तो गळदंडा श्रीकंठीं ओळगवीति : श्रीमुगुटीं मुगुटमाळ : मोकळयां पूष्पां चीं पूजा करीति : श्रवणीं क्षळबुंके : बाहुभूषणें : कळीकां चे हातसर : श्रीकरीं फुलां चा झेला ओळगवीति : धुपटणा आंगारा आणीति तया वरि दसांग धूपु घालीति : बाईसें : पांचै वाती उजळीति : आर्ती पालमंडां ठेवीति : चक्रधरा : धुपार्ती होए : मंगळार्ती होए : " जयतु मंगळमंगळा परममंगळरूपा " हे जतु ओळगवीति : बाईसां : सि *आठे सात्वीक प्रकटेति । बाइसांचे हातिचें पालमंडें थरारीलें देखौनि : चक्रधर : म्हणति : वाणरेया बाइसां चिए हाति : चें पालमंडें धरा गा : भटोबास बाइसां चिए हाति चें पालमंडें धरीति : बाइसें हातांतु हातु सीरुनि नीराजन करीति : खालि पालमंडें ठेवीति : भटोबास पांच दंडवतें घालीति : बाइसें रासू एकू दंडवते घालीतें चि असातिं : सर्वज्ञास फोडी ओळगवीति : वीडीया करूनि देति : परि हातिचा कंपू जाए ना : भटोबास मंत्रअवसरू ( पुरुषसूक्त ) म्हणति : चक्रधर : चुकि लावीति : चक्रधर : म्हणति हांगा येथ कोण्ही सामक नाहीं : सामक ते एथ वेळा दोनि : तीनि आवर्तिजति कीं : जी जी नाथोबा तीथि वारू जाणवीति : या परी सपूजीत श्रीचक्रधरू आसनीं उपवीष्ट असातिं :॥ ० ॥छ॥ उदयां चा अवस्वरू हे दुसरी खांडणी :

उदेयां चा पूजाअवसरू जालेया नंतरें : सपूजीत : चक्रधर : आसनी उपवीष्ट असाति : भटोबास प्रवृति जाणौनि : श्रीचरणी उपाणौ ओळगवीती : चक्रधर : रायांगणीं उभे ठाकति : भटोबास आंगीटोपरें सरीसें करूनि आणीति : दुनी चीया आंगी चीया बाहीया एकें वेळें लेववीति : कसेयां सि गांठी पाडीति : श्रीमुगुटीं टोपरें ओळगवीति : फुटा परावर्ण करीति : उन्हाळे दीस तरि एकू सोगा एकी कडे : एकू सोगा एकी कडे : स्याळे दीस तरि सोलबुंथि घालीति : पाउसाळे तरि चांदोवा धरीति : बाइसें कणीकी तीमीति :तांदुळे भीजत घालीति : वीसदेया सेणि लावीति : पुडुवाटोवा घेति : जाडी सागळ घेति: बाहीरि एति : मढा चें कवाड बांधति : कां कोण्हीं एकु राखण ठेवीति : चक्रधरां : पासि एति : चक्रधर : बाहीरि उभे ठाकति : दीसा अवलोकीति : अमंगळा असति : तिया मंगळरूपा होति : चक्रधर : ह्मणति खेळों जाइजैल केउतें : कोण्हीं कोण्हीं कडे म्हणाति : कोण्हीं कोण्हीं कडे म्हणतिः बाहुल्यें भटोबास प्रवृति जाणति : भटोबास ह्मणति

* स्तंभ : स्वेदोथ : रोमांच : स्वरभंगोथ : वेपथुः : वैवर्ण : अश्रू : प्रळय :

: तेउतें : चक्रधर बीजें करीति : भटोबासीं आधींला दीसीं एकाधें वीहरणस्थान
पाहुनि ठेवीलें असे : कदाचीत कमलार्जूना कडे : कदाचीत छीन्नस्थळीये कडे :
कदाचीत पींडा कडे : कदाचीत ढगा कडे : कदाचित एकाधें वाळुवंट:तेथ : चक्रधर:
बीजे करीति : नागाम्बा : आसन रचीति : चक्रधर आसनी उपवींष्ट होति : नागाम्बा
पालवें श्रीचरण परमार्जीति : आसना वरि ठेवीति : दुसरा श्रीचरणु पालवें परमा-
र्जीति : आसना वरि ठेवीति : हे खांडणी विहरणीची : चक्रधरा नीरूपणाची
प्रवृति : तरि नीरूपण करीति : नां तरि धांववीति : पव्हवीति : झुंझवीति : दरे
दरकूटे बूजवीति : उचें टेंकें असाति : तीयें समस्तलें करवीति : पाषाण फोडवीति :
ऐसें नाना वीधि वीहार करीति : या परी एकें कर्मे नासीति : तवं उव(?न) होए :
चक्रधरां : चा भालप्रदेसीं स्वेदा चे बींदु बींदु ऐसे एति : ते मोतीयां चे कण ऐसे
मीरवति : चक्रधर : तांबूळ प्रतेजाति : गुळळा करीति : नागाम्बा : फोडी ओळग-
वीति : वीडीया करूनि देति : तांबूळ असे तें भक्तजना प्रसादु वाटीति : मठी असे
तया कारणें बाइसें पालवीं बांधौनि ठेवीति : नागाम्बा वीनवीति : बाबा उसीरू
जाला : मठा बीजे कीजो ना : चक्रधर उगे चि असाति : चक्रधरा : प्रवृति
होए : तेव्हळि बीजे करीति : कदाचीत : चक्रधर : भटोबासां चीया खांदा वरि :
लोंबता श्रीकरू : कदाचीत खोलधूंथि : कदाचीत वरि चांदोवा : चक्रधर : बीजें
करीति : नागाम्बा : पूढें जाति : आंतु बाहीरि मढू झाडीति : बाहीरीला ओटेया वरि
(पद्म) आसन रचीति : चक्रधर एति : आंगीटोपरें फेडीति । भटां हातीं देति :
भट खूंटीये सूकत घालीति : चक्रधरा : लोंबतां श्रीचरणीं आसन होए :
नागाम्बा : पालमंडें : उस्णोदका ची तांबनोली आणीति : श्रीचरण प्रक्षाळीति :
पालवें परमार्जीति : आसना वरि ठेवीति : दुसरा श्रीचरणु प्रक्षाळीति :
पालवें परमार्जीति : आसना वरि ठेवीति : चरणोदक असे तें भक्तजनां प्रसादु
वांटे : मग: चक्रधरा : गुळळा होए : श्रीकर प्रक्षाळीति : श्रीमूख प्रक्षाळीति :
श्रीकरीं सपूर दाटणा ओळगवीति : श्रीमूख परमार्जीति : श्रीकर परमा-
र्जीति : कदाचीत ओलेनि दाटणेनि सर्वांग परमार्जीति : नागाम्बा वीडा ओळग-
वीति : चक्रधर : आसनीं उपवीष्ट असति : नागाम्बा : उपाहारू नीफ-
जवीति : तेवीं चि पूजाअवसरा ची आइति करीति : पूजाअवसरा ची
आइति होए : नागाम्बा : चक्रधरां चा भालप्रदेसीं चंदनाचा आडा रेखीति :
मोकळां आक्षतीं आर्चन करीति : धुपटणा आंगारा घालीति : दसांगु धुप
घालीति : पांचै वाती एकवात करीति : आर्ती करीति : धुपार्ती होए : मंग-
ळार्ती होए : जयतुं मंगळमंगळा परममंगळरूपा हे जतु ओळगवीति :
नागाम्बां : आठे सात्वीक प्रकटाति : हाती चें पालमंडें थरारीलें देखौनि : चक्रधर :
म्हणति वाणरेया बाइसां चीए हाती चें पालमंडे धरा गा : भटोबास पालमंडें धरीति :

नागाम्बा हातांतु हातु सीरूनि नीरांजन करीति : पालमंडें खालि ठेवीति : भटोबास पांच दंडवतें घालीति : नागाम्बा । रासू एकू दंडवतें घालीतें चि असति : भीतरि ओटेया वरि आसन : रचीति : कानवडा लावीति : ताट ; करीति : चक्रधर : भीतरि बीजें करीति : आसनीं उपवींष्ट होति : चक्रधरा : आरोगण होए : नागाम्बा : नींचलोण करीति : तुपभातु पहीत : दोनि साकवतीया : कढी ऐसी आरोगण होए : पोळी तरी चौतकोर : मांडा तरि दीढ : पुरी तरि एकि : पाठीं ताका भाताची आरोगण होए : चक्रधरां : ची श्रीमंत आरोगण : चक्रधरा : गुळळा होए : श्रीकर प्रक्षाळीति : श्रीकरीं चंदन ओळगवीति : चंदनें श्रीकर उल(?ज)ळीति : सकर्पूरा फोडी भटोबास : श्रीकरीं ओळगवीति : वीडीया करूनि देति : चक्रधर : भटां चा हातु धरूनि : आरोग्यवा(?पा)उलीं : सत पदें वेढे करीति : बाइसें ओटा झाडीति : ओटेया वरि पद्मासन असे : तें सयनासन रचीति : चक्रधर : पहुडु स्वीकरीति : नागाम्बा : भीक्षान्न काढीति : काला करीति : मूदा करीति : वरि प्रसादु ठेवीति : भक्तजना पांती प्रसादु भोजन होए : मगः उंच मंठा सि जाति : हे आरोगणाच्या अवसरा ची खांडणी: नागाम्बा : चरणसम्हान करीति : घडीया च्यारि पहुडु होए : घडीया चौं उपहडैनि : लोंवतां श्रीचरणीं आसन होए : नागाम्बा : श्रीचरणीं उपाणौ ओळगवीति : चक्रधर : परीश्रया बीजें करीति : नागाम्बा : तांबतोळीए उस्णोदक ओळगवीति : चक्रधरा : उष्णोदका वीणयोग होए : चक्रधर : उंच मढा बीजे करीति : तवं ते अन्य वार्ता करीत असति : तरि : चक्रधर : राजमढा बीजे करीति : आसनी उपवींष्ट होति : नागाम्बा : पालवें श्रीचरण परमार्जीति : आसना वरि ठेवीति : दुसरा श्रीचरणु परमार्जीत : आसना वरि ठेवीति : चक्रधर : ह्मणति बाइ पोरें अन्य वार्ता करीत असति : नागाम्बा : ह्मणति बाबा केवि जाणति : बाइ हें तेथ गेलें होतें : भटोबास एति : बाइसा आजि : चक्रधर : तेथ बीजें नाहीं केलें : पोरेंहो अन्य वार्ता करीत होतेति : बाइ : चक्रधर : केवि जाणति : बाबाएं तेथ बीजें केलें होतें : भट मूख्य करूनि : समस्त भक्तजन : भीन भीन : चक्रधरां : पासि एति : चक्रधर : पूसति : काइ गा धर्मवार्ता करीत होतेति : खालौतीया माना घालौनि भुइ सीं रेघा काढीति : चक्रधर म्हणति : मरा मरा पोरेहो : तुम्हां पसि ढोरें चांगें : जें चि चरति : तें चि रोंवतीति : एथौनि जाइजे : मां एथचिया चि कथा वार्ता कीजति कीं : अन्य वार्ते पसि नीद्रा चांग : वर नीद्रा कीजे : परि अन्य वार्ता न कीजे : सूख : श्रय : श्रृंगारू : यें तीन्हीं नाहीं ते काइ गा गोष्टि : ते अरण्यरुदन कीं : ॥ : ऐसें नीरूपण होए : एणें नीरूपणें सीं जाति : कदाचीत : चक्रधर बीजें करीति : तवं तें उदेगा चें नीरूपण सवादत असति : तेणें संभ्रमें : चक्रधरां : आलेयां हीं नेदखति : चक्रधर : म्हणति हांगा हें तुम्हां वीषयत्वें चि

लागौनि ठाकलें मां : भटां सि नीरूपण होए : भट म्हणाति जो जी ( हें मज) धरे ना : चक्रधर : म्हणति हें अधीत शास्त्र कीं गा : कदाचीत : चक्रधर : बीजें करीति : चक्रधरा : आसन रचीति : चक्रधर : आसनी उपवीष्ट होति : मग : पूसति जी जी आम्हीं ऐसें म्हणत असों : भट ऐसें म्हणत असति : चक्रधर : म्हणाति तुम्हीं म्हणत असा : ते नव्हे : वानरेसु म्हणत असति तें होए : कदाचित म्हणाति : तुम्हीं म्हणत असा तें होए : वानरेसु म्हणत असति तें नव्हे : कदाचित म्हणाति तुम्हीं म्हणत असा तें नव्हे : वानरेसु म्हणत असाति तें हीं नव्हे : तें ऐसें होए : नीरूपीति : मग : पूसति कां गा परीसीलें : जी जी पां म्हणां : म्हणति : चक्रधर : म्हणति परीसीलें ऐसें वाटत असे : परि परीसा ना : पूडतीं : नीरूपीति : पूसाति कां गा परीसीलें : जी जी पां म्हणां : म्हणति : चक्रधर : म्हणाति : आइकीली मातु सांधों जाणा : परि परीसा ना (? सो नेणा) : त्रीसूधि नीरूपीति : त्रीसूधि पूसाति : कां गा परीसीलें : जी जी पां म्हणां : म्हणति : चक्रधर : म्हणति : ऐसें होए : आतां परीसीलें : भीक्षावारि जाली गा : जी जी : चक्रधर : ग्राम वांटीति : संगु पालटीति : भक्तजन भीक्षे जाति : भीक्षा करूनि एति : झोळीया दृष्टपूता करीति : झोळीया काठीये घालीति : ठेवीति : श्रीचरणा लागति : श्रीमुर्ति अवलोकीत बैसले असाति : ॥ २ ॥ छ

भटोबास झोळी काठीये सि घालूनि ठेवीति : चक्रधरां: चेया श्रीचरण लागति : नीधिवासेया हाटा जाति : पूजाद्रव्यें हाटवका आणीति : नागाम्बा : हातीं देति : आपण अलंकारु गुंफत बैसले असाति : चक्रधर : भोजनूतेया बीजे करीति : भोजनूतां नागाम्बा आसन रचीति : चक्रधर : आसनी उपवीष्ट होति : नागाम्बा : पालवें श्रीचरण प्रमार्जीति : आसना वरि ठेवीति : मग : ॥ दृष्टी पूढां भक्तीजना ची पांति होए : कदाचीत : नागाम्बा : पदार्थु नीवडीति : चक्रधरा : आरोगण देति : मग चक्रधर : मढा सि बीजें करीति : तवं सायांकाळ होए : हे तीसऱ्या पाहाराच्या भीक्षावसराची खांडणी : नागाम्बा : पूढा जाति : सडासंमार्जन करीति : चौक रंगमाळीका भरीति : ओटेया वरि आसन रचीति : चक्रधरा : आठां दीसां क्षौर : चौं दीसां मार्दनें : होए : नागाम्बा : गाडु ढाळीतें : चोखटें दाटणेनि श्रीमुर्ति दाटीति : बहीरवासू ओळगवीति : फुटा परावर्ण करीति : चक्रधर : आसनी उपवीष्ट होति : मग : नागाम्बा : चक्रधरां : चा भालप्रदेसीं कस्तुरी चा आडा रेखीति : सर्वांगीं यक्षकर्दमा ची भोरि देति : श्रीकंठीं गळदंडा ओळगवीति : त्या गळदंडेया सि तिनि भासा : एकि माळ : तऱ्हीं गळदंडा चि : दोनि माळा तऱ्हीं गळदंडा चि : तीनि माळा तऱ्हीं गळदंडा चि : सेवंतेयां मोगरेयां ची दाट माळ गुंफति : माजि माजि वान सीं(? सा)

रीति : तो गळदंडा श्रीकंठीं ओळगवीति : श्रीमुगुटीं मुगुटमाळ : मोकळेयां पुष्पां चीं पूजा करीति : श्रवणीं झूळंबुके बाहुभुषणें : कळीकां चे हातसर : श्रीकरें ,फुलां चा झेला ओळगवीति : नागाम्बा : धुपटणा आंगारा आणीति : त्या वरि दसांगु धुपु घालीति : पांचे वाती उजळौनि आर्ती पालमंडां ठेवीति : चक्रधरा : धुपार्ती होए : मंगळार्ती होए : जयतु मंगळु मंगळा : परममंगळरूपा : हे जति ओळगवीति : नागाम्बा : सि आठे सात्वीक प्रकटति : हाती चें पालमंडें थरारीलें देखौनि : चक्रधर : म्हणति : बाणरेया बाइसां चीए हाती चें पालमंडें धरा गा : भटोबास पालमंडें घेति : नागाम्बा हातां तु हात सीरूनि नीराजन : करीति : पालमंडें खालि ठेवीति :भटोबास पांच दंडवतें घालीति : नागाम्बा : रासु एकु दंडवतें घालीतें चि असति : नागाम्बा : वीडा ओळगवीति : चक्रधर : नगरजना सि पाठवणी देति : नीजकींकर सेवे सि राहाति : रात्रीच्या अवस्वरा ची हे खांडणी : नागाम्बा : नाथोबा करावे दूध आणवीति : आळीवां दुधां तु साकर तुप भात साकर ऐसी : चक्रधरा : व्याळी होए : नागाम्बा : उदक ओळगवीति : चक्रधर गुळळा करीति : श्रीकर प्रक्षाळीति : नागाम्बा : सपूर दाटणा श्रीकरीं ओळगवीति : चक्रधर : श्रीमुख प्रमार्जीति : श्रीकर परमार्जीति : भटोबास श्रीकरीं चंदन ओळगवीति : चक्रधर : दोन्हीं श्रीकर चंदनें परमार्जीति : भटोबास सकर्पूरा फोडी ओळगवीति : वीडीया करूनि देति : रात्रीच्या आरोगणाची हे खांडणी : नागाम्बा : पद्मासन असे तें सयनासन रचीति : चक्रधर : आसनी उपवीष्ट होति : भटोबास : नागाम्बा : जेउं बैसाति कांहीं पदार्थु आला असे : तरि भटोबास बाइसां तें म्हणति : बाइसेया : नागाम्बा : कांहीं पदार्थु आला असे : तरि बाइसें भटोबासां तें म्हणति : नागदेया घेया : चक्रधरां : चा प्रसादु असे तो दोघें वांटुनि जेवीति : मग : चक्रधर : भक्तां प्रति परावर नीरूपण करीति : नीरूपण करीतां भटोबासां सि जाड्य ये : तरि : चक्रधर : सागळे चेनि उदकें : सींपवीति : वाती चें तेल सरे : तरि नारीएली चें तुप घालवीति : एकु दीं नरूपण होत असे : भटोबासां जाड्य आलें असे : नागाम्बा : कोण्हा व्यापारा गेलीं होती : तीयें आलीं : नागाम्बां : म्हणीतलें : बाबा नागदेया सि जाड्य आलें असे : तरि बाबा हें कोणा प्रति बोलत असति : म्हटलें : एथ प्रवृत्ति जाली तरि : स्तंभा एका तें नीमीत्य करूनि बोलीजेल : म्हणौनि : श्रीकरें स्तंभु त्राहाटीला : एकु दीं नरूपण होत होतें : नागाम्बा : कोण्हा व्यापारा गेलीं होतीं : तीएं आलीं : तवं नीरूपण जालें : नागाम्बें : म्हटलें : बाबा हें नीरूपण म्यां आइकीलें नाहीं : असें : बाइ बाणरेसां तें पूसा : भटोबास : चक्रधरां : पासि बैसले असाति : बाइसें भटोबासां तें पूसों लागली : भटोबास बोलों लागले : नागाम्बें : म्हटलें : हां बाबा हें (ऐसे) होए :। असें : बाइ : हा काइ आपुलें बोलैल : हा एथचें चि बोलैल कीं : हे रात्रीच्या पहुडाची खांडणी : एकु

दीसू नीरूपण करीतां : पाहातपडि जाली : भटोबासीं : म्हटलें : जी जी पाहालें असें : येथौनि तुम्हां पाहालें चि बहुत : पुरूषां : चीया भेटी युगें जाति : या वरि : चक्रधरें : पुरुषां : ची गोष्टि सांघीतली : कोण्ही एकु राओ : पुरुषा : चीये भेटी आला : आपूला पाइकु परीवारू : बाहीरि राहाउनि : आपण ( विडा घेऊनि हातीं) भीतरि आला : तवं तेयां : पुरुषां : ची काष्टी लागली असे : तथा समाधी लागली असें : काष्टी भंगैल : मग : वीडा वाइन : नमस्कारू करीन : म्हणौनि राहीला : काष्टी भंगली : वीडा वाइला : नमस्कारू केला : मग : नीगाला : तेहीं म्हटलें : के नीगालेति : ना पाइकु परीवारू : बाहीरि उभा असे : तेहीं : म्हटलें : तें युग चि गेलें नव्हे : या उपरि : बाइसीं : म्हणीतलें : जी जी : एकी वासना : बाइसीं म्हणीतलें : ऐसे ते आमचे बाबा चि होति : चक्रधर : उगे चि होते : ॥ ३ ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ ३ ॥ हे नीरूपणाची खांडणी रात्रीच्या

२ मानभाव लोकां चे सहाशें वर्षां पासून आतां पर्यंतचे जेवढे म्हणून नकल केलेले ग्रंथ उपलब्ध झालेले आहेत, त्यांत लिहिण्याचा एक विशेष दृष्टीस पडतो तो हा कीं, कधीं एकाशब्दानंतर, कधीं दोन तीन शब्दानंतर व क्वचित् अपूर्ण किंवा पूर्ण वाक्यानंतर : टिंबद्वय हें विरामचिन्ह दिलेलें आढळतें. हें टिंबद्वयचिन्ह शब्द व वाक्यांश तोडण्या करितां देत. हें चिन्ह मानभावेतर ग्रंथकारांच्या ग्रंथांत हि आढळून येतें, ही बाब संशोधकांच्या नित्याच्या परिचयाची आहे. परंतु, मानभाव लेखक ह्या विरामचिन्हाचा जितका उपयोग करितात तितका इतर लेखक करीत नाहींत.

३ शब्दांचा व रूपांचा भिन्नपणा वाचकांच्या लक्षांत यावा, एतदर्थ ह्या टिंबद्वयचिन्हांचा मानभाव उपयोग करतात. त्यावरून मराठी भाषेच्या वैयाकरणांना मराठी भाषेचें पृथक्करण करण्यास फार साहाय्य होण्या जोगें आहे. उदाहरणार्थ, (१) चक्रधर या शब्दा पुढें सि, सिं, तें, ही अव्ययें आलीं असतां, चक्रधरासि चक्रधरेसीं, चक्रधरातें, अशीं जोडून तीं लिहिलेलीं नसतात. तर चक्रधर या शब्दाची द्वितीया चक्रधरा किंवा तृतीया चक्रधरें अशी करून नंतर त्या रूपा पुढें टिंबद्वयचिन्ह देऊन सि, तें व सीं हीं अव्ययें निराळीं काढतात. (२) चक्रधर या शब्दा पुढें च या सर्वनामा चें एखादें रूप आल्यास तें हि असें च टिंबद्वयानें पाठीमागील शब्दा च्या षष्ठ्यन्त रुपापासून वेगळें काढिलेलें असतें. चक्रधर या शब्दाची षष्ठी चक्रधरा. सध्यां महाराष्ट्रांत दादोबापांडुरंगप्रभृति जे अर्वाचीन वैयाकरण आहेत ते चक्रधराचा असें षष्ठी चें संबंध रुप समजून, एक च शब्द लिहितात. परंतु प्रस्तुत मानभावी ग्रंथा वरुन स्पष्ट दिसतें कीं जुने लेखक चक्रधरा व चा हे दोन निरनिराळे शब्द मानीत होते. ज्याला आधुनिक अडाणी वैयाकरण षष्ठी चा प्रत्यय

समजतात तो चा हा शब्द त्यत् या संस्कृत सर्वनामा पासून निघालेल्या च या मराठी सर्वनामाचें पुलिंगा प्रथमे चें एकवचनी रूप आहे, हें मीं सुबंतविचार ह्या प्रबंधांत दाखवून दिलें आहे; व त्याला प्रस्तुत मानभावी ग्रंथाच्या मानभावी लेखकाच्या लिहिण्यानें दुजोरा मिळत आहे.

४ प्रस्तुत दिनचर्येत हें हें रुप मीं या शब्दा बद्दल अनेक वेळां योजिलेलें आढळतें. म्हणजे सहाशें वर्षां पूर्वी मराठींत संस्कृत अहं पासून निघालेलें हें हें रूप कित्येक प्रांतांत किंवा कित्येक जातींत प्रचलित होतें, असें झालें. हें हें सर्वनामरूप चक्रधराच्या बोलण्यांत आलें आहे. चक्रधर हा देशस्थ ब्राह्मण गोदावरीतीरस्थ होता. अर्थात् सहाशें वर्षां पूर्वीच्या गोदावरीतीरस्थ मराठी भाषेंत हें ( अहं ) सर्वनाम होतें हें निश्चित. हें अहमर्थक हें सर्वनामरूप ज्ञानेश्वरी भाषेंत आढळत नाहीं. हें ज्ञानेश्वरा च्या पूर्वी पांच साहाशें वर्षे मराठींत असावें. नंतर त्याचा अस्त झाला.

५ प्रस्तुत उताऱ्यांत खालील रूपें व शब्द लक्ष्यांत ठेवण्या सारखे आहेतः-

१ पसीमीली, दक्षिणिली, उत्तरिली, पूर्वीली, अशीं इह्र प्रत्ययापासून झालेला इल प्रत्यय लागून रूपें होत.
२ पहुडु=निद्रा
३ उपहुडु=जागें होणें
४ पालेंवें=लुगड्या चा शेंवट
५ उसीसा=उसींसें( वर्तमान उसें )
शब्दाची सप्तमी
६ इसीति=यत्किंचित
७ सूजगरें= जागृत
६ साउमीं=समोर
७ ओळगवीति=घालीति, देति
८ श्रीजें करणें=जाणें
९ वीसंवणें=विसावा घेणें, (!विसरणें)
१० स्याल=सीतकाल=सीअआल=स्याल
( हींवाळा ). दिवस शाळू आहे.
११ दारसंक=द्वारशंकु
१२ दाटीत=दडपति
१३ मोमा=मुका (!=मर्दनयुक्त नमस्कार)
१४ भागथि=मागति, तिबद्दल थि
१५ परिश्रो, परिश्रय=परसाकडे परिश्रय=परसअ= परसा
१६ आधीली=पसिमीली प्रमाणें इल प्रत्यय लागून झालेलें विशेषण
१७ जगती= ! (बाहेरील पडवी, भोजनगृह, यज्ञशाळा )
१८ वीदी=रस्ता
१९ तांबतोली =ताम्रतुली = तामतोली=तामोली=तांबोली=तांबली
२० बहीरवासू=बहिर्वस्त्र
२१ परमाजींति=पुसती
२२ पसि=पेक्षां ( पश्चे=पसि )
२३ आरौता=अलीकडे
२४ पासि=पार्श्वे ( जवळ )
२५ वडिल=वरीच
२६ हें=मी
२७ थाप=स्थापना
२८ सीलीका=काड्या
२९ सरे=संपे
३० फोडि=चिरफळ्या, खांडें (सुपारीची)

३१ आकर्षीति=आकर्षीति=खरडतो
३२ पालमंडें=पात्रविशेष (थाळा अगर कडपी पितळी)
३३ सौंदरा=सौंदर्यवान्
३४ गुळळा=गुळणा
३५ सपूर=जाळीची, बारीक, जाळीदार, नाजुक, वालीफ
३६ दाटणा= रुमाल
३७ सुवेळें=सोळें
३८ गळदंडा=गळ्यांतील हार
३९ झुळंबके(झळंचुके ?) =कर्णभूषणें
४० हातसर=हातांतील गजरे
४१ झेला= गुछ, स्तबक
४२ जतु = छंदोविशेष
४३ सीरूनि=घालुनि
४४ रासू=२० ? शत ?
४५ वीडी=विड्याची पट्टी
४६ सपूजित=संपूजित
४७ उदेयां=उदयीं (उदय=उदे, उदे शब्दाची सप्तमी उदेयां)
४८ आंगी=आंगरखा
४९ टोपरें=टोपडें
५० फुटा=वस्त्रविशेष
५१ परावर्ण=प्रावरण
५२ खोलचूंथि=खोळीचा पडदा
५३ चांदोवा=छत्री, वस्त्राचें छत
५४ वीसदेओ=विस्तव
५५ पुडु =पुडें
५६ वाटोवा =झोळणा, बटवा
५७ सागळ =मोरवा, सुरइ
५८ ढग=स्थलविशेष, उंच जागा
५९ प्रतेजति=परित्यजति
६० कीजो=क्रियताम्

६१ कानवडा=कर्णपट्टः(दाराचें झांकण) वस्त्राचा आडपडदा
६२ आरोगण=पथ्य, भोजनपदार्थ
६३ पहीत =वरण
६४ साकवतीया=भाज्या
६५ वाउलीं=पाउलीं
६६ वेढे=फेऱ्या
६७ पांती=पंक्तीस
६८ पोरेहो !=संबोधनाचें रूप, एकशब्द
६९ वर=वरं better
७० सवादत=संवादत
७१ हांगा=अंग !
७२ संगु=संगति
७३ नीधिवास=नीहिवास=नीइवास=नीवास=नेवासें
७४ हाटवका = बाजारांतून घेतलेलें सामान
७५ भोजनूता=स्थलविशेष
७६ मादनें= । मर्दन, तैलमर्दनयुक्त स्नान । =नुसतें स्नान
७७ गाडु ढाळणें = गडु ओतणें
७८ आडा=टिळा, पट्टा
७९ यक्षकर्दम=कापूर + कस्तुरी + कंकोळ इत्यादींचें उटणें; अष्टगंध
८० भोरि=उटी
८१ वान=वर्ण. वान सारीति=पुष्पें गुंफण्याचे वेगळाले प्रकार करतात.
८२ व्याळी = रात्रिभोजन
८३ पाहात=पाहाट
८४ पडिजाली=प्रतिजाता
८५ नाहालें=प्रभातं
८६ वारि=ऐवजीं
८७ खांडणी = श्लोकांचा चरण

६ वरील यादींत दोन रूपांकडे लक्ष्य देण्यासारखें आहे तीं रूपें हीं:— सपूजित व सवादत. हीं दोन मराठी रूपें संपूजित व संवादत ह्या दोन संस्कृत रूपांचे अपभ्रंश आहेत. सं या गतींतील अनुस्वार मराठींत नष्ट होऊन नुसता स असा अपभ्रंश रहातो. सं या कर्मप्रवचनीया चा हि तो च प्रकार होतो.

७ या सबंध उताऱ्यांत एक हि शब्द, फारसी, आरबी, कानडी इत्यादि भाषांतील नाहीं. येथून तेथून सर्व शब्द तद्भव किंवा तत्सम संस्कृतोत्पन्न आहेत. सबंध उताऱ्यांत एकंदर शब्द २५८५ आहेत; पैकीं तत्सम म्हणजे शुद्ध संस्कृत शब्द ६५० आहेत, म्हणजे शेंकडा २१ शब्द तत्सम आहेत. बाकी चे शेंकडा ७९ शब्द तद्भव आहेत. या तद्भवांत दोन प्रकार आहेत, नवे तद्भव व जुने तद्भव. येथें नव्या जुन्या तद्भवां संबंधानें विचार करण्या चें कारण नाहीं. चक्रधर ब्राह्मण होता व त्याचे प्रत्यक्ष मुख्य मुख्य शिष्य हि बहुतेक ब्राह्मण च होते. तत्रापि श्रोते व प्राशिष्य ब्राह्मणेतर होते. असें असून, त्याच्या बोलण्यांत जर शेंकडा २१ शब्द संस्कृत येत, तर असें विधान करतां येते कीं सहाशें वर्षां पूर्वील बहुश्रुत ब्राह्मण शेंकडा २१ शब्द संस्कृत बोलत. ज्ञानेश्वरींत हि हा च प्रकार आहे. तींत हि संस्कृत शब्दां चा भरणा असा च सडकून आहे. इतकें कशाला, नामदेव तुकाराम-आदिकरून शूद्रग्रंथकारांच्या ग्रंथांत काय थोडे संस्कृत शब्द आहेत! तात्पर्य संस्कृत शब्द महाराष्ट्रांतील ग्रंथकार सहज च वापरतात. त्यांत विशेष असें कांहीं च नाहीं. न वापरते तर आश्चर्य! बापाच्या मालमत्तेवर मुला चा हक्क च आहे. मराठी ही संस्कृतभाषेची नात आहे. तेव्हां नातीनें आजीचे शब्द उचलावे हें स्वाभाविक आहे. इंग्रजांच्या अनुकरणानें कित्येक लोक या प्रकरणीं विचार प्रदर्शित करतांना किंचित् कोतेपणा दाखवितात. इंग्रजींत ल्याटीन शब्द बेसुमार आले, किंवा थोडे जरि आले, तरि तें येणें इंग्रज टीकाकर अस्वाभाविक समजत. आणि तो समज रास्त होता. कारण ल्याटिन भाषा ही कांहीं इंग्रजी भाषेची आई नव्हे, आजी नव्हे, इतकें च काय पण दशांतली देखील नव्हे. इंग्रजीचा व ल्याटीनचा जो कांहीं बादरायणसंबंध आहे तो एवढा च कीं ह्या दोन्ही भाषा एका च गोत्रांतल्या आहेत. मराठी–संस्कृतां च्या सारखा ल्याटीनइंग्रजींचा निकट संबंध नाहीं. अर्थात च ल्याटीन शब्द बाणेदार इंग्रज टीकाकारांना उपयोगांत आणणें रिणकऱ्या सारखें वाटे. तसें वाटण्याचें आपणा मराठ्यांना कांहीं एक कारण नाहीं. आपण हव्या त्या प्रमाणानें संस्कृत शब्द योजिले, तत्रापि त्यांत अस्वाभाविक असें कांहीं नाहीं. तो आपला हक्क च आहे.* त्रि. का. राजवाडे

---

* वरील दोन्ही निबंधांतील मूळ उताऱ्यांचे पाठ रा. दत्तलक्षराज महानुभाव, महंत, यांनीं दोन जुन्या पोथ्यांबरहुकुम तपासून दिले, व कांहीं पारिभाषिक शब्दांचे सांप्रदायिक अर्थ सांगितले याबद्दल संपादक त्यांचा आभारी आहे. संपादक

# ४२ चक्रधरा ची प्रसादसेवा

१ चक्रधरा च्या दिनचर्ये चा उतारा मागील निबंधांत दिला. दिनचर्ये ची ही कहाणी मानभाव लोक रात्रीं जेवण झाल्यावर मोठ्या भाविकपणें वाचतात व ऐकतात. नंतर प्रसादसेवा करतात. चक्रधरा संबंधानें जी जी कांहीं स्मारक वस्तु असेल तिला प्रत्येकीला दंडवत घालणें म्हणजे प्रसादसेवा करणें, असें मानभाव समजतात. ज्या ज्या वस्त्राला, लांकडाला, दगडाला, इमारतीला, धातूला व वस्तूला चक्रधराचा स्पर्श झाला किंवा ज्या ज्या वस्तूशीं कमजास्त निकट संबंध आला, त्या त्या वस्तूला मानभाव दंडवत करतात. तो दंडवत कसा करीत व करतात याचें वर्णन प्रसादसेवावर्णन नामक त्रोटक चोपड्यांत केलेलें आढळतें. मज जवळ या प्रसादसेवावर्णना च्या दोन प्रती आहेत; एक जुनाट सुमारें तीनशें वर्षां ची आहे व एक तीहून अर्वाचीन आहे. दोन्ही प्रतींतून जुनाट पाठां चा उतारा खालीं देतों:—

ब्रह्म : स्व : देवो : चीद्घन : स्व : देवो : ज्ञान : स्व : देवो : तो : ईश्वरु : अव्यक्त : श्रृष्टी मध्यें अवतरौनि : जीवा : उधरावेया तो चि एकु समर्थ : त्या चें साधन समर्थ : त्या चि (ए) साधना चे च्यारि पक्ष : स्थान : प्रसाद : वासनीकु भीक्षु : हेयातिल गुणा चे ग्रहण : परश्रएस्थाना पासौनि : आसन : वसति : अवस्थान : पूजा : आरोगण : पहुडु उपहुड : श्रीचरण च्यारि : एणें जाणें : घेयावें घोकावें : नमस्करावें : हें चि केवि पां ना : चक्रधरें : भटोबासा तें : म्हटलें : एथिचया संबंधा गेलेः ते वोटे गोटे आदि करुनि : तुम्हा नमस्करणीए कीं गा : मा एसणी देमती कैसी डावलीली : आणि : चक्रधरें : स्वडकलीए इंद्रभटां फुटा दान दीधला : तेव्हळि इंद्रभटा तें : म्हटलें : इंद्रया हा पूजाअवसरीं काढीजे : पुष्प एक वाइजे : एथ नमस्कार कीजे : सुकृत सेवीजे : अंती एत्न कीजे : हें जैसें देखीलें तैसें आठवीजे : या तव संबंध नमस्करीजे : आतां वीसएसंबंध पदार्थ : कापुसः ॥१॥ः कोसला : ॥ २ ॥ रोम : ॥ ३ ॥ चर्म : ॥ ४ ॥ धातु ॥ ५ ॥ दांतु ॥६॥ काष्ट : ॥ ७ ॥ पाषाण : ॥८ ॥ हे वीसएसंबंध पदार्थ

आतां श्रीमूर्तिनिष्टपदार्थ बोलीजेति : श्रीमुर्तिनीष्ट पदार्थ : नख : । १ । दाढ : । २ । केंसकलाप : । ३ । आनुलेपन : । ४ । या मूर्तिनिष्टपदार्थां सि माझें दंडवत : ॥ ७ ॥

आतां कापुसांतु : आवघीं सुताउवें वस्त्रें आलीं असति : आंगीं : । १ : टोपरें : । २ । बहीरवासु : । ३ । फुटा : । ४ । पडदणीं : । ५ । पासवडा : । ६ । उदास्या ची दुटी : । ७ । प्रसनाएकाची दुटी : । ८ । गदो भांडारीया ची जाया :

तीर्चे वस्त्र : । ९ । दोन्हीं करडसले : । १० । गोगो चें वस्त्र : । ११ । गारवेचें वस्त्र । १२ । कुब्जें मातांगा चीए त्रेवेडींचें वस्त्र : । १३ । द्रावडदेसीचें वस्त्र : । १४ । जोगनाएका चें वस्त्र : । १५ उथरी : । १६ । जानिवें : । १७ । पवांतें : । १८ । नवेया मांचेयाचा पाटु : । १९ । तथा जुनेया मांचेयाचा पांटु : । २० । सुपवतीये चा : ट : । २१ । हे मुख्य करुनि : जेतकीं वस्त्रें पूजा जालीं : तेतलीं वस्त्रें कापुसांतु आलीं असांति : तया वस्त्रसंबंधां सिं माझें दंडवत : ॥ छ ॥

आतां जेतुला पाटाउं वस्त्रसंबंधु असे : तेतुला कोसलयांतु बोलीजेति : बारवे ची दुटी : ॥ १ ॥ म्हांईभटां ची मेघवर्णी दुटी : । २ । मेघवर्णी पाग : । ३ । सेनेसळा फुटा : । ४ ॥ सीरोदक फुटा : । ५ । सारनेरा फुटा : । ६ । म्हाळाइसां चोया वस्त्रा ची धारी : । ७ । गरुडनीळ दुटी : । ८ । या पाटाउवां वस्त्रसंबंधा सि माझें दंडवत : । ९ ॥ छ ॥

आतां रोमे आतु : पांचवर्ण जाडी : । १ । सोरठी जाडी : । २ । चवरी : । ३ । घोंगडें : । ४ । सकलादें चें टोपरें : । ५ । हे मुख्य करुनि जेतुलेया रोमां सि संबंधु जाला : तेतुलेया रोमा सि माझें दंडवत : ॥ छ ॥

आतां चर्मा आतु : चरणगादी : । १ । पाटगादी : । २ । वोसाडी : । ३ । दांडीये चें वोसारण : । ४ । पाखाल : । ५ । पोहरा : । ६ । काको चा करवंता : । ७ । सागळ : । ८ । उपाहाणौ : । ९ । हे मुख्य करुनि : जेतुलेया चर्मसंबंधु जाला : तेतुला चर्मसंबंधा सि माझें दंडवत : ॥ छ ॥

आतां धातु आंतु : वांकि : । १ । सांखळें : । २ । कांबि : । ३ । पालिमंडें : । ४ । आरति : । ५ । थाळा : । ६ । ताट : । ७ । वाटें : । ८ । बाटी : । ९ । आरिसा : । १० । लोह : । ११ । गंगाळ : । १२ । तांभाण : । १३ । दोन्हीं तांबकळस : । १४ । अंबिनाथींचें तांबें : । १५ । तथा देउळगावा चें तांबें : । १६ । चौरंगा चें लोहो : । १७ । राजमठीचेया कवाडा चें लोह : । १८ । काकोचेया करवतेया चें लोह : । १९ । माहाद्वारीचेया कवाडा चें लोहो : । २० । केशवनाएकाचेया पन्हेचेया धारुकेया चें लोहो : । २१ । तथा केशवनाएका चिया कवाडा चें लोहो : । २२ । । हे मुख्य करुनि जेतुला धातसंबंध : तेतुलेया धातुसंबंधा सि माझें दंडवत : ॥ छ ॥

आतां दांतातु कापुरा ची सेंद आली असे : तीये सि माझें दंडवत : ॥ छ ॥

आतां काष्टांतु आवघीं काष्टें आलीं असति : आउसा चें पात्र : । १ । डोंबेग्रामराजमठीचा खांबु : । २ । तथा राजमठीचा उंबरवटु : । ३ । नवा मांचा : । ४ । जुना मांचा : । ५ । मांचळी : । ६ । पाट : । ७ । चौरंग : । ८ । माहाद्वारींचें कवाड : । ९ । राजमठीचें कवाड : । १० । भाणवसीचें कवाड : । ११ । त्री : षा : चीए मठींचें कवाड : । १२ । केशवनाएकाचेया माळयधा चें

कवाड : । १३ । साळे चें कवाड : । १४ । बारवे केसवे चें कवाड : । १५ । नेउरगावीचें बाळाणें : । १६ । फणी : । १७ । दोन्ही एमलार्जुनु : । १८ । हे मुख्य करूनि : जेतुलेया काष्टां सि संबंधु जाला : तेतुलेया काष्टसंबंधा सि माझें दंडवत : ॥ ७ ॥

आतां पाखाणांतु : मोतीयां चा टिळा : । १ । छीन्नस्थळी : । २ । माहाद्वारीचा उंबरवटु : । ३ । सोपान पाइरी : । ४ । भींति : । ५ । भांडेभेदन : । ६ । राजमठीचा उंबरवटु : । ७ आरोगणस्थानीचा खांब : । ८ । वीचारवीरा : । उखळी : । १० । वोटा : । ११ । घोडा : । १२ । गुढा खडकळीचें खडक : । १४ । हे मुख्य करूनि जेतुलेया पाषाणां सि संबंधु जाला तेतुलेया पाषाणसंबंधा सि माझें दंडवत : ॥ ७ ॥

ऐसा दोहीं देवा चा संबंधु : वंदीजे सेवीजे : रि : प्रसादसेवे तव काइ होए : ना चक्रधरा : डोंबेग्रामीं उदास्य स्वीकरावेया ची प्रवृत्ति उपनली : तेव्हळी : चक्रधरा : चीए दृष्टी समोर कोण्हां रीगवे ना : तेव्हळी भटोबासीं : म्हटलें : चक्रधरा : ची प्रसाददुटी स्वीकरीजो जी : आणि चक्रधरां : चें उदास्य परीहरीलें : दुटी चक्रधरें : प्रावर्ण केली : आणि : असें : ऐसें होए हांगा हें ऐसें तुम्हां काइ : आं : स्फुरलें । ऐसें होए : वीधि करीतां वीधि स्फुरे : मग : या उपरि : चक्रधरें : प्रसादा ची महीमा नीरोपीली : मग : भटोबासां : प्रति डोंबेग्रामीं उदास्या चा प्रसंगीं : म्हटलें : प्रसादसेवे तव : पुरुषु : धर्मी दक्ष होए : इश्वरीं : आर्त्ति उपजे : अविधि परिहरे : वीघ्ना उपसांति होए : वीधि सबीज होए : देवं साह्या तें करी : अवीधिअनीष्टा चा नासु करी : तामसे काळीं सत्व उपजे : गेलें सत्व ए : संनिधान देयावेया ची प्रवृत्ति उपजे : जये जये जी : ईश्वरा : श्रीचक्रधरा सचिदानंद : स्वरूपा : देवो : आनादीचा अपवीत्रु गा जी : श्रीचक्रधरा आज्ञानें अन्यथाज्ञानें अपवीत्रु : लोंकोकि : स्वोक्ति : आपवत्रि : शास्त्रोक्ति : अपवीत्र : अभिलाषें : अहंता ममता अपवीत्रु : कामक्रोधीं मदमछरी : रागद्वेषीं अपवीत्रु : आणि : श्रृष्टी श्रृष्टी चा प्रमादीया गा जी : श्रीचक्रधरा : आतां ए सृष्टी मध्यें तु एकु वाचौनि : हा जीव आणिकें काइसेन हीं पवीत्रा नव्हे गा जी : श्रीचक्रधरा : आतां आपुलेनि दरिसनें स्परीसनें : संभाषणें : अवलोकणें : अंतःकणें मातें आपवीत्रा तें पवीत्रा कीजो जी श्रीचक्रधरा : तुझें नाम : लीला : मूर्ति : चेष्टा : स्थान प्रसाद : वासनीकु : भीक्षु याचें सेवादास्यु घडउनि मातें अपवीत्रा तें पवीत्रा कीजो जी गा जी : श्रीचक्रधरा : आपुलेनि नीत्यवीधी : नीमीत्यवीधी : घडउनि : मातें अपवीत्रा तें पवीत्रा कीजो जी गा श्रीचक्रधरा : जी तुझेया स्थाना प्रसादा : वासनीका भीक्षु सि

माझें दंडवत : प्रश्रया चीए ठाऊनि : आसन : वसति : अवस्थान वेन्हि दीधलें : त्या त्या सि माझें दंडवत : वोवीए पासौनि वचनवाक्य ठ्येन्हीं : दीधलें त्या सि माझें दंडवत : साब्दज्ञानीयां सि आपरोक्षज्ञानीयां सि : सामान्यज्ञानीयां सि : विशेषज्ञानीयां सि माझें दंडवत : आतां आठा हीं भक्ता सि माझें दंडवत : पुरभजनीयां सि : वसिखज्ञानीयां सि : आग्रहीया : तळमळीया : आत्महननरूपमेळीया : आवस्थाप्रकटीया : उपाइया : आइकत खेवो जाये : या आठां भक्तां सि माझें दंडवत : उपकारनीमीत्या सि माझें दंडवत : असेखा गुरुकुळा सि माझें दंडवत : एंव प्रसादसेवा : संपुर्ण : ॥ छ छ ॥

२ शेवटल्या रकान्यांत "वोवीए पासौनि वचमवाक्य ठ्येन्हीं" ह्या वाक्यसंदर्भात चक्रधर वोवीया करीत असे असा उल्लेख आहे. म्हणजे ज्ञानेश्वरा च्या फार पूर्वी पासून मराठींत वोवीछंदांत रचना होत होती असें निष्पन्न होतें.

३ चक्रधरसंबंधक ज्या वस्तूंचा निर्देश वरील उताऱ्यांत आला आहे त्या वस्तूं पैकीं कांहीं सध्यां अपरिचित आहेतः—

१ सुताउवें=सूतानें विणलेलीं वस्त्रें
२ टोपरें=टोपडें (टोप शब्दाचें लघुत्वदर्शक रूप)
३ बहीरवासु=बाहेरजातांना नेसावयाचें वस्त्र
४ फुटा ?
५ पासवडा=पासोडा
६ दुटी ?
७ करडखलें ?
८ त्रेवेडी ?
९ उथरी=उत्तरी
१० पाटु=पलंगपोस
११ सुपवती ?
१२ पाटाउ=पाटाव
१३ पाग ?
१४ धारी ?
१५ जाडी ?
१६ सकलाद=Sackcloth (अर्थात् पडतें.) बहुशः सकलाद फ्रांडर्समधून येत असावी. (सकलाद शब्द ज्या अर्थी या ग्रंथांत आला आहे, त्या अर्थी तो शब्द इंग्रज १७ व्या शतकांत हिंदुस्थानांत आल्या नंतर ग्रंथांत शिरला असण्याचा जबर संभव आहे.)
१७ चरणगादी ?
१८ पाटगादी ?
१९ दांडी ?
२० बोखारण ?
२१ करवता ?
२२ सागळ =सुरई
२३ वांकि ?
२४ कांवि ?
२५ पालिमेंडै=धाळा
२६ लोह ?
२७ धारुका ?

| | |
|---|---|
| परदेशांहून म्हणजे इंग्लंडाहून त्या | २८ सैंद ! |
| कालीं म्हणजे चक्रधरकाली म्हणजे | २९ याळाणें ? |
| शालिवाहनाच्या बाराव्या शत- | ३० भांडेभेदन ? |
| कांत हिंदुस्थानांत Sackcloth | ३१ चीचारचीरा ! |
| येत होती असें दुर्घट मानणें भाग | ३२ गुढा ! |

ज्या शब्दां पुढें प्रश्नचिन्ह आहे ते शब्द काय वस्तु दाखवितात तें सांगतां येण्यास सध्यां मजजवळ साधन नाहीं. हे शब्द घरगुती व्यवहारांतील आहेत व आजपर्यंत ज्ञानेश्वरा पासून चिपळोणकरां पर्यंत जे ग्रंथकार आपणास ठाऊक आहेत त्यांच्या ग्रंथांतून आलेले नाहींत. ज्ञानेश्वरा पलीकडील महाराष्ट्रांत आपण प्रवेश करीत आहोंत, असा ग्रह हे शब्द भेटल्यानें होतो. ह्या शब्दांचे अर्थ मानभावां पैकीं जे कोणी साक्षेपी ज्ञाते असतील त्यांना अवश्य माहीत असणार. कारण, त्यांना परमपूज्य जो चक्रधर त्याचा संबंध या वस्तूंशीं आला आहे. तेव्हां ओघास च आलें कीं या शब्दाचे अर्थ समजण्यास मानभावां चें साह्य घेतलें पाहिजे. दुसरा एक उपाय आहे. हे शब्द कोणत्या हि कारणानें ज्यांत आले आहेत असे तत्कालीन इतर गद्यपद्य ग्रंथ मिळाले पाहिजेत. इतकें स्पष्ट आहे कीं हा प्रसादसेवा ग्रंथ आपणाला ज्ञानेश्वराच्या पूर्वींच्या महाराष्ट्रांत नेतो.

४ प्रसादसेवाग्रंथाच्या ज्या दोन प्रती मला मिळाल्या आहेत त्या तीनशें वर्षां हून जुन्या नाहींत. अर्थात् त्या दोन्हींतील भाषा बहुत स्थळीं अर्वाचीनलेली आहे. ह्याहून जुन्या प्रती मिळतील त्यांत चक्रधरकालीन व ज्ञानेश्वरकालीन एकोनएक रूपें सांपडतील, हें सांगावयाला नको. नकलकारांनीं कोठें कोठें प्राचीन रूपें दिली आहेत व मनास वाटेल तेथें अर्वाचीन रूपें घातलीं आहेत. एक प्रत ज्या शब्दाचे प्राचीन रूप देते त्यां च शब्दाचें अर्वाचीन रूप दुसरी प्रत देते. एक च नकलकार एका च शब्दाची प्राचीन व अर्वाचीन रूपें निरनिराळ्या स्थळीं देतो.

वि. का. राजवाडे

## ४३ मानभावांच्या ब्रह्मविद्येचीं स्थूल तत्त्वें

मानभाव ज्या तत्त्वां वर विश्वास ठेवितात त्याचें स्थूल टिपण ज्यांत आहे अशीं दोन चोपडीं मज जवळ आहेत. एक सुमारें तीनशें वर्षांचें जुनें आहे व दुसरें त्याहून किंचित् अर्वाचिन आहे. दोहींत हि कमजयास्त प्राचीन अर्वाचीन रूपें आहेत. पैकीं दोहींतून सापेक्षतः प्राचीन रूपें प्रस्तुत उताऱ्यांत घेतलीं आहेत. उतारा एणें प्रमाणेंः—

श्रीदत्तात्रए नमाः श्रीकृष्णाए नमाः शृष्टी मध्यें कव्हणें करणें मुचिजे ना : एकें : परमेस्वरें : वाणि : तो चि परमेस्वरु निर्वेवु : नीराकारु : पररुपावसें : सावयेउ : साकारु होए : अवतरे आपुलें संनिधान दे : तें दास्यमोचक : ॥ छ ॥ जैसे द्वापरीं श्रीकृष्णचक्रवर्ति : ॥ : जैसे सैहाद्रीं श्रीदत्तात्रएप्रभु : ॥ : जैसे द्वारावतीये : श्रीचांगदेवो राउळ : ॥ : जैसे आतांस्यां आजि कालि रुद्धिपुरीं श्रीगुंडमराउळ : ॥ : जैसे प्रतिष्ठानीं श्रीचांगदेवो राउळ : ॥ छ ॥ द्वापरीं : श्रीकृष्णचक्रवर्ति : गोसावियांचे चरण शरण : ॥ १ ॥ सैहाद्रीं श्रीदत्तात्रएप्रभु : गोसावियाचें चरण शरण : ॥ २ ॥ द्वारावतिये श्रीचांगदेओ राउळ : गोसावियांचे चरण शरण : ॥ ३ ॥ रिधपुरीं श्रीगुंडमराउळ : गोसावियांचे चरण शरण : ॥ ४ ॥ प्रतिष्ठानी श्रीचांगदेवो राउळ : गोसावियांचे चरण शरण : ॥ ५ ॥ छ ॥

कर्मभूमीचीया : देवता : होति : परि परमेस्वरु नव्हति : ॥ १ ॥ अष्टौ देवयोनी : देवता : होति : परि : परमेश्वरु नव्हति : ॥ २ ॥ अंतराळिंचे गणगंधर्व : देवता : होति : परि : परमेश्वरु नव्हति : ॥ ३ ॥ स्वर्गाचे इंद्रचंद्रादीक : देवता : होति : परि : परमेश्वरु नव्हति : ॥ ४ ॥ कैलासवैकुंठिचे हरिहरुब्रह्मादीक : देवता : होति : परि : परमेश्वरु : नव्हति : ॥ ५ ॥ क्षीराब्धिचा सेखसैया : देवता : होए : परि : परमेस्वरु नव्हे : ॥ ६ ॥ अष्ट भैरव : देवता : होति : परि : परमेस्वरु : नव्हति : ॥ ७ ॥ विश्वरूप : देवता : होए : परि : परमेस्वरु : नव्हे : ॥ ८ ॥ चैतन्य : देवता : होए : परि : परमेस्वरु : नव्हे ॥ ९ ॥ चैतन्यापरपरमेस्वरु : तो श्रीचक्रधरु : सकळजीवां तें : रक्षता हो उद्धरिता हो : ॥ १० ॥ छ ॥

बत्तीसलक्ष कृतयुग : कृतयुगीं आत्मोपास्ति : हा धर्मु : ॥ : भक्ति अधर्मु : धर्मा तव : चैतन्यप्राप्तिफल : अधर्मा तव खालिलीं युगीं जन्म : ॥१॥ सोळा लक्ष त्रेत : ॥ : त्रेतीं भक्ति हा धर्मु : यागु अधर्मु : धर्मा तव कैलासवैकुंठप्राप्तिफल : ॥ : अधर्मा तव खालिलीं युगीं जन्म : ॥ २ ॥ आठलक्ष द्वापर : द्वापरीं यागु हा धर्मु : तीर्थक्षेत्रव्रतदान अधर्मु : धर्मा तव स्वर्गप्राप्तिफल : अधर्मा तव खालिलीं युगीं जन्म : ॥ ३ ॥ च्यारिलक्ष कलियुग : कलियुगीं तीर्थक्षेत्रव्रतदान हा धर्मु : हिंसा अधर्मु : धर्मा तव अंतराळप्राप्तिफल : अधर्मा तव नरक : ॥ ४ ॥ उत्तमा धर्मा तव अंतराळप्राप्तिफळ : मध्यमा धर्मा तव अष्टौ देवयोनी प्राप्तिफळ : कनीयसा तव अधोनिकप्राप्तिफळ : ॥ ५ ॥ कृतयुगीं लक्षु भरि आयुष्य : ॥ : त्रेतीं दाहा सहस्र : ॥ : द्वापरीं सहस्रु : ॥ : कलियुगीं सत : ॥ ६ चहूं युगीं चां धर्मी : परमेस्वरु नेणिजे : न पवीजे : परमेस्वरें परमेस्वरु जाणिजे : ॥ ७ ॥ छ ॥ छ॥

एकि वीया : ॥ १ ॥ दोनि वीया : ॥ २ ॥ आठ विया : ॥ ३ ॥ सवावो लक्षु नव कोडी वीया : ॥ ४ ॥ बाहातरि कोडि विया : ॥ ५ ॥ एकि विया ते

ब्रह्मविद्या : ॥ ६ ॥ द्विधा सांभव : ॥ ७ ॥ अष्टधा शाक्तए : ॥ ८ ॥ सैवावां लक्षु नव कोडी माहानव : ॥ ९ ॥ बाहातरि कोडी आनव : ॥ १० ॥ वीसयाधार वेधु : ॥ ११ ॥ इंद्रियाधार वेधु : ॥ १२ ॥ अंतःकरणाधार वेधु : ॥ १३ ॥ देहाधार वेधु : ॥ १४ ॥ विदेहाधार वेधु : ॥ १५ ॥ केवलाधार वेधु : ॥ १६ ॥ विसयवेधें विसया ची प्राप्ति : ॥ १७ ॥ इंद्रियवेधें इंद्रियां ची प्राप्ति : ॥ १८ ॥ अंतःकरणवेधें अंतःकरणा ची प्राप्ति : ॥ १९ ॥ देहवेधें देहा ची प्राप्ति : ॥ २९ ॥ विदेहवेधें विदेहा ची प्राप्ति : ॥ २१ ॥ केवलवेधें कैवल्या ची प्राप्त : ॥ २२ ॥ छ ॥

परमेश्वरु प्रवृत्ती : मायाशृष्टीसंहारु करी : ॥ १ ॥ विसो इंद्रीं विलया जाए : ॥ २ ॥ इंद्रिए अंतःकरणीं विलया जाए : ॥ ३ ॥ अंतःकरण देहीं विलया जाए : ॥ ४ ॥ देह विदेहीं विलया जाए : ॥ ५ ॥ विदेह तें नित्य : ॥ ६ ॥ कार्य अविद्या : कारण अविद्ये चां ठाइं विलया जाए : ॥ ७ ॥ कार्य कारणीं विलया जाए : ॥ ८ ॥ एकु नित्यवर्गु : ॥ एकु अनित्यवर्गु : ॥ ९ ॥ नित्यवर्गी : जीव : देवता : परमेस्वरु : उरति : ॥ १० ॥ अनित्यवर्गी अनादिअविद्या : कर्मलेप उरेति : ॥११॥ अनादिअविद्याकर्मलेपुयुक्त : जीव मायास्वरूपीं असाति : ॥ १२ ॥ देवता स्वरूपस्तिता होति : ॥ या परि प्रपंचु संहारे : ॥ १४ ॥ माया परमेस्वरा ची प्रवृत्ति ओळगे : ॥ १५ ॥ छ ॥

मायास्वरूपीं एकदेसीं तम असे : ॥ १ ॥ तमोनिमग्नु जीवु मायास्वरूपीं असे : ॥२॥ परमेस्वरप्रवृत्ती मायातमोनिमग्ना जीवां : चैतन्यमइं(ईं) ऐसें उपजवी : ॥ ३ ॥ माया जीवा तें विकरे : संचरे : विए : प्रसवे : हालवी : डोंचली : उगळी : लोटी : ॥ ४ ॥ परमेस्वरप्रवृत्ती : मायाव्यापारवसें : अविद्यात्मकजीव चैतन्यमइं(ईं) ऐसें घेउनि उठीति : ॥ ५ ॥ चैतन्यमइं जीवां जन्म बोलिजे : अन्यथा ज्ञान बोलिजे : आयमळु बोलिजे : ॥ ६ ॥ मायासृष्टि जीव : जीवसृष्टि प्रपंचु : ॥ ७ ॥ मायाकृत जीव : जीवकृत प्रपंचु : ॥ ८ ॥ मायाकार्य जीव : जीवकार्य प्रपंचु : ॥ ९ ॥ या परी माया जीवां तें जन्मौनि आपण उदासीन होए : परि सूत्रा तें न संडी : ॥१०॥ जीउ माये सि अधीन होए : कां प्रपंचा सि मध्यें असणें चि नाहीं : ॥ ११ ॥ जन्मला सांता जीउ : क्षणुपर्यंत सुध असे : मग मैले : ॥ १२ ॥ चैतन्य मृत्तिकापर्यंत मैले : चैतन्या सरिसा जीउ मृत्तिकापर्यंत मैले : ॥ १३ ॥ : चैतन्य चैतन्यपर्यंत उजळे : चैतन्या सरिसा जीउ चैतन्यपर्यंत उजळे : ॥ १४ ॥ : आनां चां करणा : त्या सि अभिमानु : ॥ १५ ॥ : मग जीउ प्रपंचा तें रचीति : ॥ १६ ॥: कां रचीति : जें अधोमति : अधोगति : अधोराति म्हणौनि : रचीति : ॥१७॥: काइसेनि रचीति : ना तें त्यां तें सामर्थ्य आति : ॥ १८ ॥ : मग जीउ नाहीं तें चि एक गंधर्वनगराकार विस्व रची : त्या माजि रिगे : तादात्मकु होए विस्व-

महं ऐसें बुझे : ॥ १९ ॥ : मग जीउ नाहीं तें चि एक गंधर्वनगराकार अष्टधा प्रकृति रची : त्या माजि रिगें : तादात्मकु होए प्रकृतिरहं ऐसें बुझे : २० ॥ : मग जीउ नाहीं तें चि एक गंधर्वनगराकार अनेधी विकृति रची : त्या माजि रिगे : तादात्मकु होए : विकृतिरहं ऐसें बुझे : ॥ २१ ॥ : मग जीउ नाहीं तें चि एक गंधर्वनगराकार अनेकधाविकृति विकृति रची : त्या माजि रिगे : तादात्मकु होए: विकृतिविकृतिरहं ऐसें बुझे : ॥२२॥ : या परी मनुष्यपर्यंत मेळे : ॥२३॥ : मग चतुर्विधा कर्मफळा जाति : ॥ २४ ॥ स्वर्ग नरक कर्मभूमि मोक्षु यां तें चतुर्विध कर्मफळ बोलिजे : ॥२५॥ : या परी मागौती जैसी असिली तैसी सृष्टि रचे : ॥२६॥ : माया परमेस्वरा चि प्रवृत्ति ओळगे : ॥ २७ ॥ :छ ॥ छ ॥

जीवप्रपंचव्यतिरिक्त : सच्चिदानंदस्वरूप : परमेस्वरु एकु आति : तो सर्वशक्तियुक्तु : ॥ १ ॥ नित्यकेवल : अनादिअविद्यायुक्त : वस्तु येकि आति : ते जीवशब्दें बोलिजे : ॥२॥ विस्वरुपा चीए ठाउनि : मृत्तिकापर्यंत प्रपंचु बोलिजे : ॥ ३ ॥ व्यतिरिक्त म्हणजे वेगळा : ॥४॥ सत्शब्दे ब्रह्म बोलिजे : चित्शब्दें माया बोलिजे : आनंदशब्दे ईश्वरू बोलिजे : ब्रह्म : माया : ईश्वरु : ऐसा त्रिअंशु परमेस्वरु एकु आति : ॥५॥ : शक्तिशब्दें सकल ही देवता : सकल ही गुण : सकल ही धर्मु : ज्ञानविज्ञान : सर्व : शक्तिशब्दें बोलिजे:॥६॥ युक्त म्हणजे एतत्सहित :॥७॥ सौंदर्य : लावण्य : सौभाग्य : औदार्य : दया : मया : रुपा : कारुण्य : एवमादिक अनंत गुण बोलिजति : ॥८॥ नित्यत्व : व्यापकत्व : सर्वात्मकत्व : सर्वातीतत्व : सर्वकर्तृत्व : सर्वसाक्षित्व । एवमादिक अनंत धर्म बोलिजति : ॥ ९ ॥ छ ॥ छ ॥

आनंदशब्दें ईश्वरु बोलिजे : ॥ १ ॥ आनंद तो : ॥ २ ॥ ब्रह्म तो : ॥ ३ ॥ अच्युत तो : ॥ ४ ॥ अवक्रीयु तो : ॥ ५ ॥ अवेक्तु तो : ॥ ६ ॥ अमूर्त तो : ॥७॥ सूधु तो : ॥ ८ ॥ बूधु तो : ॥ ९ ॥ नित्ययुक्तु तो : ॥ १० ॥ निरअभीमानु तो : ॥ ११ ॥ परु तो : ॥ १२ ॥ परि साक्षित्व ऐसा ही धर्मु तेथ नाहीं : ॥ १३ ॥ केवळु तो : ॥ १४ ॥ केवळीं चि नित्यसंबंधें माया असे : ॥ १५ ॥ तेथ चि मायासंबंधा तें प्रातली असे : तेथ चि न पवे : ॥ १६ ॥ ऐसी चि वस्तु ते : ॥ १७ ॥ ऐस्वर्यआदिकरूनि सकल ही धर्म मायासंबंधें चि तेथ : ॥१८॥ सर्वात्मकु तो : ॥ १९ ॥ सर्वातीत तो : ॥ २० ॥ सर्वकर्ता तो : ॥२१॥ सर्वसाक्षि तो : ॥ २२ ॥ ऐसा एकू परमेस्वरु आति : ऐसा : तो : श्रीचक्रधरू : ॥ २३ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

सृष्टी मध्यें परमेस्वरू अवतरति : ॥ १ ॥ मनुष्यवेसधार्य होति : ॥ २ ॥ मायावेसधार्य होति : ॥ ३ ॥ मायापुरधार्य होति : ॥ ४ ॥ मायानिर्मीतं पुरम् मायापुरं : ॥ ५ ॥ माया घटकारें आकारें बोते : ॥ ६ ॥ नख–चर्म–रोम–आदिकरुनि : सूध चैतन्य चि तें : ॥ ७ ॥ मायारूपीं माए सि अभिमानु : ॥ ८ ॥

ब्रह्मादिशक्तीअधीनु : शक्तीव्यापारू : मायापुरीं परमेस्वरा अधीन शक्तीव्यापारू ॥९॥ मायापुरीं इतरशक्तितुल्य माया : ॥ १० ॥ परमेस्वरीं संपूर्णा शक्ती : जीवीं अंशता शक्ती : ॥ ११ ॥ ऐसेया मायापुरा तें स्वीकरूनि : कर्मभूमीस्तीतां : मनुष्यदेहयुक्ता जीवां ज्ञानपर्यंत आपुला परमेस्वर संबंधु देति : ॥ १२ ॥ एकां प्रेम संचरीति : ॥ २३ प्रेम बोलिजे : भक्ति बोलिजे : ॥ १४॥ प्रेमसंचारमात्रें : विकारु : विकल्पु : स्वभाओ : तीन्हीं उछेदुनि जाति : ॥ १५ ॥ भक्ता चें सकल ही संनिधानीं चरीतार्थ होए : ॥ १६ भक्ता सि श्रीमूर्ती : वरि साध्यसाधनप्रतीति : प्राण्यप्रापकुबोधु : ॥ १७ ॥ साध्यसाधनाकारें आकारलें करचरणवंत ब्रह्म हें : ऐसी भक्ता सि प्रतीति : ॥ १८ ॥ भक्तु वियोगीं नुरे : ॥ १९ ॥ भक्ता नित्यसंबंधु : ॥ २० ॥ एकां जीवां प्रति परा गिरा करूनि परमेस्वरु आपुले स्तीत्व साधीति : ॥ २१ ॥ मग एक अनुसराति : एक ननुसरति : ॥ २२ ॥ ननुसरति ते प्रमादीए बोलिजति: तयां सृष्टि शून्य होए : ॥ २३॥ अनुसरलेयां चें अगांतुक कुंठे : अनारब्ध झुके : प्रारब्धां भोगें क्षेवो : ॥२४॥ अनुसरलेया सि कर्म सवा भोगु नाहीं : दैव सवा भोगु ॥२५॥ अनुसरलेयां सि देवत्व : तिर्यचत्व : होणें नाहीं : ॥२६॥ ज्ञानियां सि श्रीमूर्ती वरि साधनप्रतीतिप्रापकु बोधु : ॥ २७ ॥ कैवल्यदाता हा : मोक्षदाता हा : ऐसी ज्ञानियां सि प्रतीति : ॥ २८ ॥ अनुसरौनि संनिधान करी : या परी योग्य होए : त्या सि परमेस्वरु सत्ताज्ञानदान करीति : ॥ २९ ॥ कव्हणी एकीं अवसरीं सकला ही मलां चें परिसारण करूनि : परमेस्वरु आपुली सत्ता : जीवीं संचरीति : (मग मागौते मळ घालीति) ॥३० ॥ सत्ता बोलिजे : सूचा ( ? सुचा ) बोलिजे : अविभचार्य : ज्ञान बोलिजे : ॥ ३१ ॥ सत्ता ते विदित : ॥ ३२ ॥ सत्ताज्ञान तें चि अपरोक्षज्ञान : ॥ ३३॥ सत्ताज्ञानी असेख कर्म जाणे : कर्मक्षालणीं उपावो जाणे : एतें विघ्न जाणे : विघ्नीं उपशमु जाणे : ॥ ३४ ॥ मग संनिधानीं क्षाळी : ॥ कां असंनिधानीं क्षाळी ॥ ३५ ॥ संनिधानीं तोकडेनि बहुत क्षाळी : असंनिधानीं जें जेतुलेनि क्षाळावें : तें तेतुलेनि चि क्षाळी : ॥ ३६ ॥ सत्ताज्ञानी विकारसृष्टि : कर्मसृष्टी अधीना होति : दैव विघ्न : ॥ ३७ ॥ ब्रह्मादिक आपुलेया पदा नेवो एति : परि तो तयां ची वास न पाहे : ॥ ३८ ॥ अष्ट भैरव आळवीति : डंडळवीति : परि तो जैसा कांहीं तैसा चि : ॥ ३९ ॥ ब्रह्मतुल्य आनंदु विघ्नत्वें प्रकटीति : ॥ ४० ॥ विद्या : अविद्या : पुरुषु : यां तींहीं तें विद्या प्रकासी : मग : तो विद्ये अधिन होए : ॥४१॥ या परी योग्य होए त्या सि परमेस्वरु सामान्यज्ञानदान करीति : ॥ ४२ ॥ सामान्यज्ञानी विकारसृष्टी कर्मसृष्टी वेगळा होए । दैवसृष्टी अधीन होए : ॥४३॥ सत्ता सामान्यज्ञानीं मीळौनि : असेखकर्मक्षालन करी : असेखमळक्षालन करी : ॥ ४४ ॥ तेणें लाविलें तें तो फेडी : तेणें लाविलें नाहीं तें तयाचेनि न फीटे : ॥ ४५ ॥ एतू क्रीएते : तत् कर्म । म्हणौनि कर्म : कर्मशब्दें कर्म बोलिजे : कर्मशब्दें मळ

ही बोलिजति : ॥ ४६ ॥ या परि योग्य होए त्यासि परमेस्वरु विसेसज्ञानदान करीति : ॥ ४७ ॥ विसेसज्ञानीं दैवसृष्टी वेगळा होए : सकला ही शक्तीं अधीना होति : अपरोक्षा होति ॥४८॥ माया कोपैनि उदासीन होए: ॥४९॥ मायारुपाव्यतिरिक्तु परमेस्वरु त्या सि सकला ही शक्ती दान करीति : ॥ ५० ॥ मग तो सकळां सि ही प्रमाणद्रव्य होए : ॥५१॥ आदिमळयुक्त चरमदेहस्तीतु रुपास्पदीभूतु होउनि असे : ॥५२॥ मग परमेस्वरू त्या चि रुपा करीति : ॥५३॥ मग परमेस्वरू आपुलिया रुपाशक्ती करूनि अनादिअविद्याछेदु करीति : मूलाविद्याछेदु करीति : अज्ञानछेदु करीति : ॥ ५४ ॥ अज्ञानछेदें करुनि अन्यथाज्ञानत्रुटि होए : आदिमळत्रुटि होए : जीवत्वत्रुटि होए : ॥५५॥ तळीचील हानि तळेया वरिचिल पडे : उतरडि गडबडी : ॥ ५६ ॥ मग परमेस्वरू तया तें माया पारांगतु करीति : ॥५७॥ साध्याच्या प्राप्ती साधन निवर्ते : ॥ ५८ ॥ परमेस्वरु भक्ता सि आपुली अनुभूतिरति देति : ॥ ५९ ॥ भक्ता सि समोर आपणपें देति : ॥ ६० ॥ ज्ञानियां सि ब्रह्मीभूत करीति : ॥ ६१ ॥ ज्ञानियां सि पाठि सीं घालीति : ॥ ६२ ॥ ज्ञानियां सि मोक्षु देति । ॥ ६३ ॥ ज्ञानिया ब्रह्मीं मिसळे : बुडी दे : ॥६४॥ भक्त भेदें अनुभवीं कीं अभेदें : ऐसे विकल्प तेथ करूं न एति : ॥ ६५ ॥ यापरि परमे : श्रीचक्रधरु : जीवां तें उद्धरीति : ॥ ६६ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

## ४४ ज्ञानेश्वरकालीन गोमांतकी मराठी ताम्रपट

१ हा ताम्रपट फोंडे महालांतील वेरें गांवचा रहिवासी रा. आत्मारामशेट वेरेकर नांवाचे वाण्याच्या घरीं सांपडला. हा दोन पत्र्यांवर मिळून लिहिलेला आहे. पत्र्यांची लांबी १२ इंच व रुंदी ९ इंच आहे. पत्रे तांब्याचे असून फारसे जाड नाहींत. या च काळचे एक दोन ताम्रपट गोमांतकांत आढळले ते जाड आहेत. यांची जाडी फक्त १ मिलिमिटर आहे. पत्र्यांच्या मध्यभागीं वरच्या बाजूस भोकें आहेत. तीं दोन्ही पत्रे जोडण्यास तार घालण्याकरितां असावींत. पहिल्या पत्र्यांत १७ व दुसऱ्यांत १५ ओळी आहेत.

२ याचा शक १२२१ प्रारंभीं च दिलेला आहे. ' सावरी' म्हणजे 'शार्वरी' संवत्सर धरून श्रावण वद्य ८ मीस सोमवार कधीं येतो हे दीक्षितकृत जंत्रीवरून पाहतां याचा शक हल्लींच्या पद्धतीनें शके १२२२ म्हणतां येईल. त्यावेळीं 'तिंम' नांवाचा मंत्री राज्य करीत होता. तो कोणत्या राजाचा मंत्री यासंबंधीं निर्णय करण्याच्या कामीं मला बऱ्या च अडचणी भासत असल्यामुळें येथें कांहीं च लिहिनां येत नाहीं.

३ या ताम्रपटांतील लिपी जुनी कानडी (हळेगन्नड), व भाषा मराठी आहे ही गोष्ट मला महत्वाची वाटते. पोर्तुगीज किंवा अदिलशहा यांचा अम्मल गोमांतकांत बसण्यापूर्वी बरीं च वर्षे गोमांतकांत कर्नाटकी राजांचा अम्मल चालत होता यांत शंका नाहीं. या कानडी राजांबरोबर कांहीं कानडी वाणी गोमांतकांत शिरले. त्यांचें लिहिणें, हिशेब वगैरे कानडींत च चाले. पण भाषा मराठी असे. हा प्रकार ७५ पाऊणशें वर्षांपूर्वीपर्यंत ह्मापसें येथें प्रचारांत होता. व अशा प्रकारचे बरे च हिशेबी कागद तेथील सरकारी दप्तरांत शाबूत आहेत. मूळ कानडी भाषा बोलणाऱ्या लोकांनीं कालांतरानें लिहिण्याच्या कामीं स्वभाषा सोडून मराठीचा आश्रय केला असावा; किंवा कानडी भाषा च अजीबात ते विसरले असावे. सध्यां या लोकांना कानडी भाषा किंवा किपी कांहीं च येत नाहीं. घरांतले जुने कागद मात्र कानडी लिपींत व मराठी भाषेंत आहेत. या चमत्कारिक प्रघाताचें मूळ शोधून काढण्यास अधीक शोध केला पाहिजे. तथापि रा. राजपुरोहित म्हणतात त्या प्रमाणें गोंवाप्रांताची भाषा कानडी होती असें मात्र मला वाटत नाहीं. उलट या प्रांताची पूर्वापार मराठी भाषा ( किंवा कोंकणी ) अद्याप कायम असून कर्नाटकी राजांच्या अमदानींत देखील कानडी लोकांना ( या प्रांतांतील सार्वत्रिक प्रचारांत असलेली ) मराठी भाषा उचलावी लागला. यावरून कर्नाटकी राजांनीं येथें कांहीं काल राज्य केलें व येथें कांहीं लोक कर्नाटकी आहेत हें मान्य असलें तरी गोमांतकाची भाषा मराठी च होती, कानडी नव्हती असें मला वाटतें.

४ ताम्रपटांतील मजकुराचा अर्थ मला बरोबर लागला नाहीं. बरे च शब्द समजत नाहींत. तथापि खाडे गांवचे वाणी व सोनार यांचा तंटा पडल्या वेळीं बेरेगांवाचे वाणी आपल्या जातीच्या मदतीस धाऊन गेले या उपकाराची फेड करण्याकारितां कांहीं दान व मान ठरवून दिले आहेत असें दिसतें.

५ गोंवेनगर, नारवेनगर, वेरें व बद्‌वाडग्राम हीं गांवें पणजी महाल व फाडे महाल यांत सध्यां आहेत. त्याचप्रमाणें, गोवेनाथ, सप्तनाथ, कपिलेश्वर, नागनाथ, हीं देवळें आजतागायत हयात आहेत. हा ताम्रपट जेथें लिहिला तें 'खाडेग्राम' 'खंडोळे' या नांवानें सध्यां ओळखलें जातें. तें अंत्रुज ( फोंडे ) महालांत आहे; व तेथें गणनाथाची ( म्हणजे गणपतीची ) मूर्ती फार जुनी आहे. त्या च देवाच्या देवळांत बसून हा अग्राहार लिहिण्यांत आला आहे.

६ ताम्रपटाची बरोबर कल्पना भा. इ. सं मंडळास व्हावी, माझ्या वाचण्यांतील चुका दुरुस्त व्हाव्या आणि या ताम्रपटांतील मराठी भाषेचा, इतिहासजिज्ञासूंना, शक्य तितका उपयोग करून घेतां यावा या इच्छेनें त्याची छापिल प्रत पाठविली आहे. ती चार बंदांवर मिळून आहे. १ व २ आडवा जोडला असतां

पहिला पत्रा होतो; व ३१४ मिळून दुसरा होतो. जोडाच्या ठिकाणीं ३१४ अक्षरें दुबार आढळतील. तीं मुळांत नसून मीं मुद्दाम आणलीं आहेत हें सांगावयास नको च.

द. वि. आपटे

१ स्वस्ति श्री साळिवान सक १२२१ वरुसां वरत्तमन सावरी संवदर श्रावण बहु
२ ळ ८ मि सोमवारी तिम्ममंतरि धर्माधमि मरिकु भादुरु राज करीत आस
३ तां अग्राहरं साडेग्रामे वारातु श्री गणनाथा देवाचा देउळीं बइ
४ सिके नगर समस्त मळलेयाचा विवरु गोवें नगर पयिकीं सेटिया
५ नागसेटी जणु १ तथा नगर पयिकीं गोम सेटी जणु १ तथा मयिरसेटी जण
६ १ तथा कायिसेटी जणु १ तथा लखुसेटी जणू १ यवं गोवेचे नगराचे निनमिं (! र्यि).
७ जण ५ नारवें नगर पयिकीं सेटिया विठल सेटी जणु १ तथा नगर पयि
८ कीं सात(! व)सेटी जणु १ तथा सोम सेटी जण १ तथा वजर सेटीजणु १ यं
९ वं नारवे नगराचेनि निमिते जण ४ चवग यवं समस्त आमीं नगरानं
१० वेरेकारासी अंत्रुजे मितरी अग्रारवेरें ग्रामे लकसेटी सिवा चांद्सेटी
११ सिवा यिसर सेटीसि यवं जण ३ तीं वरगासी लघु नुडि थलादांने मान्य
१२ चावी नरुतं तुमी आमचे जाति समधाचा कारे(!रि)यासि उपगा अलेत क
१३ वण कार्य म्हणाल तरी आमासी आणि सोनारांसि सवादा होउनु
१४ हाणमारी जाले समधीं तुमी वेरेंकार अमचेया वाणियाचा समयाचे
१५ संमादि विढिसि तुमी वाणी समयासि यउनु मानु समेचा राकिला समधीं आ
१६ मीं नगरा दोसी जानि तुमासी आमी दोंसि जा नगराचु जातीचु कार्यविहासी(! ओ) प्रं
१७ सओ तुमासी आमीं दांन मान लुगडीं विडा गंध आकेत दिधले ग्रमं

## ( दुसरा पत्रा )

१८ धी भूसितां तथाहीं माने भूसितां यणें प्रमाणे प्रगु पायिले मानेण व (ल!)
१९ *नगर पयिकिं भोगावें दुसरें माने नारवें नगर पयिकिं भोगावें
२० तिसरें मानें तुमीं आमा ओपारि भोगावें आमा दों वरगासीच्यां नगरासी
२१ सलु वेरेंतु कामानुपर्दे तितुमा वेरेकारासी भोगावावा तुमच्या जातप्र
२२ जातान यणेचि पदेति भोगावे आमी वा आमचा जातपरजातान यावचंद्र

---

* येथें ⌒ किंवा : अशासारखें कांहीं चिन्ह खोदलेलें दिसतें. —संपादक

२३ .कं पाळावा लिहिले प्रमाणें तुमीं वा तुमच्या जातपरजातान यावचंद्रकं
२४ पाळावे लिहिले प्रमाणें तुमीं वा तुमच्या जातपरजातान यावचंद्रक भोगा
२५ वे ह्मणउनु दिधला दानमानेचा सासनपटु होय भासेसाकी अग्राहारं कटं
२६ (क)ल ग्रामे नगर पयिकिं विठलसेटी जणु १ तथा ग्रामें केतसेटी जणु १ अग्राहा
२७ रं बंदवाडग्रामें बाळसेटी जण १ पारीकरू विठ(ल) सेटी जण १ तथा
२८ ग्रामे सांत सेटी जणु १ यवं साकी जण ५ लिहित सेणवी कुळ
२९ तळी ग्रामें सारांतु आहेता मांग सेणवी स्वस्ति दोप गोवें नगराचे दो( वो!)प
३० श्री गोवेनाथ देउ नारवें नगराचें दोस श्री सपत(प्थ)नाथा देउ साकी दोप श्री क
३१ पिलेस्वरु देउ श्री कपिलेस्वर देउ श्री नागनाथ देऊ श्री गणनाथ देउ
३२ श्री गणनाथ देउ

## ४५ भटांची देशमुखी

१ भटांच्या घराण्यांत दंडाराजपुरी प्रांताची देशमुखी शक १४०० पासून शक १६०० पर्यंत अव्याहत चालली होती. शक १६०१ च्या आगेमागें जानो विश्वनाथ भट याजवर हबशाची इतराजी होऊन तो प्राणास मुकला. तव्हां देशमुखी व हबशाचें राज्य सोडून भट घराणें मराठराज्यांत निघून गेलें. नंतर शक-१६३२ पर्यंत भटांनीं देशमुखी परत मिळविण्याचा प्रयत्न केला नाहीं. ह्या ३२ वर्षांत बाळाजी विश्वनाथाचे बंधू दिवंगत होऊन, तो व घरांतील कांहीं बाया व मुलेंबाळें अशीं कांहीं दिवस कोंकणांत दाभोळ, चिपळोण, अंजनवेल, वगैरे ठिकाणीं राहून, नंतर सुमारें ३० वर्षे वरघाटीं होतीं. कोंकणांतून निघण्याच्या काळीं बाळाजी चांगला कर्ता सवरता पुरूष असून, त्याचें वय सुमारें पंचविशीच्या सुमाराचें होतें. तत्कालीन रिवाजा प्रमाणें बाळाजीचें लग्न दाहा बारा वर्षांच्या वयांत झालें असलें पाहिजे. म्हणजे हबसाण सोडण्याच्या काळीं बाळाजीचें लग्न होऊन बारा पंधरा वर्षे झालीं असलीं पाहिजेत. ह्या बारा पंधरा वर्षांत त्याला कांहीं संतति हि झाली असण्याचा संभव आहे. देशावर आल्या नंतर डुबेरकर बर्व्यांच्या म्हणजे नाशीकप्रांतातील बर्व्यांच्या घराण्यांतील राधाबाईशीं बाळाजी विश्वनाथाचा द्वितीय विवाह झाला असें दिसतें. तदनंतर बाजीराव, चिमाजीअप्पा व अनुबाई, अशीं तीन मुलें झालीं. बाळाजीचा राधाबाईशीं विवाह शके १६०४ च्या सुमारास झाला असें धरल्यास, त्या नंतर चार सहा वर्षांनीं म्हणजे १६०८ च्या सुमारास बाजीराव हा पुत्र झाला असावा. हा अंदाज मी एवढ्या च करितां

करून ठेवितों कीं बाजीरावा नंतरच्या पेशव्यांच्या घराण्यांतील इतर सर्व पुरुषांच्या जन्ममृत्यूंची टिपणें यद्यपि आपणांस उपलब्ध झालीं आहेत, तथापि बाजीराव, चिमाजीअप्पा व अनुबाई यांचीं जन्मटिपणें अद्यापपर्यंत आपणांस सांपडलीं नाहींत. जन्मटिपणें जर सहज उपलब्ध असतीं, तर पेशव्यांच्या वंशावळकारांनीं व मित्तीकारांनीं तीं नमूद केल्यावांचून ठेविलीं नसतीं. कारण बाजीराव ह्या पराक्रमी पुरुषा संबंधानें वंशावळकारांत, मित्तीकारांत व बखरकारांत परम अभिमान वास करीत होता. तेव्हां वंशावळकारादींच्या जन्मटिप्पणविषयक मौग्ध्यावरून एक च अनुमान संभाव्य दिसतें. तें हें कीं, बाळाजी विश्वनाथाला बाजीरावादि संतति तो थोडाबहुत हि प्रसिद्ध होण्याच्या पूर्वी झाली असली पाहिजे. असा काळ म्हटला म्हणजे शक १६०१ पासून १६१० पर्यंतचा होय. ह्या कालांत सुभेदारी, सरसुभेदारी, मुतालकी, सेनाकर्तेपण वगैरे थोर हुद्दे चढून जाण्याच्या पहिल्या पायरीवर हि बाळाजी आरूढ झाला असेल नसेल. बाजीराव शक १६०८ च्या सुमारास जन्मला असावा, असा अंदाज दुसऱ्या हि एका प्रमाणावर भिस्त ठेवून करतां येण्या सारखा आहे. प्रस्तुत टिपण ज्या दस्तऐवजाच्या संबंधानें प्रामुख्यानें लिहिण्यांत येत आहे त्या दस्तऐवजांत बाळाजी विश्वनाथ हबशाला लिहितो कीं देशमुखीच्या वतनाची देखरेख करण्या करितां आपण आपला बेटा कोंकणांत पाठवून देतों. शक १६३२।१६३३ त वतनाची देखरेख करण्या सारख्या बेट्याची उमर वीसपंचवीसाच्या सालीं सहसा असण्याचा संभव फार अल्प आहे. शक १६३२ त कल्पीं बाजीरावाची उमर जर पंचविशीची धरली, तर त्याचा जन्म शक १६०७।१६०८ पडतो. शक १६०८ नंतर तीन तीन किंवा चार चार वर्षांच्या अंतरानें बाकीचीं दोन मुलें बाळाजीला झालीं असें धरल्यास, चिमाजीअप्पाचा जन्मशक १६१२ व अनुबाईचा जन्मशक शक १६१६ समजणें ओघास च येतें. अस्सल जन्मटिपणांच्या अभावीं, अंदाज सुद्धां बांधतां येण्यास दस्तऐवज आपणास आस्ते आस्ते मिळत आहेत, ही उमेदीची बाब आहे.

२ प्रस्तुत दस्तऐवज श्रीवर्धन येथील देशकुलकरणी जे करणिक त्यांच्या दप्तरांत सांपडला. दस्तऐवज अस्सल नाहीं; नक्कल आहे. नक्कल करणारा हि बऱ्या पैकीं नाहीं, अगदीं गचाळांतला गचाळ आहे. अनुनासिक व अनुस्वार ह्यांचा आणि नक्कलकाराचा उभा दावा आहे. शिवाय शब्दांतील अक्षरें गाळण्याची त्याला खोड असून, शब्दांतील एखादें अक्षर दुधार लिहिण्याची त्याला लकब आहे. इतकें च नव्हे, तर फारशी शब्दांचे अपभ्रष्ट उच्चार करण्या इतका तो अजाण आहे. इतके हि दोष एकवार क्षम्य झाले असते. पण, सगळ्यांत उद्वेगजनक दोष ह्या नकलकारांत असा आहे कीं मूळांत नाहीं तो शब्द त्यानें एका ठिकाणीं घुसडून दिला आहे. इहिदे अशर मिया व अलफ या चार आंकड्यांत आलेल्या पदरचा तैन हा

आगंतुक आंकडा घालून इहिदे अशर मिया तैन व अलफ असे पांच आंकडे ह्या नकलकारानें गचाळपणानें लिहिले आहेत. इहिदे अशर मया अलफांत बाळाजी विश्वनाथ ह्यात होता, हें एखादा नवशिक्या हि सांगूं शकेल. तैन हीं अक्षरें घालून ह्या नकलकारानें बाळाजी विश्वनाथाला शंभर मुसलमानी वर्षे पुढें ओढला आहे. इहिदे अशर मया व अलफ म्हणजे शक १६३२ आणि इहिदे अशर मया तैन व अलफ म्हणजे शक १७३२. दस्तऐवज शक १६३२ तील आहे, शक १७३२ तील नाहीं, हें ठरविण्यास दस्तऐवजांत अवांतर पुरावे आहेत. श्रीमंत मेहेंदळे यांचा एक पुर्वज विश्वनाथभट वलद बहिरंभट शक १६३२ होता, शक १७३२त त्या नांवाचा मेहेंदळे कोणी नव्हता. हें एक च प्रमाण दस्तऐवज शक १६३२ तील आहे हें सिद्ध करण्यास पुरें आहे. परंतु, दुसरें हि एक प्रमाण दस्तऐवजांत आहे. लारी या नाण्याचा उल्लेख दस्तऐवजांत केला आहे. हें नाणें कोंकणांत शक १६३२ त चालूं होतें व त्या कालीं हिशेब त्या नाण्यांत करीत. शक १७३२ त लारी या नाण्याचा कोंकणांत मागमूस हि राहिला नव्हता. अशीं हीं दोन अंतःप्रमाणें असल्यामुळें, दस्तऐवज जात्या पूर्णपणें विश्वासपात्र आहे. यांत बिलकुल संशय नाहीं. नकलेंतील हस्तदोषां वरून इतकें च म्हणतां येईल कीं नक्कलकार गचाळांतला गचाळ आहे. वतन बद्दल वेतन, मशारुन्निले बद्दल मशारुल, नख्त बद्दल नख्ता, बितपसील बद्दल बीततपशील, अशरांत बद्दल अशरनांत अशा एक ना दोन, अनेक चुक्या नकलकारानें यद्यपि केल्या आहेत, तथापि ह्या नकलकाराचे आभार मानल्या वाचून रहावत नाहीं. एक दुर्मीळ दस्तऐवज ह्या नकलकाराच्या श्रमामुळें आपणास पहावयास सांपडत आहे. हा दस्तऐवज नकलेची नकल आहे. मूळ दस्तऐवज हबशी सरकारच्या दप्तरखान्यांत शक १६३२ च्या रुमालांत असला पाहिजे. त्या मूळाची एक नकल दंडाराजपुरीप्रांताच्या देशकुळकर्ण्यांच्या दप्तरांत दाखल्या करितां आली ती शक १६३२ त च आली. त्या नकलेची नकल पुढें शंभर वर्षांनीं जी झाली ती आपल्या हातीं आली आहे.

३ देशमुखीचा हक्कलवाजिमा मलिकंबरानें ठरावून दिला होता, असें या दस्तऐवजांत म्हटलें आहे. म्हणजे शक १५०० पासून शक १५३० पर्यंतच्या अवधींत दंडाराजपुरीच्या भट देशमुखांचा हकलवाजिमा निजामशहाचा प्रधान जो मलिकंबर त्यानें ठरावून दिला व तेव्हां भटांकडे देशमुखी होती, असा अर्थ होतो. ह्या हि पूर्वी शक १४०० पासून भटांकडे देशमुखी चालत आली होती, हें इतरत्र दाखवून दिलें आहे.

४ बाळाजी विश्वनाथ शक १६३२ च्या सुमारास सेनाकर्ते झाला. तत्पूर्वी आंग्र्याच्या साहाय्यानें हबशाचा बंदोबस्त व प्रांताची वाटणी बाळाजीनें करून घेतली होती. अर्थात्, बाळाजीचें वजन राजकारणांत त्या कालीं इतकें वाढलें होतें कीं

नुसती इच्छा प्रदर्शित केली असतां, हबशाला त्याची कदीम देशमुखी, जी आज तीस पसतीस वर्षे अमानत पडली होती ती, चालू करणें इष्ट झालें होतें. तत्रापि, हबशाच्या प्रांतांतील देशमुख या नात्यानें हबशाकडे आपली कदीम देशमुखी चालविण्याकरितां अर्ज करणें केवळ शिरस्ता व संप्रदाय म्हणून रीतसर च होतें. इलतिमासांत बाळाजी म्हणतो :–प्रगणेमजकूरची देशमुखी आपली कदीम असे. आपले बडे मुद्तलला परागंदा होऊन मराठराज्यामध्यें गेले. या करितां आपलें वतन चालत नाहीं. तर मेहरवान होऊन वतन दिल्हेयानें वतना वर बेटा एऊन चाकरी करील. बाळाजी विश्वनाथाचा कोणता हि बेटा श्रीवर्धनास जातीनें देशमुखी करावयास गेला नाहीं, हें आपणांस विदित च आहे. आपला बडा मराठराज्यांत परागंदा झाला, असें बाळाजी विश्वनाथ म्हणतो. हबसाणांत बडा या शब्दाचा अर्थ बाप असा करतात. तो जर मान्य केला तर, बाळाजीपंताचा बाप जो विश्वनाथपंत तो हबसाण सोडून गेला, असें मानावें लागतें. आतां नाशिकच्या उपाध्यांच्या येथील दप्तरांत विठ्ठल विश्वनाथ याचा शक १६०१ तील लेख आहे. त्यांतील लिहिण्या वरून असा ग्रह होतो कीं विश्वनाथपंत १६०१ त हयात नव्हता. म्हणजे विश्वनाथपंत व त्याचे मुलगे हबसाण १६०१ पुर्वी सोडून गेले होते, असें म्हणणें प्राप्त होतें. बाळाजी विश्वनाथ बंधू सह हबसाण सोडून गेला असें बखरी म्हणतात. परंतु, बाळाजी स्वतः इलतिमासांत म्हणतो कीं आपले बडे म्हणजे बाप हबसाणांतून परागंदा झाले. बखरी पेक्षां बाळाजीचें स्वतःचें लिहिणें जास्त विश्वसनीय असणार, हें सांगावयाला नको.

५ प्रस्तुत दस्तऐवजांत बाळाजी विश्वनाथानें आपणा स्वतःस देसाई असें म्हटलें आहे. इतर हि पेशव्यांना देशमुख ही संज्ञा लागलेली ज्यांत आहेत अशीं हि पत्रें श्रीवर्धनच्या करणिक देशकुळकरण्यांकडून उपलब्ध झालीं आहेत. लेखांक २ यांत बाजीराव बलाल देशमुख असे शब्द आहेत, आणि लेखांक ३ यांत बाळाजी बाजीराव देशमुख असे शब्द आहेत. बाळाजी बाजीरावानंतर रघुनाथ बाजीरावा पर्यंतचे सर्व पेशवे आपणास श्रीवर्धनचे देशमुख म्हणवून घेण्यांत भूषण मानीत. वतन कितीं हि कां स्वल्प असेना, आपण वतनदार आहोंत ही भावना महाराष्ट्रांत व कोंकणांत फार पुरातन काला पासून आज तागायत अत्यंत उत्कट आहे. दंडाराजपुरीची देशमुखी चालविण्यास पेशव्यांनीं आपला एक प्रतिनिधि ठेविला होता. या प्रतिनिधीचा उल्लेख अजहत देशमुख म्हणुन लेखांक ४ मध्यें आला आहे. लेखांक ५ मध्यें रामराव नारायण देशमुख दंडाराजपुरी असा उल्लेख असून, हा रामराव नारायण पुण्यांतील राजमाचीकर यांचा पूर्वज असावा असें वाटतें.

६ श्रीवर्धन व हरिहरेश्वर या दोन गांवांवर सर्व भट घराण्याची पराकाष्ठेची भाक्ति असे. ह्या दोन गांवांवर निमित्याला मात्र हबशाचा अंमल असे. बाकी वास्तविक सर्व सत्ता पेशव्यांची च असे. श्रीवर्धन गांवांतील सोमजाई, लक्ष्मीनारायण, बाहिरी, काळेश्री, वगैरे सर्व देवतांना नैवेद्य वगैरेंची व्यवस्था पेशव्यांच्या कडून झालेली होती. श्रीवर्धन येथील ब्राह्मणांना पेशव्यांकडून साडे बत्तीस खंडी भात धर्मादाय वार्षिक पोहोंचत असे (ले.६). ग्रामपंचायतींत पेशवे देशमुख या नात्यानें भाग घेत असत व देशमुखीच्या गांवांत कोठें पान हललें तर त्याची वर्दी पेशव्यांच्या कडे जाई व तिची ते तावडतोब दाद घेत असत.

**लेखांक १** ( बाकीचे अस्सल कागद मंडळांचे दप्तरीं आहेत. सं० )

हू

बज्यानेब आमीलान हाल व इस्तकबाल प्रगणा प्रगणे मरुड-नादगाव तालुके कोट जजिरे दंडाराजपुरी बीदानद सुरुसन्न इहिदे आशर मया तेन व आलफ आं की बालाजी विश्वनाथ देसाई यानी इलतिमास लेहून पाठविले की प्रगणे मजकूरची देशमुखी आपली कदीम आसे आपले बडे मुदतलला परागदा होऊन मराठराज्यामधे गेले याकरिता आपले वतन चालत नाही तर मलीकसाहेबाचे जागा साहेब आहेत मेहेरबान होऊन वेतन दिल्हेयाने वेतनावर बेटा येऊन चाकरी करील म्हणौन इलतिमास पाठविला त्यावरून मेहरवान होऊन प्रगणेमजकूरचे वतन देशमुखी मशारुलची कदीम सबब देऊन कदीम मलकंबरी इक्कलवाजिमा खातरेस आणून पेशजी देविला होता लारी ६२।९ सवाबासष्ट लाहारी नऊ रुके तो दूर करून हाली जदीद हाकलाजिमा रयतनिसवती करार केला आसे बीत-तपसील

गला केली राजभाग
सरकारचा धारा आकार
होईल त्यापैकी हक
इनामती व देहेनगी व
कसीदी व काजी वगैरा
वतनदार वजा पडोन
बाकी खालिसा बेरीज
राहील त्यास रयेतनिसबत
धारा खडी १ येक खडी
होईल त्यास हाक
भात येकंदर कैलि
॥१

नख्तबाब मोहोतर्फा
व जराईबाब खुमावर
ऐन महसुल सदर
येक से रुपये जमाबंदी
होईल त्यास हाक सेकडा
पाच रुपये
५
वजनी जिन्नस
सरकारचा आकार होईल
त्यास पैकी हाक इनामती
व देहणगी व मसीदी
व काजी वगैरा वतनदार

नारळ व राजभाग आकारतील
त्यापैकी वजा हाक इनामती
वांदणगा व मसीदी व
काजी वगैरा (व)तनदार वजा
पडोन बाकी खालिसा वेरीज
राहील त्यास रयतनिसबतीस
राजभाग होईल त्यास दर शकडा
नारळ
१

व वजा पडोन बाकी सरकार
खालिसा बेरीज राहील
त्यास रयतेचा धारा
राजभाग खडी येक होईल
त्यास हाक वजन एक
मण प्रमाणें
८१

येकूण हालीं हाक जदीद करार केला आसे गला राजभागपैकीं हाक वजा देहनगी वगैरा वजा पडोन खालिसा राहील त्यापैकी दर खडीस येक मण व वजनी आकार होईल त्यापैकी हकइनामती वगैरा वजा पडोन रयेतेचा आकार राजभाग होईल त्यास दरखडीस वजन येक मण व नरूतबाच मोहोतर्फा व जराईबाब खुमावर ऐन महसुल शेभर रुपये जमावदी होतील त्यास सेभर रुपयास रुपये हाक ५ पाच व सुमारी नारळ राजभाग येकशे होतील त्यास नारळ सुमारी १ येक सााार पासून करार करून छ. १५ रबिलाखर सन आशरनात खुर्दखत केले आसे वतनाचे खिजमत बदल पेशजी शकराजी केशव नाईब पाठविला होता तो घाटावर गेला हाली त्याचे ऐवजी विश्वनाथभट वलद बहिरंभट मेदले पाठविले आहेत याचे हाताने वतनाची जमत घेऊन सदरहू बरहुकूम साल बे साल आयाब करून मशारूलचे नांवे खर्च लिहीत जाणे ताजे सनदेचा उजुर न करणे नकल घेऊन आसल फिराऊन देणे परवानगी हुजूर रसवानगी खुसे मा। जबानी रामाजी महादू पाकर अफराद रा। छ. २५ माहे सवाल

वि. का. राजवाडे

## ४६ भट ( पेशवे ) यांची वंशावळ

श्रीगजानन

याची वोंशावल मुलपुरुश माहादाजीपंत भट देशमुख मामले दडाराजपुरी याचे पुत्र २ याची नावें

नारो माहादेव
१
यांसी पुत्र माहादाजीपंत
यास बाबाजीपंत म्हणत

सिवाजी माहादेव
१
यासी पुत्र ३
कृापंत
१

यासी पुत्र

यांचे विठजीपंत १

१

नारोपंत

बाबाजीपंत

याचे पुत्र

१

१

याचे पुत्र
त्रिंबकपंत

यांसी माहादजीपंत
पुढे नकल १ जाहाली

१ अताजीपंत
१ नारोपंत
२

यांची नंकल जाहाली

यासी पुत्र
१ बावाजीपंत
याची नकल जाली
दुसरे पुत्र नारो
त्रिंबकपंत
१
याचे पुत्र रामराव
१
याचे पुत्र १ त्रिंबकराव

१

दुसरे पुत्र अताजीपंत
याची नकल जाली

१

तिसरे विसाजी सिवजी

यासी पुत्र ४ पौ नकल
जाहाली
१ रुद्राजीपंत
१ जानोपंत
१ विठलपंत चवथे
पुत्र माहाडांस
कारखानीसी करीत
होते याची नकल
जाली
१

याकी तिसरे पुत्र
बालाजीपंत यासी पुत्र २
वडील बाजीराव उर्फ
विसाजीपंत
१
यासी——
बालाजीपंत रघुनाथपंत

नानासाहेब दादासाहेब

१ १

यासी याचे पुत्र

१ विश्वासराव १ अमृतराव

पाणीपतास गेले घेतल

१ माधवराव १ बाजीरावसाहेब

१ नारायणराव

याचे पुत्र १ चिमाजी अपा

माधवराव

दुसरे पुत्र बालाजी विश्वनाथ

याचे चिमाजी आपा उर्फ

अंताजीपंत याचे पुत्र

सदाशिव चिमणाजी

पाणीपतास गेले

१

समान अशर मया तैन व अलफ साली इंग्रजी होऊन आमृतराव चित्रकूटास व बाजीराव व चिमाजी आपा ब्रह्मवर्तास गेले शेके १७३९ ईश्वरनाम संवत्सरे

१ सदरहू वंशावळ श्रीवर्धन येथील देशकुळकरणी कर्णिक यांजकडून मिळाली. ही शके १७३९ त म्हणजे बाजीराव रघनाथाच्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षांत तो पदभ्रष्ट जाहल्यानंतर लगे च लिहिली आहे. लिहिणारानें जुन्या टिपणांचा उपयोग केलेला आहे. आजपर्यंत बाळाजी विश्वनाथाच्या आजापर्यंतचीं नांवें आपणांस माहीत होतीं (भा. इ. सं. मं. अहवाल १८३४ पृ. २७१। २७२ ).प्रस्तुत वंशावळींत बाळाजी विश्वनाथाच्या पणजाचें नांव महादजी असें नमूद केलें आहे व आजाचें नांव सिवजी असें दिलें आहे. रा. पटवर्धन यांनीं नाशिक येथील तीर्थोपाध्यायांच्या वहींतून जे उतारे दिले आहेत त्यांत बाळाजीच्या आजाच नांव खुद्द बाळाजीच्या बंधूनें म्हणजे विठ्ठल विश्वनाथ यानें अंताजीपंत असें दिलें आहे, सिवजी असें दिलें नाहीं. पटवर्धनांच्या उताऱ्यांत बाळाजीची स्त्री राधाबाई इचे दोन लेख, एक स्वदस्तूरचा व दुसरा लिहविलेला असे , आहेत. पैकीं स्वदस्तूरच्या लेखांत बाईनें पुढील घोटाळ्याचे शब्द लिहिले आहेत "......राधाबाई भ्रतार बाळाजीपंत सासरे विसाजीपंत अजसासरे विसाजीपंत ......" इ० पैकीं सासरे विसाजी हें ठीक. बाईच्या लेखांतील चुकांवरून बाईला बिनचूक लिहिण्याचा सराव नव्हता, हें स्पष्ट दिसत आहे. त्यामुळें एकदां विसाजी लिहून पुन: विसाजीपंत कदाचीत् हातून पडलें असेल.

पण 'अज सासरे विसाजीपंत' कसे ? विठ्ठलाचे लेखावरून तर, आजेसासरे अंताजी पाहिजेत. बाईच्या परलेखित लेखांत हा घोटाळा नसून अंताजीपंताचा स्पष्ट उल्लेख आहे. प्रस्तुतच्या वंशावळींत 'सिवजीपंत' असें बाळाजीच्या आजाचें नांव असून चुलत्याचें नांव अंताजीपंत आहे. बाईच्या हातून 'सिवजी' बद्दल चुकून विसाजी पडलें असें मानिलें तरी बाकींच्या लेखांचा विरोध राहतो च.

२ दुसरा मुद्दा म्हटला म्हणजे बाळाजीच्या बंधूंचीं नांवें व त्यांचा वयोनुक्रम हा होय. बंधूंचीं नांवें १ रुद्राजी २ जानोजी ३ बाळाजी व ४ विठ्ठल हीं नाशिकच्या उताऱ्याप्रमाणें च आहेत. काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें-यादींतील ४९६ व्या लेखांत विठ्ठलाचे ऐवजीं कृष्णाजी असें नांव आहे, तें चूक आहे हें रा. पटवर्धन यांचें म्हणणें बरोबर आहे. प्रस्तुतच्या वंशावळींतील 'विठलपंत चवथे पुत्र' या व इतर उल्लेखांवरून १ रुद्राजी २ जानोजी ३ बाळाजी व ४ विठ्ठल असा या बंधूंचा वयोनुक्रम असावा. विठ्ठलाच्या लेखांत अनुक्रम आहे असें मानल्यास जानो रुद्राजीहून वडील ठरेल.

३ विठ्ठलपंत महाडास कारखानीस होता अशी नवीन माहिती या वंशावळींत दिली आहे.

४ विठ्ठलपंताचा लेख शके १६०१ तील आहे व त्यांत तो आपल्या तिन्ही बंधूंचा उल्लेख करतो. उल्लेखावरून हे सर्व बंधू शके १६०१ मध्यें हयात होते असें मानिल्यास, जानोला हबशानें गोणत्यांत घालून बुडविल्याचा प्रसंग १६०१ नंतरचा असला पाहिजे व अर्थात् च बाळाजी विश्वनाथ वरघाटीं या प्रसंगानंतर म्हणजे शके १६०१ नंतर आला असला पाहिजे. पक्षीं, जानोला बुडविण्याचा प्रसंग १६०१ च्या पूर्वी घडून आला असल्यास बाळाजी विश्वनाथ वरघाटीं १६०१ च्या पूर्वी आला असला पाहिजे.

५ काव्येतिहाससंग्रहांतील ( पत्रें-यादी ) ४९६ व्या यादींत विसाजीपंत याला मूळपुरुष म्हटलें आहे; व प्रस्तुत यादींत महादाजीपंत यास मूळ-पुरुष म्हटलें आहे. याचा अर्थ इतका च होतो कीं त्या त्या यादीकाराला ज्या कोणत्या पुरुषापासून वंशावळ माहित होती त्या पुरुषाला वंशाचा मूळपुरुष अशी संज्ञा तो तो यादीकार देतो. ह्यावरून असें समजावयाचें नाहीं कीं दंडाराजपुरची देशमुखी महादाजीनें प्रथम मिळविल्यामुळें तो च भटोपनामक देशमुख घराण्यांतील देशमुखी मिळविणारा पहिला पुरुष होता. देशमुखी त्याच्या हि पूर्वी मिळविली असण्याचा संभव आहे.

६ आजपर्यंत अनुपलब्ध अशी आणीक माहिती जी या लेखांत उपलब्ध होत्ये ती अशी कीं बाजीराव बल्लाळ व चिमाजी बल्लाळ यांचीं पाळण्यांतील

नांवें अनुक्रमें विसाजी व अंताजी होतीं. बाजीरावाच्या आजाचें नांव विसाजी होतें व चुलत आजाचें नांव प्रस्तुत वंशावळीप्रमाणें अंताजी होतें. पैकीं, आजाचें नांव बाजीरावाला दिलें व चुलत आजाचें नांव चिमाजीला दिलें, हें उघड आहे. आपल्या समाजांत आजा जीवंत असतांना, त्याचें नांव नांतवाला देत नाहींत तेव्हां, असें म्हणणें युक्त दिसतें कीं बाजीरावाच्या जन्मसमयीं त्याचा आजा विसाजी हयात नव्हता व चिमाजीच्या जन्मसमयीं त्याचा चुलत आजा हयात नव्हता.

७ शके १६०१ च्या किंचित् अगोदर किंवा किंचित् नंतर बाळाजी विश्वनाथ वरघाटीं आला. वरघाटीं येण्याच्या वेळीं त्याचें वय सुमारें पंचविशीच्या सुमाराचें असावें, असें दिसतें. म्हणजे शके १६०० त किंवा १६०२ त बाळाजी सुमारें पंचवीस वर्षांचा असावा. अर्थात्, बाळाजीचा जन्म शक १५८० च्या सुमारचा दिसतो. शक १६३६ त बाळाजी विश्वनाथाला पेशवाई मिळाली, त्या कालीं त्याचें वय, या हिशोबानें पहातां, सुमारें ५६ वर्षांचें असावें. इतरत्र असलेल्या उल्लेखां वरून शक १६३६ त पेशवाई मिळण्याच्या कालीं बाळाजी विश्वनाथाचें वय याहून निदान दहा वर्षांनीं जास्त असावें, असा स्थूळ अंदाज आहे. तो जर खरा धरला, तर बाळाजी विश्वनाथाचा जन्म शक १५७० च्या सुमारास न्यावा लागतो. प्रस्तुत यादींतील मूळपुरुष जो महादजी तो बाळाजी विश्वनाथापासून चौथा पूर्वज आहे. दरपिढीस बावीस वर्षे धरलीं, तर या महादेवाची हयात सुमारें शक १५०० त पडते. याच्या पूर्वीं सुमारें शंभर दीडशें वर्षे भटांच्या कुळांत देशमुखी जाऊन झालीं असावीं असा अंदाज आहे. त्याला कारणें येणेंप्रमाणें. शिलाहारांच्या व यादवांच्या राजवटींत देशांत व कोंकणांत एकोन एक देशमुख्या व पाटिलक्या मराठ्यां कडे असत. प्रायः ग्रामांत पाटिलकी मराठ्याची व कुळकरण ब्राह्मणाचें, आणि प्रांतांत देशमुखी मराठ्याची व देशपांडेपण म्हणजे देशकुळकरण ब्राह्मणाचें किंवा असल्यास कायस्थाचें असा प्रघात होता. दंडाराजपुरी प्रांतांत ग्रामकुळकरण व देशकुळकरण कराणिक नांवाच्या कायस्थांकडे फार पुरातन कालापासून आहे. शिलाहार व यादव यांच्या राजवटींत ज्यांना आपण सध्यां ग्रामकुळकरणी किंवा देशकुळकरणी म्हणतों त्यांना ग्रामकरणिक किंवा देशकराणीक अशी संज्ञा असे. सौलभ्यार्थ, ग्रामकरणिक किंवा देशकराणिक यांना नुसत्या करणिक या नांवानें संबोधीत. करण करणारे जे ते करणिक. राज्यांतील सर्व करणिकांचा जो मुख्याधिकारी त्याला श्रीकरणाधिप म्हणत. प्रख्यात हेमाडपंत उर्फ हेमाद्रिपंडित यादवांचा श्रीकरणाधिप कांहीं काल होता, हें प्रसिद्ध आहे. श्रीकरणाधिप म्हणजे देशांतील जमावंदीचा मुख्याधिकारी. मुसुलमानी अंमलांत ह्या श्रीकरणाधिपाला फडणिस ही संज्ञा असे. दंडाराजपुरीप्रांतांत शिलाहार

व यादव यांच्या राजवटींत जसे कायस्थ कराणिक देशपांडे होते, तसा देशमुख ऊर्फ देसाई कोणीतरी मराठा होता, हें निश्चित आहे. शिलाहार व यादव यांच्या राजवटींत गांवांत पाटील व देशांत देशमुख ह्यांच्या हातीं लष्करी व फौजदारी अधिकार असून, शत्रूंपासून ग्रामाचें व देशाचें संरक्षण करण्याची जबाबदारी पाटील व देशमुख यांजवर धर्मानें पडे. राजाला लढाईच्या प्रसंगीं अमुक सैनिक पाटलानें व देशमुखानें बिनतक्रार पुरविले पाहिजेत असे तह असत; व हे तह पेशवाईच्या अंतापर्यंत ह्या देशांत प्रचलित होते. यादवांचें साम्राज्य जाऊन व कोंकणांतील शिलाहारसंस्थानिकांचा अंमल उठून, कोंकणांत जेव्हां मुसुलमानी सत्ता प्रचलित झाली, तेव्हां लष्करी पेशाचे जे मराठे पाटील व विशेषतः मराठे देशमुख ते लढाईच्या धालमेलींत नष्ट, स्थानभ्रष्ट व परागंदा झाले. त्यांच्या देशमुख्या रिकाम्या पडल्या व त्या कालान्तरानें ब्राह्मणादिकांच्या हातांत मुसुलमानी अंमलांत गेल्या. अशा तऱ्हेनें दंडाराजपुरी प्रांतांतील व कोंकणांतील इतर प्रांतांतील देशमुख्या ब्राह्मणादिकांच्या हातांत गेलेल्या आहेत. पैकीं दंडाराजपुरी येथील देशमुखी भटोपनामक ब्राह्मण घराण्यांत मुसुलमान अंमलाच्या पहिल्या हप्त्यांत आलेली आहे. दक्षिणेंत यादवांचें साम्राज्य शक १२३९ त गेलें आणि कोंकणांत शिलाहारादि लहान संस्थानिकांचा अंमल सुमारें शक १३५० च्या सुमारास नष्ट होऊन, सर्वत्र मुसुलमानी अंमल ज्यारी झाला. अर्थात, शक १३५० किंवा शक १४०० च्या सुमारास भटांच्या घराण्यांत देशमुखी आलेली आहे. म्हणजे शक १५०० त असणारा बाळाजी विश्वनाथा पासूनचा चौथा पुरुष जो महादजी त्याच्या पूर्वीं सुमारें शंभर वर्षें म्हणजे शक १४०० पासून भटांच्या घराण्यांत दंडाराजपुरप्रांताची देशमुखी आली. ती बाजीराव रघुनाथाच्या पदभ्रंशापर्यंत म्हणजे शक १७३९ पर्यंत सुमारें साडे चारशें वर्षें पर्यंत चालून, नंतर महादजीचा दुसरा पुत्र जो नारो महादेव त्याच्या शाखेकडे सध्यां नाममात्रानें चालू आहे. हा नारो महादेवाचा वंश सध्यां कोंकणांत तळें येथें आहे.

८ शक १४०० च्या सुमारास दंडाराजपुरीची देशमुखी जशी भटानीं संपादिली, तशी च रेवदंड्याची देशमुखी हि एका चित्पावन कुळानें त्या च कालाच्या सुमारास मिळविलेली आहे. तें कुळ रेवदंड्यास ठब्बू या आडनांवानें प्रथित आहे.

वि. का राजवाडे

द. वा पोतदार

# ४७ शिवाजीच्या एका नवीन हकीकती बखरीचीं तीन पानें

हीं बखरीचीं तीन पानें कऱ्हाड येथें सांपडलीं. ह्यांत कांहीं कलमां खालीं हकीकत असा शब्द लिहून कलमाची समाप्ती केली आहे. ह्या वरून ह्या बखरीला हकीकती बखर म्हटलें असतां वावगें होणार नाहीं असें वाटतें. प्रस्तुतच्या तीन पानांत ५, ३४ व ३५ असे हकीकतींचे आंकडे नमूद आहेत. एकंदर सर्व हकीकती संपूर्ण बखरींत किती होत्या तें अर्थात् ह्या तीन पानां वरून सांगतां येणार नाहीं. ज्या बखरींत शहाण्णव कलमें आहेत अशी बखर आपणांस छापलेली उपलब्ध आहे व तिला नांव हि पुरातन लेखकांनीं शहाण्णव कलमी बखर असें दिलें आहे. सबब, अनुमान होतें कीं प्रस्तुत बखरीला हकीकती बखर अशा सारखें कांहीं नांव मूळचें च असावें. प्रस्तुत हककती बखरीचीं जीं तीन पानें मिळालीं आहेत त्यांत दोन चार बाबी नवीन दिल्या आहेत त्या जिज्ञासु इतर बखरींतील हकीकतींशीं ताडून पहातील च. प्रस्तुत तीन पानें मंडळाच्या संग्रहास ठेविलीं आहेत.

वि. का. राजवाडे

## पान चवथें

चे बरोबरीचे नव्हते असे असता ते कचेर × + + + होऊन गेले तुम्ही त्यास उत्तर दिल्हे नाही या प्रकारे बाइकोने निशध केला तेव्हां जाधवराव यानी उत्तर केले जे आम्ही स्वाभाविक बोलिलो पानसोबरे कांहीं वाटिले नाही त्यास चाकरी वरुन दूर करु ऐसे बाइकोचे समाधान केले दुसरे दिवशी मालोजी व विठोजी नित्याप्रमाणे भोजनास बोलाविले त्याणी ओढन आणिले जे तुम्ही सोइरे जाह + + + + + + + चे समई भोजनास येऊ ऐसे उत्तर दिल्हे नंतर जाधवराव भो ( जन ) करून कचेरिस येऊन बसले कारकून बोलावून मालोजीस विठोजी भोसले याचा हिशेब करुन उभयतास चाकरी वरून दूर केले आणि त्यास सांगितले की तुम्ही आम्ही सोइरे नाहीं पान सोबरे वाटिले नाहीं उगी च गला पडो नये याउपरी तुम्ही + + + + ले सुध्धां येथून + + + + व्हा भाऊ उभयेता बाहेर लाविलियावरी मागती वेरुलास आले पूर्ववत् प्रमाणे शेते करून राहिले उभयेताचा नेम सिवपूजा येथासांग व येकादसी सोम- वार-प्रदोष ( होता ) व ब्राह्मणाचे चेरणतीर्थ नित्यशाहा घेतल्या + + अन्न

भा. ६-१३

द्यावयाचे नाही ऐसे चालत आसता कांहीं दिवसानीं मा +++ रात्रौ चांदणे पडिले त्यात +++ माल्यावर राखणेस बसले आहेत तेथे शेतात माल्या नजीक येक वारूल होते त्यातून स्त्रीचा हात चुड्या सईत अकस्मात निघाला तो विजेसारखा चमकला हे मालोजीचे दृष्टीस पडिले तेव्हां भयाभीत होऊन विठोजी निद्रिस्त होता त्यास उठवून ज्याग्रत होता त्यास हे वर्तमान सांगितले त्याणी उत्तरे केले की तुम्ही झोपेत आसाल ही गोस्ट लटकी तुम्हा निद्रा करणे मी जागत बसतो ऐसे म्हणता मालोजीनी निद्रा केली विठोजी जागत बसले तो मालोजीस मागती स्वप्न पडिले की वारुलातून श्री भवानिचे रुपे निघाली शुभ्र पातळ कपाली कुंकू आंगावर दिव्य आलंकार ऐसी उभी राहोन मालोजीस हातानें जागे करुन सांगितले कीं मी तुजला प्रसन्न जाहाले या वारूलात सर्प आहे तो माझें स्वरुप आहे त्यास तू नमस्कार ++++ द्रव्य आहे ते घेणे तुम्हास सर्प उपद्रव करणार नाही तो तेथून जाईल त्याचे वाटेस तुम्ही न जाणे तुम्हास सत्तावीस पिढ्या राज्य दिल्हे प्रसन्न जाहाले जे चित्ती धराल ते होईल माझे + + + + तेव्हां येईन ही हाकीकत ॥ ५ ॥

++++ स होऊन विठोजीस श्रुत केले नंतर ++++ वारूल खाणून द्रव्य का ++++ ड्यावर घलून पाहात होते ते + + + त नेहून पुरून ठेविले या उपरी शेताचा ++ वगैरे विल्हेस लाऊन बाईको व मुले तेथें ठेऊन श्रीगोंदे येथें आले तेथें पुरातन सावकार शेषोबा नाईक शड लक्षाधिपती होते त्याचा पहिला स्नेह होता त्याची भेट घेऊन येकांतीं सर्व वर्तमान इस्तकबील तागाईत सांगून + + + उभयेतास वचन मागितले + + + राज्यपद आले तर आम्हास काय द्याल तेव्हां उभयेतानी पो(त)दारी वतन करार दिल्हे जोवर आमचे राज्य तो परयेंत पोतदारी तुम्हास दिल्ही आसी शेफत करून सनद करून दिल्ही त्याजवर नाईक याणी उभयेतास अभ्यंग स्नान घालून उत्तम आलंकार वस्त्रे देऊन गाडीवर बसवून का + + + तेथे नेहून हाजार घोडी उत्तम + +

पान चवदावें

१

++ तली जे उभयेता संकेता प्रमाणें यावयाची असल्यास यावे भेट होईल आमचे येणे घडत नाहीं हे खानानी ऐकून पुत्र फाजीलखान यास फौजेत ठेवून आपण पालखीत बसले बत्तीस भोई पालखीस उचलावयासी लागत होते शेरीर मोठे प्रचंड होते समागमे नपरे पंचवीस व कारकून कृष्णाजी भास्कर दिवाण व पंताजी गोपीनाथ राज्या + + + डोंगर चढोन सदरे संनिध आले राज्यानीं सदरेच्या मागे गर्ता खाणोनी त्यामध्ये धारकरी च्यालीस असामी संभाजी चिन

कावजी व हिरोजी करजंद सोनमले व जिरभाल वगैरे यासी ठेविले + + +
त ही हाकीकत ॥ ३३ ॥

राजे याणी अंगांत चिलखत व बखतर डोईस टोप ढाली बिचवा + + +
नी त वज्रटाकी + + अैसा मजबूद + + + म करून किल्याची
खबरदारीने कुल त + +

( मागची बाजू )

पया केल्या भोई व खिजमतगार + + + ले ते समई पेठेत
पंताजी गोपीनाथ हेजीब सापडले त्यास वार जाहाले लोकानी ओलखले नाहीं
हे राजे याणी पाहाता च पंताजी पंतास रक्षण कृष्णाजी भास्कर यासी + + +
रू दिले नाहीं मार्ग दिल्हा लस्करात + + + + सी जव घेऊन
गेले हाकीकत ॥ ३४ ॥

पालखी समवेत मुडदा खानाचा गडावर आणिला तुळजापुरास देवीस उप-
द्रव केला म्हणोन गाडीत मेख लोखंडाची तापऊन टाकिली सीर दरवाज्यावर
टांगून ठेविले तोफांची सरबत्ती केली नगारखाना सुरू जाहाला याप्रमाणें इशारती
होता च मावले किल्यावर होते त्याणी घाट धरून खानाची फौज

पान तेहतिसावें

१

जाहला तेव्हा तिजला समागमे घेतली किले मालवण सिंधुदुर्ग पावेतो होती
नंतर माघारी रायगडास रवाना केला त्या वेलेस गर्भ राहिला पुढें पुत्र जाहला
त्याचे नाव राजाराम ठेविले सिंधुदुर्ग येथें तमाम जहाजे अरमार अणुन मावले
जमाव सुधा जात बसोन पेठ बेदकर प्रांत + + + + समुद्रतीर + + +
याचे बंदर मोठे होते ते मारिले माल बहुत सांपडला सावकार धरुन द्रव्य घेऊन
रायगडास आले सिवाजी नाईक बिदनूरकर यासी दहशेत पड + + + + +
कडे पाठवून सर्वास तीन लाख होन + + + + + याप्रमाणें तह
केला उमा पंडित + + + + पाठविले त्या दिवसा पासून श्रेहे जाहाला
कर्नाटक प्रांती शहाजी राजे होते त्याचे चाकर मनसबदार पांच हजार
स्वारानिसी होते त्यास सिवाजी राजे याणी अबदूलखान मारिला तमाम गड
घेतले राज्य बलकट राखले काही इलाज चालत नाही + + + +
चा बाप शाहाजी याचे परिपत्य करावे + + + + + बाजी घोरपडे
यासी येकांतीं पातशाहानी कपट सांगोन पाठविले त्याकालां शाहाजी राजे किले
त्रीवनंदी चंद्रावर या स्थली सडे फौजनिसी होते तेथें घोरपडे याणी मेजवानीस

बोलाऊन विश्वास दाखवून कैद केले लस्कर लुटून मालमत्ता जप्त केली आणि वर्तमान पादशाहास सत्वर सांगोन पाठविले पातशाहा खूश जाहले जिलीबदार ये + + + लाऊन परवाना घोरपडे यासी लेहून पाठविला जे + + + ॠ गार खणून शाहाजीस गारेत घालून चोप बसवून जमिनीत पुरून टाकणे असे पत्र घेऊन जिलीबदार गेला हें वर्तमान रणदुल्लाखान वजीर वीस हजार फौजेचा धनी मजमदार थोर याचा व शाहाजी राजे याचा भाऊपणा त्यास हें वर्तमान समजले तेव्हां त्याणी काळी लुंगी लावून दिवटी हाती घेऊन पातशाहाचे मजुऱ्या + + + बहुत घाबरे + + + पातशाईस धका बसेल असा + + मनांत आणून रणदुलाखान यासी हाती धरून बसविले तेव्हां खानानें मुद्दा जाहीर केला जे सिवाजीचे रागे शाहाजीस कैद करून मारावे हे युक्त + + + बाप पावे + + + करी सो बेटा पावे असे + + + ले आहे त्यास साहेबी माफी केली पाहिजे + + + + + पातशाहाने ऐकून खूश होऊन बोलिले + + + + हुजुर घेऊन येऊन जामीन तुम्ही होणे + + + + खानानी कबूल केले तेव्हां पातशाहानी शाहाजीची परवाना वस्तभाव हाती घोड दौलत काय असेल ती परत देऊन सन्माने हुजुर घेऊन येणे या प्रमाणें घोरपडे यासी लेहून दिल्हे खानानी आपला जिलीबदार तयार करून ताकीद केली की पादशाचा जिलीबदार पेशजी गेला आहे तो पोहचल्याचे आगोदर जलदू जाऊन शाहाजी राजे यासी सोडऊन हुजूर घेऊन येणे म्हणजे तुजला बक्षीस मणभर सोने देऊ असे सांगोन जलदीनें रवाना केला तिकडे प्रथम परवाना पातशाई घोरपडे यासी + + + +

## ४८ पटवर्धन सरदारां वरील एक प्रशस्ति

रा. जंगी व रा. नवांगुळ या दोन गृहस्थांनीं कऱ्हाड येथें दोन तीन जुनीं दफ्तरें चाळलीं. त्यांत एक फाटकें बाड सांपडलें. त्याच्या समार्रास खालील श्लोक लिहिले आहेत. हे श्लोक पटवर्धन सरदारां वरील एक कमजास्त विस्तृत अशा प्रशस्तींतील असावे, असा तर्क आहे. श्लोक एकंदर चार आहेत व त्यांत गोविंद हरि पटवर्धन व गोपाळराव पटवर्धन या दोन पटवर्धन सरदारां संबंधानें कवित्व आहे. बाकी परशुरमभाऊ आदिकरून इतर सरदारांवर श्लोक ह्या प्रशस्तींत नाहींत.

**श्लोक**

गोविंदपंत हरिभक्त स्वये वीराजें ।
धीरत्वबुद्धिपुरुषार्थ तयास साजे ॥

श्रीपांडुरंगी दृढभाव असे जयाचा ।
सर्वा भुतीं लय आसे आपुले दयेचा ॥ १
गोपाळराव पटवर्धन शूर मोठा ।
राज्यांत थोर सरदार वदे सुघंटा ॥
युद्धे बहुत करिता श्रम फार जालें :
नाना-मुखी वचनीं अमृत गौरविलें ॥ २ ॥ छ
गोविंद हरी हा पटवर्धनाचे :
वंसी असे ईश्वरप्रतिमाचे ॥
( पाठभेदः दीपक सत्या वाचे ) ॥
ज्या त्या मिसे ब्राह्मण पाळितो हों :
सर्वा भुति त्या समता आसे हो ॥ १ ॥ छ छ छ
शुरा माजि गोपाळरावा समान
जगी अन नाना करि हें प्रमाण ॥
तया लागि अणुनि सन्मान द्या जी
कडिं चौकडा पालखि पांच वाजि ॥ १ ॥

हे श्लोक ऱ्हस्वदीर्घाकडे लक्ष न देतां नकलकारानें लिहिले आहेत. अर्थात्, ऱ्हस्वदीर्घ नीट करून वाचले असतां, कानाला गोड लागतील हें उघड आहे. गोविंदराव पांडुरंगभक्त होता, हें पहिल्या श्लोकांत सांगितलें आहे. गोपाळराव पटवर्धनाला नानासाहेब पेशव्यांनीं अमृत वचनांनीं गौरविलें असें दुसरा श्लोक म्हणतो. गोविंद हरि ब्राह्मणांची प्रतिपालना नाना मिषांनीं करितो, अशी प्रशस्ती तिसऱ्या श्लोकांत केली आहे. आणि चौथ्या श्लोकांत शूर गोपाळरावास कडी, चौकडा, पालखी व पांच घोडे द्या अशी नानासाहेब पेशव्या पाशीं कवि विनंति करितो. गोपाळराव व गोविंदराव हे पटवर्धन सरदार नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत होते. त्यांचा उल्लेख वर्तमानकालानें कवि करतो. त्या अर्थी हे शूर सरदार व नानासाहेब पेशवे हयात असतांना प्रशस्तिकार हि हयात होता असें दिसतें. समकालीन शूरांचा समकालीनें कवीनें हा स्तव केलेला आहे. या वरून उघड होत आहे कीं हे दोघे हि सरदार स्वकालीं स्वकालीन समाजास बहुमान्य झाले होते. कवीनें आपलें नांव बहुतेक कवींच्या परिपाटी प्रमाणें ज्या शेवटच्या श्लोकांत गोवले ते श्लोक नकलकारानें उतरले नाहींत; त्या वरून असें म्हणावें लागतें कीं प्रशस्तिपर श्लोक चारांहून जास्त असावे. श्लोकांचें बाड मंडळाचे संग्रहास ठेविलें आहे. बाडाच्या शेवटच्या पानाचा कोंपरा तुटला होता, तो मीं नकल केल्या वर कोठें गहाळ झाला, तें समजत नाहीं.

वि. का. राजवाडे

# ४९ धनगराची ओंवी ६ वी

सुंबराण मांडल । माळावेल्या धन्याच । सदरच्या स्वामीच । धरतरी बा मातच । मेघराया पित्याच । ह सुंबराण मांडल । कैलासाच्या सांबाच । सुंबराण मांडल । इटल बा ब्रमल । बोलु ना लागल । सोमा मालदारालागा । मालदाराला बोलल । घराच्या बा गरतिला । गरतिला बा सांगाव । न्हान सरच्या[1] तयार । तयारीत असाव । भोंबीच्यां[2] पुनवला । जतरा बा भरवायची । सोमा माझा मालदार । घराच्या बा घरतीला । बोलु तव्हा लागला । अनसरच्या तय्यार । तय्यारी बा करावी । भोंबीच्या बा पुनवला । जतरा बा भरवायची । फरांड्याचा पवा गा । पवा मग यत्राचा । मणग्या माणिगिरायाच[3] । भंडाऱ्याच्या गोण्या गा । गोण्या मग ईयाच्या । घराची बा घरत । घरत बा बोलली । जळो जळो जतरा । पाण्या काइली भरताना । डोईला टकल पडल । आना राशी पाडताना । हाता फोड येत्याल । जळो जळो जतरा । पदुगा माजा गवळण । गवळण बा बोलली । सोमा माझा मालदार । माघारा बा गेलाया । इटल ब्रमल देवगा । देव बोलु लागल । कसकाय सोमार । तैयारी बा करतो । कर्तो म्हणून बोलला । इटल ब्रमल देवाला । अंतरि बा कळाल । बोलु तवा लागल । सोमा माज्यार मालदारा । आना मिठाला लसनास । मग लबाड बोललास । मग इटल ब्रमल । मग बोलु बा लागला । सराप देऊ बा लागला । पदु या बा गवळण । गवळणीला सराप । खुळीगा येडी होशील । धोंड दगड मारशील । गावातल्या पोराला । सुंबराण मांडल ॥ १ ॥ ( धृ० ) ॥ तवाच्या बा येळला । गावातली पोरगा । शेणमारा करत्याल । पदुगा माजी गवळण । खुळीगा येडी झालीया । धोंड दगड मारित । गावातली पोरगा । शेणमारा करत्यात । गावाच्या बा वरत । वरत बा जाशील । लुगड राहिली कारीला । चोळी राहिली बोरीला । झिंझ्या टोप बंचाला । धंड पडल माळाला । पदु मग गवळण । गवळणीच्या माह्यारच । गुराखी बा पोरगा । पोर तवा आल्यात । बंबाच्या बा सावलीला । पोर खेळु लागलीगा । आवचित नदर गेलीया । पोर बोलु लागली । पदु मग गवळण । बंबाच्या बा बेटाला । बेटाला बा आडाकली । पोर पळत गेल्याति । आइबापाला सांगीत । तुझी गा पदु गवळण । बंबाच्या बा बेटालार । बेटाला बा आडाकलीर । तिच आइबापकीगा । धावत बा पळत गा । रडत बा आकसत । बगायाला आल्यात । सुंबराण मांडल ॥ २ ॥( धृ० ) ॥ तिच्या मग धंडावर । पाचा फड्या भुजंग । भुजंग डोलु लागला । औराचौरा बिग्यावर । माणूस उभ राहून । दिना मग झालाया ।

---

१ शिदोरी २ आश्विनशुा १५ ३ मणग्या माणिंगराय नांवाचा देव त्याची जत्रा भरण्यासंबंधी ही ओंवी आहे.

माणस बोलु लागली । देवाच्या बा बायकोला । मराण बा नाहीं गा । तुझी नव्हे पदु गा । चल आपल्या वाटन । माघारी बा गेल्यात । सुंबराण मांडल । तवाच्या बा येळला । इटल बा ब्रमल । बोलु तवा लागल । सोमा माज्या मालदारा । भागु मग लेकीला । आणायला बा जावाव । नंदी त्यान घेतलार । *बुति भाकरी घेतली । निघून बा चालला । भागु लेकीच्या वाड्याला । वाड्याला बा जाऊन । भागु लेकीच्या सासऱ्याला । सासऱ्याला बोलला । भागु लेकीला न्यायाला । न्यायेला बा आलोया । सासरा बा बोलला । न्हाइ लावून देत गा । सोमा माजा मालदार । माघारा बा आलाया । इटल बा ब्रमल । बोलु तवां लागल । नंदी रिकामा आंडला । भागु लेकीचा सासरा । लाऊन द्यायची नाहीं गा । म्हणून बा बोलला । इटल ब्रमल द्यावगा । बोलु तवा लागल । भागु लेकी सासऱ्याच । मड येशीच्या तोंडाला । तोंडा आडव येइलर । भागु लेकीला आणावी । सोमा गेलाया माघार । मग तिच्या बा सासऱ्याच । मड आडव आलयार । सोमा निघून गेलायार । भागु लेकीच्या वाड्यालार । तिच्या सासुला बोललार । भागु लेकीला न्याय-लार । तिची सासु बोलली । नाहीं लावून दियाची । नंदी माग फिरला । ह, सुंब-राण मांडल ० ॥ ३ ॥ सोमा माजा मालदार । नंदी घेऊन माघार । माघार बा आलाया । सोमा नंदी रिकामा । रिकामा कां आलार । तिची सासु बोलली—

निरूपण—तिची सासु बोलली कीं कारभारी मेला तेव्हां लावून द्यायची सोय नाहीं. हें एकून सासूचें हि मढें आडवें येईल (म्हणजे ती मरेल) असें देवानें सांगितलें तेव्हां सोमा पुन्हा भागूच्या वाड्याला गेला. सासु मेली पण दीर लावून देईना तेव्हां त्याचें हि मढें आडवें येईल म्हणून देवानें सांगितलें. पुन्हा सोमा भागूच्या वाड्याकडे गेला. तेव्हां दिराचें हि मढें आडवें आलें; नंतर तिच्या नवऱ्यानें तिला सोमाबरोबर पाठविली. त्यानें नंदीवर बसवून तिला नगराबाहेर आणली; वाटेंत नदी लागली तेथें तान-लाडु भुक-लाडु खाऊन पाणी प्याली व मग सोमाला 'माझी पदु कशी आहे' (ही तिची आइ व इटलब्रमलची बायको) म्हणून तिनें प्रश्न केला. तेव्हां सोमानें कांहीं तरी उडवाउडवीचें उत्तर देऊन वेळ मारून नेली. पण आपल्या माहेरच्या गांवाच्या शिवेनजिक येतां च तिला पदुच्या दुर्दशेची हकीकत पुढील प्रमाणें समजली:—

ह, सुंबराण मांडल । तवाच्या बा येळला । भागु मग लेकंगा । गावाच्या बा बाहेर । गावाच्या बा जवळ । जवळ बा गेलीया । तिच्या मग माह्यारच । माणस बा

---

* कुरवाडी लोकांत व धनगर वगैरे इतर जातींत हि पाहुण्याच्या अगर आप्ताच्या घरीं जाणें झाल्यास बरोबर 'बुति' म्हणजे भाकरी अगर रोटया नेऊन पाहुण्याच्या घरीं देण्याची व त्या पाहुण्यानें शेजाऱ्यापाजाऱ्यांना ती वाटण्याची चाल आहे. त्यास अनुसरुन हा उल्लेख आहे.

आंढाळल । तिला मग कळाल । तुज्या मग पदुच । येवस्था बा झालीया । कशां-लाग जातीस । भागु मग त्या लेकीन । नंदीवैन खालीगा । उडी वैन टाकली । रड तिन मांडल । आकरूस करीत । सोमा माजा मालदार । आइ बाइ करितो । बाई बाई करितो । बाइ उठना झालीया । सोमा निघून गेलाया । वजिरा निघून गेलाया । गेलाया खडक्या माळाला । वजिरा देव ब्रमल । बोलला वजिरा । नंदी रिकामा आणलास वजिरा । तुजी लेक बा हेकाड वजिरा । तुज्या लेकीला कळाल वजिरा । रडत या ककत बसली । ईना बा झालिया वजिरा । सुंबराण मांडल (धृ०) ॥ ४ ॥ देव इटल ब्रमल । आणायला गेल्यातर । लेक आणायाला गेल्यात । उठ उठ ग म्हणाल । बाई उठना झालीया । देव ह्यो इटल ब्रमल । लेक पोटिशी धरली । मग रडु बा लागली । रडु बा लागली । × × × लेकीला बा घेऊन । मग घेऊन आल्यात । मग ह्यो लेकीला बोलला । लेकीलार बोलला । मग सात बा रोज गा । मग आरवाव मिरवाव । मग ह्या उभ्या बा जत्रात । मग जिवाला वाटल । मग वाटल एवढ । एवढ तुम्ही बा खावार । उजव्या अंगचा मान गा । मान तुम्हीं बा घेवावा । यग ह्यो फराडयाचा पवा । पवा आलाया शिवला । पवा गेलाया माघारी । पवा निघाला माघारी । माळिंगराया मागी राह्याचे । सिवपोतोर यार गा । देव ह्यो माघारा फिरला । माझ इटल ब्रमल । गेल धावत पळत । पवा आडवून आंडला । माळी गृह्याला आंडला । सात रोज गा जतरा । जतरा मग बा भरली । भागु लेकला बोलला । मग आरवाव मिरवाव । मग काय बा खावाव । ह, सुंबराण मांडल ० ॥ ५ ॥ ( धृ० ) ॥

वा. दा. मुंडले

## ५० जुनीं मराठी गीतें

( हप्ता ३ रा )

### मल्हारीचं आणखी एक गाणें

तुजी झकडी । माजी झकडी । पाची फुलारी । मजवर झकडी घालग तू ॥ धृ० ॥ माझा मल्हारि कुणिकड गेला सइ माजा मार्तंड कुणिकड गेला । आंब्याचे आंबे तोड ग तू । सइची ओटी भरग तू ॥ माझा मल्हारि कुणिकड गेला । माजा मार्तंड कुणिकड गेला । रथाला जुपल चार वारु । मलारि नवरा झाला स्वारु । रथ चालला गडगडाजी ॥ १ ॥

---

१ समुदाय, लोकसमूह

## संकीर्ण गीतें

(सांगणार स्त्री–हालीम)

पावणा आला म्हणु, पाठ टाकला जांवइळा। ताइता माज्या बंदुराया घस केळीच्या कंबइळा ॥ १ ॥ हावस भारी मोटी कड मोडुनि करदोड्याची। जडिता बंदु माज्या गोरी कंबर सरदाराची ॥ २ ॥ माज्या दारावैन कोण गेलाया गलो-लीचा। हौशा माजा बंदु पेट शराच्या तालुक्याचा ॥ ३ ॥ वैराळे सादीवितु परसु-दारिच्या पायइरी। माजी तु बयाबाई हाक मारिति दुयिरी॥ ४ ॥ थोरल माज घरू येया जायाला एक दारू। पोथी वाचितु माजा दिरू ॥ ५ ॥

## पंढरपुरासंबंधीं गीतें

(सांगणार स्त्री–वालु)

कंतासंगट पंढयिरी लेकासंगट आळईदि। हरिपाटाचा पवाइडा वाची पुण्या-च्या पाणइंदी ॥ १ ॥ आळंदि गावीचा मंडइपु कुणी शिण्यान शिविइला। घ्यानु तुकोबा देवायाचा वर अबंग लिविइला ॥ २ ॥ रुसली रुकमिणु जाऊन बसली वाळवटी। पिरतीचा पांडुरंग तिच्या धरितो मनकटी। तिची तुटली चिचपटी। मोति झाल्याति वाळवटी ॥ ३ ॥ इटल हेबैं देव त्यो का आडविला परसदारी। सोळा ससरु माज्या नारी नाव घेऊ मी कुठवरी ॥ ४ ॥ इटल देव म्हणी सोड रकमिणी माजी बंडी। घ्यानु तुकोबा देवा याची बाकीरिवु आली दिंडी ॥ ५ ॥ पंढरिची हवा काय सांगून येडियाला। चंद्रभाग टाकुइनी करी आंगुळ वाडि-याला ॥६॥ आइबाप असताना कोण पंडरी गेल येड। येथं पायाच दिल भाड* ॥७॥ पंडरपुरामंदि ह्युबे राहिलो धोंड्यावरी। गेली अवचित नदाइरू रकमिणीच्या गोंड्यावरी ॥ ८ ॥ पंडरपुरामंदि कोण सोन्याच्या जोडव्याची। राणी इटलु बडव्याची ॥९ ॥ भरली चंद्रभागा पाणी लागल हावेलीला। इटल हेबी देव रताच्या सावलीला ॥ १० ॥ भरली चंद्रभागा पाणी लागल तटाइला। इटल हेबी देव उभा तुळसीच्या बेटाइला ॥ ११ ॥ पंडरिला जातो आडवा लागइला हुंबईरु। देवा माज्या इटलाच्या टाळ इण्याला बंगइरु ॥ १२ ॥पंडरिला जातो आडवी लागली टाकईळी। देवा माज्या इटलाच्या टाळ इण्याला सासइळी ॥ १३ ॥ मायबापान मला दिली साधु संताचा शेजाइरु। टाळ इण्याइचा येतो गजरु कानावरू ॥ १४ ॥ आऊक

---

१ कमळ २ कासार ३ ओरडतो ४ दुहेरी–दुसऱ्यांदा ५ नवरा–नवऱ्या-बरोबर ६ पार्णद=चिबडाच्या रानातून गेलेली वाट ७ ? ८ वाकिरी गावात *आइबापाच्या सेवेपेक्षां पंढरी अधिक नाहीं असा भावार्थ. पुंडलिकाच्या कथेचा इतिहास या ओंवीच्या मुळाशीं आहे. ९ उंबराचें झाड १० टाकळी गांव ११ आयुष्य

मागिती माज्या साधुसंताईला । देवा माज्या का इटलाला टाळातल्या या भजन्याला ॥ १५ ॥ चंद्रभागच एवढ पाणी सोनियाच्या हांडियातु । घ्यानोबा तुकाराम साधु तान्याला दिडिइतु ॥ १६ ॥

साकरच लाडु सोन्याच्या परातितु । घ्यानुबा तुकाराम साधु भुक्याला दिंडियितु ॥ १७ ॥ पंडरीला जातो संग न्हेवावी आइइला ! गोपाळपुरावरी चारा घालावा गइइला ॥ १८ ॥ भरली भिवराबाई येवडी केरावीका[13] तुन्यान । इटल देवाजीन केली आंगुळ चातुरान ॥ १९ ॥ पंडरीला जातो म्हणती गलीच्या बाइका । सुमराण एवढ सांगा इटवइल्या नायिका ॥ २० ॥ पंडरीचा इटु नाहीं कुणाच्या देवाइरी । तेच्या भेटीपाई सारी लुटिली जवाईरी[14] ॥ २१ ॥ पंडरीला जातो माज्या वट्यात हाइत पेरू । एकादशीच माज दिरु ॥ २२ ॥ ( दुसरापाठ ) इटल हेची देऊ एकादशीचा निराकारू ॥ पंडरिला जातो माज्या वट्यांत दुधपेड । घ्यानुबा तुकारामु एकादशीच गेल पुढ ॥२३ ॥ पंडरिला जातु कर्यांस माजति मोकइळ । साधुच्या संगतान—— ॥२४ ॥

इटल देव म्हणी काग रकमिणी रागामंदि । जनी तुळशीच्या बागमंदि ॥२५ ॥ पंडरपुरामंदि कशाची चोरी झाली । देवा इटलाचा शेला जनीच्या उशाखालीं ॥ २६ ॥ भरली चंद्रभागा धोंडा बुडला लहान थोरु । देवा इटलाचा शेला जनी धुतिया पायावरु ॥ २७ ॥ रकमिणी म्हणिइति इटु जनीच कोण मात । वनवासी ते पाखुइरु राति वस्तीला आल होत ॥ २८ ॥ रुसली रकमिणु गेली मंगळुयेडियाला । पिरतीचा पांडुरंग जिन घालितु घोडियाला ॥ २९ ॥ इटु इटु म्हणु हाक मारिती राऊळातु । इटु जनीच्या देवळातु ॥ ३० ॥*

## कोल्हापूरसंबंधीं गाणें

कोलापूर शारु हाइ कागल सखलातु[16] । चिमाजी महाराजाची झाड सुरूची गेली नीटु ॥ १ ॥ कोलापूर शारू जसा आंगटीवेला सडा । चावड्याच्या माळा चिमाजी महाराजान नवा बांधिला राजवाडा ॥ २ ॥ राजवाड्यापुढ कोंजी[17] आलिग्या गलासाला । माज्या बंदूजीला ह्याळी रोसन्ंथा[18] नाइकाला ॥ ३ ॥ कोलापूर शारू

---

१३ धो, धो, गर्जना करते. 'केरावणें' हें ह्या क्रियापदाचें धातुसाधित नाम १४ जवाहिर १५ केस * २५ – ३० क्रमांकांचीं गीतें स्त्रीजनांचा स्वाभाविक व दुस्तर असा स्वभाव व्यक्त करितात. देवाचीं स्त्री व भक्तिणि यांजवर हि त्यानीं ह्या स्वभावाचा आरोप करण्याचें सोडलेलें नाहीं. यावरुन ज्याच्या जशा भावना तसे च त्याचे देव बनतात हें च खरें ठरतें. १६ सखलप्रदेशांत १७ काजळी १८ रोषनाई करणारा

तिथ पैशाची वांगी च्यारू। तेला मसाला हिरवा गारू बंदु जेवणार शिलेदारू ॥ ४ ॥ राजाच राज गेल ताराबाईच्या फितेरान[१९]। साठ शंभर हेवी घोडा चंद्रभागच्या उतारान ॥ ५ ॥ तोपमंदि तोपु तोपु आँनंदी खुळकुळ्याची। नगरी शिवाजी महाराजाची ॥ ६ ॥ सांगुनि धाडियेती कोलापुरीच्या आताराला। माज्या बंधुजिला सुरम[२१] लियाच चतुराला ॥ ७ ॥ काशी म्हणु काशी आलिया रकाळ्याशी। दिवस उगवला बाचु जमाली[२२]पाशी ॥ ८ ॥ कोलापूर शार दुइरस्त्यान पानमळ। कोलापुराची आंबाबाई पूजा घेतिया तिन येळ ॥ ९ ॥ कोलापूर शार भोवत-भोवतन कंचंइळ[२३]। आंबाबाईच्या देवळाला दैताची बांदावळ ॥ १० ॥ इंग्रज बोलत्यात लिपाणी घ्याइयाची। तोप आनंदी जाइयाची ॥ ११ ॥

## संकीर्ण गीतें

### ( सांगणार स्त्री-वालु )

जन जातया जतरला आम्ही जाऊया माहेराला। बापाजी बयाबाई दोनी शिखर[२४] पाहायाला ॥ १ ॥ जन जातया जतरला धरली माहेरीची वाटु। माज्या बयाच्या[२५] पायापाशी तिर्थ घडल तिनसेसाटु ॥ २ ॥ जलम माझा झाला बयाबाईच्या डाव्या कुशी। बया माज्या मालणीला[२६] उण उत्तर बोलु कशी ॥ ३ ॥ माजा अंगलोट पित्याबाबानी पैदा केला। बया माज्या मालणीला नवा महिना जडु गेला ॥ ४ ॥ बया मालणी परीस[२७]सु पिता दवलत उपकारी। दुनिया दाविली मला सारी ॥ ५ ॥ लंब लंब केसु माज्या बयाच्या सायासाच। पाणी पित्याच्या कावडीच ॥ ६ ॥ लंब लंब केसु शिरी बुचडा माइना। बया माजी मालईण जोपा करिता राहिइना ॥ ७ ॥ लंब लंब केसु जस दांगडीच येलु। बया माजी मालइणी जटा झाल्यात्या पाणी घालु ॥ ८ ॥ सुमरल्या सोध्या नित[२९] कचेरी नेमायाची। पिता माजा दवलतु करी वकीली गावाइची ॥ ९ ॥ सोनाड[३०] गावीचा एवडा पार पाचा आगळ पन्नासाचा। पिता माजा दवलतु वर जराच्या मंदिलाचा ॥ १० ॥ गाविगाविच्या पाटलान सोनाड गावीचा भरला पारू[३१]। पिता माजा दवलतु कुठ गेल्याति न्यायदारू ॥ ११ ॥ सोनाड गावीच्या पारावरी हिरव्या कातीचा नाग डुल। ताइता माजा बंदु वत्नदारांचा[३२] बचा बोल ॥ १२ ॥ भाऊबिजायाची कसी कापड झाली म्हागु। बंदुजी माजा म्हणी किरण[३३] गुजर घेण भागु ॥ १३ ॥ भाऊबिजायाची चाल निघाली

---

१९ हा काय उल्लेख आहे? २० तोफेचें नांव २१ सुरमा २२ ह्या नांवाचा एक मोठा नंदी रंकाळ्यानजिक आहे. २३ कमळें २४ हें रूपक आहे. २५ आई २६ आईस प्रतिशब्द २७ पेक्षां २८ वेल २९ नित्य, नेहमीं ३० शिराळ्यानजिक हें गांव आहे. ३१ चावडीसमोर वडाचें अगर पिंपळाचें झाड असतें त्याच्या भोंवतीं बैठकीकरितां बांधलेला घेरेदार कट्टा ३२ वतनदाराचा ३३ काळें लुगडें

घरोघरी । ताइता माज्या बंदु जरीपटका कोल्हापुरी ॥ १४ ॥ भाऊबिजायाची चाल निघाली देशामंदि । माज्या बंदुजीच्या चोळी [34] हांजिरी खिशामंदि ॥१५॥ सोनसळी गहू सोजिसाठी वलविल । ताइत माज बंदु भाऊबिजेला बलविल ॥ १६ ॥ बंदुजी माजा म्हणी काग बइनीइ [35] काळी [36] गोरी । काळी चंद्रकळा साळी घालितु मागामंदि ॥ १७ ॥ शिपिच्या दुकाइनी चंद्रकळाची घडी ताजी । ताइता माज्या बंदु सोड बटवा लाव [37] फाँडी ॥ १८ ॥ भरल्या बाजारातु चंद्रकळाच्या उतरंडी । ताइता माजा बंदु उच पाराच्या बस तोंडी ॥ १९ ॥ शिंप्याच्या दुकाइनी भणीभावंड मांडल्याति । माज्या बंदुजीच शिंपि मैतरू हासल्याति ॥ २० ॥ भरला बाजाइरू नाहीं भरली गुजईरी [38] । पिता दवलत आला नाहीं पेठें [39] दिसना साजइरी ॥२१॥ भरला बाजाइरू काय भरूनि मला रिता । ताइता माजा बंदु वाणी भरण्याचा ईलं [40] आता ॥ २२ ॥ पाची परकाराच ताटु वर सोजीची पाकईर [41] । मांडवाच्या दारी इण इवाई हेची झाली एका मातेची [42] लेकइर ॥ २३ ॥ पाची परकाराच ताटु वर केळाच शिकरणु । ताइता माज्या बंदु तुमावाचुनि सगे [43] कोणु ॥ २४ ॥ पाची परकाराच ताटु वर केळाची केळफणी । माज्या बयावाणी हाक मारिली मला कुणी ॥ २५ ॥ शेजी [44] च्या घरा गेलो बस म्हणिती हासडयान । तुसड माज मनु [45] मी का जाइना दुसऱ्यान ॥ २६ ॥ सोजीची हेची पोळी गुळावाचुनि दिस फिक्की । बयाच्या माघाइरि कोण माहेरा गेली सकी * ॥२७॥ भुक लागली माज्या सइनीवली [46] माजी निरी। दरवाजाच्या तोंडी बया कनवाळु हाक मारी ॥२८॥ भुक लागली माज्या पोटा उभि चिंचच्या झाडाखालीं। तान लागली ताकायाची भूक लागली भातायाची। घडोघडीला याद होती माज्या बयाच्या हातायाची ॥ २९ ॥ भुक लागली माज्या पोटा मी का नेसनी देति तिडा। बया माज्या तू मालइणी तुझ्या सुखाचा देतु झाडा ॥३०॥ धाकल माज बंदु माजिपरास झाल चड । ऱ्या का भुजच आड केल ॥ ३१ ॥ सावळ तुज पणु गोरेपणाला माग सारी । बंदु माज्या सरदाराला दिष्ट लावुनि गेल्या नारी ॥ ३२ ॥ सावळ्या सुरतीवरि मोडैयां [47] उटल्या बाणावाणी । बंदु माज्या सरदाराची सुरत खाऊच्या पानावाणी ॥ ३३ ॥ सावळ्या सुर्तीवरी मोड्या बायाचा ताटइवा । बयाचा माजा बाळु भरजानीचा नटइवा ॥ ३४ ॥ किति मी सांगु तुला नक उब्या या गल्ली जाऊ । ताइता माज्या बंदु सुरमगंदाच्या मदि लिऊ । दिष्ट मी काडिताना कुण्या रंचच नाव घेऊ । माळ्याच्या

---

३४ अंजिरी रंगाची ३५ बहिणी ३६ रंजिस ३७ रुपयाच्याफाडी ३८ कापडाची आळी ३९ बाजारपेठ ४० 'येईल' याचें रूप ४१ पक्वान्न, पदार्थ ४२ मांडवाच्या दारीं सर्व सारखे असें म्हणण्याचा आशय ४३ सगा सोयरा ४४ शेजारणी ४५ मन * गुळाशिवाय जसी पोळी फिकी तसें आईशिवाय माहेर फिकें असा भावार्थ. ४६ सैल झाली ४७ तारूण्य दर्शक मुरमा–पुरळ

मळ्यामंदि येसबंदाला कवा जाऊ ॥ ३५ ॥ माळ्या दादाला ताकिद्तु येसबंदाच्या रोपाईची । बंदु माज्याला झाली दिष्ट साऱ्या सबच्या लोकाइची ॥ ३६ ॥ माळ्याच्या मळ्यामंदि येसबंदाचु याल गेल । बंदु माज्या सरदाराच्या दिष्टपायी ध्या गोळा केल ॥ ३७ ॥ माळ्याच्या मळ्यामंदि येसबंदकवइळा । माज्या बंदुजीची दिष्ट झालीया जावइळा ॥ ३८ ॥ इसाचा हेबी घोडा तेला तिसाचा तोबइरा । बंदु माज्याला देकिताना झाला बकिलु घाबइरा ॥ ३९ ॥ केळीचा सांब डुल बत्तीस केळावरी । बयाची माज्या माया सरज्या बाळावरी ॥ ४० ॥ जलमामंदि जलम केळी बाईचा चांगइला । बिन पुरसाचा तिला गरब समावला ॥ ४१ ॥ माळ्याच्या मळ्यामंदि केळी नारळी दोघी भणी । मधे केवडा अवगुणी तेला काडावा एक्या कोनी ॥ ४२ ॥ माळ्याच्या मळ्यामंदि नग डुलुस केळीबाई । घड कापील एक्या घायी ॥ ४३ ॥ वाटवइला मळा धनी मळ्याचा झाला माळी । ताइता माजा बंदु हौशा उसात लावी केळी ॥ ४४ ॥ गुराळुघरामंदि शेटी महाजन आल वाणी । कंत माजा हवइशा धनी मळ्याचा मालु धनी[४५] । ४५ ॥ वाटवइला मळा नार मागिती पुंडीं उस । कंत माजा हवइशा धनी मळ्याचा राजवस, पाणी म्हणुनि पाजी रस ॥ ४६ ॥ लगनापराइसु काय गुराळी तुजी हवा । कंत माज्या हवशाचा घाणा कातीव बैल नवा ॥ ४७ ॥ रातदिवइसु तुज्या गुराळी दिवा जळ । हौशा माज्या कंताच हेतु गळ ॥ ४८ ॥ पाटच्या पाऱ्यामंदि कशाचा हिलौयेळु । बंदु माज्याच गुराइळु ॥ ४९ ॥ पाटच्या पाऱ्यामंदि हाक हाराळी कुणायाची । कंत माजा हवाशिया पात हाणितो गुराळाची ॥ ५० ॥ लगनाच्या येळा भटबामण गेल काशी । माज्या बंधुजीच मामा हाइत जाणंजोसी[५२] ॥ १ ॥ मांडवाच्या दारी बवल घालितु गुलालाच । माज्या बंदुजीच पाय वाज पैजंणाच ॥ ५२ ॥ मांडवाला मेडी तुज्या बवल्याला केळी । माज्याबंदुजीच मामा हाइत मालचेळी[५३] ॥५३॥ वरमाइचा घोडा सावलीला वेडा[५४] । माज्या बंदुजीचा झाला हळदीचा उकाइडा ॥५४॥ वरमाइपराइसु काय करुली तुजा ठसा । वइणा माजी गुजइर माळी मागिती जानवसा ॥ ५५ ॥ वरमाइचा मान घ्यावा करुली बाळइला । भणु वाणीची भावा तुला ॥ ५६ ॥ मांडवाच्या दारी हाळदीबाइचा पाटु गेला । ताइता माजा बंदु न्हवरा लिबांच पाणी न्हाला ॥५७॥ मांडवाच्या दारी हलग्या शिंगाची एकघाइ । बंदु कळसाच पाणी न्हाइ ॥५८॥ मांडवाच्या दारी हाळदीबाइच वाळवाण । न्हवऱ्या बाळाच केळवाण ॥५९॥

---

४८ मेंदीचें झाड ४९ मळ्याचा धनी तसा च मळ्यांतील मालाचा हि धनी ५० मोटा ५१ डजेड ५२ 'जाणसोसी' एक शब्द'. जोसीपणा जाणणारा असा त्याचा अर्थ. ५३ मातबर ५४ 'ओढा' याचें रूप

हळद एवढ कुकु आदि थळ पांडरीला । मग न्हवऱ्या बाळाइला ॥ ६० ॥ पाच पानाचा हेर्वी इडा आदि देवाच्या म्होर ठेवा । बंदुजीला मग हाळदाई तुम्ही लावा ॥ ६१ ॥ माळयाच्या मळ्यामंदि जाइ फललो चौकोनी । ताइता माजा बंदु न्हवरा झालाया बाळपणी ॥ ६२ ॥ लोकाच्या लगनातु मी का धरमाची वराडीण । माज्या बंदुच्या लगनातु गाडी सवती शिनगारीन ॥ ६३ ॥ लोकाच्या लगनातु माज धुरान डोळ भर । माज्या बंदुच्या लगनातु अशी पाताळ सोगा लोळ ॥ ६४ ॥ लोकाच्या लगनातु जातो दळाया कांडायाला । बंदुच्या लगनातु जातु कळस मांडायाला ॥ ६५ ॥ मांडवाच्या दारी काग वरमाई काळी मोरी । माजी बइणाबाइ तुज्या बंदुच्या पातळाचा बाजा होतोया शिववरी ॥ ६६ ॥ मांडवाच्या दारी काग बइणाइ दुचिइतु । तुज्या बंदुच्या पातळाच शिंग वाजल आवचितु ॥ ६७ ॥ सोयिऱ्याचा आइइरू[54] जेच तेला जायायाचा । बंदुच पातायाळु सातासंलैंदी[55] राहायाच ॥ ६८ ॥ मांडव घातिला निचळ जाइचा । न्हवऱ्याच्या आईचा ॥ ६९ ॥ मांडव घातिला चाव्या कळ्याइचा । छंदु न्हवऱ्याच्या मावळ्याचा ॥ ७० ॥ मांडव घातिला निचळ जाईच्या फोकाचा । छंद न्हवऱ्याच्या बापाइचा ॥ ७१ ॥ भाउ इवाइ करु गेलो इण सारजा न्हाइ बरी । भिस्त इवाया तुमावरी ॥ ७२ ॥ भाऊ इवाई करु गेलो इण दुरुन मला दावा । नाकी सरजाची नतु हाइ कारंडा तिचा हेवा ॥ ७३ ॥ भाऊ इवाइ करू गेली सोनाडगावीचा धोरंवतु[56] । माज्या बंदुजीचा इल गाडीन रूकवतु ॥ ७४ ॥ पाच दुरड्या रुकवतु सावी दुरडी शेवायाची । माज्या बंदुजीची चाल देसुरी[57] इवाइची ॥७५ ॥ भाऊ इवाइ करू गेली न्हाइ मागीत काळा दोरा । आटा आयरू[58] नउ म्होरा ताइता माज्या बंदु गावजेवाणु तालेवारा ॥ ७६ ॥ भाऊ इवाई करू गेली न्हाइ मागित काळी दशी । आटा आयारु नऊ म्हशी माज्या बंदुराजा गावजेवाण तुमापशीं ॥ ७७ ॥ कलालिणीबाइ नग करूस कलाकला । ताइता माजा बंदु माप दाराचे किती प्याला तेचा उतारा सांग मला ॥ ७८ ॥ कलालिणीबाई तुज्या दुकानावरी पाँलु[59] । माज्या बंदुजिच माज्या कैप्याच डोळ लालु ॥ ७९ ॥ जिवाला भारी जडु नग जाऊस सातान्याला । तुज्या अंगावैला शेला वैदु मागिल उतान्याला ॥ ८० ॥ जिवाला भारी जडु धावता धावत कुणी केली । माज्या बंदुजिची धोत्र घामान भिजइली ॥ ८१ ॥ जिवाला माज्या जडु शेर्जि[60] बघिती वाकइनी । बया माजी मालइण आली सरव टाकुइनी ॥ ८२ ॥ जिवाला माज्या जडु कस कळाल माळा आडु । माज्या बंदुजिच्या शिरी मंदिल झाला जडु ॥ ८३ ॥

---

५४ आहेर ५५ ? ५६ थोरात ५७ देशावरील (विशेषण) ५८ आठ आहेर ५९ पाल ६० शेजारीण

जिवाला माज्या जडु कस कळाल मळ्यामंदि । ताइता माजा बंदु मोटा सोडितु पाण्यामंदि शिवळा बैलाच्या गळ्यामंदि ॥ ८४ ॥ जिवाला माज्या जडु म्हेवण्या राजसा हलु हलु । माजी बहिणाबाई हरिणी जितिली[61] निमा मालु ॥ ८५ ॥ जिवाला माज्या जडु कस कळाल धारयेळ । बया माजी मालइण आली चांद-ण्याच्या बळ ॥८६ ॥ जिवाला माज्या जडु मी का कुणाला घालु वज । सावळ्या पांडुरंगा गरडासहित येण तुज ॥ ८७ ॥ जिवु माजा गेला माजी अगिन धुमइति । बया शिवारु गरजिती ॥ ८८ ॥ दुदातुपाचा तांब्या ठेविला मारइगी । पिता तान्याला सरइगी ॥ ८९ ॥ पेटला डोंगइरु आग लागली कराडाला । पिता न्हाइ चिराडाला ॥ ९० ॥ सरगीच्या देवा तेला न्हाइ व्याइनिती । जलम दिलेल्या बयासाटी किती आलो मी काकुळती ॥ ९१ ॥ आइवमरं[62]राइणु याव असल्या पणामंदि । जागा तुळसिबनामंदि ॥ ९२ ॥ आइवमराइणु भाग्याची नारी तुला । सोन्यारुप्याची हेयी फुल कंत उदाळित गेला ॥ ९३ ॥ सरगीच्या वाट कोण बैरालु बैल चारी । आइव नारीला चुड भरी ॥ ९४ ॥ आइवमरणाचा बोबाटा कुणी केला । हातीं पातळाची घडी कंत चावडीवैन गेला ॥ ९५ ॥ जलम येऊइनी न्हाइ पायिल सुख दुख । पोटीच्या बाळायाची येरथ झाली सेप ॥ ९६ ॥ जलम येऊ-इनी एकु मलैया[63] न्हाइ केला । जलम येरथ वाया गेला ॥ ९७ ॥ दुरर्‍यां[64]च्या काटी मोत्या पवळ्याच्या झाल्या लुटी । नार संचिताचि खोटी हाती आलिया गार-गोटी ॥ ९८ ॥ पान खातावण्या तुला सुपारी झाली थोडी । वर लवंग ताल तोडी ॥ ९९ ॥ पिकल्या पानाची हौशा माज्याला आवइडु । तांबुळ्याची मैना पान दिल्यान निवं[65]इडु ॥ १०० ॥

बा. दा. मुंडले

## ५१ संभाजी राजाचे पंडितराव

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सन १६८० त मृत्यु पावल्या पासून ई. स. १६८९ त संभाजी राजाचा वध होई पर्यंत ९ वर्षे मराठी राज्याचा कारभार कसा चालला होता ह्या बाबतींत आजामित्तीस तर सर्व माहिती संशयांत बुडालेली आहे. ह्या कारकीर्दीतील कागदपत्र हि अजून सांपडावे तसे सांपडलेले नॉहात.

---

६१ हरिणीच्या वेगानें चालून आली. ६२ सवाष्णपणांतील मरण ६३ मलकार्जुनाची यात्रा अथवा फेरी, भेट. हा मलकार्जुन वाळवे तालुक्यांतील येडे गांवानजीक डोंगरावर आहे. ६४ समुद्राच्या ६५ निवडिते याचें रूप

शिवाजीमहाराजांनीं संभाजीराजास पन्हाळा किल्ल्यावर अटकेंत ठेविलें होतें. त्यास तेथल्या तेथें तसें च ठेवून राजारामाच्या नांवें राज्यकारभार चालविण्याचें प्रधानांनीं ठरविलें परंतु संभाजी आपल्या पराक्रमानें अटकेंतून बाहेर पडला व आपल्या विरुद्ध असणाऱ्या राजारामास कैदेंत ठेवून त्याच्या आईस ठार मारून–भिंतींत चिणून–राजमंडळांतील पुरुषांपैकीं आपल्यास प्रतिकूळ असणारांस ठार मारून अगर कैदेंत टाकून आपण बापाच्या सिंहासनावर बसला. त्याचा स्वपराक्रम पाहून हंबीरराव मोहिता सेनापती त्यास वश झाला. बाकीच्या सर्व अष्टप्रधानांस त्यानें फांटा देऊन नवीन नेमले असावे असें वाटतें. आज जी सनद मंडळापुढें ठेविली आहे तींत मोरेश्वर पंडितराव म्हणून नांव आहे. ही सनद राजशक ११ तील म्हणजे इ. स. १६८५ तील आहे. हें वर्ष संभाजी राजाच्या कारकीर्दीचें पांचवें होय. पंडितरावाप्रमाणें दुसऱ्या प्रधानांच्या हि नेमणुका झाल्या असल्या पाहिजेत. ह्या प्रधानमंडळाचा अस्त संभाजीराजाच्या अस्ताबरोबर च झाला असला पाहिजे. संभाजीनें आपल्या प्रिय अमात्यास म्हणजे कबजीस छंदोगामात्य कविकलश पंडितराव अशी पदवी दिली होती खरी परंतु अष्टप्रधानांतील पंडितरावाच्या जागेशीं ह्या पदवीचा संबंध दिसत नाहीं; ही त्या व्यक्ती पुरती स्वतंत्र योजना होती असें आपल्या पुढें आलेल्या अस्सल कागदावरून निःसंशय दिसतें.

शिवछत्रपती विद्वान् ब्राम्हणांस जमिनी इनाम न देतां धान्याच्या नेमणुका करून देत असल्याचें बखरींतून आपण वाचतों. ह्या गोष्टीचा अस्सल कागदोपत्रीं पुरावा आतां पुढें येऊं लागला आहे. शिवाजीच्या पद्धतीस अनुसरून च ह्या सनदेंतील देणगी धान्याची असून ती पुत्रपौत्रादि परंपरेनें चालणारी नसून दान घेणाराच्या हयातीपर्यंत चालणारी आहे.


ह्या सनदेंत कोठीमाप म्हणून मापाचा निराळा नामनिर्देश केला आहे. त्या वरून इतर बाजारच्या मापाहून कोठीमाप निराळें होतें असें दिसतें.

संभाजीच्या कारकीर्दीतील ही सनद व राजारामाच्या व त्याच्या वंशजांच्या कारकीर्दीतील श्रीकराचार्य पंडितराव यांच्या सनदा ज्या प्रसिद्धाप्रसिद्ध आहेत त्यांवरुन धर्मादाय इनामांच्या देणग्या देण्याचा पंडितराव यांस अधिकार होता असें दिसतें. संभाजी राजाची अंधारांतील कारकीर्द उजेडांत आली म्हणजे पुष्कळ च नवीन गोष्टी समजून येतील. अस्सल कागद ज्याचा त्यास द्यावयाचा आहे, नक्कल मंडळाच्या संग्रहीं राहील.

कृ. वि. आचार्य कालगांवकर

## श्री शंकर

श्री सकलगुणमडीत अखडितलक्षमी अलरुत राजमान्य राजश्री रगो विस्वनाथ



देशाधिकारी व लेखक प्रात कऱ्हाड वर्तमान व भावी गोसावी यासि पोष्य मोरेस्वर पंडितराऊ नमस्कार राज्याभिसेक स्रके ११ रक्ताक्षी नाम संवछरे फालगुण शुध शष्टी रविवार वेदमूर्ति नरसिंभट शेष भट मुंजेमणी वस्ती कराड ब्राम्हण योग्य वैदिक देखौन धर्मादाय देविले तादूक केली कोठी मापे मण रुद्री (?) जोंधळे देणे मण ·॥· दाहा प्रतिवर्षी नूतनपत्राचा आक्षेप ना करणे क्षेम असतीळ तोवरी देणे प्रती लिहून घेऊन मुख्य पत्र भट गोसावीया जवळी देवणे रा छ ५ माहे रबिलौवल सु॥ समस समानीन आलफ पा हुजूर सदरहू धर्मादाय पेस्तर साला पासून देत जाणे पा हुजूर हे विज्ञाप्ति




बार सुद बार

## ५२ केदारलिंगाचें अष्टक

एक पोथी पांच पानाची रा. राजवाडे यांजकडून मिळाली. तींत पन्हाळा किल्याजवळील जोतिलिंग उर्फ केदारालिंग ह्या देवाची चार अष्टकें आहेत. पहिल्या व तिसऱ्या अष्टकांत प्रत्येकीं आठ श्लोक असून, दुसऱ्यांत तेरा व चवथ्यांत अकरा श्लोक आहेत. पहिल्या अष्टकाचा कर्ता कोणी माधव म्हणून आहे. दुसऱ्या अष्टकाचा कर्ता नक्की कोण आहे तें कळत नाहीं. तिसऱ्याचा कर्ता रंगनाथ असेल असें आठव्या श्लोकांतील सहजरंग या पदावरून अनुमान होतें. चवथ्या अष्टकाचा कर्ता बालकृष्ण म्हणून कोणी कवी आहे. दुसऱ्या अष्टकाच्या बाराव्या श्लोकांत केशरिनाथ हा शद्ब येतो, त्यावरून तें अष्टक केशरिनाथाचें असावें असा तर्क केल्यास चालण्यासारखें आहे. ह्या चार कवींपेक्षां केसरिनाथ व रंगनाथ हीं प्रसिद्ध दोन नांवें आहेत. माधव व बालकृष्ण या दोन कवींचीं नांवें नवीन च उपलब्ध होत आहेत. हे दोघे हि कऱ्हाडापासून कोल्हापूर पर्यंतच्या प्रांतांतील असावे. कारण, सदर पोथी रा. राजवाडे यांना कऱ्हाड प्रांतीं सांपडली. यद्यपि

माधव व बाळकृष्ण हीं नांवें रा. चांदोरकर यांच्या सूचींत असलीं, तत्रापि त्या सूचींतील त्या त्या कवींची प्रस्तुत अष्टकें असतील असें निश्चयानें म्हणण्यास जितका सबळ पुरावा पाहिजे तितका अद्याप उपलब्ध नाहीं. पोथी मंडळाच्या संग्रहास ठेविली आहे.

महादेव मोरेश्वर भानू फडणीस

॥ श्री नाथवरद ॥

क्षमा करूनी अपराध माझा । देई मला दर्शनलाभ तुझा ॥
आणीक कांहीं तुजला न मागे । केदारलिंगा हृदयात गाजे ॥ १ ॥
वाचेसि तूझे स्मरणा घडोदे । पाई तुझ्या हेत सदा जडोदे ॥
भक्तांस तुझ्या बळ दे निजांगे । केदार० ॥ २ ॥
या डोळियाच्या निज डोळियाते । राहो तुझें रूप जिवा मुळाते ॥
तत्वार्थ कांहीं हितगूज सांगे । केदार० ॥ ३ ॥
वर्णातिता शाम सुवर्णवर्णा । वेदायुधा वेदभुजात पूर्णा ॥
दुर्गूर्ण हे मारुज( नि ) दुष्ट रागे । केदार ० ॥ ४ ॥
माता मिता तूं गणगोत इष्ट । नाहीं मला तुजविना वरिष्ठ ॥
सर्वस्व माझी तुज लाज लागे । केदार० ॥ ५ ॥
संकल्प प्रालब्ध विशेष शेषा । तु स्वार त्या ही वरता विशेषा ॥
पाई तुझ्या पावन ब्रीद वागे । केदार० ॥ ६ ॥
मनोहरा चांग-भला-स्वरूपा । मूर्तित्रया निर्गुण ब्रह्मरूपा ॥
वर्णू तुझा मी तुज शब्द वागे । केदार० ॥ ७ ॥
सिंगीवरी पुंगित डौर शंख । वाजे अनूहात ध्वनी निशंख ॥
सेली गळा पट्ट हि सानुरागे । केदार० ॥ ८ ॥
सदा सुधापान हि पात्र-पूर्ण । त्रिकांडशूले अविवेकचूर्ण ॥
प्रबोधखर्गे रणरंग अंगे । केदार० ॥ ९ ॥
क्रोधादिरत्नासुर मारिलें कि । रुपाकटाक्षेत हि तारिले कि ॥
आनंदवीले ऋषिदेव स्वांगे । केदा० ॥ १० ॥
जडीत सद्गुण अनेक रत्नीं । भांगार-पूजा सुमन-प्रयत्नी ॥
सद्भक्ति-प्रेमात हि भाव पांगे । केदार० ॥ ११ ॥
श्री केशरीगंध सुगंध अंगा । ल्याला बरा केशरिनाथ वागा ॥
देशीच दीनावरदान चांगे । केदार० ॥ १२ ॥
हे स्तोत्र वाची च त्रिकाळ नित्य । त्यासी करी मंगळ सर्व कृत्य ॥
शिर्षी जिवाचे दिन विघ्न भागे । केदार लिंगा० ॥ १३ ॥

## श्रीनाथ वरद

रत्नासुरासि वधुनी निजभक्तकाजा। सद्भक्त रक्षित परीक्षक देवराजा ॥
तो दीनवत्सळ दयाघन सौख्यसिंधू। पाहू चला खळनाथ अनाथबंधू॥१॥
रत्नागिरीवारि विराजित ज्योतिर्लिंग। तो चित्समुद्र जग हे लहरी-तरंग ॥
चित्तांत विश्वपटि हा पाहाता संमधू। पाहू चला० ॥ २ ॥
केदार ह्मणति पण्डित दक्षणेचा। याचा प्रताप सविशेष प्रदक्षिणेचा ॥
संदर्शनें निरासि दुर्घट दुर्मदांधु। पाहू चला० ॥ ३ ॥
चिच्छक्ति विश्वजननी मुळिची तुकाई। गोडी गुळात गुळ गोडित चोपडायी॥
तैसी विलासित अभिन्नपणे प्रसिध्दु। पाहू० ॥ ४ ॥
जाऊ उठा त्वरित हे वय व्यर्थ जाते। घेऊ बरा धणिवरी निजलाभ चित्ते ॥
पाहोनिया परम पावन पूर्ण बोधू। पाहू० ॥ ५ ॥
पदोपदी वदनि चांगभला म्हणावा। ठेऊनि भाव भजनी हृदयी अणावा ॥
टाकूनिया असुर-संपति काम क्रोधू। पाहू० ॥ ६ ॥
श्लोकाष्टकी विमळ भाव चि देव होतो। भावार्थ हा सुचविला कविनें अहो तो।
भावे विना पतन पावति दुर्मदांधू। पाहू चला० ॥ ७ ॥
संपूर्ण हा सहज रंग अभंग श्लोकी। कीजे सदा श्रवण कीर्तन पुण्य श्लोकी।
सज्ञान भाविक उपासक सिद्ध साधू। पाहू० ॥ ८ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीरवळनाथाय नमः ॥

ज्योतीस्वरूप निजरूप स्वरूप पाहा। केदारलिंग म्हणती जग तो चि तो हा
तारावया जडमुढा प्रति दक्षणेसी। श्रीजोतिलिंग स्मरता भवदुःख नाशी॥ १ ॥
रत्नागिरी-सिवरि आसुर मारिले हो। रत्नासुरासि वधुनी जन तारिले हो ॥
बद्रीनिवास म्हणती प्रतिरूप जासि॥ श्री जोति० ॥ २ ॥
काळाधिकाळ भयभ्रांति निवारिताहे। भक्तासि नाम स्मरता सुख देत आहे॥
बद्रीनिवास म्हणती प्रतिरूप जासि। श्री जोतिलिंग० ॥ ३ ॥
रत्नासुरा-वरद नाम हि चालवीले। ध्यानी मनी रवळनाथ अनाथ ठेले।
इछीत-काम-फळ दे सकळा जनासी। श्री जोति० ॥ ४ ॥
जो जामदग्नि-अवतार उदार क्रूरा। जाचें भय त्रिभुवनी बहुधा असुरा।
दासासि रक्षुनि सदा पदि मुक्ति देशी। श्री जो० ॥ ५ ॥
केदार लिंग पुजिती सुर हे त्रिकाळी। चिद्रूप-रूप अवघा शिव चंद्रमोळी।
ऐक्यत्व जो हरिहरात्मक साम्यतेसी। श्री जो० ॥ ६ ॥
जो बद्रिकाश्रमिहुनी निजभक्तकाजा। त्रासोनि दुष्ट असुरा रिपुतेज-पुंजा।

श्री लक्ष्मी कराविरी पुरवे कृपेसी । श्री जो० ॥ ७ ॥
सिद्धस्वरूप (नि)जरूप जयासि ध्यातीं । चिंता हारोनि तुरवी भवक्लेशभ्रांति ॥
हे माधवासि निजभक्ति पदीं निवासी । श्री जो० ॥ ८ ॥

॥ श्री नाथवरद ॥

कसा पर्वतू दीसतो रत्नखाणी । तिथें नांदती स्वामि हे देव तीन्ही ॥
अशा शंकरा शक्ति ते चोपडा गा । नमस्कार माझा तया जोतिलिंगा॥ १ ॥
दरे दर्कटे वृक्ष पाषाण शृंगे । तिथे वास केला तया जोतिलिंगे ॥
मग राहिले भक्ति तुझ्या निसंगा । नमस्कार० ॥ २ ॥
भुजंगावरी आसन नाथजींचे । कसे सावळे दीसते रूप जाचे ॥
अंगी साजरी दीसती दिव्य गंगा । नम० ॥ ३ ॥
उभा देहुडा पाय ठेऊनि राहे । चतुर्भूज स्वामी असा कोण आहे ॥
करी घेऊनी खड्ग त्रीशूळ वाटी । उभा राहिला दैत्य त्रासोनि दृष्टी ॥ ४ ॥
आश्वारूढ हा रूढ हा कोण देव । महाधीर गंभीर तो ज्योतिराव ॥
भजारे भजा भक्तिभावेंचि जागा । नम० ॥ ५ ॥
चला जाउरे दर्शना ज्योतिलिंगा । तया पाहता दोष जातील भंगा ॥
तया मस्तकी शोभती दिव्य गंगा । नमस्कार० ॥ ६ ॥
करी मुद्रिका कंठिया कंठमाळा । कटी दाब शोभे दिसे दिव्य लीळा ॥
कसे नेत्र सूढाळ तूझे बरे गा । नमस्कार० ॥ ७ ॥
कर्णी कुंडले शोभतो डौर करी । कसा दीसतो क्षेत्रपाळाप्रकारी ॥
बहू वेषधारी असा स्वामि तूं गा । नमस्कार० ॥ ८ ॥
प्रतापी असा स्वामि ( कोठे ) दिसेना । तया वेगळे चित्त कोठे वसेना ॥
न सोडी अता पाय तूझे कधी गा । नम० ॥ ९ ॥
ब्रह्मांविष्णूमहेश्वर तूं दयाळा । तिही आवतारी तुझी पूर्ण लीळा ॥
असा स्वामि कोठे मला दाखवागा । नमस्कार० ॥१० ॥
गण गोत्र तूं मैत्र तू मायबाप । सखा सोयरा बंधु तू गा सुमित्र ॥
उपेक्षू नको बाळकृष्णा कधीं गा । नमस्कार माझा तया ज्योतिलिंगा ॥ ११ ॥

## ५३ रत्नाकराची गीतेवरील टीका

श्रीसमार्थांचे त्र्यंबक म्हणून एक शिष्य होते. त्यांना च भोळाराम म्हणत. श्रीसमर्थ चरित्रात भोळारामांच्या पुष्कळ कथा प्रसिद्ध आहेत. मोगलाईत औरंगाबाद जिल्ह्यांत भालगांव म्हणून एक ठुमदार ठिकाण आहे, तेथें भोळारामांचा मठ आहे. मठापासून जवळ च एका डोंगरावर त्यांची समाधी आहे.

— भोळारामांच्या मठांतील कागदपत्रांचा वगैरे जो कांहीं संग्रह मिळाला, त्यांत रत्नाकरांच्या गीतेवरील टीकेची एव सबंध प्रत आहे. प्रतीच्या शेवटीं अकरा ओंव्या आहेत, त्यांत टीकेचा काळ व प्रतीचा काळ दिला आहे, म्हणून त्या अकरा ओंव्या येथें देतों:-

जो येकनिष्ठ श्रवण मनन करी । तो तरेल संसारसागरीं ।
होती मोक्षाचे अधिकारी । हा वर श्रीहरि बोलिलासे ॥ १ ॥
शके १६२१ सोळासे येकवीस । विकृति संवत्सर पौष मास ।
शनिवार मकरसंक्रांति दिवस । अश्विनीकुमारी पूर्णतेस ग्रंथ आला ॥ २ ॥
त्याचा नित्य नेम घेउनी । जो श्रद्धे वाची प्रतिदिनीं ॥
त्यासी नाना संकटीं चक्रपाणी । तत्क्षणीं तारील ॥ ३ ॥
नाना विघ्नें ते ते निर्विघ्न होती । पावे ज्ञान वैराग्य भक्ति ॥
कल्पित मनोरथ पावती । हे असे प्रतीति रत्नाकरा ॥ ४ ॥
ज्यासी आपुले स्वहित करणें । तेहीं या शब्दरत्नाते कंठीं धरणें ॥
चुकेल जन्ममरणाचें येणें । गीतेचा जाणे सर्वार्थ ॥ ५ ॥
याचें पठण केलिया श्रद्धायुक्त । त्यासी संस्कृताचा अर्थ प्राप्त ॥
तो आपण आपणाते जाणत । तुटे भ्रांति संसाराची ॥ ६ ॥
सातर्से गीतेचे श्लोक । तितुके च प्राकृत जाले देख ॥
हे सद्गुरुकृपेचे कौतुक । येणे अज्ञान लोक तरतील ॥ ७ ॥
रत्नाकराचें रत्नकरपण । तो सद्गुरु जाला आपण ॥
तेथें जालें ग्रंथकथन । जेणें पावन नर नारी होती ॥ ८ ॥
श्रीरामानंदाचे प्रसादें । बोले रत्नाकर आनंदें ॥
भवबंधन तुटेल या संवादें । ऐसा गोविंदें वर दीधला ॥ ९ ॥
शके १६ सोळासे ८५ पंचासी । सुभानु नाम आषाढ मासीं ॥
कृष्णपक्षीं येकादशी । लेखनसीमेसी मुहूर्त येक ॥ १० ॥
उदयो होउनी गुरुवार । जाला गीतार्थ सविस्तर ॥
येकादासाचें अक्षर । कृपाकर सद्गुरुचा ॥ ११ ॥

यावरून श्रीरामानंदाचे शिष्य रत्नाकर यांनीं ही गीतेवरील टीका १६२१ च्या मकरसंक्रांतीला संपविली व तिची एक प्रत येकादासांनीं स्वहस्ताक्षरें १६८५ च्या आषाढ वद्य ११ स संपूर्ण करतांना या अकरा ओंव्या लिहिल्या, असें दिसतें.

या अकरा ओंव्यांनंतर प्रस्तुतची प्रत केव्हां लिहिली गेली, तो काळ दिला आहे, तो असा:-

"शके १७३० विभवनाम संवत्सरे ज्येष्ठासितनवम्यां पुस्तकमिदं समाप्तिमगमत् । लेखकपाठकयोः शुभं भवतु ॥ छ ॥

हे येकादास कोण होते तें कांहीं कळत नाहीं. ग्रन्थाच्या शेवटीं येकादासांनीं केलेली आरती दिली आहे, ती अशीः

### आरती भगवद्गीतेची

श्रीभगवान् अर्जुन संवाद जाला । अष्टादश अध्यायीं निजबोध केला ॥
सप्तशत श्लोक अनुभवीं आला । गीताग्रंथ नांव रुपे उपजला ॥ १ ॥
जय देव जय देव जय भगवद्गीता श्रीभगवद्गीता । आरती वोवाळूं आदी अव्यक्ता ॥ ध्रु० ॥
विवरोनी सारासार अद्वय रूप तुझें । अकळ कळतां गेलें मीपणाचें वोझें ॥
गुह्याद्गुह्य अध्ये हें सर्वत्र समजे । अनाद्य गोप्य पाहातां विरालें दूजें ॥ २ ॥
इंद्रियवर्गेंकरुनी प्रत्यायि शोधिलें । अनंग आंगी साधे दृश्य निवटीलें ।
क्षराक्षरातीत परम सांपडलें । शब्द निःशब्दीं आटोनी गेले ॥ ३ ॥
जे श्रवणें मननें पठणें अर्थप्रचीती । देवोनी अक्षयी सौख्यावृत्तिंनिवृत्ती ॥
नानाचे विज्ञान जगीं दृश्य प्राप्ती । येकादासीं जालें मौन्य निश्चीती ॥ ४ ॥

शं. श्री. देव

---

## ५४ वडगाव मठाची परंपरा

( कृ. वि. आचार्य कालगावकर )

मौजें वडगाव ता० खटाव जिल्हा सातारा येथें जयरामस्वामींचा मठ आहे. ह्या मठास जयरामस्वामींचा मठ असें जरी म्हणतात तरी त्याची स्थापना श्री कृष्णाप्पा स्वामी म्हणजे जयरामांचे गुरू याणीं केली.

आज मंडळापुढें जी वडगावमठाच्या परंपरेची माहिती ठेवीत आहे, तिचा आधारभूत लेख बखरीच्या स्वरूपाचा असावा असें त्याच्या स्वरूपा वरून दिसतें. ह्याची फक्त तीन च पानें सांपडलीं आहेत. कऱ्हाड येथें एका वडगाव मठाच्या संप्रदायी मनुष्या जवळ हीं मिळालीं. हीं पानें आरंभा पासून अनुक्रमानें तीन आहेत.

कृष्णाप्पास्वामी धरून अनुक्रमानें सात मठाधीशांची हकीकत लिहिण्याचा संकेत मूळ बखर लिहिण्याचा आहे असें ह्या तीन पानांवरून दिसतें.

सात मठपतींचें प्रत्येकी कालमान सांगितल्यावर लिहिणारानें कोरी जागा सोडलेली आहे. त्या जागेंत ह्या सात मठाधीशांच्या मागून झालेल्या मठाधिकाऱ्यांचीं नांवें व त्यांचा काल दुसऱ्या कोणीं तदनंतर दाखल केल्याचें दिसून येतें.

ह्या कोन्या–मागून भरून काढलेल्या–सोडलेल्या जागे पुढें पुन्हा मूळच्या लेखकानें कृष्णाप्पास्वामीची हकीकत सुरू केली आहे. ह्या वरून ही मध्यभागीं सोडलेली कोरी जागा मुद्दाम च सोडली होती व त्या सोडण्याचा हेतु सात मठाधिकाऱ्यांचीं नांवें कोणींतरी त्या जागीं लिहावीं असा च होता असें दिसतें. ह्या कोन्या जागेंत ज्या मठपतींचीं नांवें लिहिलीं आहेत ते मूळ लेखकाच्या कालानंतर झाले असले पाहिजेत अगर त्यांचीं नांवें लेख लिहितांना त्यास मिळालीं नसतील असें हि दुसरें अनुमान करण्यास जागा आहे.

काव्येतिहाससंग्रहांत जी बखर छापिली आहे तींत कृष्णाप्पास्वामी वडगावीं आल्याचा काळ सांगितलेला नाहीं तो ह्या लेखांत शके १५०४ हा दिलेला आहे. कृष्णाप्पास्वामीचा समाधिकाळ शक १५४५ असा बखरींत दिला आहे; ह्या लेखांत शक १५४९ हा दिला आहे. माघ शु॥ १५ दोन्हीं हि ठिकाणीं आहे. ह्या लेखांत रुधिरोद्गारी संवत्सर दिला आहे. बखरींत संवत्सर दिला नाहीं असा दोन्ही लेखांत फरक आहे.

दुसरा फरक बखरींत ज्या सहा मठाधिकाऱ्यांची हकीकत दिली आहे त्यांपैकीं सहावे–व ह्या लेखांतील सातवे–महादेवबाबा ह्यांचा समाधिकाल बखरींत शके १७२७ कार्तिक वद्य ५ असा लिहिला आहे. ह्या लेखांत शके १७२१ सिद्धार्थी संवत्सर भानुवार कार्तिक वद्य ५ असा दिला आहे.

शके १७२१ पासून शके १७९४ पर्यंत ७३ वर्षांत झालेल्या पांच मठाधिकाऱ्यांचीं नांवें व काळ ह्या लेखांत मागाहून दाखल केलेलीं आहेत; बखरींत मुळीं च नाहींत. ह्या लेखांत जी प्रथम सात मठपतींचीं नांवें आहेत, त्यांपैकीं साहावे नांव बखरींत मुख्यत्वें दिलेलें नाहीं. ह्या लेखांत साबाजीबावा असें दिलेलें आहे तथापि त्यांची समाधी नाहीं असें हि सांगितलें आहे. बखरींत मुनीश्वर स्वामींचे शिष्य संभाजीबावा म्हणून एक महादेव बोवा ( स्वामी ) बरोबर सांगितले आहेत ते च हे साबाजी बोवा असावे. हे साबाजी बोवा फक्त सात वर्षें मठाची वहिवाट करीत होते इतकें च ह्या लेखांत दिलें आहे. बखरींत साबाजीबोवा हें नांव मुळीं च नाहीं. त्याच्याबद्दल संभाजीबोवा असें आहे हें वर सांगितलें च आहे.

अलीकडे जयरास्वामींचे गुरु कृष्णाप्पा ह्यांच्या संबंधानें चमत्कारिक विधानें कित्येक करूं लागले आहेत त्यास का. सं.तील बखरींत व ह्या लेखांत जो थोडा मजकूर लग्नाचा आला आहे त्यावरून आधार दिसत नाहीं. श्रीयुत रा. चांदोरकर यांणीं कृष्णाप्पा या नांवाबद्दल कृष्णस्वामी असे यांचें नांव लिहून त्यापुढें जो शेरा मारला आहे त्यांत " यांचें लग्न चुकून एका म्हाळ्याच्या मुलीशीं झालें होतें । " असें लिहिलें आहे. ह्यास आधार काय आहे कळत नाहीं. असो.

एकां गृहस्थांची तर अशी समजूत झाली आहे कीं कृष्णाप्पा हे न्हावी होते व त्यांचा शिष्य जयराम! ही चमत्कारिक समजूत तर अगदीं च खोटी. अलीकडे आत्माराम बोवांचा दासविश्रामधाम नांवाचा एक रामदासी पंथातील संग्रहग्रंथ श्रीयुत देव यांनीं प्रसिद्ध केला आहे त्यांतील २१ व्या अध्यायांत रामदासांचा शिष्य एक कृष्णाप्पा न्हावी व त्याचा शिष्य एक जयराम म्हणून सांगितला आहे. त्या वरून ही भलतीं च समजूत कोणीं करून घेतली असावी; परंतु कृष्णाप्पा मठ करून वडगावास शके १५०४ मध्यें राहू लागले असें प्रकृत लेखांत आहे. तेव्हां रामदास जन्मास हि आले नव्हते. व कृष्णाप्पा बखरी प्रमाणें शके १५४५ व प्रकृत लेखा प्रमाणें १५४९ यात समाधिस्थ झाले तेव्हा समर्थांचें वय १५अगर १९ वर्षांचें होतें. व तो काळ पंचवटींतील त्यांच्या तपश्चर्येचा होता. त्यांचें अफाट कर्तव्यचरित्र ह्या पुढील होय. ह्यावरून ही समजूत किती चुकीची आहे हें स्पष्ट समजून येईल. कृष्णाप्पा यांचें उपनांव अभ्यंकर असें होतें ही हि समजूत चुकीची आहे.*

कृ. वि. आचार्य कालगावकर

श्री

श्री कृष्णापा अपास्वामी वडगांवास आले तेथोन संप्रदाई ( यी ) सिष ब्रह्मच्यारी ब्रह्मनिष्ठ प्रतापी जाहले व गुरुसेवेची| ज्यानी पराकाष्ठा केली व गाव दरोबस्त इनाम मेळविले व वर्षिके व इनाम जमिनी मेळवून ब्राह्मणसंतर्पण अवीट करीत आले त्याचा तपसील

१ कृष्णापास्वामी उरणग्रहेकर
१ जयरामस्वामी कात्राबाज मांडवगणचे देशपांडे
१ गोपाळस्वामी
१ विठावास्वामी हे म्हसवडकर पारखे याची स्वामीनी आग्रहाने दोन तीन लग्ने करविली परंतु लग्न करता च बायका मेल्या अतेव ते ब्रह्मच्यारी
१ मुनेश्वरस्वामी
१ साबाजीबावा भंडारे वडगाव ( कर )
१ महादेवबाबा धारासीव वडगावकर
७

* भारतवर्ष मासिकांत ऐतिहासिक चर्चा सदरांतील पृ. १९ वर "कृष्णाप्पा-स्वामी" ह्या मथळ्याचा माझा लेख आहे तो वाचावा.

तपसील

६ समाधी वटग्रामी आहेत

१ कृष्णापास्वामीची मुख्ये

१ जयराम स्वामीची दुसरी

१ गोपाळस्वामीची तिसरी

१ विठास्वामीची चवथी

१ मुनेश्वरस्वामीची पाचवी

१ माहादेवस्वामीची साहावी

६

१ सावाजी बावाची समाधी नाही

७

याणी स्नानसंध्या केली त्याचा तपसील वर्षे

४५ कृष्णाप्पा स्वामी वटग्रामास आले सके १५०४ ते सके १५४९ रुधिरोद्गारीनाम संवछरे माघ शुा १५ समाधिस्त जाहाले स्नानसंध्या केली

४५ जयराम स्वामी सके १५९४ परा( रि )धावीनाम संवछरे भाद्रपद वद्य ११ समाधिस्त जाहाले स्नानसंध्या आपास्वामीचे माघे केली

१८ गोपाळस्वामी शेके १६१२ प्रमोदी संवछरे अस्वीन वाा १ समाधिस्त जाहाले स्नानसंध्या केली

२९ विठोवा स्वामी शेके १६४१ कार्तिक वद्य १० गुरुवारी + + + त चेतुर्थाश्रम घेऊन समा( धि )स्त जाहाले स्नानसंध्या केली

२७ मुनेश्वर स्वामी शेके १६६८ क्षयनाम संवछरे फालगुन वद्य ९ समाधिस्त जाहाले स्नानसंध्या केली

७ सावाजीबावा सके १६७५ सात वर्षे मठची वहिवाट करून होते

४६ महादेवस्वामी शेके १७२१ सिधार्थी संवछर कार्तिक वाा ५ भानुवारी समाधिस्त जाहले स्नानसंध्या केली

२१७

७३ आलीकडे शके १७२१ ताा शके १७९४ परयंत वर्षे त्र्यहत्तर काराकिर्दी बावाच्या

१ आपाजी बावा वर्षे २०

१ गोपाळ बावा वर्षे १२

१ बाळकृष्ण बावा वर्षे ४

१ कृष्णाजी बावा वर्षे २६

१ रामकृष्ण बापा ऊर्फ नारायण बावा वर्षे ११

५

२९०

येकूण मंडळींनी स्नानसंध्या केली त्याचा विस्तार प्रथम कृष्णापा आपा हे उरणबहेचे कुलकर्णी कृष्णातीरी पवित्रभूमी तेथें जन्म कृष्णातीरी वास्तव्य पूर्व पुण्याई सबळ या योगे काही दिवस तेथे होते लग्न हि केले होते त्ये कुटुंब निवर्तल्या नंतर सर्वस्थाचा त्याग करून

( अपूर्ण )

कृ. वि. आचार्य, काळगावकर

## ५५ श्री० रघुनाथराव यांचें समाधीस्थान व दहनभूमि

श्री. रघुनाथराव दादासाहेब पेशवे शके १७०५ मार्गशीर्ष बा। ३ रोजीं कोंपरगांवानजीक कचेश्वर येथें वारले. कोंपरगांवानजीक गंगेच्या पलीकडे कचेश्वराचें ठिकाण असून, त्यास बेट अशी संज्ञा आहे. ह्या बेटानजीक किंवहुना बेटांत च शुक्रेश्वर व विष्णु अशीं दोन मंदिरें आहेत. ह्या मंदिरां नजीक श्रीमंतांचा भव्य वाडा होता. हा वाडा उध्वस्त करण्यांत आला असून, त्या वाड्याचे दगड बारी गांवच्या एका मारवाड्यानें विकत घेतलेले असून, ते तसे च पडले आहेत. ह्या वाड्याच्या खुणा बारकाईनें पाहणारास च दिसतात. वाड्याचा दरवाजा मात्र हल्लीं शुक्रेश्वराच्या देवळास लावण्यांत आला आहे. या वाड्यांत च श्रीमंतांचें देहावसान झालें.

मरणापूर्वीं दादासाहेबांनीं कोंपरगांवानजीक हिंगणी येथें, जेथें गोदावरी दक्षिणवाहीनी होते तेथें, एका जंगी वाड्याची उभारणी करण्यास सुरवात केली होती; परंतु हें काम त्यांच्या हयातींत पुरें होण्याचा योग आला नाहीं, व पुढें तें तसें च राहिलें. ह्या वाड्यास "तीन भिंतींचा वाडा" असें अद्याप म्हणतात. कोंपरगांवानजीक मुर्शदपूर ऊर्फ शितापखेडें नांवाचें पन्नास एक घरांचें खेडें आहे. ह्या खेड्याचे हद्दीवर पण हिंगणी गांवचे हद्दींत गंगेच्या कांठावर हा वाडा अद्याप आहे. एकंदर काम फार च पहाण्या सारखें आहे. हा वाडा हिंगणी येथील सर्वे नं. २ मध्यें असून, पूर्वेस गोदावरी, पश्चिमेस व उत्तरेस सर्वे नं. १ व दक्षिणेस सर्वे नं. ३ येणेप्रमाणें ह्या वाड्याच्या चतुःसीमा आहेत. आपल्या हातून वाड्याचें काम पुरें झालें नाहीं हें पाहून निदान आपली राख तेथें पडावी ह्या हेतूनें दादासाहेबांनीं आपला अत्यंविधि ह्या वाड्याचे ठिकाणीं व्हावा, असें दर्शविल्यावरून त्यांस तेथें

दहन केलें. त्या ठिकाणावर सांबाची स्थापना करण्यांत आलीअसून, एक लांकडी देवालय च तयार झालेलें दिसतें. रावबाजींनीं अगर अन्य कोणीं ह्या जागेची वास्तपुस्त घेतली नाहीं. सांबाची पूजा सांप्रत रा. विश्वनाथ रंगनाथ दिघे या ब्राह्मण पुजाऱ्याकडे असून, हिंगणी येथील सर्वे नं. ३ ह्या पुजाऱ्याकडे आहे. इनाम कोणीं दिलें तें कळलें नाहीं. खुद्द कोपरगांव येथें दादासाहेबांचा एक लहानसा वाडा* ( ज्यांत हल्लीं मामलेदार कचेरी आहे ) होता व कचेश्वरीं एक बाग हि होता.

पां. न. पटवर्धन

## ५६ मलिकंबर याचें मृत्युस्थान

मि. हेग यानें केलेल्या "Historic Landmarks of the Deccan" नांवाच्या पुस्तकांत मलिकंबर याची कबर रोजा येथें असल्याचें पृ० ५७ वर लिहिलें आहे; परंतु वस्तुस्थिति भिन्न आहे. मलिकंबर हा शके १५४८ वैशाख वद्य १० बुधवार रोजीं अंबरापूर, ता० शेवगांव, जि० नगर येथें वारला, व त्याची कबर तेथें च आहे. अंबरापुरास मलिकंबराचा दर्गा प्रसिद्ध असून दर्ग्या-कडे इनाम चालूं आहे. कबरीची स्थिति शोचनीय आहे.

पां. न. पटवर्धन

## ५७ श्रीमन्नृसिंहसरस्वतींचा काळ

श्रीक्षेत्र औदुंबर येथें गेलों असतां वे. शा. नारायण शास्त्री धोंडदेव पुजारी यांनीं एक बाड नारायण बोवा वडगांवकर यांच्या केलेल्या कवितांचें दाखविलें. त्यांत गुरुचरित्रांत श्रीमन्नृसिंहसरस्वतींच्या समाधीचा काळ कन्यागत बृहस्पतिशी । बहुधान्य नाम संवत्सरासि । सूर्य चाले उत्तरगतीशीं । कुंभ संक्रांति पर्येसा ॥ १ ॥ शिशिरऋतु माघमास । असितपक्षप्रतिपदेस । शुक्रवार पुण्यदिवस। श्रीगुरु बैसले निजानंदीं ॥ २ ॥ असा दिला आहे तें वर्ष कोणतें हें ठरवून लिहिलेला एक श्लोक आढळला तो असा:—

तेरार्शे ऐंशि शाकीं घटगरविविना योग आहेत सारे ।
सिद्धें नामांकिता जें कथन गुरुचरित्रांत केलें पहा रे ॥
ज्योतिर्मानायनांशे गणित करुनिया पाहतां तो हि आला।
वाटे ग्रंथासि कर्ते मकरग रविया बोलती पुण्य वेळा ॥ १ ॥

---

* ह्या वाड्यास विटाळशीचा वाडा म्हणतात.

सारांश शके १३८० त नृसिंहसरस्वति समाधिस्थ बसले असा निष्कर्ष. हा च शक रा. गद्रे यांनीं हि दिला आहे. शके १३८० म्हणजे इ. स. १४५८. रा. गद्रे यांनीं चुकीनें १४६० दिला आहे. गुरुचरित्रांत नृसिंहसरस्वती एका बेदरच्या बादशाहास पायास फोड झाला होता त्यास बरें केल्यानें प्रसिद्धीस आधिक येऊन बादशाहानें बेदरांत त्यांची थाटानें मिरवणूक काढली असें वर्णन आहे. हा बादशाहा कोणता असें नारायण शास्त्रीपुजारी यांनीं मला विचारिलें. फेरिस्ताचा इतिहास (इंग्रेजी भाषांतर) काढून पाहतां हा बादशाहा अल्लाउद्दीन शाह बाहमनी निश्चयानें ठरतो. यास मरणापूर्वी दोन वर्षेंपासून पायास फोड झाला होता तो हकीमास बरा करतां येईना असें वर्णन फेरिस्ता करतो व शेवटीं तो त्यानें च मेला : "The disorder in his foot increasing to a mortification he left the world of vanity in A. H. 862 or A. D. 1457." म्हणजे नृसिंहसरस्वतींच्या समाधीपूर्वी एक वर्ष. हा बादशाहा न्यायी होता असें हि वर्णन आहे, पण त्यानें हिंदूंच्या धर्मास मान दिला असें फेरिस्ता म्हणत नाहीं. नृसिंहसरस्वतींच्या भेटीची व मिरवणुकीची हकीकत दुसऱ्या एखाद्या विस्तृत मुसलमानी तवारिखेंत सांपडावी. फेरिस्ताचा इतिहास इतर इतिहासांवरून संकलित केलेला आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

चिं. वि. वैद्य

---

## ५८ आनंदीबाईचा दुसरा एक पुराणीक

कऱ्हाड येथील नृसिंहाचार्य या नांवाचा एक ऋग्वेदी माध्व पुराणीक श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांची स्त्री आनंदीबाई हिच्या पदरीं पुराण सांगून होता. कोंकणांतील कोणी एक चित्पावन ब्राह्मण हि आनंदीबाईजवळ पुराण सांगत असे हें सर्वश्रुत आहे च. टोणप्याचा वंशज सध्यां कऱ्हाड येथें आहे व त्याजकडे कांहीं इनाम ( गोवारे गांव ) अद्याप चालू आहे. सदर इनाम पुराणिकवृत्तीबद्दल पेशव्यांकडून मिळालेलें आहे. पुढें दिलेला कागद इनामाच्या वसुलासंबंधीं आहे. रघुनाथराव दादा देशोधडीस लागल्यावर त्यांचे आश्रितांना पाठिंबा नाहींसा झाल्यामुळें या आश्रितांच्या इनामाचीं उत्पन्नें आश्रितांना सुरळीत येत नसत. अशा तक्रारीचें खालील पत्र आहे. लिहिणारा शास्त्री असलेमुळें सबंध पत्र बालबोधींत आहे. अस्सल पत्र मंडळाच्या संग्रहास ठेविलें आहे.

वि. का. राजवाडे

श्री

॥ स्वस्ति श्रीमन्निजाराधन स्वामिचरणकमलाखंडित ध्यानैकनिरतांतः-
करणसंपादितदिगंतकीर्तिविलसितेषु गोब्राह्मणप्रतिपालनशीलेषु स्वगुणगण-
संपादितश्रीमद्राजाधिराजमानेषु राजश्रीविराजमान–रामचंद्र तात्या
प्रभुवर्यनलिनेषु

टोणपेत्युपाख्य नृसिंहाचार्याभिधानक वज्रचूडामंडितानंदिसंज्ञिक श्रीमत्सार्व-
भौम रघुनाथराव धर्मपत्नी पुराणिक कृतानेक वेदोक्ताशीर्वाद मिलिंदाः विलसंवित-
रा मज विशेषस्तु अपणाकडे प + + + + + पत्र अम्हाकडे पाठवा
मणून अपली अज्ञा होती + + करून देवू त्यास पत्र पाठविले होतें तें प्रविष्ट
जालें कीं नाहीं हे कलत नाहीं सौ बाईसाहेबानी अमुचा खेड्याविषई रा
दाजीपंत हुजूर मामलेदार नवी चवकशी करतात ती न करावी सालावाद चालत
अल्याप्रमाणें द्यावें व वरात ८०० अठाशाची मौजे अटके यावर दिली अहे ते
मानीत नाहीत ती अपण तस्ती पोंचून उसूल करून अमुचा पदरीं घालावी मणून
केसो (गो)विंदा करवी अपणास पत्र दिले अहे माझें हि अगत्य अपणास
अहे च सर्व प्रकारें करू अपलें ही अगमन त्या प्रांतीं जालें अहे तर अमुचे बंधू
येवून अपणास वृत्तांत निवेदन करतील तें क्षण मात्र अवकाश करून श्रवण
करून मनास अणून मनावर घेवून कार्य करून देणें हा समय पुढें येत नाहीं
अपण तो सूज्ञ च अहेत बाबूराव पाटणकर याने अपणापासी १५ बिगे जमीन
चेलवड्यामध्ये देतो मणून करार केले अहे त्याचें हि पत्र करून देणें बंधूपासी
शिरालकरानी बाईपासी ३० बिगे जमीन देतो मणून कबूले केलें अहे असें
असता देत नाहीत त्यास तस्ती पोचून पदरी पडे ते करावें तेणेंकरून अपणास
श्रेय फार कोटि होमापेक्षां अधिक अहे माजें साहित्य केले तर अपणास च
भूषण अहे मी तुमचा अपण ही पुण्याचे विभागी होतील सूज्ञा प्रति विशेष काय
ल्याहावें रा वासुदेव बा० पासी मोरोपंत मायणीकर अहेत ते बहुत सूज्ञ ही
अहेत त्यानी अठाशा रुपायास ही फशिविलें अहे अणिक ही नाना प्रकारिचे
कागस घेवून अम्हासी घासतात तर युक्तीन च पेचात अणून तस्ती ती पोचविणें
बंधु वृत्तांत सांगतील तो मनास अणून करणें रुपये अगत्य उगवून देण
पाटणकराकडील जमीन पदरीं पड तें करणें शिरालेकराकडील बाईचा
श + + + ल ते करावें + + + + + ई
नीरोप देईनात रामचंद्र सर्व तुमची कार्ये तुम पासी करून देईल संशय नाहीं
तुम्ही न जाणें या करता मी राहिलों बाईचें जाणें राहिलें शरीरास सामर्थ्य नाहीं
थोरल्या बाईन राहविलें मूल ही खुसरूप अहे अमुचा घरास जावें आश्रम
पाहावा हें भूषण अम्हास बहुत होईल मी कृतकृ(त्य) होईन सौ बाईपाशी

सागन अमुचा परास जावून परामर्श केला मणवून ग्रायस्ता मध्ये बहुत भूषण मला होईल सूज्ञा प्रति विशेष ल्यावेंसें काय अहे अपल्या उचिलास जें येईल तें करावें पाठीमाघें जो न सांगतां कार्य करील तो सन्मित्र ऐस शास्त्राहे हे अनेकाशीर्वाद

> द्रव्याणि भूमौ पशवश्च गोष्ठे भार्या गृहद्वारि जनः स्मशाने
> देहश्चितायां परलोकमार्गे धर्मानुगो गच्छति जीव एकः ॥

इति भागवत श्लोकार्थ जाणून करणें तें करावें छ

## ५९ मुठींतील पदार्थ ओळखण्याचे मराठी श्लोक

हें एक बाड कऱ्हाडाजवळील काशेगांवच्या जोशानें दिलें. यांत प्रश्नसार नांवाचा संस्कृत ग्रंथ आहे त्यांत निरनिराळया ज्योतिष-प्रश्नांचा संस्कृतांत ऊहापोह केलेला आहे व मध्यें च पुढें दिलेले मराठी श्लोक लिहिलेले आहेत. मनकवडे, सहस्त्रावधानी यांच्या तोंडपाठांतील हे श्लोक आहेत. बाड मंडळाच्या संग्रहास ठेविलें आहे.

बाडाच्या शेवटीं खालील मराठीं वाक्य आहे.:—

आला वार पूर्वेस दीजे
उफराटे गणिजे शनि तेथे
काळ जाणिजे ॥

वि. का. राजवाडे

॥ अथ मुष्टिवस्तुर्चिंतनज्ञानमाह ॥

ते शेण काष्ठें फळ फूल जाणा । शेंदूर मोतीं जिव धातु नाना ॥
कृष्णांजनं ते नख मांस शिंपि । ते तूप काचे तृण पान स्थापि ॥ ७६ ॥
सिळा माती मोतीं नख तुप धूळे राख गुळ तो ॥
बहू अन्नें पाने जळ निजकरीं कात धरि तो ॥
पाहा काष्ठा चा तो जिनस मिठ चर्मा स धरि तो ॥
परिक्षा मांसा ची तदुपरि कवी शीघ्र करि तो ॥
तें पोंवळें कीं जळ शील शिंपी । कापूर मोतीं मूळ तूप स्थापी ॥
पानें फळें चर्म हि शेण साचा । तो राख पारा धरि कात काचा ॥ ७८ ॥
कात काच गुळ कापुस जाणा । जीव काष्ठ मिठ चर्म हि माना ॥
अस्थि कापुर हि शेंदुर रेती । मूळ राख पुल बोवर मोति ॥ ७९ ॥

तूप काच तृण कापुस पारा । कात केश शिळ कापुर सारा ॥
काष्ट मांस अति सुंदर मोतीं । शुक्तिका मिठ हि शेंदुर माति ॥ ८० ॥
धात्वन्नं नख विद्रुमं फल जलं पात्रास्थि जीवं गुडं ॥
पुष्पं मूल पुरीश भस्म अजिनं लोमं तृणं मृत्तिका ॥
'मांसं पारिज शुक्तिका शिळ घृतं तुळादिकं सिंदुरं ॥
क्षारं दारु च कर्पुरं काच खदिरं मुक्तादि हस्तं धृतं ॥ ८१ ॥

## ६० देवदासकृत वेंकटेशस्तोत्राची नवी प्रत

एक बाड कऱ्हाड एथें नारायणराव लाटकर यांचे घरीं सांपडलें त्यांत देवदासकृत व्यंकटेशस्तोत्र आहे. त्याच्या शंभर ओंव्या बराबर असून, समाप्ति येणेंप्रमाणेः–

॥ " इति श्रीभावार्थपुराणें वेंकटेश स्तुति संपुर्णमस्तु " ॥

या समाप्ति व्यंकटेशस्तोत्राला 'वेंकटेशस्तुति' म्हटलें आहे आणि ही स्तुति भावार्थपुराणांतून घेतली आहे असें विधान केलें आहे. भावार्थपुराण म्हणजे अठरा पुराणें व अठरा उपपुराणें यां पैकीं कोणतें पुराण तें समजण्यास मार्ग नाहीं. तत्रापि एवढें खरें कीं कवीनें प्रस्तुत स्तोत्र कोणत्या तरी संस्कृत व्यंकटेशस्तोत्राच्या आधारानें रचिलेलें आहे. बाड मंडळाच्या संग्रहास ठेविलें आहे. हें बाड रा॰ जंगी यांनीं संपादन केलें.

या च बाडांत एकशें बावीस ओंव्यांचा एक थालीपाक आहे. कर्त्यानें आपलें नांव शेवटीं दिलेलें नाहीं. चांदोरकरांच्या सूचींत एकंदर सहा स्थालीपाक दिलेले आहेत व त्या प्रत्येकाच्या कर्त्यांचें नांव हि दिलेलें आहे. प्रस्तुत स्थालीपाकाच्या कर्त्यांचें नांव ग्रंथांत उपलब्ध नाहीं. सबब, हा ग्रंथकार अनामक म्हणून निर्देशणें भाग पडतें.

वि. का. राजवाडे

## ६१ शकुनवंति संस्कृत

१. एका संस्कृत पोथीचें एक च पान कऱ्हाडाजवळील कासेगांवीं जोशांच्या एथें सापडलें. या पानाचा संग्रह अशा करितां केला कीं, मराठी मध्यें आजपर्यंत ज्या दहापांच प्रकारच्या शकुनवंत्या उपलब्ध झालेल्या आहेत त्यांचीं मूळें संस्कृतांत आहेत हें सिद्ध करण्यास साधन हातीं असावें. हनुमंत–शकुनवंति, सहदेव–शकुनवंति, गर्ग–शकुनवंति, इत्यादि ज्या अनेक शकुनवंत्या मराठींत

प्रचलीत होत्या व आहेत त्या प्रथमतः मराठी भाषेंत च निर्माण झाल्या असा प्रकार नाहीं. मूळांत ह्या सर्व शकुनवंत्या संस्कृतांत होत्या, त्यांचीं भाषांतरें मराठींत झाली. हा प्रकार पांचपंचवीस मराठी शकुनवंत्या सांपडल्यावर ध्यानांत येत चालला च होता परंतु त्याला अद्यापपर्यंत प्रत्यक्ष प्रमाण मिळालें नव्हतें तें प्रमाण प्रस्तुत पान मिळाल्यानें उपलब्ध झालें आहे. पान मंडळाचें संग्रहास ठेवलें आहे.

२ मराठी शकुनवंत्यांत संस्कृत शकुनवंत्यांचें जें भाषांतर येतें तें शब्दशः भाषांतर नसतें. संस्कृतांतील मतलब मराठींत योग्य व समर्पक दिलेला असतो.

वि. का. राजवाडे

## शकुनवंति

### संस्कृत

( अहो ) रात्राणि पक्षश्च क्लिश्यते नास्ति ते सुखं ॥ ४१ ॥
यत्त्वं चिंतयसे कार्यं निष्पत्ति तस्य नास्ति तं ॥
निश्चितं व्यवसायांतः किंचिदालोक्य ते फलं ॥ ४३ ॥ १४४ ॥
पदं पूर्वं चतुष्को द्वौ वृषोयं + + + स्तव ॥
संपत्तिः सर्वकार्याणा धनधान्यस्य चागमः ॥ ४४ ॥
यत्त्वया चिंतितस्यार्थः स च सर्वो भविष्यति ॥
स्वप्ने द्रक्षसि चेदंच निशायां नात्र संशयः ॥ ४५ ॥ ४१४ ॥
चतुष्कादौ पदं मध्ये चतुष्कं चावसानिकं ॥
दैवानुकूल्यतः साधुः कूटोयं पतितस्तव ॥ ४६ ॥
द्विपदे वर्त्तते चिंता तस्य भासेन संभवः ॥
अर्थागमस्तथा बंधः संयोगा मासमात्रतः ॥ ४७ ॥
शरीरे च तथारोग्यं मनसा चिंतितं त्वया ॥
ततः सर्वमिदं क्षिप्रं सफळं ते भविष्यति ॥ ४८ ॥ ११४ ॥
पदं पदं चतुष्कं च पातिता तव कार्णिका ॥
कुल + + + री ह्येषा कल्याणं समुपस्थितं ॥ ४९ ॥
भूमिलाभोर्थलाभश्च संबंधं करणानिच ॥
प्रियस्य दर्शनं चैव पुत्रलाभश्च दृश्यते ॥ ५० ॥
मासत्रयेण ते लाभः सर्वोप्यर्थ भविष्यति ॥
गुरुभाक्तिपरस्तच्च कुलदेवां + + + +॥

# ६२ असमसाहस

असमसाहस हा शब्द ज्या पोथींत आला आहे ती पोथी कऱ्हाडाजवळील कासेगांवीं जोशांच्या एथें त्रुटित सांपडली. पोथीचीं एकंदर चार पानें होतीं; पैकीं फक्त चौथें पान उपलब्ध झालें आहे. पोथीची नकल शक १६३२ त यद्यपि केली, तत्रापि आंतील मराठी भाषा ३०० वर्षांची जुनी आहे. घालिजे,दीजे कीजे, वश्यार्थें, देईजे, इत्यादि जुनीं रूपें ह्या नकलेंत आलेलीं आहेत. करुन, ठेउन, वगैरे अर्वाचिन रूपें हि नकलेंत आहेत. वस्तुतः करुनु, ठेउनु, अशीं रूपें ३०० वर्षांपलीकडील पोथ्यांत प्रायः असतात; परंतु मूळ पोथीची नकल नकलकारानें जितक्या कसोशीनें केली पाहिजे होती तितक्या कसोशीनें केलेली नसल्यामुळें, नकलेंत कांहीं रूपें प्राचीन व कांहीं अर्वाचीन आढळतात. शब्द, मात्र, जसेचे तसे नकलेंत उतरले आहेत. उदाहरणार्थ, असमसाहस हा शब्द घ्या. असमसाहस हा शब्द फार जुनाट आहे. हा ज्ञानेश्वरींत क्वचित येतो; व चोंभाकवीच्या उखाहरणांत एकदां आलेला आहे; आणि आतां प्रस्तुत पोथींत हा आढळला आहे. रामदास, एकनाथ, इत्यादि ग्रंथकारांच्या ग्रंथांत हा शब्द आढळत नाहीं. प्रस्तुत पोथींत हा शब्द आला असल्यामुळें, तो ठळकपणें निदर्शनास यावा म्हणून हें टिपण व पोथीचें हें एक च एक पान मंडळास सादर केलें आहे. पोथींत वशीकरणादि मंत्र सांगितले आहेत. पोथीचें पान मंडळाच्या संग्रहास ठेविलें आहे.

वि. का. राजवाडे

५२ कीजे दशांशे शतपत्रे होम कीजे सिद्धि होय ॥ मल्लासि झोंबिजे बळ अद्भुत होय ॥ युद्धि घाव न लागे जिमूतिमायि चेटक ॥ ओं नमो दिठि देखीलया असमसाहस जालें तेणे जाऊन झोटिंगा पुढे सांगितले तुझे मज देणे धारा बहिणी ची आण ही देवा गुरु ची आण सिद्धि दे स्वाहा ॥ बेहडीया चे मुळी चा झोटिंग करून बोकडा च्या कातड्या वरी ठेउन दिवस ७ नित्य पूजा जप कीजे १०८ पंच खाद्य तुपे शि हवन किजे गुग्गुळ नैवेद्य दाखवीजे ॥ हवना चि महस जवळि असो देईजे आदित्य वारि जी वेरि घालिजे ते दासी होय ॥ नाना वस्तु आणून दे ॥ मसि पोटात दीजे रोग तुटे । ओं नमो सर्व स्त्री सर्व पुरुष वश्यार्थे ऐं श्रीं ऱ्हीं स्वाहा जप सहस्र ७२००० कीजे दशांशे खोबऱ्याचा होम कीजे मंत्र सिद्ध होय ॥ स्त्री पुरुष ज्याचे नांव पुकरावा तो वश्य होय ॥ वश्य को नाम चेटक ॥ ओं समां चामुंडे शत पिशाचिन्यै स्वाहा ॥ ये णे मंत्रे दोन्हि हळदि अभिमंत्रून आगी उटणे किजे रात्रौ शयन शुचि होऊन कीजे चिंतिले रुत्य देवतास्वामी सागेल सर्व संपूर्ण ॥ शके १६३२ विकृतिसंवत्सरे लिख्यते ॥

# ६३ कुट-प्रश्नोत्तर

कऱ्हाड एथील पंढरपुऱ्यांच्या दप्तरांत खालील कूट-प्रश्नोत्तर आढळलें. कूट-प्रश्न असाः—

मार्गी तस्कर पंधरा द्विजसमे देवालई राहता
आला राक्षस भक्षणार्थ अवघ्या या या असे बोलता
मोजोनी नवव्यास फेर फिरता चोराद्विजे दीधले
राजा बोलतसे प्रधानचतुरा सांगा कसे वर्तले १


या प्रश्नांत असा सवाल आहे कीं, चोरांचा व ब्राह्मणांचा असा फेर लावावयाचा कीं प्रत्येक नववा इसम फेरांत मोजतांना जो राक्षसास सांपडेल तो हटकून चोर असावा. चोरांचा व ब्राह्मणांचा असा क्रम मांडून दाखवावयाचा आहे. याला उत्तर खालील श्लोकांत दिलें आहेः—

आदी ब्राह्मण चार ठेउनि फुडे चोरास ही पाच दे
विप्रा द्वे मग येक तीन द्विज दे येका फुडे एक दे
दो चोरास हि दोन विप्र बसवा ते तीन येका फुडे
चोरा युग्म हि विप्रयुग्म सरुता ज्याचे कुडे त्या फुडे ॥ २ ॥

हें च उत्तर दुसऱ्या एका श्लोकांत सांगितलें आहे तें असेंः—

चत्वारी ॥ पंच ॥ द्वय ॥ मेक ॥ त्रीणी येक ॥ येक ॥ द्वे ॥ द्वे ॥ त्रितीयेणीगुणी येकंच ॥ द्वे ॥ द्वे ॥ वरी येक घाला ऐशा परी रक्षिले ब्राह्मणाला ॥

या दोन श्लोकांत सांगितल्या मोडीप्रमाणें फेरांत ब्राह्मणांचा व चोरांचा क्रम खालीलप्रमाणें बसविला असतां प्रत्येक नववा इसम चोर सांपडतो आणि राक्षसाच्या जबड्यांत नेमके पंधरा चोर जाऊन पंधरा ब्राह्मण जिवंत राहतात. फेर एणें प्रमाणेंः—



फेरांत ज्या आंकड्याच्या खालीं रेघ मारली आहे ते चोर होत. मूळ पत्र मंडळाच्या संग्रहांत ठेविलें आहे.

वि. का. राजवाडे

## ६४ शिवानंददास-कृत पद

कऱ्हाड एथील पंढरपुऱ्यांच्यां दप्तरांत खालील पद आढळलें. पदाचा कर्ता शिवानंददास आहे. याचें नांव चांदोरकरांच्या सूचींत सांपडत नाहीं. भाषेवरून दिसतें कीं, हा कवि मोरोपंत-समकालीन असावा.

पद

हात घालूनि गोमुखि ॥ जप करि सदा मुखी ॥
बिजे चुकलाशिरे मुर्खा ॥ काय केले राडलेका ॥ धृ ॥
स्नानसंध्येचे दुकान ॥ माळा मुद्रा कडासन ॥ बीजे ॥ २ ॥
देवपूजेचा ह्व्यास ॥ फुलपत्रींचा सायास ॥ ३ ॥
नेमनिष्टा करि मोठि ॥ सोवाळ्याची आटाआटी ॥ ४ ॥
येके दिनी निराहार ॥ ऐके दिनी उपाहार ॥ ५ ॥
ऐसा केला मोटा शीण ॥ तेथे नाहि नारायण ॥ ६ ॥
शीवानंददास म्हणे ॥ गुरूविणे व्यर्थ जिणे ॥

पत्र मंडळाच्या संग्रहास ठेविलें आहे.

वि. का राजवाडे

## ६५ रामनवमीसंबंधी श्लोक

कऱ्हाड येथील पंढरपुऱ्यांच्या गळाठ्यांत रामनवमीसंबंधानें खालील श्लोक सांपडला. श्लोक एखाद्या मोठ्या काव्यांतील आहे किंवा स्वतंत्र एकटा एक च आहे तें सांगण्यास मार्ग नाहीं. उतरून ठेवणाऱ्याला त्यांत जी कांहीं चमत्कृति आढळली तिचा अनुभव मंडळांतील सभासदांस यावा या हेतूनें सदर श्लोक जशाचा तसा देत आहे.

अयोध्ये मधे लोक ऐस ची सारे । विना रामनामे नेणती हे पसारे ॥
तयाचे चि गाती असे गीत नाना । न ज्या कीर्तनि अन्नवार्ता तनाना ॥१॥

२ वरील श्लोकाच्या शेजारीं दशावतारां संबंधानें खालील संस्कृत श्लोक आहे:—

प्रातः प्रातस्तु मध्यान्हे सायं सायं निशीथयोः ।
मध्यान्हे मध्यरात्रिश्च सायं प्रातरनुक्रमात् ॥ १ ॥

अनुक्रमे दशावतारांच्या वेळा जाणाव्या

| प्रातःकाळीं | | माध्यान्हीं | |
|---|---|---|---|
| मत्स्य | चैत्र शुा १ कल्की भाद्रपद | वराह | चैत्र शुा ७ |
| कूर्म | ज्येष्ठ शुा २ | राम | चैत्र शुा ९ |
| सायंकाळीं | | मध्यरात्रीं | |
| नारसिंह | वैशाख शुा १४ | परशराम | वैशाख शुा ३ |
| वामन | भाद्रपद शुा १२ | कृष्ण | श्रावण वा। ८ |
| बौध्य | ज्येष्ठ | | |

श्लोकांचें पत्र मंडळाच्या संग्रहास ठेविलें आहे.

वि. का. राजवाडे

## ६६ कृष्णदयार्णवशिष्यकृत श्लोकाष्टक

कऱ्हाड येथील पंढरपुऱ्यांच्या दप्तरांत पुढील अष्टक सांपडलें. सदरहू अष्टक कृष्णदयार्णवांच्या शिष्यानें केलेलें दिसतें. कृष्णदयार्णव कऱ्हाड पासून ३।४ मैलांवर असलेल्या कोपरडे गांवचे होत. त्या अर्थी त्यांचे शिष्य जवळपास असलेल्या कऱ्हाडांतील अगर इतर गांवांतील असावेत. त्यां पैकीं एका शिष्यानें हें अष्टक रचिलेलें दिसतें.

सहर श्लोकाष्टकाचा कागद मंडळाच्या संग्रहास ठेविला आहे

वि. का. राजवाडे

### कृष्णदयार्णव शिष्यकृत श्लोकाष्टक

जिंकावया शडरिपु प्रमदोत्कटाते । सोसावया त्रिविध पावकसंकटाते ॥
साधावया पद अचंचळ केशवाचे । भिक्षाप्रदान मज कृष्णदयार्णवाचे ॥
वैराग्ययुक्त इह भोग त्यजावयाते । स्वर्गादि भोग अवघे वरजावयाते ॥
चिंतावया हरिकथामृत नित्य वाचे । भिक्षाप्रदान० ॥ २ ॥
तृष्णा समस्त भवमस्त शमावयाला । सर्वेंद्रिया निजविवेक दमावयाला ॥
छेदावया त्रिविध बंधन या जिवाचे । भिक्षाप्रदान० ॥ ३ ॥
चांचल्यचित्त गुरुराजपदीं रमाया । खंडावया कठिण दांभिक घोर माया ॥
मिथ्या अभास जग साचपणेन वाचे । भिक्षाप्रदान० ॥ ४ ॥

प्रारब्ध संचित समग्र सरावयासि ! जन्मांतरार्जित मना विसरावयासि ॥
भंगावया कठिण बीज पुरे भवाचें । भिक्षाप्रदान० ॥ ५ ॥
जाणावया अचळ तृप्त अखंड आत्मा । तो मीच देह नसता वसतो महात्मा॥
नाही मला स्मरण आठव नाठवाचे । भिक्षाप्रदान० ॥ ६ ॥
तोडावया सकळ ही ममता मनाचि । सोडावया सकळ संगति कामनाचि ॥
मोडावया कुशळता नटणें शवाचें । भिक्षाप्रदान० ॥ ७ ॥
वृंद त्रिसप्तक पुरातन पूर्वजाचे । पावावया सदन ते गरुडध्वजाचे ॥
झाडावया सकळ पातक पालवाचे । भिक्षाप्रदान० ॥ ८ ॥
गोविंदराज गुरुवर्य पदारविंदा । चिंतावया त्यजुनि मन्मथसंगधंदा ॥
पावावया सुत्दृद भीष्म बळि ध्रुवाचे । भिक्षाप्रदान० ॥ ९ ॥

## ६७ भागवतपुराणा विषयीं दोन शब्द

कांहीं दिवसांपूर्वी भागवतपुराण हें बोपदेवानें लिहिलें कीं काय या बद्दल वाद चालला होता व या विषयावर माझे मित्र रा. रंगाचार्य रड्डी यांनीं वसंत-व्याख्यानमालेंत एक व्याख्यान हि दिलें आहे. मला ह्या वादांत तूर्त पडावयाचें नाहीं. भागवताचे कर्त्याला मराठी भाषा माहीत असावी असें दाखविणारें एक प्रमाण माझे नजरेस आलें तें मंडळापुढें मी ठेवीत आहे. भागवताचे दशम स्कन्धांत ( अ. ३७ श्लोक ७ मध्यें ) केशिदैत्याचे वधाचें वर्णन करितांना खालील वाक्य आलें आहे. ' प्रस्विन्नगात्रः परिवृत्तलोचनः पपात लेंडं विसृजन् क्षितौ व्यसुः ॥' ह्या ठिकाणीं ' लेंडं ' हा शब्द निवळ देशी ( मराठी ) दिसतो.

भागवतपुराण कोणत्या अक्षांशांत लिहिलें गेलें असावें हें ह्या खालील वाक्यावरून स्थूलमानानें काढतां येईल असें वाटतें. ' यदा मेषतुलयोर्वर्तते तदाहोरात्राणि समानानि भवन्ति यदा वृषभादिषु पंचसु राशिषु चरति तदाहान्येव वर्धन्ते ह्रसति च मासि मास्येकैका घटिका रात्रिषु ' स्कंध ( ५-२१-४१ ). ह्या वरून वृषभ राशिपासून कन्याराशिपर्यंत दर महिन्यास एक घटिका ह्या प्रमाणें जास्तींत जास्ती पांच घटिका दिवस वाढतो व पांच घटिका रात्र कमी होते. म्हणजे अत्यंत मोठ्या दिवसापेक्षां अत्यंत लहान रात्र दहा घटिकांनीं कमी असे. व अशा ठिकाणीं भागवतपुराण लिहिलें गेलें किंवा हें दिनमान ग्रंथावरून तरी पुराणकाराला माहीत होतें. वेदांग-ज्योतिषांत सदरहू फरक बारा घटिकांचा आहे.

पांडुरंग वामन काणे

## ६८ व्याडीचा संग्रह

भारतइतिहाससंशोधक मंडळाच्या शके १८३५ च्या इतिवृत्तामध्यें रा. राजवाडे यांनीं बाणभट्टाच्या हर्षचरितांतील ' सुकृतसंग्रहाभ्यासगुरवः ' ह्यावरून असें आपलें ठाम मत प्रदर्शित केलें आहे कीं शके ६०० च्या सुमारानें झालेल्या बाणभट्टाचे वेळीं **व्याडिकृत संग्रह** हा व्याकरणग्रंथ विद्यमान असून त्याचें पठण चालू होतें. सदरहू हर्षचरितांतील वाक्य पाहिलें म्हणजे सकृद्दर्शनीं असं वाटतें खरें परंतु सदरील अनुमानास बाधक अशीं दुसरीं प्रमाणें आहेत त्यांचा रा. राजवाडे यांनीं आपल्या स्फुट लेखांत उल्लेख केलेला दिसत नाहीं. प्रसिद्ध वैयाकरण भर्तृहरि यांचा व्याकरणशास्त्रावर ' वाक्यपदीय ' म्हणून अत्यंत कठीण व सर्वमान्य असा ग्रंथ आहे. चिनी प्रवाशी ' इत्सिंग ' याचे प्रवासवृत्तावरून वैयाकरण भर्तृहरि हे इ. स. ६५० च्या सुमाराला वारले असावे असें दिसतें. वाक्यपदीयाच्या दुसऱ्या काण्डाचे अंतीं खालील श्लोक आहेतः

> प्रायेण संक्षेपरुचीनल्पविद्यापरिग्रहान् ।
> संप्राप्य वैयाकरणान्संग्रहेऽस्तमुपागते ॥
> कृतेऽथ पतञ्जलिना गुरुणा तीर्थदर्शिना ।
> सर्वेषां न्यायबीजानां महाभाष्ये निबन्धने ॥
> अलब्धगाधे गाम्भीर्यादुत्तान इव सौष्ठवात् ।
> तस्मिन्नकृतबुद्धीनां नैवावस्थित निश्चयः ॥
> बैजिशौभवहर्यक्षैः शुष्कतर्कानुसारिभिः ।
> आर्षे विप्लाविते ग्रंथे संग्रहप्रतिकंचुके ॥
> यः पतञ्जलिशिष्येभ्यो भ्रष्टो व्याकरणागमः ।
> काले स दाक्षिणात्येषु ग्रन्थमात्रे व्यवस्थितः ॥

ह्यांतील महत्त्वाचा भावार्थ असा आहे कीं 'संक्षेपाची च ज्यांना आवड, ज्यांचें विद्येचें भांडवल अल्प आहे अशा वैयाकरणांचे हातीं पडून संग्रह( ग्रंथ ) अस्तगत झाला. पतंजलीनें संग्रहाशीं ( विद्वत्तेनें ) स्पर्धा करणारा असा महाभाष्य ग्रन्थ रचिला त्याचा बैजि, शौभव, हर्यक्ष्य वगैरे शुष्क तर्कांचे भरीस पडलेल्या लोकांनीं विपर्यास केला इत्यादि. ह्या अवतरणावरून भर्तृहरीचे कालीं संग्रह ग्रंथ लुप्त झाला होता असें स्पष्ट दिसतें. भर्तृहरी हा बाणभट्टाचा समकालीन होता. तेव्हां या दोघांचे ग्रंथांत परस्पर विरोध येतो त्याचा परिहार कसा करावयाचा? मला वाटतें तें नम्रपणें मी सुचवितों. तें ग्राह्य आहे कीं नाहीं तें. रा. राजवाडे

---

१ Max Muller's 'India: What can it teach us'. p. 385 ( edition of 1883 ).

व इतर विद्वान् लोकांनीं ठरवावें. बाणभट्ट हा कांहीं वैयाकरण नव्हता व हर्षचरित हा व्याकरण ग्रंथ नव्हे. शिवाय हर्षचरिता मध्यें 'सुकृतसंग्रहाभ्यासगुरवः' हें पद श्लेषचमत्कार दाखविण्यासाठीं घातलें आहे. शेवटीं 'लोके इव व्याकरणेऽपि' असें त्या वाक्यांत शब्द आहेत. व्याकरणाचे न्यास, वृत्ति, वगैरे ग्रंथांचा श्लेषानें उल्लेख व्हावा एवढा च अभिप्राय आहे. पण भर्तृहरी हा महान् वैयाकरण असून आपल्या व्याकरणग्रंथांत स्पष्ट सांगतो कीं संग्रहग्रंथ अस्तास गेला आहे. म्हणून भर्तृहरीचें वाक्य खरें, व बाणभट्टाचे लिहिण्यावरून काढलेलें अनुमान चूक. संग्रहग्रंथाचा लोप झाला तरी अशा प्रकारचा ग्रंथ झाला म्हणून प्रसिद्ध होतें व त्यांतील कांहीं कारिका अवशिष्ट राहिल्या होत्या व त्या आधुनिक ग्रंथकारांचे हि ग्रंथांत क्वचित् येतात. म्हणून 'सुकृतसंग्रहाभ्यासगुरवः' यावरून संग्रहग्रंथ साग्र विद्यमान होता असें च अनुमान काढलें पाहिजे असें प्राप्त होत नाहीं. संग्रहाच्या अवशिष्ट राहिलेल्या कारिकांचें अध्ययन त्यांनीं केलें होतें असा अर्थ करून ह्या पदाची गति लाविता येते व भर्तृहरीचे वचनांशीं विरोध हि येत नाहीं. विद्वानांनीं माझे म्हणण्याचा विचार करून आपआपला अभिप्राय कळवावा.

पांडुरंग वामन काणे

# ६९ शाहाजी महाराजांचे वृंदावन व निधनतिथि

१ थोरले शाहाजी महाराजांसंबंधानें त्यांची निधनतिथि व निधनस्थान ह्या दोही गोष्टींचा अद्याप कोणीं निश्चित असा निर्णय केलेला नाहीं. इतिहास-लेखकांत व संशोधकांत ह्या दोन्ही बाबींसंबंधानें तीव्र मतभेद आहे. अशा स्थितींत मला मिळालेल्या माहितीच्या आधारें व मुकत्या च म्हैसूरप्रांतांतील फेरीनें ह्या दोन हि प्रश्नांचा समाधानकारक निकाल लावावा ह्या हेतूनें खालील मजकूर लिहिला जात आहे.

२ थोरले शाहाजी महाराजांच्या मृत्युतिथीसंबंधानें पाहातां काव्येतिहास-संग्रहांतील चारशें दहाव्या यादींत व मल्हार रामरावकृत सप्तप्रकरणात्मक चरित्रांत ( पृ. ८० ) 'शहाजी शके १५८३ पुव नामसंवछरे माघ शुद्ध पंचमीस म्हणजे १६६२ च्या १५ जानेवारीस वारला' असें लिहिलेलें आढळतें. डफ शाहाजी महाराज १६६४ च्या जानेवारींत वारले म्हणून लिहितो. भारत-इतिहास-संशोधक मंडळाचा शके १८३५ चा अहवाल पृ. ३७९ वर मीं धडफळे यांच्या संपादिलेल्या यादींत सदरहूबद्दलची माहिती दिलेली आहे. धडफळ्यांच्या यादींत ही मिति 'माघ शुा ६ शके १५८५ शोभकृत संवछर'

अशी दिलेली आहे. परंतु, ह्या मितीस वार कोणता होता हें कोठें लिहिल्याचें मला त्या वेळीं न आढळल्यामुळें ह्या मितीचा निर्णय करणें तसें च राहिलें. रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांस भोर संस्थानांतील कारी येथील जेधे घराण्यांतील एका वंशजाकडून शिवकालीन मित्यांचें व प्रसंगांचें एक विश्वसनीय व नमुनेदार टांचण मिळालेलें आहे. तें श्रीमंत सरदार खंडेराव मेहेंदळे संस्थेचे चिटणीस ह्यांनीं मला नुकतें च रुपेनें दिलें. ह्या टांचणांत शाहाजी महाराजांच्या मृत्यूचा उल्लेख तिथी व वार ह्यांसह केलेला आहे. ह्या टांचणांतील मिति व मीं संपादिलेल्या धडफळे यांच्या यादींतील मिति एक च होत. वाराचें गमक सुदैवानें मिळाल्या-मुळें ह्या प्रश्नाचा निकाल कायमचा च होत आहे. टांचणांत वार शनिवार दिलेला आहे. सूक्ष्म गणीत करून पाहातां तिथि आणि वार ह्यांची सांगड बरोबर जमते. तेव्हां माघ शुा ६ शोभकृत संवत्सर शके १५८५ ही च महा-राजांची मृत्युतिथि निश्चयानें समजण्यास कांहीं एक प्रत्यवाय नाहीं. सदर दिवशीं इंग्रेजी तारीख २३ जानेवारी इ. स. १६६४ ( जुनी पद्धत ) ही येते.

२ दुसरा प्रश्न मृत्युस्थानाबद्दलचा आहे. ह्यासंबंधानें सर्व च प्रकार मासले-वाईक असा झालेला आहे. डफ सदर स्थान तुंगभद्रातीरीं असलेलें बसवापटण गांव हें होय असें म्हणतो. डफ शिवाय बाकीचे यच्चयावत् इतिहासकार बेदिकिरे अगर बेद्किरे असें असल्याचें सांगतात. रा. सरदेसाई यांनीं मराठी रियासतीच्या आपल्या इतिहासांत ' शाहाजी तुंग भद्रातीरीं बेदिकेरे ऊर्फ बसवपट्टण येथें वारले ' असें लिहून हीं दोन्हीं गांवें एक च होत असें केवळ अज्ञानानें म्हटलें आहे. डफनें हि बसवापटण हें तुंगभद्रातीरीं वसलेलें आहे हें जें विधान केलें तें भूगोलदृष्ट्या साफ चुकीचें आहे. बसवापट्टण व तुंगभद्रा ह्यांचा कांहीं एक संबंध नाहीं. डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीच्या विद्यमानें छापलेल्या शाहू महाराजांच्या रोजनिशींत पृ. ३६ वर ह्या संबंधानें माहिती देतांना सलास सलासीन मया व अलफ साबान १ ह्या रोजीं दिलेल्या ताकीदपत्राचा जो मथितार्थ दिलेला आहे त्यांत महाराज राजश्री कैलासवासी यांचें वृंदावन मौजे येरगटनहळी संमत बोदि-गिरी मामले बासवापट्टण येथें असल्याचा उल्लेख आहे. सनदापत्रांतील माहिती (Sanads and Letters )चा जो एक व्हाल्यूम शेठ पुरुषोत्तम विश्राम व रा. ब. द. ब. पारसनीस ह्या उभयतांनीं संपादिलेला आहे त्यांत पृ. १०७ वर शाहू छत्रपतीच्या रोजनिशींतील वर उद्धृत केलेली गोष्ट पुनरुक्तीनें विनाकारण नमूद केलेली आहे. व शाहूच्या रोजनिशींत संमत बोदि-गिरी असें होतें तेथें ह्या अलिकडच्या पुस्तकांत बेदिगिरा व बासवापट्टण याचे जागीं बसवापटण असे शोध घातलेले आहेत. असल्या प्रकारच्या नोंदणीचा इति-हास-संशोधकांस व सामान्य वाचकांस कांहीं एक उपयोग होत नाहीं. वाचकानें हें

गांव काढावें कसें ! ह्या बेदिगिरे, बोदिगिरी अगर बेदिकिरे गांवांचा शोध लावतां लावतां खरोखर च नाकीं नव आले. वास्तविक प्रकार असा आहे कीं, निधनस्थान बोदिगिरे, बेदिकिरे अगर डफचें बसवपट्टण ह्यां पैकीं एक हि नसून ते होदिगिरे असें आहे. मोडींतील हो बद्दल शिवकालीन पत्रव्यवहार वाचण्याचा सराव नसणाऱ्या मंडळींनीं बे असें अक्षर साहाजिक च चुकीनें वाचल्यामुळें असा हा अनर्थ ओढवला.

४. म्हैसूर प्रांतांतील शिमोगा जिल्ह्यांतील चन्नगिरि तालुक्यांत होदिगिरे व येरगटनहळ्ळी ह्या जवळ जवळ असणाऱ्या दोन्ही गांवांशीं महाराजांचे मृत्यूचा संबंध आहे. येरगटनहळ्ळी हें खेडें पूर्वी होदिगिरि संमत, मामले बसवापट्टण ह्यांत मोडत असे. आतां हीं दोन्ही गांवें चन्नगिरि तालुक्यांत मोडतात. बसवापट्टण येथील पाळेगार नाईक घराणें इतिहासप्रसिद्ध आहे. शाहाजीमहाराज ह्या नायकावर चालून गेले असतां होदिगिरे ह्या गांवीं उतरले होते व तेथें च त्यांचा लष्करी तळ होता. त्या जागेस अद्याप हि 'कुदुरे लायद होला' असें म्हणतात. कुदुरे, लायद, होला ह्या शब्दांचा अर्थ अनुक्रमें घोडा, तबेला व शेत असा आहे. व ह्या ठिकाणीं मराठ्यांनीं तळ दिला होता हें तेथील खाणाखुणांवरून स्पष्ट होतें. जवळपास अद्यापि असलेली मराठ्यांची वस्ती व तदनुषंगिक इतर गोष्टी ह्या वरील विधानास समर्थक असा पुरावा म्हणून देण्यास हरकत नाहीं. होदिगिरे गांवास जाण्यास जवळचा मार्ग म्हटला म्हणजे होललकिरे हें एम्. एस्. एम्. रेल्वेवरील स्टेशन होय. होलिलकिरे हें गांव चितलदुर्ग (चित्रदुर्ग) ह्या जिल्ह्यांतील एक तालुक्याचें ठिकाण होय. होलिलकिरें हें गांव होलिलकिरे स्टेशनापासून चार मैलांवर आहे. तिकडे न जातां स्टेशनापासून परभारें चन्नगिरीकडे जाणाऱ्या सडकेनें आठ मैलांवर नजीक च होदिगिरे व येरगटनहळ्ळी हीं गांवें आहेत. होदिगिरी येथील शानभोग (कुलकर्णी व देशपांडे) रा. तिमाप्पा बिन गंगाप्पा नाडगीर यांचे मालकीच्या सर्वे नं. २१९ पोट नंबर १ ह्या शेतांत महाराजांचें वृंदावन आहे. हें पूर्वी येरगटनहळ्ळी ह्या गांवाच्या सीमेंतच असलें पाहिजे. वृंदावन ऑरसचौरस ९ × ८ फूट ३ इंच असें आहे. वृंदावनाची दक्षिण बाजू व उत्तर बाजू प्रत्येकी ९ फूट व पश्चिम आणि पूर्व बाजू ८ फूट ३ इंच अशा आहेत. ह्या दगडाचा घेर २ फूट आहे. ह्या चबुतऱ्यावर मधोमध चुन्यांत बांधलेलें असें वृंदावन आहे. चुनेगची कामाच्या पूर्व आणि पश्चिम बाजू ४ फूट २ इंच आहेत. व उत्तर आणि दक्षिण बाजू ह्या ५ फूट आहेत. चबुतऱ्यावरील वर सांगितलेलें चुनेगची काम आतां अवघें ११ इंच उभें राहिलेलें आहे. चबुतऱ्याचे पश्चिमेस चबुतऱ्याला लागून च एक पांढरा संगमरवरी दगड ३ फूट ७ इंच उंचीचा उभा आहे. ह्या दगडांतच दिवा ठेवण्याकरितां एक भोंक ठेवलेलें आहे. चबुतऱ्याची

पूर्व बाजू अत्यंत नादुरुस्त आहे. उत्तरेकडील बरा च भाग वाहून गेलेला आहे. वृंदावनावर आच्छादन वगैरे कांहींएक नाहीं. ह्यामुळें व ह्या समाधीची आठवण च बुजून गेल्यामुळें समाधीची अशी दुर्दशा झालेली आहे. सन सलास सलासीन मया व अलफ साबान १ म्हणजे माघ शु॥ ३ रविवार शके १६५४ ता. ७ जानेवारी १७३३ पावेतों व त्यापुढें हि कांहीं दिवस वृंदावनाची पूजा उर्जा होत असे. त्या वेळीं ही पूजा बसवापट्टण येथील ध्यानभारथी गोसावी ह्याचा शिष्य बालखंडी भारथी ह्याकडे असून वृंदावनाचे पूजाउर्जेस येरगटनहळ्ळीचा वसूल लावून दिलेला होता. पण पुढील अस्मानी सुलतानीमुळें ह्या व्यवस्थेंत फरक होऊन वृंदावनाची वर सांगितल्याप्रमाणें अत्यंत शोचनीय अशी स्थिति झाली. हल्लीं ज्या शेतांत सदर वृंदावन आहे तें शेत पूर्वी वनचराईचें होतें. परंतु सुमारें ३० वर्षांपूर्वी शेताचे त्या वेळचे मालक गंगाप्पा यांचे मनांत सदर शेत लागवडीस आणण्याचें येऊन शेताची सफाई करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. ह्या वृंदावनावर त्या वेळीं मातीचा ढिगारा होता. खणतांना सदर वृंदावन नजरेस आल्यामुळें त्यानें तें तसें च ठेवलें. चन्नगिरी येथील मराठे मंडळांतील प्रमुख लोक व चन्नगिरी तालुक्याचे अंमलदार ह्यांनीं दिलेल्या मदतीमुळें मीं परवां समाधीवरील घाण वगैरे काढून ती व्यवस्थित रीत्या मोकळी केली. दिलेल्या मदतीबद्दल चन्नगिरींतील मराठे मंडळी, तेथील इंग्रजी शाळेचे हेडमास्तर व तालुक्याचे अंमलदार ह्या सर्वांचा मी ऋणी आहें.

५. येणेंप्रमाणें समाधिस्थानाचा व कालाचा इतिहास आहे. माझी अशी विनंती आहे कीं, म्हैसूर सरकारनें हें ठिकाण पुराणवस्तुसंशोधकखात्याचे हवालीं करून त्याचे डागडुजीची व्यवस्था करावी. मराठ्यांच्या इतिहासांत हें स्थान महत्वाचें आहे व त्याची व्यवस्था ठेवणें हें म्हैसूरसरकारप्रमाणें च आपणा महाराष्ट्रीयांचें हि कर्तव्य आहे. कोल्हापूर दरबारचे नजरेस ही गोष्ट आणिली पाहिजे.

पां. न. पटवर्धन

## ७० भोसल्यांच्या वसतींच्या गांवांची यादी

सोबतची यादी श्रीक्षेत्र पैठण येथील शिवछत्रपती यांचे कुलोपाध्याय कावळे यांच्या संग्रहांतील आहे. यांत भोसल्यांचीं सर्व गांवें आलीं आहेत, असें नाहीं. तरी इतकीं नांवें एके ठिकाणीं दिलेलीं आढळल्यामुळें तीं मुद्दाम येथें देत आहें. इतिहाससंशोधकांस सदरहू यादीचा निःसंशय उपयोग होईल.

पां. न. पटवर्धन

# गावांचीं नांवें

१ सातारा
२ चंदी चंदावर
३ खानवट
४ तांदुळवाडी ( ता० गंगापूर )
५ कोडरुरे, प्रा सातारा
६ जिंती
७ भांचोरे ( प्रा चांभारगोंदे )
८ नानजवळ
९ कवठ
१० राजेगांव
११ मुंड ( प्रा वाई )
१२ हिंगणी
१३ किन्ही ( वाई )
१४ सिरीम ( ,, )
१५ येसकळ ( ,, )
१६ येळू पिंपरी
१७ तारगांव नारगांव
१८ खानापूर
१९ तडवळ (प्रा वाई)
२० उधडन प्रा इंदापूर
२१ चांभारगोंदे
२२ जलालपूर ( प्रा चांभारगोंदे )
२३ शेडगांव
२४ बेलवंडी ( प्रा करड लिंबोणे )
२५ मावसडे
२६ लिंबगांव
२७ आरवी प्रतापरायाची ता॥ मानूर
२८ खुती तारापूर
२९ गांव देवळानी हंबीररायाची
३० कारल
३१ जळगांव प्रा बारामती
३२ गल्हान (प्रा दर्यापूर )
३३ तऱ्हाळे ( प्रा कऱ्हाड )
३४ सिरापूर
३५ टाकळी
३६ जोगवडी
३७ कडेठाण
३८ बाखडी
३९ बावंडी
४० पारगांव
४१ टकवाडे
४२ हिंगणगांव
४३ पळसदेव
४४ कोथूट
४५ तुळापूर
४६ पाटेवाडी
४७ दिवी खिरडी
४८ रटर
४९ आव्हाळ
५० कडसमुडी
५१ वाटार
५२ नरतवड
५३ नागापूर
५४ पडजवळ
५५ खोडसी
५६ वडस ( सातारा )
५७ उंबर ( आकळूज )
५८ इस्लामपूर
५९ मांडोगण
६० देवराष्ट्र
६१ सरकुली
६२ मंगरूळ
६३ येळंब ( वाई )
६४ सिरगाव ( वाई )

६५ जाम ( वाई )
६६ खवजनपूर ( वाई )
६७ अपसिंग ( ,, )
६८ रहिमतपूर ( ,, )
६९ सुरगली ( ,, )
७० देवपिंपरी
७१ अंगापूर
७२ शिंगणापूर
७३ बनसेंद्रें
७४ वडनेर
७५ वावी
७६ संभुखेड
७७ राजोडी बिजोडी
७८ रांजणी धुळगाव
७९ बोरगाव
८० इंदापूर
८१ फलटण
८२ माळककिरात
८३ येळकभाद्
८४ सेळव
८५ भिकवाडी
८६ जामत
८७ पारड
८८ पाटनखोर
८९ नेलकरंज
९० अंजनडोह
९१ कोल्हापूर
९२ बीड ( कोल्हापूर )
९३ चिकोडी
९४ मनराजूरी
९५ सरकोरी
९६ कळंब
९७ केरल ( प्रा दहि)
९८ गांवाकिरात
९९ कडेपूर
१०० वडगांव
१०१ करल
१०२ पिंगवत
१०३ धानवी ( गांडापूर )
१०४ वीट ( बीड )
१०५ अष्टी ( गोपाळरायाची )
१०६ जखड ( प्रा परंडा )
१०७ वेळापूर
१०८ तिळवनी सिरसगांव
१०९ रायगांव-सायगांव
११० तोडल
१११ रेवड
११२ कळस ( इंदापूर )
११३ बनवडी ( चंदनवंदन )
११४ जांबगांव ( पारनेर )
११५ मोईज ( वांई )
११६ सासूर
११७ नागोठण
११८ नागपूर
११९ कऊलग
१२० अक्कलकोट
१२१ विशालगड
१२२ हरीपूर
१२३ पंढरपूर
१२४ माणिकदौंडीची टमळवाडी
१२५ मुंगी

## ७१ रामचंद्र गणेश कानडे यांची वंशावळ

१ रामचंद्र गणेश कानडे यांचें नांव मराठ्यांचे इतिहासांत प्रसिद्ध आहे. यांचेकडे जरीपटका संभाळण्याचें काम असे. यांचें घराण्यासंबंधानें फारशी माहिती उपलब्ध नाहीं. मोंगलाईत संशोधनार्थ हिंडत असतां या घराण्यासंबंधीं जी अत्यल्प माहिती मिळाली ती येथें सादर करीत आहें. हें घराणें सध्यां कोठें नांदत आहे, एवढें च आजच्या या टिपणावरून कळून येणार आहे.

२. रामचंद्र गणेश कानडे हे कोंकणस्थ ब्राह्मण. गोत्र शांडिल्य. यांचे वडील गणेश केशव कानडे यांस श्रीशाहू छत्रपती यांणीं राज्याभिषेक शके ५१ क्रोधी-संवत्सरे फाल्गुन शु० ६ रोजीं सोनोरी येथें ६० बिघे जमीन दिली. पुढें रामचंद्र गणेश यांनीं सातवणें खुर्द, ब्रह्मवाकडी ( ता० पाथ्री जि० परभणी ), व भिलवडा ( ता० पाटोदे जि० बीड ) हीं तीन गांवें जागीर मिळविलीं; व शिवाय पंढरपूर तालुक्यांतील गोपाळपूर येथील जमिनी, जमाखिंडी संस्थानापैकीं मौजे मुढवी येथील इनाम जमीन १०० एकर, व नेवासे जि० नगर पैकीं माळवडगांव येथील पाटीलकी येणेंप्रमाणें वतन संपादन केलें. रामचंद्र गणेश यांचे चिरंजीव माधवराव यांनीं हि चांगला लौकिक मिळविला. माधवरावांचे पुत्र रामचंद्रपंत, रामचंद्रपंताचे गणपतराव, गणपतरावांचे माधवराव ( दत्तक ), माधवरावांचे रामचंद्रराव. रामचंद्रराव हे १९०१ मध्यें वारले. त्यांनीं आपल्या मुलीचा मुलगा दत्तात्रय हा दत्तक घेतला. तो निजामसरकारनें मंजूर केला असून त्याजकडे तिन्ही इनामी गांवें चालतात.

३. माळवड गांवची पाटीलकी रा. अंबादास बळवंतराव कानडे यांजकडे चालू आहे. रामचंद्र गणेश कानडे यांस त्र्यंबकराव नांवाचा आणखी एक नातू होता; त्याचे चिरंजीव हरिपंत, व हरिपंताचा अंबादास अशी परंपरा रा० अंबादास बळवंतराव यांनीं सांगितली.

४. कलम २ मध्यें सांगितलेले रा. दत्तात्रय रामचंद्र कानडे हे सातवणे येथें राहतात, व कलम ३ मधील रा. अंबादास बळवंतराव हे सवंदगांव, ता० वैजापूर, जि० औरंगाबाद येथें राहतात.

५. कानड्यांचा पुण्यांतील वाडा म्हणजे कसबा घ. नं. १४६४ हा होय.

पां. न. पटवर्धन

# ७२ गोविंद भगवंत पिंगळे

१ गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे या उभयतांचीं नांवें निजामचे राजकारणांत हमेष आलेलीं आढळतात. पैकीं गोविंदराव पिंगळे यांचे घराण्याची हकीकत कोठें वाचण्यांत नाहीं. ती मी श्री. रा. गोविंदराव नरहरराव पिंगळे, घर नं. १३, पेठ शनवार यांचे माहितीनें त्यांचे घरचे कागद पाहून येथें नमूद करून ठेवीत आहें. श्री. गोविंदराव हे गोविंद भगवतांचे पणतू होत.

२ गोविंद भगवंत पिंगळे हे मूळचे रहाणार इंदापुरचे. देशस्थ, ऋग्वेदी ब्राह्मण. गोत्र भारद्वाज. गोविंदराव काळे यांचे वशिल्यानें यांचा पेशवे सरकारच्या फडांत शिरकाव झाला. हे फडणिसांचे विश्वासपात्र कारकून होते. यांस आलेलीं पत्रें म. इ. सा. खंड ७ यांत आलेलीं आहेत, त्यांवरून यांचे संबंधींची बरी च कल्पना येईल. गोविंदराव पिंगळे व गोविंदराव काळे असे दोघे हि उभे आहेत, अशी एक तसबीर पिंगळे यांचे संग्रहीं होती, ती मी मंडळास सादर करीत आहें. गोविंदराव पिंगळे यांस पेशवे सरकारांतून सरंजाम मिळाला असून, निजामाकडून निंबगांव, सांगवी, व भाळवणी अशीं तीन गांवें इ. स. १७८३ मध्यें जागीर मिळालीं. तीं हल्लीं त्यांचे घराण्यांत चालू नाहींत. शके १७३६ चे वांटणीपत्रकांत गोविंदराव सन १२०८ फसली ( इ. स. १७९८ ) मध्यें दिवंगत झाल्याचा उल्लेख आढळतो.

३ मराठ्यांचे राज्य इंग्रजांचे हातांत आलें, त्यावेळीं निजामाकडून मिळालेलीं तिन्ही गांवें गोविंदरावांचा द्वितीय पुत्र शामराव याचे ताब्यांत होतीं. पहिला पुत्र व्यंकटराव फसली सन १२१० मध्यें वारला होता, व त्रितीय पुत्र भगवंत हा काशीस जाऊन राहिला होता. भगवंत हा मरेपर्यंत म्हणजे ता १५ मे १८६९ पर्यंत काशीस च होता. इ. स. १८२०।२१ सालच्या निजाम व ब्रिटिश यांमधील तहानें जागिरीचीं तिन्ही गांवें ब्रिटिश सरकारचे हद्दींत आलीं. शामराव हे १८२८-२९ सालीं वारले. विंहा-मांडवी येथील श्रीमंत यशोदाबाई-साहेब चंद्रचूड ह्या शामराव पिंगळे यांच्या कन्या होत.

४ शामराव वारल्यानंतर, गांवांची व्यवस्था त्यांची बायको यशोदाबाई यांजकडे आली. त्यांनीं नरहरराव यांस दत्तक घेतलें. नरहरराव यांनीं मरेपर्यंत गांवांची व्यवस्था केली. ते शके १७६८ कार्तिक शु. १४ रोजीं वारले. तदनंतर नरहरराव यांच्या पत्नी लक्ष्मीबाई या जागिरीची व्यवस्था पाहूं लागल्या. यांच्या च कारकीर्दींत १८५२ च्या ११ व्या आक्टाप्रमाणें सदरहू गांवें गोविंद भगवंत याचे त्रितीय चिरंजीव भगवंतराव यांचे मृत्यूनंतर खालसा व्हावीं, असें ठरविण्यांत

आलें. लक्ष्मीबाईनें आपल्या मुलीचा म्हणजे तुकाराम रामचंद्र यांचा मुलगा ता. १५।१२।१८६२ रोजीं दत्तक घेतला. यांचें च नांव गोविंदराव. यांचें वय ५३ वर्षांचें असून, ते सांप्रत शनवारांत आपल्या घरांत राहतात. भगवंतराव इ. स १८६९ मध्यें वर सांगितल्याप्रमाणें काशी येथें वारल्यानंतर, तिन्ही गांवें जप्त करण्यांत आलीं. आतां या घराण्याकडे लोहगांव ( ता० हवेली ), टाकळी ( ता० इंदापूर ), अकोले बुा व शेडसिंग ( ता० माढे ), सांगवी व निंबगांव ( ता० करमाळे ) येथील कांहीं वृत्ती अद्याप चालू आहेत. विद्यमान गोविंदराव यांस नरहरराव नांवाचा मुलगा असून, नरहररावांस हि व्यंकटेश म्हणून एक मुलगा आहे. गोविंदराव भगवंतराव पिंगळे यांच्या घराण्याची अशी ही त्रुटित माहिती आहे.

पां. न. पटवर्धन

## ७३ संभाजी व झेबुन्निसा

१ औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा हिचा शंभुछत्रपतीशीं प्रेमसंबंध होता, त्यास तिनें मनानें वरल्यामुळें, त्या व्यतिरिक्त दुसऱ्याशीं लग्न करणें अधर्म्य होय अशी झेबुन्निसाची समजूत असल्यामुळें ती जन्मभर अविवाहित राहिली व शंभुछत्रपतीचा मुलगा शाहु यास तिनें वात्सल्यप्रेमानें संभाळिलें, इतकें च नव्हे तर शाहूच्या सुटकेस ती च कारणीभूत झाली वगैरे हकीकत मराठ्यांसंबंधींच्या लहान मोठ्या ग्रंथांतून अलीकडील लेखकांनीं लिहिलेली आढळते. शालोपयुक्त इतिहास-पुस्तकांतून या कादंबरीवजा प्रकरणाचा उल्लेख केलेला आढळतो. अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या रा० सरदेसाई यांच्या 'मराठी रियासती' च्या नवीन आवृत्तींत पृ० ६१९ वर ही च हकीकत दिलेली आहे. या एकंदर प्रकरणांत तथ्यांश किती आहे, हें पाहणें अगत्याचें आहे.

२ रा. सरदेसाई यांनीं या बाबतींत डगलस याचा आधार जमेस धरिलेला आहे. झेबुन्निसा बेगमची हकीकत डग्लसकृत वेस्टर्न इंडिया आणि बांबे, भाग १, पृ० ३४७ वरून घेतल्याचें रा० सरदेसाई यांनीं नमूद केलें आहे. परंतु डग्ल-सकृत पुस्तकांतील या हकीकतींत व आपण स्वतः 'मुसलमानी रियासतीं'त पृ० ६९९ वर अन्य ठिकाणच्या आधारावरून दिलेल्या हकीकतींत काय फरक पडतो, याचा रा० सरदेसाई यांनीं विचार केलेला दिसत नाहीं. ही रा० सरदेसाई यांची गोष्ट; मग इतरांची कथा काय ! ! झेबुन्निसा बेगम इचें स्वतंत्र असें एकादें चरित्र उपलब्ध नाहीं. लाहोरचे मुनशी अहमदुद्दीन यांनीं झेबुन्निसाचें एक उर्दू

भाषेंत चरित्र लिहिलेलें आहे. परंतु तें हि हैयत-इ-झेबुन्निसा नांवाच्या मुनशी महमदुद्दीन यांनीं रचिलेल्या ग्रंथावरून केलेलें आहे. या च पुस्तकाचा विस्तृत गोषवारा मिसेस वेस्टब्रूक इनें आपल्या 'धुइस्डम ऑफ दि ईस्ट सेरिज, (१९१३), या पुस्तकाचे उपोद्घातांत दिलेला आहे. परंतु इतिहासदृष्ट्या या सर्व ग्रंथांची किंमत करितां, हे ग्रंथ कितपत टिकतील, याविषयीं संशय च आहे. अशा स्थितींत खाफीखान व त्या पेक्षां विश्वासपात्र जो मुस्ताइद् साकी असे उभयतां झेबुन्निसा-संबंधानें काय म्हणतात तें पाहिलें पाहिजे. मुस्ताइद् साकी यानें आपल्या 'म-आसिर-इ-अलमगिरी' या उपयुक्त ग्रंथांत या बेगमेची जी हकीकत दिली आहे तिच्या आधारें व प्रो. सरकार यांच्या 'औरंगजेब' या पुस्तकाच्या आधारें तिचें चरित्र खालीं देत आहें.

३ दिल्लीपति औरंगजेब याचें लग्न शहानवाजखानाची मुलगी दिलरस बानू इच्याशीं इ. स. १६३७ त होऊन, तिचे पोटीं औरंगजेबास पांच अपत्यें झालीं. या पांचांपैकीं झेबुन्निसा (लावण्य-लतिका) ही सर्वांत वडील असून, तिचें जन्म दौलताबाद् येथें ता. १५ फेब्रुवारी सन १६३८ रोजीं झालें. लहानपणीं च हाफिजा मरियम नामक विदुषीचे हाताखालीं हीस शिक्षणसंपादनार्थ ठेवण्यांत आलें होतें. हिची बुद्धिमत्ता दांडगी असल्यामुळें हिनें कुराणग्रंथ लहाणपणीं च मुखोद्गत केला होता. या बद्दल तिला बापानें तीस हजार होन बक्षीस दिले. फारसी व अरबी या भाषांतील अक्षरें काढण्यांत ती पटाईत होती. इतकी कीं, मोठमोठे विद्वान् तें तिचें अक्षर पाहून चकित होत. पुस्तकांचा तिचा संग्रह हि दांडगा असून, हस्तलेखांचा व नव्या जुन्या पुस्तकांचा संग्रह करण्याकरितां तिनें मोठमोठ्या पंडितांची योजना केली होती. औरंगजेबास काव्याचा जात्या च तिटकारा असल्यामुळें, तत्कालीन कवींस झेबुन्निसा बेगम इचा साहजिक च आश्रय मिळे. तिच्या आश्रयच्छत्राखालील मुकसफीउद्दीन नांवाच्या एका पंडितानें 'तफसीर' नांवाचें केलेलें उत्कृष्ट काव्य झेबुन्निसाचें च असल्याचें चुकीनें समजण्यांत येतें. जेबुन्निसा ही उत्तम प्रकारची कवयित्री होती, यामुळें तिच्या कविता कोणत्या व इतरांच्या कोणत्या हें समजणें मुष्किलीचें झालेलें आहे. दिवाण-ई-मकफी हा ग्रंथ कोणीं रचिला हें निश्चयानें सांगतां येत नाहीं, तथापि तो तिच्या नांवावर मोडतो. इच्या फारसी कविता 'मखफी' (रहस्यमयी) या टोपण नांवावर आढळतात. औरंगजेबाचा मुलगा अकबर यानें आपल्या बापाविरुद्ध बंड उभारिलें, त्या कामीं हिचें अंग असल्यानें, हिला जानेवारी १६८१ मध्यें औरंगजेबानें दिल्ली येथील सालिमगड येथें कैदेंत ठेविलें. ता. १६ जानेवारी १६८१ रोजीं राजपुत्र अकबर याचें अजमीर येथील ठाणें बादशाही सैन्यानें उधळून दिलें, त्या वेळीं या बेगमेचा अकबराशीं झालेला पत्रव्यवहार उघडकीस आल्यामुळें, हिचा चार लाखांचा

तनेसा बंद करण्यांत आला, व मालमत्ता जप्त करण्यांत आली. बंदिवासांत असतांना तिचे फार हाल झाले. ती तेथें च ता. २६ मे १७०२ रोजी दिवंगत झाली. तिला दिल्ली येथें काबुली दरवाजा बाहेर जहानरहा इचे बागेंत पुरण्यांत आलें. इंग्रजांचे रियासतींत हिची कबर ज्या बागेंत होती, ती बाग रेलवेचा रस्ता तयार होण्याकरितां घेण्यांत आल्यामुळें, तिची कबर व त्यावरील शिलालेख हीं शिकंदरा येथें ठेवण्यांत आलीं. अद्याप हि ही कबर दाखविण्यांत येते.

या हकीकतविरून झेबुन्निसा ही इ.स.१६८१नंतर दक्षिणेंत आली च नव्हती, हें उघड होतें. तिचा १६८१ तील अगर पूर्वीचा संबंध, संभाजीस घांचविण्यांत यावें अशाबद्दल तिनें धरिलेला आग्रह, शाहूशीं तिची वागणूक व बेगमपूर येथील तिची कबर वगैरे यच्चयावत् गोष्टी कादंबरींतील कथानकांत शोभण्यासारख्या आहेत. त्यांत इतिहास नाहीं, हें स्पष्ट आहे. वरील हकीकतीच्या अनुरोधानें विचार करितां रा० केळुसकर, रा० सरदेसाई इत्यादि लेखक यांची हकीकत साफ चुकीची आहे, हें म्हणणें धाष्टर्याचें होणार नाहीं.

४ संभाजीविषयक प्रेमसंबंधाची ही गोष्ट झाली. आकिलखान नामक सरदाराशीं हिचा असा च कांहीं संबंध असल्याची कथा कांहीं पुस्तकांतून दिलेली आढळते. या हकीकतींत हि कांहीं तथ्य नाहीं, असें प्रो. यदुनाथ सरकार यांनीं मॉडर्न रिव्ह्यूच्या सन १९१६ चे जानेवारीचे अंकांत साधार प्रमाणें देऊन दाखविलें आहे. भूदेव मुकरजी नांवाच्या एका बंगाली कादंबरीकारानें झेबुन्निसाचा संबंध पुण्यश्लोक श्री शिवाजी महाराज यांच्याशीं होता, असें लिहिण्यास हि कमी केलें नाहीं. 'झेबुन्निसा अने शिवाजी' या गुजराथी काव्यांत हि असा च प्रयत्न केलेला आहे. परंतु ऐतिहासिक दृष्ट्या ह्या लेखांची किंमत चिलकुल नाहीं.

५ झेबुन्निसा ही संभाजीचे वधाचे वेळीं दक्षिणेंत आली च नव्हती, हें वर दिलें आहे. औरंगजेब बादशहाबरोबर त्याची दुसरी मुलगी वृद्ध कुमारिका झिनतुनिसा ऊर्फ पादशाही बेगम होती. ती आपल्या बापाबरोबर दक्षिणेंत त्याची खाजगी व्यवस्था पहात असे. बापानंतर ती पुष्कळ वर्षे होती. ही हि दिल्ली येथें वारल्यानंतर, तिला तिनें इ. स. १७०० मध्यें बांधिलेल्या 'झिनत-अल-मसजित' या सुंदर इमारतींत पुरण्यांत आलें. पुढें इंग्रजांनीं ही इमारत घेतल्यानंतर, तिची कबर दुसरीकडे नेण्यांत आली. झिनतुनिसा ही हि दिलरसबानुचे च पोटीं जन्मली. 'झेब' व 'झिनत' हे शब्द फारसी मध्यें जवळ जवळ सारखे च असल्यामुळें, 'झिनत' या शब्दाबद्दल 'झेब' असें माआसिर-इ-अमलगिरीच्या

भा. इ.-१९

छापील प्रतीत हि दोन ठिकाणीं चुकीनें वाचण्यांत आलेलें आढळतें. शाहूस खिनतुन्निसा इचे च ताब्यांत देण्यांत आलें होतें. बेगमपूर हें नांव कां पडलें व तेथें औरंगजेबाचे एखादे मुलीची कबर आहे किंवा कसें हे प्रश्न अद्याप सुटा-वयाचे आहेत.

पां. न. पटवर्धन

## ७४ खुरशेटजी जमशेजी मोदी

खुखुशेट मोदी या पारशी जातींतील गृहस्थाचें नांव शेवटल्या रावबाजीच्या कारकीर्दींत ऐकूं येतें. सुरत येथें दावर मोदी नांवाचें एक खानदानीचें घराणें आहे. त्याची च एक शाखा खंबायत येथें जाऊन राहिली, तींत खुखुजीशेट मोदी यांचा जन्म इ० स० १७५५ चे सुमारास झाला. मॅलेट सुरतेहून पुण्याचे रेसिडेन्सीकडे आला तेव्हां त्यानें आपल्या बरोबर खुखुजी शेट यांस त्यांचे मामाचे शिफारसीवरून आणिलें, व या मुळें खुखुजी शेट यांचा मराठी राजकार-णांत प्रवेश झाला. मॅलेटनें यांची नेमणूक आपले हाताखालीं केली. पुढें त्यांनीं बाजीरावसाहेबांची मर्जी सुप्रसन्न करून घेऊन कर्नाटक प्रांताची सुभेदारी मिळविली. पेशव्यांचा दिवाण होण्याची या शेटजींची ईर्षा होती. रावबाजीचें हि त्यांचे ठिकाणीं प्रेम असे. परंतु पुढें कांहीं कारणांनीं उभयतांचा बेबनाव झाला. शेवटीं ता. २७।२।१८१५ रोजीं शेटजीनीं विष खाऊन जीव दिला. नारायण पेठेंतील सुप्रसिद्ध मोदीचा गणपती यांनीं च स्थापिला. गणपतीजवळ यांची बाग होती, ती सध्यां नातूकडे आहे. खुखुजी शेट यांस मुलगा नव्हता. त्यांनीं आपला पुतण्या पेस्तनजी होरमसजी यास आपला वारस केलें. पेस्तनजीचा मुलगा खरसेटजी; व खरसेटजीचा पेस्तनजी. या घराण्यांतील सरदार बापूजी खरसेटजी मोदी हे विद्यमान असून ते रालेज, ता० बोरसद, जि० खेडा येथें आपल्या इनाम गांवीं नांदत आहेत. त्यांजकडे कागदपत्र असावेत.

पां. न. पटवर्धन

## ७५ पेशव्यांच्या स्तुतिपर काव्य

सोबतचें ५४ श्लोकांचें लहानसें काव्य श्री० नारायणराव माधवराव जहागीरदार चिंचोली, ता० कन्नड जि० औरंगाबाद यांचे दप्तरांत मिळालें. तें त्यांचे पणजे भगवंतराव यादव मुनशी यांनीं रचून श्री० नानासाहेब पेशवे यांस अर्पण केलें.

भगवंतराव हे देशस्थ, आपस्तंब, आडनांव पठाडे द्वने, वेरुळकर. यांचे चिरंजीव त्र्यंबक भगवंत हे खर्ड्याचे लढाईंत कामास आले, काव्य स्तुतिपर असून, साधारण बरें आहे. या स्तुति-स्तोत्रावरून त्या वेळच्या स्थितीची कांहींशी कल्पना होते.या दृष्टीनें काव्य मननीय आहे. भगवंत यादवाचें हें काव्य त्यांचे वृद्ध पणतू श्री० नारायणराव माधवराव यांनीं शरपंजरीं असतां हि मोठ्या अभिमानानें व ऐतिह्यासिक प्रेमानें मुद्रणा म्हणून दाखविलें. श्री० नारायणराव सांप्रत औरंगाबादेस राहतात.

पां. न. पटवर्धन

---

श्रीगणाधिपतये नमः-श्रीसरस्वतये नमः श्रीगुरुभ्यो नमः श्रीम्हाळसाकांताय नमः श्री रामचंद्राय नमः

आदौ श्रीशिवपादपद्मयुगुले वंदुनीया मानसे
भावाचे मणिकर्णिकांबुकरुणि सिंचि तया सौरसे ।
आर्धुनी सुमने सुगंध सदने सप्रेम पंचामृता ।
घेई वाग्वर किं नृपेंद्र विदुशा जेणे घडे तोषता ॥ १ ॥
स्वामी मंगलमूर्ति चार्वेद स्मरती मार्तंड रूपे जया
ज्याचे नाम पवित्र धम स्मरता सिद्धत्व भाग्योदया
त्याचा लब्ध प्रसाद श्रीसिवमहाराजा प्रतापि क्षिती
शाहुछत्रपती तद्वंश नृपति हर्षोद्भवे वार्णिती ॥ २ ॥
त्याचे मुख्य प्रधान वंद्य सकळा विख्यात पृथ्वीवरी ।
बाळाजी प्रभू विश्वनाथस्तवने आनंदली वैखरी ॥
जेणें राज्यतरूसि यत्न उदके प्रस्फुल्ल केले जनी ।
शाहुछत्रपती सहर्ष दिधला उत्कर्ष राज्यासनीं ॥ ३ ॥
तत्पुण्यांश नभि रवी शशी महा शौर्ये यशे शोभले ।
बाजीराव प्रतापवंत विजयी आपा चिमाजी भले ॥
ज्याच्या कीर्तिपराक्रमासि स्तविता पेषा पडे मौनता ।
तेथे केवि गुणाब्धि त्या नृपतिचा जिव्हा तरे वर्णिता ॥ ४ ॥
मर्यादा त्यजुनि तथापि वंदतो मि मंदबुद्धी मुखे ।
दोषाते न धरूनि पंडितेजनि ते आयकिजे सुखे ॥
होते शत्रु थकि असंख्य इ भवत् देखोणि हे केसरी ।
धाके कांपुनि थथेरा त्यजिले जीवीत्व पैकेसरी ॥ ५ ॥

पादाक्रांत करूनि म्लेछ नृपती शिवराज्य हे रक्षिले
दीना दुर्बल भाग्यवंत पुरुषा समदृष्टिनें लक्षिले
लंकेच्या सम दुर्ग थोर वसइ जे सिंधुमध्ये असे
पाहा क्रूर पराक्रमासि करुनी ते घेतलेसे कसे ॥ ६ ॥
राजे जिंकुनि राजपुत प्रबळि तो घेतला माळवा ।
जयसिंहादि प्रकोल धाडिती करा कि त्या नृपा आळवा ॥
श्रीमद्दाशरथि तदानुज स्वये या नामरूपे जनी ।
आवतारूनि दमुनि दुष्ट असुरा उद्धारिली मेदिनी ॥ ७ ॥
विप्रोद्धार करूनि मुक्तविदुषा सन्मानिले आदरे ।
गो वाजी गज ग्राम द्रव्य सिबिका देउनिया आंबरे ॥
त्याचे पुण्यप्रभोद्भवे उगवला बाळार्क शौर्यांबरी ।
बाळाजी नृपनाथ सद्गुणनिधी अवतार हा ईश्वरी ॥ ८ ॥
ताताख्याज्य सुपुत्र विक्रमबळाच्या हो जळे वर्धले ।
मुद्रावर्ण विलोकिता सकाळिके प्रत्यक्षते पाहिले ॥
वाजी हस्ति पदाति सैनिक बहु वाद्ये सदा वाजति ।
ज्याचा खड्गप्रताप ऐकुनि अरि देशांतरि कापती ॥ ९ ॥
बंधूसि बहु ऐक्यता दिसतसे श्रीधर्मरायापरी ।
केले शौर्यबळे मदान्वित रिपु निर्माल्य पृथ्विवरी ॥
देवि विप्रकुळि सदोदित असे ज्याला अति नम्रता ।
सद्भावे विधीयुक्त जो करितसे मोरेश्वराच्या व्रता ॥ १० ॥
चित्तार्थी पुरवि कृपा करुनिया श्रीराज चिंतामणी ।
दिव्ये मौक्तिकतुल्य शुक्र गुरुच्या कर्णांचिय भूषणी ॥
रत्नाहार अनर्घ्य फार दिधले ज्यागिर रत्नाकरे ।
हर्षे सेवितसे वसतव्य जने घेऊनि वायुकरे ॥ ११ ॥
शोभे रूप सुचामरे झळकति विद्युलतेचे परी ।
राहे अष्टक सिद्धीचे निसिदिनी दास्यार्थ श्रीमंदिरी ॥
श्रीयात्रादिकरासि मुक्त करुनी पुण्यध्वजा लाविल्या ।
रत्ने ग्राम गजाश्वद्रव्य सिबिका दीनाजना दीधल्या ॥ १२ ॥
रंकाचे शत कोटिका वरुनि त्या दीधली संपदा ।
विप्राचे रुण मोचिले दवडिल्या शत्रुग्रही आपदा ॥
ज्याचि वेत्रधरे सरा प्रगटिली औदार्य बीदावळी ।
आहे आश्चर्य थोर हे म्हणउनि अल्हादिजे दुर्बळी ॥ १३ ॥
कैलासासम पर्वतावरि पाहा जे स्थापिली पर्वती ।
तेजःपुंज स्वरूप पाहुनि तिचे भानु शशी लाजती ॥

विश्वाचि जननि प्रसन्न वदना जे पूर्ण अशा करी ।
तिच्या पादसरोरुहासि नमिती भावे विरंची हरी ॥ १४ ॥
शास्त्री मुख्य सभा वर्म त्या नृपतिच्या श्री बाळकृष्णाख्यवा ।
ज्ञाने शोभविले प्रसिद्ध करुनि वाचस्पतिवैभवा ॥
वेदोचारक सामगायक महा पयोद्भवा सारिखे ।
बंधु पुत्र अमात्य रम्य वदति जे कि तयाचे सखे ॥ १५ ॥
व्यासे अर्जुन विक्रमासि कथिले अद्भुत श्रीभारती ।
केले त्यासि जयि प्रसाद्य वरवा होऊनिया श्रीपती ॥
त्याचा शौर्यप्रकाश हा प्रगटला भूभर हारावया ।
भाउसाहेब कि सदाशिव स्वये दुष्टासि माराावया ॥ १६ ॥
शत्रूचे दळहि असंख्य असता येके सरे मोडिले ।
कारुण्ये जीवदान देउनि पाहा शरणांगता सोडिले ॥
केला विक्रम थोर या कलयुगि घेऊनिया देश हो ।
पापाचा तिळतुल्य हि नुरविला या भूवरि लेश हो ॥ १७ ॥
श्रीमत्शौर्ययशे विराजित जेये रघुनाथ अवतारला ।
दादासाहेब हा तपोधन महा सत्कीर्तिने शोभला ॥
जिंकूनी कुरुदेश गुर्जर तथा लाहोर मुलतान हो ।
शत्रूचा परिहार गर्व करुनि केले तया म्लान हो ॥ १८ ॥
श्रीमन्मंगळ सजराजित यशे विश्वासराया पहा ।
चिन्ही बत्तिस लक्षणे दिसतसे पूर्णेंदु प्रत्यक्ष हा ॥
जेणे कि प्रथमोदई रणभूमि शत्रूतमा नाशिले ।
पृथ्वि निर्मळ हो यशे करुनिया आशहि व्यापिले ॥ १९ ॥
श्रीमंतात्मज बुद्धिमंत दुसरा शोभे सुदिव्यांबरी ।
मुक्ताहार गळा विराजत जसे तारांगना अंबरी ॥
माधोराय तयाभिधान दिधले श्रीलक्ष्मीनायके ।
स्वामी होउनीया प्रसन्न मजला वाक्यार्थ हा आइके ॥ २० ॥
ज्याणे उत्तम थोर नाम धरिले नारायणाचे असे ।
पावे सार्वभुमत्व सर्व जग हे त्याचे कृपेने वसे ॥
आदित्यासम नाशुनि रिपुतमा शौर्याप्रतापा करी ।
गो विप्रा प्रतिपाळुनि अतिमुदे दीनांजना उद्धरी ॥ २१ ॥
मामा त्रिंबकराव श्रेष्ट सकळा श्रीन्ममाहार्थीनिधी ।
बापुराव प्रसिद्ध नायक असे सत्कीर्तिचा अंबुधी ॥
रायाचे परमाप्त हे उभयता औदार्य कर्णापरी ।
होता आश्रय या सर्व प्रभुचा क्लेशा न राहे उरी ॥ २२ ॥

ज्याचे श्रेष्ठ जगीं पुरंदर असे उपनाम विख्यातले ।
इंद्राचे हृदईं भया निशिदिनीं शब्दे चि या घातले ॥
अबाजी माह्यादाजी सुत जो प्रसिद्ध जगति सत्कर्म धर्मात्वरे ।
आहे मान्य वदान्य मानिती जया नाना हि अत्यादरे ॥ २३ ॥

आहे धीर उदार शूर बरवा नाना परि शोभला ।
बंधूच्या परि प्रीति फारकति नाना स्वयें त्याजला ॥
बाबूराव महा धुरंधर असे फडनीस ते शोभती ।
चित्ती जे धरिती तसेचि करिती दोना जमा तारिती ॥ २४ ॥

उपकाराचे नभिचा दिनकर वदति जो असे धर्ममूर्ति ।
होता तो साह्य ज्याचा हरखुन करितो कामना सिघ्र पूर्ति ॥
जिवाजीपंत अण्णा सुखकर सकळा पुण्ये सत्ताधिकारी ।
रायासि भेटउनि द्विजवर मनिच्या सर्व चिंता निवारी ॥ २५ ॥

बापूजीसुत कृष्णराव मुनशी अपसव्या ज्ञाने पहा !
सद्भावे निज स्वामिकार्य विषईं कर्तृत्व त्याचे महा ॥
रावे राव जया वदियेले बळवंत गोपाळ हे ।
रायाच्या मनतोषणार्थ करिती कार्यास तात्काळ हे ॥ २६ ॥

नागोराव प्रसिद्ध हे उभयता गोपाळ गोविंद हरि ।
ज्ञाने मानकरी धीमंत पुरुषा दामोदराचा हरि ॥
बाळोबा अति बुद्धिमंत वदति ज्या लागि माडागणे ।
त्याचे मान्य असे प्रमाणिकपणे रायापुढे सांगणे ॥ २७ ॥

राया संनिध धर्मकार्य करितो गोविंद शिवराम हो ।
त्या नाम स्मरता मुखे श्रम हरे चित्तास विश्राम हो ॥
जिवे जीवनराव सेवक असे तात्काळ कार्या करी ।
आहे दास रुपाई त्या नृपतिचा वंदूनी आज्ञा शिरी ॥ २८ ॥

सालंकार नृपा राजारूढ पाह इंद्रापरि संपदा ।
वाद्यें वाजति सुस्वरे जययशा उच्चारिति सर्वदा ॥
सेनाभार अपार जाणुनि फणा शेषाचि हि थर्थरी ।
भूरेणूगण ऊर्ध्वपंथगमने पूर्णांबरा ते करी ॥ २९ ॥

ज्यांच्या दुंदुभिचा ध्वनी करितसे दिग्व्याळ बाधिर्यता ।
शौर्ये वीर्ये पराक्रमे निर्ज यशे शोभे ध्वजा उन्नता ॥
गायकवाड पवार जाधव भले मोदे जया साजती ।
सेनाधीप असंख्य थोर कुळिचे वर्णू तयांते किती ॥ ३० ॥

हमशेरे कवडे हि भापकर ते समरंगणींचे गडे ।
शैस्राचे रगडे करूनि दमिति शत्रूदळा रोकडे ॥
थिंदेहोळकरादि सैनिक बळि वीराश्रिये शोभले ।
अश्वी धारकरी अनेक चढती भारीशतायकळे ॥ ३१ ॥
खड्गी शूर जयासि नाम दिधले तो पूर्ण योद्धा असे ।
शत्रूचे दळ हि असंख्य असतां तात्काळ मोडीतसे ॥
यंत्रे दारुक थोर थोर चमुच्या संगे बहू चालती ।
त्यांचे उन्नत शब्द ऐकुनि गिरी पत्रा परी हालती ॥ ३२ ॥
वीणा ताल मृदांग चंगपणवे वेणू तथा झल्लरी ।
भेरि नौबत वाजती निसिदिनी जो नाद सौख्या करीं ॥
गाति गायक भाट वर्णिती यशा नृत्यांगना नाचती ।
दाऊनि कुशलत्व भाव चतुरा रंभेपरी मोहिती ॥ ३३ ॥
पाहा अहमज देव दुर्ग दुसरे विख्यात जे दक्षणी ।
येथे सिघ्र शिवध्वजा उभविल्या घेऊनि एके क्षणी ॥
होते दुष्ट उपप्लवासि करिते ते सर्व निर्दाळिले ।
विष्णूने अवतार हा धरुनिया धर्मासि संस्थापिले ॥ ३४ ॥
सोळाच्या वरि अष्ट त्यवरि जरि दोन अंक जेव्हा दिने ।
संख्या हे शक शालिवाहन असे विद्वज्जनी बोलिजे ॥
अठरासे सतरा हि ज्योतिसमते तो उतरे दुसरा ।
आहे थोर प्रसिद्ध विक्रम असे हे नाम संवत्सरा ॥ ३५ ॥
दुर्गे देश बुऱ्हाणपुर गृहिले हो याच संवत्सरी ।
शौर्याच रीवाच प्रभा विकसली सर्वत्र देशांतरी ॥
केले हे जयपत्र त्या नृपतिचे श्रवणार्थ या किंकरे ।
लोपी प्राकृत गोविली निजकरे स्मर्णार्थ हे अक्षरे ॥ ३६ ॥
मार्तंडा नृप मान्य हे करुनि संतोषवावे मना ।
पुरविजे प्रभुते प्रसन्न करुनि दासाचिया कामना ॥
साष्टांगी प्रणिपात किंकर करी पादारविंदाप्रती ।
जे म्या मूढमती यथार्थ कथिले ते आयके भूपती ॥ ३७ ॥
वेरूळि शिवपादपद्मयुगुळी वास्तव्य माझे असे ।
मेहि फार कुटुंब आय पुरता योगक्षमाते नसे ॥
अपसव्ये यवनाधिराज स्तविला त्याने मला दीधली ।
संतुष्टूनि बहुत मनूसबसदीत तजवीज ही लाधली ॥ ३८ ॥

हौता हेत समीप ग्राम बरवा द्यावा तयापासुनी ।
हे आशा परिपूर्ण राव करिशी आलो तया लागुनी ॥
घेऊनि ऋण भक्षिले तदुपरि आलो तुझ्या दर्शना ।
लोखंडा परिसासी गांठ पडता का दोष या प्राक्तना ॥ ३९ ॥

ब्रम्हस्वे बहु पिडलो म्हणउनि राया तुला प्राथिले ।
वर्षे पूर्ण दयाघना तदुपरि दे कल्पवृक्षा फळे ॥
ठेवी हस्त कृपार्णवा मम शिरी श्रीमंत राजेश्वरा ।
विष्णूचा अवतार पूर्ण दिससी या भूवरि दूसरा ॥ ४० ॥

ग्रामे द्रव्य गजाश्व फार सिबिका देसी बहुता जना ।
सेवा थोर वरिष्ठ योग्य पुरुषा नानाप्रकारे धना ॥
आता होयी कृपाळ सत्वर करी ऐसी कळा प्रेमळा ।
सिंधू ज्या चिरकाळ घेऊनि वसे या किंकराच्या स्थळा ॥ ४१ ॥

द्यावा ग्राम समीप उत्तम बहु स्वामि स्वदेशी मला ।
तेथे किंचित हि पराशचि नसे विख्यात हो चांगला ॥
वस्ती होउनि इक्षुदंड रुहति वृक्षा फळे लागती ।
धान्य शालिवने अनेक पिकती तुळसीवने शोभती ॥ ४२ ॥

होती अंब्रफळे रसाल मधुरे जे लाजवीति मद्दा ।
चंचू द्रोण भरूनिया द्विज रसा त्या भाक्षितो सर्वदा ॥
द्राक्षा मंडप कर्दळि उपवना जाणूनि मेघांबरी ।
गाती मत्त मयूर नृत्य करिती गंधर्ववृंदापरी ॥ ४३ ॥

होती फार गुलाब चंपक तरू अरविंद ही सेविती ।
गंधे बद्धदमत ( ? ) होऊनि मुखे सार आलापिती ॥
भक्षत्रालि परी सुशोभित वनी हो मालती मोगरे ।
मानूनी शुक कोकिळा झडपिती की शर्करेचे गरे ॥ ४४ ॥

होती रामफलादि दाडिम फळे सीताफळे श्रीफळे ।
अंजीरे अति मिष्ट इष्ट असती बदरी फळा जांबळे ॥
निंबे-पानक देति पाथिकजना घालूनिया शर्करा ।
मार्गाचे श्रमहारके वदति ते गोविंद नामा स्मरा ॥ ४५ ॥

नारिंगे कवळे रसिक फणसे शहतुजांबावळी ।
खिरनिया पपय अनेक परिच्या मेव्याचिया आवळी ॥
भारद्वाज ममोल बुलबुल तथा निलम्बिवाचे थवे ।
उद्यानी सुफळीत वृक्ष असता येताति हर्षोद्भवे ॥ ४६ ॥

मक्षूनि महदोछवे शडरसा पत्रासनी बैसती ।
आसिर्वाद करूनि धन्य म्हणती राया तुला वर्णिती ॥
पात्रि स्वर्ण सुगंध दाविति जना प्रत्यक्ष ही केतकी ।
देखोनि सुरयोषिता कुरळ त्या व्याळासमासक्तकी ॥ ४७ ॥

पुष्पे गंधित पारिजातक तरू शाखा करे वर्षती ।
अर्पूनि अमरांगना हरि रमे गौरिहरा वर्षती ॥
कस्तूरि मृग वर्ग ते विहरति संतोषती त्या जळे ।
यत्ति हंस सुखे मुखेचि चुगति उदबिंदु मुक्ताफळे ॥ ४८ ॥

होऊनि हरि सद्य त्या भूमिवरी श्रीविष्णुपादांबुजे ।
रम्ये जे सुख दे सुरेंद्र नृपति येती तयाचे पुजे ॥
तेणे श्रेय तुम्हासि उत्तम असे लाधे कवी हि धना ।
गोविप्रार्चन अग्निहोत्र करुनि वर्ते समाराधना ॥ ४९ ॥

द्यावे मुद्रिक ग्रामपत्र करुनि जे पुत्र पौत्रादिका ।
अन्नाच्छादन आश्रयास्तव घडे दातृत्व हे जीविका ॥
दातारा गुण सागरा नृपवरा ऐसी करावी दया ।
कोणाचि अन घडे अतःपरा स्पृहा जेणे द्विजा तोषया ॥ ५० ॥

जाला हा स्तव पूर्ण किंकर म्हणे अश्वीन मासांतरी ।
पक्षि कृष्ण चतुर्थईचा अभिचिती इंदेचिया वासरी ॥
रायाचे श्रवणि पडो मज घडो संतोषता या मनी ।
मार्तंडा प्रभुच्या रूपे करुनिया संन्मान दीजे जनी ॥ ५१ ॥

षष्ठी वद्य तिथीसी जाणुनि महा हो मार्गशीर्षांतरी ।
आनंदे महदोछवे शुभदिनी गोदावरीच्या तिरी ॥
श्रीमंता करि अर्पिली कमळ जे रत्नोदधी आत्मजा ।
राय द्रव्य अपार शुध मतिने दातृत्व केले द्विजा ॥ ५२ ॥

आकाशे बहु सोडिल्या निजकरे लग्नोछवाचे निशी ।
लीला दारुक चंद्रज्योति हवया नक्षत्र पुष्पे तसी ॥
मार्तंडा सफळित हो नव रूपे श्रीलक्ष्मीची लता ।
रायाचे मन तोषणार्थ्हे घडवी श्रौतादि कर्मी व्रता ॥ ५३ ॥

वाचालत्वे जोति यादव सुते सांभाळि जे वैखरी ।
बाळाजी नृ(प) थोर प्रेमळ असे तो पूर्ण आशा करी ॥
मा. इ.-२०

कल्याणेज्जीत इछि त्या नृपति चे घृष्णेश्वराचे स्थळीं ।
पादाक्रांत असोत शत्रु अवघे होऊनिया निर्बळी ॥ ५४ ॥
श्री मार्तंड आशा परिपूर्ण करो'

भगवंत यादव येरुळकर

## ७६ हणमंते यांची एक सनद व वंशावळ

नारायण त्रिमल दीक्षित हे थोरले शहाजी महाराज यांचे पदरीं होते. त्यांस त्यांनीं बाणेरे, ता० हवेली जि० पुणें हा गांव शके १५७१, मार्गशीर्ष शु. १२ रोजीं धारादत्त इनाम करून दिला. पुढें थोरले शाहू महाराज यांनीं शके १६५७ आश्विन वद्य ९ रोजीं नारायण त्रिमल यांचे पणतु गंगाधर व रघुनाथ त्रिमल या उभयतांस सदर गांवाबद्दल नवीन सनद करून दिली. या नवीन सनदेची नक्कल ( शके १५७१ चे पत्रासह ) वाल्हे येथील अजहत देशमुख यांच दप्त- रांत पहावयास मिळाली. तिची अक्षरश: केलेली नकल सोबत जोडिली आहे. ह्या वरून थोरले शहाजी महाराजांनीं नारायण त्रिमल यांस बाणेरे गांव इनाम दिल्याचें उघड होतें.

दुसरें, या पत्रावरून नारायण त्रिमल दीक्षित हणमंते यांची चार पिढ्यांची वंशावळ हि तयार होते. रा. ब. काशीनाथ नारायण साने यांनीं शके १८३७ च्या 'चित्रमय जगत्'चे जादा अंकांत हणमंते घराण्यासंबंधानें कांहीं नवीन माहिती दिलेली आहे. माहितीचे शेवटीं त्यांनीं जी वंशावळ दिली आहे, त्यांत जनार्दन नारायणाची च वंशावळ आहे. नारायण त्रिमल यांचा दुसरा मुलगा 'राजव्यवहारकोशाचा' कर्ता रघुनाथ नारायण याचे घराण्याचे वंशवेलाचा मागमुस नाहीं. रघुनाथ नारायण हा तर प्रसिद्ध च आहे. त्याचा मुलगा त्र्यंबक ऊर्फ तिमाजी हा राजाराम महाराजांबरोबर चंदीस गेला होता. पुढें पुढें हा कोल्हापूरचा मुख्य प्रधान झाला. मुख्य प्रधानकीचा याचा शिक्का रा. मुंडले यांस सांपडलेल्या एका कागदांत पाहिल्याचें मला स्मरत असून, रा० दत्तोपंत आपटे, फोंडा–गोवा यांनीं नुकत्या च दाखविलेल्या कागदांत हि हा शिक्का आढ- ळून येतो. या त्र्यंबक ऊर्फ तिमाजी रघुनाथाचा एक संस्कृत ग्रंथ रा० राजवाडे यांचे कऱ्हाडचे संग्रहांत असून त्यावर त्यांनीं शके १८३६ सालीं आपल्या मंडळासमोर एक टांचण हि वाचलेलें आहे. या त्र्यंबक ऊर्फ तिमाजी रघुनाथाचे गंगाधर त्रिमल व रघुनाथ त्रिमल असे दोघे चिरंजीव होते. त्यांस च शके १६५७ त थोरले शाहू यांनीं दिलेली सनद सोबत आहे. या उभयतांपैकीं गंगाधर त्रिमल

याचीं कांहीं पत्रें गंगाधर त्रिमल सुमंत अशा मजकुराचीं रा० दत्तोपंत आपटे यांचे संग्रहांत आहेत. यावरून तिमाजी रघुनाथ प्रधान याचे मृत्यूनंतर कदाचित् त्याचे हयातींत गंगाधर त्रिमल कोल्हापूर दरबारीं सुमंत पदावर होता असें होतें. या सर्व हकीकती वरून जो वंशवेल तयार होतो तोः—

- नारायण
  - रघुनाथ
    - तिमाजी
      - गंगाधर
      - रघुनाथ
  - जनार्दन

ही वंशावळ रघुनाथ नारायण यांचे शाखेची होय. रा० सरदेसाई यांनीं आपल्या मराठ्यांच्या रियासतींत पृ० ७५१ वर या घराण्याची वंशावळ देण्याचा प्रयत्न केला आहे. थोरले शाहुमहाराजांचे कारकीर्दींत अबूराव यास अमात्यपदाचीं वस्त्रें देण्यांत आलीं. हा अबूराव रा. ब. साने यांचे म्हणण्याप्रमाणें जनार्दन नारायण यांचे वंशांतील अगर रा. सरदेसाई यांचे म्हणण्याप्रमाणें तिमाजी रघुनाथ याचा भाऊ होता ह्याचा उलगडा झाला पाहिजे. कणेरी, कोल्हापूर, तंजावर व सातारा इत्यादि ठिकाणीं हणमंते घराण्याचा शोध केल्यास तपास लागण्याचा संभव आहे.

पां. न. पटवर्धन

श्री

शके १६५७ अश्विन वद्य ९

नकल

स्वति श्री राज्याभिषेक शके ६२ राक्षसनाम संवत्सरे अश्विन बहुल नवमी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपति स्वामी याणी

राजश्री गंगाधर त्रिमल व रघुनाथ त्रिमल उपनाम हणमंते गोत्र मुद्गल सूत्र अश्वलायन यांसी दिल्हे इनामपत्र ऐसीजे तुम्ही साताराचे मुक्कामी स्वामीसन्निध विनंति केली जे आपले पणजे राजश्री नारायण त्रिमलदीक्षित यांस महाराज राजश्री शाहाजी महाराज यांणी मौजे वाणेरे ता। हवेली प्रांत पुणे हा गांव धारादत्त इनाम कुलबाव दरोबस्त वंशपरंपरेने करून दिला त्याप्रमाणे महाराज राजश्री थो-

रले कैलासवासी स्वामी व राजश्री संभाजी महाराज व राजश्री राजाराम साहेब यांचे कारकीर्दीपरियंत इनाम चालला अलिकडे राजाराम साहेब चंदीस गेले त्या समागमे आपले बाप तिमाजी रघुनाथ चंदीस गेले जाते समई मौजे मजकूर श्री नारायण देव चिंचवडकर यांचे स्वाधीन कसाविसीस केला ते गावचा ऐवज आम्हाकडे पाठवीत होते त्या उपरि महाराज साहेब मोगलाईतून स्वराज्यास आले ते समई देवानी कमाविसीमुळे वहिवाटा चालत होता त्यामुळें मौजे मजकूर आपणाकडे इनाम करून घेतला परंतु गावचा ऐवज आम्हाकडे च वसूल देत होते व नारायण देवानीं महाराजांस पत्र हि दिल्हे आहे जे मौजे मजकूरचा वडिलास पुरातन इनाम आहे त्याप्रमाणें पत्रें करून देऊन चालविला पाहिजे म्हणून पत्र आहे तें हि मनास आणून आपला गांव आपणास इनाम करार करून द्यावा म्हणोन विनंती केली व नारायण देवाचे पत्र व पूर्वील पत्र राजश्री महाराज शहाजी राजे व थोरले कैलासवासी महाराज यांचीं पत्रें आणून दाखविलीं त्याचा मजकूर

" अजरख्तखाने महाराज राजश्री शहाजी राजे दाइम दौलत हूं बजानेब् कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी प्रांत पुणे बिदानद सु॥ खमसैन अलफ दरीविले बाबत इनाम राजश्री नारायण त्रिमल दीक्षीत यास इनाम मौजे बाणेरे ता॥ हवेली प्रांत पुणे देह एक देखील नख्तयाती व महसूल व बाजे उजबती देखील तालुका ठाणे व तालुका देहाय व ठाणेबाब व सैलभैलं व मोईन व सादिलवार व खर्चपट्टी व पायपोसी व दसरापट्टी व ठाणेभेट व हुजूरभेट व मोहीमपट्टी व हेलपट्टी व तमाखू व बागाईत व अहिस्थान व विराहिस्थान व मोहतर्फा व थळजकाती निकाळू व पैसाळू व अश्वजकाती व ठाणबंदी व गाडा व घोडा व बंदी व बरदा व मेढी स्थळ व वेसीपेढी व पालभारा व बेगारी व राबता व अडपाली व कानू व गैरकानू व कमावीस हाल व पेस्तर वेठबेगार फर्मासी व सरहरसद व बार नमजग आंबराई कुलबाब कुलकानू बाब महसुलेसी मौजे मजकूर देह १ अजरामऱ्हामत करून इनाम दिधला असे दुमाले करणे अवलाद अफलाद चालविणे यास मुसलमान होऊन जो कोणी इस्कील करील त्यास मकेमधे सूर मारल्याची सोगंध असे व हिंदु होऊन जो कोण्ही इस्कील करील त्यास कासीमधे गाई मारल्याचें पाप असे हर दरसाल ताजे खुर्दखताचा उजूर न करणें तालिक लिहोन घेऊन अस्सल दीक्षित मजकुरापासी परतोन देणे छ १० जिल्हेज "

येणेप्रमाणे पत्र तुम्ही आणून दाखविले व कैलासवासी राजश्री थोरले महाराज तीर्थरूप आबासाहेब व तीर्थरूप काकासाहेब यांचीं पत्रें आणून दाखविली ती मनास आणून मौजे मजकूर तुमचा पुरातन इनाम चिंचवडकर देव यांचे

कमाविसीचे वहिवाटीमुळें आपणाकडे करून घेतला असे जाणून स्वामी कृपाळु होऊन मौजे मजकूर देवांकडून दूर करून हल्ली तुम्हास स्वराज्य व मोंगलाई अमल एकून दुतर्फा कुलबाब कुलकानू देखील इनाम तिजाई व सरदेशमुकी व साहोत्रा व सरपाटलिकी व सरगौडकी व हलीपटी व पेस्तरपटी जल तरु पाषाण निधिनिक्षेप सहित खेरीज हकदार व इनामदार तुम्हास व तुमचे वंशपरंपरेने इनाम करार करून दिला असे तरी तुम्ही मौजे मजकूर चतुःसीमापूर्वक मर्यादेप्रमाणे आपले दुमाले करून घेऊन मौजे मजकूर सदरहूप्रमाणे तुम्ही व तुमचे वंशपरंपरेने इनाम अनुभवून सुखरूप राहणे

## ७७ श्रीएकनाथांचा वंशवृक्ष

सोबत नाथांचे घराण्याचा वंशवृक्ष दिला आहे. तो नाथांचे पणजे भानुदास यांजपासून तो आज तागायत मित्ती पावेतोंचा दिलेला आहे. निजाम सरकारचे हद्दींत ज्या कांहीं मोठ्या जागिरी आहेत, त्यांत पैठणची जागीर बरी च मोठी आहे. शिवाय पैठणच्या संस्थानचें धार्मिक दृष्ट्या हि अतोनात महत्त्व आहे.

नाथ संस्थानास पहिली देणगी नाथांचे निपणतु रामचंद्रबोवा यांचे दुसरे चिरंजीव छय्याबोवा यांनीं मिळविली. माळापुरी, जि० बीड हा गांव व अडूळ, अखतवडे, व पिंपरखेडे या तीन गांवचे मोकासे अशा बाबी यांनीं मिळविल्या.

छय्याबोवाचे चुलतबंधु काशीनाथ जगंनाथ यांनीं ढोरकीन व बाहेगांव, ता० पैठण या गांवचा मोकासा व कांहीं इनाम जमिनी मिळविल्या.

छय्याबोवांचा नातू रामचंद्र कुशाबा यांनीं तोंडोळी, करजगांव, तागडगांव आणि खानापूर असे चार गांव मिळविले.

रामचंद्राचा मुलगा बालकृष्ण यांनीं हि पिंपळवाडी, सामनगांव आणि पारून असे तीन गांव मिळविले .

विद्यमान पांडुरंगबुवा यांचे वडील माधव बुवा यांनीं वाघुंडी, ता० पैठण व ब्रम्हगांव ता० पैठण हे दोन गांव निजामाकडून जागीर मिळविले.

हरिपंडितांचे तिसरे पुत्र राघोबा यांचे निपणतु रघुनाथ केशव यांच्या पत्नी जानकीबाई यांनीं दर आषाढीस पैठणहून पंढरीस पालखी नेण्याचा क्रम सुरू केला; तेव्हांपासून त्या शाखेस 'पालखीवाले' असें टोपण नांव मिळालें.

पैठण संस्थानचे मालक अज्ञान भानुदास महाराज व श्री. गं. वेणूबाई साहेब ( रंगनाथ बाळकृष्ण यांच्या पत्नी ) यांच्या कन्या श्री. सौ. कृष्णाबाई यांमध्यें संस्थानच्या मालकीसंबंधानें चालू असलेल्या कज्जाचा नुकता च निकाल लागला.

पां. न. पटवर्धन

श्रीभानुदास—चक्रपाणी—सूर्यकांत—श्रीएकनाथ — हरिपंडित — १ प्रल्हाद (१)
२ मेघःशाम ३ राघोपंत
(२) (३)

१ प्रल्हाद—रंगोबा—रामजी—बाबाजी—दादोबोवा*

२ मेघःशाम — १ प्रल्हाद* २ शामजी* ३ नारायण (४) ४ कृष्ण (२०)

(४) नारायण — १ पांडुरंग* (२) रामचंद्र (५)

(५) रामचंद्र — १ मय्याबोवा* २ छय्याबोवा (६)

(६) छय्या —, १ बाळाजी (७) २ कुशाबा (८) ३ नारायण (९)

(७) बाळाजी–गोविंद (१०)

(८) कुशाबा—रामचंद्र—बाळकृष्ण—रंगनाथ × वेणूबाई—नारायण × लक्ष्मी* (१९)

(९) नारायण—एकनाथ (१६)

(१०) गोविंद— १ हरिहर (११) २ बिठोबा* ३ माधव (१४) ४ दाजी*

(११) हरिहर—१ तुकाराम (१२) २ शामराव (१३)

१२ तुकाराम—१ दामोदर २ सावळेराम ३ जनार्दन

१३ शामराव—१ भानुदास* २ दत्तात्रय ( दत्तक )

१४ माधव—१ पांडुरंग (१५) २ नारायण*

१५ पांडुरंग—दत्तात्रय ( हा शामरावास दत्तक गेला ) (१३)

१६ एकनाथ—१ श्रीराम २ लक्ष्मण
(१७) (१८)

१७ श्रीराम—केशव—१ विनायक २ भानुदास (हा रंगनाथास दत्तक
(१९)
झाला व संस्थानचा मालक झाला आहे)

१८ लक्ष्मण—१ वामन २ दीनानाथ* ३ पंढरीनाथ
|
जगन्नाथ

२० कृष्ण—जगन्नाथ—काशीनाथ—१ बापू* २ विठोबा—एकनाथ
(२१)

२१ एकनाथ—१ रामकृष्ण २ वासुदेव ३ जनार्दन*
(२२) (२३)

२२ रामकृष्ण—विश्वनाथ*

२३ वासुदेव—कृष्णाजी उर्फ दादाबोवा
(२४)

२४ कृष्णाजी—१ रंगनाथ २ दत्तात्रय ३ वैजनाथ ४ भागवत
|
एकनाथ

३ राघोपंत—१ नागुबोवा* २ त्र्यंबक—१ वासुदेव* २ माधव ३ यादव ४ विश्वनाथ
(२५) (२६) (२८)

२५ माधव—राघोबा—१ महादेव * २ वासुदेव—बाळाजी—एकनाथ—
भानुदास *

२६ यादव—परशराम—१ दीनानाथ * २ प्राणनाथ* बाळाजी
(२७)

२७ बाळाजी—१ त्र्यंबक २ मनोहर
| |
सूर्यकांत * सीताराम *

२८ विश्वनाथ— केशव—१ बापु * २ रघुनाथ
(२९)

२९ रघुनाथ—१ भागवत २ गोपाळ
| |
त्र्यंबक १ हरी २ नारायण *
३०

३० हरि—१ नारायण २ नाथ—

---

* = नकल जाली. × = पत्नी

## ७८ श्रीशिवादिननाथांचा वंशवेल

श्रीक्षेत्र पैठण येथील श्रीशिवदिन केसरींचा मठ प्रसिद्ध आहे. संस्थानचे शेवटचे पुरुष श्रीरघुनाथनाथ हे निवर्तल्यामुळें, गादीच्या वारसांविषयीं चौकशी होऊन, शेवटीं रघुनाथ नाथांच्या कन्या श्रीमंत बगूताई या संस्थानच्या मालक ठरल्या आहेत. श्री. बगूताई या अज्ञान असून, श्री. बाळासाहेब पंत प्रतिनिधी सं. औंध यांच्या मुलीच्या कन्या होत. संस्थानचें उत्पन्न हिदांडगें आहे. शिवदिन-नाथांचा ग्रंथसंग्रह संस्थानचे पुजारी कै. विष्णुपंत घुगरी यांचे घरीं आहे, तो मिळविला पाहिजे. मठपरंपरा खालील प्रमाणें:—

- विश्वनाथ
  - गदाधर
    - यादव
      - (अज्ञात)
      - हरी
        - शिवादिन ( मूळ संपादक )
          - गदाधर
          - नरहरि
            - महीपति ( ग्वालेर शाखा )
            - रामचंद्र
              - रघुना
                - धोंडीनाथ
                  - रंगनाथ
                    - रघुनाथ ( दत्तक )
                      - बगुबाई ( विद्यमान )

पां. न. पटवर्धन

## ७९ अनंत कविकृत श्रीमन्मध्वस्तोत्र

पुणें येथें एका वैष्णवाच्या घरीं पडलेला कागदपत्रांचा गठ्ठा शोधीत असतां त्यांत हें मध्वस्तोत्र सांपडलें. महाराष्ट्रांत प्राबल्येंकरून अद्वैतमत बहुत दिवस प्रचलित आहे व त्यामुळें मराठी वाङ्मयांत त्याचा च ऊहापोह सर्वत्र केलेला दृष्टीस पडतो. हें समग्र नसून त्रुटित आहे. पोथी मंडळापुढें ठेवली आहे. ३८ श्लोकांपैकीं फक्त १८ आपल्यापुढें आहेत.

द्वैतमताचे स्थापक श्रीमन्मध्वाचार्य हे शके १०४० त कर्नाटकांत जन्मास आले व ११२० त बदरिकाश्रमीं गेले. सुमारें ६० वर्षें भरतखंडांत बद्धमूल झालेल्या अद्वैतमताच्या खंडनाचें काम त्यांनीं केलें. सर्व भरतखंडांत प्रवास करून वादांत नामांकित अद्वैतवादी पंडितास जिंकून त्यांनीं आपल्या द्वैतमताची स्थापना केली.

ह्या च सुमारास अद्वैतवादानें व तदनुरूप समजुतीनें ढिले पडलेल्या भारतवर्षीयांस वायव्येकडून येणारे द्वैतमती मुसलमान झोडपीत सुटले होते. त्याचा अखेर परिणाम स्थानेश्वरच्या लढाईत झाला. ह्या लढाईत महंमद घोरीनें दिल्लीपति पृथ्वीराजचव्हाण ह्याचा पराभव करून त्याचें राज्य घेऊन त्यास कैद करून नेलें.

इकडे भरतखंडाच्या दक्षिण टोकास श्रीमन्मध्वाचार्यांनीं द्वैतमत प्रस्थापित केल्यामुळें अद्वैतवाद्यांत मोठी चळवळ उडाली. चारशें वर्षें पर्यंत अद्वैतवादानें थंड पडलेले विद्वान अंग झाडून द्वैतमताच्या खंडनाकरितां झटून श्रम करूं लागले. ह्याप्रमाणें अद्वैताचा वाद करणारे परंतु द्वैतखंडनाचा आटोकाट प्रयत्न करणारे म्हणजे वस्तुतः " तुझें माझें " म्हणून अंतःकरणपूर्वक एकमेकांशीं झगडणारे विद्वान् श्रीमन्मध्वाचार्यांच्या प्रयत्नानें च उत्पन्न झाले.

ह्या उत्तम जागृतीचा परिणाम श्री विद्यारण्य ऊर्फ माधवाचार्य ह्यांच्या परिश्रमानें विजयानगरच्या राज्याची स्थापना होऊन उत्तरेकडून येणाऱ्या मुसलमानी सत्तेच्या ओघास थोपवून धरणारा भक्कम तट निर्माण झाला. असो.

द्वैतवादी वैष्णवांनीं आपल्या परिश्रमानें सर्व भरतखंडांतल्या प्रमाणें महाराष्ट्रांत हि विष्णुभक्तीचा फैलाव केला. मूळचे अद्वैतवादी व महाराष्ट्रांतील अद्वैतवादी ह्यांच्यामध्यें हा च मोठा भेद आहे कीं, महाराष्ट्रांतील अद्वैतवादी हे सर्व वैष्णव म्हणजे विष्णुभक्त आहेत व भक्तीचे प्रतिपादन करणारे आहेत. हा जो मोठा भरतखंडांत फरक पडलेला दिसतो ह्याचें कारण श्रीमन्मध्वाचार्य व त्यांचे अनुयायी ह्यांचा द्वैतमतस्थापनेचा प्रयत्न हें होय.

इतका परिणाम महाराष्ट्रावर व इतरत्र द्वैतमताचा घडला असून ह्या मताचें वाङ्मय मराठींत नाहीं याचें आश्चर्य वाटतें. ह्याचें कारण माध्व पंडितांनीं अद्वैती पंडितांशीं वाद करून त्यांस जिंकण्या पलीकडे प्रयत्न केलेला दिसत नाहीं. देशी भाषेंत कर्नाटकांत कनकदास, पुरंदर, विठ्ठल, वगैरे कवींनीं कानडी भाषेंत पुष्कळ कविता केली आहे म्हणतात. मराठींत प्रत्यक्ष माध्वां कडून असा प्रयत्न झाल्याचें दिसत नाहीं. परंतु माध्वांतून निघालेल्या चैतन्य संप्रदायी लोकांनीं महाराष्ट्र व्यापलेलें आहे. राघवचैतन्य, केशवचैतन्य, बाबाजीचैतन्य व तुकाराम व तुकारामा नंतर त्याचे अनुयायी हे सर्व द्वैतमती वैष्णव च होत. असो.

चालू सालांत रा. राजवाड्यांना अष्टपुत्रे ह्यांच्या संग्रहांत सांपडलेलें एका माध्वानें केलेलें गुरुस्तुतिपर काव्य आपल्यापुढें आलेलें आहे व मला सांपडलेलें हें दुसरें माध्वकवीचे कविताकर्म आहे. ह्या वरून मराठींत अद्वैती, जैनी, लिंगायत वगैरे वाङ्मयाप्रमाणें माध्व वाङ्मय हि सांपडण्याचा संभव दिसतो.

ह्या कवितेची भाषा कांहींशी वामनाच्या भाषेसारखी दिसते व स्तोत्र त्या च सुमारास रचलेलें असावें असें मला वाटतें.

कृ. वि. आचार्य कालगांवकर

## श्रीमन्मध्वस्तोत्र

स्वभावें जिवा स्वल्प नाहीं च सत्ता ।
फळातें शुभाशूभकर्मा न भोक्ता ॥
अनंता गुणीं व्याप्त तो शेषशायी ।
हरीभक्ति हें द्वैत दावी उपायी ॥ १० ॥ ( १ )

जो श्रीनिवास परिपूर्ण गुणाब्धि जो का ।
विश्वोदयो स्थितिलयो करणार तोकां ॥
त्यासी समत्व मनि ते अति दूरि व्हावी ।
हे बुद्धि आश्रित जना गुरुमध्वधी वी ॥ ११ ( २ )
भार्या रमा सुत विधी पुरवैरि नातु ।
शक्रादि निर्जरजया परिवार भूतू ॥
ध्यानी सदा मुनिजनी प्रतिमा नमावी ।
तो वंदिजे निजजना गुरुमध्व दावी ॥ १२ ॥ ( ३ )

स्थापूनि भेद परिचिन्हित तप्त मुद्रा ।
मंत्रोपदेश तरवी ममता समुद्रा ॥
तात्पर्यनिर्णय स्व-शिष्य-जनोपकारा ।
केला कुवादघनमेघविनाश-वारा । १३ ॥ ( ४ )

व्यासें स्वशिष्य गुरुमध्व म्हणोनि शानें ।
वालूस्वरूप प्रतिमा दिधल्या दयानें ॥
होते सुवार्चन ( ? ) मठांत परंपरा ही ।
तद्दर्शनें भुविपुन्हा जननादि नाही ॥ १४ ॥ ( ५ )

तारूनि विश्व स्वमताप्रति चालवीले ।
शास्त्रें पुराण सकळांसहि मान्य जालें ॥
लावूनि भक्ति हरीची गुरुमध्व तो हा ।
विख्यात तो जगति माजि विराजतो हा ॥ १५ ॥( ६ )

लक्ष्मीनिवास जगतीपति वासुदेवो ।
वैकुंठनायक भवाब्धित नीरनावो ॥
कर्ता अनेक परिपूर्ण सुखैक भोक्ता ।
हा बोध निश्चित धरी तमराशिहर्ता ॥ १६ ॥ ( ७ )

सर्वोत्तमोत्व हरि हें दृढज्ञान व्हावें ।
सम्यग्वरे उडुपक्षेत्र नरें पहावें ॥
कैसे उपेक्षिल तया यति मध्वमूर्ति ।
अंगीकृतं सुकृतिनः परिपालयंती ॥ १७ ॥ ( ८ )

ब्रह्मादि देव हरिकिंकरसे कळावें ।
त्या साम्य दैवत कुबोध कधी नसावे ॥
हे बुद्धि निश्चितदया करि मध्वमूर्ती ।
अंगीकृतं सुकृतिनः परिपालयंति ॥ १८ ॥ ( ९ )

सत्वीं रजीं तमगुणीं जिव जन्मले ते ।
प्रेरी हरी तदनुसारि च वर्त्तले ते ॥
ज्याला जसा अधिकार तसी च बुद्धि ।
अंतर्नियामकमनोगति सर्वसिद्धी ॥ ३० ॥ ( १० )

स्वातंत्र्यता हरिपदीं जणू ही न चाले ।
आज्ञा घडे तरिच हें तरुपान हाले ॥
एसा समर्थ प्रभु हा जिव सूत्रधारें ।
हे पाहिजे उमगलें गुरुच्या विचारें ॥ ३१ ॥ ( ११ )

कामादि षड्रिपु तया श्रवणें जिणावे ।
तृष्णा–कुसंग–विषयादिक दूर व्हावे ॥

मी कोण काय घडतो लटक्याच भारें ।
हें पाहिजे उमजलें गुरुच्या विचारें ॥ ३२ ॥ ( १२ )

चौऱ्यांशिलक्ष जननें मरणेंचि होती ।
श्वानादि कुश्चित तनू धरणें फजीती ॥
दैवानरूप नरवपू हरिभक्ति सारें ।
हें पाहिजे उमगलें गुरुच्या विचारें ॥ ३३ ॥ ( १३ )

वांछा नको परवधू-परद्रव्य-ठायीं ।
वैराग्य हें कडकडीत धरीं स्वदेहीं ॥
दास्यत्व साधि समता न करूनि चारें ।
हें पाहिजे उमगलें गुरूच्या विचारें ॥ ३४ ॥ ( १४ )

आकाशवायुहुतभुग्जलभूमिमेळें ।
हे पंचभूतक तनू घडली दयाळें ॥
तो मुख्य वर्त्तवि हरी जिवसूत्रधारें ।
हें पाहिजे उमगलें गुरुच्या विचारें ॥ ३५ ॥ ( १५ )

राखों नका कलिवशें मनि ऐक्यभावा !
तो एकलव्य अणि पौंड्रिक वासुदेवा ॥
हे नेणतां वैष्णव-मार्ग-ज्ञानें ॥
अंधतमीं नियत सत्य कधीं न माने ॥ ३६ ॥ ( १६ )

यतिवर पवनाचा वेश मध्वाख्य दंती ।
कुमतिकदळिरानें नास्ति केली दिगंती ॥
सुरवर उडपेचा स्थापिला कृष्ण जेणें ।
+ सुरनर म्हणतां तो गौरवीं होय जाणे ॥ ३७ ॥ ( १७ )

वागार्चनी विरचिली हरिदास पूजा ।
कर्ता अनंत प्रकटी करि तत्वबीजा ॥
हें साधिलें शतमखें बहुता उपायें ।
तो तारिला यतिवरें गुरुमध्वरायें ॥ ३८ ॥ ( १८ )

एकंदर श्लोक ३८ आहेत. पैकीं सांपडलेल्या प्रतींत आरंभीचे १ – ९ व पुढील १९ – २९ असे २० श्लोक नाहींत. आहेत त्या १८ श्लोकांची नक्कल केली आहे.

+ " नरसुर " असें मुळांत आहे, त्या पेक्षां हा पाठ बरा.

कृ. वि. आचार्य काळगांवकर

# ८० गोपाळनाथांचे कृष्णलीलेचे अभंग

हे अभंग सातारा जिल्ह्यांतील कोरेगांव तालुक्यांतील तांदुळवाडी येथील वाठारे उपनांवाच्या एका ब्राह्मणाच्या घरीं होते. अभंग संख्या १६३ ह्या बाडांत आहे. श्री कृष्णलीलेचें प्रकरण यांत संपलेलें दिसत नाहीं. अभंग आणखी पुढें बरे च असले पाहिजेत, असें शेवटच्या १६३ व्या अभंगा वरून दिसतें.

तांदुळवाडी हा गांव त्रिपुटीपासून सुमारें ४।५ मैलांवर आहे. त्रिपुटी येथें गोपाळनाथांची समाधी आहे. त्रिपुटी हा गांव सातारा-पंढरपूर रस्त्यावर साताऱ्या पासून सुमारें ८ मैलांवर आहे. त्रिपुटी व तांदुळवाडी हे गांव जवळ आहेत सबब हे अभंग त्रिपुटीकर गोपाळनाथांचे आहेत असें मी म्हणतों व ज्या घरीं हें बाड मिळालें त्या घरचीं माणसें हि हे अभंग त्रिपुटीच्या गोपाळनाथांचे असें म्हणतात.

तिसऱ्या अभंगांत कवि म्हणतो कीं—

श्री कृष्णाचा लिळा वर्णाव्या अंतरीं। आवड हे खरी मनीं वसे ॥ ३ ॥
दशमस्कंद हे भागवत हरी। वंश हा अंतरी पढावया ॥ ४ ॥

असें तो म्हणतो ह्या वरून भागवत व हरिवंश हे दोन ग्रंथ आपल्या कृतीस आधारभूत आहेत अशी त्याची समजूत दिसते.

प्रत्येक अभंगाच्या शेवटीं " श्रीनाथ गोपाळ " असें नांव आलेलें आहे, व हें नांव श्री भगवन्नामदर्शक असें च त्यानें योजिलेलें आहे. अभंग बहुतेक लहान लहान नसून मोठाले आहेत.

कवीची वर्णन-शैली हृदय-भेदक असून रसाळ आहे. श्री कृष्णाच्या बाळपणाच्या खोड्या वर्णन करितांना कित्येक ठिकाणीं ग्राम्यतेची छटा पडलेली दिसते. तथापि मुबलक चारा व पाणी पाहून आपल्या गोधनासुद्धां रानांत राहणारे गौळ्यांच्या वर्णनांत दिसणारी ही ग्राम्यता, ग्राम्यता नसून गौळ्यांच्या गांवढळपणाचें तें हुबेहूब वर्णन होय असें मला वाटतें.

रा. चांदोरकरांची संत-कवि-काव्य-सूची पाहतां तींत गोपाळ किंवा गोपाळ-नाथ नांवाचे पांच कवि आढळून येतात. मागें रा. पटवर्धनांनीं त्रिपुटीकर गोपाळ-नाथा संबंधानें लेख मंडळा पुढें वाचलेला आहे. ह्या अभंगांत कोठें हि आपल्या गुरूचें नांव कवि देत नाहीं. जागजागीं आपल्या गुरूची आठवण करीत असतां हि नांव कोठें नाहीं. कदाचित् शेवटच्या अभंगांत असल्यास न कळे. चांदोरकरांनीं दिलेल्या गोपाळ नाथांपैकीं पहिल्याच्या वर्णनापैकीं बरें च वर्णन ह्याशीं जुळतें आहे. परंतु समाधी माहुलीस नसून त्रिपुटीस च आहे. आतां नमुन्यासाठीं एक अभंग देतों.-

श्री कृष्ण कोठें दिसेनासा झाला तेव्हां

( १७ ) यशोदेने सर्व स्थळ शोधीयली । जगत्रय माउली लागोनीया ॥ १ ॥
शोधी स्थूळ लिंग कारण ते माहा । कारणही पाहा शोधीयले ॥ २ ॥
अवस्था त्रिगुण भोगच्यारी खाणी । अभिमान वाणी चान्ही शोधी ॥ ३ ॥
पिंडब्रह्मांडीची तत्व शोधीयली । वेद शास्त्रं बोली पुराणही ॥ ४ ॥
नानाग्रंथ नाना साधन उपरी । माड्या शडचक्री शोधीयल्या ॥ ५ ॥
दिसेनाची कोठे म्हणे काये करू । कोण्हाचे मी धरू पाय आतां ॥ ६ ॥
आला नंद तेव्हां पाहत अंगणी । यशोदा गौळणी आक्रंदती ॥ ७ ॥
माता सोडी प्राण म्हणोनीया स्वामी । नीळवंदभूमी धावतये ॥ ८ ॥
देखोनीया नंद हृदयीं धरीत । मातेसी फुटत पान्हा तेव्हां ॥ ९ ॥
घेऊनी आडवा राजीवनयन । पुसता मी म्हणे येथें होतो ॥ १० ॥
श्रीनाथगोपाळ हृदय पालखा । ब्रह्मानंदसुखा नाना घाली ॥११ ॥

ह्या अभंगांत परमेश्वर जवळ असून हि योगी आदिकरून त्याच्या शोधाकरितां केवढी आटाआट करितात ह्याचें वर्णन कवीनें मजेदार केलें आहे. असो.

कवितेचें बाड मालकानें पाहण्या पुरत दिलें आहे तें ज्याचें त्यास परत देण्याच्या बोलीनें आणिलें आहे त्यामुळें मंडळाच्या संग्रहीं ठेवण्याची सोय नाहीं.-

कृ. वि. आचार्य कालगांवकर

## ८१ जिजियापट्टीसंबंधांत औरंगजेबास पत्र कोणीं लिहिलें ?

१ अकबरानें बंद केलेली जिजियापट्टी औरंगजेबानें पुनः जारी केली हें इतिहासज्ञांस विदित आहे. या बाबतींत औरंगजेबास निषेधप्रदर्शक व वर्मी लागणारें पत्र पाठविण्यांत आलें, ही बाब हि अश्रुतपूर्व नाहीं. परंतु या पत्राचा लेखक कोण ? या बाबतींत निरनिराळ्या ग्रंथकारांत व लेखकांत मतभेद असल्याचें दिसून आल्यावरून, या वादविषयक प्रश्नाचा कायमचा निकाल लावावा, या हेतूनें खालील मजकूर लिहित आहें.

२ ऑर्म यानें वरील पत्र युरोपांत प्रथमतः प्रसिद्ध केलें. त्यानें सदर पत्राचा लेखक मारवाडचा राजा यशवंतसिंग होय असें जाहीर केलें. ले० जेम्स,

टॉड यानें तें आपल्या राजस्थानच्या इतिहासांत भाग १, पृ० ३५३ वर दिलेलें असून, सदर पत्राचा लेखक उदेपूरचा राणा राजसिंग हा होय, असें त्याचें आग्रहाचें म्हणणें आहे. 'इतिहासाचार्य' प्रो० यदुनाथ सरकार यांनीं हि एशियाटिक सोसायटी, कलकत्ता येथून एक, व रॉयल एशियाटिक सोसायटी, लंडन येथून एक अशा दोन ठिकाणांहून सदरहू पत्राच्या दोन निरानिराळ्या प्रती मिळवून, त्या पत्राचें इंग्रजी रूपांतर सन १९०७ च्या जानेवारीच्या मॉडर्न रिव्ह्यूमध्यें प्रसिद्ध केलें आहे. प्रो० सरकार यांच्या दोन प्रतींपैकीं लंडनची प्रत सदरहू पत्र शिवाजीनें लिहिल्याचें सांगत असून, कलकत्ता प्रत संभाजीस पत्रलेखकाचा मान देत आहे. कादंबरीकार रा० हरिभाऊ आपटे यांनीं हें पत्र आपल्या 'रूपनगरच्या राजकन्ये' वरील पुस्तकांत उद्धृत केलें आहे. सदर पत्र शिवाजीनें जयसिंगामार्फत पाठविलें असें रा. रा. बाळ गंगाधर टिळक हे कोल्हापुर दरबारांतून मिळालेल्या एका प्रतीच्या आधारें म्हणाले असल्याबद्दल 'लोकमान्य टिळकांचीं गेलीं आठ वर्षें' या पुस्तकांत दिलेलें आहे. मला नुकत्या च उपलब्ध झालेल्या 'सातारकर महाराजां'च्या बखरींत या फारसी पत्राचा मराठींत विस्तृत सारांश दिलेला असून, तें शिवाजीनें च पाठविलें असा बखरींत स्पष्ट निर्देश आहे. सदर पत्रासंबंधानें या प्रकारची हकीकत आहे.

३. अशा स्थितींत सदर पत्राचा लेखक कोण? हें आपणांस निश्चित करावयाचें असल्यामुळें, तें पत्र च माझ्या बखरीवरून येथें देत आहे. पत्र येणें प्रमाणें:—

"नेकीची इच्छा करणार सत्यवचनी शिवाजीस ईश्वराची कृपा व पादशाहाची मेहे(र)वानी हे सूर्याप्रमाणें प्रसिध आहे त्याचा धन्यपणा मानून नंतर पत्र लिहितो की प्रालब्धयोगाने हुजुरून निरोपाशिवाय आला परंतु यथायोग्य आहे सेवेसि हजर आहे ही चांगली सेवा उत्तम प्रकारे हिंदुस्तान व इराण व तुराण व रूम व शाम येथील पादशाहास व उमराव व मोंगल व राजे व राणे यास वगैरे लोकास जाहीर आहे त्यापेक्षा आपले अंतःकरण समुद्राप्रमाणें आहे त्यास हे विदित च जाहाले असेल याजकरितां किती गोष्टी आबालवृद्धाच्या कल्याणास्तव लिहिल्या जातात आम्ही इकडे आल्यावर पादशाई खाजिना रिकामा जाहाला व सारे द्रव्य खर्च जाहाले याजकरिता हिंदु लोकांपासून जेजिया पट्टीचे द्रव्य उत्पन्न करून पादशाईचा क्रम चालविला आहे असे ऐकण्यांत आले त्यास पूर्वी अकबर पादशहा याणी बावन वर्षे पादशाही केली यामुळें एकंदर हिंदु वगैरे लोकांचे धर्म चांगले चालले व ते धर्मस्थापने विसी मदत ठेवीत होते सबब 'जगद्गुरु' असी त्याची कीर्ति जाहाली व त्यास हर एक स्थळी यश येत

होते पुढें नुरोद्दिन ज्यांगीर पादशाहा याणी बेवीस वर्षे ईश्वरीं लक्ष ठेऊन पादशाई केली नंतर स्वर्गास पोहोचले उपरांत शहाजहा(न) साहेब किराण पादशहा याणी बत्तीस वर्षे पादशाहाई करून कीर्ति मिळविली जो पुरुष जिवंत असतां लौकिकवान व माघे ज्याची कीर्ति त्याजला अचल लक्ष्मी प्राप्त जाहाली असें आहे तेव्हां पादशाहा याणी जेजियापट्टी घेण्यास ते समर्थ होते परंतु सारे लहान लहान मोठे जन ईश्वराचे आहेत असे जाणोन त्यागी कोणावर जुलूम केला नाहीं याजकरितां सर्वांचे मुखा त्याची स्तुती आहे ज्याची जसी नेत तसी त्यास बरकत त्या पादशहा याची दृष्ट प्रजेचे कल्याणावर होती व आपले कारकीर्दीस कितीएक किले व मुलुख गेले बाकी राहिले ते हि जातात रयत लोक खराब आहेत व सौदागर पुकारा करितात की हरएक महालचे उत्पन्न लाखाचे एक हजार येणे कठीण जाहले आहे पादशाहाचे घरी दारिद्र्याचा वास जाहला तेव्हां पदरचे मंडळीची अवस्था कळत च आहे की कितीएक लोकास पोटास मिळत नाही त्याजवर जेजियापट्टी म्हणोन हिंदुलोकावर आपण कर बसविला तो मुलगा जाहला म्हणजे दहा रुपये व मुलगी जाहली म्हणजे पाच रुपये असा चक बसविला या प्रकारचे करण्यांत च पुरुषार्थ पादशाहा समजतात व तैमूर पादशाहाचे नाव बुडवितात असे जाहले आहे व कुराणात ईश्वर जगाचा व मुसलमानाचा चं आहे येविसी वाईट अगर चांगले हे दोनी ईश्वराने निर्माण केले आहे हे रद करून महेजतीत यवन लोक बांग देतात व देवालयात हिंदु लोक घंटा वाजवितात याजकरिता कोणाचे धर्मावर दोष ठेविल्यास ईश्वराने लिहिले ते रद्द केल्यासारिखे होते न्यायाचे मार्गाने जेजियापट्टीचा कायदा केवळ गैर ज्यावर जुलूम जाहाला त्याणे खेद करोन 'हाय हाय' म्हणोन मुखाने धूर काढिल्यास त्या धुराने जितके लौकर जळेल तितके अग्नी जलदीने जळता इसबदास (?) जाळणार नाही ऐसे आहे याजवर हिंदुलोकास पीडा करण्यात च धर्म आहे असे मनात आले असल्यास राजा राजसिंग याजपासून जेजियापट्टी अगोदर घ्यावी मग इकडून देण्यास कठीण नाही परंतु गरीब मुंग्या चिलटांसारखे आहेत त्यास उपद्रव करण्यात मोठेपणा नाही पदरची मंडळी अग्नी गवताने झाकितात हे आश्चर्य वाटते राज्याचा सूर्य प्रतापाचा उदयचळापासून तेजस्वी असो ". बखरींतून दिलेलें हें पत्र व टॉड व प्रो० यदुनाथ यांनीं इंग्रजींत दिलेलीं अवतरणें यांत नांवासंबंधीं एक दोन ठिकाणांव्यतिरिक्त कोठें हि फरक नाहीं. मूळ फारसीचें जुनें मराठी कसें असतें याचा मासला हि वरील बखरींतील उताऱ्यावरून कळण्यासारखा आहे.

४ सदर पत्राचा लेखक कोण हें ठरविण्यास माझ्या मतें पत्राचा काल हें एक नामी गमक आहे. इंग्रजी इतिहासकारांनीं खाफीखानचा आधार जमेस धरून,

पत्राचा काल इ. स. १६७१ हा होय असें ठरविलें आहे. परंतु खुद्द खाफीखान याला औरंगजेबाच्या कारकीर्दीतील राजशक १२ ते २१ मधील तारखा व गोष्टी कालानुक्रमवार अशा लिहिण्यास न सांपडल्यामुळें, त्यानें वरील शकांच्या दरम्यानचा इतिहास एका भागांत कालविपर्यास करून दिलेला आहे; व जेजिया पट्टीसंबंधाचा त्याचा मजकूर इ. स. १६७१ सालांत दिल्यामुळें, सदर पत्राचा काल हि युरोपियन लेखकांनीं हा च धरिला आहे. परंतु ही चूक आहे. औरंगजेबा-संबंधींचे इतिहासांत अगर तवारिखांत मुस्ताइदखान याच्या 'मआसिर-ई-अलम-गिरी' स प्रमुख स्थान देण्यांत येतें. त्यानें जेजिया पट्टी पुनः केव्हां सुरू करण्यांत आली याची तारीख दिलेली आहे. ही तारीख म्हटली म्हणजे १ रबिलावल, ता० ३ एप्रिल सन १६७९ ही होय. यावेळीं जयसिंग व जसवंतसिंग हे दोघे हि दिवंगत झाले होते. अशा स्थितींत ऑर्मचे म्हणण्याप्रमाणें सदर पत्र जसवंतसिंगानें लिहिलें असें होत नाहीं, व जयसिंग हा या प्रसंगीं हयात नसल्यामुळें अर्थात् च त्याचा या पत्राशीं दूरचा हि संबंध पोंचत नाहीं. त्या योगें कालविपर्यासाचा दोष येतो. शिवाय, जसवंतसिंग व जयसिंग हे औरंगजेबाचे सरदार व अंकित असल्यामुळें, त्यांनीं हें पत्र लिहिलें असेल, हें संभवनीय दिसत नाहीं.

५. जसवंतसिंग व जयसिंग या उभयतांच्या नांवांचा अशा रीतीनें निकाल लागल्यानंतर, सदर पत्र उदेपूरचा राणा राजसिंग यानें लिहिलें किंवा कसें, या प्रश्नाचा आतां विचार करूं.पत्राचे शेंवटीं, 'जेजिया पट्टी अगोदर राजा राज-सिंग यांजपासून वसूल करावी,' असा पत्रलेखकानें औरंगजेबास अन्वर्थक टोमणा मारिलेला आहे. टॉड वगैरे लेखकांच्या मतें राजसिंगाच्या जागीं 'राम-सिंग' असें घ्यावें, असें आहे. परंतु रामसिंग हा हि आपला बाप जयसिंग याचे प्रमाणें अवरंगजेबाचा अंकित असल्यामुळें, हा कल्पनेंत अर्थ उरत नाहीं. शिवाय राजसिंगाशीं औरंगजेबानें केलेल्या तहांत त्यानें राणा राजसिंगाचे हद्दींतून जेजिया घेतला जाणार नाहीं, असा निर्बंध घातलेला आहे. अशा स्थितींत वरील निर्बंध व अखिल राजघराण्यांत उदेपूरच्या राण्यास मिळत असलेला मान या दोन गोष्टी जमेस धरितां सदरहू पत्र राणा राजसिंग यानें लिहिलें नसावें असें सिद्ध होतें. शिवाय परवानगीशिवाय पळून आल्याचा जो पत्राचे आरंभीं च उल्लेख करण्यांत आलेला आहे, यावरून हि वरील सिद्धांतास साहजीक च बळ-कटी येते.

६. कलकत्ता प्रतींत सदर पत्र संभाजीनें लिहिलें म्हणून म्हटलें आहे. परंतु जेजियापट्टी नुकती च सुरू झाल्याचा पत्रलेखकानें केलेला उल्लेख जमेस धरितां संभाजी संबंधींच्या विधानास किंमत देतां येत नाहीं. पत्रासंबंधींच्या या अंतर्बाह्य

पुराव्यावरून सदर पत्राचा लेखक दुसरा तिसरा कोणी नसून, औरंगजेबाशीं दोन हात करून, महाराष्ट्रांत स्वतंत्र सत्ता स्थापित करणारा शककर्ता राजा शिवाजी हा च होय, हें निःसंशय आहे.

पां. न. पटवर्धन

---

## ८२ औरंगाबाद येथील मुकबेऱ्यावरील फारसी लेख

मोंगलसम्राट औरंगजेब याचे कारकीर्दीत दक्षिणेंत ज्या थोड्याफार प्रेक्षणीय इमारती झाल्या, त्यांत च वरील इमारतीची गणना करतां येते. औरंगजेबानें आपणांकरितां औरंगाबाद येथें बांधिलेला आलमगिरी महाल जवळ च 'किल्लेअर्क' मध्यें होता. परंतु तो आतां नाममात्रानें हयात आहे. औरंगाबादेस औरंगजेब बादशाहाची आठवण मुकबेऱ्यावरून च होते. ही इमारत सर्व संगमरवरी दगडांनीं बांधिलेली असून, ही ताजमहालचे आकृतिबरहुकूम बांधिलेली आहे. ही औरंगजेबाचा मुलगा राजपुत्र आजम यानें बांधिली असून, तीस त्या काळचे रु. ६६८२०३-७-० खर्च झाले, असें गुलाम मुस्तफा यानें लिहिलेल्या औरंगजेबाच्या तवारिखनाम्यांत आढळून येतें. या इमारतींत औरंजेबाची पहिली बायको दिलरस बानू इस पुरण्यांत आलें. हिलाच 'राबिओदौरानी' असें म्हणतात. या इमारतींत औरंगजेबाची मुलगी पुरण्यांत आल्याचें सांगतात, परंतु तें खरें नव्हे.

२ इमारतीचे पुढील दरवाजावर दोन फारशी लेख कोरलेले आहेत. ते येणेप्रमाणें:—

### लेख पहिला

दर-ई रौजा मुन्नवरा मेमारी अताउल्ला बामल
हैबतराय तय्यार शुदा

### लेख दुसरा

ई रोजा दरवाजा बाये हतमाम रफ अत पन्हा
आमा अबुल कासिम बेग दारोगा तय्यार शुदत्त

ह्या लेखांवरून सहरहू इमारत हैबतराव यांचे देखरेखीखालीं अताउल्ला यानें १०७१ हिजरीमध्यें बांधिली असा निष्कर्ष निघतो.

पां. न. पटवर्धन

---

## ८३ पंचोपाख्यान : महालिंगदासकृत

१ सिंहासनबत्तीशी, वेताळपंचविशी वगैरे ग्रंथांप्रमाणें च महालिंगदासाचें पंचतंत्र ऊर्फ पंचोपाख्यान उपलब्ध आहे; परंतु प्रसिद्ध नाहीं. प्रसिद्ध नाहीं म्हणजे छापलेलें नाहीं.

२ महालिंगदासानीं आपली सिंहासनबत्तीशी गद्यावरून पद्य केली, असें सदहू ग्रंथांत म्हटलें आहे व वेताळपंचवीशीचा हि तो च प्रकार असावा असा अदमास आहे. परंतु पंचोपाख्यान, हें त्यांनीं मूळ विष्णुशर्म्याचे ग्रंथावरून च एकदम पद्य म्हणजे ओंवीबद्ध केलें असें दिसतें. महाराष्ट्रांत अनेक पंचतंत्रें आढळतात. त्यांत निर्मळ पाठक, नामापाठक यांचीं आणि यांचे नांवावर लिहिलेलीं अशीं हि कांहीं आढळतात. निर्मळ पाठकानें आपले पंचतंत्राचे शेवटीं पुढील ओंवी लिहिली आहे.

पूर्वीं प्रती होती मोकळी । तें वोंवी शुंखळा केली । महासाक्षेपें निपजविलीं । म्हणें निर्मळ पाठकू ॥

स्वतःच्यो च किंवा आणखी कोणाच्या गद्यावरून पद्य केलें हें जरी निर्मळ स्वच्छ लिहीत नाहीं, तरी त्या वेळीं प्रचलित असलेल्या याच्या पूर्वीच्या गद्यग्रंथाची यानें पद्य म्हणजे ओंवीबद्ध रचना केली हें स्पष्ट दिसतें.

३ महालिंगदास हें नांव नसून 'महालिंग'या कोणा ईश्वरपरायण सत्पुरुषाच हा ग्रंथकार शिष्य असावा व विनयानें आपलें नांव न देतां गुरुनामावरून आपला नामनिर्देश या कवीनें ग्रंथांत केला आहे, असा समज आढळतो. परंतु या पंचोपाख्यानांत महालिंगदास म्हणतो:--

+ + + + × । प्रसाद श्रीगुरूचा ॥ रामकृष्णभट माझा गुरू । तयासी केला नमस्कारू । आतां देऊं गौरव थोरू । या विष्णुशर्म्यासी ॥

४ पंचतंत्राची ग्रंथसंख्या पुढील प्रमाणें आहे.

| तंत्र | श्लोक | ओंव्या | एकूण |
|---|---|---|---|
| १ | १४० | ७१२ | ८५२ |
| २ | १७४ | ७३५ | ९०९ |
| ३ | १५६ | ६४९ | ८०५ |
| ४ | ४६ | २७७ | ३२३ |
| ५ | ३२ | २२७ | २५९ |
| एकूण | ५४८ | २६०० | ३१४८ |

५ ग्रंथांत रचनाकाल, स्थल वगैरे कोणत्या हि बाबीचा उल्लेख नाहीं.

विनायक लक्ष्मण भावे

## ८४ देवस्की

देवस्कीसंबंधी एक कागद कालगांव येथें मिळाला. त्याची नक्कल व अस्सल दोन्ही सोबत जोडलीं आहेत. तीं मंडळाच्या संग्रहीं रहाणारीं आहेत. देवस्कीची लोकांची समजूत अजून अगदीं गेली आहे असें नाहीं. थोडी फार आहे च, परंतु अधिकाऱ्यांपुढें त्या संबंधी लेखी करार आतां घडत नाहींत.

कृ. वि. आचार्य कालगांवकर

श्री

मोकदमाणी मौजे कालगांव गोसावी--यांसि

क्रियापत्र वे॥ माहादू बिन हानगु गुरव मौजे मार सु॥ सबा असरीन मयातैन व आलफ कारणे लेहून दिल्हे क्रियापत्र आसीजे काळू गुरव याजकड आमचे देणे घेणेचा खटला होता त्याचा ठराव रु ४ च्यार जाहाला ते रुपये श्री कलेश्वर याचे चवकावर ठेऊन घ्यावे काळू मजकुर यास माहितगारी नहवती सबब उचलून रुपये घ्यावे या प्रा॥ जाहाले त्याजवरून काळू मजकूर याणे चवकात ठेविले ते आमचे येणे खरे म्हणऊन उचलून रुपये च्यार घेतले आसत आठ पांच तेरा दिवसांत आम्हास व आमचे कुटुंबास व गुराढोरास वगैरे येडवाकड जाहाले आसतां सरकारगुणेगार व दैवाचे खोटे हे क्रियापत्र लेहून दिल्हे सई छ १७ मोरम

निशाणी करणार

साक्षे
१ हाहीवती माई-गडा
हस्त आक्षेर जनापा सिंपी काकडे

## ८५ शाहाणवे पद्धति

( वि. रा. सरज्योतिषी मु. फोंडा-गोंवा यांजकडून )

१ ही पोथी रा. रा. पां वैद्य मु. केरी ( गोंवा ) यांजकडून मिळाली. वीसबावीस वर्षांपूर्वी कोणी एका शेणवी गृहस्थानें ही पोथी रा. वैद्य यांना दिली या पलीकडे तिचा अधीक इतिहास त्यांना सांगतां येत नाहीं; परंतु या पोथीच्या आणखी कांहीं प्रती गोमांतकांत सांपडण्याचा बरा च संभव आहे कारण दोन तीन वृद्ध गृहस्थांनीं असें सांगितलें कीं, "वीस पंचवीस वर्षांपूर्वी-म्हणजे गोव्यांत कुळ-

कर्ण्यांचें काम वतनदार आसामींकडून सरकार घेत असे, त्यावेळीं-शहाण्णवी पद्धतीची पोथी बहुतेक कुळकर्ण्यांकडे संग्रहीं असे. गांवचा जमाखर्च लिहितांना यांतील पद्धतीनें ते पत्रकें लिहीत असत, परंतु सरकारी कुलकर्णी नेमून गांवचें काम घेण्यास सुरवात होऊन एक पिढीचा काळ लोटल्यामुळें व जुन्या पोथ्या व्यवस्थितपणें बाळगण्याची हौस वैदिकेतर लोकांत फारशी नसल्यामुळें आज या पोथीच्या प्रती सहज मिळेनाशा झाल्या आहेत.

२ 'शाहाणवेपद्धति' हें या पोथीचें नांव अखेरीस आलेलें च आहे, शिवाय 'सेणवे' हा शब्द बरे च वेळां आलेला आहे. यावरून ही पोथी शेणव्यांच्या व्यवहाराकरितां 'गोविंद' नांवाच्या गृहस्थानें रचली आहे असें दिसतें. मूळ हेमाडपंडितानें एक ग्रंथ केला होता, तो मिळविण्याकरितां प्रयत्न केला. 'परि समग्र हातासि नाहीं आला;' पण मिळाला तेवढ्याच्या आधारानें हा ग्रंथ लिहिला अशी ग्रंथकारानें च माहिती दिली आहे. 'इति शाहाणवे पद्धति संपूर्णः" असें लिहिल्यानंतर सात ओळी मजकूर आहे, त्यांत चार संस्कृत श्लोक आहेत. ते हेमाडपंताच्या मूळग्रंथांतले असावे असें वाटतें. 'सेणवे' शब्दाच्या उल्लेखावरून ही पोथी गोमांतकांत उत्पन्न झाली असण्याचा बरा च संभव आहे. पण या पोथींत एक ही शब्द पोर्तुगीज भाषेंतला नाहीं यावरून पोर्तुगीज अमलापूर्वीं ती रचली गेली असली पाहिजे. मोहरीर, रोजकीर्द, कारखाने, जमाखर्च, कौल, इनाम, मोहतर्फा वगैरे शब्दांवरून व आंतील विषयावरून मुसलमानी अमलांत ही पोथी लिहिली गेली असावी असें ठरतें. गोमांतकांतील दहा महालांपैकीं तीन महाल ( जुनी काबिजाद ) पोर्तुगीज अमलाखालीं जाऊन साडेतीनशें वर्षें झालीं; व बाकीचे सात महाल ( नवी काबिजाद ) पाणिपतच्या युद्धानंतर मराठ्यांकडून पोर्तुगीजांनीं घेतले. तेव्हां ही पोथी जुन्या काबिजातींत लिहिली असेल तर तिचा काळ साडेतीनशें वर्षांपेक्षां अधीक आहे, व नव्या काबिजातींत तिचा जन्म झाला असल्यास तिचें वय दीडशेंपेक्षा अधीक आहे. भाषेवरून किंवा अक्षराच्या वळणावरून पोथीचा काळ ठरविण्यास मदत होण्याजोगी नाहीं. कारण ही नकल अलीकडे कोणीं तरी केलेली आहे.

३ लेखणी कशी करावी किंवा बोरू कशा प्रकारचा असावा येथून तो जमाखर्च कसा लिहावा, धन्याचे गुण कोणते वगैरे माहितीपर्यंत कारकुनास ज्या ज्ञानाची आवश्यकता दोन शतकांपूर्वीं भासत असे ती पुरविण्याकरितां ही पोथी लिहिण्यांत आली. विषयावरून 'सेणवे' या शब्दाचा अर्थ कारकून, कुलकर्णी किंवा लेखक असा दिसतो. 'सेणवे' शब्दाच्या अर्थाबद्दल रा. गुंजीकर वगैरे मंडळींनीं बरा च ऊहापोह केला आहे पण त्यांत या अर्थाचा उल्लेख कोठें हि नाहीं.

---

## ८६ नाथ नारायणांची संतमाळ

आज पावेतों श्रीसंतांचा नामोच्चार अथवा त्यांच्या पावन चरित्रांचा उल्लेख प्रसिद्ध अप्रसिद्ध अशा २०।२२ कवींनीं-संतकवींनीं-केलेला आहे. त्यांत च आज आणखी एका संतकवीची भर मी घालीत आहें.

ही संतमाळ अपूर्ण अशी उपलब्ध झाली. ९२ वे ओंवीपासून तों ११७ वे ओंवी पावेतों मूळ ग्रंथ असून पुढें दोन ओंवींनीं ग्रंथ कोठें व कधीं रचिला हें दाखविलें आहे.

> शके सोळाशे सत्तावन । राक्षस संवछर हा जाण ।
> आषाढ मास शुक्ल पूर्ण । येकादसी प्रतिष्ठानीं ॥
> ते दिवसीं संतमाळा । अर्पिली विठोबाच्या गळा ।

या संतनामरूपी सुगंधी पुष्पांचा हार शके १६५७ राक्षस संवत्सरीं आषाढ मासीं शुद्ध एकादशीस श्री विठ्ठलास नारायणनाथांनीं अर्पण केलेला आहे.

हे नारायण कोण ? या प्रश्नाचें हि उत्तर यांनीं च दिलें आहे; व तें देण्यांत कांहीं 'संतकवि' संबंधाची विश्वसनीय अशी माहिति हि आपणास उपलब्ध झाली.

> नव्हे नारायण वक्ता । अवघी केशरींची सत्ता ।
> संतमाळ हे तत्वता । पंढरीनाथा समर्पिली ॥ ११९ ॥

तेव्हां हे नारायणनाथ केसरीनाथांचे शिष्य हें उघड आहे. परंतु केसरीनाथाचे कालासंबंधीं आतां शिवदिनांचे उल्लेखाप्रमाणें प्रत्यक्ष प्रमाण हि मिळालें आहे.

> ऐसा संताचा प्रकाश । × × पाची पूर्णरास ।
> उद्बोधनाथघरीं वास । अनंत नामे दुकानें ॥

श्रीज्ञानेश्वर सांप्रदायांतील उद्बोधांचे प्रशिष्य केसरीनाथांचे शिष्य हे नारायणनाथ होत.

या संतमालेच्या वर सांगितल्याप्रमाणें ९२ ते ११७ अशा केवळ २५ ओंवींत तितकीं च संतांचीं नांवें आलीं आहेत. त्यांत कांहीं पौराणिक व कांहीं ऐतिहासिक (!) अशी भेसळ आहे. कालानुक्रमानें निर्देश नाहीं. क्वचित् पुनरुक्ति हि असावी असें वाटतें, परंतु कदाचित् तें माझें अज्ञान असेल. उदाहरणार्थ

> एक देऊळ फिरविलें । विठोबाला जेवाविलें ॥

हें नामदेव ( शिंपी ) यास अनुलक्षून आहे असें सकृत्दर्शनीं वाटतें व पुढें हि

> गाय मारूनि टाकिली । नामदेवें सजीव केली ।

या वरून कित्येक ठिकाणीं द्विरुक्ति हि असावी असें वाटतें परंतु या २५ ओंवींत मात्र ही एकदां च आलेली आहे. एका ओंवींत १अगर २'संत' आले असल्यानें या संपूर्ण संतनामावलींत पौराणिक व ऐतिहासिक (?) मिळून सुमार १५०।२०० संत आले असावे असें ठोकळ अनुमान काढण्यास प्रत्यवाय नाहीं. या 'आवलींत' असें कांहीं वर्णन आहे कीं तें अश्रुतपूर्व—मला—असल्यानें 'संता' चा अंदाज मला होत नाहीं. या २५ ओंवींत नामदेवांचून प्रत्यक्ष नांवाचा असा उल्लेख फक्त उद्धोध व केसरी यांचा च केलेला आहे. इतर वर्णनावरून वाचकानें अथवा पाठकानें अंदाज बांधावयाचा.

या 'माले' ची भाषा अधिक अर्वाचीन असून कवित्व आपलें असें च आहे.

गो. का. चांदोरकर

## ८७ जीवनकृत श्रीरामस्तोत्र

सूचीवरून 'जीवन' हें पद ज्या नामांत आहे तीं अशीं:-जगजीवन, जगजीवनप्रभू, जगजीवनात्मज, आणि जीवनप्रभू.

यां पैकीं पहिले तिहींचा प्रस्तुत स्तोत्राशीं म्हणजे स्तोत्रकर्त्याशीं संबंध नाहीं; याचें कारण जगजीवन व जीवन हे उघड उघड भिन्न आहेत. तशांत जगजीवनाचे गुरु सूचींत "**परमानंद**" दिले आहेत. हे जीवनस्तोत्रांत असा उल्लेख करतात.—

श्रीराम दावि सद्गुरु । मुकुंदराज श्रीगुरु ।
**जीवन** हरि निरंजना । श्रीराम नाम हे म्हणा ॥

या वरून "मुकुंदराज" हे यांचे गुरु हें उघड आहे; आतां हे 'मुकुंदराज' कोण हें पहाण्यापूर्वीं वरच्या श्लोकांत श्रीरामनामावांचून चार नांवें आलीं आहेत, तेव्हां गुरूचें नांव ( मुकुंदराज ) हें सोडलें तर जीवन, हरि, निरंजन, या पैकीं 'कवि' कोण ? असा संशय वाचकास येऊं नये म्हणून खालील अवतरण देतों.

श्रीरामभाव येक हा । नंद ( दि ) यामीं तो पहा ।
भेटलासि **जीवना** । श्रीराम नाम हे म्हणा ॥

येथें **जीवन** हें नांव कर्त्यानें आपलें स्वतःचें म्हणून स्पष्ट दिलें आहे. आतां हे "मुकुंदराज" कोण ?

शक ११९० त विवेकसिंधूची रचना करणारे "श्रीमुकुंदराज" तर हे नव्हत खास. कशावरून? स्पष्ट कारण देतां येत नाहीं, परंतु भाषा, रचना, स्तोत्रपद्धति यावरून ते हे मुकुंदराज नव्हत असें मनास भावतें. श्री रामाष्टकावरून हे 'रामदासी' असावेत व **भीमस्वामीचे** शिष्य जे **गोविंदबाबा,** त्यांचे पुतणे जे **मुकुंदस्वामि** रामदासी ते हे मुकुंद होत असें वाटतें. परंतु हें विधान केवळ तर्क म्हणून केलेलें आहे. नामसादृश्यावरून कदाचित् हा प्रमाद हि असेल, परंतु भाषा अगदीं आधुनिक आहे; विशेषतः वृत्त श्रीरामदासी आहे. पद्यः–

श्रीराम सार गोड रे। सुधारसाची हून रे।
गुरुमुख घे कर्णी ना। श्रीराम नाम हें म्हणा॥
श्रीराम शेवटीं तुला। विमान पाठवी तुला।
'चुकेत' सर्व यातना। श्रीराम नाम हें म्हणा॥

गो. का. चांदोरकर

## ८८ जीवनकृत चंडिकाष्टक

'चंडिकाष्टक' म्हणण्या ऐवजीं 'तुकाई' अष्टक म्हटलें तरी हरकत नाहीं.

तुका येकोन तीतुका। म्हणोनि स्थापिली तुका।

पहिल्या अर्धांतील पदें कशीं पाडावीं ते निःसंदेह सांगतां येत नाहीं परंतु 'तुकाई' चा यांत उल्लेख आहे खास व यावरून कवीचें उपास्य दैवत तुकाई असावें असें दिसतें.

काव्य टाकाऊ अगदीं नाहीं. रसानुरूप शब्दरचना असल्यानें मध्यम म्हणतां येईल.

हें **जीवन** विप्र होते.

भुगोल मांडिसी किति। किति किति नसे मिति।
**जीवन**विडा पाळना। उदे उदे असे म्हणा॥

'किति' च्या पुनरुक्तीनें जरी 'पुनरुक्ती होती तरी त्यानें अर्थगांभीर्याचा पोष च केला आहे.

गो. का. चांदोरकर

## ८९ कासिरामकृत शांतिरसनाटक

ह्या पोथीचीं त्रुटित १८ पानें वे० बाळा भाऊ मुजुमदार पिंपराळेकर यांजकडून मिळालीं. आद्यंत उपलब्ध नाहींत. ग्रंथ ओंवीबद्ध असून, विषय वेदांत व महावाक्यादि विवरण हे आहेत. भाषा जुनाट असून, नाथकालीन दिसते. पोथी अशुद्ध लिहिलेली आहे. पहिले अध्यायाचा शेवट असाः—

...याकारणे रिघावें सद्गुरूसिं शरण । देहाभिमान टाकुनिं । म्हणें कासिराम ॥६२॥ इति श्री शांतीरस नाटक विरचित श्रीकासिराम देख ॥ संतवल्लि नाम पृथक ॥ मूळ पिठिका अनुक्रम ॥ ६३ ॥

यावरून या अध्यायांत संतांना नमन आहे. उपलब्ध असलेल्या पत्रांत एकादश आचार्यांना नमन आहे. तसें च, श्रीधराचार्य भागवत टीकाकार यांचा उल्लेख ( ओंवी ३३ ) आहे. त्यापुढें कोणा श्रीमदन गोपाळाचा उल्लेख दिसतो. कवीनें कुलदेवतेला येणेंप्रमाणें नमन केलें आहे:—

आता कुळदेवता नमन । जगंन्माता अंबा परिपूर्ण ॥
स्मरतां निःशब्दाचें अंजन । लेणें लेववि ज्ञानचक्षुचें ॥ ११ ॥
श्रीमंछकराचार्य इत्युक्त । वरि वैकुंठपुरिं बोलत ॥
सांक्षिपेण सूत्रवेदांत । माहावाक्यार्थ प्रकट करिं ॥ १५ ॥
सन्यास निमित्य उपकार हेतु । वार्तिक शास्त्र शांतिरस नाटकु ॥
वदतु ते संज्ञा आसे निरोपण करितु । आल्प शास्त्रज्ञा ॥ १६ ॥

ग्रंथकाराच्या या ओंव्या चिंतनीय आहेत.

या ग्रंथांत पृ० ७ वर 'तयायें' व पृ० १० वर 'हेया' 'सर्वांथें' अशीं जुनीं रूपें आलीं आहेत.

उपलब्ध पानांतील एका अध्यायाचा शेवट असाः—

इति श्री शांतिरसनाटक । ऋग्वेद आनंद शब्द सोरस ।
द्वितीय सिंधांत वर विशेष । आत्माराम निंदानिं ॥ २ ॥ १६ ॥

या ग्रंथांतील ' श्री ' मात्रा फोडून जुनाट लिहिली आहे.

स. म. दिवेकर

## १० मध्व शब्द कोठें आहे ? त्याचा अर्थ काय ?

### ( राजवाडे यांच्या शंकेचें निरसन )

भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे शके १८३५ सालचे इतिवृत्तांत अनुक्रमांक १७ ह्या लेखांत " मध्व " ह्या सदराखालीं द्वैतमतस्थापक श्रीमन्मध्वाचार्य यांच्या

नांवांतील "मध्व" ह्या शब्दाबद्दल वाटाघाट करून अखेरीस रा. राजवाड्यांनीं आपल्या मतें निर्णय केला आहे कीं " मध्व असा स्वतंत्र शब्द संस्कृतांत मध्वाचार्यांच्या पूर्वी नाहीं. मध्व हा एक प्रकारचा प्राकृत शब्द आहे असें म्हणावें लागतें. मध्वाचार्य फार विख्यात पुरुष झाला त्या मुळें मध्व हा प्राकृत शब्द स्वतंत्र संस्कृत विशेषनाम म्हणून योजिला जाऊं लागला इतकें च."

हा त्यांचा लेख आपल्या मंडळांतील पाक्षिक सभेंत त्यानीं वाचला होता व म्यां हि ऐकला होता. पुढें छापून प्रसिद्ध झाल्यावर कांहीं माध्व वैष्णवांच्या दृष्टीखालीं तो घातला. त्यांच्या कडून आलेल्या उत्तरांचा इत्यर्थ असा–

'मध्व' हा शब्द ऋग्वेदांतील बलित्थासूक्तांत आहे. या शब्दाचा अर्थ सायनाचार्यांनीं मधुसदृशं हविः असा केला आहे व दुसरीकडे त्रिसुपर्णांतील 'मधु' शब्दाचा अर्थ त्यांनीं च आनंद असा केला आहे. मधु शब्द मद्याचा वाचक मानून राजवाड्यांनीं केलेल्या कोट्या व्यर्थ होत. श्री मध्वाचार्यांच्या मातापित्यांनीं त्यांचें ठेविलेलें नांव " वासुदेव " असें आहे. आनंदतीर्थ, पूर्णप्रज्ञ इत्यादि दुसरीं नांवें हि त्यांस आहेत. त्यांच्या दर्शनास पूर्णप्रज्ञदर्शन असें च नांव आहे. बलित्थासूक्त हे वासुदेवाच्या–हनुमान्, भीम व मध्व ह्या तीन अवतारांच्या वर्णनात्मक आहे. ह्या सूक्ताचा अर्थ मात्र सायनाचार्यांनीं निराळा केला आहे. परंतु त्यामुळें वासुदेवाच्या अवतारत्रयात्मक वर्णनास बाध येईलसें वाटत नाहीं. श्रीमन्मध्व हे वायुदेवाचे अवतार होत व मध्व हें नांव वेद-निष्पन्न आहे म्हणून स्वीकारलेलें आहे.

तात्पर्य " मध्व " हा स्वतंत्र शब्द वैदिक संस्कृतांत आहे.

कृ. वि. आचार्य कालगांवकर

## ९१ वडगांव मठाची माहिती

श्री जयराम स्वामी यांस वडगांवकर म्हणतात. कारण त्यांचा मठ व वृंदावन वडगांव येथें आहे. हा गांव सातारा जिल्ह्यांतील सटाव तालुक्यांत आहे.

१ ह्या गांवची सनद राज्याभिषेक शक २२ तील आहे. हींत लिहिलेले नरसावा गोसावी कोण हें समजत नाहीं. तथापि हे जयरामस्वामींचे कोणी कर्ते शिष्य होते यांत संशय नाहीं. देवांनीं प्रसिद्ध केलेल्या परंपरेंत व म्यां नुकत्या च कांहीं दिवसांपूर्वी वाचलेल्या जुन्या लेखांत हें नांव नाहीं. तथापि वडगांवचे संपादक नरसावा हे च आहेत.

ह्या सनदेची नकल कऱ्हाड येथें गेल्या जून महिन्यांत मिळाली. मूळ नक्कल व तिचा म्यां केलेला बाळबोध उतारा ह्या सोबत मंडळाकडे दिला आहे.

२ दुसरी सनद कऱ्हाडा नजीक करवडी गांवच्या गांवकऱ्यांनीं एका जमिनीची दिली आहे. चौकशी करितां ही जमीन मठाकडे चालत असल्याचें समजलें. पूर्वीं गांवकरी लोक देवस्थानाकडे वगैरे अशा देणग्या देत. पुढ वार्षिक जमाबंदीच्या वेळीं देशमुख देशपांडे यांच्या शिफारशीनें सरकार त्या देणग्या "इनाम" ह्या सदरांत दाखल करण्याबद्दल गांवास हुकूम देई. या प्रमाणें गांवोगाव देवस्थानांकडे चालत असलेल्या देणग्यांची गोष्ट बहुधा आहे. अशा प्रकारच्या रोकडीच्या नेमणुका एकदम कांहीं रकमा वहिवाटदारांना देऊन सरकारानें पुष्कळ खालसा केल्या आहेत. जमिनीच्या देणग्या मात्र पुन्हा आपण सनदा देऊन चालविल्या आहेत.

कृ. वि. आचार्य कालगांवकर

लें० १

श्री

नकलेची नक्कल

स्वस्ति श्री राज्याभिशेक २२ युवा नाम संवछर मार्गसीर्ष सुध द्वादसी मंदवासर क्षत्रीयाकुलावतंस श्री राजाराम छत्रपती याणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी प्रां खटाव यासी आज्ञा केली ऐसी जे श्री जयराम गोसावी याचा मठ वृंदावन मौजे वडगाव काा निमसोड प्रां मजकूर येथ आहे याचे विशई राजश्री नरसावा गोसावी याणी राजश्री हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार समशेरबहादूर याचे विद्यमाने

पंतप्रधान सिका    पंतप्रतिनिधी सिका

चंदीचे मुकामी विदित केले की श्री जयराम गोसावी स्वामी हे आपले गुरु याचे वृंदावन मठ मौजे वडगाव काा निमसोड येथ आहे येथ अन्नछत्र काही चालत च आहे त्याजहून अन्नदान विशेषात्कारे चालावियासी नूतन रथोछाव करावयासी येक गाव इनाम देविलियाने ये स्थली अन्नदान व रथोछाव पूजापुनस्कार विशेषाकारे चालऊन श्रीस्वामी सन्निध्ध स्वामींच्या राज्यास व स्वामीस कल्याभिवृध्धी चिंतून म्हणोन शृत केले त्याजवरून मनास आणीता गोसावी थोर संत पुरुष होते याचे वृंदावनी अन्नदानास व रथोछावास नूतन इनाम मौजे वडगाव काा निमसोड प्रां मजकूर देहे १ येक रास कुलबाब कुलकानू देखील हालीपटी पेस्तरपटी जलतरु पाशाण निधिनिक्षप पडिल पाने सहित खेरीज हाकदार व इनामदार करून ग्राम चतु:सिमा भूमी पूर्व मर्यादे प्रमाणे सर्वमान्य दिल्हा आसे गोसावी याचे वृंदावनीचे सिशांचे ध्याध्येन करून अन्नदान व रथो-

छाहा सांग चाले ऐसे करणे आणि सर्व मान्य गाव आचद्रार्क सिषपरंपरा चालवणे प्रतिवर्षी नवीन पत्राची आपेक्षा न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र यासी परतोन देणे या इनामास हिंदु आगर मुसलमान कथला करील त्यास आपल्या महाजबाची आण असे ऐसी शेफत जाणोन यासी इनाम सुरक्षीत चालवणे निदेश समक्ष मोर्तब

तेरीख १०
जमादिलावल सुा
सीत तिसैन आलफ
बार सुद

रुजू
रा छ २४ जावल
माहे जमादिलावल
सुरु सुद बार

ले० २

श्री

असलबरहुकूम नक्कलेची नक्कल

हरिगुरुभक्तपरायन राजमान्य देवमान्य राजेश्री माहादेवबावा वास्तव्य वटग्राम स्वामी दानपत्र मोकदम मौजे करवडी ता हवेली प्रां कराड सुा तिसा सितेन मया व अलफ शेवेसी लेहून दिल्हे दानपत्र ऐसे जे स्वामीचे मठी नित्य आनसतर्पन होते त्यासी आमचे हातून भिक्षा घडत नव्हती यास्तव मौजे मजकुरी जमीन अवल बिघे ०४ चार दिल्ही असे ते आनभवावी त्या जमिनीस कोणी हिलाहरकत करतील त्यासी गोहत्येचे पातक असे हे लेहून दिल्हे दानपत्र सई शके १६९० सर्वधारी नाम संवछरे आस्वीन येकादसी छ ११ जाखर हकदारी देखील मना असे सई सदरहू जमीन डाग पिराचा

निशाणी नांगर असे

बिा रामचंद्र मल्हार कुलकर्णी मौजे मजकूर

## ९२ पंडितकविकृत विक्रमचरित्र

हा ग्रंथ पुणें येथें रविवार पेठेंत विनीवाल्यांच्या वाड्यांत रा. बापूराव शिंदे ह्या नांवाचे पेन्शनर रजिष्ट्रर राहतात त्यांजकडे मिळाला. कवीनें प्रत्येक अध्यायास प्रसंग असें नाव दिलें आहे. समग्र ग्रंथांत असे प्रसंग किती आहेत तें समजत नाहीं. सांपडलेल्या पोथींत ३७ सदतीस प्रसंगांचा पत्ता लागतो. ९, १०, ११, १९ आणि २४ हे प्रसंग ह्या पोथींत नाहींत. १, ३ आणि ३७ हे प्रसंग अपुरे आहेत. बाकीचे पूर्ण आहेत पहिल्या प्रसंगाचीं आरंभींची व ३७ व्याचीं अखेरचीं पानें नसल्यामुळें कवीचें वृत्त व काल-निर्णय कळण्यास मार्ग नाहीं.

ही पोथी एकाच लेखकानें लिहिलेली नाहीं. बऱ्याच जणांनीं मिळून लिहून काढलेली आहे. सातवा प्रसंग लिहिणाऱ्या लेखकानें बहुतेक सर्व ठिकाणीं 'ळ'कारच लिहिला आहे. शुद्धाशुद्ध लिहिण्याचा मासलाही लेखकपरत्वें निरनिराळा आहे.

अशिष्ट अथवा कुणबाऊ मराठी भाषेच्या नियमाप्रमाणें वर्तणारीं शब्दरूपें ह्या पोथींत विपुल आहेत. संस्कृत शब्दांचे अपभ्रंश मराठींत कसे होतात त्याचीं उदाहरणें ह्या पोथींत पुष्कळ पहावयास सांपडतात. मूळ ग्रंथाची भाषा देशस्थी मराठी आहे. लेखकमंडळींत बहुतेक ब्राह्मणेतर असावेत असें वाटतें; कारण देशस्थ ब्राह्मणांच्या भाषेचें रूप जागोजागीं अपभ्रष्ट झालेलें दिसतें.

सगळा ग्रंथ किती प्रसंगांचा आहे हें समजत नाहीं असें वर लिहिलें आहे, तथापि सदतिसाव्या प्रसंगाचा जो थोडा भाग उपलब्ध आहे त्यावरून हाच असावा असें म्हणण्यास जागा आहे. प्रसंग कदाचित् असल्यास एकदा दुसरा प्रसंग पुढें असेल.

ह्या ग्रंथाचे १७ ते ३३ प्रसंग कोल्हापूर संस्थानांत सोळांकूर गांवांत रा. विष्णु अप्पाजी कुळकर्णी नांवाच्या गृहस्थास मिळाले असल्याचें त्यांचें पत्र मुमुक्षु पत्रांत ता. २२।१२।०९ चें प्रसिद्ध झालेलें आहे. सोळांकूरच्या सदर गृहस्थांस म्या पत्र लिहिलें आहे.

सांपडलेली जी पोथी आपल्या पुढें आहे तींत एकंदर ४१८८ ओंव्या आहेत. ग्रंथांत जागोजाग सुरस वर्णनें आहेत व क्वचित् ग्राम्यपणाही आहे.

ह्या ग्रंथांत विक्रमाची उत्पत्ति चमत्कारिक प्रकारानें वर्णिली आहे, तशी ती कोणाच्या वाचण्यांत अगर ऐकण्यांत आहे कीं नाहीं न कळे–ती उत्पत्ति अशी वर्णिली आहे:––

कोणे एके वेळीं श्री शंकरासमीप ब्रह्मादिदेव बसले असतां व गंधर्वाप्सरांचें गायन चाललें असतां, गोविंद नामा गंधर्व मदिरापानानें उन्मत्त होऊन गातांना गर्दभाप्रमाणें ओरडला. तें पाहून शंकरास राग येऊन त्यांनीं त्यास शाप दिला कीं, तूं चित्रपुरी किंवा त्रिपुरी नगरांत कुंभाराचा गाढव होशील मग त्यानें दीन होऊन प्रार्थना केल्यावर पुन्हा म्हणाले कीं त्या पुरीच्या राजकन्येबरोबर तुझा विवाह होईल व विवाह प्रसंगीं तुजवर अक्षता पडल्यावर तूं पूर्वरूप पावशील. त्याप्रमाणें तो त्या नगरींत गाढवाच्या जन्मास गेला तो गाढव असतांही घोड्याप्रमाणें सुंदर होता. तो मोठा झाल्यावर एके दिवशीं आपल्या धन्यास मनुष्य वाणीनें म्हणाला कीं, तूं मजकरितां राजकन्येची मागणी कर. त्याची ती विचित्र तऱ्हा पाहून कुंभार भ्याला व हें पिशाच तर नव्हे अशी शंका आली. तो गाढव दररोज सायंकाळीं घरीं आल्यावर धनी त्यास बांधीत असतां वर सांगितल्या प्रमाणें त्यास बोले.

अखेरीस कुंभारानें हा सर्व चमत्कार राजाच्या नजरेस आणिल्यावर राजानें त्या गाढवास कन्या देण्याचें ठरविलें. लग्नांत त्यावर अक्षता पडतांच तो आपलें पूर्वीचें गंधर्वरूप पावला. त्या गंधर्वापासून त्या सुंदरा नामें राजकन्येच्या पोटीं तीन पुत्र शंकरांशानें जन्मास आले. एक भर्तृहरी, दुसरा विक्रमार्क व तिसरा भट्टी. भर्तृहरी व विक्रमार्क हे दोघे बंधु म्हणून प्रसिद्धी आहे, परंतु भट्टीचें नांव ह्यांत नवीनच आहे असें वाटतें.

ह्या काव्यग्रंथाचे संविधानक असें आहे कीं, वर सांगितल्याप्रमाणें विक्रमादिकांची उत्पत्ति झाल्यावर त्यांच्या गंधर्व पित्यानें आपल्या सासऱ्याचें म्हणजे चित्रसेनाचें राज्य आपल्या स्त्रीसहवर्तमान पुष्कळ दिवस केलें. पुढें तो आपल्या पत्नीसह स्वर्गास गेल्यावर मग भर्तृहरी राजा झाला व त्यानें उज्जनी राजधानी केली. तो राज्य करीत असतां तो विरक्त होऊन राज्य सोडून गेला. ह्या गोष्टीच्या मुळाशीं असलेली फळाची हकीकत दिलेली आहे. भर्तृहरी राज्य करीत असतां भट्टी हा कारभार करीत होता. भर्तृहरी राज्यावर असतांही विक्रम त्यास नाद असल्यामुळें हा तीर्थयात्रादि प्रवास करीत फिरत असे. त्यास भट्टीनें हुडकून आणून राज्यावर बसविलें व आपण कारभार करूं लागला. विक्रम पुन्हा प्रवासास जाण्याची इच्छा करूं लागला तेव्हां असें ठरलें कीं सहा महिने विक्रमानें कोठें जाऊं नये, राज्य करावें; व सहा महिने तीर्थयात्रा कराव्या. त्या प्रमाणें तो कुब्जक नांवाच्या प्रीतींतल्या न्हाव्यासुद्धां तीर्थयात्रेस निघाला. विक्रमास परकायाप्रवेश विद्येचें ज्ञान होतें तें आपणास ही असावें असें त्या कुब्जकास वाटून त्यानें राजास त्याविषयीं विनंती केली. त्यानें ती विद्या त्यास शिकविली, व प्रचीती दाखविण्या करितां राजा एका मृत सर्पाच्या देहांत शिरला; त्या बरोबर कुब्जक राजाच्या देहांत शिरून त्या सर्पास मारण्या करितां त्याच्यां मागें लागला. तेव्हां सर्परूपधारी राजा बिळांत शिरला व त्यानें आपले प्राण वाचविले. राजदेहधारी कुब्जक उज्जनीस लागलीच परत गेला व विक्रमाच्या जागीं राज्य करूं लागला. भट्टीस इतक्या लवकर राजा परत कसा आला ह्या विषयीं संशय आला व त्या सोंगाड्या राजाचें अज्ञान पाहून संशय दृढ झाला. राजस्त्रिया त्यास वश होईनात. एके दिवशीं सुमंत नांवाचा एक भाट राजाकडे आला. तो नेहमीं येणारा असून त्यास राजरूपधारी कुब्जकानें ओळखिलें नाहीं, व त्याची संभावना भट्टी करीत असतां ह्यास इतकें धन काय द्यावयाचें आहे असा निषेध केला. तेव्हां तूं विक्रम नसून दुसरा कोणी आहेस असें सुमंतानें त्यास बजावलें व खऱ्या विक्रमाच्या शोधास तो निघून गेला. इकडे विक्रम सर्पदेहांतून एक शुकदेहांत शिरून शुक बनला. व स्वेच्छेनें एका ब्राह्मणाच्या हातीं पडून त्या कडून दुसऱ्या एका धनिकास आपणास विकावयास

लाविलें. त्या धनिकाकडे एक वेश्या आली असतां शुकाच्या सांगण्यावरून त्यानें वेश्येचा तिरस्कार केला. त्या वेश्येनें हरतऱ्हेनें त्या धनिका कडून तो शुक मिळविला व त्याला देवी पुढें बळी देण्याचें ठरविलें. तेथें ही चमत्कारिक रीतीनें वेताळानें त्यास वांचविलें. ( वेताळ विक्रमास प्रसन्न झाल्याची कथा ह्या ग्रंथांत नाहीं ती गृहीत धरली आहे ) पुढें त्यास हुडकीत हिंडत असलेल्या सुमंताची व त्याची गांठ पडली.

पुढें कित्येक गोष्टी घडल्यावर हा शुक चंद्रसेन नामक राजाच्या हातीं पडला. तो शुक त्यास पुष्कळ गोष्टी सांगत असे. राजास पुत्रसंतान नव्हतें. तेव्हां पुत्रकामेष्टी यज्ञ करण्याविषयीं शुकानें राजास सांगितलें–मध्यंतरी दशरथाचा यज्ञ व रामकथा व विशाळपुरीचा राजा सुधास वगैरे ह्यांच्या कथा आल्या आहेत– राजानें त्या प्रमाणें यज्ञारंभ केला भट्टीचे हेर तेथें होते त्यांनीं जाऊन विक्रमाची हकीकत त्याला कळविली. तो सुमंतास घेऊन ब्राह्मण रुपानें चंद्रसेनाकडे आला-- चंद्रसेनानें इच्छितदान मागण्याविषयीं त्यास सांगितलें. तेव्हां त्यानें तो शुक मागितला. राजानें ही वचनबद्ध झाल्यामुळें तो शुक भट्टीस दिला. चंद्रसेनानें यज्ञ केल्यावर त्यास सिंहकेतु, मच्छकेतु, श्येयनकेतु ( शंयनकेतु ग्रंथांत ), वृषकेतु ( वृसकेतु ) आणि धर्मकेतु असे पांच पुत्र झाले. इतकी कथा ३७ व्या प्रसंगाचीं जीं पानें सांपडलीं आहेत त्यांत आहे; त्यावरून ग्रंथाची समाप्ती ह्या च प्रसंगांत किंवा पुढें एखाद्या दुसऱ्या प्रसंगांत असावी असें अनुमान मीं वर केलें आहे.

हें संविधानक सजावितांना मध्यंतरीं पुष्कळ गोष्टी कवीनें आणिलेल्या आहेत. ह्या गोष्टी शुकबहात्तरी, विक्रमबात्तिशी व वेताळपंचविशी ह्या ग्रंथांत आहेत कीं काय तें तपासून पाहिलें पाहिजे.

कांहीं ठिकाणीं पंडित कृष्णाचादास असें लिहिलें आहे त्या कृष्ण वरून हा कवीचा गुरू दिसतो.

कांहीं थोड्या दिवसांपूर्वी श्री. मुजुमदार यांनीं पंडित कवीची कांहीं कविता मंडळापुढें ठेविलेली आहे,तो पंडित व हा एक च कीं काय हा हि विचारणीय प्रश्न आहे.

ह्या कवीचा काळ ग्रंथांतील भाषेवरून इ. स. चे आठराव्या शतकाचें उतरार्ध असावें असें त्याच्या भाषेवरून वाटतें. चाळविणे=फसविणे, लुगडे= वस्त्र, मेटें=चौक–चौकी, उळपा=शिधा, बाईलभाड्या वगैरे ग्राम्य शब्दांवरून हा ग्रंथ दक्षिण महाराष्ट्रांत झालेला दिसतो.

कृ. वि. आचार्य कालगांवकर

# १३ वीसदेओ

१ मानभावांच्या ( लीळाचरित्र या नांवाच्या ) ज्या ग्रंथाचा परिचय गेल्या सभेस सभासदांस झाला त्या ग्रंथांतील दहा पांच चरित्रांत वीसदेओ हा शब्द एका हून जास्त वेळां आला आहे. असें एक चरित्र संकेतलिपींतून एथें उतरुन घेतों:—

॥ रात्रीं वीहीरणीं ओंवीया अरोगणें ॥

= करमणूक = खाणें

चक्रधरा रात्रीचाः पूजाअवसरुः ( =वेळ ) जालाः गंगे पैलाडी सेत तेथः आलेः धनुवार्टा (=क्षेत्रनाम ) ये ती चंद्रमा होता असेः ओंवीयां देखोलीयांः भटीः म्हटलेंः ओंवीया घेओजीःचक्रधरः उगे चीः मागोतेंः म्हटलेंः जी जि ओबीयां जालीया असती तरि घेओंः उत्तर केलें जालीया नसती कीं गाः जी जिः जालीया असातिः तरि घेयाः मगः भटोबास घेओं लागलेः म्हटलेंः चीरूनी घेयाः मगः भट चिरुनीं जालीया जालीया घेतिः चक्रधरः पूढारें मळेया वरीः आलेंः श्राकरीं गोफणं घेतलीः थै भोरडायें थै भोरडायेः म्हणौनिः सोंकरीलेंः ( = ओरडणेंः ) तवं चंद्रमा मालवलाः आणि चक्रधरः आलेंः तवं वारा सूटलांः तें थोरं वावधान ( =वावटळ आलेंः ) तेंव्हाळिः चक्रधरः मेरूचां (=डोंगर)कोहकिंः=(गुहा) आसन जालेंः लुखदेओ बायेंः चक्रधराः आड पसवडी (=पासोडी) धरीलीः तवं भटोबा बोबाउं लागलेः लुखदेयाः लुखदेयाः लुखदेयाः सबदु दीधलांः नागदेया येः चक्रधर येथ असातिः भटोबास आलेः तवं वावधन नावेक समलेंः मगःम्हटलेंः कां गां ओंबीयां बाजा नां कांः जी जिः **वीसदेओ** नाहिंः म्हटलेंः गुफे हुनी घेउनी याः हा घेया पैल दीवाः दीसतु असेः मगः भट गेलेः **वीसदेओ** घेउनी आलेः तव भटां सरीसीं आउसें ( = विशेषनाम आलींः ) तवंः चतुर्धराः मर्गज-(विशेषनाम ) सी आसन जालेंः तवं भट ओवीयां भाजुनी घेउनी आलेः मगः चक्रधरः गुफे सीः आलेः मगः जीः ओंबीयां चोखटा केलीयांः कोवळीया नीवडीलीयाः आतु साखर घालौनी ओळगवीलीयाः ( = घोळल्या ) यरी (= इतरांस )वाटे घाटौनि दीधलीयाः चक्रधरः प्रसादु केलाः मगः आवघेयां भगतजनां देववीलीयीः चक्रधरें: आरोगलीयाः गुळळ(= गरळ) जालाः वीडा ओळगवीलाः ( =दिला ) मगः पहुडु ( = निद्रा ) स्वीकरीलाः ॥ ११ ॥

२ वरील चरित्रांत वीसदेओ हा शब्द दोनदां आला आहे. ओंब्या भाजण्या करितां वीसदेओ पाहिजे होता. या शब्दाचा अर्थ वाचकांच्या ध्यानांत सहज आल्या वांचून राहणार नाहीं. वीसदेओ म्हणजे ज्याला सध्यां आपण वर्तमान मराठींत विस्तव म्हणतों, तो मूळ संस्कृत शब्द वैश्वदेव. भोजना पूर्वी विश्वे देवां करितां ज्या अग्नींत आहूती टाकतात, त्याला वैश्वदेव म्हणतात. वैश्वदेव

पेटला, वैश्वदेवांत आहुती टाकल्या, इत्यादि लौकिक उक्तींत वैश्वदेव म्हणजे अग्नि असा लौकिक अर्थ अद्याप हि प्रतीतीस येतो. ह्या वैश्वदेव शब्दाचे अपभ्रंश येणे प्रमाणें होत आले

वैश्वदेवः = वीसदेओ
= वीसदो
= वीस्तो = विस्तू
= विस्तव

पैकीं विस्तो विस्तू, हा अपभ्रंश कांहीं लोक योजतात. कांहीं लोक विस्तव असा उच्चार करतात. वस्तुतः अशिष्टांचा विस्तू, विस्तो,हा उच्चार मूळाच्या अधिक जवळ आहे, हें सांगणें नलगे. कित्येक वर्षां पूर्वीं विष्णू या शब्दा पासून विष्टु, विस्तु, अशा परंपरेनें विस्तव हा शब्द मीं व्युत्पादिला होता. परंतु त्याला ऐतिहासिक आधार कांहीं एक नव्हता. प्रस्तुतच्या व्युत्पत्तीला ज्या अर्थीं ऐतिहासिक आधार सांपडला आहे त्या अर्थीं वैश्वदेवः = वीसदेओ = विस्तो = विस्तव ही परंपरा मान्य करणें अपरिहार्य व सयुक्तिक आहे.

वि. का. राजवाडे

## १४ उपाहाणौ

हा द्विवचनान्त शब्द ऊर्फ हें द्विवचनान्त रूप मानभावांच्या (लीलाचरित्रनामक) ग्रंथाच्या ७ सातव्या लीलेंत आलें आहे, तें असें:—

॥ श्रीचरणीं उपाहाणौ घातलींयां ॥

मूळ संस्कृत रूप उपानहौ. अक्षरविपर्ययानें उपाहाणौ असा अपभ्रंश सहाशें वर्षां पूर्वींच्या मराठींत झाला. द्विवचन मराठी अपभ्रंशांत हि कायम च होतें हें ध्यानांत ठेवण्या सारखें आहे. उपाहाणौ चा अपभ्रंश वर्तमान मराठींत वाहाणा. तात्पर्य, वाहाणा हें रूप स्वरूपतः द्विवचनी आहे. आणि ज्या अर्थीं उपाहाणौ हा कर्ता द्विवचनी आहे, त्या अर्थीं घातलींयां हें क्रियारूप हि द्विवचनीं च आहे. याहिते असें मूळ संस्कृत द्विवचनी रूप. याहिता चें मराठी घातली (स्वार्थक लप्रत्यय). घातलीचें द्विवचन घातलीया. मराठींत द्विवचनी व बहुवचनी रूपें एकसारखीं च असतात. सबब, द्विवचनी रूप कोणतें व बहुवचनी रूप कोणतें तें, कर्त्यांच्या रूपावरून ओळखावयाचें असतें. मानभावी ग्रंथांत प्रस्तुत द्विवचनी रूप साक्षात् असल्या मुळें, जुन्या मराठींत द्विवचनी शब्दांचा व धातूंचा उपयोग क्वचित् क्वचित् होत

असे, असें जें विधान मीं आपल्या ज्ञानेश्वरी-व्याकरणांत केलें आहे त्याला बळकटी येत्ये.

२ वाहाणा रूप संस्कृत उपानहौ या रूपा वरून निघालेलें नाहीं. अक्षरविपर्यास झालेल्या जुन्या मराठी उपाहाणौ या रूपा वरून झालेलें आहे. संस्कृत उपानहौ पासून अपभ्रंश येणेप्रमाणें होतील:--

उपानहौ = ( उलोप ) वाणहौ = वाणहा

जुन्या मराठींत उपानहौ हें संस्कृत रूप येतांना प्रथम अक्षरविपर्यास होऊन उपाहाणौ असें रूप झालें व त्याचें वर्तमान मराठींत अपभ्रंश येणे प्रमाणें झाले:--

उपाहाणौ = ( उलोप ) वाहाणौ = वाहाणा

उघड आहे कीं वाहाणा हें रूप अपभ्रष्ट उपाहाणौ या रूपा पासून निघालें आहे.

३ मराठींत आद्य उ चा लोप होण्याची लकब आहे. उदाहरणार्थ:--

१ उपास्थापनं = ( उलोप ) पाठावणें = पाठवणें
उपास्था म्हणजे ( कोणत्या हि वस्तू कडे ) जाणें
उपास्थापन ( णिच् ) म्हणजे जावविणें.

= २ उपोहनं = पोहणें
३ उपाध्याय = पाध्या
४ उपविश् = वइस = बैस
५ उपवादः = पवाडा ( निंदा ) ( हा अर्थ ज्ञानेश्वरींत येतो ).
६ उपनमनं = वणवणें =ओणवणें
७ उपधारणं = पधारणें ( गुजराथी )

वि. का. राजवाडे

## ९५ नरहरि मोरेश्वराचें उद्योगपर्व

नरहरि मोरेश्वर देशपांडे यांनीं महाभारताचीं चार पर्वे मराठींत आणिल्याचें काव्यचिकित्सकांस विदित आहे. ह्या कवीचे गुरुचा शोध करून, त्यावर एक लहानसा निबंध हि रा. पटवर्धन यांनीं मंडळापुढें नुकता च वाचलेला आहे. वरील चारी पर्वांपैकीं फक्त द्रोणपर्वास मुद्रणसंस्कार झालेला आहे, व बाकीचीं पर्वें तशीं च राहिलेलीं आहेत. रा० पटवर्धनांनीं आपल्या निबंधासमवेत नरहरि मोरेश्वरकृत उद्योगपर्वाची हस्तलिखित प्रत व कर्णपर्वाची प्रत अशा दोन प्रती मंडळास सादर केल्या. शोधा अंतीं, मला हि एदलाबाद येथील श्रीमंत दाजी

त्रिंबक देशमुख यांजकडे उद्योपर्वाची एक प्रत पाहण्यास मिळाली, त्यांत उद्योगपर्वाचा काळ दिलेला असून, कवीनें आपल्या घराण्याचें हि त्रुटित वर्णन दिलें आहे. रा. पटवर्धनांच्या प्रतींत या ओंव्या माझे प्रतींतल्या अनुक्रमानें च दिलेल्या आहेत. या ओंव्या खालील प्रमाणें:—

आसो तीतुका कवळोनी आर्थ । पंचम पर्व फले समाप्त ॥
तीन सहश्रपाचशत । वोवीया ग्रंथी वोविल्या ॥ ९४ ॥
की ते भारथसमुद्रीची रत्ने । आर्थान्वय कवळोनी यत्ने ॥
हारा गुंफीली श्रोतीया प्रत्ने । पवीत्र आर्त वोडवीजे ॥ ९५ ॥
श्री नृसींव्हे उपासना परंपरा । त्यावीन सर्व त्यागीले परा ॥
काया वाचा मानसी थारा। सामराज वलवीला ॥ ९६ ॥
त्याचे कृपेचा आमयेकर । जेणे ग्रंथासी जाला पसर ॥
ग्रंथाभीधानी लक्ष्मीवर । मी वीगारी ग्रंथीचा ॥ ९७ ॥
माया सीव्हाद्री नीवासीनी । **भवानी तुळजापुर** पाटनी ॥
देवी भगवती कुळस्वामीनी । साह्य ग्रंथी सर्वथा ॥ ९८ ॥
श्री गुरु **भीमराज** समर्थ । परमार्थी जगविख्यात ॥
**नरहर मोरेश्वर तदांकीत** । हरी भक्ती वीनटला ॥ ९९ ॥
अंकामाजी वर्तमान । जो सहश्रफणीचा नंदन ॥
जया म्हणती शालीवाहन । दैवी अंश वीक्रमी ॥ १० ॥
दिगपाळाचे द्वीगुणीत । ह्या वरी वसुचे गणीत ॥
अंख आग्नीवरी मंडीत । शक नीर्धार जाणपा ॥ १ ॥
देव ऋषीचा कुमर । प्रमाथी नाम संवत्छर ॥
ऊर्ज ( =कार्तिक ) मास सर्वा सुखकर । येमद्वीतीया पर्वणी ॥ २ ॥
ग्रंथ समाप्त तये दीणी । जाला आर्पीला **नृसींव्हचरणी** ॥
अर्त श्रवणे कैवल्यदानी । प्राप्त होये श्रोतया ॥ ३ ॥
**बीड** परडे मध्य मध्य भागी । **बालाघाट** विख्यात जगीं ॥
**बीट परगणा** शोभे भांगी । शेंदुर जेवी स्त्रीयाच्या ॥ ४ ॥
बीटलपदातळींचे बीट । त्याची भर्गाख्यी नाम हे बीड ॥
सुख सुखाडे सदा आवीट । ग्रामा माजी वर्तता ॥ ५ ॥
गरुड गंगा पुर्ण वाहीनी । वेणु नाद उद्भव चरणी ॥
संगमी वसे शुळपाणी । संगमेश्वर या नावे ॥ ६ ॥
ज्याचे सेवे आधी व्याधी । हरोणी आकल्पा होती सीधी ॥
तो **खोपेश्वर** कृपानीधी । नांदे जेथे श्रीयेसी ॥ ७ ॥
तये नगरीचा देशपांडा । मोरोजी नरहरी कीर्ती धेंडा ॥

पुत्र नरहरी भक्की झेंडा । दास सकळा संताचा ॥ ८ ॥
पाळना नाव नरहरी । ठेवीले बहुती लाळन परी ॥
बच्या म्हणता नीज वैखरी । लोकवीहारी बच्याजी ॥ ९ ॥
आता असो हे उपपती । मीं तुमचा सेवक भक्ती ॥
रुपा करूनी सज्जन संती । सेवे माते लाविजे ॥ ११० ॥
ईती श्री उद्योगपर्वणी भारथ । धर्म शास्त्र ज्ञानमर्थीतार्थ ॥
ऋषी मुख्ये धरत्रीनाथ । समाप्तीते पाववी ॥ १११ ॥
पंचवींशतीमोध्याय गोड हा संपुर्णमस्तु । श्री कृष्णार्पणमस्तु ॥

यांत कवीनें ग्रंथरचना शकासंबधानें ओंवी दिलेली आहे ती:—

" दिगपाळचें द्विगुणित । ह्या वरी वसुचे गणीत ॥
अंख आग्रावरी मंडीत । शक निर्धार जाणपा ॥

ह्या वरून उद्योगपर्वाचा रचना काल शके १६८१ हा येतो. उद्योगपर्व शके १६८१ प्रमाथी नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध २ ( यम-द्वितीया ) रोजीं समाप्त झालें असें वरील ओंव्यांवरून निघतें. कवीसंबंधानें इट परगण्यांत शोध केला पाहिजे.

स. म. दिवेकर

## ९६ जव्हार संस्थानचा राजशक

१ सोबतच्या चार सनदा गोठणे येथील दिवाकर भट बिन लक्ष्मणभट गोडबोले यांस जव्हार प्रांतापैकीं वंसेले ( हल्लीं वासेले ) येथील जमाबंदीपैकीं नेमणुकीसंबंधानें दिलेल्या त्यांचे विद्यमान वंशजाकडे उपलब्ध झाल्या. या सनदांत जव्हार प्रांत पेशव्यांकडे आल्यानंतर सनद मान्य केल्याचा उल्लेख आहे.

२ सनदांतून जव्हार शकाचा उल्लेख आहे. जव्हार दरबारांत अद्याप हा शक चालू आहे. जव्हार संस्थानचे नेमीशहा यांस 'शहा' हा किताब मिळाल्यापासून हा नवीन च शक सुरू झाला. ही गोष्ट शके १२६५ ज्येष्ट शु. १२ रोजीं घडली. ह्या शकाचा आरंभ मृगापासून धरतात. सध्यां जव्हार शक ५७३ आहे. या शकासंबंधानें विस्तृत माहिती मी मंडळास लवकर च सादर करणार आहें.

स. म. दिवेकर

लेखांक १ श्री

नकल

वेदशास्त्रसंपंन राजमान्य राजश्री दिवाकरभट बिन लक्षुमणभट उप-
नाम गोडबोले वास्तव्य गोठणें प्रा राजापूर हाली वस्ती वसई यासी

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री माहाराज राजे जवार दंडवत विशेष तुम्ही श्री त्रिंबकेस्वरचे मुक्कामी येऊन विदित केले की आपला योगक्षेम चालला पाहिजे यास्तव कांही वर्षासन करून द्यावे म्हणजे श्रीत्रिंबकेश्वरीं आपले अभीष्टचिंतन करूं म्हणोन विदित केलेंत त्याजवरून मनास आणितां तुम्हीं थोर वियावांन भले सत्पात्र तुमचें चालविलेयानें राज्यास श्रेयस्कर जाणोन तुम्हास वर्षासन प्रतिवार्षिक तांदूळ मुडा १ येक व नख्त रुपये २० वीस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करार करून देऊन यांचा ऐवज प्रा वंसेले येथील जमाबंदी पैकीं देविला असे त्याची सनद अलाहिदा अमीन व जमीदार प्रा मजकूर यांस सादर करून दिली असे तर सदरहू प्रा वर्षासनाचा उपभोग करून श्रीस्थली राज्यास अभीष्टचिंतन करीत जावें विशेष काय लिहिणें

मोहर दरसाल येक मुडा तांदूळ व वीस रुपये

वय ११ रोजी माहे वैशाख साल ४१३ वर्षे बार मुर्शाफ

लेखांक २ श्री

नकल

राजाज्ञा अमीनानी हाल व इस्तकबाल व जमीदार प्रा वंशेले—
साल ४१३ वर्षे

लेहावयासी कारण कीं वेदमूर्ति राजश्री दिवाकर भट गोडबोले बिन लक्षुण भट वास्तव्य हालीं वसई यांस वर्षासन प्रतिवर्षिक तांदूळ मुडा १ येक व नख्त रुपये २० वीस करार करून जमाबंदी प्रामजकूरपैकीं हर दरसाल येकंदर ताकीद दिली असे तर प्रामजकूरपैकीं सालदसाल वंशपरंपरा वेदमूर्तीस तांदूळ मुडा १ येक व रुपये २० वीस आदा करीत जाणे पेस्तर सालदसाल नवें ताकिदीचा उजूर न करणें माहालीं नकल घेऊन असल भोगवटीयास भटजीजवळ फिरोन देणे जाणिजे छ

मोहोर रुपये २० वीस व तांदूळ मुडा येक वय १३ रोज माहे वैशाख
बार मुर्शाफ

लेखांक ३ श्री

गुरुवार आश्विन बा १३ शके १६८१

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री विसाजी केशव
गो यासी

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ सितैन मया व अलफ वेदमूर्ती राजश्री दिवाकरभट गोडबोले यांची वर्षासनाची सनद जवार प्रांतीची पेशजी राजश्री शंकराजी केशव याच्या आमलांत सादर जाहाली आहे त्या प्रो वेदमूर्तीचें वर्षासन चालवणें जाणिजे छ २६ सफर बहुत काय लिहिणें

पो छ ४ रा॥खर

लेखांक ४ श्री

रविवार चैत्र व॥ ७ : ६८६

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री विसाजी केशव गो वांसी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सु॥ अर्बासीतैन मया व अलफ वो रा॥ दिवाकरभट यांणीं हुजूर विदित केलें कीं आपल्यास पेशजी जवारकराकडून वर्षासन रु॥ २० वीस व तांबूल मुडा १ येक होतें त्यास जवार प्रांत सरकारांत आलियावर कैलासवासी श्रीमंत नानासाहेब यांणीं सदरहूप्रमाणें चालवयाविसीं सनद वसईस करून दिल्ही त्याप्रमाणें चालत असतां हालीं अमलदार नवीन पत्राचा आक्षेप करितात याजकरितां ताकीद जाहाली पाहिजे म्हणून त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे तरी वेदमूर्तींचें वर्षासन नख्त व तांबूल सालाबाद पावत आलें असेल त्याप्रमाणें पावधीत जाणें कोण्हेविसीं दिकत न करणें जाणिजे छ २० सवाल बहुत काय लिहिणें

बार

लेखन सिमा

## १७ दक्षिणी वैश्यांचीं गोत्रें व प्रवर

गोत्र प्रवर

१ वासिष्ठ—१वसिष्ठ २ प्रमथ ३ भारद्रस्क

आडनांवें—१मसुरकर २ कोपकर ३ प्रभू उर्फ परब ४ दिवकर ५ मडगांवकर उर्फ खोत

२ कौशिक—१विश्वामित्र २ देवरा ३ नैधृति

आडनांवें—१म्हापसेकर २ पोकळे ३ सलप ४ वेरेकर ५ गांवस

३ काश्यप—१काश्यप २ वत्सरा ३ सिनेती

आडनांवें—१नागवेकर २ धुरी ३ विरमोडकर ४ कुशे ५ ताम्हनेक ६ आरडे ७ सांघरे ८ लाड ९ ढुले १० सोंचरे ११ कोदे १२ पावले १३ तोरसेकर १४ सातोसे १५ वावरे १६ फोंडके १७ देवाळकर १८ साडये १९ मिके २० धोले

४ सौनत्य—१वसिष्ठ २ पत्सरा ३ वसिष्ट

आडनांवें—१भिसे २ नेवगी ३ विडये

५ विश्वामित्र—१आंगिरस २ अघमर्षण ३ कौशिक

आडनांवें—१कुडतरकर २ भाट ३ वेड्ये ४ वेंगुर्लेकर ( वैद्य ) ५ पंढित उर्फ कुडतडकर

६ भारद्वाज—१आंगिरस २ भारद्वाज ३ बार्हस्पत्य

आडनांव—१वेटे २ राणे ३ परमानंद ४ तायशेटे ५ मराठे उर्फ तायशेटे ६ वांदिवडेकर ७ सोह्नी ८ नवरे

७ शांडिल्य—१शांडिल्य २ आसित ३ दैवत

आडनांवें—१मुंगी २ काणेकर ३ महाजन ४ कळगुटकर ५ जुवेकर ६ तिवरेकर ७ सनदे उर्फ संदे ८ चौधरी उर्फ चौघरी ९ आंडुर्लेकर १० घराडकर

८ कौंडिन्य—१ भार्गव २ मैत्रावरुण ३ कौंडिण्य

आडनांवें १ नांरबेकर २ पारकर ३ फोंडेकर ४ करमळकर ५ मणेरकर उर्फ नारवेकर ६ दर्झीकर ७ हवालदार उर्फ नारवेकर

९ हारित—१अंगिरस २ अंबरीष ३ यौवनाश्व

आडनांवें—१ पिळणकर २ गवंडळकर ३ वर्दम ४ महाडेसर ५ तेली ६ तंबटे ७ ढवण ८ डुबळे ९ नारकर उर्फ तेळी १० पिळणेकर

१० पुतमाक्ष—१ आंगिरस २ गौरवती ३ सांकृत्यती

आडनांवें-१ सुकी २ मयेकर ३ आंदारी ४ बांदोडकर

११ नामाभ्य—१ आंगिरस २ बार्हस्पत्य ३ नामाभ्य

आडनांवें—१ मिशाळ २ वैराग ३ जामदार ४ मळीक ५ पालव ६ लोटलेकर ७ पाळ

१२ जमदग्नि—१ आंगिरस २ वरुक्ष ३ पार्शव

आडनांवें—१ पडते २ वाळके ३ रगार ४ सावंत उर्फ सामंत ५ आरसेकर ६ पंडित उर्फ वाळके ७ मोरजकर ८ बांदेकर ( वा. देश्वर कुलदेव ज्यांचा ते )

१३ कपी--१ आंगिरस २ महीध ३ वहक्ष
आडनांवें—१ शिरसाट २ धारकाढे ३ वैद्य उर्फ शिरसाट ४ आगलावे उर्फ शिरसाट

१४ वृद्धविष्णु—१ वसिष्ट २ पौरुकुत्स ३ त्रासद
आडनांवें--१ वळजू २ सडवेलकर ३ नानचे उर्फ पावसकर ४ कवळेकर ५ पाटकर

१५ वत्स--१ वत्सरा २ वसिष्ठ ३ देवरा
आडनांवें--१ चांदेकर २ बेटकर ३ केणी ४ सांपळे ५ पेम ६ चांदिलकर

१६ बाभ्रव्य—१ बाभ्रव्य २ गौतम ३ अंगिरस
आडनांवें--१ कोरगांवकर २ शेट्ये ३ बल्लाळ ४ नलावडे
आडनांवें--१ मुंज २ पारसेकर ३ मंडलीक ४ देव ५ फळारी

१७ विष्णुवर्धन--१ अंगिरस २ पोरुकुत्स ३ त्रासद

१८ पुरीश—१ पुरीश २ वत्स ३ अगस्त्य
आडनांवें—१ पांगम २ चिले ३ म्हाडगुत ४ कर्पे ५ दाटेकर

१९ च्यावनभार्गव--१ विश्वामित्र २ देवरा ३ त्रिपूर
आडनांवें--१ पेडणेकर २ डेगवेकर ३ गाड ४ वेर्लेकर

२० अगस्ति--१ अगस्ति २ द्राढचित ३ विध्मवाह
आडनांवें—१ टोपले २ गोवेंकर ३ कोठवळे ४ आलेकर ५ कांगणे ६ मणेरकर उर्फ गोवेंकर ७ आखरे ८ सोलापूरकर

२१ चाणाक्ष--१ भार्गव २ भार्गस्व ३ मुद्गल
आडनांवें--१ नाटेकर २ बोंद्रे ३ धडम ४ चिरेकर

२२ नित्युदन--१आंगिरस २ पौलस्त्य ३ बादृम्य
आडनांवें--१ देउलकर २ कांदे ३ केरकर ४ मुरकर

२३ मांडव्य-१ विश्वामित्र २ च्यवन ३ प्रवोवाज
आडनांवें--१ वणजारे २ पानकर ३ मीरकर ४ तामसे ५ पोंगुर्लेकर

२४ महेंद्र--१ आंगिरस २ पौलस्ति २ वादृस्य
आडनांवें--१ आळवे २ शिरोडकर ३ म्हाडदळकर ४ न्हावेलकर ५ रेवडेकर

२५ उपमन्यु—१ आंगिरस २ बार्हस्पत्य ३ भारद्वाज
आडनांवें—१ केसकर २ सांगळे ३ माणगांवकर ४ नागोडकर

२६ गार्ग्य--१ आंगिसर २ तैतरी ३ कापिभूव
आडनांवें--१ भंडगे २ डांगे उर्फ डांगी ३ म्हैसकर ४ चणेकर
२७ अत्रि--१ आत्रेय २ अर्चनानस ३ शेवास
आडनांवें--१ भोगटे २ निखारगे ३ नानवडे ४ फुलारी

खुलासा--मंगलोरचे पाळ हे पालव
सुकळवाडचे मणेरकर हे गोवेंकर
बांद्याकडील मणेरकर हे नारवेकर
पेडण्याचे हवालदार हे नारवेकर
कुमठे येथील पंडित हे वाळके

सूचना--बेळगांवकडे "बांदेकर वाणी", मालवणकडे "कुडाळे वाणी," मुंबई-कडे "गोवेकर वाणी," कारवारकडे "वैश्य हळदीपुरमठ" असें त्यांना म्हणतात त्यांचा जींत समावेश होतो त्या ज्ञातीला च "दक्षिणीवैश्य" असें येथें म्हटलें आहे.

दक्षिणी वैश्यांसंबंधीं वर दिलेली माहिती बऱ्या च अंशीं एका पुस्तकावरून घेतली आहे. त्या पुस्तकाचें नांव "दक्षिणी वैश्यांची गोत्रावळी व प्रातःसंध्यावंदन" असें आहे. तें शके १८३४ मध्यें मुंबईवैभव छापखान्यांत छापून रु. आ. मुंगी ( मेडिकल प्राक्टिशनर, ठाणें ) यांनीं प्रसिद्ध केलें आहे.

पुष्कळ वैश्यांना आपलीं गोत्रें माहीत नाहींत व कांहीं लोक या पुस्तकावरून आपलें गोत्र सांगतात, कांहीं वैश्य मात्र पूर्वापार संध्यादिवंदन करणारे व गोत्रप्रवरांचा उच्चार करणारे आहेत व त्यांच्या सांगण्याचा या पुस्तकांतल्या माहितीशीं मेळ बसतो असें तपासाअन्तीं ठरल्यामुळें या पुस्तकांतील माहिती येथें दिली आहे. कांहीं ठिकाणीं अधिक माहिती मिळाली ती वरील यादींत सामील केली आहे.

द. वि. आपटे

## ९८ मराठ्यांच्या इतिहासांतील कांहीं मित्या

खालील मित्या मआसिर-इ-अलमगिरी नामक फारसी तवारिखेवरून काढिल्या आहेत. औरंगजेबाची दक्षिणेंत जी शेवटची स्वारी झाली, त्या काळचा इतिहास लिहितांना, या तारखांचा उपयोग व्हावा.

संभाजीचा शिरच्छेद :—फाल्गुन वा। ३० शके १६१० तारीख ११ मार्च १६८९

रायगडाचा पाडावः—कार्तिक वा। १ शके १६११ तारीख १९ अक्टोबर १६८९

औरंगजेब शके १६१७ ज्येष्ट वा। ३ ता. २१ मे सन् १६९५ रोजीं ब्रह्मपुरीस तळ देऊन राहिला व सुमारें चार वर्षांनीं म्हणजे कार्तिक शु.६ शके १६२१ ता. १९ अक्टोबर सन १६९९ रोजीं मराठ्यांचे किल्ले हस्तगत करण्याकरितां स्वतः बाहेर पडला.

## औरंगजेबाचे वेढे

वसंतगड—मित्ती मार्गशीर्ष शु. १३ शके १६२१, ता० २५ नोवेंबर सन १६९९ रोजीं पडला.

सातारा येथील वेढा—मार्गशीर्ष वा। १२ शके १६२१, ता० ८ माहे दिजंबर १६९९ ते शके १६२२ वैशाख शु. १४, ता. २१ एप्रिल १७०० पावेतों

परळीचा वेढा—वैशाख वा। ८ शके १६२२, ता. ३० एप्रिल ते आषाढ शु.४,ता. ९ जून पावेतों

शके १६२२ चे पावसाळ्यानिमित्त खवासपूर (ता। वाळवे ) येथें शके १६२२ भाद्रपद वा। १२ (ता. ३० आगष्ट सन १७०० ) पासून मुक्काम

पन्हाळ्याचा वेढा—फाल्गुन शु. ११ शके १६२२ ते ज्येष्ट शु० २ शके १६२३ ( ता. ९ मार्च ते २८ मे १७०१ )

शके १६२३ चे पावसाळ्यानिमित्त खटाव येथें ज्येष्ट शु. ३ ता. २९ मे ते कार्तिक वा। ३ ता. ७ नोवेंबर पर्यंत मुक्काम. वर्धनगडाचा पाडाव–ज्येष्ट शु. १२ शके १६२३, ता० ६ जून १७०१. नांदगीर, चंदन व वंदन यांचा पाडाव शके १६२३ आश्विन वा। १, ता. ६ आक्टोबर १७०१

खेळण्याचा वेढा--पौष शु० ८ शके १६२३ ता० २६ डिसेंबर १७०१ ते ज्येष्ठ वा। ६ शके १६२४ ता. ४ जून १७०२. शके १६२४ चे पावसाळ्यानिमित्त बहादूरपूर येथें ज्येष्ठ वा। ११ ते कार्तिक पावेतों मुक्काम

कोंडाण्याचा वेढा--पौष वा। ४ शके १६२४, ता. २७ डिसेंबर १७०२ ते वैशाख शु० ३ शके १६२५, ता. ८ एप्रील १७०३

शके १६२४ चे पावसाळ्याकारितां पुणें येथें वैशाख वा। १२ ता० १ मे ते कार्तिक शु. १३, ता. १० नोवेंबर १७०३ पावेतों मुक्काम

राजगडचा वेढा—मार्गशीर्ष शु० ५ ता. २ डिसेंबर १७०३ ते माघ वद्य ७ शके १६२५ ता० १६ फेब्रुवारी १७०४

तोरण्याचा वेढा--माघ वा १४ ते फाल्गुन शु. १५ शके १६२५ (ता. २३ फेब्रुवारी ते १० मार्च १७०४).

शके १६२६ चे पावसाळ्याकरितां खेड येथें चैत्र वा ९ ता. १७ एप्रिल ते कार्तिक शु. ५ ता. २२ आक्टोबर पावेतों मुक्काम

वाखिनखेडें (मद्रास इलाखा) येथील वेढा--माघ वा १० शके १६२६ ता. ८ फेब्रुवारी ते वैशाख शु. १५ शके १६२७, ता. २७ एप्रिल १७०५ पावेतों

शके १६२७ वैशाख ते कार्तिक वा ३ शके १६२७ ता. २३ आक्टोबर पावेतों देवपूरचा मुक्काम

औरंगजेब देवपुराहून बहादरपुरास जातो (पौष शु.१ शके १६२७ ता. ६ डिसेंबर) व तेथून नगरास पोंचतो (माघ वद्य ३ शके १६२७ ता. २० जानेवारी १७०६).

औरंगजेबाचा मृत्यु:--शके १६२८ माघ वा ३० (ता. २० फेब्रुवारी १७०७)

पां. म. पटवर्धन

## ९९ चिंतामणकृत शिवदिनाष्टक

शिवदिनकेसरींची माहिती इतरत्र पुष्कळ ठिकाणीं आली आहे. त्यांच्यावर कोणी चिंतामण कवीनें केलेलें अष्टक भालगांवमठांतील संग्रहांत आढळलें. अष्टक गोड आहे. चिंतामण कवींची गुरुभक्ति त्या अष्टकांत पूर्ण बिंबलेली आहे. सर्व गुरुभक्तांना हें अष्टक प्रिय होईल, असा भरंवसा आहे.

॥ श्रीगुरुशिवकेसरीउब्दोध ॥

ध्यातसें निज अंतरीं गुरुमाउली करुणाघना।
दृष्टि मुरडुनि रूप पहातां होतसे मम उन्मना ॥
देव किन्नर करिति ज्याच्या येउनी पदवंदना।
तो चि सद्गुरुनाथ शिवदिन मानला बरवा मना ॥ १ ॥
संत ज्याचें स्मरण करिती भावें करुनी कीर्तना।
टाळनादें नामघोषें तोषवीती सज्जना ॥

बोध करुनी उद्धरी जो सर्व जड मुढ या जना ।
तो चि सद्गुरुनाथ शिवदिन मानला बरवा मना ॥ २ ॥
वाल्मिकादिक सर्व ऋषिगण करिति ज्याच्या पूजना ।
गंध अक्षत परिमळादिक वाहती बहु सूमना ॥
उजळुनीयां धूप दीपा देति षड्रसभोजना ।
तो चि सद्गुरुनाथ० ॥ ३ ॥
हस्तकमळा धुउनि सुंदर बैसविति सिंहासना ।
तांबुलातें अर्पुनी वरि देति तनुमनदक्षणा ॥
करुनियां नीरांजना अणि मंत्रपुष्पसमर्पणा ।
तो चि सद्गुरुनाथ ॥ ४ ॥
भक्त ऊभे राहती साष्टांग करिती नमना ।
कर जोडुनि वीनवीती देई मंत्रोद्धारणा ॥
दीन बंधु नाथराया नयनिं दाखविं गुरुखुणा ।
तो चि सद्गुरुनाथ शिवदिन मानला बरवा मना ॥ ५ ॥
साहि च्यान्ही ग्रंथ अठरा करिति ज्याची वर्णना ।
नारदादिक आळवीती हातिं घेऊनी विणा ॥
विश्वव्यापक पूर्ण भरला गंध जेवी चंदना ।
ता चि० ॥ ६ ॥
रामकृष्णशंकरादिक करिति ज्याची अराधना ।
नेणती हो श्रेष्ठ कांहीं देव आणिक गुरुविणा ॥
निश्चयेंसीं नित्य तुंबर करिति नामगायना ।
तो चि० ॥ ७ ॥
चिंतामण नयनिं पादे नाथ सद्गुरु शिवदिना ।
धन्य जाला जन्म माझा सेवितां गुरुचरणा ॥
अष्टकातें पठण करितां दुरि करी भवबंधना ।
तो चि सद्गुरुनाथ शिवदिन मानला बरवा मना ॥ ८ ॥

शं. श्री. देव

## १०० शिवगुरुदास पीतांबर

रा. चांदोरकर यांच्या सर्वतोपरि उपयुक्त अशा कविकाव्यसूचींत शिव- गुरु नांव दिलें असून त्याच्या पुढें त्यांचे ग्रन्थ म्हणन ' पदें ' अशी नोंद आहे.

हे शिवगुरु कोठील, कोण, केव्हां होऊन गेले वगैरे कांहीं माहिती दिलेली नाहीं. कदाचित् ते शिवगुरु नसून शिवगुरुदास पीतांबर असण्याचा संभव आहे. सदरहु सूचीच्या पुरवणीसूचींत शिवदास नांव नमूद असून त्यांचा काल १७०४ दिला आहे. ते शिवदास म्हणजे हि शिवगुरुदास पीतांबर च कीं काय, कोण जाणे.

भालगांवमठांतील एका कागदावर एका बाजूस १७३१ माघ वद्य ७ ते ११ पर्यंतचा म्हणजे अर्थात् श्रीरामदास नवमीच्या उत्सवाचा जमाखर्च दिला असून दुसऱ्या बाजूस पुढील दोन सुंदर, प्रेमळ पदें आहेत, तीं सर्वांस आवडतील, असें जाणून येथें देतों.

१

॥ श्रीगुरुगणपतये नमः ॥

कोण तारिल बा गुरुराया । तुजाविण पापि नरा या ॥ ध्रु० ॥
जन्मजराभय व्याधि दुःख किती । सोसूं वपु गा या ॥ १ ॥
लोभमोहमदमार कोठवर । साहूं षड्रिपुघाया ॥ २ ॥
तृष्ण कल्पना व्याकुळ मन कहिं । न सुचे धीर धराया ॥ ३ ॥
प्रबल अहंतागर्वप्रवाहीं । बुडतो नेणे तराया ॥ ४ ॥
पीतांबरहृदिं शिवानंद हा । इच्छितो भ्रांति हराया ॥ ५ ॥

(२)

कधिं तरि विटशिल बा संसारा । करिशिल गुरुपदिं थारा ॥ ध्रु० ॥
विषयगरल हें मारक सेवुनि । नागविशी हितसारा ॥ १ ॥
अंतकाळिंच्या बिकट यातना । चुकविना धन दारा ॥ २ ॥
आप्त बंधु गण गोत सोयरे । टाकुनि जाशि पसारा ॥ ३ ॥
क्षणिक तनूचा नाहिं भरवसा । केव्हां जाइल वारा ॥ ४ ॥
शिवगुरुदास पीतांबर म्हणतो । सावध हो गव्हारा ॥ ५ ॥

शं. श्री. देव.

## १०१ अनंतकृत दामाजीची रसद

ही कविता सातारा जिल्ह्यांतील कोरेगांव ( तालुक्याचें ठिकाण ) येथें एका मनुष्या जवळ होती. कऱ्हाडी कागदांच्या चार चंद्रांवर पाठपोट मोडी लिपींत हें काव्य लिहिलें आहे. एकंदर श्लोक ७० आहेत. उजव्या बाजूस कागद उंदरानें तोडले आहेत.

कविता सामान्यतः बरी आहे. छंदोभंगादि दोष ठिकठिकाणीं आहेत. बहुतेक श्लोक भुजंगप्रयात वृत्तांत रचलेले आहेत. " रघुवीर ", " राम " असे ईश्वरवाची शब्द ठिकठिकाणीं आले आहेत ह्यावरून व रामदासी वृत्त जें भुजंगप्रयात तें च सर्व श्लोकांचें बहुधा वृत्त आहे ह्या वरून कवि रामदासी-पंथ-प्रिय दिसतो. ग्रंथमचें मंगला-चरण हि रामदासी मनाच्या श्लोकांतील मंगला-चरणा सारखें आहे, तें असें--

नमो जे मुळीं त्या गणाधीपतीला ॥
नमो शारदा आदिमाये सतीला ॥
क्रमू वृत्त आरंभुनी त्या द्विजाचे ॥
भला भक्त जो पंत दामाजि ज्याचे ॥ १ ॥

कवीनें काव्याच्या शेवटीं सांगितलें आहे त्या शिवाय त्याचें वृत्त कळण्यास मार्ग नाहीं. कोरेगांवच्या एका वृद्ध गृहस्थाच्या सांगण्यांत हा कवि कोरेगांव येथें ६०।७० वर्षांपूर्वी शाळापंतोजी होता. शेवटचा श्लोक असा आहे—

मुळी बुंधिचा सांप्रती सास्वडात ॥
वसे ठाय ज्याचा भला कीर्तिवंत ॥
जया नाम आनंत त्या चरणी या ॥
क्षणीं लागतां राम जाला गणी या ॥ ७०

कोरेगांवा पासून ८।१० कोसांवर फलटण जहागिरींत सास्वड म्हणून एक गांव आहे त्यास झणझण्याचें सास्वड असें म्हणतात, तेथें हा शेवटीं राहत होता असें वाटतें. कारण हें कोरेगांवास जवळ आहे. परंतु " कीर्तिवंत " ह्या शब्दांत जर कांहीं विशेष अर्थ असेल तर मग पुरंदऱ्यांचें प्रसिद्ध सासवड हि असूं शकेल. हा आपणास मूळचा बुंधिचा म्हणतो तें " बुंधि " गांव कोठें आहे त्याचा पत्ता अजून मला लागला नाहीं.

ह्या कवितेच्या मासल्याकरितां एक दुष्काळवर्णनाचा श्लोक देतों.-

जळें जाहलीं थोडकीं ठायिं ठायिं ॥
पसा पायली धान्य ही तेवि होई ॥
तया कारणें वेचलीं तीं धनें ही ॥
निरूपाय जाला सुचेना चि काही ॥ ५५ ॥

ह्या मोडी नकलेच्या आरंभी "दामाजीचा (चें) वृत्तकथन" असा मथळा लिहिला आहे व शेवटीं " दामाजीचि रसद समाप्त" असें म्हटलें आहे. कवितेचा मुख्य विषय हि तो च आहे. ह्या करितां म्यां हि "दामाजीची रसद' हें च नांव ह्या

कोंव्यास दिलें आहे. मूळ मोडी प्रत मंडळाच्या संग्रहास राहण्या करितां सोबत जोडिली आहे.

कृ. वि. आचार्य काळगांवकर

## १०२ शंभर वर्षां पूर्वीं तुकाराम बोवा देहूकर यांच्या योग्यतेबद्दल तंटा

पुढील पत्र श्रीवर्धन येथील देशकुळकरणी जे कर्णिक त्यांच्या दप्तरांत सांपडलें. ह्यांत श्रीवर्धनगांवच्या लक्ष्मीनारायणाच्या देवालयांत झालेल्या एका कथाप्रसंगीं घडलेल्या वृत्ताची हकीकत जंजिरे येथील सरकारांत तक्रारीच्या रूपानें दिली आहे. हरिदास काशीनाथ गोसावी यानें श्रोत्यांस तुकाराम या नामाचें भजन करण्यास विनंति केली. ती कित्येक ब्राह्मणश्रोत्यांस पसंत पडली नाहीं. त्या वरून हरिदासांनीं साधुसंत तुकोयाचें नांव घेत आले आहेत, तेव्हां तें घेण्यांत आपणाला कांहीं कमीपणा नाहीं, असा टोला मारला. त्यावर वाण्याला इतका नामसंकीर्तनाचा, भजनाचा व गुरुत्वाचा मान ब्राह्मणांकडून देतां येणार नाहीं असा कांहीं ब्राह्मणांनीं उलट जबाब दिला. तत्रापि हरिदास व त्यांचा भाऊ हे तुकाबाचें नामसंकीर्तन आपण करणार असें आग्रहानें बोलून तदनुरूप आचरण करूं लागले. शेवटीं प्रकरण तोंडांत मारण्या पर्यंत गेलें. अर्थात्, सरकारदरबार सुरु झाला. तेव्हां श्रोत्यांत जे संभावित होते त्यां पैकीं रामचंद्र लक्ष्मण व पांडुरंग लक्ष्मण कुळकर्णी यांनीं पुढील जबानी लिहून दिली. श्रीवर्धनचे कुळकर्णी कायस्थ होते. हा प्रसंग शक १७२९ त म्हणजे १०८ वर्षां-पूर्वीं कोंकणांत घडला. गुरुत्व गेलें नीचयातीं, असें समर्थांनीं म्हटलें आहे. त्याचा अतिव्यापक अर्थ करून श्रीवर्धनच्या कांहीं ब्राह्मणांनीं आचरण केलें, असें म्हणावें लागतें. पत्र येणें प्रमाणें:--

आश्विन शुद्ध २ शके १७२९

हु

लक्ष्मीनारायण

तकरीर बो रामचंद्र लक्ष्मण कुलकर्णी मो श्रीवर्धन सुा समान मिया तेन व अलफ आपण श्री याचे देवालयांत कासीनाथ गोसावी व त्याचे बधु बापाजी यांची कथा होत होती तेथे कथा कांहीं थोडीबहुत होत होती तों इतक्या आपण गेलो तेथे भाशण झाले बापाजी गोसावी कथेस

उभे राहिले होते ते बोलिले की तुकाराम तुकाराम ऐसे सर्वाही म्हणावे साधुसंत म्हणत आले त्याप्रमाणे आपण रुपा करून म्हणावे तेव्हा प्रथम हरिपंत येकटे व त्याचे जवळ आसपास गोविंदपंत वाडदेकर बसले होते तात्या अधिकारी भिक्षुक-मडळांत होते तेव्हा हरिपंत व वाडदेकर बोलले की आम्ही ब्राह्मण असता तुका-राम वाणगट आसता आम्हास भज्यन करावयासी सागता त्यास .आम्ही करणार नाही तेव्हा बापाजी बोलले की तुका सोडावा आणि राम म्हणावा तेव्हा वाडदे-कर व हरिपंत व तात्या अधिकारी बोलले की तुम्ही म्हणवणार कोण तेव्हा बापाजी बोलले की साधुसंत म्हणत आले म्हणोन आम्ही तुम्हास सागतो तेव्हा बोलले की तुम्ही साधूचे पैजार शोभाल की काय तेव्हा बापाजी बोलले की आम्ही करितो तेव्हा गोसावीबावा बोलले की लेकराचे बोबडे बोल आपण गोड करून घ्यावे तेव्हा हे तिघेजण बोलिले की हे आमचे ऐकत नाही तेव्हा आम्ही याचे तोडात मारावा की काय तेव्हा कासीनाथ गोसावी बोलिले की तुम्ही जे माराल ती मी च आपले भावाचे तोडात मारितो ऐसे बोलोन बापाजी याचे तोडात मारिले त्याजवर गोसावी उठोन नमस्कार केला या प्रमाण वर्तमान जाले ते समई विठोबा मजुमदार देवलात होते हे लहून दिल्हे सही छ १ माहे शाबान लिहिल्या प्रा रामचद्र लक्ष्मण मान्य मी माहाली यावे त्यास सरीरी समाधान नाही

बि॥ पांडुरंग लक्ष्मण कुलकर्णी प्रो मजकूर

१

## १०३ कृष्णदास ताना कृत महाबळभट कथन ( ? )

सूचींत तीन नांवें तानाजीचीं आलीं आहेत. तुळशीची आरती करणार एक, सासुरवास व अंबास्तव करणारे दुसरे, व अश्वपरिक्षा करणारे तिसरे.हे सर्व एक किं अनेक याबद्दल ‘ सूचींत ’ स्पष्टीकरण नाहीं; या अनिश्चिततेंत आणखी आज भर घालण्याचें योजिलें आहे. विशेष इतका च कीं या आजच्या ‘ ताना ’ नें स्वतःस कृष्णदास म्हटलें आहे.

कवींचीं चरित्रें उपलब्ध नसलीं म्हणजे कसे संशय उत्पन्न होतात त्याचा मासला थोडकासा खालीं देतों:—

कृष्णदास ताना यानें वर दर्शविल्याप्रमाणें ‘ महाबळ भट कथन ( ! ) ’ रचिलें आहे. चरित्र दशम स्कंदांत आहे हें सर्वश्रुत च आहे. या दशमाचें प्राकृत अवतरण ’ बाळक्रीडा ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. तेव्हां वर ‘ दिलेलें महाबळ भट

कथन ' हें हि बाळक्रीडेंतील एक प्रकरण असलें पाहिजे. कारण आरंभीं च तानां म्हणतो:--

आइकें राया परिक्षिति । श्री कृष्णाची ख्याती ॥
पूतना मारूनि निभ्रांति । सकळ विचारीं पडिलें ॥ १ ॥

येथें ' पूतनाशोषणाचा ' स्पष्ट उल्लेख असून त्यानंतर या प्रकरणास सुरवात आहे. तेव्हां ' ताना ' नें त्या प्रकरणावर ही टीका केली असली पाहिजे हें उघड आहे. शेवट जो दिला आहे तो असा:--

" इति श्री भागवते महापुराणे परमहंससंहितायां श्रीदशमस्कंदे महाबळ भट कथन नाम षोडशोऽध्याय:".

हा सोळावा अध्याय आहे. मूळांत तो असावा. तेव्हां हें अवतरण आहे यांत शंका नाहीं व त्या अवतरणाचे पहिले १५ अध्याय होऊन हा १६ वा आहे; व या नंतर हि हा ग्रंथ पुढें चालला आहे हें हि निश्चित आहे:--

रिठासुर दैत्य दारुण: त्या बाळकें घेतला प्राण:
पुढां कैसें वर्तलें जाण: ते सांघेल कृष्णदास तानो ॥ ५९ ॥

या वरून हा ' बालक्रीडे ' चा ग्रंथ आहे.

आतां ' बालक्रीडा ' करणारा एक **कृष्णदास** आहे परंतु तो ' कृष्णदास ' **गोविंद** आहे ( सूचि पा. २१ ); प्रस्तुतचा कृष्णदास **ताना**. तेव्हां या दोन भिन्न व्यक्ति होत्या कां ! दुसरें, या कृष्णदास गोविंदानें **अंबास्तुति** केली आहे. तानाजी देशमुखानें हि **अंबास्तव** केला आहे ( पा. ४२ ). तेव्हां अंबास्तव करणारा '**ताना**' हा च 'कृष्णदास' **गोविंद** व 'कृष्णदास' **ताना** कीं काय ! गोविंद हें खरें नांव असून आपल्या गुरूप्रमाणें ( कान्हा ) स्वत:स हि 'ताना' ( तान्हा ) असें यानें नांव धारण केलें कीं काय ! ( पहा--कान्हा हरिदास, कृष्णदास गोविंद, व ताना ). असले हे संशय समग्र ग्रंथ अथवा ग्रंथकाराचें चरित्र उपलब्ध होईपावेतों कायम च असावयाचे.

वर दिलेल्या उताऱ्यावरून श्रीनाथांच्या वेळची किंवा किंचित् नंतरची भाषा या ग्रंथांत उपलब्ध होत आहे, हें उघड दिसतें. या भाषेवरून मात्र कृष्णदास गोविंद व कृष्णदास ताना हे भिन्न दिसतात. कृष्णदास गोविंदाचा काल मीं १६८०–१७०० हा दिलेला आहे.

आतां प्रत्यक्ष ग्रंथाबद्दल थोडें लिहूं. पोथी १२ बोटें लांब असून ८ बोटें रुंद आहे. कागद पुरातन जाड आहे, परंतु दुहेरी नाहीं. लेखक अत्यंत अडाणी दिसतो. तथापि तो जुना आहे यांत संशय नाहीं. कारण एक तर सर्वत्र ' ख ' हेवजीं ' ष ' चा उपयोग केला आहे व दुसरें क्वचित् अनुस्वार मागें दिलेला आढळतो जसें ष्याति ( ख्याति ), गोकुळासीं ( गोकुळासीं ).

वरील वाक्यांगाहून हि या पोथीचा अथवा कथाभागाचा एक विशेष आहे. त्याचें येथें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे. भा. इ. सं. मंडळाचे शक १८३७ चे संमेलनप्रसंगीं मला एका बाळक्रीडेच्या ग्रंथावर टीका करण्याचा प्रसंग आला होता. त्या बाळक्रीडेचा कर्ता कोणी 'एकनाथ' 'जनार्दनाचा एकनाथ' नांव घेणारा तोतया होता. श्रीनाथांनीं दशमस्कंदावर टीका केली नाहीं हें सर्वश्रुत च आहे असें असून हा "जनार्दनाचा एकनाथ" कोण असा संशय त्या च वेळीं मला आला व एकंदर ग्रंथावरून जें मला भावलें त्यावरून हि तो कोणी तोतया असला पाहिजे असें माझें मत झालें व मंडळास हि ती माझी टीका मान्य झाली असें मला त्यावेळीं वाटलें.

त्या बाळक्रीडेंत मूळ श्रीमद्भागवत अथवा हरिवंश यांत नसलेला एक कथाभाग आला होता. तो च कथाभाग हल्लींच्या 'महाबळभट्ट कथनांत' आहे. रिठासुर नामक दैत्याची एका दोऱ्याचे गांठींत स्थापना करून तो दोरा श्रीकृष्णाचे कंठांत बांधण्याकरितां 'माभळ' भट घेऊन गोकुळास आला. ही कथा किंचित् फरकानें या दोन्हीं ग्रंथांत दिलेली आहे. बाळक्रीडेंत या असुराची स्थापना फक्त काळ्या दोऱ्यांत च होती; येथें आणखी एक 'रिठा' जास्त आला आहे व म्हणून त्यास रिठासुर नांव पडलें आहे.

ही कथा या दोन्हीं ग्रंथकारांनीं कोठून आणली कोणास ठाऊक. बाळक्रीडेचा कर्ता तोतया एकनाथ हा मीं 'मानभव' असावा असें दर्शविलें होतें. त्या च कथेचा स्वीकार करणारा हा कृष्णदास ताना कोण !

पोथीचे समासांत या कथेस 'भट अख्यान' म्हटलें आहे.

गो. का. चांदोरकर

## १०४ लीळासंवादांतील संकेत

शके १८३५ चे 'वार्षिक इतिवृत्त' चे ६ वे पानावर रा. राजवाडे यांनीं मानभवांचा एक संकेत दिला आहे. त्या संकेतावरून 'लीळासंवादांतील' कांहीं 'एकाक्षरी' संकेत सहज उमगतां येतात; उदाहरणार्थः—

| | |
|---|---|
| कः—रर | मीः—वि(नंति) |
| कुः—पुशिलें | त्मीः—स्वी(करणें) |
| कें—पेणें केलें | गंः—दं(डवत) |
| सेंः—त(र) | पः—ज(र) |

परंतु नेवढ्यानें सर्व संकेतांचा बोध होत नाहीं. सदरचा ग्रंथ नुकता च वाचण्यांत आल्यानें पुढील वाचणारास व्यर्थ श्रम पडूं नये म्हणून सर्व संकेतासंबंधी

येथें थोडक्यांत विवेचन करतों. वर दिलेल्या संकेतांवरून एक गोष्ट लक्षांत आली च असेल कीं शब्दांतील एक अक्षर घेऊन त्यावर च सबंध शब्दांत उपलब्ध होणाऱ्या काना मात्रा व अनुस्वार यांचा बोजा लादावयाचा.

एक च अक्षर घ्यावयाचें तें निश्चयानें प्रथमचें च असावयाचें असा हि कांहीं नियम नाहीं. शेवटचें हि घेतलेलें असतें. तथापि एक नियम दिसतो (वस्तुतः त्यास नियम हि म्हणतां येत नाहीं. या लिपींत नियम अथवा 'पद्धत' अशी निश्चित कांहीं नाहीं च ) तो असा कीं त्र्यक्षरी शब्द असल्यास प्रथमाक्षर घेतलें असतें. द्व्यक्षरी असल्यास शेवटचें घेतलें असतें. परंतु वर दर्शविल्याप्रमाणें हा नियम अबधित आहे असें कोणीं समजूं नये.

मागें मीं एका लेखांत या मानभवांचा लिपीचे बाबतींत एक विचित्रपणा नमूद केला होता. तो हा कीं, कांहीं शब्द यांनीं सांकेतिक लिपींत लिहून कांहीं 'रूढ' लिपींत लिहिले आहेत (एका च ग्रंथांत व एका च वाक्यांत ) ; संकेतांचे संबंधीं हि त्यांनीं हा च क्रम ठेविलेला आहे. वर दाखविल्या प्रमाणें कांहीं संकेत त्यांचे सांकेतिक लिपींतील एकाक्षरी आहेत, कांहीं रूढ लिपींतील एकाक्षरी आहेत। आणि कांहीं तर केवळ चिन्हें च आहेत.

असा हा 'संकोच' व अशी ही गूढता कां ? मला वाटतें 'लीळासंवाद' हा ग्रंथ वाचल्यानें या प्रश्नाचें उत्तर देतां येण्यासारखें आहे. पण त्या बद्दल पुढें एखादे वेळीं पाहूं.

सूचनाः-जेथें 'त' व 'प' वर आडवी रेघ आहे तेथें तो संकेत म समजतां 'आहेत', 'पर' या अर्थी ते आहेत असें समजावें.

संकेत व चिन्हें अशीं:—

| चिन्ह | | रूढ | संकेत | | रूढ |
|---|---|---|---|---|---|
| ऽ | – | मग | उ | – | आउ |
| ॿ | – | राउळ | उे | – | आउवे |
| ,, ,, | – | म्हणौनि, देखौनि | | | |
| U | – | एकदां | धीं | – | आधीं |
| ३ | – | देव | थ | – | तथा |
| ३। | – | देवता | त्स | – | सद्गुरू |
| ॿ | – | ब्रह्म | दें | – | दर्शन |
| ६ | – | आनंद | कें | – | पेर्णे केलें |
| ९ | – | मूर्ति | वां | – | देवां |

| | | |
|---|---|---|
| ७ | – | नैवेद्य |
| ८ | – | चक्रधर |

| संकेत | | रूढ |
|---|---|---|
| ई | – | ईभु, विभू |
| ईळ | – | ईठ्ठल, विठ्ठल |
| ल्मी | – | स्वी( करणें ) |
| गं | – | दं( डवत ) |
| गु | – | गुरू |
| कुं | – | पु( शिलें ) |
| प | – | जर |
| उरें | – | उपरें |
| कं | – | पर |
| स्सी | – | बुद्धि ? |
| अं | – | अनेक |
| न्स | – | मान्स, मनुष्य |
| ब्रं | – | ब्राह्मण |
| ब्रीं | – | ब्राह्मणी |
| स | – | तर |
| ढ | – | स्थित होणें |
| अें | – | समागमें |
| क | – | भक |
| कृ | – | कृष्ण, रूष्ण |
| गूं | – | सांगूं |
| मी | – | वि( नंति ) |
| सीं | – | हीं( व ), थंडी |
| ओ | – | ब( सले ) |
| श्र | – | भ( स्लिले ) |
| ७१ | – | आ( सन ) |
| ए | – | हें |
| एठें | – | तिष्ठले, स्थित झाले |

गो. का. चांदोरकर

## १०५ विष्णुदास नामा

मंडळापुढें मागें मीं एकदां कपोताख्याना वरून विष्णुदास नामा यांचा गुरु ' रामभारथी ' म्हणून दिलें आहे. आज एक यांचें च ' शल्यपर्व ' उपलब्ध झालें आहे, त्यांत एक ओंवी आली आहे ती विचारार्ह आहे, म्हणून देतोंः–

तयेसि करोनिया नमन । मग ते जालीं प्रसन्न ॥
ते हि दिल्हे वरदान । कवित्वमति ॥ १२ ॥
गोपिनाथाचेनि प्रसादें । सांगीन गदापर्व विनोदें ॥
तया माजि आधि । शल्यपर्व ॥ १३ ॥

येथें गोपीनाथ हे कोण ?

गो. का. चांदोरकर

# १०६ श्री कान्होबा-मढि

अहमदनगर जिल्ह्यांत शेवगांव तालुक्यांत मढि म्हणून एक गांव आहे, येथें नवनाथांपैकीं श्री कानीफ नाथांची समाधि आहे. या कानीफनाथास च कान्होबा म्हणतात. कान्होबाच्या समाधीमुळें मढाची बरी च प्रसिद्धी असून तेथें फाल्गुन वद्य पंचमीला प्रचंड यात्रा भरते. अहमदनगरापासून हें स्थान सुमारें बारा कोस असून अहमदनगर-तीसगांव या रस्त्यानें तीसगांवावर येऊन तेथून सडक सोडून आड मार्गानें दोन तीन मैल गेलें म्हणजे हें स्थान लागतें. कान्होबाचें देऊळ एका लहान टेंकडीवर आहे, त्यामुळें तें बऱ्या च अंतरावरून दिसतें व जसजसें जवळ जावें तसतशी या देवळाची शोभा जास्त जास्त च दिसूं लागते. देवळाची एकंदर रचना, तेथील घुमट, कळस वगैरे सुंदर दिसतात.

या स्थानांत विशेष गोष्ट म्हटली म्हणजे, येथें जरी नवनाथांपैकीं कानीफनाथ या हिंदुसत्पुरुषाची समाधि आहे, तथापि येथील पुजारी मुसलमान आहेत व कान्होबा हा हिंदुमुसलमानांचा देव झाला आहे, व दोघे हि येथें भक्तीनें भजतात. एकंदर देऊळ व शुद्ध कान्होबाची समाधि हीं मुसलमानी पद्धतीप्रमाणें आहेत. हिंदु व मुसलमान कान्होबाला आपला च साधु समजात. नऊ नाथांपैकीं प्रत्येकास असें च समजण्यांत येतें. याचें काय कारण असेल याचा उलगडा अद्याप बरोबर झाला नाहीं. हिंदुमुसलमानांस सारखे च मानणारे राम व रहीम हें एक च अशी संत कबीराप्रमाणें भावना ठेऊन विश्वबंधुत्वाच्या कल्पनेचा प्रसार करणारे हे नऊ सत्पुरुष होऊन गेले असावेत असें हल्लींच्या स्थितीवरून वाटतें.

कान्होबाच्या देवालयास जाण्यास तीन मार्ग आहेत. त्यांपैकीं पूर्वेकडचा मुख्य आहे. तिन्ही ठिकाणीं दगडी पायऱ्या बांधिलेल्या आहेत. पूर्वेकडून गेलें म्हणजे सुमारें सवाशें पायऱ्या चढाव्या लागतात व मुख्य दरवाजा लागतो. त्यांतून आंत गेलें म्हणजे मध्यभागीं कान्होबाचें भव्य मंदीर दिसतें. मंदीर सर्व असून सुंदर बांधलेलें आहे. बांधणी हिंदु-मुसलमान पद्धतीच्या मिश्रणाची आहे. मुख्य गाभाऱ्यांत कान्होबाची समाधि आहे ती मुसलमानी पीराप्रमाणें आहे. परंतु त्यांत हि थोडी भिन्नता दिसून येते. समाधि पीराप्रमाणें उंच नसून थोडी पसरट बांधली आहे. तिजवर नेहमीं गलफ असतो. शोभेकरतां वरतीं शहामृगाचीं अंडीं टांगलेलीं आहेत. येथें कान्होजी आंगरे यांनीं देवास अर्पण केलेला पितळेचा सुमारें दोन वीत उंच असा एक घोडा आहे. तसे च दिल्लीचा शहाअलम बादशहा यानें देवास अर्पण केलेलीं माही-मरातबाचीं चिन्हें देवाजवळ आहेत. हीं दोन चिन्हें एका पितळी दांडीवर जाळीदार पंजाप्रमाणें आहेत. काठीची उंची

सुमारें दोन फूट असून वरील चिन्ह एक फूट उंचीचें आहे. माहीचें चिन्ह बदामी आकाराचें आहे व मरातब वरच्या बाजूस थोडें पसरट आहे. दोन्हींवर उत्तम नक्षीदार जाळीचें काम असून तींत कुराणांतील वचनें कोरलेलीं आहेत. दिल्लीचे बादशाहा बहुमानार्थ माही-मरातबाचीं चिन्हें देत असत. महादजी शिंदे यांना सन्मानाचीं चिन्हें मिळालीं होतीं, तसलीं च चिन्हें शहा अलम बादशहांनीं श्री कान्होबास समर्पण केलीं आहेत.

गाभारा सभामंडपापेक्षां थोडा उंचीवर असून गाभाऱ्याच्या जोत्यावर दरवाज्या पुढें-

॥ श्री चरनी दृढभाव ॥

॥ पीलाजी गायकवाड ॥

असा मराठी लेख आहे व लेख ओलांडून च गाभाऱ्यांत जावें लागतें. लेखां-तील अक्षरें आंत खोदलेलीं नसून वरती उठावदार बनविलेलीं आहेत. गाभाऱ्याच्या उजव्या बाजूस देवाचें शेजघर असून तेथें पलंग आहे. शेजघराच्या पुढें सभामंडपांत देवाचें सिंहासन आहे. त्यावर चौरंग मांडून कुराण ठेवलें आहे. सिंहासन बरें च मोठें असून त्याचें काम प्रेक्षणीय आहे. त्यावर सुरेख नक्षीकाम केलेलें असून वरील छत्राच्या पुढील जी कमान आहे तिजवर अरबी भाषेंत कुराणांतील वचनें कोरलेलीं आहेत. सिंहासन सर्व दगडी असून त्याची नक्षी, बांधणी वगैरे सर्वांग-सुंदर आहे. तें सुमारें दीडशें वर्षांपूर्वी बारामतीचे देशमुख काटे यांनीं बांधलें. काटे यांचे डोळे गेले होते म्हणून त्यांनीं नवस केला. त्याप्रमाणें त्यांचे डोळे बरे झाले म्हणून हें सिंहासन त्यांनीं बांधलें. गाभाऱ्याच्या दरवाज्याच्या वरच्या बाजूस "बिस-मिला हिर रहमा निर रहीम लाहिलाल्ला इल्ल इल्लिला हो महमद रसिलिला' हा सुप्रसिद्ध मंत्र अरबी अक्षरांत कोरला आहे. सभामंडपाच्या फरशीवर मध्यभागीं एक शिलालेख आहे, त्याचीं अक्षरें वर दिलेल्या मराठी लेखाप्रमाणें च उठावदार आहेत. लेखाच्या पांच ओळी असून तो दक्षिणोत्तर आहे. तो येणें प्रमाणें-

( १ ॥ चीमाजी सावतः भः ॥

( २ ॥ की नीरंतरः नीते नमः ॥

( ३ ॥ स्कारः शीहांसनीः ॥

( ४ ॥ तुझे गा पाडलः मस्तका उपरी ॥

( ५ ॥ द्वारका नगरी टाव मजः ॥

सभामंडपाच्या बाहेर समोर च परंतु थोडे डाव्या हातास एक ओटा आहे. त्यास दाळिंबाचा ओटा म्हणतात. त्यावर पूर्व बाजूस तिसरा मराठी शिलालेख

आहे. तो जरा निराळ्या तऱ्हेनें लिहिला आहे. अक्षरें पहिल्या दोन लेखांसारखीं च आहेत. परंतु या शिलेचे दोन भाग कल्पून पहिल्या भागांतील वाक्य निराळें आहे व दुसऱ्या भागांतील निराळें आहे. पहिल्या भागांत " श्री नृप शालीवाहन शके १६५२ साधारणनाम संवत्सेर " येव्हढें च येतें. दुसऱ्या भागांत " मढी द्वारका तेथे माझा सखा । तयाचे चरणी लक्ष माझे । पिलाजी गायकवाड । चिमाजी भगत सावत । " असें आहे. एकंदर लेख खालीं दिला आहे—

( १ ) श्री नृपशा ॥ मढि द्वारका तेथें मा ( १ )
( २ ) ली वान सः ॥ झा सषाः तयाचे चर ( २ )
( ३ ) के १६५२ सा० | णी लक्ष माझी ॥ पील ( ३ )
( ४ ) धारण ना |
( ५ ) म संवतेस ॥ जी गायेकवाडः चीम ( ४ )
( ६ ) रे ॥ : ॥ ० : ॥ जी भगत सावत ॥ : ॥ ( ५ )

हा लेख शके १६५२ ( इ. स. १७३० ) मधील आहे. परंतु तें साल ओटा बांधल्याचें आहे किंवा देऊळ पुरें झाल्याचें आहे, याचा या लेखावरून उलगडा होत नाहीं. परंतु तें साल देऊळ बांधल्याचें असावें असें वाटतें. या दाळिंबीच्या ओट्याला थोडें महत्त्व आहे. याचेमध्यें नवसाप्रीत्यर्थ जो पशुसंहार होतो, त्याचा नैवेद्य देवाच्या दृष्टीस देखील पडतां उपयोगी नाहीं असला कडक निर्बंध आहे. म्हणून तो या दाळिंबीच्या झाडास दाखवीत असतात. दाळिंबीचें च झाड कां पसंत करण्यांत आलें याचा बरोबर उलगडा होत नाहीं. ह्या दाळिंबीच्या ओट्यास पूर्वी तुळशीवृंदावन म्हणत असत. देऊळ बांधण्याच्या वेळच्या कारखान्याचा व खर्चाचा एक जुना कागद पहाण्यांत आला. त्यांत " कारखानें वृंदावणे दोन सन्मुख तुळसी वृंदावन व द्वितीय वामभागा वृंदावण. ज्या पुष्पवेली वयजयंती " असा उल्लेख असून या दोन वृंदावनांस एकंदर खर्च १०७०८ आला असें म्हटलें आहे.

देवळाच्या समोर वर सांगितलेला मुख्य दरवाजा आहे. तो वाराहट्टीचे नाईक यांनीं बांधला असें सांगतात. दरवाजा मोठा असून काम चांगलें केलें आहे. त्यावर नगारखाना आहे तो त्यांनीं च बांधला. दरवाजाचे आंत दक्षिणेस उत्तर बारदारी नांवाची एक इमारत आहे. तिला पूर्वेकडे एक मोठी खिडकी असून तिच्यापुढें सज्ज्यासारखी बसण्याची सोय केली आहे. येथून दूरवरचा सुंदर देखावा दिसतो. सज्ज्याचा कठडा हि दगडी असून जाळीचा आहे. ही इमारत थोरले शाहूमहाराज यांनीं बांधली. राजमाता येसूबाई यांनीं शाहू महाराज यांस अवरंगजेब बादशहानें धरून नेलें त्यावेळीं महाराज सुखरूप राहून परत

यावेत असा या देवास नवस केला होता. त्या नवसा प्रीत्यर्थ शाहूमहाराजांनीं ही इमारत बांधली. ही इ. स. १७३१ मध्यें बांधली गेली.

पूर्व दरवाज्या लगत उत्तरेस दोन लहान इमारती असून त्यांत शहा जलालोद्दीन व शेख कमाल या दोन बंधूंच्या कबरी आहेत. हे दोघे येथील इनामदारांचे मूळपुरुष होत व त्यांजवर कान्होबांनीं अनुग्रह केला होता असें सांगतात. शके १६५२ साधारण संवत्सरांत पिलाजी गायकवाड व चिमाजी सावंत यांनीं या इमारती बांधल्या असें अहमदनगर ग्याझिटियरमधें म्हटलें आहे. परंतु तें बरोबर दिसत नाहीं. दाळिंबीच्या ओट्यावरील शिलालेखावरील संबंध इकडे लावण्यांत आला असें दिसतें. परंतु तो लेख मुख्य देवळासंबंधीं आहे. या इमारतींबद्दल नाहीं हें उघड दिसतें.

देवळाच्या दक्षिणेस दोन मुशाफरखाने आहेत. ते दगडी नसून तेथें लाकडाचे दुजोडी खण आहेत. यांपैकीं पश्चिमेकडील दुजोडी तीन खण अहमदनगरचा बादशहा मुर्तिजा निजामशहा याचा वजीर सुप्रसिद्ध सलाबतखान यानें बांधले. येथील सर्व इमारतींत ही इमारत पहिली व जुनी आहे. तीसगांव येथें सलाबतखानानें जे समोरासमोर दोन मुशाफरखाने बांधले त्यांच्याप्रमाणें या इमारतीची बांधणी आहे.

देवळाच्या पाठीमागें शहा रमजानचा दरगा आहे. त्याच्या दरवाज्यावर एक मुसलमानी लेख असून " दरगा शहा रमजान बंदेर दरगा " असें त्याच्या आरंभीं आहे. हा लेख महत्त्वाचा आहे. शहा रमजान व कान्होबा एका च सत्पुरुषाचें नांव असें मानण्यांत येतें. या दरग्याच्या खालीं एक तळघर आहे व दरग्यांत गेलें म्हणजे डाव्या हाताच्या कोपऱ्यांत जिना लागतो. जिन्याच्या तोंडाशीं च एक शिळा असून जिन्याचें दार बंद करण्याकडे तिचा उपयोग होत असावा. ही शिला चढून खालीं जिन्यांत उतरावें लागतें. जिन्यांत दाट अंधःकार आहे. एक दोन वळणें जिन्यांत घेतलीं कीं एका लहान झरोक्यासारख्या खिडकीच्या उजेडांत आपण जातों व तेथून एक खोली लागते. ही खोली टेंकडीच्या सपाटीपासून सुमारें वीस फूट खालीं असावी. खोलींत त्या झरोक्यांतून उजेड येईल तेवढा च; त्याशिवाय मुळीं च उजेड नाहीं. खोलींत खालीं फरशी असून वर घुमट आहे. फरशींत एक लहान कुंड काढलें आहे. ही जागा शहा रमजान ऊर्फ कन्होबा यांची समाधी लावण्याची होती. जागा हि समाधीच्या योग्य आहे. वरील दरग्यांत मध्यभागीं कबरीप्रमाणें एक शिला बसविली आहे. परंतु तेथें कबर वगैरे कांहीं नसून खालील तळघराच्या कळसावर कोणीं जाऊं नये म्हणून बसविण्यांत आली असें सांगतात.

या दर्ग्या शेजारीं पश्चिम दरवाजा आहे व तेथून पायऱ्या आहेत. परंतु या पायऱ्या अवघड आहेत त्यामुळें त्यांचा उपयोग होत नाहीं. हा दरवाजा अहमदनगरच्या कविजंगाचे बंधू खोजा शरीफ यांनीं इ. स. १७५० च्या सुमारास बांधला. दरवाजाचें काम चांगलें आहे. दरवाज्याशेजारीं एक पडलेली मशीद आहे. व तिच्यापुढें इनामदारांच्या कबरी आहेत.

देवळाच्या उत्तर बाजूस दरवाजा व पायऱ्या आहेत. तो दरवाजा मोरे नांवाच्या सरदारांनीं बांधला. या तिन्ही दरवाज्यांच्या आंत देवड्या आहेत, व त्यांचें काम चांगलें आहे त्यामुळें बरी च शोभा येते. उत्तर दरवाज्यापासून पूर्व दरवाज्याकडे जाण्यास बाहेरून रस्ता आहे. उत्तर दरवाज्यानजीक आणखी एक मुशाफरखाना आहे.

येथपर्यंत श्री कान्होबाच्या देवळासंबंधीं व त्या भोंवतालच्या इमारती व दरवाजे यांसंबंधीं माहिती दिली आहे. यांपैकीं बरी च माहिती तेथील इनामदार व पाटील मदूबोवा यांनीं सांगितलेली आहे. त्यांच्याजवळ या संबंधीं कांहीं जुने कागदपत्र आहेत व त्यावरून हि आणखी माहिती ते शोधून काढणार आहेत असें त्यांनीं कबूल केलें आहे. या ठिकाणीं देवळावर आणखी शिलालेख आहेत परंतु ते मुसलमानींत आहेत. गाभाऱ्याच्या भिंतीवर बाहेरच्या बाजूस दक्षिणेस, पश्चिमेस व उत्तरेस असे तीन लेख आहेत. यांपैकीं उत्तरेचा " कुशादाबदलवत बहागके अशा रुदाम अन" असा असून " तूं बांधले आहेस तुझी दौलत वाढो" असा परमेश्वराचा आशिर्वाद आहे असा त्याचा अर्थ आहे असें सांगण्यांत आलें. चवथा लेख दर्ग्यावर असून त्याचा उल्लेख वर केला च आहे. पांचवा लेख तळघरच्या खिडकीखालीं बाहेरच्या बाजूस आहे. आणखी एक सभामंडपाच्या पुढें असावा. हे लेख शोधून त्यांचें बरोबर भाषांतर करून प्रसिद्ध केल्यास इतिहासदृष्ट्या उपयोग होईल व बऱ्या च गोष्टींचा उलगडा होईल. मुसलमानी भाषेतील तज्ञांनीं हें अवश्य करावें.

देऊळ केव्हां बांधलें यासंबंधीं पक्का उलगडा जरी नाहीं तथापि दाक्षिंबीच्या ओस्यावरील शिलालेख प्रमाण मानण्यास हरकत नाहीं. त्यावरून इ० स० १७३० मध्यें देवळाचें काम पुरें झालें असें दिसतें. देऊळ व इमारती बांधल्या त्यावेळचा एक महत्त्वाचा कागद मदूबोवा यांनीं दाखविला. त्याचा आरंभींचा भाग गेला आहे. तथापि त्यांत कांहीं महत्त्वाचीं टिपणें आहेत तीं खालीं दिलीं आहेत. वृंदावनासंबंधीं टिपण वर दिलें च आहे.

१ "सन ११३९ माहे जिल्काद छ १ ता सन ११४१ माहे शवाल" पावेतों "मसाला खरेदी" दाखविली आहे व खर्चाची तेरीज देतांना एकंदर खर्च रु. २९३९२ दाखविला आहे.

२ " गिरी तळवटी पश्चात वामभागी गौतमी वापी " असा या टेंकडीच्या मागें असलेल्या " गौतमी " नांवाच्या बारवेचा उल्लेख करून तिजप्रीत्यर्थ रु. ४४२५४४८१२ खर्च दाखविला आहे. विहिरीस जर इतका खर्च केला तर वर दाखविलेल्या एकंदर खर्चांची तेरीज देवळाच्या खर्चांची नसावी असें वाटतें.

३ " धारागीरी वास्तवे नरोहरी मायबा तये स्थानी तडाक (तलाव) कारखाना " केला असून त्या प्रीत्यर्थ खर्च रु १०११०८४ दाखविला आहे. मायंबा उर्फ मच्छेंद्रनाथ या नवनाथांपैकीं एक नाथाचें स्थान येथून तीन चार मैलांवर डोंगरांत आहे. त्या डोंगरास " नवनाथभक्तिसार " या ग्रंथांत " गर्भागिरी " असें म्हटलें आहे; व मायंबास " नरोहरी मायंबा " म्हटलें आहे. हें नरहरी काय आहे याचा खुलासा होत नाहीं. तेथील तलावाचें काम या देवळाच्या वेळीं च करण्यांत आलें असें या उल्लेखावरून दिसतें.

४ " कळस देवाचे पाच सभामंडपाचे चार पश्चात् देवळें पांच एकूण खर्च जीसनस रु. ७५० " यावरून गाभाऱ्यास कळस पांच, सभामंडपांत चार व इतर देवळांस पांच असे चवदा कळसांचा उल्लेख केलेला आहे. सुप्रसिद्ध कान्होजी आंगरे व त्यांचा मुलगा बाबूराव आंगरे यांचा येथें नंदादीप असून कान्होजीनीं देवास एक निशाणाची काठी दिली होती. त्या दोघांची या ठिकाणी फार भक्ती होती. शाहू महाराजानीं इ. स. १७१८मध्यें देवास जहागीर दिली होती. या शिवाय मोगल बादशाहांनीं कांहीं इनाम जमीनी दिल्या आहेत त्या अद्याप चालू आहेत. शाहू महाराज, कान्होजी अंगरे, पिलाजी गायकवाड या सारख्या सुप्रसिद्ध ऐतिहासिक व्यक्ती श्री कान्होबाचे भक्तांपैकीं होत्या; त्यांनीं व इतर मराठे सरदारांनीं येथें बऱ्या च देणग्या दिल्या व देवाच्या इमारती बांधल्या. कान्होजीची व त्याच्या मुलाचीं कांहीं पत्रें येथें पाहण्यांत आलीं. " गौतमाबाई " बारवेवर एक मराठी शिलालेख आहे परंतु तो अवघड ठिकाणीं असल्यामुळें वाचावयास मिळाला नाहीं. वरील सर्व माहिती रा. मदुबोबा यांनीं अगत्यानें दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

कान्होबा याचे वास्तवीक नांव कानीफनाथ असून नवनाथ म्हणजे जे नऊ सत्पुरुष प्रसिद्ध आहेत त्यांपैकीं तो एक होता. त्याची थोडी हकीकत "नवनाथभक्तिसार" या ग्रंथांत प्रसिद्ध च आहे. या नाथांनीं एक दुसऱ्याच्या [illegible] समाधी घेतल्या असून त्या सर्व गर्भगिरीच्या डोंगरांत आहेत असें त्यांत म्हटलें आहे. अहमदनगरच्या उत्तरेस दहा बारा मैलांवर जी डोंगराची रांग आहे तीस च पूर्वी गर्भागिरी पर्वत म्हणत असत व या रांगेंत च नऊ नाथांच्या समाधी आहेत. या

हिंदु साधूंच्या जरी समाधी आहेत तरी त्या सर्व मुसलमानी पीराप्रमाणें बांधलेल्या आहेत व या नाथांनां हि मुसलमानी नांवें मिळालीं आहेत. जालंदरचे जानपीर झाले, मच्छंद्राचे मायंबा झाले, गहिनी नाथाचे गैबी पीर झाले, कानीफाचे कान्होबा झाले वगैरे अशी सर्व नाथांची नामांतरें नवनाथभक्तिसार यामधें दिलीं आहेत. व पुढें मुसलमानी राज्य होऊन हिंदुंच्या समाधींचा उच्छेद होईल म्हणून हिंदु प्रमाणें समाधी न बांधतां मुसलमाना प्रमाणें पीर बांधले व नांवें हि बदलून टाकलीं असा त्यांत खुलासा केला आहे. हा खुलासा कितपत खरा आहे हें तूर्त पहावयाचें नाहीं. परंतु त्या ग्रंथांत कानीफ नाथाचे कान्होबा हे च एक नांव दिलें असून इतर नांवें दिलीं नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मारवाडी लोक कानीफनाथास रामसात पीर समजतात व मुसलमान लोक त्यास शहारमजान असें म्हणतात व हिंदु लोक कान्होबा म्हणतात. त्यां सर्वांत कान्होबा हें नांव सर्वत्र प्रसिद्ध आहे.

कान्होबा हा हिंदु व मुसलमान या दोघांचा देव मानण्यांत आल्यामुळें व मुसलमान लोक त्यास शहा रमजान समजत असल्यामुळें शहा रमजानच्याबद्दल जी हकीकत अगर ज्या दंतकथा या भागांत प्रसिद्ध आहेत, त्या येथें देणें अवश्य आहे, कदाचित् या बाबतींत निर्णय ठरवितांना त्यांचा उपयोग होईल. अहमदनगर ग्याझिटियर मध्यें शहा रमजानची अशी हकीकत दिली आहे कीं, शहा रमजान मही सवार हा इ.स. १३५० हिजरी ७५२ च्या. सुमारास पैठण येथें आला. तो मंत्रविद्येंत प्रवीण असून गोदावरी नदींतून तो एका मोठ्या माशावर बसून आला, म्हणून त्याला मही सवार हें नांव मिळालें. तो पैठणाला आल्यावर सादत अल्ली नांवाच्या एका इसमानें त्याला मुसलमानी धर्माची दिक्षा दिली. तेथें तो कांहीं वर्षें राहिला व पुढें सहा वर्षें सतत प्रवास करून तो मढी येथें इ. स. १३८० ( १७८२ हिजरी ) मध्यें आला व तेथें इ. स. १३९० ( ७९२ हिजरी ) या सालीं मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ९० वर्षाचें होतें.

त्यावरून इ. स. १३०० मध्यें शहा रमजतचा जन्म झाला. वयाच्या पन्नासाव्या वर्षी त्यास मुसलमानी धर्माची दिक्षा मिळाली व वयाच्या ९० व्या वर्षी तो मरण पावला असें दीसतें. ही माहिती काय आधारावर दिली हें कळण्यास मार्ग नाहीं. तथापि तीस कांहीं तरी आधार असला पाहिजे. शहा रमजान जेव्हां मढी येथें गेला, त्या वेळची एक कथा सांगण्यांत येते. शहा रमजानचा दरगा ज्या ठिकाणीं आहे तेथें एक देवी होती. तो तेथें गेल्यावर त्यानें त्या देवीस हुसकून लावलें व ती देवी तेथून निघून नजीक च शिरापूरच्या रानांत एका गुहेंत आश्रय धरून राहिली. ही दंतकथा ग्याझिटियर मधें दिली आहे.

मढीपासून पांच कोसांवर मिरी म्हणून एक मोठें गांव आहे. तेथें कान्होबाचें स्थान आहे. हें व मढीचें स्थान एक च असून तेथील व मढीचे मुजावर वतनदार एक च आहेत. तेथें कान्होबा कसा आला याबद्दल एक दंतकथा प्रचलित आहे व ती हि ग्याझिटियर मध्यें दिली आहे. मिरी येथें बळी नांवाचा एक राजा राज्य करीत होता. त्यास कित्येक महंकासूर हें नांव देतात व त्यावरून मिरीस महंकावती हें नांव पूर्वी होतें असें सांगतात; हा महंकासूर ऊर्फ बळी हा फार जुलमी होता. त्याच्या जुलमास तेथील लोक कंटाळले. त्यांची सुटका करण्याकरितां कान्होबा पैठणहून मिरी येथें आला. त्यानें त्या राजाचा पराभव केला. तेथील लोकांची सुटका केली व मिरीहून मढी येथें गेला. ही दंतकथा देतांना ग्याझिटियर मध्यें १३२० हा सन दिला आहे. परंतु वर दिलेल्या सनावरून पहातां हा सन बरोबर नाहीं. तो १३७० च्या सुमारचा पाहिजे.

याशिवाय मिरी व मढी यांच्या दरम्यान ऐन रानांत कान्होबाचें आणखी एक स्थान आहे. त्यास तांबुळदेव म्हणतात. याच्या उत्तरेस ' राही ' नांवाची एक लहान नदी असून तिच्या उत्तरेस सुमारें अर्ध्या मैलावर एक थडगें बांधलेलें असून तें पठाणखान नांवाच्या इसमाचें आहे असें सांगतात. थडगें बांधलेलें नसून तेथें गारा पसरलेल्या आहेत; व एक निशाण तेथें लावण्यांत येतें. पूर्वी बांधलेलें थडगें असल्यास न कळे. तेथील कांहीं आख्याइका सांगण्यांत येतात. पठाणखान हा कान्होबाचा सेनापति होता व कान्होबांनीं त्या राजाशीं जी लढाई केली त्यांत पठाणखान मारला गेला. ज्या ठिकाणीं हें थडगें आहे त्या भोंवतालच्या जमीनीस अद्याप रण म्हणतात, व रात्रीं बेरात्रीं एकटें तेथून जाण्यास लोक भितात. या ठिकाणीं कान्होबाची व बळीची लढाई झाली त्यांत कान्होबांस यश मिळालें परंतु त्याचा सेनापति मारला गेला. यशप्राप्ती झाल्यानंतर कान्होबांनीं नदी ओलांडली व तेथें थोडी विश्रांति घेतली व तांबुल खाल्ला. या ठिकाणीं कान्होबाचें स्मारक बांधलें असून त्याला च तांबूळदेव म्हणतात. येथें लहानसें देऊळ बाधलें आहे. अशी या तांबूलदेवासंबंधी आख्याइका असून राही नदीच्या लढाईचें व कान्होबाच्या यशप्राप्तीचें तें स्मारक होऊन बसलें. मिरी, तांबूलदेव व मढी हीं तीन पांच पांच मैलावर कान्होबाचीं स्थानें आहेत. मिरीची यात्रा फाल्गुन शुा १० ला होते व मढीची फाल्गुन वाा ५ ला होते.

वर दिलेली सर्व हकीकत एकत्र केली तर असें दिसून येईल कीं, शहा रमजान हा मूळचा हिंदु होता. तो पैठणला आला तेथें तो सादतअलीच्या प्रसादानें मुस-

लमान झाला. तेथें कांहीं दिवस राहिल्यावर तो मिरी येथें आला व तेथील जुलमानें गांजलेल्या लोकांची त्यानें जुलमापासून सुटका केली. त्यांत त्याला तेथील संस्थानिकाशीं अगर सुभेदाराशीं लढाई करावी लागली. तांबुळदेवाच्या ठिकाणीं त्यानें विश्रांति घेतली व तेथून मढी येथें गेला. तेथें टेंकडीवर एक देवीचें देऊळ होतें, तेथील देवी काढून टाकली व तेथें च राहिला, व वयाच्या ९० वर्षी मरण पावला. ह्या टेंकडीवर फार दाट झाडी पूर्वी होती असें सांगतात, त्या झाडींत च त्यानें वस्ती केली. मंत्रविद्येंत तो निष्णात असे व सत्पुरुष होता.

ही हकीकत बरोबर असल्यास अर्थात् मुसलमानी राज्य इकडे सुरू झालें त्यानंतरची आहे. पैठण त्यावेळीं बहामणी राज्यांत होतें. नवनाथ मुसलमानी राज्य सुरू होण्यापूर्वी कांहीं शतकें होऊन गेले. नवनाथभक्तिसारामध्यें सांगितल्याप्रमाणें शके दहाशें मध्यें कानीफनाथांनीं समाधी घेतली असें मानलें तर कानीफनाथामध्यें व शहा रमजान मध्यें तीनशें वर्षांचें अंतर पडतें. व कानीफनाथ ऊर्फ कान्होबा व शहारमजान एक नसून दोन होते असें दिसून येतें. व शहा रमजान नांवाचा एक अवलिया सादत अल्लीचा शिष्य होता. तो वर सांगितल्याप्रमाणें फिरत फिरत मढी येथें आला व कानीफनाथाच्या पाशीं सेवा करीत राहिला व त्याचें व कान्होबाचें स्थान एक च समजण्यांत आलें, असें हि वाटतें. परंतु प्रचलित समज कान्होबा व शहा रमजान एक आहेत असा असल्यामुळें व आज कित्येक शतकें तो चालत आला असल्यामुळें त्यास च मान देणें अवश्य आहे. निष्कारण सल करून बुद्धिभेद उत्पन्न करण्याचा आपणास अधिकार नाहीं. अधिकारी लोक च त्याचा निर्णय करतील असें म्हणणें न्याय्य व योग्य आहे. कानीफनाथ व शाहारजमान एक असोत, अगर दोन असोत दोघे हि सत्पुरुष होते, अधिकारी होते त्यांची योग्यता हि श्रेष्ठ होती. म्हणून आज कित्येक शतकें लक्षावधि लोक भक्तीनें त्यांचें दर्शन घेण्यास जात आहेत व कान्होजी आंगरे यांचा मुलगा बाबूराव आंगरे यांनीं स्थान जागृत आहे असें म्हटलें आहे तें यथार्थ असल्याशिवाय तेथें कोणाची भक्ती हि बसणार नाहीं. सत्पुरुषांच्या समाधीचा गुण च असा आहे कीं येथें गेलें कीं मन रमतें, व इतर कल्पना बाजूस जाऊन त्याजविषयीं आदर वाटूं लागतो, भक्ती बसते व मोक्षप्राप्तीचा मार्ग खुला होतो.

ना. य. मिरीकर

# १०७ कुमठे येथील राणे भोसल्यांची हकीकत

वौशावळ दाळजी राणे भोसले मौजे कुमठे बुजरुख कुमेस्वराचे सा कोरेगांव पां वाई सुहूर सन हाजार १०७० सयेन अलफ

आपले मूळ पुरूष रतनसिंग पा मौजे कुमठे बुजरुख यास पुत्र

१ भागीवंत वडील
१ जयसिंग दुसरा
१ सुरसिंग तिसरा
१ उदेसिंग चवथा
१ कमलसिंग पाचवा
१ चितसिंग
६

एकूण असामी साहा याचा विस्तार

भागीवंत यास पुत्र
१ सावजी वडील
१ दुसरा मालोजी
२

सावजी यास पुत्र
१ वडील सिवजी
१ दाळजी दुसरा यास पुत्र इनाजी व येसू अहे
१ लखमोजी तिसरा
१ भानजी चवथा
१ रामोजी पाचवा
५

मालोजीस पुत्र तोच आहे १

बाकी राहिले असामी पांच
१ जयसिंग दुसरा
१ सुरसिंग तिसरा
१ उदासिंग चवथा
१ कमलसिंग पाचवा
१ चितसिंग साहावा
५

येणेप्रमाणें पांच असामी बेदराहून पातशाहानी चंदीच्या ठाणीयास पाठविले तिकडे च पाच जण झुंजात ठाणियाच्या पडिले पांच जणाचे नकल जाहाले अमचे आजे भागीवंत बेदरात पातशाहापासी राहिले मौजेमजकूरच्या पाटीलकीचे कामकाज चालिले पाहिजे याजकरिता गुमास्तेगिरीस तुकोजी व राजजी पनाळे यास ठेविले होते तैसे च कुमठीयात ठेऊन गेले होते कजिया पडोन पनाळे यास पहिले च पातशाहानी खोटे केले होते भागीवंत यास पहिल्याने बायको दताजी जाधवराव याची लेक सुलक्षणाबाई केली होती ती पांच जण चंदीच्या ठाण्यात पडिले म्हणून त्याच्या दुःखेकरुन मृत्य पावली तिच्या पोटी काही विस्तार

नाही तेव्हा भागींवंत यास बायेको पाहिजे म्हणून बेदरात दादजी गोयाजी माने होते त्याची बहीण उपवर नवरी होती तिचे नांव रंभाबाई ती पातशाहानी भागींवंत राणे भोसले पाटील मौजे कुमठे बुजरूख यास बायेको करून दिल्ही तिच्या पोटीं विस्तार पुत्र वडील सावजी व धाकटा मालोजी व लेक येमाबाइ येणेप्रमाणे मुले जाहली पुढें आमचे आजे भागींवंत बेदरात मृत्य पावले म्हणून आमची आजी रंभाबाई याणी आपली मुले लहान कुमठे येथील पाटीलकीचा कारभार थोर याजकरिता मागती तुकोजी राजजी पनाळे यास पाटीलकीच्या गुमास्ते-गिरीचे काम सांगोन बेदराहून पातशाहाई हुकूम घेऊन आपल्या पाटीलकीच्या गांवांवरी सावजीस व मालोजीस व येमाबाईस कुमठीयास घेऊन आली पाटील-कीची गुमास्तेगिरी च्यार वर्षेपर्यंत रंभाबाईच्या] अज्ञेप्रमाणे केले पुढे बाईच्या अज्ञेप्रमाणे वर्तणूक करीनासे जाले पाटीलकीचे खावंद आम्ही तुमचे नातें काही नाही म्हणून बाईपासी बेबदल होऊन फिराऊन गोष्टी पनाळे सांगू लागले उपरांतीक रंभाबाई याणी उभयेता पनाळे यासी उत्तर केले की माझ्या दादल्याने तुजला पातशाहापासी खोटे केले असता माझी मुले नेणती व मी बायको देखोन बदअमली आम्हांसी करिता तरी तुम्ही आमचे पाटीलकीची गुमास्तेगिरी न करणे तुमचे काम नाही तुम्ही जाणे माझ्या कुमठ्यास न राहाणे ऐसे बाईचे बोलणे पनाळे याणी ऐकून मनसबा केला की बाईस व मुलास दगा करून जिवे मारावे याजला मारल्यावर आम्ही पाटीलकीचे धणी अहो ऐसा मनसबा केला ती बातमी बाईस कळता च बाईनी आपले भाऊ दादजी गोयाजी यास वाडीहून बोलावून आणिले त्याजला पनाळे याचा विचार सांगितला उपरांतिक बाई आपल्या उभयता भावास व सावजीस व मालोजीस व येमाबाईस बेदरास घेऊन गेली तेथे जाऊन आपले दोघे लेक यास पोशाख करून मौजे कुमठे बुजरूख कुमेस्वराचे येथील आपले पाटिलकीचे वतनाचे कागद बरावर देऊन पातशाहाचे भेटीस पाठविले पातशहा तख्तराव्यावर होते नजीक कचेरीस खाली ख्यालतमाश्या कलवतीणीचा होत होता तेथे दाटी बहुत जावयासी रीग होईना तेव्हा सावजीने तजबिजीने रीग करून जाऊन कचेरीस तख्तराव्याखालता उभा राहिला आणि पातशाहास मुजरा केला तो पातशाहानी अपल्यां मनांत आणिले की हे मारेकरी आहेत तेव्हा हुजरातीस हुकुम केला की हा मारेकरी आहे तरी यास धरून नेऊन वडाचे झाडाखालते याचे डोसके मारणे ऐसी फर्मास जाली एकाएकी च सावजीवर गर्दी जाली इतकी इशारत होता च सावजीने जलद करून आपल्या झग्याच्या खिशात हात घालून वतनदारीचे कागद पाटीलकीचे होते ते पातशाहाच्या पुढे टाकिले लिखा पाहाता च सबूर ऐसा हुकूम हुजरातीस केला कागद वाचून पाहिले तो मौजे कुमठे बुजरूख पा। बाई

येथीळ राणे भासले पाटील याचे निघाले तेव्हा डोचके मारावयाचे पातशहानी राहा. वेले आणि सावजीस पुरसीस केली की तुजवर काये जुलुम आहे तो सांगणे त्यावरी जी हाकीकत जाली होती ती सावजीने पातशाहाजवळ जाहीर केली कीं माझा बाप भागीवंत याणे पनाळे यास कुमठ्याची पाटीलकीची गुमास्तगिरी सांगितली म्हणून त्याणी आम्हा मायेलेकराचा मारा करावयाचा मांडिला आहे याजकरितां हाजूर आलो साहेब दुधापाण्याचा निवाडा करणार आहेत त्याजवर पातशहा बोलीले की पनाळे गुमास्ते ठाऊक आहेत ते च वेळेस पनाळे यास पातशाहानी × देवाकडून बेदरी पंचाईत करऊन खोटे केले पारपत्य करून शहर बेदर लाऊन दिल्हे रंभाबाई यानी पातशाहास अर्ज केला की साहेबी पनाळे यास खोटे करून लाऊन दिल्हे अतां माझा गांव थोर मुले लाहान चालावितो कोण याजकरिता माझे भाऊ दादजी गोयाजी माने नाईकवाडी बेदरचे आहेत त्यास माझ्या दादल्याने जमीन पांच चावर कृष्णेचे तीरी करून दिल्ही आहे त्याजला साहेबी हुकूम करावा म्हणजे माझी मुले नेणती आहेत तों पर्यंत पाटीलकीची गुमास्तगीरी चालवितील आमचा पाटीलकीचा मानपान होळीची पोळी माहार नांगर सिरालशेट विडा टिला पटीपछोडी हाक लाजिमा कानू कायिदे इनामती चावर व घुगरी सेव धार येणेप्रमाणे माझे मजकडे चालवावे गुमास्तेगिरीचा कारभार मात्र माझे भाऊ माने याणी करून माझी मुले नेणती आहेत ती वाढवावी याप्रमाणे अर्ज केला त्याप्रमाणे पातशाहानी अर्ज ऐकून दादजी गोयाजी माने यास आपले हुजूर हुकूम केला की पनाळे खुनी नफर दिसोन आले याजकरिता त्याचे पारपत्य करून खोटे लाऊन दिल्हे आहेत तरी रंभाबाई याची मुले लहान नेणती आहेत तो पर्यंत तुम्ही त्याच्या गावची पाटीलकीची गुमास्तेगिरी घेऊन जाऊन करणे बाईचे रजेतलबेखेरीज वर्तणूक न कर्णे पाच जण चंदीच्या ठाण्यांत पडिले हे जाहीरणा पातशाहास कळला पातशाहानी हुकूम पाचजणाच्या बायेका सती निघत आहेत तरी तुम्ही पांच थडी आपल्या वतनाच्या गावावरी बाधणे सरकार साहित्य हुजूरचे दिल्हे कलवतीणीचा ताफा व सदानद परमानद घडसी वाजंत्री व भाट ऐसे दिल्हे आपले गाव पाटीलकीचे कुमठे बुजरूख येथे आली सती निघाल्या पाच थडी बांधली गावावर रभाबाई व मालोजी व यमाबाई कुमठ्यांत नांदू लागली सावजी परभारे चंदीच्या ठाण्यास पातशहाच्या हुकूम घेऊन गेले दादजी गोयाजी बाईच्या रजेतलबेत राहून मौजेमजकुरचे पाटीलकीचे गुमास्तगिरीचे कामकाज करून राहिले दादजीचा लेक दत्ताजी होता त्याजला येमाबाईचे लग्न करून दिल्हे तिकडे सावजीने चंदीचे ठाणे बलकाविले हे खबर पातशाहास कळली म्हणून रणदुलाखान यास हुकूम पातशहानी केला

की राणे भोसले पाटी कुमठे बुजरुख वांई येथील आहेत त्याणी चंदीचे ठाणे बळकाविले आहे तरी तुम्ही तेथे जाऊन कुमठ्यांत त्याची मुले माणसे आहेत ती धरून कैद करणे गाव लुटून टाकणे म्हणून हुकूम जाला होता तो हुकूम रणदुला-खान घेऊन स्वारी तयार करून कुमठ्यास येऊन गाव लुटला रंभाबाई मुलेयास घेऊन दादजी गोयाजी यास घेऊन परागंदा जाहाली ही खबर चंदीस सावजी होता तेथे कळली चंदीहून सावजीने पांच हजार फौज तयार करून रणदुलाखान याजवरी चढाई करून आला रणदुलाखान यास हारीसं आणिले गावची खबर घेतली तो रणदुलाखान याणे गाव जाळून जमीनदोस्त करून टाकिला दुसरे जागा पांढर वसवून नांव रहीमपूर ठेविले तेव्हां रणदुलाखान याची व सावजीची कटकट बहुत जाली मधी दरम्याने माने पडिले आणि सावजीची व रणदुलाखान याची समजूत करून दिल्ही सला जाहाला आपली मौजे मजकूरची पा। हाली रहिमपूर नाव वसहात जाली आहे तरी तुम्ही करून राहाणे मुले माणसे परागंदा जाहली असतील ती गावावरी आणून पाटीलकीची वहिवाट करणे याप्रमाणे बोलणे होऊन रणदुला-खान फिरोन विज्यापुरास गेला सावजीने मुले माणसे आणून माने याच्या हावाली करून दत्ताजी माने दादजी माने याचा लेक यास आपले पाटीलकीची गुमास्त-गिरी ज्याप्रा। दादजी गोयाजी करीत होते त्याप्रमाणें सांगून बाईची अज्ञा घेऊन आपण निघोन चंदीस गेले हाली माने आमचे गुमास्ते ऐसे असोन सांगि-तले काम तरी कह्यांत नाहीं याजकरिता तुम्ही प्रा। मजकूरचे जमीदार आहां आम्हांस तुमचे महजर पत्र देशमुख व देशपांडे याचे असल्यानें दुसरीयाचा दावा आम्हावरी चालणार नाहीं त्यास तुम्ही देशमूख व देशपांडे आहां व हाजीर मज्यालसी देव आहे आम्हावरी मेहरबान होऊन महजर करून देऊन वैशावळ आपल्याजवळ ठेवावी याप्रमाणें हाकीकत सही मोतब.

पां. न. पटवर्धन

## १०८ आनंदराव काशी कोतवाल

१ घाशीराम कोतवाल ( शके १७०३–१७१३ ) ह्याच्या कारकिर्दीनंतर पुण्याचे कोतवालीवर यांची नेमणूक झाली. खर्ड्याचे लढाईचे वेळीं, पुण्याचे कोतवालीसंबंधानें आनंदराव काशी याचा उल्लेख पेशव्यांचे बखरींत आलेला आहे (पृ.१५८). राघो बल्लाळ गोडबोले हे यांचे समकालीन असून, ह्या उभयतांचीं नांवें त्या च सुमारास आढळतात, इतकें च नव्हे तर खर्ड्याचे लढाईनंतर दांतीं तृण धरून आलेला मद्दशूर मशिरउल्मुलुक ह्यास आनंदराव काशी व राघोपंत गोड-

बोले यांचे देखरेखीखालीं खजिन्याचे विहिरीवरील बंगल्यांत प्रतिबंधांत ठेविलें होतें. रावबाजीचे कारकीर्दीचे अखेरीस आनंदराव काशी हे पुण्याहून पाली येथें आपले वतनाचे गांवीं परत आले. पाली हा गांव खंडोबाचें स्थान म्हणून प्रसिद्ध आहे. आनंदराव काशी हे देशस्थ, ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र भारद्वाज आडनांव वाचासुंदर. यांजकडे यांचे पूर्वजांपासून चालत आलेली पाल, सासपडे, एकंबे व शिरंबे ह्या चार गांवची जोशी–कुळकर्णीपणाची वृत्ती होती व ती अद्यापि हि ह्या घराण्याकडे परंपरेनें चालू आहे. आनंदराव काशीचे वंशज मुख्यतः पाली येथें राहत असून, कधीं कधीं कागदोपत्रांतून आपलें आडनांव कोतवाल असें हि लावितात. शालुकरांचा व यांचा आप्तसंबंध असल्यामुळें, त्यांचा शालूकरांचे मार्फत दरबारीं प्रवेश झाला म्हणतात. आबाजी कृष्ण शालूकर ह्यांनीं रावबाजींचीं पेशवे-पदाचीं वर्खे सातान्याहून आणिलीं असल्याबद्दल त्यांचा बखरींतून नाममात्र उल्लेख आलेला असून, त्यांचे नांवें पुण्यांत एक बोळ हि चालू आहे. हे च ते शालूकर अगर शेलूकर. शेलू हा गांव मोंगलाईंत आहे. असो. आनंदराव काशी कोतवाल यांनीं एकादें इनाम वगैरे संपादिल्याचें दिसून येत नाहीं. पाली येथें त्यांचे वंशजांकडे व रा. गणेश धोंडदेव कुळकर्णी, एकंबें (कोरेगांव) यांजकडे कांहीं कागद सांपडावेत.

पां. न. पटवर्धन

---

## १०९ त्रिपुटीचे गोपाळनाथ

मंडळाचे सभासद रा. अच्युत सिताराम साठे यांनीं नुकी च ज्यांची कविता प्रसिद्ध केली त्या दयाळनाथांचे गोपाळनाथ हे पणजे गुरु होत. हे मूळचे औरंगाबादनजीक सलाबतपूरचे राहणारे. वडिलांचें नांव गोविंद व आईचें नांव आनंदीबाई. देशस्थ, यजुःशाखा, कौंडिण्य गोत्र, उपनांव घोलप. हे ब्रह्मचारी होते. गुरु रंगनाथ मारकी (वऱ्हाड) येथील; पंथ नाथसंप्रदाय. ह्यांनीं शके १६८८ श्रावण वा॥ ३० रोजीं त्रिपुटी येथें जिवंत समाधि घेतली. गोपाळनाथ हे त्रिवर्ग बंधू होत. रामचंद्र, गोपाळनाथ व नानासाहेब ह्या त्रिवर्गांपैकीं गोपाळनाथ व नाना साहेब हे ब्रह्मचारी असून, त्रिपुटी येथील मठपति रामचंद्राचे सीधे वंशज होत. रामचंद्र–विठ्ठल–गोपाळ व लक्ष्मणबुवा ही रामचंद्राची वांशिक परंपरा होय. गोपाळनाथांच्या पुण्यतिथीनिमित्त दरसाल श्रावण वा॥ ३० स उत्सव भरत असतो. गोपाळनाथांचे ४५ प्रमुख शिष्य होते. १ परमहंस, २ शेख सुलतान, ३ गोविंदनाथ व ४ गोपाळभट सोनार. परमहंस–समाधि पाटकळ येथें, शेख सलतान व गोपाळभट

त्रिपुटी येथें, व गोविंदनाथ कऱ्हाणपूर येथें, येणेंप्रमाणें यांच्या समाधी होत. गोपाळनाथांचीं पदें व अभंग इत्यादि कविता असून, सिरोमणी ( किरात १८, ओं. ९२०९ ) 'समाधिबोध' ( ओं. अदमासें १०० ) असे दोन ग्रंथ आहेत. सिरोमणी शके १६६८ क्षयनामसंवत्सरीं ज्येष्ठ वा। ७ शुक्रवारीं कृष्णातारळी-संगमीं गोपाळवाडीस पूर्ण झाला. ह्याची शके १८१५ मध्यें केलेली प्रत मठांत माझे पाहण्यांत आली. गोपाळनाथांचें ओंवीबद्ध चरित्र अ० ३२, ओंवीसंख्या ७५००, गोपाळनाथांचे बंधु नानासाहेब यांनीं विराचिलें असून ह्याची मूळ प्रत बागणीचे जहागीरदार मंत्री यांजकडे असून, दुसरी प्रत गोविंदराव नाथ, तुळशीबागेनजीक व्यंकटराव गुजर यांचा बंगला, नागपूर यांचे संग्रहीं आहे. शिरोमणीग्रंथाची एक प्रत (शके १८१५ मधील ) मठांत असून दुसरी रा. नारायणराव महाडीक, जैतापूर यांजकडे आहे. गोपाळनाथांची समाधि त्रिपुटीस गांवाबाहेर आहे. समाधि दर्शनीय आहे. गोपाळनाथशिष्य शेख महंमद याची समाधि अगदीं निकृष्टावस्थेंत असून, सदरील दोन्ही समाधींचे दरम्यान एक विस्तीर्ण तळें आहे. गोपाळनाथांचा सांप्रदाय ठिकठिकाणीं विखरलेला असून, १ स्वाराचे गेटानजीक, शुक्रवार पेठ, पुणें, २ चास नारुडी, ३ नागपूर, ४ भांडवली, ५ बुध, ६ कऱ्हाड, ७ पाटकळ इत्यादि ठिकाणीं ह्या सांप्रदायांतील मठ आहेत. गोपाळनाथांचें तत्कालीन चित्र कऱ्हाडचे मठांत असून, त्याचे फोटोची प्रत ' मंडळा ' चे संग्रहीं दिलेली आहे.

पां. न. पटवर्धन

## ११० दाभाड्यांची अहमदनगरवर स्वारी

सोबतचा महजर पांडेपेडगांव येथील देशपांडेदफ्तरांतील असून तो नगर येथील माझे मित्र श्री. नानासाहेब मिरीकर यांचेकडून मिळाला. सय्यद बंधूंपैकीं धाकटा हुसेन अलीखान यास दक्षिणचा सुभेदार नेमण्यांत आल्यावर, त्याची व मराठ्यांची लढाई होऊन तींत मुसलमानांचा पुरा मोड झाला. ह्या पराजयाचें परिमार्जन करण्याकारितां हुसेन अलीचा दिवाण महकूबसिंग व चंद्रसेन जाधव हे उभयतां चंग बांधून निघाले; परंतु अहमदनगर येथें खंडेराव दाभाडे व सुलतानजी निंबाळकर या उभयतांशीं मोंगल फौजेची गांठ पडून मोंगलांचा पूर्ण पराजय झाला. ही लढाई शके १६३९ वैशाख वद्य ९, ता. २४ एप्रिल सन १७१७, हिजरी सन ११२९ जमादिलावल छ० २२ रोजीं झाली अशी नक्की तारीख सोबतचे महजरांत दिली आहे. ह्या लढाईनंतर खंडेरावास सेनापतीचीं वस्त्रें मिळालीं ही गोष्ट लक्षांत आणिली म्हणजे महजरांत निर्देशि-

त्याप्रमाणें सदर प्रसंगीं मोगलांचा पूर्ण पराजय झाला हें म्हणणें च सयुक्तिक दिसतें. नगरच्या वेढ्याची तारीख व निकाल या गोष्टी आज नव्यानें मिळत आहेत. इ. संग्रह, पु. ६, अंक ४।५।६ मध्यें 'पेशवे दफ्तरांतील सनदा पत्रांतील माहिती' पृ० १६ वर वरील स्वारीचा उल्लेख असणारें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्या पत्राचा मथळा चुकीचा आहे.

पां. न. पटवर्धन

श्री।

नकल महजर पारसी बमोहर काजी अबदुल वसूल वगैरे उमदे मनुश व तालुकदार वगैरे समस्त लहान थोर साकीन शहर अहमदनगर वगैरे मोहरा सुमार ३६ छतीस वगैरे शाहीया समस्त सेद लोक व सेख वगैरे साकीन शहर मजकूर याचे सेवेसी महमद अशरफ वगैरे पुत्र फते मा। कादरी वलदे मजकूर याणें येऊन विनंति केली कीं छ २२ जमादीलवल सन ११२९ हिजरी ते दीवसी खंडो दाभाड्या व सुलतानजी नीबालकर वगैरे सरदार गनीमाईचे चालीस हजार स्वार व प्यादे बेसुमारानसी आमदानगरावर येऊन वेढा घातला फौजदारी लढाई गेली व बाणाची संध्याकाल पावेतो जाली. सेवट ते फौज बेसुमार शहरांत दाखल जाहली जे वस्तभाव घरची व परवानें पेशेजीचे हकमाचे व चकनामे जमीदाराचे बा। एक चावर जमीन इनाम खेरीज जमा सेताचे उपयोगी मौजे बुरुडगांव पो। पांडे पेडगांव सरकार मजकूर बदल योगक्षेम आमच्या मधे फरजंदाकरार होते ते लुटून नेले. त्या प्रो। सनद जमीन मजकूरेचे व परवाने बमोहर इस्माईलखान व परवाने बमाहर दुखलेसखान व परवाने बमोहर मीर्जा साले व परवाने बमोहर फकरूदीखां कीलेदार व जागीरदार याच्या फौजजे तळावर हुडकीता फाटके टुकडे सांपडले ते उपयोगी नाहींत. त्याचे वर्तमान ज्यास वीदीत असेल त्याणी इश्वरपरायण आपली मोहर साक्षीची व साक्षी आपली या पत्रावर करावी म्हणोन विनंती केली त्याजवरून महजरावर मोहरा करून दिल्या

तपसील मोहरा

१ मोहर काजी अबदुल रसूल
१ मोहर सैद आली आमजसू
१ महमद आकरान फरोखसेरी
१ सेद सुज्या मोहतसीब
१ गुलाम नीजामुदीन फरोखसेरी
१ अबदुलनबी इमाम व खतीब मसीद दरगा पातशाहा
१ महमद सुलतान एखत्यार खानी
१ मीर सादक हुसेनी
१ महमद फाजलखा सेरखानी
१ हयातखान
१ रहमत तुला
१ महमद अली

# १११ वाकोजी ढमढेरे

पेशव्यांचे शकावलींत वांकोजी ढमढेरे यानें पाबळचें ठाणें घेतल्याचा उल्लेख असून, शिवाय तो पेशव्यांतर्फे पुण्याचे अमलावर असल्याचा हि निर्देश आढळतो. हा वांकोजी ढमढेरे कोण, कोठील ह्या संबंधानें किंबहुना ह्या ऐतिहासिक व्यक्तीचे अस्तित्वासंबंधानें बिलकुल माहिती नाहीं.

सोबतचीं चार पत्रें तळेगांव-ढमढेरे येथील ढमढेरे यांचे दप्तरांतील होत. त्यावरून सदरचा वांकोजी हा जातीनें मराठा असून तळेगांव-ढमढेरे घराण्यांतील होय असें ठरतें. भारतवर्षकारांनीं एके ठिकाणीं वाकोजी बद्दल 'व्यंकाजी' लिहिलें आहे, ती अर्थातच चूक होय. ह्या वांकोजीसंबंधानें ऐतिहासिक कागद उपलब्ध झाले पाहिजेत.

पां. न. पटवर्धन

श्री

लेखांक १

श्री
राजा शाहु न
रपती हर्ष नीधा
न बाळाजी वीश्व
नाथ मुख्य प्र
धान

आज्ञापत्र राजश्री पंत प्रधान ता। मोकदमानी मौजे येडगाऊ ता। हवेली प्रांत जुनर सुहूर सन सबा अशर मया अलफ मौजेमार राजश्री वाकोजी ढमढेरे यांसी मुकासा दिल्हा असे तुम्ही मारनिलेसी रुजु असोन मुकासबाबेचा ऐवज सुरळीत पावविणे जाणिजे छ ९ सफर आज्ञा प्रमाण

लेखन
सीमा

सुरु सुद बार

लेखांक २

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषक शके ४३ दुर्मुख सवत्सरे पौश शुध चतुर्दसी भानुवासरे क्षत्रिये कुलावतंस श्रीराजाशाहुछत्रपती स्वामी याणी मोकदमानी मौजे

कादली ता। अळे यांसी अज्ञा केली ऐसीजे मौजे मजकूर पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून हली राजश्री वाकोजी ढमढेरे यांसि कुलबाब

~ श्री ०
राजा शाहु नर
पती हर्ष नीधा
न बाळाजी वीश्व
नाथ मुख्य प्र
धान

श्री
श्री आई आदि पुरु
ष श्रीराजाशाहुछत्रप
ति स्वामि कृपानिधि त
स्य श्रीनिवास परशु
राम प्रातिनिधि

कुलकानु खेरीज हकदार व इनामदार यांसी इनाम दिल्हा असे तरी तुम्हीं यांसी रुजु होऊन मौजेमजकुर

वसूल कुडे देणे जाणिजे
लेखनालंकार

मर्या
देयं रा
जते

रुजु सा।
मंत्री

तेरीख १२ मोहरम सुरू सबा
बार सुद सुरू सुद बार बार

श्री

लेखांक २

~ श्री ०
राजा शाहु न
रपती हर्ष नीधा
न बाळाजी वीश्व
नाथ मुख्य प्र
धान

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान ता। मोकदमानी मौजे पिपलगांव ता। घोडे खु।। आशरैन मया व

अलफ मो मार राजश्री बाकाजी ढमढेरे यास पेसजीपासून इनाम आहे तेणे प्रो करार आहे तरी तुम्ही मारनिलेसी रुजु होऊन गावीचा इनामतीचा ऐवज सुरळीत वसूल देत जाणे ऐविसी उजूर न करणे जाणिजे छ ९ जिलकाद आज्ञाप्रमाण

लेखन
सीमा

बार

श्री

लेखांक ४

० श्री ०
राजा शाहु नर
पति हर्ष नीधान
बाजीराव बल्ला
ळ प्रधान

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडीत प्रधान ताां मोकदम मौजे पिंपळगाऊ ताा घोडे प्रांत जुंनर सुाा सबां सलासीन मयां अलफ मौजेमजकूर राजश्री बाकोजी ढमढेरे याजकडे मुकासा पेशजी आहे तेणेप्रमाणें सालमजकुरीं करार असे तरी जम तुम्ही मशारनिलेसी रुजुवात वर्तोन मौजे मजकूरचा मुकासबाबेचा वसूल यांजकडे सुरळीत पावणे जाणिजे छ ३ जिलकाद आज्ञाप्रमाण

बार

लेखन
सीमा

## ११२ बहादुरगड

बहादुरगड ह्या ऐतिहासिक स्थळाचा निर्देश मुसलमानी रियासतींत वारंवार येतो. इलियट आणि डासन व्हा० ७ मध्यें बहादुरगड हा बागलाणांत असल्याचें

लिहिलें आहे. दौंडनजीक पूर्वेस आठ मैलांवर श्रीगोंदे तालुक्यांतलि पांडेपेडगांव अगर शेडगांव–पेडगांव हेंच तें ठिकाण होय. येथें एक किल्ला असून, त्यास बहादुरगड अशी संज्ञा आहे. हें नांव औरंगजेबाचा सरदार बहादुरखान याचे नांवावरून पडलें आहे. कारण त्यानें हा किल्ला इ. स. १६७२ चे सुमारास बांधिला. ह्या सरदाराचें मूळ नांव मीर मलिक हसन हें असून, तो औरंजेबाचा दूधभाऊ होता.

इ. स. १६७० मध्यें त्याला दक्षिणचा सुभेदार नेमण्यांत आलें, व पुढें इ. स. १६७४ चे सुमारास बहादूरखान ह्याऐवजीं खान जहान बहादुर कोक-लताश जाफर जंग हा बहुमानाचा किताब त्यास देण्यांत येऊन, त्यास ७००० घोडेस्वारांचें पथक देण्यांत आलें. हा ता० १९ जमादिलावल ११०९ हिजरी (२४ नोवेंबर १६९७) रोजीं वारला. ह्या सरदाराचे नांवावरून बहादुरगड नांव पडलें हें वर आलें च आहे. पेडगांव हें पूर्वीपासून च इतिहासप्रसिद्ध होतें; व येथें किल्ला झाल्यानें त्याची महती फार वाढली. औरंगजेबाचे अखेरीपर्यंत ह्याचें महत्त्व फार होतें; परंतु पुढें तें मोंगलांचे ऱ्हासाबरोबर खालावलें. औरंगजेब येथें महिन्याचे महिने मुक्काम करी. संभाजीस औरंगजेबासमोर संगमेश्वराहून धरून आणिलें तें येथें च आणिलें. पांडेपेडगांव हें पूर्वी परगण्याचें ठिकाण होतें. आतां येथील स्थिति कालमानाप्रमाणें खालावली आहे. पूर्वी ह्या गांवास पंचवीस वेशी व बावन्न पेठा होत्या असें म्हणतात. येथील देवालयांतील देवांस हि मोंगलांचा त्रास सोसावा लागला होता. हल्लीं हा किल्ला मोडकळीस आलेला आहे. गांव व किल्ला ह्या सभोंवतीं निवडुंगाचें बेट च झालें आहे. आतां बहादुरगड ह्या नांवानें हा किल्ला कोणी ओळखीत नाहीं.

पां. न. पटवर्धन

## ११३ पिंपरी येथील मोकाशांची सनद

सोबतची सनद पिंपरी येथील मुसलमान मोकाशाची आहे. मूळ संपादक महमद अदल वलद सेख मैराज महमद हा छत्रपती शाहूमहाराज यांजबरोबर दक्षिणेंत आला. त्याचे मुलीचा वंश पिंपरी येथील मोकासपणाचा उपभोग घेत आहे. विद्यमान मोकाशी शेख शमसोद्दीन यांचे संग्रहीं विजापूर रियासती संबंधानें एक उत्तम फारसी बखर व इतर कांहीं कागद आहेत.

पां. न. पटवर्धन

## लेखांक १

० ॅ
वर्धिष्णुर्विक्रमे
विष्णोः साम्मूर्तिरिव
वामनी शंभुसूनो
रसौ मुद्रा शिवरा
जस्य राजते

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५२ पराभव नामसंवत्सरे चैत्र सुध दसमी गुरुवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शाहु छत्रपती स्वामी याणी महमद अलद वलद शेख मैराज महमद वासी दिल्हे इनामपत्र ऐसे जे तुम्ही स्वामीसनीध बहुत

०श्री ॅ
राजा शाहु नर
पति हर्ष नीधान
बाजीराव बल्ला
ल प्रधान

०श्री ॅ
श्री आई आदि पुरु
ष श्री राजाशाहु छत्रप
ति स्वामि कृपानिधि
तस्य श्रीनिवास
परशराम प्रतिनिधि

दिवस राहोन एकनिष्ठतेनें सेवा केली याकारितां तुमचे चालवणें अवशक जाणून स्वामी तुम्हांवरा कृपालु होऊन मौजे पिंपरी समत कोरेगांव प्रां वाई हा गांव तुम्हाकडे पेशजी मुकासा होता तो हालीं तुम्हांस इनाम स्वराज्य व मोगलाई एकून दुतर्फा देखील सरदेशमुखी सावोत्रा व इनामतिजाई व हलीपटी व पेस्तरपटी कुलबाब कुलकानू खेरीज इनामदार हकदार तुम्हास व तुमचे अवलाद अफलादेस इनाम करून दिला असे तरी तुम्ही मौजेमजकूर चतुःसीमा पूर्व मर्यादेप्रमाणें आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे अवलाद अफलाद अनभऊन सुखरूप राहाणें लेखनालंकार

मर्या
देयरा
जते

रुजु सुरु समत सां सा
सुमंत मंत्री सरकार
भा. इ.-२९

तेरीख ८
साबान सुा सीत अशरीन
बार सुद सुरू सुद बार बार बार बार
18502

# ११४ सातारचे गुजर

१ सोबतची सनद शके १७५१ आश्विन शु. १० ची असून, तींत श्री प्रतापसिंह छत्रपती यांणीं सातारचे रघुनाथराव गुजर यांस मौजे उपळवे हा गांव इनाम दिल्याचें लिहिलें आहे. हे रघुनाथराव कोण? शिवकालीन सेनापती प्रतापराव गुजर ह्यांचे हे वंशज असून, त्यांस श्री. प्रतापसिंहमहाराजांनीं नांवलौकिकास चढविलें. प्रतापजी गुजराची बायको व मुलें औरंगशहानें रायगडीं शाहुराजा बरोबर कैद करून नेल्यावेळीं त्याची दुसरी बायको व मुलेंबाळें आपल्या पाटीलकी वतनाच्या गांवीं म्ह० भोसरे, ता. खटाव, जि. सातारा येथें राहिलीं. तेथें प्रतापरावाचे घराण्याची ही शाखा पेशवाईच्या अस्तापर्यंत होती. पुढें श्री. प्रतापसिंह महाराजांनीं ह्या घराण्याचा शोध केला व रघुनाथराव नांवाच्या एका हुषार तरुणास शिक्षण देऊन नांवारूपास आणिलें. रघुनाथराव हे चतुरसिंगराजे ह्यां बरोबर राहून त्यांस मदत करीत. श्री. बाबासाहेब पेशवे यांनीं त्यांस पकडून पालगड येथें कैदेंत ठेविलें होतें. पुढें बाजीरावी आटोपल्यावर हे बंधमुक्त झाले.

२ मराठ्यांमध्ये भोसले, शिरके, महाडीक, गुजर, खानविलकर व मोहिते हे उच्च कुलांतील असें मानीत. महाराजांच्या ( सातारकर ) घराण्यापैकीं शरीरसंबंध ह्या षट्कुळांपैकीं कोणत्या तरी एकाद्या कुळाबरोबर होत असे. श्री. प्रतापसिंह उर्फ बुवासाहेब महाराज ह्यास रामचंद्रराव मोहिते यांनीं आपल्या दोन बहिणी दिल्या. दोघींचीं नावें अंबिकाबाई हीं च होत. ह्यां पैकीं दुसऱ्या अंबिका बाईसाहेबास गोजरासाहेब झाल्या. ह्या गोंजरासाहेब सातारचे रघुनाथराव यांचे दत्तक चिरंजीव यशवंतराव ह्यांस त्यांची हुषारी पाहून दिल्या. सातारा येथें शुक्रवारांत जलमंदिराच्या बाहेर गोजरासाहेब महाराजांचा वाडा प्रसिद्ध आहे. हल्लीं ह्या वाड्यांत श्री. नानासाहेब गुजर राहतात हे वरील रघुनाथरावाचे वंशज होत. सांप्रतच्या सातारकर गुजरांचा उदय वरील प्रमाणें श्री. बुवासाहेब महाराज ह्यांचे कारकीर्दींत झालेला आहे.

पां. न. पटवर्धन

० श्री
गौरीनाथवर प्रा
प्त शाहुराजात्मज
न्मनः ॥ मुद्रा प्रताप
सिंहस्य भद्रा सर्व
त्र राजते ॥

शके १७५१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १५६ विरोधीनाम संवत्सरे आश्विन शुद्ध दशमी सौम्यवासरे क्षत्रीय कुलावतंस श्रीराजा प्रतापसिंव्ह छत्रपती स्वामी याणी राजश्री रघुनाथराव गुजर वास्तव्य शहर सातारा यांसी दिल्हे इनामपत्र ऐसीजे तुम्हीं पुरातन राज्यांतील शेवक एकनिष्टपणे सेवा करीत आलां व तीर्थरूप कैला-सवासी आबासाहेब माहाराज याचे आज्ञेवरून राजकारणांबद्दल चतुरसिंग राजे भोसले यांज समागमे अवल अखेर स्वदेशीं व हिंदुस्थानांत सेवा करून श्रमसाहास बहुत केले याजमुळें पेशवे याणीं तुम्हांस कैद करून किले पालगड येथे ठेविले तेथून पेशवे अखेरीस मुक्त होऊन हालीं स्वामीपासी निष्टेने सेवा करीत आहां सा चालवणे अवश्यक जाणून स्वामी तुम्हांवर रुपाळु होऊन मौजे उपळवे कर्यात मायणी पेटा खानापूर हा गांव बोकील यांजकडे होता तो जफ्त होऊन सरकारव-सुलीकडे आला तो गांव हालीं तुम्हांस इनाम द्यावयाचा त्यास मौजे मजकुर येथील कुलकमाल आकार बेरीज रुपये

| | | |
|---|---|---|
| १७४३॥। | जमीन बाब आकार | रुपये |
| १ | शिवाय जमा दसरा बकरें मसाल्याबद्दल | रुपये |
| १७४४॥। | | |
| ५५५॥ | पैकीं वजा ज्यारी इनामदार | |
| | २७०॥ कदीम इनामदार | |
| | १८५ हालीं नवीन जमिनी बोकील याचे अमला पो नेमिल्या त्याबा। | |
| ५५५॥ | | |
| २६७॥। | गांव नि॥ खर्च हक्कदार वगैरे कदिमाप्रो | |
| २२१॥ | सरकारवसुलीकडे | |
| २०॥ | बोकील यांचे अमला पो | |
| २२१॥ | | |
| १०४४॥। | | |

बाकी वोकील यांचे अमलाबाा बेरीज ७०० रुपये एकूण सातशें रुपये आकाराचा मौजे मजकूर हा गांव कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तर पटी जळ तरु तृण काष्ट पाषाण निधीनिक्षेप सहित कदीम व नवीन इनामदार व हकदार गांवखर्च वगैरे व सरकार वसुली बेरीज खेरीज करून सालमजकुरापासून तुम्हास इनाम दिल्हा असे तरी सदरहू गांव चतुःसिमापूर्वक आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सदरहूप्रमाणें स्वामीनिष्ठेत राहून इनाम अनुभवून सुखरूप राहाणें *जाणीजे लेखनालंकार

मर्यादेयं
विराजते

---

## ११५ सोलापूर किल्यासंबंधी कैफियत

सोबतची सोलापूर किल्ल्यासंबंधाची कैफियत श्री. नानासाहेब मिरीकर यांचे मार्फत मिळाली. ती सोलापूर येथील देशपांड्यांच्या दफ्तरांतील आहे. ही कैफियत किल्ला इंग्रज सरकारचे ताब्यांत आल्यानंतर दोन वर्षांनीं लिहिली आहे. कैफियती वगैरे इतिहासाचीं गौण साधनें अस्सल पत्रांच्या कसोटीस उतरावीं लागतात, हें सांगणें नको च.

वा. न. पटवर्धन

श्री

कैफियेत सोलापुरचे कोट नीर्माण जाहला इ॥ शालीवान
शके १२३५ आनंद नाम संस्छर भाद्रपद मास अष्टमी
बुधवार आरंभ केला त्यामधे बेहद्दरच पाछाई त्या
चे सोजाने बांधीला हासन गंगुची पाछाई

ऐलीकड ईसुफ आदलशानें पाच मण सोने देऊन सोलापूर व
वीजयापूर घेतल त्याचे कीलेदार १३ आमलवार सालवार नावनीसी ताा

| | नंबर | वर्ष | महीने | रोज | | नंबर | वर्ष | महीने | रोज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कामीलखान | १ | १० | ३ | ७ | दीलतगीरी | ९ | ३ | ५ | ९ |
| कुरुद्मामदी | २ | ६ | १ | २ | सेदखान | १० | ४ | १ | २८ |

* हीं अक्षरें खाशांचीं आहेत.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बर्गीतखान | ३ | ६ | १ | ८ | शाहामीरबेग ११ | १ | ३ | २ |
| खोजा इभ्रइम | ४ | ४ | ३ | ७ | मीरमाद १२ | ४ | ५ | ३ |
| कामीलखान | ५ | ३ | ० | १२ | अबदुल अलिता | | | |
| कासीमलई | ६ | ४ | २ | ७ | जावराज १३ | ० | २ | १९ |
| अलीबकस | ७ | ३ | ४ | ३ | | १३ | ६ | १ |
| बीजलीखान | ८ | २ | १ | ५ | तेरीज | ३९ | ४ | २१ |
| | | ३९ | ४ | २१ | | ५२ | १० | २२ |

याउपरी अबदुल अली ताजधरान याणी पांच मण सोने घेऊन नीजाम शाहास कोट दील्हे त्याचे कीलेदार २

बरयाखान १ १० ॥ २ ॥ २१ कीता २ ४५ ॥ १ ॥ २१

५५ ॥ ३ ॥ १२

तेधून ईभराईम आदल शाहाने फीतवा करून मागाहून घेतला त्याचे कीलेदार २

| | वर्षे | महीने | रोज | | वर्षे | महीने | रोज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रेवनधूमखू | १ | ७ | ५ | तोकल पोलादखा | ५ | ३ | ११ |
| चीत्याखान १ | | | | न बु॥ तो जुंजुन पडला मृत्य जाला २ | | | |

६ ॥ १० ॥ १६

त्यावरी लिंगोजी धर्मराव दीवाण याणी कोट रीकाम करून चांदल शहास दील्हा त्याचे कीलेदार २

| | वर्षे | महीना | रोज | | वर्षे | महीना | रोज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आगा जेमशाई | | | | सीदी आतीफ २ | | | |
| मुळीक १ | १ | ७ | १० | | | | |

तेधून ईभ्रईम ऐदलशाहास सलान दील्हे त्याचे कीलेदार २

मीर्जाखान १ ० ॥ ३ ॥ २१ दस्तुरखान २ ४ ॥ २ ॥ २२

४ ॥ ६ ॥ १३

तेधून बहुधान्ये नाम संव्छर मलीकअंबर याणी वेढा घालून लक्ष सरजांम मीळून दक्षणभागी मुळीक मैदान लाढून खुलतान ढव करून कौल कोट घेतले त्याचे कीलेदार ४

| | | वर्ष | महीना | रोज | | | वर्ष | महीना | रोज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सीदी याकुब | १ | ० | ६ | २५ | माहलवरया खान | ३ | ० | ४ | २ |
| सीदी रवान | २ | ११ | ८ | ३ | कीता सीदी रवाजान | ४ | ४७ | ५ | ० |
| | | ११ | १४ | २८ | | | ४७ | ९ | २ |

६०

या उपरी सीदी रहाजान याणी बहुधान्ये नाम संस्छर श्रावण शुा १४ चेतुर्दसी दीवसी वजीरासी मेलवून घेऊन सलाहा करून घेतले त्याचे कीलेदार २१

| | वर्ष | महीने | रोज | | वर्ष | महीना | रोज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मलीकसंदल | ० | ७ | १८ | हासन रुमीखान | ० | ८ | २६ |
| अबदुलनबी | ० | ९ | ७ | माादु कासीम | ० | १० | २५ |
| सुरुरखान | ० | ६ | ३ | सैदआशरीफ | ० | ९ | ८ |
| मलीकखान | ० | ३ | २ | मीर्जाईसफ | १ | ३ | २१ |
| अमदुशाहा | ० | १० | २८ | कीता | ३ | १ | ४ |
| माादु साबान | ० | ८ | ९ | महमदु जावीनखा | १ | १० | ० |
| मलीकशाबान | ० | ११ | ४ | हसनरुमीखान | २ | १० | २५ |
| सीदीमीर | ० | ४ | १५ | त्याच लेक माादुरुमी खान | १ | १ | २८ |
| अलहमदुशाबात | ० | ७ | २८ | अबजलखान | ० | ८ | १३ |
| सैदअशरीफ | ० | ६ | २० | माादुरुमीखान | १ | १ | ० |
| | ६ | ३ | १४ | मीरअबदुलकादर व चांदखान सुबे बे-कआली माहल बांधवीला | ४ | ४ | १६ |
| | | | | | १८ | १० | १२६ |

२५८२८०

त्या उपरी नीजामशाही याजकडून कालर्दार

| | वर्ष | महीने | रोज | | वर्ष | महीने | रोज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जरुरखान | १ | १ | ० | आमनखान | ५ | १ | ७ |
| अकोटखान | ० | ० | २२ | बुऱ्हानखान | ० | ७ | ७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आदम पोलादखान | ५ | ५ | ९ | त्याने शुभानपूरये-ढ वसवीला | | | |
| शेम शादीपोलादखान | ६ | १ | २२ | | | | |
| आलीखान | २ | १ | २ | पीर महमद जावीत-खान | २ | ९ | २० |
| शाहामीरबेग | ५ | ३ | ८ | शीमसरखान | ४ | ७ | १६ |
| मराठा बाबाजी जाधव | ५ | ३ | ८ | वलीखान | ४ | ४ | १० |
| | २५ | ४ | ११ | करीमशाहा | १ | १ | १० |
| | | | | | १८ | ७ | १० |

४३८११८२१

या उपरी दीलीचे पादशहाने उमरावसुभा दील्हेलखान यानि जानत रायासी स्वादे सीलाऊन घेतला आशाढ अधीक मास रात्री घटीका ७ पळे ३० या समई ईलीच खान प्रवेश जाला शके १५९३ माघ वदी रात्रे घटका २ खोजा बारखुरदार प्रवेश सन १०८१ फसली

| | वर्ष | महीना | रोज | | वर्ष | महीना | रोज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ईलीचखान | ३ | ६ | १३ | गजफरखान | २ | ७ | २८ |
| बरखुरदार खोजा | १ | ९ | १ | मागता ईलीचखान | ० | ८ | २४ |
| | ५ | ३ | १४ | | ३ | ४ | २२ |

८८८८६

| | | | |
|---|---|---|---|
| महाराज मनोहर बसगोडा | २ | आबासखान | ३ |
| सैद शेरखान | ३ | नजमीखान | २ |
| केशरसींग | ५ | मुरादखान | २ |
| कईकुबाईतखान | ३ | मीरशरीफबेग | ८ |
| सेदअनावर | २ | राजा बीहिरसाल | २ |
| जैन अलावदीन | ४ | मागती शरीफखान | ३ |
| सैद दुमाई | २ | मीर आमद | ३ |
| मईदीखान | १ | फजलअलीखान | ६ |
| मीर्जामहीद | ६ | शाहामीरखान | २ |
| समीखान | ७ | खलीटुदीखान | ३ |
| आघाखान | ३ | | |

सेफुदीखान ३ १४

मोईनखान कोटातून मरून गेला कोट

महीना खाली ३

४३

७७

८६

सलीफुदीखान कीलेदार याने श्रीमंत पेशव्यापासून द्र-
व्य रुपये २५००० पंचेवीसहजार घेऊन कील्हा दिल्हा शके १६८०
बहुधान्य नामसंस्छर आशाढ शुा १ प्रतिपदा गुरवार पु-
ष नक्षेत्र घटीका १८ सन ११६८ फसली छ २९ सवाल त
दीने कृष्णसींग वेस हवलदार श्रीमंताचे तर्फेने येऊन प्र
वेशी जाहल आमल बाबुराव सदासीव बारामतकर याजकडून की-
लेदार २

७ रामचेंद्र त्रींबक, २ नाना जोसी,

९

( मागील बाजु )

त्यापरी श्रीमंताचे हुजुरचे आमलदार

| | | |
|---|---|---|
| २ उद्धो वीरेश्वर मंगळवार पेठ वस-विल | १३॥ | सदाशीव माणकेश्वर याजकडून |
| १॥ गणेश त्रींबक | | आमलदार आयाजी बलाळ |
| ३४ रामचेंद्र सीवाजी आमल | ॰।॰ | हुजुर आमल वीसाजी देवराव |
| ३७॥ | १३॥। - | पाछारपूरकर तीन महीना सन १२२७ |

५१

६०

त्याउपरी सन १२२७ फसली वेशाख शुा १० दशमी ईंग्रेज बाहा-
दर आमल फौजनीसी जेरनेल मंडरोल साहेब बाहादुर येऊन साहा दि-
वस लढाई करून कीला घेतला त्याजकडून आमलदार २

१ वेंकटपा माजी १ हाली श्रीनीवासराव

तरीख छ २५ जमादिलावल सन १२२९ फसली पावेतो झाडा

सदरहु एकंदर झाडा वी तपशील कीता मामलेदार नावनीसी
१ भगवंतराव मामलेदार दौा इंग्रे
ज बहादुर

# ११६ तुळशीबाग

आपल्या ह्या पुण्यपत्तनांत जीं चार दोन प्रसिद्ध देवालयें आहेत, त्यांत च तुळशीबागेची गणना होते. ह्या देवस्थानासंबंधानें ज्या गोष्टी श्री. नानासाहेब तुळशीबागवाले ह्यांच्या मुखानें त्यांच्या भेटीचे वेळीं नवीन च कळल्या त्या मी भीत–भीतच पुढें मांडीत आहें. भीत भीत म्हणण्याचें कारण ह्यांपैकीं बरी च हकीकत तोंडी आहे; तथापि त्यांत हि थोडा फार इतिहास आहे, ह्या दृष्टीनें खालील माहितीकडे पाहण्याची मी विनंति करितों.

तुळशीबाग संस्थानचे मूळ संपादक नारो आप्पाजी. हे पुणें प्रांताचे सरसुभेदार असून, पेशवाईंतील दोन चार आणीबाणीच्या प्रसंगीं यांनीं विशेष प्रकारची कामगिरी केलेली आहे. हे मूळचे सातान्याखालील पाडळी गांवचे वतनदार कुळकर्णी असून, यांचें उपनांव खिरे हें होय. ह्यांच्या बालपणाविषयीं विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं. काय असेल तें असो, बालपणीं च कांहीं तंटाबखेडा व रुसवारुसवी होऊन, पुण्याकडे येणान्या कांहीं मंडळींच्या संगतीसोबतीनें हे पुण्यास आले. येथें उतरावयाचें कोठें ही पंचाईत च. तेव्हां त्यांनीं आंबिल ओढ्याचे कांठीं असणान्या श्रीरामेश्वराच्या देवालयांत–शुक्रवारांतील हल्लींच्या रामेश्वराच्या मंदिरांत–आपलें चंबूगबाळें ठेविलें व आपण तेथें च रडत बसले. पेशव्यांच्या मर्जींतले खासगीवाले लिमये हे नित्याप्रमाणें देवदर्शनास आले असतां, त्यांनीं ह्या मुलास ओक्साबोक्सीं रडतांना पाहिलें. तेव्हां साहजिक च त्यांनीं त्याजकडून झालेली हकीकत विचारून घेतली. त्याची ती हकीकत ऐकून खासगीवाल्यांस त्या मुलाची फार करुणा आली, व त्यांनीं नारायणास स्वगृहीं नेलें. अशा रीतीनें नारायण खासगीवाल्यांच्या आश्रयानें पुण्यास च राहिला. त्या वेळीं हल्लींच्या तुळशीबागेच्या ठिकाणीं खरोखरीचा ‘ तुळशीबाग ’ असून, त्याचें स्वामित्व खासगीवाल्यांकडे होतें. नारायणाकडे ह्या बागेंतील तुळशी वगैरे तोडून आणण्याचें काम असे. नारायणाची तरतरी पाहून खासगीवाल्यांची त्याजवर मर्जी बसली, व त्यास ते आपल्या कौटुंबिकांपैकीं एक अशा रीतीनें वागवूं लागले. पुढें एक दोन प्रकरणांत ह्या लहान नारायणानें उत्तम कामगिरी बजाविल्यामुळें, नारायण हा नारो आप्पाजी होऊन मुत्सद्दीमंडळाच्या नजरेसमोर येऊं लागला. खासगीवाल्यांनीं हि कृतज्ञताबुद्धीनें नारो आप्पाजीस त्याचे विनंतीवरून ‘ तुळशीबाग ’ बहाल करून टाकिला. अशा रीतीनें हळूं हळूं नारो आप्पाजींचा उदय होत गेला. नारो आप्पाजी हे रामभक्त असल्यामुळें, श्रीरामजींच्या कृपेनें आपला ऊर्जितकाळ आला ही गोष्ट ते विसरले नाहींत. त्यांनीं लागली च तुळशीबागेंत श्रीरामाची प्रति-

स्थापना करून, त्याच्या सेवेंत राहण्याचा क्रम आरंभिला. कर्मधर्मसंयोगानें जमाबंदीच्या मुख्याचे जागीं त्यांची नेमणूक होऊन तें काम करण्यास त्यांनीं श्रीत्र्यंबकेश्वरापासून च सुरुवात केली. नारो आप्पाजीनें जमाबंदीचे कामांत काय क्रांति घडवून आणिली, हें सांगण्याचें प्रकृत स्थल नव्हे; तरी पण मलिकंबरानंतर नारो आप्पाजीनें च काय ती जमाबंदीसंबंधानें सुव्यवस्थित घटना तयार केलेली आहे हें नमूद करणें इष्ट दिसतें. असो; त्र्यंबकेश्वरीं मुक्काम असतांना, गौतमाश्रमींच्या एका सत्पुरुषाच्या कृपेनें नारो आप्पाजीस श्रीराम व जानकी अशा दोन मूर्ति मिळाल्या व ह्यांची च आपल्या तुळशीबागेंत शके १६८३ चे सुमारास त्यांनीं मोठ्या समारंभानें स्थापना केली; व पूर्वींच्या श्रीराम, लक्ष्मण व सीता अशा तीन हि मूर्ति कोणा महाशब्दे आडनांवाच्या रामोपासकास दान देऊन टाकिल्या. दान दिलेल्या ह्या मूर्ति शनवारांत महाशब्द्यांच्या घरीं ( घ. नं. ३१४) असून, तेथें रामनवमीस उत्सव हि होतो. गौतमाश्रमींच्या सत्पुरुषाकडून नारो आप्पाजीस श्रीराम व सीता अशा दोन मूर्ति मिळाल्या. लक्ष्मणाची मूर्ति बखतरामनामक सुप्रसिद्ध कारागिराकडून मुद्दाम तयार करविली. शके १६८३ चे सुमारास ही जी अर्चा झाली ती चलार्चा होय. अशा रीतीनें तुळशीबागेंतील रामाची प्रख्याति होत गेली. ठिकठिकाणचे रामोपासक दर्शनास लोटत. श्रीतुकाराममहाराज ह्यांचे तत्कालीन वंशज खंडोबा गोसावी यांनीं आपला नव्वद रुपयांचा मोकासा रामार्पण केला. ही गोष्ट शके १६८५ त झाली. तुळशीबाग संस्थानास श्रीमंत पेशवे सरकार यांची पहिली देणगी शके १६८५ त मिळाली आहे.

रावबाजींचे कारकीर्दींत होळकरानें पुणें लुटलें, त्या वेळीं पुण्यांतील सरदार, मुत्सद्दी वगैरे वाट फुटेल तिकडे गेले. नारो आप्पाजींचे चिरंजीव रामचंद्रपंत ह्यांनीं हि ह्या वेळीं स्वसंरक्षणार्थ पलायन केलें. देवस्थानाचे व्यवस्थेस हरिपंत पुरंदरे नांवाचा इसम मागें राहिला. पुण्याच्या लुटीची हकीकत ऐकून नारो आप्पाजींच्या चिरंजिवांनीं श्रीरामाच्या मूर्ति आपणांकडे घेऊन येण्याविषयीं हरिपंतास हुकूम फर्माविला. परंतु सुदैवानें होळकरानें संस्थानास बिलकूल हात लाविला नाहीं; इतकें च काय, तर त्या वेळीं पडलेला रामजन्मोत्सव मोठ्या थाटानें आपल्या देखरेखीखालीं पार पाडला. होळकरी दंगा आटोपल्यानंतर पूर्ववत् देवस्थानाची व्यवस्था सुरू झाली, व ती कालमानाप्रमाणें आजतागाईत चालू आहे.

नारो आप्पाजीकडे पुणें प्रांताच्या सुभेदारीसारखें जबाबदारीचें व अत्यंत व्यापक स्वरूपाचें असें काम असल्यामुळें त्यांचे दप्तरीं ऐतिहासिक संग्रह सांपडावा; परंतु त्यांच्या दप्तरखान्यामध्यें आज शेंपन्नास हिशेबाच्या वह्या ह्या च काय त्या राहिल्या आहेत. इनाम कमिशनच्या वेळीं कौपरसाहेबानें ठिकठिकाणचे कागदपत्र

नेले. ह्या संबंधानें एका माहितगारानें पुढील हकीकत सांगितली.–एके दिवशीं सकाळीं खुद्द कौपरसाहेब व त्याची कांहीं मंडळी तुळशीबागवाल्यांचे भेटीस आली. औपचारिक कुशल प्रश्न वगैरे झाल्यावर, साहेबानें दप्तरखाना पाहण्याविषयींची आपली मनीषा दर्शविल्यानंतर, तुळशीबागवाल्यांनीं तो साहेबमजकुरास दाखविला; व आपण दुपारची बारा वाजण्याची वेळ, श्राद्धासारखा गडबडीचा दिवस, म्हणून साहेबाची रजा घेतली. इकडे दप्तरखान्याचें निरीक्षण करितां करितां कौपरसाहेबानें सर्व दप्तर गाड्यांत घालून भरून नेलें! पण ह्या हकीकतीशीं विसंगत अशी हकीकत प्रसिद्ध झालेली आहे. सरकारी दफ्तरच्या दुसऱ्या चांगल्या आधारावरून इनाम, जहागिरदार वगैरे लोकांच्या माहितीकरितां 'इनाम–कमिशन खात्यांतील गैरइनसाफ' नांवाचें जें पुस्तक इ. स. १८५९ मध्यें येथील ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें आहे, त्यांत सदरील प्रसंगासंबंधानें पृ. ६४ वर मजकूर आहे तो:–"तुळशीबागवाले राहणार शहर पुणें यांणीं आपले घरांतील कागदपत्र कांहीं हरकत न करितां इनाम कमिशनचे अधिकारी यांस जितके होते तितके नेऊं दिल्हे, म्हणून त्यांची शिफारस होऊन सरकारांनीं त्रिवर्ग बंधूंस सालीना ३०० रुपये पेनशन तहाहयात करून दिलें." दफ्तरखान्यासंबंधानें वस्तुस्थिति कशी हि असली तरी, सांप्रत जीव धरून राहिलेल्या ऐतिहासिक सामुग्रीचा उपयोग तुळशीबागवाल्यांचे विद्यमान वंशज हे एखाद्या संशोधकास करून देतील अशी उमेद आहे.

पां. न. पटवर्धन

## लेखांक १

शके १६८५ चैत्र शु. १३ रविवार २७ मार्च १७६३

श्री

श्री
राजाराम नरप
ती हर्ष निधान माध
वराव बल्लाळ मु
ख्य प्रधान

राजश्री देशाधिकारी लेखक वर्तमान व भावी प्रांत पुणें गोसावी यांसि
अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाळ प्रधान

आसीर्वाद व नमस्कार सुरां सलास सितैन मया व अलफ शके १६८५ सुभानु नाम संवत्सरे राजश्री नारो आपाजी उपनाम खिरे गोत्र वसिष्ट सूत्र आश्वलायेन जोतिषी व कुलकर्णी मौजे पाडळी संमत कोरेगांव प्रांत वांई याणी कसबे पुणें येथील मुकामी हुजूर येऊन विनंती केली कीं पुण्यामध्यें आपण नूतन देवालय बांधून श्रीरामचंद्रजीचे मूर्तीची स्थापना केली आहे तेथील नंदादीप व नेवेद्य व सेवेच्या ब्राह्मणाचे कुटुंबाचा योगक्षेम चालला पाहिजे याजकरितां स्वामींनी कृपाळु होऊन एक गांव नूतन इनाम करार करून देऊन चालविला पाहिजे म्हणून त्याजवरून मनास आणितां मा।रनिले याणी का। मजकुरीं नूतन देवालय बांधून श्रीरामचंद्रजीची स्थापना केली तेथे देवास नंदादीप व नेवेद्य व सेवेच्या ब्राह्मणाचे कुटुंबाचा योगक्षेम चालविल्यानें धर्मकृत्य व राज्यास श्रेयस्कर हे जाणून यांजवरी कृपाळु होऊन श्रीच्या नंदादीपास व नैवेद्यास व सेवेच्या ब्राह्मणाचे कुटुंबाचे योग-क्षेमाबद्दल मौजे वडूं ता। सांडस प्रांत मा।र हा गांव मोकासबाब व इनामदार व हकदार खेरीज करून मोगलाई व स्वराज्यबाबतिसा। देशमुखी व सावोत्रा दरोबस्त कुलबाब कुलकानू हाली पटी व पेस्तर पटी देखील इनाम तिजाई जलतरुपाषाण निधिनिक्षे-पादि करून श्रीकडे नूतन इनाम करून देऊन हें पत्र सादर केलें असे तरी मौजे मजकूर हा गांव मा।रनिले याचे दुमालां करून देऊन श्रीच्या नंदादीपास व नेवे-द्यास व सेवेच्या ब्राह्मणाच्या कुटुंबाचे योगक्षेमाबद्दल यांजकडे पुत्रपौत्रादि वंशपर-परेनें इनाम चालवणें प्रति वर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रती लेहून घेऊन हें असेल पत्र भोगवटियास मा।रनिले यांजवल परतोन देणे जाणिजे छ ११ रमजान आज्ञाप्रमाण

लेखन सिमा

बार

**लेखांक २** शके १६८५ कार्तिक शु० ५

श्री

श्रीरामचंद्र

श्रीहरिभक्तपरायेण राजमान्य राजेश्री श्री नारोपंत नाना गोसावी यांसी

स्नो। खंडोबा गोसावी वास्तवे मौज देहू ता। हावेली प्रा। पुण कृतानेक विनंती उपरी तुम्ही का। पुण येथें श्रीच्या मूर्तीस स्थापन केलें आहे त्यास त्याच्या नेवेद्य नंदादीपास आपल्यापासून नेहमी ऐवज द्यावा ऐसा आमचा हेत जाला म्हन-ऊन तुम्हास पुसिलें तुम्ही म्हतले श्री चे पूजेस नेहमी ब्राह्मण ठेविला आहे जें द्याल त्याचे निसबतीस लाऊन देऊं तो श्रीस समर्पण करील त्यावरून मौज तळवडे

तरफ मजकूर येथे आम्हास मोगलाईचे ऐवजीं रुा। ९० नवद् सालदरसाल वौंशेपरंपरेने करार करोन दिल्हे आहे ते आम्हास पावतात ते रुपये नवद् नवद् श्रीस सालदरसाल अर्पन आपले स्वसंतोशें केलें आसत आपन घेऊन श्रीस समर्पण करवांत जावे यावत चंद्र सूर्य तावतकाल्ळपर्यंत श्रीस सदरहू रुपये देविले आसत यास आपले वौंसीचा कोन्ही हिला हरकत करील त्यास श्रीची शेफत आस सके १६८५ सुभानुनाम संवछरे कार्तीक सुध पंचमी हें लेहून दिल्हे सही बी कलम ॐ

## ११७ लिंब-गोव्याशेजारील जाधवाच्या वाड्यांत सांपडलेला एक मराठी ताम्रपट

### शक १५५४

१ सातारा जिल्ह्यांतील कृष्णाकांठच्या गोवें गावीं रहाणाऱ्या रा. रा. बळवंत सदाशिव चितळे यांनीं तेथून एका मैला वर असलेल्या एका खेड्यांतील जाधवांचा वाडा विकत घेतला. त्या वाड्यांत एका कोनाड्यांत प्रस्तुत मराठींत कोरलेला ताम्रपट सांपडला तो त्यांनीं मला दिला.

२ पत्रे एकंदर दोन आहेत. प्रत्येक पत्र्याची लांबी ३$\frac{1}{8}$ इंच, रुंदी २$\frac{3}{8}$ इंच व जाडी $\frac{1}{12}$ इंच आहे. वजन १६$\frac{1}{2}$ भार आहे.

३ भाषा अर्वाचीन मराठी. मूळ निवाडपत्राचा काळ शक १५५४ दिला आहे. म्हणजे हें निवाडपत्र रामदासतुकारामकालीन आहे. मूळ निवाडपत्र कागदावर झालें असून, नंतर स्वामित्वाचा पुरावा अक्षय जवळ रहावा म्हणून तें पत्र तांब्याच्या पत्र्यावर कोरून घेतलेलें दिसतें. कां कीं, ताम्रपटावरील भाषा शक १५५४ तील मराठी भाषेहून अर्वाचीन आहे. साक्षात् कोणत्या शकांत ताम्रपट बनविला गेला तें सांगणें मुष्कील आहे. परंतु, इतकें सामान्यतः म्हणतां येतें कीं मूळ कागदावरील निवाडपत्रानंतर पाउणशें वर्षांनीं हें ताम्रपत्र कोरविलें असावें.

४ ताम्रपट तत्कालीन गोव्याच्या पाटिलकी संबंधानें आहे. तत्संबंधानें विशेष कांहीं सांगण्या सारखें नाहीं. एवढें नमूद करणें योग्य दिसतें कीं अगदीं पेशवाई संपत तों पर्यंत महाराष्ट्रांत वतन वगैरे बाबीं संबंधानें ताम्रपट कोरण्याचा प्रघात होता.

स. मा. दिवेकर

पत्रा १ पोट

१ मुवाफिके हिन्दवी हरसे रजामन्द शुदन्द
२ ब मआमिलये आं हा मुशखस शुद
३ नीवाड ात्र सके १५५४
४ आंगीरा नाम समछर जे
५ स्ट सुध १० सोमवार ते दीव
६ सी म्हास थळ मौजे कडफळ नाा
७ बारामती पाा सुप बाीा गोत सवा
८ जी पाा मोकदम मौजे थळमजकुर
९ सैताजी व सुभानजी आटोळ मौजे
१० थळमजकुर या ईदमान अ

पत्रा १ पाठ

११ ग्रवादे कुस्णाजी व पछेमवादीये
१२ महीमाजी मौजे गाव समते नीबं
१३ पाा वई हर दो जन भांडत थळमज
१४ कुरास आल सबाब भांडन हर दो
१५ घाच भाउपनाच वतनाच आहे यासी
१६ सदर्हु दोघंचा नीवाडा केला हर दो जन
१७ बाजी पाा का नीबं पाा वांई यासी
१८ राजी जाल त्या वरन बेजी पाा सडी
१९ पाठवीली त्यासी सडीची हाकीक
२० त बाीा हर दोघाचा मुळपुरुश नागो
२१ जी पाा यासी बायेकां २ दोघी जनी

---

१ अनुस्वार दिला नाहीं. २ अनुस्वार दिला नाहीं. ३ अनुस्वार दिला नाहीं. ४ या पाहिजे ५ ब हवा ६ अनुस्वार दिला नाहीं. ७ घा पाहिजे ८ अनुस्वार दिला नाहीं. ९ बा पाहिजे १० ये ही खूण य ह्या उच्चाराची आहे.

## पत्रा २ पोट

२२ तों[11]
२३ वडलीचा तान्हजी
२४ त्यें[12]च हरजी त्यें[12]चा
२५ [13]म्हीमाजी

२६ सदरहु दोघीचा
२६ ½

तों[11]
धाकटीचें[14] षे
लोजी व वीटो
जी त्यां[15]च कृ
ष्णाजी व नाई
कजी

२७ वीस्तार [16]बेयेका वरी नीवाडा केल
२८ ा[17] सडी प्रमान नीवाडा दे[18]र्घाचा के
२९ ला थळ गांव कुल कं[19]नु कौं[20]ना घर
३० वाडा सेत ईनाम पौं[21]ढरी कौं[22]ली
३१ कुल उतपन दौं[23] टौं[24]ई कौं[25]ल लीही
३२ त्या प्रमान नीवाडा केला मान
३३ ता महीमाजीस नागर पान हो

## पत्रा २ पाठ

३४ लीची पोली व
३५ म्हार ४ पुडं

३६ सदरहु प्रमान
३७ हार दोघाचा नी
३८ वाडा केला अ
३९ स हार दोघास अर्था अर्थी सं[26]
४० [26]मंध नाही हे नीवाडपत्र सही

कृस्णाजीस
दसरा व दिवाली
वाजतर व लगिना
ची वाटी व माहा
राची मोली पुड

---

११ तर्फ ११ त्या पाहिजे, चा पाहिजे १३ भी बद्दल म्ही काढला आहे. १४ चा पाहिजे १५ चा पाहिजे १६ ब हा फारसी प्रत्यय वर या अर्थी आहे. १७ कान्हा दुसऱ्या ओळींत काढिला आहे. १८ दो पाहिजे १९ का पाहिजे २० अर्थ कळत नाहीं. २१ अनुस्वार पाहिजे २२ ळी ब ल.ली काढिली आहे. २३ दो पाहिजे २४ ठा पाहिजे २५ क वर व ल वर मात्रा पाहिजेत. २६ म वर अनुस्वर दिला नाहीं.

| | |
|---|---|
| ४१ गोदजी पा<br>४२ का सेळगउ<br>४३ पा ईदीपुर[२७]<br>४४ बीा सीवराम थीा<br>४५ मीा[२८] | गोही नीा नागर ॥<br>लीगोजी पा मौजे<br>कुरबावी कीर्यात<br>दहीगाउ |

# ११८ कवीजंग व पेशवे

नगरचा किल्लेदार कवीजंग ह्यानें शके १६८१ कार्तिक वद्य पंचमी, ता. ९ नोवेंबर इ. स. १७५९ रोजीं नगरचा किल्ला पेशव्यांचे ताब्यांत दिला ही गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे. हा कवीजंग मूळचा कोण, कोठील ह्या विषयीं कांहीं माहिती सांपडली नाहीं; तरी पण कवीजंगाचे वंशांतील, वास्तविक पाहतां कवीजंगाचा भाऊ ख्वाजे शरीफ ह्याचे वंशांतील विद्यमान जहागिरदार मीर अमीनोद्दीन कवीजंग यांनीं दिलेल्या कागदांवरून ह्या घराण्यासंबंधानें व विशेषतः नगरचा किल्ला श्री. भाऊसाहेब पेशवे यांचे हवालीं केला त्यासंबंधानें बरी च माहिती मिळण्यासारखी आहे.

सोबत एकंदर लेखांक १२ जोडिले आहेत. अनुक्रमांक १ पेशवाई बुडाल्यानंतर ठिकठिकाणच्या सरदारांकडून ज्या कैफियती गुजरण्यांत आल्या त्यांपैकीं ह्या घराण्याबद्दलची कैफीयत होय.

लेखांक २ ह्या घराण्याची आतांपर्यंतची वंशावळ होय. ह्यावरून नगरच्या किल्लेदाराचें नांव खाजे महंमदखा असें होतें, असें दिसतें. येथील हल्लींची संतती महंमदखा कवीजंग ह्याचा भाऊ ख्वाजे शरीफ ( मराठी अपभ्रंश खोजे सराफ ) याची होय, हें स्पष्ट होतें.

लेखांक ३ ची यादी महत्त्वाची असून, तींतील कलमान्वयें नगरचा किल्ला पेशव्यांकडे आलेला आहे.

लेखांक ४ हा हि ह्या च संबंधानें 'बेलभंडारा' चा कागद होय.

लेखांक ५ ते ११ हे कागद हि इतिहासोपयोगी आहेत.

लेखांक १२ हा कमानी मशिदींतील कवीजंगाचे कबरीवरील शिलालेख होय. ह्यावरून कवीजंग इ. स. १७७४।१७७५ मध्यें वारला हें उघड दिसतें.

पां. न. पटवर्धन

---

२७ ई वर अनुस्वार दिला नाहीं . २८ थळ २९ मजकूर

श्री

कैफियेत नवाब कवीजंग बाहादूर बमये बिगदून

१ नबाब ख्वाजे आमानखा कवींजंग बाहादूर उमर
२५

१ ख्वाजे महंमद् जाफरखां उमर
८०

१ हासन मिरजाखा उमर व मीर हाया मुलाफखा
४५

१ ख्वाजे महंमद् हुशनखा उमर व ख्वाजे वजीर खा उमर व ख्वाजे
७५ ५०

आहदमखा उमर
४ २०

याजकडील श्रीनिवास गोविंद वकील याणी × × नगर मुकामी विदित केले की आमचे ये + + + नाचे संपादन सवस्थान दिल्ली पैकी नबाब येकेताजखा याचे पुत्र नबाब कुरताजखा यास पुत्र नवाब कवीजंग बाहादूर व ख्वाजे शेरीफखा बहादूर याजकडे नगरचा किल्ला ताा औवरंगाबादमे बालेघाट परियेंत पातशाई देणे व निज्याम आलीखा याजकडे हायेदराबादचे सवस्थान परस्परे दिलीहून हुकूम येईल ते करीत असावे निज्यामआलीखा जबरीचे पोटी आमचा किला घेऊन मुलूख काबीज करावा तो दिलीचे सवस्थान पेशवे याजकडे जाले आम्ही जर करिता सवस्थान निजामआली खा याचे हवाले दिलीचे हुकमाखेरीज करावे तर निज्याम आली खा बा(?या)गी जाहाले पादशाची बदनामी आम्हाकडे येती सबब किला गोळी न वाजविता सरकारी सवस्थान पेशवे याचे हवाली करून आम्ही आपले कुटुंबाचे जातीची जाहगीर कायम ठेविली वौशावळ बीतपशील

३ नबाब तुरेताजखा बहादूर धाकटे यासी पुत्र तीन थोर नबाब कवीजंग बाहादूर धाकटे ख्वाजे हामीदखा त्या धाकटे ख्वाजे शरीफखा बाहादूर

१ नबाब कवीजंग बाहादूर याचे पुत्र नवाब ख्वाजे महंमदखा त्यास पुत्र

नबाब ख्वाजे मामलखा यास पुत्र नबाब ख्वाजे आमानतखा कवीजंग बाहादूर हली पुणे मुकामी आहेत

१ ख्वाजे हमीदखा याचा वंश तुरकाबाद उर्फ खराडी येथे आहेत

१ ख्वाजे शरीफखा बाहादूर याचे पुत्र ख्वाजे महंमद जाफर बाहादूर हली आहेत यास पुत्र

१ खाजे ऐकेताज बाहादूर

१ खाजे बहूजजमाखा

२

३

२ भाऊ व भाचे

१ सैद हसमखा नवाब तुरताजखा याच भाचे त्याचे पुत्र सैद मुकीमखा व महमदशफीखा बाहादूर यास पुत्र.

१ सैद मुकीमखा यास पुत्र सैद उगलाखा यास पुत्र मीर हाया तुलाखा हली आहेत

१ महंमद शफीखा यास पुत्र हसन मीरजाखा व नकी मीरजाखो हली आहेत

२

१ ख्वाजे खानधाब तुरताजखा याचे भाऊ त्यासी पुत्र तीन

१ ख्वाजे आशूरखा

१ ख्वाजे फते मुबारकरू

१ खाजे उसमान

३

यासीं पुत्र

१ ख्वाजे फते मुबारकरु यासी ख्वाजे महंमद हुशेनखा हली आहेत व त्यास पुत्र ख्वाजे कादरखा हली आहेत

१ ख्वाजे उसमान यास पुत्र ख्वाजे वजीर हली आहेत यास पुत्र

१ खाजे आश्रफा हली आहेत

१ ख्वाजे पातशा हली आहेत

२

१ खाजे अशूरखा याचे पुत्र खाजे उमर व ख्वाजे शादी व ख्वाजे बरखुरदार यास पुत्र ख्वाजे हसन यास पुत्र खाजे आहमद हली आहेत

३

२

यासी जाहगीर सवस्थान बितपशील

१ नवाब ख्वाजे आमानतखा कवीजंग बाहादूर याजकडे

१ पो आकोले देहे दरोबस्त आमल देहे २६

१ पो नेवासे पो इनामी देहे दरोबस्त आमल

३

१ कसबे तुरलापूर उर्फ भानस हिवरमे पाटीलकी सुद्धा

१ मौजे मालीचिंचोर

१ मौजे कवदे

२ ३

१ बेरीज

१ बाग आहंमदनगरातील

१ मळा खरीदी इनाम सावेडी पैकी बिघे १२

१ अबराई

मौजे सेडी पो झाडे सुमार ५

१ भिस्त बाग पैकी झाडे सु ५

१ मौजे खाडके येथील इनामदार याचे झाडापैकी खरीदी सु २

३ १२

३

३

१ ख्वाजे महमंद जाफर बाहादूर

४॥ पो श्रीगोदे पैकी देहे जाहागीर आमल

१ मौजे चिखलवण

१ मौजे उंबरड

१ मौजे मांगी

१ मौजे खंडाळे

०॥। मौजे केंदूर जाहागीर आमल पो इसमीर आखा याज कडे आमल ।। बाकी

४॥।

पो नवासे पो देहे जाहागीर आमल

१ मौजे भाट कुडगाव

१ मौजे देवटाकळी

१ मौजे बखारपूर

१ मौजे गुंफा

१ मौजे बाभुलखेड

५

१ इनाम मौजे सावेडी ता। नगर हवेली पैकी चाहूर ०॥० जमीन
बिघे ६०

१०॥।
१ हसन मिरजाखा व मीरहायातुलाखा जाहागीर आमल
०॥० कसबे रासीन पो हिसा रुपये ३२५
१।० पो श्रीगोदे पैकी देहे
१ मौजे पाटेगाव
०।० मौजे केदूर पैकीं हिसा

१।

१॥।
ख्वाजे महमद हुशेन खा व ख्वाजे वजीर व ख्वाजे आहमदखा आमल जाहागीर
०॥० को रासीन पैकी हिसा रु २५३१
२ पो श्रीगोंदे पैकी देहे
१ मौजे कुमेज
१ मौजे बिटरगाव

२

२॥।

४ देहे ४३ तिरेताळीस

इनाम वगैरे

पैकी हली चालनात ते देहे बितपशील
नबाब ख्वाजे आमानत खा कवीजंग बाहादूर याजकडे पो नेवासे
पैकी देहे दरोबस्त आमल
१ कसबे तुरकपूरमे पाटीलकी सुधा
१ मौजे माळीचिंचोर
१ मौजे कवटे

३
१ खेरीज
१ बाग आहमदनगरातील
१ मळा खरीदी सावेडी पो इनाम बिघे १२
१ आबराई झाडे सु।। १२

३

४

१ ख्वाजे महंमद जाफर खा बाहादूर याजकडे

४ श्रीगोंदे पो देहे ४॥ पैकी जाहगीर आमल

१ मौजे चिखलगाव

१ मौजे उखरड

१ मौजे मांगी

१ मौजे खंडाळे

४

२ पो नेवासे पो देहे ५ जाहागरि आमल

१ मौजे देवटाकळी

१ मौजे गुंफा

२

१ इनाम लावेडीगा नगर हवेली पो

जमीन चावर ·॥· चिघे ६०

७

१ हसन मीरजाखा व मीर ह्यानुलाखा

याजकडे जाहगीर आमल

·॥· कसबे गर्नान पो हिसा रु. ३२५०

१ पो श्रीगोंदे पो देहे १। पो मौजे

पाटेगाव

१॥

१ ख्वाजे महंमद हुशन खा व ख्वाजे वजीरखा

व ख्वाजे अहमद खा याजकडे जाहगीर आमल

·॥· को गर्नान हिसा रु २५३१

२ पो श्रीगोंदे पो देहे

१ मौजे कुनेज

१ मौजे चिंटरगाव

२

२॥

देहे १३ नेग इनाम वगैरे

४

बाकी देहे तपसील

१ नबाब ख्वाजे अमानतखा कवीजंग बहादूर जाहगीर दरोबस्त ामल पो आकोले येथे भिलानी बंड करून ठाणे घेतले गावची तसनस केली सबब पंतप्रधान याचे सरकारात कानावर घालून भिलाचे पारपत्य करून ठाणे उठविले त्याचे सिबंदीखर्चाबद्दल ऐवज घेणे राहिला सबब अमानत राहिले देहे २६

१ खाजे महमद पो देहे जाफरखा बहादूर जाहगीर आमला पो देहे

३ पो नेवासे पो देहे

१ मौजे भाट कुडगाव

१ मौजे बाभुळखेड

१ मौजे बख्तपूर

---

३

सदरहू तीन देहे माधवराव देशमूख कुकाणेकर याणी सिंदे आलिज्या बहादूर याचे वकिलीचें काम करून आले तेव्हा बाळोजी कुंजर याचे कारभारात जबरीने दाबले ते

०।।।० पो श्रीगोंदे पो देहे मौजे केदूर पो हिसे ०।।।० सदरहू देहे बाळोजी कुंजीर याचे कारभारात निगडे सिलेदार नि।। इचोरकर हे दाबून खातात

---

३।।।०

१ हसन मिरजाखा व मीर हयातुलाखा याजकडील जाहगार आमल पो श्रीगोंदे पो मौजे केदूर पो हिसा चोथाई सदरहू पो निगडे नि।। इचोरकर दाबून खातात

---

३

देहे ३० तीस

या खेरीज खोज महमद पन्ना मि।। कवीजंग बहादूर व याचे पुत्र मीर गुलाम हुशन याजकडे जाहगीर व इनाम मौजे माडप पो पाडे पेडगाव जाहगीर आमल चालत होता तो दरम्यान तुळेखान याणी दाबला आहे

इनाम जमीन

१ मौजे मर्जुदानगर हवेली येथील जमीन बिघे २२

१ मौजे निबोडी ता। नगर हवेली पो इनाम जमीन बिघे ३०

---

२

( लेखांक २ ) वंशावळ

शागुलाखा—एकेताजखा १ तुरुपताजखा २ खाजेखा
(१) (१२)

१ तुरुपताजखा—१ खाजे महंमद खा कवीजंग २ खाजे हमीदखा× ३ खाजे
(२)
शरीफ खान ऊर्फ एकेताजखान
(३)

२ खाजे महंमदखा कवीजंग—खाजे महंमद खा ऊर्फ आसुदुलाखा—खाजे मोगलखा—खाजे अमानतखा.*

३ खाजे शरीफखान ऊर्फ एकेताजखान—खाजे महंमद जाफरखान—१ एके-ताजखान ऊर्फ बापूसाहेब २ बदीयु जमाखान
(४)

४ एके ताजखान ऊर्फ बापूसाहेब—१ मीर शरफोद्दीन २ मीर बुराणोद्दीन
(५) (८)
३ मीर कमालोद्दीन
(९)

५ मीर शरफोद्दीन—१ मीर अजिजोद्दीन ऊर्फ बाबासाहेब २ मीर वजिरोद्दीन
(६) (७)
३ मीर कमारोद्दीन

६ मीर अजिजोद्दीन—मीर अजिनोद्दीन

७ मीर वजिरोद्दीन—मीर अमिनोद्दिन—मीर कंकर साहेब

८ मीर बुराणोद्दीन—१ मीर प्यारे साहेब २ मीर फैजुद्दीन

९ मीर कमालोद्दीन—१ मीर शमसोद्दीन २ बद्रोद्दीन
(१०) (११)

१० मीर शमसोद्दीन—१ मीर हुजुरोद्दीन २ छोटे साहेब

११ बद्रोद्दीन—मीर मुनिरोद्दीन

१२ खाजेखा—१ खाजे फत्ते मुबारकरुह २ खाजे उस्मान ३ खाजे आशूरखा
(१३) (१४) (१५)

१३ खाजे फत्ते मुबारकरुह—खाजे महंमद हुसेनखा—खाजे कादरसाहेब

१४ खाजे उस्मान—खाजे वजीरखा—१ खाजे आश्रफखा २ खाजे बाळासाहेब

१५ खाजे आशूरखा—खाजे उमर* २ खाजे शाही* ३ खाजे बरखुरदार
(१६)

१६ खाजे बरखुरदार—खाजे हासनखा—खाजे अहमद—१ खाजे कडुमिया खाजे रहीम

---

× याचा वंश तुर्काबाद अगर खराडी येथें

**लेखांक ३** नंबर 5234

ता।० २८।१०।१७५९

( अक्षरें गेलीं आहेत )

महिना पंधरा दिवसात सरकारचे लोक घेऊन स्वाधीन करावा त्या प्रो करावे हे जाहल्यावर कराराप्रो बारा कलमे क्षेपनिक्षेप चालवावे अंतर न करावे म्हशारनिल्हेनी हि करारप्रो काम सत्वर अमलात आणावे

एणेप्रो करार करावे लेकराचे लेकरी

याद्री कलमे मतालिब कविज्यंग चंद्र ६ रबिलावल कार्तिक सन सितैन ४५ हजार प्रो अकराणे सुा व जागीर ४५ प्रो वसुल असेल आकोल्यात लगती हावेली संगमनेरात नेमून द्यावी दरोबस्त अमल नेमून द्यावे. पनास हजाराची जागीर वसूलही पनास हजार चौथाई व सरदेशमुखी व बाबती सहीत याच प्रा एका प्रगण्यात आपणास द्यावी फेरफरमाविस कमाविसदाराचा सरकाराचा काही संबंध नसावा आणि उपद्रव न द्यावा

प्रगणे अकोले प्रगणे धाद्रफल

कोा सिनेर प्रगणे कडे निबोन

जागा पाहोनच नेमिली असे

ज्या प्रगणीयात जहागिर देतील त्याच प्रगणीयात गढी मातबर असेल तो कसबा आपणास द्यावा की कबिले ठेवण्यास योग्य असावे मातबर कज्या पडल्यास अन्य स्थल संवरक्षनायोग्य द्यावे

१ तुरकपूर वगैरे हे गाव आम्हाकडे चवथाई व सरदेशमुखी व बाबत व तेथील पाटीलकी आपणाकडे इनाम लेकराचे लेकरी या प्रकारे चालतात त्या गावास काही उपसरग मोगलाईतून लागू न द्यावा व दरोबस्त या गावच्या सनदा स्वराज्यातून इनाम लेकराचे लेकरी चालेल असी चवथाई व सरदेशमुखी बाबती देखील करून द्यावे

सुदामत प्रमाणे वतन व आमल चालवावे पेशजी प्रमाणे इनाम पत्रे करून देखील मोगलाई पत्र द्यावे देणे

१ मौजे तुरकपूर ऊर्फ भानस डिहिवरे प्रगाणे नेवासेच्या पाटीलकी व मौजे कवटे नेवासे प्रगण्याचे गाव येथील पाटीलकी आपली आहे

प्रमाणे पाटीलकी चालवावी व जहागीर स्वराज आमल दरोबस्त चालवावे. दीड हजार तीन हजार पर्यंत असलेशिवाय ज्यास्ती जमा असली तर बिकरार जावीत (४५) तालीसात वजा करावी इनामपत्रे

करून द्यावे देणे. राजुरी न चालेल तर मुबदला गाव त्याजवळील त्या
जाफ्त करून द्यावे देणे करार जफ्त

१ मोजे राजुरी वाळुंज प्रगण्याचा गाव आहे जर हा गाव राहू न सकेल तर याच्या ऐवजी
नेवासे प्रगण्याचा गाव आपले जहागिरीचा आहे तो द्यावे

१ तुरकाबाद उर्फ खराडी आपले वडिलांचे कबिल्यास व आपले भावास व बहिणीस व आपणास इनाम आहे तो असें करावे की नबाबाकडून व सरकारातून त्यास उपसर्ग न लागावे त्याचे त्याजकडे चालावे येविशई साहितेपत्र द्यावे जथवर प्रयेत्न होईल तो करावा येणेप्रमाणे करार करावे करार

शहेर नजीक आहे येथून साहितेपत्र देऊन चालवावे न चालेल तरी
मोबदला द्यावा दरसालासी सदरील साहिते पत्रे चालले करावे
चालवावे करार करावे करार

नेवासे वगैरे आहे त्या प्रो चालवावी चाकरी हुजूर करावी अगर मोगलाईत केली तर चालवावी करार करावे करार

१ आपले भाऊ भाचे वगैरे लोक बीतपसील

भायाचे जाहगिरीस सरकारातून उपसरग न लागावा ते चितास आल्यास मोगलाईत चाकरी करितील चितांत आल्यास सरकारात राहतील. मोगलाईतुन त्यासं पेच पडल्यास त्याचे साहिते सर्व प्रकार करावे त्याचे हवाल्या बाग वगैरे नगरात आहेत त्यास उपसरग सरकारचे लोक न द्यावे व सुखवस्तीस मुजाहिमता नसावे

हावाल्या बाग भावाचे या नगरी आहेत ते चालवावे काजीचे
इनाम व रोज पेशजीप्रमाणे चालवावे येणे प्रो कलम करार करावे
करार व करार

१ ऐके ताजखा भाऊ याची जाहागीर चांभार गोंदे वगैरे १५६७९॥-

१ महमंद मुकीमखा व महंमद शेफीखा हासनखाचे लेक व भाचे आपले यासी हवेली अहमदनगर वगैरे ११०१२

१ खोज्ये फते मुबारकरु १७३३

१ खाजे महमहपन्हा १८७४॥।~

१ खाजी आबदूल नबी याची जाहागीर व इनाम रोज वगैरे वजा जाता चालते ते १६६६॥ जागीर पांडेपेडगाव इनाम रोज लागेल असा बंदोबस्त करावा चारपाच हजार परीयंत गल्ला आहे तो नवा जंगी सामान दारु गोळी तोफा जजाला बंदुकी नेऊ नये सरकारात द्याव्या करार करावे करार

संगमनेरात हजार रुपये तनखा गाव जाहगीर वगैरे दुरोबस्त गावं इनाम द्याव्या करार करावे करार

१ गला जितका किल्यास असेल तो आपण घेऊन जाऊं त्यास मुजाहीमत न व्हावी.

खास्सा सरमजाम बंदुकी असतील त्या न्याव्या चाकरी माफ करावी करार करावे करार

१ चाकरी सर्व प्रकारे आपल्यास माफ असावी पागेचा सामान शेंभर रावतानसी तयेनात राहून करार करावे करार

चाकरी करण्याचे सांगावे तेथे चाकरी करावी करार करावे करार

१ महमद करीम आपला पालक लेक जातीनसी दरमहा करून शेंभर लोकांनिशी चाकरी ठेवावी व खाशासंही दरमहा पाहून करार करावे करार फसलीप्रमाणे दाखल आमल होई तो वसूल तुम्हाकडे पडेल कलम करार करावे करार

१ आपली जहागीर जी आतां आहे त्याचा पैका ज्या दिवशी सरकारात ठेऊन ते दिवस पर्यंत जो प्रगण्यात राहील तो कमाविसदारास ताकीद करून वसूल करून द्यावा

अजमासे एकतीसहजार तनख्याची जहागीर आहे त्यांत नगर पांडेपेडगाव चांभारगोंदे चोविस पंचवीस हजार

तनखा येथील जहागिरीचा वसुलाचा अदमास पाहून त्याप्रमाणें गंगथडी खानदेश येथें मोबदला जहागीर द्यावी.

१ मुरात खाँ मौलवी यास आपल्यास जाहगीर देतील त्या प्रगण्यांत हजार रुपयाचा गाव इनाम लेकराचे लेकरी चालेल चौथाई सरदेशमुखी व बाबती देखील द्यावी

सरकारात पदरी पडून काम केल्यावर कराराप्रो चालेल वरकडानी पेच केले तर खातरे येणार नाही करार करावे . करार

१ सरकारची चाकरी आम्ही अंगिकारल्याउपर मोगलाईकडून आनखी पेच आम्हाकडे हाजार पडतील व लोक लिहितील ते खातरेस न आणावे सर्व मतालिब सदरी लिहिलेले ते त्याजप्रो लेकराचे लेकरी चालवावे त्यास श्रीमंत, नानासाहेब व भाऊसाहेब व दादासाहेब व विश्वासरावसाहेब याणी आपले बेलभंडार व्यगलाले द्यावे व या पत्रावरहि दस्त खत करून द्यावे की लेकराचे लेकरी सदरहू कलमे चालवू

सिवबंदी करण्माबदल कामे आजपावर पंचेवीस हजार रुपये द्यावे करार
करावे करार

१ किल्यात सिवबंदीचे लोक आहेत त्याची तलब चढली ते आदा करावयाबद्दल रुपये २५००० पंचवीस हजार नक्त द्यावे की त्याची तलब आदा केली जाईल

१२

**लेखांक ४**

श्री

६।१२।१७५९ नकल

सिका

शाहामत मिसालते मर्तबत कवीजंग बाहदूर सलामहू

छ बाळाजी बाजीराव प्रधान व सदासिव चिमणाजी आहदनामा लिहिला ऐसा जे तुमचे मतालिबाचे कलमे बारा आलाहिदा बंदावर करार करून दिल्हे ती गोळी न वाजता किला सरकारचे हावाली जाल्यावर वौशपरंपरेने चालतील ये बाब वसवस न धरावा राघो तुकदेव याजबरोबर बेलभंडार पाठविला आहे हा येऊन किला बेवसवस सरकारचे लोकाचे हावाला करने सर्व गोस्टीने खातरजमा असो देणे तुमचे सर्व प्रकारी लेकराचे लेकरी चालविले जाईल तुमचे आमचे दरम्यान विस्वर आहे करारप्रो सरकारातुन चालेल सदर स्थळ हवाला करने जानिजे छ १५ रबिलावल सन सितैन ज्यादा काय लिो मोर्तब सुद (लेखन सीमा)

**लेखांक ५**

(ता २७।१२।१९५९) श्री

राजश्री माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहित असलें पाहिजे विशेष खाजे शरीफखान ऊर्फ एके ताजखान यांजकडे

१ मौजे चिखल ठाणे

१ मौजे खंडाळे

१ मौजे मांगी

३

सदरहु तीन गांव पा चांभारगोंदे जागीर आहेत त्याप्रमाणें हक्कीं करार करून दिल्हे असेत तरी तुम्हीं देहाये मजकुरास व अमलदारास व जमीदारास ताकीद करून सालाबादप्रमाणें जागिरीचा अमल देववावा रा छ ६ जमादिलावल सुा सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणें

श्री

**लेखांक ९**

० श्री ०
राजा शाहु नर
पति हर्षनिधान
बाळाजि बाजि
राव प्रधान

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडीत प्रधान तां मोकादम मौजे सावेडी पा हवेली अमदानगर सरकार मजकूर सुरु सितैन मया व अलफ खोजे शरीफ खान ऊर्फ एकतार्ज खान याणी हुजूर मौजे टाकळी पा पांडे पेडगांव येथील मुकामी येऊन अर्ज केला कीं मौजे मजकुरीं आपले बाग २ दोन एकून जमीन बिघे १२० एकशेवीस ईनाम पेशजी-पासून मोगलाई अमलांत आपणाकडे चालत होते त्यास हाली पा मजकूरचा मोगलाई अमल सरकारांत आला आपण सरकारचे किफाइती कामकाज केले आहे मेहेरबान होऊन सदरहु जमीन पेशजी प्रमाणें ईनाम करार करून देऊन लेकरा लेकरी ईनाम चालविली पाहिजे म्हणोन त्यावरून मनास आणिता याणी सर-कारचे कामकाज केले आहे याचे चालवणे जरूर जाणोन याजवर मेहेरबान होऊन याचा आर्ज खातरेस आणून सदरहु दोन्ही बागाची जमीन बिघे १२० एकशेवीस पेशजीप्रमाणें याशी व याचे लेकरालेकरी याजकडे इनाम चाल-वण्याचा करार करून देऊन हे आज्ञापत्र सादर केलें असे तर सदरहु जमीन याचे दुमाला करून सालदरसाल याजकडे ईनाम चालवीत जाणे दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे या सनदेची नकल घेऊन हे सनद भोगवटीयास परतोन देणे जाणीजे छ १२ जमादिलावल आज्ञाप्रमाण

लेखन
सीमा

बार

२।१।१७६०

## लेखांक ७

कवीजंग बाहादर महबतहु

छ शाहामत व बिसालत मर्तबत खान समीऊन मकान बादज शौक मकशुफ आंकी येथील खैर जाणोन आपली खैर लिहीत जाणे दिगर शहर अमदानगर येथे हवेल्या सरकारच्या बितपसील

| | | |
|---|---|---|
| सर्ज्याखान याज— | | सियारत खान |
| बाबद | हवेली | बमये बाग याजबा |
| | १ | व हवेली बुलनशाबद्दुल खरेदी |
| | | १ |

येणे प्रमाणे दोन हवेलीया बमये बाग व कारंज्याचे पाणी दाने हवेल्यात येत आहे ते ऐसे तुम्हास राहावयासी व तुमचे लेकरालेकरी राहावयासी करार करून तुम्हास दिल्या असेत तर सदरहू दोन्ही हवेल्या बमये बाग आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे लेकरालेकरी आंत सुखरूप राहाणे जाणीजे छ १२ जमादिलावल सुा सितेन मया व अलफ ज्यादा काय लिहिणे

लेखन
सीमा

० श्री
राजा शाहुनर
पति हर्षनिधान
बाळाजी बाजि
राव प्रधान

ता २८।४।१७६०

श्री

## लेखांक ८

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाळाजी महादेव गोसावी यांसी: सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सुा सितेन मया व अलफ

पो अकोले येथील जागीर साल मजकुरी कवीजंग बाहादर याजकडे करार करून देऊन पेशजी पत्र सादर असता मारनिलेकडे जागीर चालावयास खलेल करता म्हणून हुजूर विदित जाले ऐशास पा मजकूरची जागीर मारनिलेकडे दिल्ही असता उपसर्ग द्यावयास कारण काये हाली पत्र सादर केले असे तरी पेशजीचे पत्राप्रो पा मजकूरची जागीर मारनिलेकडे चालवणे कोणेविसी उपसर्ग न करणे जाणिजे छ ११ रमजान बहुत काये लिहिणे

लेखन
सीमा

श्री

१७।६।९६
लेखांक ९

श्री
जोतिस्वरूप च
रणी तत्पर माहाद
जी सुत दवलतरा
व शिंदे निरंत
र

छ आनाम देशमुख व देशपांडे प्रांत रासीन यासी दौलतराव सिंदे सुा मया तैन व आलफ ख्वाजे मोगल खा कवीजंग याजकडून सरकारचा नजरचा ऐवज येणे याजकरिता त्याजकडील सरंजामाचे वहिवाटीस सरकारातून कारकून पाठविले होते त्यासी कवीजंग याणी नजरच्या ऐवजाचा फडशा करून दिल्हा मारनिलेकडील का दार माहाली सनद घेऊन येतील त्यासी रुजु राहून आमल त्याजकडे सुरळीत देत जाणे जाणिजे छ ९ मोहरम मोर्तब सुद

मोर्तब
सुद

लेखांक १०

श्री

१७।६।१७९९

राजश्री नारो कृष्ण गोसावी यांस

छ स्नो दौलतराव सिंदे दंडवत सुरु मया तैन व अलफ ख्वाजे मोगलखा कविजंग याजकडून नजरचा ऐवज एणें त्याजकरिता तुम्हास सरकारातून त्याचे गावगन्नाचा एवजाचे वसुलास पाठविले होते त्यासी नजरचे ऐवजाचा त्याजकडून

फडशा जाला तरी तुम्ही त्याजकडील अमलाची वहिवाट केली त्याचा हिसेब घेऊन सरकारात येणे जाणीजे छ ८ मोहरम बहुत काय लिहिणे

मोर्तब
सुद

श्री
जोति स्वरूप च
रणी तत्पर महाद
जी सुत दौलतरा
व शिंदे निरंतर

श्री

## लेखांक ११

१४।६।१७९९

श्री
जोति स्वरूप च
रणी तत्पर महाद
जी सुत दौलतरा
व शिंदे निरंत
र

अज सुभा राजश्री दौलतराव सिंदे ता। मोकदमानी देहाये व मजरे टपे रासीन सुरु सन मया तैन व अलफ ख्वाजे मोगलखा कविजंग याचे सरंजामाची जफ्ती सरकारांतुन केली होती सा। सरकारात नजर ठरून मोकळीक करून दिल्ही त्यासी नजरेचा येवजाचा फडशा झाला नाहीं याजकरितां हलीं कारकुन नारो कृष्ण माहली पाठविला आहे यासी रुजु राहुन देहाये मा।रचा आमल मा।रनीलेकडे देत जाणे जाणीजे छ ९ मोहरम मोर्तब सुद

मोर्तब
सुद

## कवीजंगाची कबर

अहमदनगर येथें जुन्या तुरुंगावरून डांगे गल्लीकडे जातांना कोंपऱ्यावर कमानी नांवाची एक मशीद आहे. ही कोणी असदखान रूमी नांवाच्या इसमानें सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत बांधिली असें म्हणतात. इ. स. १८१८ नंतर मशिदीचे आवारांतील कांहीं भाग दुरुस्त करण्यांत येऊन तेथें सरकारी दवाखाना उघडण्यांत आला; व तेथें तो नवीन रिपन हॉस्पिटल स्थापन होईपर्यंत होता. तेव्हांपासून ह्या इमारतीचा उपयोग दिवाणी तुरुंगाकडे होऊं लागला आहे.

२ कमानी मशिदीचे आवारांत मशिदीसमोर च कवीजंग नांवानें प्रसिद्ध असलेल्या नगरच्या किल्लेदाराची कबर आहे. ह्या कबरीवर चारी बाजूंस चार शिलालेख आहेत. ह्यावरून कवीजंग इ. स. १७७४ तारीख १४ मार्च ते १७७५ तारीख ३ मार्च पावेतों सुरू असलेल्या हिजरी सन ११८८ मध्यें केव्हां तरी मृत्यु पावला, असें स्पष्ट होतें.

### शिलालेख

उत्तरेकडील: =**जान ब खुदा दाद अमीरे जमान**

ह्या वेळच्या सरदारानें ( अमीरे जमान ) आपला प्राण ( जान ) ईश्वराकरितां ( ब खुदा ) दिला ( दाद ) म्ह० ईश्वरार्पण केला.

पूर्वेकडील:-**हिंमते उ दर हमा आलिम इल्म**

अर्थ:-त्याचें ( ऊं ) धैर्य (हिंमते) सर्व ( हमा ) जगामध्यें ( दर आलिम ) प्रसिद्ध ( इल्म ) आहे.

दक्षिणेकडील:—**मिश्रये तारीखे वफाताह बिश्नौ**

त्याचे मृत्यूची ( वफातशा ) तारीखेची ( तारीखे ) ओळ ( मिश्रये ) ऐक ( बिश्नौ )

पश्चिमेकडील:--**रफ्त कवीजंग जहाने करम ११८८**

अर्थ:-जगावर ( जहाने ) प्रीती करणारा ( करम ) असा कवीजंग ( कवीजंग ह्या शब्दाचा रणशूर असा हि अर्थ आहे ) गेला म्ह. मेला ( रफ्त )

टीप-ह्या खालीं ११८८ चा आंकडा दिलेला आहे तो हिजरी सनाचा द्योतक असून दक्षिणेकडील शिलालेखांत सांगितल्याप्रमाणें, 'रफ्त कवीजंग जहाने करम' ही कवीजंगाचे मृत्यूचे तारखेची ओळ होय. 'अबजत' पद्धतीनें ह्या ओळीची किंमत ११८८ ही येते.

# ११९ गोव्याचे भाषेंतील पद

( चालः—भूपती खरें तें वैभवसुख० )

तुमि किल्लेंय् सोदलें विचार किल्लोय् केलो ॥
तरि गुरूवगर देव तुम्कां मेळूचो ना पेलो ॥ ध्रु० ॥
आजले खितू हजारांवेर साधु जावून् गेले ।
तरेतरेन् उपकार त्यांणि लोकांचेर् केले ॥
त्या साधुंत येक पुण् गुरूशिवाय् जालो ना ।
गुरुशिवाय केन्नाच् मोक्षाक् कोण गैलो ना ॥
या संसारांत पुण् गुरु नास्ल्यार कांय जाता ? ।
येक अक्षर तरि पुण शिकनस्ल्यार काय येता ? ॥
गुरु नास्ल्यार कुक्कुट हाताक् । गांवूचें ना ।
गावलें च तरि तें पदराक् । रावूचें ना ।
रावूलें च तरि तें देवाक् । फांवूचें ना ।
ह्ये भाशेन जण येक मनीस गुरूचो पाग्लो ।
आस्तना लेखिना गुरूक् देखुन् तो भंग्लो ॥ तुमि० ॥ १ ॥
अवो ! धेल्लो देवान् राम म्हणुन अवताऋ ।
साप् भुर्गो अस्तना माल्ले राक्षसां थाऋ ॥
बापायूच्या उत्राक् राज्य दिलें सोडून् ऽ ।
घरदाऋय् सोडूलें धलें सामुखें रान् ऽ ॥
सांखोव समुद्राक् लांब चारशीं कोस् ऽ ।
बांदून वचुन लंकेंत घाल्लो भौ धोस् ऽ ॥
थैं आस्ले जे वायट् मार्गाक् । काप्ले ते ।
धनि केले थैंच्या राज्याक् । आप्ले ते ।
वांचेले जे जे धर्माक् । जप्ले ते ।
तो राम वशिष्टाक् सदांच पायां पडूलो ।
गुरु करून आप्ल्यापरस मान्तालो व्हडूलो ॥ तुमि ॥ २ ॥
अवतार आणि येक् तसो च जो श्रीकृष्ण् ऽ ।
हुजो पुस्कळ् गिळ्ळो ! लागुक्ता पुण् तांका उष्ण् ऽ ।
कर्तुत्वां आणि कुय् अजापांचिं भौ केलीं ।
भागवतांत व्यासान् बरोन् सगिंल तीं थेयलीं ॥
त्या कृष्णाक् पळेया सांदीपनि गुरु आस्लो ।
गुरुशेवा करून् तार्णे जगाक् वाखेलो मास्लो ॥

केदि व्हड्ली पट्टी गुरुची । सांगुं न जो ।
तशि किंमत गुरुभक्तीची । करु न जो ।
गुरु दाखैला संसार करूंक् मागे शास्त्रांत्लो ।
आणि निमार्णे मेक्ळो कर्ता ह्रि संसारात्लो ॥ ३ ॥ ध्रु ॥
आतां म्हणशी जर गुरु जगांत खैं खैं आस्ता ?
तर् समज् गुरुशिवाय् तिळा येदो ठाव नास्ता ।
तूं आफुड्शी खाशी हुंग्शी आय्कशी देखशी ।
तें सग्लें गुरु तुका शिकैत् जर तूं शिकशी
सगल्याचे वस्तुनीं गुरुचें गुरुपण भर्लां ।
वलखुंकूना देखुन् आम्चें पिशेपण उर्लां ।
निट आसून वांकडें जातां । पोंग तें ।
आज आस्ता फाल्यां नास्ता । धोंग तें ।
हांसैता ते चि रडैता । सोंग तें ।
हें सग्लें निर्मितो सगल्या जगाचो येक्लो ।
धनि असो समज् जो तोच् गुरू सगल्यांत्लो ॥ ४ ॥
ह्या गुरूक् मनाचो आमच्या मठ बांदूं या
त्या मठांत भक्ती हें चि आसन् मांडूं या ॥
बरे तरेन् आस्नार् मूर्ति बसौया गुरुची ।
गुरु सांपडच्ना अशें म्हणुन् गरज् ना जुरुंची
गुरुपुजेक सद्दां फुला खैचीं हाड्चीं ?
बरिं बास्कळ कर्मां आम्गेलीं च हीं खुंट्चीं
जाळिल्यार मीपण सग्लें । जालो धूप ।
ममतेचें निरांजन लायलें । पेट्लो दीप ।
वास्नेचें वीं च जर शिज्लें । निवेद् खूप् ।
ह्ये तरेन् गुरूची पुजा करून् जो गावलो
तो प्रसाद पळे रे **रामु** कोणा कोणाक् पावलो ? ॥ ५ ॥

सदर पद रा. राजवाडे यांस मिळालेलें आहे. शेवटच्या ओळीवरून कवी 'रामु' दिसतो. भाषेकरितां मुद्दाम दिलें आहे.

द. वा. पोतदार

## १२० गोविंदतनय-गिरि-कृत व्यंकटेशाची जयंती

ही जयन्ती कान्हूरास सांपडली. मंडळाच्या संग्रहास ठेविली आहे. कवि केव्हांचा व कोठचा तें कळण्यास साधन नाहीं.

वि. का. राजवाडे

## गर्गाचार्यकृत शकुनावति

१ हा संस्कृत ग्रंथ कान्हूर येथें सांपडला. समग्र आहे. मराठींत ज्या कित्येक प्रश्नोत्तरी शकुनवंत्या आढळतात त्या ह्या च संस्कृत ग्रंथा वरून मराठी भाषेंत उतरलेल्या आहेत. तुळशीच्या फांशावर एक, दोन, तीन, चार असे आंकडे खोदून तो फांसा तिनदा टाकावयाचा व ते आकडे एकापुढें एक जुळवून जुळलेल्या रकमेखालील उत्तर समजावयाचें. असा ह्या शकुनवंतींत शकुन बघण्याचा प्रकार आहे. या ग्रंथाचे एकंदर १७८ श्लोक आहेत. ग्रंथ मंडळाचे संग्रहास ठेविला आहे.

वि. का. राजवाडे

## १२२ पांडुरंगकृत नवा अभंगाची विनंति

१ चांदोरकर-सूचींत कोण्या पांडुरंग कवीचे नारायणरावबध वगैरे ग्रंथ नमूद केले आहेत. कान्हूर येथील अंक १ च्या वहींत ह्या कवीची नवा अभंगांची विनंति दिली आहे. आपला गुरू जो श्रीरंग त्याचा उल्लेख कवीनें पहिल्या अभंगाच्या चौथ्या कडव्यांत केला आहे. नवव्या अभंगाच्या तिसऱ्या कडव्यांत तुकोबा देहूकर यांचा उल्लेख केलेला दिसतो. तें कडवें असें:--

तूकाआश्रइ करावे श्रीरामा । तेणे भवसिमा उलंघेल ॥ ३ ॥

वि. का राजवाडे

## १२३ सिद्धपाल केसरीकृत मल्लारिमाहात्म्य

१ हा ग्रंथ कान्हूरास सांपडला. याचे एकंदर २३ अध्याय आहेत. पहिल्या अध्यायाचा शेवट असा:--

हे चरित्र मल्लारिमाहात्म । ब्रह्मांडपुराणिचे उतम ॥
तो कुबेरा चा सुत सूगम । कथा जाण सांगेल ॥ ६९ ॥

२ बाविसाव्या अध्यायाचा शेवट असाः—

तेणे वीस्वासे जेन्मलो राजकुळी आपण । वेशी कुद्रात्याचे ॥ ३७ ॥
धन्ये तो श्रीमंत कुबीरराज पिता । धन्ये धन्ये ते आंबिका माझीमाता ॥
ज्यांच्यां चरणे स्मरणे पावलों तत्वता । दाशत्व श्रीमल्लारिचें ॥ ३८ ॥
दाशत्व पावोनी सीधपाळ केशरि । मल्लारिमाहात्म समाप्त करि ॥
श्रोती सावधान होउनी आंतरि । भक्तिभावे करावे ॥ ३९ ॥
औसा ब्रह्मांडपुराणिचा ईतिहांस । श्रीमल्लारिमाहात्म बोलीला व्यास ॥
त्याचा प्रकृत-भास-सौरस । बोलिला आत्मजु कुबेराचा ॥ ४० ॥
श्री शके पधरा शते सात । पार्थीव नाम सवत्स्छरी श्रावणमासांत ॥
वद्पक्षी शुक्रवारि शेष्टीसी ग्रंथ । समाप्तीसी पावला ॥ ४१ ॥
ईति श्रीब्रह्मांडपुराणे । क्षेत्रखंडे ॥

मल्लारिमाहात्मे ॥ वर्णन मल्लारि स्वमुखवाक्योनाम ॥ द्वीशोतमोध्याये ॥ २२ ॥ ॐ स्वति श्रीशके १६८८ व्यय नाम सवछरे श्रावण ध्वे १३ त्रीयोदशी समाप्त ॥ मस्तु ॥ श्रीमल्लारिमार्तंडार्पणमस्तु ॥ श्रीदेवार्पणमस्तु ॥ छ ॥ छ ॥ ॥ श्रावण सुध्वे १ ते दिन समाप्त ॥ छ ॥ २२ ॥ २२२२२ श्रीराम जय राम जये जये राम ॥ श्रीकृष्णपर्णमस्तु ॥

३ वरील ओंव्यां वरून दिसतें कीं हा कवी जातीचा मराठा होता. याच्या बापा चें नांव कुबेर व आई चें नांव अंबा. आडनांव रुद्रांत. रुद्रांत हा शद्ब कोणत्या तरी मराठ्याच्या मराठी आडनांवा चें संस्कृत रूप आहे. कवीनें हा ग्रंथ शके १५०७ मध्यें रचिला. एकनाथ भर उमरींत असतां हा कवी झाला. काव्यांतील वर्णन बरेंच सरस आहे. पोथी मंडळाचे संग्रहास ठेविली आहे.

वि. का. राजवाडे

☞ श्री. आबासाहेब मुजुमदार यांचे संग्रहास हि याची एक प्रत आहे.-संपादक

# १२४ तांब्याच्या पत्र्यांवर खोदलेल्या मोहरपी

परवा वैशाखांत मावळांत हिंडतांना रा० शंकरराव देव यांना या तांब्याच्या पत्र्यांवर खोदलेल्या मोहरपी मिळाल्या. एकंदर पत्रे सात आहेत. पत्र्याची लांबी आठ बोटें असून रुंदी चार बोटें आहे. मोहरपीची जाळी एणेंप्रमाणें आहे:—

जाळी शिवाय या पत्र्यांत आणखी एक विशेष असा आहे कीं, सात पत्र्यांतून दोन पत्र्यांवर एक फारशी शिक्का कोरलेला आहे. तो असाः—

अहमदशाह
पादशाह गाजी

फारशी अक्षरें फारशी चालीप्रमाणें उजवीकडून डावीकडे लिहिलीं आहेत. शिक्यांत अहमदशहा पादशहा दिल्लीवाला याचें नांव आहे त्या अर्थी असें म्हणावें लागतें कीं ह्या जाळीची कल्पना मूळ अहमदशहा पादशहाच्या मनांत आली.

अहमदशहा पादशहा दिल्लीस होता. तो कधीं दक्षिणेंत आला नाहीं तेव्हां प्रश्न असा उपस्थित होतो कीं ही जाळी मावळांत आली कशी ! याला उत्तर एक च आहे तें हें कीं मराठ्यांच्या दिल्ली प्रांतांत ज्या स्वाऱ्या झाल्या त्यांतील कोणातरी मांवळांतील सरदाराला ही जाळी हस्तगत झाली असावी. ही जाळी पीतांबर, शेले, गालिचे, रेशीमकाठी-धोतरें, यांच्या काठांचें विणकाम करतांना नमुना म्हणून तयार केलेली आहे. जाळींतील सर्व फुलें रुईचीं आहेत. अर्थात् जाळी रुईफुली आहे व ती साळ्या कोष्टयांच्या व मोमिनांच्या उपयोगी पडण्या करितां केलेली होती.

वि. का. राजवाडे

## १२५ दत्तकवीकृत श्लोक

कऱ्हाड येथील पंढरपुऱ्यांच्या गळाठ्यांत खालील श्लोक सांपडले. सदर श्लोकांत कांहीं चमत्कृति असल्यामुळें मंडळास सादर केले आहेत.

एका राजाच्या राणीशीं प्रधान लागू होता तो तेथें असतां राजा आला. तेव्हां त्याला राणीनें गादीच्या वळकटींत गुंडाळून वळकटी कोंपऱ्यांत उभी केली.

तेव्हा दासीनें चतुरतेनें त्याची सुटका केली. यासंबंधी कवीनें उत्प्रेक्षा केल्या आहेत. पुढें प्रधानानें दासीस बक्षीस दिलें. सदर कागद मंडळाच्या संग्रहास ठेविला आहे.

वि. का. राजवाडे

दिनकर उदईचा पश्चमे लागि आला । मधुकर रसभावें पद्मिनी लीन जाला ॥
त्यज त्यज रसनेच्या पंकज्या दूर होई । नाहि तर क्षणमात्रे गुंतसी तूं अपाई ॥१॥
गुंडाळिल्या किमपि कापसि थर्थराटे । जाता कसे परगृही मनि हर्ष वाटे ॥
इच्छा मनातिल तुवा परिपूर्ण केली । भीतोसि का न मरता मति काय जाली ॥ २ ॥
ऐके शशी परम निर्मळ देहधारी । जाला कलंक कुटिले तुझिये शरीरी ॥
तुझाही जंवर असे नृप हा निजेला । अछादिले वदन झाकुनि लोचनाला ॥ ३ ॥
चिंता नसे भ्रमरणी भ्रमराशी जाणे । आनंदयुक्त असणे सदनासि जाणे ॥
नाही तया मरण मुक्त होइल आता । जाता निसी दिनकरे उदयासि येता ॥ ४ ॥
पाहे सखी जो गळि हार नाहीं । पाही पलंगावरि हार नाही ॥
होसील दासी जरी भाट येव्हां । आणूनि देसी तरी हार येव्हां ॥ ५ ॥
राया तु ते म्या पहिले जुहारी । शत्रु तुझे येतिल नित्य हारी ॥
मंत्री सभे येउनि बैसलासे । जोहार जोहार जोहारिलासे ॥ ६ ॥
ऐकोनिया चतुरता मग त्या प्रधाने । शाले सहीत सिरपाव दिला तयानें ॥
दासी चिये चतुरते उपमा नसे हो । दत्त प्रसिद्ध कविता वदला असे हो ॥ ७ ॥

## १२६ बाबूनाथ कवी

कऱ्हाड येथील पंढरपुऱ्यांच्या गळाठ्यांत वरील कवीचे खालील श्लोक आढळले. सदर कवी शालिवाहन शकाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत जाहला. कवीचें नांव चांदोरकरांच्या सूचींत आढळत नाहीं. कवीचा शिष्य गणेश असावा असें दिसतें. श्लोकांचें पत्र मंडळाच्या संग्रहीं ठेविलें आहे.

वि. का. राजवाडे

गुप्त रूप तें दीसतें जनीं । आत्मसुख तें कोंदलें मनीं ॥
जीवभाव तो नावरे कदां । रामचंद्रजी पाव येकदां ॥ १ ॥
रूप देखिले सांगता नये । अत्मसुख तें भोगिजे स्वये ॥
गुरुकृपा जरि होय ज्यांवरी । सहज मुक्ति तो पावला त्वरी ॥ २ ॥
सर्व जाण गा ब्रह्म ठाकलें । सर्व देखणें त्याशि खुंटलें ॥
बाबुनाथ तो सांगतो असी । गणेशा तुला सांगणें किती ॥ ३ ॥

## १२७ रामाजनार्दनकृत आरती आनंतभुजाची

कऱ्हाड येथील पंढरपुऱ्यांच्या दप्तरांत सदर आरती सांपडली. रामाजनार्दनकृत ज्ञानेश्वराची आरती प्रसिद्ध आहे. आनंतभुजाची आरती येणेंप्रमार्णेः--

आरती

आरती आनंतभुजा ॥ वीटो पढरी राजा ॥ न कळती उपराज ॥ मनु साजली पूजा ॥ आरती आनंत भुजा ॥ १ ॥ परेसी पाळ नाहीं न पड निगमा टोई भोळील्या भक्तिभावा ॥ लाहु घेतला टाई आरती आनंतभुजा ॥ २ ॥ आनुरवाच सुंध येथे उभा राहीला नट रामाजनार्दनी बाई. जोडली वीट आरती आनंत भुजा ॥ ३ ॥ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

पत्रक मंडळाच्या संग्रहास पाठविलें आहे. आरतींतील पाठभेद पाहाण्यासारखे आहेत.

वि. का. राजवाडे

## १२८ ललिताचीं पद्यें

कान्हूरास हें बाड सांपडलें. मंडळाच्या संग्रहास ठेविलें आहे. ह्यांत खालील कवींचीं पद्यें आहेत–

१ शिवदिन केसरी २ कबीर ३ रंगनाथ ४ रामदास ५ चिन्मयनाथ ६ नरहरि महीपति ७ केशव ८ गोपाळनाथ ९ दास १० कृष्णदयार्णव ११ एका जनार्दन १२ मिरा गिरधर १३ ज्ञानदेव १४ गोसावीनंदन १५ राघव नानकशा १६ राघवदास १७ माधवदास नाथ १८ माधव नारायणाचा.

वि. का. राजवाडे

## १२९ दासबाळाकृत कबीर-आख्यान

१ कान्हूर येथें सांपडलेल्या बाड अंक २ यांत दासबाळाकृत कबीरआख्यान आहे. ओंव्या ५९. शेवटील ओंवी अशीः—

दासबाळा म्हणे संदेह फीटला। सोयेरा जोडीला पांडरंगा ॥ ५९ ॥

२ या च कवीनें लिहिलेल्या उपमन्युकथेच्या १८ ओंव्या सदर बाडांत आहेत.

वि. का. राजवाडे

## १३० आनंदकृत माधवानलकथानकम्

१ हें संस्कृत कथानक कान्हूरास सांपडलें. ह्याचीं पंधरा पासून चाळीस पानें आहेत. समाप्ति अशीः—

इति श्री वियाधरभटशिष्येण आनंदाभिधानेन विरचितं माधवानलकथानकं संपूर्ण

२ या कथानकांत विक्रमार्कानें माधव नामक पुरुषाला उज्जनीचें राज्य दिल्याची कथा आहे. ग्रंथ मंडळाचे संग्रहास ठेविला आहे.

वि. का. राजवाडे

## १३१ शामसुंदरकृत अनसूयाचरित्र

प्रस्तुत ग्रंथ पारनेराजवळील कान्हूरगांवीं सांपडला. वही आहे. ग्रंथाचे एकाहून अधिक प्रसंग आहेत. किती आहेत तें नक्की सांगतां येत नाहीं. कारण, दुसऱ्या प्रसंगाच्या ६१ व्या ओंवीस ग्रंथ मध्यें च लिहावयाचा सोडून दिला आहे. प्रथम प्रसंगाची पहिली ओंवी येणें प्रमाणेः—

ॐ नमो जी येकदंता । जो सकळवियाबुद्धिदाता ॥
तो सरस्वतीसहीत आता । पादांबुजी नमीयेला ॥ १ ॥

प्रथमप्रसंगाचा शेवट येणें प्रमाणेंः—

येथुन जातील तीघे जण । ब्रह्मा–महेश–आदीनारायण ॥
शामसुंदर जिवलग म्हणे । प्रसंग यथे यक जाला ॥ ७८ ॥

शामसुंदर ह्या नांवावर चांदोरकर–सूचींत पदें असा शेरा आहे.

वही मंडळाच्या संग्रहास ठेविली आहे; व तिला कान्हूरवही अंक १ असें म्हटलें आहे.

वि. का. राजवाडे.

## १३२ लोलिंबराज व रत्नकला चरित्र

१ भारतवर्षाच्या अर्वाचीन कोशांत लोलिंबराज हा जुन्नराच्या दिवाकरभट्टनामें विद्वानाचा स्वच्छंदी पुत्र, पुढें सप्तशृंगच्या भवानीच्या आराधनानें शके १५५२त सिद्ध होऊन जुन्नरास लोकादरपात्र झाला, यानें जुन्नराच्या यवन सुभे-

दोराची कन्या मागून घेऊन रत्नकला म्हणून तिला नांव देऊन तिशीं लग्न केलें, शके १५५५ त वैद्यजीवन नांवाचा संस्कृत ग्रंथ व हरिविलासादि ग्रंथ यानें रचिले, इत्यादि माहिती आढळते.

२ श्री. गो. वा. पोतनीस उरवडेकर यांचेपासून मिळालेल्या एका बाडांत लोलिंबराज व रत्नकला यांच्या वर्णनपर व हकीकतपर श्लोक **रत्नकलाचरित्र** या नांवानें मिळाले. बाड पृष्ठ १३ वर ' लोलींबराज अख्यान' सुरू जालें आहे.

आरंभः-"श्रीगणेशायनमः प्रगट दिसत आहे सप्तशृंगि भवानि ॥ सकळ जिते ब्रह्म चिद्रुप भानि ॥ आसुरमथन केले लाविले विश्व ध्यानि ॥ आगणी गुणवानि लाल० ॥ १ ॥ सदर दौलत ताज बिची फर्ती ॥ परव दु माय मुन बिजलीमर्ता ॥ स ( ब हि ) आ सुलतान पठावणा ॥ हरत लोलींबराज बुझावणा ॥ २ ॥

३ श्लोक ११ पावेतों रत्नकलेची व्याकुळता हा विषय असोन १२ वा श्लोक हा आहे.: -

आमृतमधुर ज्याचे श्लोक भूपाल नारी ।
पडत पडत कैसे कौतुके कीर सारी ॥
हरी हृदय तो हा रूपविद्याविलासी ।
उठ सखी मजपासी आणी लोलीमकासि ॥ १२ ॥

४ 'लोलींबराज उवाच ' इ. पासून १३ ते १७ अखेर उक्त लोलिमाचे उद्गार आहेत. पुढें 'रत्नकलौवाच' असा आरंभ होऊन ३ श्लोक झाल्यावर पुढील २१ वा श्लोक लिहिलेला आहे:—

" ज्याची कीर्ती जगत्रइं प्रगटलि मंदाकिनिचे परि ।
जो येके घटकेंत शंभर नविं पद्यें विनोदें करि ॥
ज्याला कि कविपातशाह पदवि विद्वज्जनि दीधलि ।
तो हा रत्नकले तुला विनवितो लोलीमराजः कविः" ॥ २१ ॥

५ पुढें ५८ व्या श्लोकापर्यंत या आपुकमापुकांच्या विरहलीला वर्णिल्या असून लोलिंबानें " रंगो राम गृहस्थ थोर ", " भट्टाणि ", रामदीक्षितवधू",
(५२) (५४) (५५)
' भानभट भगिनी' वगैरेंना शृंगारसौख्य दिलें असें हि वर्णिलें आहे.
(५६)

६ श्लोक ५९ त 'विषय विषय कर्ता सर्व सौंसार गेला ॥ क्षणभरी परीं नाहि मुक्तीचा यत्न केला ॥ अझुणु तऱ्ही आतां कृष्ण तुं सेवि आधी ॥ अभिनव सुख पावी लाली लोलीमराजः ॥ ५९ ॥

असा विरक्तिचा उपदेश सुरू होऊन तो ७४ अखेर टिकला आहे. येथें

"इति रत्नकलाचरित्र जालें ॥

सकळां हि कवीच्या मनास आलें ॥
अमृताहुनि गोड पढावें ॥
पढवावे पुढिल्यांस प्रेमभावें ॥ ७५ ॥

असा शेरा असून लगेच पुढें संस्कृत, हिंदुस्थानी, मराठी असे मिळून श्लोकसंख्या ८५ एकंदर काव्याची बाडांत गणून

"ईति रत्नकलाचरित्र संपुर्ण" ॥

असा शेवट केला आहे. शेवटल्या म्हणजे ८५ व्या श्लोकांत "त्वरित या न गमे मज येकलें" ॥ अशी विनवणी आहे.

७ बाडांतील हे ८५ श्लोक अत्यंत गचाळ व अशुद्ध लिहिलेले आहेत. पुष्कळ श्लोक खाल्लेले दिसतात; त्या मुळें बऱ्या च जागीं अर्थ व संदर्भ संशयित आहेत. या प्रकरणाच्या अधिक प्रती मिळतील तेव्हां हे संशय मोडतील.

८ कित्येक श्लोकांत बाष्कळ चावटी आहे.

९ "दस्तुरखान मीरखान फरादखान । गालीबखान नुरखान जलालखान ॥
पोलादखान तुम्ही जावो । लोलीमराज समजावुनि शीघ्र आवे ॥ ८१ ॥
कृष्णाजिपंत हरिपंत मुरारिपंत । रुद्राजीपंत तिमाजिपंत ॥
जा जा वल्हे बहु तुम्हासि असेती आणा । लोलीमराज समजाउनि सीघ्र आणा ॥ ८२
लोलीमराज मज सांडुनीया पळाला ॥

इत्यादि उद्गार रत्नकळेचे आले आहेत. त्यांतील पुरुषांच्या नांवांवरून लोलिंबराज कोण्या यवनाच्या पदरीं होता तें कळण्याचा संभव आहे.

द. वा. पोतदार

# १३३ माधवनंदन

१ उरवडे येथील श्री. पोतनीस यांजकडील एका बाडांत सदर कवीची कांहीं स्फुट कविता–श्लोक, पदें–सांपडली. श्लोक बरे आहेत. याचा गुरू कोणी श्रीकृष्ण हा 'राघव आत्मज' होता. 'बाजीराव उदार कर्ण दुसरा विप्रास देतो धने' इ. श्लोकावरून व 'श्रीअर्याप्रभु सचिव' या सदराखालील 'पुण्यवान रघुनाथराव महाराज कृपाळु धर्म जरा ॥' या उल्लेखावरून हा रघुनाथ चिमणाजी सचिव (इ. स. १८२७ ते १८३९) यांचा आश्रित होता असें ठरतें. तो च म्हणतो "जन्मोजन्मि अम्हास स्वामि दासळु म्हि पदरिं त्याचे ॥ हे चि मागणें देवाजीला शेवक मिरवावे त्याचे ॥ राघवअत्मज नंदनमाधव भृत्य पुरातन पदरिचा ॥ जाणुनियां संरक्षण केलें स्वपुत्र जैसा उदरिचा ॥ १ ॥

३ यानें दशरथकौसल्याविवाहावर काव्य केलें आहे त्याचे अखेर हा म्हणतो:—

" इत्यादि हे लग्नकथा स्वकानें ॥ सविस्तरें अैकुनिया मनानें ॥ त्याअन्वयें श्लोक यथामतिनें ॥ केले असे माधवनंदनानें ॥ १०८ ॥ पंडित वामनकवि बहु श्रेष्ट जो किं ॥ त्या तुल्यभाव रचना न घडे च लोकिं ॥ जे धिटपाठकवि जे कवनें करिती ॥ तैसें च हे तुम्हि गणा जन लोक रिती ॥ १०७ ॥ छ. ॥"

४ या च बाडांत "श्लोक शिवाजि राजे सिन्हासनि बैसले तें सालव" या सदराखालीं असा श्लोक आहे:—

"प्रासादो जगदिश्वरस्य जगतांमानंदभानुज्ञया ॥ श्रीमत्त छत्रपते शिवस्य नृपते सिन्हासने तिष्टतं ॥ शाके शष्टव बाणभूमि गणनामानंत संवत्सरे ॥ जोतीराज मुहुर्त कीर्ति महते शुक्लेशसापेतिथौ ॥ १ ॥ शके १५९६ अनंदनाम संवत्सरे जेष्ठ शुध १३ सन संमस सबेन अलफ ॥

द. वा. पोतदार

# १३४ रामजोशीकृत सुभद्रेचा पवाडा

हारिचि० ॥ मायबापाचा श्रीकृष्णाचा विचार मोडुनि बळिदेवे ॥ दुराग्रहाने निश्चय केला सुयोधनाला मज द्यावे ॥ भाउ नव्हे ग बाई बाउच केवळ भाउनि मनात उमजावे ॥ वडिल बंधुपरि अडिल खोडकर खळाकडिल हे समजावे ॥ हंसा टाकुनि काय वायसा मुक्ताफळ ते अर्पावे ॥ ब्राह्मण ढकलुनि चांडाळाला का ह्मण जेउ घालावे ॥ जन्मातरिचा वैरिभाउ आशावरूनि हे वळखावे ॥ अपाय याला उपाय न सुचे काय करावे विष खावे ॥ दुर्योधन खळ हे मेला गेल उलथोनि पोट मरा ॥ दादाजि० ॥ १ ॥ भाउजींचा निरोप घेउनि गेला तीर्थं हिंड फीरा ॥ कोणिं जागा न कळे अहे जागा किंवा निजसुरा ॥ तडितापाडि किंवा कापाडि होउनि गेला काशिपुरा ॥ आवडिने कि कावडि नेल्या शेतुबंधरामेश्वरा ॥ गंगा यमुना तपति तुंगा कृष्णा रेवा हरिद्वारा ॥ याचा पुलिने रम्य साधुच्या मंडळिमध्यें असल खरा ॥ काटके बाई कर्नाटक व्यंकटपतिस पाहुनि करवीरा ॥ पंढरपुर भुवैकुंठाला अला हरि जन माहेरा ॥ पुंडलिकाने कान फुंकिला केला चेला संत पुरा ॥ दादा० ॥ २ ॥ किंवा अमराधीशे नेला अमरावतिला निजकुमरा ॥ तिळोत्तमा उर्वशी मेनिका रंभादिक ज्या धुराप्सरा ॥ असला सुंदर ठसला + सला भुळउनि नेला त्यानि घरा ॥ रुसला बसला घुसला जाउनि फसला तेथे खराखुरा ॥ अथवा आला असेल साधु शोधुनि सगळि प्रसुंधरा ॥ प्राणाधीक तो आणा घालुनि

आणावा वर पार्थहिरा ॥ अर्जुन घेउनि कशास कोणा गर्जुन मज भय नाहि जरा ॥ अर्जुन वर्जुन देह विसर्जुन वाटे मजला मृत्यु बरा ॥ तो बैरागी मी बैरागीण होउनि जाईन दिगांतरा ॥ दादा० ॥ ३ ॥ बहर नवतीचा कहर करितसे लहर अली + बाई धरा धरा ॥ पळपळ युगसम वाटे अरुंभवे पाहिला + वहिनी मनी स्मरा ॥ काल रात्रि म्या स्वप्न देखिले ज + णु पुजीते गौरिहारा ॥ गौरव करुनि गौरीने हा प्रसाद दिदला हारतुरा ॥ कौरवपतिला रवरव होईल बोले ऐशी दिव्यगीरा ॥ जाईल बाइल करूनि येइल ती तुजला ठिक नर नवरा ॥ यति नव्हे या वरूनि गमतो पति अर्जुनजीचा चेहरा ॥ खुणा पहाता उणा नसे तिळ कोणा सांगुन तुह्मि होरा ॥ शुभ चिन्हे ही देही सांगति **कविरायाचा** ठिक होरा ॥ दादा॥जि॥४॥

कविराय म्हणजे रामजोशी यांची वरील चटकदार लावणी राजवाड्यांचे कऱ्हाडसंग्रहांत मिळाली.

द. वा. पोतदार

## १३५ त्रुटित उखाहरण

राजवाड्यांच्या कऱ्हाडसंग्रहांत उखाहरणावरील ओंव्यांची कांहीं त्रुटित पत्रें मिळालीं. ओंव्या चांगल्या आहेत. याजवर 'संवत १६७८ चे पूर्वीचें' असा रा. राजवाडे यांचा शेरा आहे.

द. वा. पोतदार

## १३६ मातृकानिघंट

राजवाड्यांचे कऱ्हाडसंग्रहांत मातृकानिघंट नामक कोश ५२ श्लोकांचा संस्कृत मिळाला. कित्येक एकाक्षरी कोश छापलेले आहेत. हा नवीन दिसतो. नमुनाः—

"ओम् ॥ ध्रुवस्तारास्त्रिवृद्ब्रह्मवेदादिस्तारकोव्ययः ॥ प्रणवश्च त्रिमात्रोपि ॐकारो ज्योतिरादिमः " ॥ १ ॥

शेवटः—

"क्ष० ॥ संवर्त्तको नृसिंहश्च हृदयान्मुखसंस्थितः ॥ अनंतः परमात्मा च वज्रकायोंतिमः क्षकः ॥ ५२ ॥ इति श्रीमातृकानिघंट समाप्तः " ॥

द. वा. पोतदार

## १३७ सचिदानंदाचा स्वात्मबोध

सदर ग्रंथ राजवाड्यांच्या कऱ्हाडसंग्रहांतला आहे. एकंदर सहा प्रकरणें आहेत. क्रमवार ओंवीसंख्या ९९।१९८।१६२।४१।३७ आणि २६६ अशी आहे. कागद, भाषा अर्वाचीन माझ्या प्रतींत आहेत. गुरु सदानंद. विषय वेदांत. चांदोरकर-यादींत याचे नांवावर पदें व अनुभवसार दिलीं आहेत.

द. वा. पोतदार

## १३८ रामकृष्णकाव्यं

सदर ३८ श्लोकांचें संपूर्ण संस्कृत काव्य श्रीमद्दैवज्ञसूर्यपंडित यानें केलेलें व 'शके १६८५ सुभानु संवत्सरे आधीक शुद्ध षष्टि भृगुवासरे' लिहिलेलें राजवाड्यांच्या कऱ्हाडसंग्रहांत मिळालें. चित्रकाव्य आहे. विलोमरचना आहे.

द. वा. पोतदार

## १३९ सोमाजी सकलकळ्या

१ मोल्सवर्थकोशाच्या पृ. ८७१ वर हा शब्द 'चतुर' या अर्थी दिला असून कंसांत The clever Somaji expert in all the arts, Somaji was a celebrated poet अशी माहिती दिली आहे. हा सोमाजी कोण ?

द. वा. पोतदार

## १४० दाजीराव देशपांडे कोळेवाडीकर उर्फ नारायणस्वामी यांचें अभंगचरित्र

राजवाड्यांचे कऱ्हाडसंग्रहांत सदर अभंगांचीं ११ पृष्ठें मिळालीं. दाजी रामचंद्र देशपांडे नाडगोंडी देशकुळकर्णी याचा जन्म शके १७०१ श्रावण शु. ९ स झाला.

'मातेची जननी काकुबाइ नामे ॥ पत्नी शिवराम प्रतिनिधींची'. चरित्रावरून भला गृहस्थ दिसतो. महायात्रा केल्या. प्रपंच करून परमार्थ साधला. पुढें सन्यास घेतला. 'गोविंद' स्वामीनें कृतार्थ केला. यांची स्त्री भाउराव शिवदे कुडळ ग्राम-वृत्तीवंत यांची कन्या धोंडुबाई. इत्यादि कांहीं हकीकत या चरित्रांत आहे. याची जन्मभूमि कऱ्हाड दिसते. चरित्रकथा १७५१ शके पर्यंत आली आहे. विशेष कांहीं नाहीं.

द. वा. पोतदार

## १४१ कृष्णलीलेची एक लावणी

### ( वरधानगडकराची )

राजवाडे-कऱ्हाडसंग्रह-बाडांत गोपीवस्त्रहरणावर एक शृंगारिक लावणी आहे. सुरवात 'सात पांच गोकुळ मदरी' इ. अशी असून शेवट येणेंप्रमाणें:— "मोरसीग दीनकर वरधानगडचा गावन घ्या तुम्ही गोपाळा गुरुकृपन सदामत वाली: आजेब सालकारी ॥ ६ ॥"

वरधानगड कोरेगांवापासोन तीन कोसांवर आहे.

द. वा. पोतदार

## १४२ गोपीनाथकवीचा नारळीप्रसाद

पुढील 'नारळीप्रसाद' ह. भ. प. वाडेकर बुवा यांचे तोंडून लोहगडीं नुकता च ऐकला. अप्रसिद्ध वाटल्यावरून देत आहे. कवी गोपीनाथ सूचींत नाहीं. तो शिवदिनाचा शिष्य दिसतो. पद येणेंप्रमाणें:–

शुकसनकादिक भक्ति पंक्ति घ्या ध्रुवनारदउद्धवा ॥ ध्रु० ॥
लवणशाकशाकाकोशींबिरिसांबारे सैंधवा ॥
वरणभातघृतपुरणपोळिया उष्ण उष्ण ही जेवा ॥
दुधमांडे फेण्या तुपसाखर खिरिमध्यें कालवा ॥ १ ॥ ध्रु० ॥
पापडवडे कुर्डया पापड्या कानवला सा देवा ॥
अनारसे गुळवरिया जिलब्या घीवर ना चाखावा ॥
मुगदळदळियाबुंदिलाडुतें शिरापुरी मिळवा ॥ २ ॥ ध्रु० ॥

केळी नारळ दाळिंब अंजिरं फणस गन्याचा खावा ॥
द्राक्ष जांभ जांबुळ आंबा रसाळ चोखावा ॥
बदाम पिस्ते आणी अक्रोड विलायचिचा मेवा ॥ ३ ॥ ध्रु० ॥
खारिक खजुर खवा दह्याशी बर्फी पेढा खावा ॥
चतुर्विध पक्वान्नं पदार्थ सावकाश भक्षावा ॥
**गोपीनाथ** शिवदीनकृपेने प्रसाद कांहीं ठेवा ॥ ४ ॥ ध्रु०

द. वा. पोतदार

## १४३ श्रीधरकृत उखाहरण

१ राजवाड्यांच्या कऱ्हाडसंग्रहांतील एका बाडांत प्रथम च श्रीधरकृत उखाहरण त्रुटित आहे. उत्तरभाग आहे म्हणजे ११ व्या पद्यापासून अखेरपर्यंत म्हणजे पद्य ३० पर्यंत कवन बाडांत आहे.

२ कवनाचा छंद कळत नाहीं. दर पद्याला ४ सयमक चरण व नंतर शेवटचा भिन्नान्तक चरण अशी रचना आहे. शेवट च पहाः–

निरोप घेऊनी कै(ला)सा गेला सिव ॥ वोवरासहीत यादवरावः
आला थोर जाहला म्हाउछाव ॥ **श्रीधरस्वामी** करी ब्रह्म सर्व ॥
यापीला सलास आभग रीता नाही कुठे ॥ ३० ॥

३ आणखी एक पद्य देतोंः—

बंदी वान घातला मदनसुत ॥ ईकड द्वारकेसी काये जाहली मात ॥ रतिरुक्मीनी परदुम्न सोक करीत ॥ नारद जाउंनी तयास करी सुर्त दळभारासहीत धावत आला यादवराना ॥ २६ ॥

४ बाड अत्यंत गचाळ लिहिलें आहे.

द. वा. पोतदार

## १४४ बहिणाबाईंची गुरुपरंपरा

१ दीनकविकृत पंचीकरणाच्या शेवटच्या म्हणजे १८ व्या अध्यायांत कवीनें आपली परंपरा दिली आहे. ती अनेक दृष्टींनीं महत्त्वाची असल्यामुळें पुढें उतरून घेतोंः–

"वशंपरंपरेचे खुण ।। बोल बाप आवडीन ।। बहीणाबायी निजनिधान ।। तुझें जीवन तेंची तें ॥ ११ ॥ जी जी म्हणोनि प्रसाद । दीन जाला सगद्गद ।। वंशपरंपरा रस वीद्रद । बोध अभेद ब्रह्मत्वीं । १२।। कव्हणी येके वेंळी ॥ कैलासभुवनी चंद्रमौळी ॥ सभा घनवटली मेंळी ॥ देव सीद्ध गंधर्वेंसी ॥ १३ ॥ नामे उमा जगत्रजननी ॥ पाहे सभा नीरखुनी ॥ तवं देव गंधर्व मुनी ॥ जाले ध्यानी तटस्त ॥ १४ ॥ मुरडोनी पाहे शंकरा ॥ पंचवगत्र दीगंबरा ॥ च्यारी वदनें समाधी सेजारा ॥ देखीली इतरां सारीखी ॥ १५ ॥ पांचवें मुख पाहे ॥ तयाची अ + + + ये ॥ हें देखोनी नीवांत होये ॥ उदोनाथ जगदंबा ॥ १६ ॥ + + ( ध्यान ? ) वीसर्जी मदनारी ।। उमा उभी जोडलां करीं ।। कोण मंत्रजपाची परी ।। ते त्रीपुरारी मज सांग ॥ १७ ॥ पाचारुनी पुष्प( क ) वीमान ॥ पार्वती सहीत कैलासराणा ॥ क्षीरसींधुचया स्छाना ॥ पैलतीरा उत्तरले ॥ १८ ॥ पुढें बैसउनी पार्वती ॥ राममंत्रा उपदेसीती ॥ ज्ञानशक्ती प्रवेषगती ॥ आत्मारामीं मीळावया ॥ १९ ॥ अलक्ष मुद्रा आदीनाथा ।। तें चि ते उदोनाथा ।। तये संधी मछेंद्रनाथा गोरक्षनाथा ॥ तो बोधु ॥२०॥ समाधीधन जें संचलें॥ अलक्षलक्षें अपार भरलें ॥ तें स्वता ती पत्र दीधलें ॥ आदीनाथ मुद्रेनसीं ॥ २१ ॥ गोरक्ष गैनीनाथा दावी ॥ गैनी नीवृतीनाथा बोधवी ।। नीवृती ज्ञाननाथा खुणावी ॥ हें घे हें म्हणउनी ॥ २२ ॥ ज्ञान दीनमणी डोळस ।। नाहीं तमाचा जेथ लेश ॥ नीवृती वृतीग्रास ॥ पुर्ण ज्ञानास बोळला ॥ २३ ॥ निवृती चिदाकाशगहन ॥ ज्ञानसुर्यें स्वप्रकाशमान ॥ उदयेअस्तु ग्रासुन ॥ प्रकाश पुर्ण पुर्णत्वीं ॥ २४ ॥ ज्ञाननाथ स्वरुपांबरीं ॥ बाबा सींधुतें पुर्ण भरी ।। ब्रह्मानंदलहरी ।। वेळोवेळां उचंबळे ॥ २५ ।। वीस्वनाथ योगीराया ॥ बाबा सींधु दे आपण यां ।। तेणें वोतप्रोत भरुनीयां ।। शुद्ध स्व + + संचलें ।। २६ ।। शुद्धचैतन्यी चैतन्यघन ॥ राघो चैतन्ये + + + ण ।। वीस्वनाथ योगीरायानें ।। पूर्ण स्वरुपानंद भरी ॥ २७ ॥ राघो चैतन्यें भरी ॥ केसो चैतन्ये पुर्ण लहरी ॥ बाबा चैतन्या परी ।। ते ची ते लाधली ॥ २८ ।। बाबा चैतन्ये चैतन्यरूप ॥ तुकोबा तो त्याचा दीप ।। ज्याच्या वचनाचा प्रताप ॥ ब्रह्मरुप जीव होये ।। २९ ॥ बाप जयाची ने वाणी ॥ वदे वेदार्थनिरोपणी ।। बहीणाबायीचया ध्यानी ।। ते यी मुर्ति ठसावली ।। ३० ध्यानसुखें सुखावला ।। येउनी पुढें उभा ठेला ।। तेणें राममंत्र दीधला ।। जो आला परंपरे ॥३१॥ अलक्षलक्ष अपार।।केला स्वरुपसाक्षात्कार ॥ जें कां वेदाचें निजसार ॥ समाधी गंव्हर आदीनांथी ।। ३२ ।। लक्षेंवीण लक्षीजे ।। रुपेंवीण देखीजे ॥ आदीअंत नेणीजे ॥ सोये जयाची ॥ ३३ ॥ गंगादी सकळ नद्याला ।। ठाव जैसा सींधु जाला ।। तेवी अशेष ही योगाला ।। ठाव जाला मम स्वामी ॥३४॥ सींधुजळाची मवणी ॥ कोण करिता असे अवनी ।। तेवी योगाब्जनी ॥

सरोवर बहेणी सद्गुरु ॥ ३५ ॥ अनंत जन्मींचिं साधनें ॥ तें मज जालीं उत्तीर्णे ॥ पावन जालों दर्शनें ॥ स्पर्शेणें स्वामीच्या ॥ ३६ ॥ सकरुणु ज्ञानदानी ॥ केवळ चिन्मयरत्नाची खाणी ॥ करी बाळपणीं+ ॥ अंगीकारु दीनाचा ॥ ३०॥ वर ++ ना भीसी ॥ दीन रक्षी पायांपांसी ॥ नामजप अहीर्णेसी ॥ नेणें देवासी दुजया॥३८ ॥ नाही देव उपासना ॥ नेणें ध्यानयोगसाधना ॥ बाइ राचुनीयां मना ॥ नावडे जाणा आणीक ॥३९॥ तवं यात्रा पंढरीची आली ॥ आज्ञा **समर्थांची** झाला ॥ मूर्ती वीठोचि देखीली ॥ तेथ जाली झडपणी ॥ ४० ॥ येउनी जडला आंगेंसीं ॥ बुडवील प्रपंचासी ॥ चीरा पडीला लोकलाजेसी ॥ माताजीतयासी अती दुख ॥ ४१ ॥ पुर्व प्रारब्धाचि गती ॥ पीता बळें व्यापार करवीती ॥ येणें जालें पुणयाप्रती ॥ तेथें अपुर्व वर्तलें ॥ ४२ ॥ येक दुर्बळ ब्राह्मण ॥ करी ज्ञानेस्वरीचें पारायेण ॥ त्यातें अध्याय मागुन ॥ नित्य पठण होतसे ॥ ४३ ॥ येको वीष्णु महद्भुत ॥ लागलें देखोनी ज्ञाननाथ ॥ त्यामाजी आपण प्रवेशत ॥ बुडाला हेत आठवा ॥ ४४ ॥ येक होतें दोन्ही जाली ॥ शेखी लंगोटी दीधली ॥ पुढें आज्ञा केली ॥ जावें भेटी बाइच्या ॥ ४६ ॥ भेटी होतां बाइचि ॥ म्हणती झडपणी महद्भुतांची ॥ जाली असे आतां याची ॥ सुटीका केवीं होये ॥ ४७ ॥ आतां सांगीजे वीचारास ॥ त्याचा कीजे अभ्यास ॥ तरी कांहींयेक खु(खास) ॥ पावसी बापा ॥ ४७ ॥ कांहीं त्याचा अभ्यास करीं ॥ + + तरीचें व्यापे बाहेरी ॥ नवल अनुग्रहाची परी ॥ जालें आनें आन ॥ ८८ ॥ भये होतें तें गेलें॥ मीपणाचें भान उडालें ॥ होतें परंपरे जें आलें ॥ तें कोंदाटलें अंतर्बाह्ये ॥ ४९ तें झाडि-तां न झडे ॥ अखंड उभें मागें पुढें ॥ रूपेंवीण अरुप गाढें ॥ सद्ट दाटे सघन ॥ ५० ॥ असो हे अनुभवाची बोल ॥ बहेणाबाइ सद्गुरु सखोल॥ ऐकोनी संतां येती डोल ॥ बोबडे बोल हे माझे ॥ ५१ ॥ श्रीपांडुरंग कृपादानी ॥ तेणें जाली ग्रंथा उभारणी ॥ मुमुक्षाची पुरे धणी ॥ ग्रंथ वीचारुनी पाहातां ॥ ५२ ॥ सद्गुरु-मुखें उकल ॥ ग्रंथ पाहातां सखोल ॥ तेणें साधकां होयील ॥ महालाभ निजरुपीं ॥ ५३ ॥ नमो ज्ञाननाथ ज्ञानरुपा ॥ नमो पांडुरंगा सस्वरुपा ॥ नमो बहेणाबायी सद्गुरुबापा ॥ वचन अक्षेपा चीत दीजे ॥ ५४ ॥ जाला ग्रंथाचा कळस ॥ तुमच्या कृपेचा सोरस ॥ तरी बोलीजे का वरास ॥ जेणें सर्वांस फळीतार्थ ॥५५॥ हो कां भावीक भजनाचे ॥ जे जी वाटेकरी मोक्षाचे ॥ अथवा कीचीत् भावाचे ॥ ते ही श्रवणें सुखी होतु ॥ ५६ नींदक भेदक वादक ॥ तें ही आम्हा गुरुरुपक ॥ त्यातें ही हा बोध सम्यक ॥ मोक्षरुप +++ फळे ॥ ५७ ॥ ऐकोनीयां दीनवाणीं॥ हो म्हणती पुर्ण +++ ॥ आनंद दाटुनी मनी ॥ जाली पुरवणी ग्रंथाची ॥५८ ॥ वर जाला ग्रंथासी ॥ हा पुरवील मनोरथासी ॥ साधकें जीवभावेंसी ॥ नित्य पठणासी करावें ॥ ५९ ॥ अनुताप बाया मनीं ॥ कृपा उपजली तया वचनी ॥

माहादेवाचीया ध्यानी ॥ पंचीकरण पाहावें ॥ ६० ॥ तत्वमसी माहावाक्यांचा ॥ उकलु दावी जो जी त्याचा ॥ जेणें या जीवाचा ॥ संदेह नीरसे समुळीं ॥६१ ॥ माझीया नीजरुपाची भेटी ॥ होआवी ऐसी आवडी पोटीं ॥ तया कारण हे गांठी ॥ जीवीची आजी सुटली ॥ ६२ ॥ उभयेताचा ऐसा हेत ॥ परी बहुतांचया उपेगा येत ॥ भावीकांचा पुरवीत ॥ मनोरथ श्रीगुरु ॥६३॥ शके सोळार्शे बावन ॥ साधारण संवत्छरीं जाण ॥ रुष्णा पंचक्रोशी स्छान ॥ चंदनगीरी तळवटी ॥ ६४ ॥ उत्तरतीर कृष्णेचें ॥ जालें लेखन ग्रंथाचें ॥ हें तव सद्गुरुरुपेचें ॥ वैभव साचें जाणिजे ॥ ६५ ॥ अक्षरें हे पुष्पें करुनी ॥ पूजा सद्गुरुची सारुनी ॥ ग्रंथ हा पांडुरंगचरणीं ॥ अर्पण करुनी मने वाचा ॥ ६६ ॥ +++ नारा अभंगाला ॥ सद्गुरुने निमीत्य केला ॥ प्री + पावो ज्याचें तयाला ॥ कळसु जाला संपूर्ण ॥ ६७ ॥ ७४ ॥ इती श्री पंचीकरणमहावाक्ये अष्टादशप्रकरणा संपूर्णमस्तु ॥ १८ ॥ श्रीगुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु

( वर ओंव्यांत जेथें फुल्या दिल्या आहेत तेवढीं अक्षरें जळून गेलीं आहेत. )

बहिणाबाईचे कवितांचा भाग १ यांत पृष्ठ २ वर शुद्ध बहिणाबाईनीं च आपली गुरुपरंपरा दिली आहे. ती जवळ जवळ अशी च आहे. व यावरून बहिणाबाई तुकारामानुग्रहीत होत्या हें च खरें दिसतें. जवळ जवळ म्हणण्याचें कारण दीनानें आदीनाथानंतर उदोनाथ असें नांव ज्यास्त दिलें आहे. हें फार महत्त्वाचें असून त्याचा विस्तार मी स्वतंत्रपणें लवकर च करणार आहे. शिवाय जेथें बहिणाबाई सच्चिदानंदबाबाचें नांव देत्ये तेथें दीन "बाबा सीधु" असें नांव देतो. दोन्ही बहुधा एका च व्यक्तीचीं नामरूपें दिसतात. नंतर विश्वंभर या बहिणाबाईच्या यादींतील नांवाचे जागीं "वीस्वनाथ यौगीराया" चें नांव आहे. तीं हि एक च असावींत. विस्वनाथ यौगिरायानंतर दीनाचे यादींत शुद्धचैतन्य अशीं पदें आलीं आहेत तीं नामदर्शक मानावीं कीं काय अशी शंका येते. मानल्यास दीनाचे यादींत एक नांव अधिक येईल.

बहिणाबाईचा व समर्थांचा संबंध असेल किंवा नसेल; ज्ञानेश्वरांचे संप्रदायांतील तुकारामाकडून बाहिणाबाईस अनुग्रह मिळाला होता या गोष्टीस हा स्वतंत्र पुरावा आज मिळाला आहे. दीनाच्या उपर्युद्धृत ४० व्या ओंवींत समर्थ शब्द आहे. त्याच्यावरून कांहीं च निश्चित अनुमान करितां येत नाहीं. त्याचप्रमाणें दीनाच्या वरील ओंव्यांपैकीं ६० व्या ओंवीचा अर्थ समजत नाहीं.

या पोथींत प्रायः जरूर त्या स्थानीं वेलांट्या व मात्रा यांवरील अनुस्वार त्यांवर न देतां त्यांमागें दिलेले आहेत.

द. वा. पोतदार

## १४५ मध्वनाथकृत कृष्णजन्म

राजवाड्यांचे कन्हाडसंग्रहांतील एका बाडांत ५४ ओव्यांचें मध्वनाथकृत एक चटकदार प्रकरण 'कृष्ण जन्म' म्हणून मिळालें.

आरंभ असाः—

"कृष्ण देवकीचा बाळ ॥ जो का आठवा गोपाळ ॥ होईल कंसासी काळ ॥ मुनि बोल जी ॥ सुखं डोल जी ॥ १ ॥". सर्व ओंव्यांना ही 'जी जी' आहे.

शेवटः—"श्रुतिवाक्याचा आर्थ ॥ गुरुकृपा समर्थ ॥ चरणरजे **मध्वनाथ** ॥ वदे प्रेम जी ॥ कृष्णजन्म जी ॥ ५४ ॥ ईती श्रीकृष्णजेन्म संपुर्णमस्तु ॥ श्रीगुरुनथे ॥"

काव्य अत्यंत चटका लावणारें असून अवश्य छापण्याजोगें आहे.

द. वा. पोतदार

## १४६ सायंदेववंशज साकरे कृत "अनुसैय अख्यान"

राज्वाड्यांच्या कन्हाडसंग्रहांत वरील श्लोकबद्ध आख्यानाचा कागद सांपडला, त्रुटित एक पान आहे. त्यांत श्लोक २४पूर्ण व २५चा आरंभ आहे. आरंभ "आा मोरया येकदंता अनंता" असा असून ५ व ७ श्लोकांवरून कवीची ख्यिाांत दिलेली माहिती लागते. सदर कागद अशुद्ध लिहिलेला आहे. कविता किरकोळ च आहे. काव्य शें सवाशें वर्षांतलें दिसतें. गुरुचरित्रकार सरस्वती-गंगाधर हे सायंदेवाचे वंशज. सांप्रत सायंदेवाचे वंशज कडगंचीस-उत्तरकांचीस आहेत.

द. वा. पोतदार

## १४७ गणेशदासकृत भूचंद्राख्यान

राजवाड्यांच्या रा. बाबुअण्णा देव यांजकडील कन्हाडसंग्रहांत च हें हि मिळालें. दोन वह्रीपृष्टें व एक दुचोटी चिठी यांवर लिहिलेलें आहे. ओंवीसंख्या ४८ आहे. आरंभः—"पद्मावती पतिव्रता ॥ सत्यवादी धर्मरता ॥ इछाभुक्ति अतीता ॥ देता मन न धाये ॥ १ ॥"

शेवटः—"गणशदासाचे माहेर ॥ जाणे तो चि धन्य नर ॥ अनुसंधानी तत्पर ॥ निरंतर लक्षांशी ॥४८॥छ॥ इति भूचंद्र अख्यान समाप्ताः ॥छ॥ कींकरू (1)"

यांत राजा भूचंद्र, त्याची पत्नी पद्मावती व पुत्र विनायक यांची कसोटी गजाननानें पाहिली आहे. चांदोरकरी यादींत पृ. २६ वर गणेशदास गणेशगीताकार दिला आहे. तो च हा काय ?

द. वा. पोतदार

## १४८ लावनी

॥ मुत्ळपेटनीवासनी : आली कराडाला ॥ मग वचेन बोलली आनीया ब्राह्मनाला ॥ छ ॥ हे कराड क्षेत्र आद हाये वो ठान ॥ तेथ कृष्णकोयेनचा सगंम होउन : सगंमात गरुडानी घातल आसन : तेथ गरुडतेर्थ नाव तेथ पावुन ॥ त्या स्तथळी पावकेस्वार घ्या अयीकोन : त्याच्या वरतं अदेस्वराच आहे हो ठान : ह्या कृष्णचा रथ दीसंतो शोभाईमान : तीचे काटी राहीला नरसीया ब्राह्मन ॥ बारा वरसा कन्यागत हो येउन : ह्या कृष्णबाईला भागीरती भेटुन : अल अवघ नगरच लोक तेथ मीळुन : त्या संगमामदी स्णन त्यानी करुन : गद धूप दीप अरती नवे( द ) घेउन : हो कमळेस्वर भाव त्यांनी पुजीला ॥ मग चालल गनपती पुजायाला ॥ १ ॥ गद धुप दीप आरती नवेद वाहुन : दुरवा हे पुस्व मुगुटावर वाहुन : त्या गज्याननाच केल त्यानी पुजेन : मग नुरताबोबीचे येसीपासी येउन : त्या दईनीवारनीचं घेतल दरसेन : तीन दईत्याच हो मरदन करुन : तीथीला महीमा घ्यावा तुम्ही आईकुन : राज्या दसेरताची पाप गेली हारुनः दीस अगासीवाचा डोंगर सोभायेमान : अईसी उजवी प्रदक्षेना अवघ्यानी करुन : मग बीस्तरवारापेटत येउन : दोनी मनुर बरोबर गेल लागोन : भला भला कारागिर हो आईसा ह्मन : त्यानी मसुद उतरली अजेब तमाशान : तीला रैईशाचेवडा चीरा हो बसउन : त्या वरत तीन मास त्यानी काढुन : तीमाशाचा हो डोळा योक केला : मोटी सोबा येती हाय त्या मनोन्याला ॥ २ धने धने असी कराडे नगरी : तेथ सुकाळ वासुदेव राजे हो करी : त्यानी चार भुजा मावच्या लावल्या हो भारी : त्यानी अवघ्या भुलीवल्या नगरच्या हो नारी : अल धाउन मधुरउन तेथ हारी : त्या सुकाळ राज्या सग येउधे करी : त्यो सुकाळ वासुदेव वधला कुरणतीरी : त्याचा पुत्र भद्रपटी त्यानी बसवीला : अईसा वईसमंपायेनु सागतो भारताला ॥३॥ अईसा हो सुकाळ वासुदेव मारून : त्यानी कुरणतीरी हो घातल असन : नाव पडरीनाथ वीठल पाउन : धने धने आईस कराड नग(र) म्हन : त्येथ नादत होता आनय, ब्राह्मन : त्यानी आचारचें धरर्म फार फार पाल्लुन : त्याच्या वाड्यामधी येक

वीहीर आहे दारून : त्या वीहीरीला होत साबाच झाकन : आंगासीवी धोत(त्यानी वात्ळउन : दूा गावावरत्या चवक्या हो बैसउन : कोन्हा येउ दीना नरा मानवाला। मोटा भारी वीटा(ळ) होईल आम्हाला ॥ ४ ॥ आस पुने त्याच भारी होऊन ; तेथ नारदस्वामी ब्रह्मपुत्र येउन : त्या बारवचे काटी उभा राहुन : तेथ राज्याच हो आल दुत धाउन : ते गैल माघार नारदाला पाहुन : मग दुत बोलती राज्याला वचेन : कोन ब्राह्मन हीरीचे काटी हो येउन : त्या बारवचे काटी करी गाईन : आला ब्रह्मच्ययारी लगोटी लेउंन : त्यानी हातामधी ब्रह्मवीना घेउन : त्या बारवचे काटी करी गाईन : आस दुत रायाला बोलती वचेन : आस हो दुताच वचेन अईकुन : मग राजा दुताला बोलोतो परतुन : तुम्ही सेन गाईच गोमत्र[१]घेउन : त्या ब्राह्मनाच्या आगावर सींपोन : त्याला लावा चवकीचे बाहीर पीटउन : ईतक हे दुतानी वचेन आईकुन : अल सेन गाईच गोमत्र घेउन : त्या ब्राह्मनाच्या आगावर सींपोन : त्यो नारद चवकीचे बाहीर पीटवीला : हो मचकु (?)कत्ळली मग त्या भोवानीला ॥ ५ ॥ आईसी नारदाची वारता हो अईकोन : गाव अउदं नगर हाये तीच ठान : त्या कराड हो नगराला येउन : त्या बारवचे काटी हो बैसुन : तेथ राज्याच हो दुत अल धाउन : ते गेल माघार मातला पाहुन : मग दुत राज्याला बोलती वचेन : कोन नार सुंदर आली हाये हो ह्मन : त्या बारवचे काटी हो बैसुन : तीचं रुप फार फार दीस्त हाये लावने : कंपात्ळी कुंकवाची चीरी लेहुन : तिच्या मुखामधी गेल पान रगुन : ती अवघ्या पान्यामंधी हो तुकोन : तीन तावडलाल पानी टाकल करुन : डाव्या हातामदी तातो हो घेउन : दोन पान्यामदी पाये तीन सोडून : असा दुत फोलती आनया ब्राह्मनाला : मग राजा धाउन हीरीचे काटी अला ॥ ६ ॥ मग राजा मातला बोलोतो वचेन : तु कोनाची ग हीत अलीस कोठोन : आह्मी यातीच ग आहेत ब्राह्मन : मोठा वीटात्ळ आम्हाला भारी हो करुन : दुर दुर दुर दुर वेगी झडकर ह्मन : मग मुत्ळमाया हो भोवानी उठोन : ती चालली आपल्या मारगान : मग राजा दुतासी बोलतो परतुन : धरा धरा आना र सुंदर या घेउन : मग अनया ब्राह्मन : राजा हो उठोन : त्या भोवानीचे पाठी हो लागुन : मग दोघ जन त्या मुत्ळपेठा जाउन : ह्याच्या डोईवर पेड्याची घागर देउन : मेड्याच सीर दील त्याच्या तात कापुन : त्याला आदमाया हो बोलती वचेन : पाहे पाहे आनया ब्राह्मना र म्हन : तेव्हा अनया हात जोडोनी उभा राहीला : त्या भोवानीच्या चरनाला लागला ॥ ९ ॥ आसा आनया ब्राह्मनाचा गर्व हारुन : त्या कराड हो क्षेत्राला येउन : तेथ लक्ष्मी आवतार घेउन : धने धने अैस करडनगर ह्मन : तेथ नाईकु धनापा गेल नामी रगुन : गुरु कबत्ळेस्वर झाल त्याला प्रसंन : आज्ञन महेस्वर बोल त्यासी वचेन : मी तुमच लेकरु न्हाहो

---

१ नकट्या रावळाची विहीर २=थारोळें

सभाल्लुन : मज मथीमुडाचा घ्या परवता अईकुन : गुरु नागनात प्रसंन जाल त्याला : कवी मन्मथ सीवलींग बारसीत रंगेला ॥ ९ ॥ ६

चांदोरकरी यादींत पृ. ७२ वर मन्मथ शिवलिंगाचा निर्देश आहे. वरील लावणीवरून त्यांचे गुरु नागनाथ हें निश्चित. शिवाय ते बारशींतले राहणारे होते असें वरील उल्लेखावरून दिसतें. त्यावरून अर्वाचीन कोशकार वृद्ध माहितीवरून म्हणतात तसे ते लिंगायतधर्मी असतील. मन्मथ शिवलिंगाचा एक फटका श्री० मुजूमदार यांचे संग्रहांत आहे.

सदर लावणींत उल्लेखिलेलीं कंचेश्वर, मनोरे, जंगी विहीर, आगाशीवाचा डोंगर वगैरे स्थळें अद्याप कऱ्हाडांत आहेत. तुरताबीबीची वेस शनवारपेठेंत आहे. मनोरे इ. स. १५५७ ते १५८० या काळांतले आहेत ( Satara Gazetteer ). अर्थात् हें काव्य तदनंतरचें आहे.

या लावणींतील हकीकत मौजेची आहे. भाषा कुणबाऊ आहे.

यांत उल्लेखिलेला धनपा नाइक व अनाया ब्राह्मण हे कोण ?

हरिवंशाच्या भविष्यपर्वांत ९१ ते १०१ अध्यायांत 'तोतया' वासुदेवाच्या वधाची कथा आहे. लावणीकाराचा वासुदेव हा च असेल काय ?

द. वा. पोतदार

## १४९ दीनकविकृत पंचीकरण

उरवडे येथील श्री. पोतनीस यांच्या संग्रहांत दीनकविकृत पंचीकरण महावाक्य ओंवीबद्ध सांपडलें. ग्रंथाचीं अठरा प्रकरणें आहेत. ग्रंथ बऱ्यापैकीं आहे. कवि प्रसिद्ध तुकारामबोवांच्या अनुग्रहीत बहिणाबाईचा शिष्य आहे. ग्रंथाचे शेवटीं कालस्थलदर्शक पुढील ओंव्या आढळल्याः—

शके सोळाशें बावन । साधारण संवत्छरीं जाण । कृष्णा पंचक्रोशी स्थान । चंदनगिरी तळवटीं ॥ ६४ ॥ उत्तर तीर कृष्णेचें ॥ जालें लेखन ग्रंथाचें ॥ हें तव सद्गुरुकृपेचें ॥ वैभव साचें जाणिजे ॥ ६५ ॥

तुकारामानुग्रहीत शिऊरकर बहिणाबाईचा काळ शके १६२२ त झाला ह्यावरून वरील शक संभवनीय दिसतो.

ग्रंथ गुरुशिष्यसंवादात्मक असून ज्ञानेश्वरीची छटा ग्रंथांत कचित् उमटली आहे. पुढील ओंव्या पहाः—

नमो साधु सज्जनासी । जे परब्रह्मीचे मीरासी । जे कैवल्यसुखाची रासी । नमन पायांसी तयांच्या ॥ १३ ॥ जे निर्विकल्पाचे सागर ॥ जे वीवेकाचे आगर॥

जे अनाथाचे माहेर ॥ पूर्णपणे जे ॥ १४ ॥ जे कारुण्याचे वोतले ॥ जे मूर्ते- दयाघन संचले ॥ जे अहिंसेसी जाले ॥ माहियेर ॥ १५ ॥ जे अमानित्वादी वोतीवं ॥ जे अभयसंशुद्धीचे घडीवं ॥ किंबहुना स्वभाव ॥ चैतन्याचे ॥ १६ ॥

ग्रंथांत गुरुपरंपरा दिली आहे. त्यावर स्वतंत्र टांचण केलें आहे.

द. वा. पोतदार

## १५० अलमखान गुरु नागेश्वर

मिरीकर बाडांक २ मध्यें अलमखान कृत कांहीं कविता आहे. अलमखान केव्हां होऊन गेला हें समजत नाहीं. परंतु सदर बाड सुमारें १५० वर्षां पूर्वी लिहिलेलें असावें असा अंदाज आहे त्यावरून तत्पूर्वीचा हा कवि असावा. याचा गुरु नागेश्वर हा कोण असावा ? याच्या कवितेचा मासला खालीं देत आहे.

जननीजठरापोटी : येतां जातां जालो कस्टी
जन्ममरणासी नव्हे तुटी रे मना : ॥ १ ॥
आत्मज्ञानावीण कांहीं : अणीक साधन नाही
निजतत्व जाणुनियां राहीं रे मना ॥ ध्रु० ॥
लक्षे चौऱ्यासीचें फेरी : नाना योनी भोगिल्या जरि :
तें दुःख तुज नाठवे अंतरीं रे मना ॥ २ ॥
दृश्य द्रष्टा दरुषणः त्रीपुटी तेथें होय छीनः
नेटीं बोटीला वीस्वरूपी अनुसंधानः रे मना ॥ ३ ॥
असाध तें साधियेलें: अभास तें भासलें
अलक्षे तें लक्षसी आलें: रे मना ॥ ४ ॥
झेप्तीचा अंत पुरे: त्याप्रतें दावीलें नागेश्वरें:
**अलमखान** उरउरीत उरे: रे मना ॥ ५ ॥

श्लोक

आवो शारदे जननी वेदमाताः तुज्य स्मरण कीर्तणी गीत गाता
अलमखान म्हण अरंभासि येईः अपुलें रुपेचें मजला प्रेम देई ॥ १ ॥

पद

मन हा बहुरंगीः चाळक तिहीं जगीः ॥ ध्रु० ॥
संकल्प विकल्प करी मनः चेष्टवि विषयालागीं ॥ १ ॥
मन छळले सिद्ध सन्यासीः नाथपंथी मुनि योगी ॥ २ ॥
ब्रह्म विष्णु महेश्वरः नाचती ममासंगी ॥ ३ ॥

मन अपणाते प्रतुनी पाहिलें: मग झाला वैरागी ॥ ४ ॥
**अलमखान** म्हणे विनती ऐक मना गुरुचरणी लाग वेगी ॥ ५ ॥

गं. ना. मुजुमदार

## १५१ मोरेश्वरसुत काशी

वे. रा. सखारामभट जोशी नेवासेकर यांजकडील एका बाडांत मोरेश्वरसुत काशी यानें केलेली चंद्राची आरती आढळली. सदरहु बाड सुमारें १०० वर्षांपूर्वी लिहिलें असावें असा अंदाज आहे. आरती येणेंप्रों—

सुरा आधी सूरि क्षिरसिंधु मथिला । मंद्राचळ रवि दोर वासुकिचा केला ॥ चौदा रत्नामध्यें सीतळ संभवला । भाळी श्रीशंभूने प्रीतीनें धरिला ॥ जयदेव जयदेव जय श्रीचंद्रा रजनी । कांता देवा मृगवाहन रुद्रा ॥ जयदेव ० ॥ १ ॥ द्विलक्षयोजन गगनीं राहिवास । नक्षत्राचा राजा म्हणवी आपणास ॥ बीजे मृगांकित वद्वी जयास अमृतवृष्टी करुनि पाळी जगास ॥ जयदेव० ॥ २ ॥ चतुर्थिचे दिवसी गणपतिसंयोग । पूजन केलिया हरती भवरोग ॥ प्रसन्न भक्ताला- गुनि वर देसी स्वांग । **मोरेश्वरसुत काशी** वरनित साष्टांग ॥ जयदेव० ॥ ३ ॥

रा. चांदोरकरांच्या सूचींत वरील कवीचा नामोल्लेख नाहीं म्हणून हा आपणांस नवीन च आहे.

गं. ना. मुजुमदार

## १५२ गिरिधर गुरु दिगंबर

श्री० नानासाहेब मिरीकर, अहमदनगर, यांजकडील बाडांक २ यांत वरील कवीनें केलेले अभंग, पर्दे, श्लोक वगैरे आहेत. कृष्णातिरीं राहणारे दिगंबर श्रीपाद यांनीं ह्यास अनुग्रह देऊन परमहंसदीक्षा दिली. ह्यांनीं आपल्या संतनामावळींत इतर साधूंबरोबर शेख महंमद यांचा उल्लेख केलेला आहे. त्यावरून सदरहु गिरिधर हे शके १६१८ नंतर होऊन गेले असले पाहिजे हें उघड होय. सदर बाडांत यांचें बरें च काव्य आहे त्यापैकीं मासल्याकरितां कांहीं खालीं देत आहे.

### संतनामावळी

भक्ताच्या घरीं किंकर होउनि द्वारी । तिष्ठतसे हरी निरतरी बाप ॥ १ ॥
अक्रुर नारद विदुर बलिराज प्रल्हाद । परम वैष्णव वीर निकट पाहे बाप ॥ २ ॥
शुक व्यास जनक उत्धव व्यास । गरुड निर्विकल्प सोहं गर्जतसे बाप ॥ ३ ॥

वणजा वांकुडे पेंधा निजभक्त सुदाम । भक्तां हृदई क्रीडा करितो सदा बाप ॥ ४ ॥
वाल्मिक विभिषण भरत ।लक्ष्मण हनुमंत रामन्नाम सदा गर्जतसे बाप ॥ ५ ॥
निर्वित्ति सोपान चांगा वाटेश्वर । ज्ञानि मुक्ताबाई नित्य मुक्त पाहे बाप ॥ ६ ॥
दत्त गोरक्ष शंकर हस्तामल विख्यात । सोहंरूपे सदा गर्जतसें बाप ॥ ७ ॥
भक्त पुंडलिक विष्णुदास नामा । येका जनार्दना मुक्त पाहे बाप ॥ ८ ॥
कबीर लतिफ सेख माहमद मृत्युंजय । सहजानंद पूर्ण स्वंये जाणे बाप ॥ ९ ॥
सत्पुरुषाचे स्मरण करितां गेले मरण । गिरि दिगंबरचरणिं ठेला बाप ॥ १० ॥

## सोहंदत्त

रामनाम परंधाम पुरविला निःकाम । याहुनि परतें नाही निरुतें पुर्ण जाणोनि खुण ॥ नित्यस्मरण तुटे भ्रमण गेले जन्म मरण । हरिहर ब्रह्म स्मरतां राम तरले हे चि वर्म ॥ १ ॥ रामनामिचा वोतिला सर देहभाविचा तुटला वास । पूर्णपणाचा लागला ध्यास ॥ ध्रु० ॥ कर्माकर्म करिती न कळे मूढा वर्म । गुरुमुख पाहाणे अनुभवखुण पूर्ण होउनि राहाणे । अज्ञानदशे केले पीसें बीज सेउनि कनक जैसें । येकाक्षर विश्वाकार साधोनिया निजसार ॥ २ ॥ येकि खुण सांगेन जाणे धरि कां पूर्ण मन । आपे आपण येकपण परतुनि पाहाणे खुण । हे नामसार ।हे नामसार आपरंपर तरले चराचर । कृष्णातीर दिगंबर श्रीपादयोगीश । गिरिधरि कृपा करुउनि पूर्ण केला परमहंस ॥ ३ ॥

## श्लोक

रघुनाथ नारायण पूर्णदाता । जना दावितो साक्ष सोपानपंथा ।
भजू सर्वभावें करी पूर्णकाम । तरी तुटती पाष बंध विषम ॥ १ ॥
रघूनायका येकला येक पाहे । जानि पुरउनि उरविता येक राहे
ऐसें पाहातां पाहाणें सुख आहे । मना सोध सारांष विचार पाहे ॥ ७ ॥
कामक्रोधलोभमोहोमदादिशोक धरुनिया निके बहुसाळ दुःखें ।
तुटता न तुटे बहुसाल खोटे मना शोध सारांश विचार मोटे ॥ १६ ॥

गं. ना. मुजुमदार

# १५३ राजाराम

मिरीकर बाडांक ३ यांत अनेक कवींचीं कवनें आहेत, त्यांत च वरील राजाराम कवीचें हि कवन आहे. सदर बाड "शके १६९३" मध्यें लिहिलेलें आहे. म्हणून राजाराम हा तत्पूर्वी होऊन गेला असला पाहिजे. हा अक्रूरा नगरीचें वर्णन करितो यावरून तो तेथील रहाणारा असावा असें अनुमान निघतें ही अक्रूरा नगरी म्हणजे नगर जिल्ह्यांतील अकोला नावाचें गांव समजावयाचें

की कसें ? कारण, सदर बाड "राजाराम माहादेव काटे कुळकर्णी कसबे मांडोगनं पेठ कात्राबाद" यांनीं "लिखित" आहे. खालीं कवीच्या काव्याचा मासला देत आहें:—

आक्रुरा नगरी मोकासी नरहारी । कीर्ती त्याची बरी ऐका तुम्ही ॥ १ ॥
वेद्शास्त्रघोश सदा सर्व काळी । कीर्तनाची गोडी बहु असे ॥ २ ॥
धर्म पुण्यसील सत्वाचा सागर । दया भूत थोर मनी असे ॥ ३ ॥
लक्षुमी संपती पुत्र ही संतान । पांडुरंगे जाण कृपा केली ॥ ४ ॥
दास **राजाराम** कवीत्वरचेना । सहजासहजी जाणा केली असे ॥ ५ ॥

अक्रूरा नगरी रुशीचे हे स्थळ । भक्तीच्या गजरे विठो आले ॥ १ ॥
मोकासी द्विजवरे बाधीले देऊळ । दयेच्या सागरे कृपा केली ॥ २ ॥
धन्य धन्ये लोक आपारे देवाचे । काये भाग्ये याचे षर्णू अ.तां ॥ ३ ॥
नित्य नित्य काळी दरशन विठोचे । रुक्मिनीवराचे नाम मुखी ॥ ४ ॥
दास **राजाराम** आनंदे करूनी । विठोचे कीर्तनी नाचतसे ॥ ५ ॥

बहु वादी छेदी । देवा पडिलो समदी ॥ १ ॥
कैसा देसील टाकुन । दृढ धरिले दोन्ही चेरण ॥ २ ॥
आता जालो आधीकारी । पंढरीचा वारकरी ॥ ३ ॥
दास **राजाराम** शेरण । ह्रुदयीं विठोचें चिंतन ॥ ४ ॥

'अक्रुरा' येथें नरहरी मोकाशी नांवाच्या ब्राह्मणाच्या भाक्तिबळानें श्रीविठ्ठल तेथें आले व नरहरीनें श्रीविठ्ठलाचें देवालय बांधलें. वरील उल्लेखावरून या राजाराम कवीचा गुरु हा नरहरी मोकाशी च असावा असें म्हणतां येईल.

गं. ना. मुजुमदार

## १५४ रेवण सिद्ध

रेवणसिद्ध हे जातीचे जंगम होते असें अर्वाचीन कोशकार म्हणतात व यांनीं परमरहस्य नांवाचा एक ग्रंथ केलेला असल्याबद्दल रा. चांदोरकर हे आपल्या कविकाव्यसूचींत म्हणतात. हे रेवणसिद्ध मोगलाईंत होऊन गेलेल्या माणिकप्रभु नांवाच्या सत्पुरुषाचे गुरु होते व त्यांचें रहाण्याचें ठिकाण रेवगा हें गांव होतें. ही माहिती माणिकप्रभु संस्थानाच्या मालकांनीं निर्णयसागर छापखान्यांत इ. स. १९०५ सालीं छापलेली "श्रीसद्गुरु माणिक प्रभू यांची पद्यमाला" यांत आहे. ती माणिक प्रभूंच्या शब्दांनीं च खालीं देत आहें.

पद

रेवणसिद्धा तूं पाहि मला । जन्म जातो हा वाया ॥ ध्रु० ॥
त्रिविधताप तापत्रय तापलों । शरण आलों तुझे पाया ॥ १ ॥
भाव भाकि मी कांहींच नेणे । माति नाहिं तुझे गुण गाया ॥ २ ॥
माणिक म्हणे जन्ममरण निवारी । नेउनी ठेवी निजपाया ॥ ३ ॥

पद

धन्य आज दिन झालों मी शुद्ध । स्वामी रेवणसिद्ध देखीयेला ॥ ध्रु० ॥
रेवगी ग्राम तेथें असे गिरि । स्वामी तयावरी वास केला ॥ १ ॥
कल्पतरुसम तेथिल झाड । फळ बहुगोड पुष्प नाना ॥ २ ॥
पूर्वदिशा भागीं तीर्थ एक असे । स्नानें पाप नासे तात्काळचि ॥ ३ ॥
तेथींचे जळानें अभिषेक करिती । करुणा भाकिति सिद्धालागी ॥ ४ ॥
सुरवर मुनी वसे तया ठायीं । सप्तऋषी पाही असे तेथे ॥ ५ ॥
माणिक म्हणे तेथें गादीची पूजा । पूजितां सहजासहज स्वरुपिं पावे ॥ ६ ॥

यावरून रेवणसिद्ध हे माणिकप्रभूंचे गुरु होते व त्यांचें रहाण्याचें ठिकाण रेवगी हें होतें हें स्पष्ट होय.

गं. ना. मुजुमदार

सदर रेवणसिद्ध यांची समाधि सातारा जिल्ह्यांत विट्यापासून तीन कोसांवर रेणावी या गांवीं आहे. कर्नाटकांत हि अथणीस व सोलापुरास यांचीं देवळें आहेत.-संपादक

## १५५ विठा गुरु रेणुकानंदन

भा० इ० सं० मंडळाचें शके १८३६ चें इतिवृत्त पान ९८ यांत व कविकाव्यसूचींत दिलेल्या माहितीवरून विठा हे च रेणुकानंदन आहेत असें समजलें जातें; परंतु श्री० नानासाहेब मिरीकर–अहमदनगर–यांनीं मजजवळ बाडें दिलीं आहेत त्यांपैकीं बाडांक १ यांत एक पद आढळलें तें खालीं देत आहें.

राग गौडी

पाण्याणे विस्तो पेटविला रे : वारेणे लाविली वाति रे ॥
आपआपे दीप प्रजळला : तेथें ननेव दीन ना राति रे ॥ १ ॥
कान्हो पाहाळेंरे पाहालें रे : सांगणें ऐकतें कान्हीं ॥
देवीलीयांत व नोळख रे : तेथें उदो ना अस्तु दोन्ही रे ॥
सोखरिं आधन घातलें रे : कैसी निफजेल माझा नास ॥
इंधना वन्ही लागली रे : तेथें न जळे न दिसे राख रे ॥ २ ॥

हे गुज उगवे त्यासि च उगवे रे : नुगवे त्यासी द्रहाळी रे ॥
स्याहान्यासी सेव दिधला रे : ढीवर पडलें जाळें रे ॥ ३ ॥
सागरीचें क्षीर सागरि रे : पेल डोंगरीं दुभते गाये रे ॥
दोहुं जाणे त्याचें दुभत रे : जेवि त्याचि मरे माये रे ॥ ४ ॥
मुरालें महि आणि मंदीर रे : तेथें फटलें दुसरपेण रे ॥
**विटयाचा स्वामी रेणुकानंदन** : आदिपुरुषि सुणा रे ॥ ५ ॥

तसें च मिरीकर-बाडांक ३ मध्यें पुढील पद आहे—

उघडे घ लोचन उघडे ची निधान : उघडीया आन काय सेवो माय ॥ १ ॥
पायाळ पंचाक्षरी बाळयी घेत जरी : उरलियां उरि केचि हो माय ॥ २ ॥
मनाचें मुरालेंपण तेथें केचे मिंपण ॥ शृति हारपली सुण केची हो माय ॥ ३ ॥
जाणीव म्हणो तरी जाणने ची नाही ॥ तेथे सांगते ऐकतें ते ही केचे हो माय॥४॥
वीजुच्या प्रकाशां डोळे चि जाले आरीसा ॥ नयन बुबुळ ठसा केचा हो माय ॥५॥
**वीटा नाही रेणुकानंद कांई** : आई आदीपुरुष तो ही केचा हो माय ॥ ६ ॥

या पदांवरून विठा हा च रेणुकानंदन नसून त्याचा शिष्य आहे हें स्पष्ट होतें. एकनाथाप्रमाणें विठा यानें आपल्या नांवास लागून च गुरूचें नांव घातलें आहे असें म्हणावें लागतें.

गं. ना. मुजुमदार

## १५६ संतुबाई

रा. रा. मार्तंडराव देशमुख, अहमदनगर, यांनीं मला १८ बाडें मंडळाकरितां दिलीं. त्यापैकीं बाडांक १ एक हें बाड छोटें एकोणीस पानांचें आहे. त्यांत तुकाराम, दीनबंधु, गोपाळदास व गंगाराम यांचे अभंग, पदें वगैरे असून शेवटीं संतुबाईचा एक अभंग आहे. त्यांत संतुबाईला गंगानंदानें स्वप्नामध्यें मंत्रबोध कोणत्या दिवशीं केला याबद्दल उल्लेख आहे. यावरून इचा काल शके १७३१ हा होय हें निश्चित झालें. तो अभंग असाः--

सके सत्रासे येकत्तीस ॥ शुक्ल सवछर नवमास ॥ १ ॥
जेष्ट सुद्ध स्वप्नामधीं ॥ **गंगानंद** मंत्र बोधी ॥ २ ॥
त्रीअक्षरी बीजाक्षर ॥ रात्रीं सांगीतले सार ॥ ३ ॥
**संतुबाईला** प्रचीती ॥ जाली शास्त्री जे बोलती ॥ ४ ॥

रा. चांदोरकरांच्या संतकविकाव्यसूचींत संता असें एक नांव आहे. ती व ही संतुबाई एक च कीं काय ?

गं. ना. मुजुमदार

## १५७ अनंतकृत गर्भगीताटीका

सदरहु प्रकरण ह० प० रा० सखारामबोवा दैठणकर यांचे संग्रहापैकीं बाडांक २६ यांत आहे. टीका ओंवीबद्ध असून संख्या १४२ आहे. गुरूचें नांव समजत नाहीं.

**कवीचा काल व स्थल व ग्रंथान्त**:-

मज कवि म्हणति लौकिकांत : परि कवित्व कर्ता श्रीभगवंत :
**कवि अनंत** ऐसि मात : या जगा आंत रुढविली ॥ १३७ ॥
**श्रीपुर**[1] क्षेत्र पुण्यनगरी : संन्निध सरस्वतितिरीं :
तेथें कवि अनंत वास करी : निरंतरि ब्रह्मानंदें ॥ १३८ ॥
पार्थिवनामसंवत्सरिं : आश्विनमास त्या भीतरी :
शुक्लपक्षीं नवरात्रीं : टिका खरि केली असे ॥ १३९ ॥
तिथी पंचमीं गुरुवासरिं : दक्षणायन विशाखा नक्षत्रिं :
विष्कंभ प्रीत योगावरी : टिका बरि केली असे ॥ ४० ॥
उपंगललितांग तद्दिनीं : अदिशक्ति व्रत साधुनि :
गर्भगीते टीकेलागुनीं : केली जाणु समाप्तते ॥ ४१ ॥
नित्य गर्भगितापठणासिं : करितां तत्काळ अघनाशी :
धर्म अर्थ काम मोक्षासिं : करि त्यासि देत असे ॥ १४२ ॥

हरिः ॐ तत्सदिति गर्भगितामृतनिषत्सुब्रह्माविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे टिकाकार अनंतकविविरचिते गर्भगिताटिका संपुर्णमस्तु ॥ छ ॥ छ ॥

**प्रकरणाचा आदि व इतर उतारे**:-

जयजय श्रीगजानना : हिमाचलात्मजेच्या नंदना :
संश्रृति भयमोचना : सचिद्घना निजमुर्ति ॥ १ ॥
चतुर्दश विद्येचिया आब्धी । तुज प्रार्थीतसें कृपानिधी :
मम बुधीतें तुं प्रबोधी : गावया त्रिशुधी गुण तुझे ॥ २ ॥

---

१ सांगली संस्थानांत एक शिरपुर, दुसरें पुणें जिल्ह्यांत दौंडाजवळ एक शिरापूर व तापीचे कांठीं तिसरें एक शिरपूर अशीं तीन गांवें आहेत. यां पैकीं कोणतें येथें लागू पडतें त्याचा उलगडा केवळ 'सरस्वती'सांनिध्यावरून च होत नाहीं.-संपादक

म्हणोनि तव चरणद्वया : प्रिति वंदितो मीं आद्व्या :
वेगी करावी जी दया : देवोनिया अभया टिका करवीं ॥ ३ ॥
मग होउनीया प्रसंन्न : अज्ञापिलें मजलागुण :
गर्भगिताटिकानुसंधान : चालवि पूर्ण मद्ज्ञें ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥

अर्जुन उवाच॥ गर्भवासं जरा मृत्यं किमर्थं भ्रमते नरः ॥
किमर्थं रहितं जन्म कथं देव जनार्दन ॥ १ ॥

॥ टिका ॥

तेव्हां तो पृथेचा नंदनः बोलिला श्रीकृष्णालागुनः
गर्भवासादि दुःख दारुण : किमर्थ आपण भोगिति नर ॥ १५ ॥
आरंभ्य गर्भोदरि जनन : घेवोनि पावति मरण :
ऐशा नाना विपरीतीकारणें : कोण्या गुणें सोसिति ते ॥ १६ ॥
तर त्या जन्ममरणारहित : होउनि भोगिति स्वानंदातें :
ऐसि काहि ते युक्ति मातें : सांगा त्वरित जनार्दना ॥ १७ ॥

यावरून अनंत कवि सरस्वतीच्या तिरीं श्रीपूर अथवा पूर या ठिकाणचा राहणार असून त्यानें हें गर्भगीताटीकेचें प्रकरण शके १६८७ मध्यें रचलें.

गं. ना. मुजुमदार

## १५८ भगवंतशिष्य शिवदास

ह. प. सखारामबोवा देंठणकर यांजकडील बाडांक १४ यांत शिवदासानें आपला गुरु भगवंत यावर आरति केलेली लिहिलेली आहे. इतर बाडांतून शिवदास याचीं पदें अभंग वगैरे आहेत. परंतु त्यांत गुरूचा कोठें उल्लेख आढळला नाहीं. ही आरति अशीः--

॥ श्रीभगवंत ॥

भुताभगवंताते वेगलेपण नाहि । त्याची क्रिया ते हि भगवंत पाहि ॥
कर्म धर्म अवघा भगवंत तो हा । भगवंते व्यापीले सबाह्य सर्व हि ॥ १ ॥
जय देव जय देव जय जी भगवंता । भुता ठाव नाही भगवंत पाहतां ॥धृ॥
त्यागी भोगी अवघा भगवंत आहे । भगवंनेसी सिद्ध साधनाता होये ॥
मुळीच्या भगवंतासी समाउनि तुं राहे। म्हणोनि ह्रदयामाजी भगवंत पाहे ॥२॥

द्वैताद्वैत अवघा भगवंत जाला । भगवंताचा साक्षी भगवत ठेला ॥
उत्पस्थितीचा वीग्रहा भगवंत केला । शिवदासाचा भेद भगवंत नेला ॥ ३॥

गं. ना. मुजुमदार

# १५९ भिका-भिक्षु-मुनि

इ० प० सखारामबोवा देठणकर यांजकडलि संग्रहापैकीं बाडांक २६ हें 'अनंतकृत गर्भगीताटीका' प्रकरण खेरीज करून बाकी सर्व भिका ऊर्फ भिक्षु याचे अभंग, पदें, व ( १ ) प्राणबोध आणि ( २ ) प्रार्थनास्तोत्र अशीं दोन प्रकरणें यांनीं भरलेलें आहे. हा भिक्षुमुनि मानभाव होता. त्याच्या गुरूचें नांव आत्माराम असें आहे. सदर भिक्षु केव्हां झाला याबद्दल त्याच्या काव्यांत कोठें हि उल्लेख नाहीं. त्याचप्रमाणें हा कोठील राहणारा हें हि समजत नाहीं. या च बाडांत मानभावांच्या सांकेतिक लिपींत कांहीं औषधि द्रव्यांचीं नांवें दोन तीन ठिकाणीं लिहिलीं आहेत. बाडाचीं पृष्ठें पाठपोट १५० आहेत. याशिवाय पहिलीं व शेवटचीं मिळून १८।२० पानें गहाळ आहेत. काव्याची लिपी बरी च अशुद्ध आहे. कवि आपला सांप्रदाय " दत्तसांप्रदाय निरंजन पंथ परमहंस " याप्रमाणें सांगतो. याचें काव्य मराठी व हिंदी भाषेंत आहे.

**प्राणबोध**—श्रीसमर्थांच्या मनोबोधश्लोकाप्रमाणें कवीनें प्राणबोध-श्लोकशतक केलेलें आहे. यांतील कांहीं उतारे खालीं देत आहें.

श्रीमंगळमंगळा तु नीजमुर्ति ॥ सकळा अदि तुं परब्रह्ममुर्ति ॥
विद्या आनाविद्या तवं निजरुपा ॥ तवांधिन सर्व हि कैवल्येधिपा ॥ १ ॥
नको भुलुं या नासिवंत पदार्था ॥ नकोरे नको पुजु नाना दैवता ॥
नको रे नको करूं हे आन वार्ता ॥ नको रे नको लोपकं धर्मकथा ॥२७॥
सुखाचि घडी लोटता सुख आहे ॥ पुढे सर्व जाईल कांहीं न राहे ॥
देहेचा भर्वसा काय रे मानसा ॥ तुझे देहे जाईल स्मंशाणवासा ॥ ४० ॥
गीता भागवत आनी न्यायशास्त्र ॥ त्या आधारे नीरोपीळा बोधसार ॥९८॥
माझा हा दत्तसांप्रदाये [illegible] ॥ नीरंजन पंथ परमहंश देखा ॥
हा नीजमार्ग बरवा [illegible] ॥ येथे नीगुर्ण भक्तीचा ज्ञानयोग ॥ ९७ ॥
आत्माराम गुरु [illegible] ॥ त्याचा भिकामुनी लाडिवाळ बाळ ॥
सर्वस्व त्या [illegible] राजसत्ता ॥ म्हणूनी स्मरारे स्मरा त्या आनंता॥१००॥

**प्रार्थनास्तोत्र**—हें प्रकरण ओंवीबद्ध असून संख्या १५२ आहे. सर्वेश्वर जो "चक्रधर" त्यास अनुलक्षून हें स्तोत्र केलेलें आहे. यांतील उतारे खालीं देत आहें—

ॐ नमोजि सचिदानंदा : आनंदकंदा परमानंदा :
परात्पर कैवल्येपदा : निजानंदा निजमुर्त्ती ॥ १ ॥
सुपर्णी नाम नारायण : हंशरुप गुण गहण :
ब्रह्मा विष्णु रुद्रासिं जाणें : केले संबोधन न्यायशास्त्री ॥ १३ ॥
तुं सकळास मुगटेस्वेर : तुझे नाम श्रीचेक्रधर :
तु चेतुर्थ मूर्ति सर्व्येश्वर : आब्रह्मापर परब्रह्म तुं ॥ ७५ ॥
जयेजये श्रीचेक्रधरा : ब्रह्मांडधारका सर्वेस्वरा :
जयेजये परमेस्वरा : निजमाहेरा भक्तजणाच्या ॥ १०६ ॥
प्रसंन्न होउनि : वर्दहास्तें चेक्रपाणि :
तोची दत्त भगवाण + + नि : करी उभारणी सांप्रदायेकी ॥ १४० ॥
हा मार्ग दत्तसांप्रदायक : परमसन्यास देख :
आणि परमहंश म्हणति लोक : ऐसे कैवतुक या मार्गीचे ॥ १४१ ॥
हे प्रार्थनास्तोत्र जो पठन करिं : त्याची मनोव्रति पुर्विल हरि :
नानापरि त्या संरक्षील ॥ १४२ ॥
आत्माराम गुरु समर्थ : मम मस्तकी ठेविला वरदहस्त :
दाखवीला नीजपरमार्थ : फेडीलीं भ्रांत गुरुराये ॥ १४३ ॥
शंशयेन न धरावा कोन्ही : नीश्चये भाक देउनि :
बोलिला श्रीचक्रपाणि : भिकामुनि संतोशविला ॥ १५२ ॥
ईति श्रीप्रार्थनास्तोत्र संपुर्णमस्तु

**अभंग वगैरे:**—

कोठवरी आम्ही करुना भाकावि । थोर तै पदवी तुझी देवा ॥ १ ॥
बहुताची तुंम्ही सोडिली बंधनें । थोर महिमान तुझे देवा ॥ २ ॥
चहुं युगामाजी अवतार धरीसी । जीव उध्धरीसी स्वामीराया ॥ ३ ॥
तुझा भरवसा आणुनी परेशा । ध्यातो जगदेशा तुजलागी ॥ ४ ॥
ईती भीका म्हणे तुझेची स्मरण । दुज काही नेना तुजवीना ॥ ५ ॥

---

झुटी माया प्रीत लेगावे । जीवडा आपणासा करलेवे ॥ धु ॥
आनहीत बतावे हीत गमावे । आवल प्राणि भुलावे ॥ १ ॥
जेबलग काया तपलग माया । माया तपलग छाया फेर सब गमाया ॥२॥

ईसखातर हुशार रहना । साई आपणासा करलेना ॥
रबका ठीकाना देखणा । आलखजीकु मीलना ॥ ३ ॥
ईति भिका कव्हे सुन भाई साधु । आवल तर जाव भवशधु ॥ ४ ॥

स्वामी देवराया मी तो आंमगळ । परि तुझे बाळ म्हणवीतो ॥ १ ॥
न पाहाता काही माझे दोष गुण । पलवी भरण पतीतासी ॥ २ ॥
पतीतपावण नाम तुझे देवा । ऐकोनी केशवा शरण आलो ॥ ३ ॥
कर हे जोडोनी करी विनवनी ॥ भीका लोटांगणी जीवभावे ॥ ४ ॥

गीरीधारी गीरीधारी : वाटेवरी उभा हारी :
भुलवील्या गोप्यनारी : गोरसचोरी करी ॥ ध्रु ॥
निमित्ये ठेउनी बोले चेक्रपाणी ॥
पदरि धरुनि मागे दही लोणी ॥
म्हणे द्यागे सत्वरी ॥ १ ॥
करी वोढावोढी न सोडी न सोडीः
तो कांचोळी फाडी : गौळनिची उडी :
... ... ... घरी ॥ २ ॥
दानाचेनी मीसे : घेतलें गोरस ॥
देउनि प्रेमरस उधंरी परेश ॥
भिका म्हणे गोकुळा भीतरी ॥ ३ ॥

मूळ लेखकानें बाड लिहिलें तेव्हां 'भीका मुनि' असें च लिहिलेलें आहे (तीन चार अभंगांत 'भिक्षु' असें हि लिहिलेलें आहे) परंतु त्याचें शुद्धीकरण केलें त्यावेळीं 'भिका' यांतील 'का' च्या ठिकाणीं प्रत्येक अभंगांत 'क्षु' खोडून केलेला स्पष्ट दिसतो. त्याचप्रमाणें इतरत्र हि बरे च ठिकाणीं अभंगांचें वगैरे शुद्धीकरण केलेलें आहे. भिकाची काव्यप्रतिमा निवळ स्वयंभू नसून त्याची बहुतेक भिस्त तुकाराम, रामदास, कबीर इत्यादिकांवर च विशेष दिसते.

गं. ना. मुजुमदार

## १६० केसरिनाथशिष्य महिपति

ह० प० रा० निंबराज प्रल्हाद उर्फ दादोबोवा देठणकर यांजकडील बाडांक ३९ मांत 'केसरीनाथका महिपति चेला' यांनीं केलेलें हिंदी भाषेंतील गोपीचंदा-

ख्यान आहे. छंद, साकी, श्लोक व पदें यांत निबद्ध असून एकूण संख्या १६ आहे. याची जास्त माहिती कांहीं च समजत नाही.

आदिः--

॥ छंद ॥ सातसो चेला लेकर सात । कानिफ धुंडे जालंद्रनाथ ॥
साहेबका नाम मुखसे गात । आया गौडबंगाला ॥ १ ॥
हमारा साई खाईमे डारा । राज करता है गन्हारा ॥
सब मिल जावरे उसे मारा । कैसा राज करता है ॥ २ ॥

॥ साकी ॥ कांचनपुरि बिच आया कानिफ जोगी सकलकलाकुलगा जु ॥
जहा फुलवाडी फूली जलसीतल हा कियो बिसरा जु ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥ बुलाये दोड दास साधक सतीकु ।
कहो जाय आदेस मैनावतीकु ॥
कहे नाथ कानीफ आदेस माई
परी पाव मैया गुरुका जरोई ॥ ४ ॥

अंतः—

पद ॥ गुरु पीरजादा हद सचखु यादर खबर कालोपर घुस्सा गुरुभक्तिका जबर ॥
**केसरीनाथका महिपति चेला** अमर सब संतनका है गुलाम घरका गबर
बेपरवा फिरत गरज किसेकी नही ॥ जि० ॥ १६ ॥

सदरहु बाड अगदीं च अलीकडील म्हणजे ५।१० वर्षांत च उतरलेलें आहे.

गं. ना. मुजुमदार

# १६१ ज्ञानदेवाचा सच्चिदानंदास लाखोटा

ह. प. दादाबोवा देठणणकर यांचे संग्रहांतील बाडांक ३ यांत उपरिनिर्दिष्ट लाखोट्यांतील सात अभंग दिलेले असून त्यांचे आरंभीं व शेवटीं शेरे लेखकानें लिहिलेले आहेत. सदरहु अभंग कोणत्या प्रसंगास अनुलक्षून केलेले आहेत हें समजत नाहीं. बाडांतील अभंग व शेरे जशाचे तसेच खालीं देत आहें.

श्री आथ आभंग लाखोट्याचे प्रारंभ

१ नवाचे माझारी ओवठ पीठा सेजारी : शुन्याची वोहरी सुनीळ प्रभा ॥ १ ॥
जीव दशामये आगुष्ट प्रमाण : त्यावरी आज्ञान परी वार्धले ॥ २ ॥
चैतन्याची मुस त्यामाजी वोतीली : अव्यक्ताने केली वस्ती तेथे ॥ ३ ॥
तयाचे ते घर मसुरे प्रमाण : गुरुमुखे षुण जाण बापा ॥ ४ ॥
ज्ञानदेव म्हणे याजपरते जाणने : नाही नाही आण नीवृतीची ॥ ५ ॥
२ डोळ्याची पाहा डोळा शुन्याचा सेवठ : नीळा बिंदु नीट लपलपीत ॥ १ ॥

वसिाउ पै आले चैतन्य हो तेथे : जाण पा नीरुते आनुभवासी ॥ २ ॥
पार्वती लागी आदीनाथे दावीले : ज्ञानदेवा फांवले गुरुरुपे ॥ ३* ॥

३ वर्ण ना व्यक्ती अमुप नीजतेज : सतांचें हे गुज आत्मरूप ॥ १ ॥
मोतीयाचा सागर भरला दाही दीशा : पाहाता जीवदशा बुडुन जाये ॥२॥
ते खुण माझीया दाटली नयेनी : चीद्ररत्नाची षाणी उघडली ॥ ३ ॥
नीवृंतीं प्रसादे ज्ञानदेव लाधला : सुर्खीयां पै जाले यणे सुखे ॥ ४ ॥

४ स्वरूपाचा पूर गगनसत पातला : देखता बुडाला देखताची ॥ १ ॥
चैतण्याचा लाग हेलावती येकसरा : प्रळयाचा नीरासारीखा पै ॥ २ ॥
ना तरी मोती वीघुरली आंबरी : दीसला परीकरी नेणती च ॥ ३ ॥
गुरुमुखे खुण वोळखुनि ध्यावी : देही च पहावी मुक्त दशा ॥ ४ ॥
ज्ञानदेव म्हणे नवृती दातार : चोजवीले सार माझे मज ॥ ५ ॥

५ मोतीयाचा वोगरु गुरुवाक्यसदनी : वाटे लाभ जनी नभाचीया ॥ १ ॥
धारणेचे हाले जेवा द्रुढ मुखे : गोडीयाचा सुखे अंग भरा ॥ २ ॥
चाषवीता वरिळा बहुतामाजी येक : आहेती डांभीक घरोघरी ॥ ३ ॥
ज्ञानदेव म्हणे जे दावील या खुणे : त्याचे पायीं लीन व्हांवे सदा ॥ ४ ॥

६ नयनाचे उगमी पाहीले आपणा : तंव उजळल्या जाण दाही दीशा ॥ १ ॥
ब्रह्मांडायेवढे वोतीव सगळे : मन बुद्धी कोंवळे ॲसे नाही ॥ २ ॥
ते ज्ञानदेवा ज्ञान बुचळी लाधले : नीवृतीनें दीधले धरुनी हाती ॥ ३ ॥
सदासीवे उमे हे षुण दावीली : हांसे लाधवीली कमळासना ॥ ४ ॥
सनकादीक तृप्त त्या षुणे पै जाले : योगी आनंदले योगायोगी ॥ ५ ॥
ते केले मज करतळामळ : नीवृती रुपाळु काय वाणु ॥ ६ ॥

७ ती शुन्यावरी नांदताहे देही : ते चीं ब्रम्हगोवी भरुनि आसे ॥ १ ॥
जयाचा जो भास षींबाकार आहे : ते ची खुण लाहे गुरुपुत्रा ॥ २ ॥
बींबाचेची आंग परब्रह्म नीघोट : ते वस्तु आवीट तेजपुंज ॥ ३ ॥
चळे ना ढळे जैसे तैसे ची : उपमा आणीकाची देता नये ॥ ४ ॥
बहु जन्मासेवटी फळ हे पुण्याचे : आभाग्यासी कैसे प्राप्त होय ॥ ५ ॥
ज्ञानदेव म्हणे याजपरत नाही : उपदेश कांही बोलावया ॥ ६ ॥

---

* वडोयास, ग्रंथप्रसारक मंडळीनें छापलेला ज्ञानेश्वरांचा गाथा पृ० ५६ पहावा.–संपादक

अभंग सात संपुर्ण सचीदानंद बाबास लागोटा ज्ञानदेवें दील्हा ते आभंग समाप्तमस्तु : ॥

गं. ना. मुजुमदार

---

# १६२ देवदासकृत भगवद्गीताटीका

ह. प. नरहर पंढरिनाथ बोवा दैठणकर यांचे संग्रहांत देवदासकृत भगवद्गीताटीकेची एक बरी च त्रुटित प्रत मिळाली. टीका ओंवीबद्ध असून एकंदर संख्या सुमारें अडीच तीन हजार पावेतों असावी असा अंदाज आहे. मिळालेला भाग खालीलप्रमाणें आहे.—

| अध्याय | ओंवीसंख्या |
|---|---|
| ६ | १०१ ते १८३ (अखेर) |
| ७ | २३ ते १५८ (अखेर) |
| ८ | ७२ ते ९६ (अपूर्ण) |
| ९ | १ ते ९८ व २२१ ते २६७ (अखेर) |
| ४ | |

येणें प्रमाणें उपलब्ध ग्रंथ आहे. देवदासानें या भागांत आपल्या गुरूबद्दल अथवा संप्रदायाबद्दल कोठें च उल्लेख केलेला नाहीं. एकंदरींत हा चैतन्यसांप्रदायी असावा असें माझें अनुमान आहे. मासल्याकारितां नवव्या अध्यायाचा शेवटचा श्लोक व त्यावरील टीका वगैरे पुढें देत आहें:--

**श्लोक**

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥
मामेवैष्यसि युक्त्वैमात्मानं मत्परायणः ॥ ३४ ॥

**टीका**

माझे ठायीं ठेवीं मनातें । करी माझेया भजनातें ॥
आणि माझेचि पूजनी प्रवर्ते । नमस्कारीं मजलागुनी ॥ २६१ ॥
ऐसेया प्रकारें करून । तूं होंईगा मत्परायण ॥
म्हणिजे माझ्या ठायीं अंतःकरण । नियोजूनि बापा ॥ २६२ ॥
ऐसें केलिया उपरी । मातें पावशील निर्धारी ॥
नव्हेसि नित्य संसारी । मजशि पावशी ॥ २६३ ॥
मज सर्वभूतांतरात्मयातें । सर्वभावें भजनी निरुतें ॥

मी चि देयीन परमगतीतें । ऐसा अर्थु ॥ २६४ ॥
दुराच्यारी हे लोक । स्त्रिया आणी शुद्रादीक ॥
माझेनि भजने प्रापक । मजलागीं जाण ॥ २६५ ॥
ऐसा हा माहा राजयोगू । अंतरीं प्रकटोनि श्रीरंगू ॥
महाराष्ट्र भाषेयां बोलविला चांगु । देवदास म्हणे ॥ २६६ ॥
श्रोतेयां प्रति विनवणी । देवदास करी नमस्कार करुनि ॥
न्यून असे तें सांभाळूनी । पूर्ण कीजे ॥ २६७ ॥
॥ हरिः ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु० ... ॥

वरील ओंव्यांतील ' माझेया ,' ऐसेया ,' ' भाषेया ,' ' श्रोतेयां ' हीं रूपें चिंतनीय आहेत. टीकेची भाषा अगदीं सुगम व सरळ आहे.

ग. ना. मुजुमदार

## १६३ नागेशात्मज विठल ( वामनाचा शिष्य )

रा. चांदोरकरांच्या कविकाव्यसूचींत ५५ पानावर ' नागेशसुत ' याबद्दल माहिती दिलेली आहे. वामनाच्या समश्लोकीच्या शेवटच्या ओंवीचा उतारा देऊन त्यावरून याचा गुरु वामन म्हटलें आहे तें बरोबर आहे. मात्र या नागेशसुताचें नांव विठल आहे हें खालीं दिलेल्या स. दै. २७ ( लेखनशक १६४० ) बाडां-कांतील पदावरून आज आपणांस नवीन समजत आहे. तें पद असें:—

संतांचे ( खु)ण वेगळि क्रिया आगळी ॥ धृ ॥
वर्तती ते जनीं नित्य निरंजनीं अंतरि बोधे निरंतरि रे ॥
भुता..,आवगुण नेणाति जाणाति ते येक ईश्वर रे ॥ १ ॥
सात्विक राजस तामस लोक विलोकुनि सांगति भक्ति रे ॥
ब्रह्मसुख अनुभवामृत सेविति सुलभ ज्याला मुक्ति रे ॥ २ ॥
संताची खुण संत चि जाणाति अन्यजनाप्रति काय रे ॥
**नागेशात्मज विठल ध्याय श्रीगुरु वामनपाय रे ॥ ३ ॥**

ग. ना. मुजुमदार

## १६४ जनार्दनसुत

ह० प० सखारामबोवा देंठणकर यांजकडील बाडांक २७ ( लेखनशक १६४० ) यांत जनार्दनसुत कवीचें एक पद आहे. कवीचा काल शके १६४० किंवा तत्पूर्वी. तें पद असें:--

जय मैराळा मार्तंडा ॥ लावण्यसिंधु प्रचंडा ॥ धृ ॥
कारि खंडा निवटी अरिमुंडा वधी रिपुनिधी नव कोटीं वितंडा ॥
बाहुदंडा करि शतखंडा मारी दैत्य उदंडा रे ॥ १ ॥
मणीमल्लारि अवतार अमरी नळदुर्ग जेजोरी ॥
पर्वत सीखरी राहे गडावरी व्यापक सर्वांतरी रे ॥ २ ॥
सर्वांगी पीवळा भंडार उधळा कंठि मुंड हि माळा ॥
अर्धांगी बाळा परम कृपाळा म्हाळसा वेल्हाळा ॥ ३ ॥
यात्रा मोटी बहुजन दाटी कोटी असंख्यात दीवटी ॥
मंडपकाटी अगणित थाटी मोर्तब मीरवती तगटी रे ॥ ४ ॥
नीजजनसुखकारी दोशनीवारी तारक भवसागरीं ॥
कृपा करीं दया मजवरी **जनार्दनसुत** उधरी रे ॥ ५ ॥

कवींसंबंधीं इतर माहिती कांहीं च समजत नाहीं.

गं. ना. मुजुमदार

## १६५ गोविंदसुत नंदन

स० दे० २७ ( लेखनशक १६४० ) यांत गोविंदसुतनंदन कवीचें एक पद आहे. कवीचा काल शके १६४० किंवा तत्पूर्वी.

### पद

अरे अरे राजीवनयना सोडिं पल्लव मोहना रे रे ॥ धृ ॥
वेगीं आम्ही अरे हरी जाउ दे सदना रे रे ॥
न जाणसी आम्ही सासुरवासिणी अंगना रे रे ॥ १ ॥
अजीपासुनी त्रासु कुपीच्या जीवना रे रे ॥
तुजसाटी अरे हारी चालु हे यमुना रे रे ॥ २ ॥
मुकंदा मंदारधरा कुंदरदाना रे रे ॥
सोडि आतां अरे हरी अरवींदवदना रे रे ॥ ३ ॥
म्हणसी ते ऐकी उदइक जगजीवना रे ॥
साक्ष घेई आरे यासी **गोविंदसुतनंदनासी** रे रे ॥ ४ ॥

कवीचा गुरु व त्रिमलाची आरती करणारा गोविंदसुत हे दोघे एक च काय?

गं. ना. मुजुमदार

## १६६ वामनकृत भीष्मप्रतिज्ञा

रा. सखारामबोवा दैठणकरांच्या संग्रहापैकीं बाडांक २१ यांत वरील प्रकरण आढळलें. वामन व त्याचें काव्य विशेष परिचयाचें असल्यामुळें त्याबद्दल कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं. वेगवेगळ्या वृत्तांत श्लोक असून संख्या १८ आहे

आदिः--

लक्ष्मीनृसिंहचरणद्वयसारसाचा
जो रेणु मान्य वदती बहुसार साचा ॥
प्रत्यूहमत्तगजासिंह तया नमीतों
जाणे तयाहुनि कदापि न आन मी तो ॥ १ ॥

अंतः—

पिता शांतनू माय जाची नदी जे
स्वये शुद्ध ऐशास सन्मान दीजे ॥
हरावा असा गर्व तो ही मनाचा
नराचा असा भाव तो वामनाचा ॥ १८ ॥

गं. ना. मुजुमदार

## १६७ अथर्वण गंगाधर

मी नुकताच श्रीनिंबराजाचे दैठण गावीं निंबराजासंबंधीं माहिती मिळविण्याकरितां जाऊन आलों. तेथें असलेल्या चार तद्वंशजघराण्यांनीं कृपाकरून आपल्याजवळ असलेल्या संग्रहापैकीं अभंग, पदें, चरित्रें, आख्यानें वगैरे असलेलीं जुनीं बाडें मला दिलीं. त्यांपैकीं रा. सखारामबोवा यांचे बाडांक १४ यांत अथर्वण गंगाधरकृत शिवरात्रि नामक प्रकरण आढळलें. हें श्लोकबद्ध आहे. संख्या ४२ आहे. लिखाईवरून बाड सुमारें १२५ वर्षांपूर्वीं लिहिलेलें असावें.

आदिः—

नमन करूं नरकुंजरा फरशधरा जया जया गणपति ॥
मंडण काश्मीरपुरसुंदरा रे विद्याधरा सारजा ज्ञानमुर्ति ॥
सद्गुरु ऋषिमुनि कविजना रे पुरातनावृत तया विनंति ॥
भक्तिमुक्तिदायका कथा आयका सीव सांगे पार्वति ॥ १ ॥

कथेस आधारः—

हा ईतिहास लिंगपुराणिचा बोलु ग्रंथीचा सांव सांगे शक्रांसि ॥
मुचकुंदाप्रति सांगे रुक्मिणिं स्कंदपुराणि आर्योव्ये सुर्यवंसी ॥ ४१ ॥

अंतः—

म्हणोनि जाणता नेणता पुजा शंकर स्मरा हरिहर जो कां गिरीजामनुहरु॥
दुस्तर भवार्णवतारकु मुक्तीदायकु आव्यक्त निराकारु ॥
प्रत्यक्ष कळीमलनाशनु जगजीवन स्वामि हा रामेस्वरु ॥
चरणकमळ त्याचे अहर्णिसी ध्याय मानसी **अथर्वण गंगाधरु** ॥ ४२ ॥

कवीच्या कालस्थलांबद्दल निर्णायक कांहीं च उल्लेख नाहीं. श्लोकांत उल्लेखिलेला रामेश्वर हा कवीचा गुरु असेल काय ?

ग. ना. मुजुमदार

## १६८ पंडित

रा. सखारामबोवा दैठणकरांकडील बाडांक २७ यांत **पंडित** कविकृत पदें अभंग वगैरे बरेच आहेत. हा कवि कोण कोठील हें समजत नाहीं. कालाचा निर्णय ठाम करितां येत नाहीं; तथापि ज्या अर्थी सदरहु बाड शके १६४० मध्यें लिहिलें आहे त्याअर्थी पंडित कवि त्यापूर्वी होऊन गेला असला पाहिजे असें उघड अनुमान होतें. मासल्याकरितां खालीं कांहीं उतारे देत आहें.

सजन तनुमन प्राण लोधले । हरिगुण वर्णन करुनि लोधले । स्तळचर जळचर वैरी विसरले । कच्छपमच्छ उरग मृगनाग विहंग संगती जाले ॥ १ ॥ जन वदते जय रामा रामा। श्रीराम मुनींमनसुखधामा निगमागम निर्गुण गुणधामा॥ पदनखमणीजीत कोटि कुसुमशर जन **पंडित** विश्रामा ॥ २ ॥ छ ॥ छ ॥

माधव म्हणती । गायन करिती ॥ छ ॥ सः स : सरिगम पदनिधा सरशृती ॥ धृं धृं द्रिमींकीटि थैथै नाचती ॥ १ ॥ कीकिटि कींरीटोणांगीणी गीडिदांगणांगीणी गीडिदांगणणां गीडिदांग ॥ २ ॥ ऐसा केशव भावे स्तविति । **पंडित** म्हणे भवसागर तरती ॥ ३ ॥

ग. ना. मुजुमदार

## १६९ हरिहर

रा. सखारामबोवा दैठणकरांच्या बाडांक २७ मध्यें हरिहरकविकृत प्रकरणें, पदें, अभंग, वगैरे आहेत. सदर बाड शके १६४० मध्यें लिहिलेलें असल्यामुळें

हा कवि शके १६४० च्या पूर्वी होऊन गेला हें उघड होय. याचें स्थळ समजत नाहीं. याची काव्यरचना मराठी, हिंदी व कानडी अशा तीन भाषांमध्यें असलेली आढळते. नमुन्या करितां खालीं कांहीं उतारे देत आहें.

## पद कानडी

निने निर्इंधी मनवे तिळियो तनुशुधी ॥ धृ ॥ नानानिंथी नानंत तिळुथी ॥ याको तनगे भ्रमदिंदं मरुथी ॥ १ ॥ निने ईंद्रयज्योतिकनागी । आडसि आटा आडगीय आडगी ॥ २ ॥ निने ज्ञाता निने माना । नीनें **हरिहर** व्यापक पूर्णा ॥ ३ ॥

सद्गुरुचरणी माथा कैं ठेविन मी लवलाहीं ॥
एसा श्रीहरि गुरु मज देई ॥ धृ ॥
जो भवसिंधुचें तारु । माझे मज देण्हारु
मस्तकी ठेवी अभयकरु ॥ १ ॥
शृष्टी शोधीली पाहीं ॥ कोण्ही सांगेना बाई ॥॥
यैसा मी हुडकी ठाईठाई ॥ २ ॥
यैसा मी जालो कष्टि ॥ जाली जीवा सोसाटीं ॥
**हरीहर** चरणाशी जाली भेटी ॥ ३ ॥

## पद हिंदी

साहेब मन्न प्यारा आपेआप हुवा सारा ॥ १ ॥
सबमे भरपुर होकर आखर सबसु स(म)झ्यत न्यारा ॥ १ ॥
मुझमे मझकु बेचुन करकर कुपर दिलका मारा ॥ २ ॥
उठत बैठत सोवत जागत **हरिहर** पदमो धारा ॥ ३ ॥

हरिहरकृत शिवरात्रिकथा नामक प्रकरण आहे त्याचा आद्यंत असा:—

आदि:—

अधिं वंदुनी रघुराजयाला । त्यानंतरे त्या गुरुपादुकाला ॥
मतीप्रकाश तेणे पुर्ण जाला । कथाविस्तार पुढें चालिला ॥ १ ॥
सीवरात्रीकथा परिसावी । भक्तीभावें पाहा नीत्य गावी ॥ धृ ॥
स्कंदपुराणींचें कथन । शिव सांगे उमेलागुन ॥
सिवकथा थोर महिमान । येक सांगीजेल मुळकथन ॥ २ ॥

अंत:—

यैसे बोलोनियां गुप्त जाली । सीवरात्री भीळा आवडली ॥
भुमंडळीं पुढें प्रगटली । ती **हरिहरें** तेचीं गाईलि ॥ ४९ ॥

ग. ना. मुजुमदार

---

# १७ मातुश्री येसुबाई साहेब यांचें एक पत्र

सोबतचें असल पत्र ( ता. १९ एप्रिल इ. स. १७०५ ) गुरुवार वैशाख शुा ७ शके १६२७ मितीचें असून तें मातुःश्री येसूबाई साहेब यांणीं अहमदनगरच्या किल्यांत कैदेंत असतांना श्री. देव, चिंचवड, यांस लिहिलें आहे. मातुश्री येसूबाई साहेब म्हणजे संभाजी महाराज यांची बायको. पत्रांतील मजकुराचा साकल्यानें विचार करितां असें दिसतें कीं या वेळीं येसूबाई साहेबांची फार हलाखीची स्थिति झाली होती. संकटाचा परिहार व्हावा या हेतूनें येसूबाईसाहेब चिंचवडकर देवांकडे पत्रद्वारें धांव घेत आहेत. मराठ्यांच्या इतिहासांतील या आणीबाणीच्या प्रसंगाचीं जितकीं पत्रें बाहेर येतील तितकीं पाहिजे च आहेत. खुद्द येसूबाई साहेबांचें असें एक महत्त्वाचें पत्र आपणांस सादर करीत आहें.

पां. न. पटवर्धन

॥ श्रीशंकर

राजश्री श्री देव स्वामीचे सेवेसी

॥ छ

श्रीमत् परमपूज्य तपोनिधी मुक्तिदायक सकलगुणाल्लंकरण देवमान्य वरदमूर्तीपरायण राजमान्य राजश्री

आज्ञाधारक सेवेसी मातुश्री येसूबाई साहेब दोनी करकमल जोडून चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम तागाईत वैशाख सुध सप्तमी गुरुवार जाणऊन मुकाम अहमदानगरी दुर्गात स्वामीच्या आशीर्वादे करून यथास्थित असे स्वकीय कुशललेखन अज्ञा केली पाहिजे विशेष बहुत दिवस जाले स्वामीनी आशीर्वादपत्र पाठवून बालकाचा परामृश केला नाहीं या करितां चितास स्वस्थता होत नाहीं ते देव जाणे तरी स्वामीनी येणारा मनुश्या बराबरी प्रतिक्षणी आशीर्वादपत्र पाठवीत गेलें पाहिजे विशेष आमचें वर्तमान तरी स्वामीपासी सत्य च लेखन केले पाहिजे चिरंजीव दाजी तों पृथ्वीपतीसमागमे गेले आम्हास सार्वभोमाची आज्ञा जाली की अहमदानगरास जावे आज्ञे प्रमाणे आम्हास अहमदानगरास घेऊन आलें येथे आलिया वरि आजी पांच मास जाले परंतु खर्चाची बहुत तंगचाई जाली काय निमित्य तरी सार्वभोम दूर गेले अमचा तनखा जो दिल्हा तेथे ताम्रानी व हरिभक्तानी व काही काळाने करून प्रतीकूल जाली त्या मुळें द्रव्य येणे राहिले येथे अहमदानगरी साहुकाराचे पांच सात हजार ब्रह्मस्व जालें आता कोण्ही देत नाही

मोंगलिया च पेकियास तागादे लाविले आहेत त्याच्या मुळे बहुत कष्टी होतों तो दुःखसागर स्वामीस काय म्हणऊन ल्याहावा + न जाणो स्वामीच्या सेवेसी रायाजी जाधव पाठविला असे तरी माहाराज कैलासवासी स्वामी गेल्या तागाईत आपणा वरि हा कसाला प्राप्त जाला इंगळास वोळंबे लागले बरें होणार भविष्य त्यास यत्न काय आहे आतां एक स्वामी वितरिक्त आणीक कोणाचा भरवसा या समयांत नाही एक स्वामी च क्लेशपरिहार करितील इतराच्याने काही होणे नाही तरी सारांश गोष्टी की ब्रह्मस्वा पासून मुक्त केलियाने बहुत कीर्ति स्वामीची आहे आणि पाऊस पाणी जालियावरी स्वामी ज्या पासून देवितील त्यास प्रविष्ट करून परंतु हा समय आम्हावरी कठीण पडला आहे आपले कोणी येथें प्रतिपक्षी नाही ऐसा प्रसंग प्राप्त जालां आहे याचे निवारण करणार स्वामी आहेत माझी उपेक्षा केली न पाहिजे वरकड चिरंजिवाकडील सामराज व आमचे वर्तमान रायाजी मुखांतरी चरणापाशी विनंती करितां शृत होईल तें सत्य च मानणे विशेष ल्याहावे तरी आपण अज्ञान मूढ असें लिहिता येत नाही अथवा ज्ञान हि नाही त्या हि वरि आपणाजवळी कोण्ही शाहणा कारकून नाही आवाक्षराची क्षमा केली पाहिजे कृपा आशीर्वाद निरंतर करीत गेले पाहिजे कृपा भासो दीजे जाणिजे मो

श्री
मोर्तब
सुद

सेवेसी सेवक बसवंनाने चरणावरी मस्तक ठेऊन सां दंडवत विनंति उपरि लिा परिसीजे मी सेवक असे आशीर्वाद पत्र पाठवीत जाणे जाणीजे हे विनंति

राा छ ११ माहे मोहरम सन ४९

हे विज्ञापना

## १७१ तकरीबखान कीं मुकरबखान ?

संभाजीस संगमेश्वर येथें पकडणाऱ्या मोंगल सरदाराचें मूळ नांव शेख निजाम असें असून, तकरीबखान अगर मुकरबखान व खान जमान हे त्याचे किताब होत. 'संभाजीचा वध' या निबंधांत संभाजीस पकडणाऱ्या सरदाराच्या नांवाची चर्चा करितांना, त्याचें नांव–अर्थात् किताब–मुकरबखान असें असावें असा मीं तर्क केला होता. शेख निजाम हा पूर्वी कुतुबशाही सरदार असून औरंगजेबास

कितुरीनें येऊन मिळाला. या वेळीं औरंगजेबानें त्यास तेरीख २६ रजब हि० सन १०९८ म्ह० तारीख २९ मे इ. स. १६८७ रोजीं मुकरबखान असा किताब दिल्याबद्दल मुस्ताइदखान यानें आपल्या 'मआसिर आलमगिरीं'त लिहिलें आहे. तकरीबखान हा किताब त्यास केव्हां मिळाला याचा आढळ होत नाहीं. डफचे म्हणण्याप्रमाणें तकरीबखान धरिल्यास हा किताब त्यास केव्हां मिळाला व तकरीबखानाचा मुकरबखान केव्हां व कसा झाला हे प्रश्न उरतात. मुकरबखान व तकरीबखान या दोन फारसी नांवांत लिहितांना बरेंच साम्य असल्यामुळें, मुकरबखानच्या ऐवजीं तकरीबखान असें जें एकदां चुकीनें वाचण्यांत व लिहिण्यांत आलें त्याचा च अनुवाद आजपर्यंतच्या लेखकांनीं केला. शालोपयुक्त पुस्तकांतून हि तकरीबखान असें नांव दिलेलें आढळावें हें हि ठीक च आहे. खरा प्रकार काय हें वर दिलें च आहे. शेख निजाम यास तकरीबखान हा किताब मिळाला नव्हता, मुकरबखानच्या ऐवजीं तकरीबखान असें वाचण्यांत येत असे, खरा किताब मुकरबखान हा होय या गोष्टी माझ्या मतें सिद्ध आहेत.

पां. न. पटवर्धन

## १७२ राजगुरु दादाजी कोंडदेव यांची वंशावळ

सोबतची दादाजी कोंडदेव यांचे घराण्याची वंशावळ विद्यमान पुरुषापर्यंत दिलेली आहे. दादाजी कोंडदेव मलठणचे कुळकर्णी. हा गांव सध्यां भिमथडी तालुक्यांतील दौंड पेट्यांत मोडतो. मलठणास रेलवेचें स्टेशन आहे. शिरूर तालुक्यांतील मलठण गांवाशीं दादाजींचा कांहीं संबंध नाहीं. दादाजीपंतांच्या गांवास राजेगांव-मलठण, व शिरूर तालुक्यांतील गांवास पवारांचें मलठण अशा संज्ञा आहेत. दादाजी कोंडदेवांचे घराणें देशस्थ, ऋग्वेदी, गोत्र शांडिल्य. दादाजीपंतांची ही वंशावळ त्यांचे विद्यमान वंशज रा. गोविंद माधव कुळकर्णी, मलठण, यांजकडे मिळाली.

पां. न. पटवर्धन

### वंशावळ

१ दादाजी कोंडदेव—महादाजीपंत—१ वासुदेव, २ दादोपंत, ३ शामजीपंत
(२), (११) (२०)

२ वासुदेवपंत—१ त्र्यंबकपंत, २ नागोपंत
(३) (७)

३ त्र्यंबकपंत—१ व्यंकटेश २ शिवराम
(४) (६)

४ व्यंकटेश—१ यशवंत* २ सदाशिव
(५)

५ सदाशिव—१ पांडुरंग * २ हरिपंत*

६ शिवराम—भाऊ*

७ नागोपंत—१ काशिनाथ* २ बळवंतराव
(८)

८ बळवंतराव—खंडोपंत – १ दामोदर २ बळवंतराव
(९) (१०)

९ दामोदर—आनंदराव—१ राघुबा २ शंकरराव

१० बळवंतराव—१ गोपाळराव २ नारायणराव

११ दादोपंत—विश्वनाथपंत—१ माधवराव २ गोविंद ३ खंडेराव
(१२) (१३) (१९)

१२ माधवराव—नारायणराव*

१३ गोविंदराव—रामराव—१ लक्ष्मण १ माधव ३ गणेश
(१४) (१५) (१७)

१४ लक्ष्मण—१ विष्णु २ सीताराम ३ वामन

१५ माधव—१ हरीपंत (दत्तक गेला) २ गोविंद
(१६) (१८)

१६ हरीपंत—केशव

१७ गणेशपंत—हरिपंत (दत्तक)

१८ गोविंद—दामोदर

१९ खंडेराव—१ भैराळ २ दादोपंत

२० शामजी—१ विश्वनाथ* २ निळकंठ
(२१)

२१ नीळकंठ— रामराव—भैराळपंत*

---

* = वंशाचें नकळ जालें.

## १७३ हरभट बावा पटवर्धन यांची समाधी

कोतवडेकर पटवर्धन यांचा मूळ पुरुष हरभट बावा. हा पुरुष शके १६८२ मार्गशीर्ष वद्य १, सोमवार, तां० ३ दिजंबर इ. स. १७५० रोजीं पुणें येथें समाधिस्थ झाला. मरणापूर्वी त्यानें चतुर्थाश्रम घेतला होता. त्याचें समाधिस्थान पुणें येथें शनवार पेठेंत ओंकारेश्वरानजीक घर नं. १७५ चे पिछाडीस धक्याचे अलीकडे पिंपळाचे झाडाखालीं आहे. समाधीच्या पूजेस नेमणूक असून, समाधीचा जीर्णोद्धार करण्याचा श्री. सांगलीकर यांचा विचार आहे, असें कळतें.

पां. न. पटवर्धन

## १७४ बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार

सोबतचें पत्र देव-चिंचवड यांचे संग्रहांतील असून, तें शके १६२९ आषाढ शुद्ध ३ शनिवार, ता. २१।६।१७०७ मिनहूचें आहे. तें राजा शिवछत्रपती यांणीं बाळाजी विश्वनाथांस दौलताबाद प्रांताचे सरसुभेदार म्हणून लिहिलेलें आहे. बाळाजी विश्वनाथ पुणें प्रांताचे सरसुभेदार असल्याबद्दल मंडळापुढें चर्चा झालेली च आहे. बाळाजीपंत तदनंतर शके १६२९ सालीं दौलताबादेस सरसुभेदारीचे हुद्यावर असल्याबद्दल आज हें पत्र सादर करीत आहें.

पां. न. पटवर्धन

श्री

देव

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित संवत्सरे आषाढ शुध त्रितीया मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपती याणी राजमान्य राजश्री बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार प्रांत दौलताबाद यांसि आज्ञा केली ऐसी जे फुलाजी भास्कर दि॥ श्री वास्तव्य चिंचवड याजवरी रायाजी मिसाळ याणे नस्ते कुभांड काहादून ५०० पांचसे रुपयांचा तगादा लावून पैसे श्री पासून घेतले म्हणून हुजूर विदित जाले त्यावरून तुम्हास हे आज्ञापत्र सादर केलें आहे तरी तुम्ही हें जाणून रायाजी मिसाळ याचा

मलाहिजा न करिता त्या लमाडास वरजोर ताकीद करून सदरहू ऐवज त्याणे घेतला आहे तो त्याजपासून घेऊन श्रीकडे पैका पाठवून देणे एविशी त्याचा मुलाहिजा न करणे व तुम्ही हि ए गोष्टीस आजिचे उद्यावरी न घालिता देखत आज्ञापत्र त्यास ताकीद करून पैके देववणे जाणिजे बहुत काय लीहिणे

मर्या
देयं विरा
जैते

सुरु सुद बारि

# १७५ श्रीसाखी

कन्धाडाजवळील कासेगांवीं जोशांच्या एथें प्रस्तुत हिंदुस्तानींत लिहिलेलें पत्रक मिळालें. त्यांत १ निरंजन, २ काशीनाथ, ३ सदानंद, ४ शिवानंद अशी गुरुपरंपरा दिली आहे. चांदोरकरकृत संतकविकाव्य–सूचींत ही गुरुपरंपरा सांपडत नाहीं. अर्थात्, प्रस्तुत पत्रकाच्या कर्त्याचें नांव व त्याची गुरुपरंपरा आजपर्यंत अनुपलब्ध होती. या पत्रकाच्या कर्त्याचें नांव कदाचित् श्रीसाखी असें असू शकेल. हें नांव महाराष्ट्र सारस्वतांत अश्रुतपूर्व आहे. श्रीसाखीची कृति पुढें जशीची तशी दिली आहे. भाषा हिंदुस्थानी आहे व ती दोनशें वर्षांहून जुनी नाहीं.

सदर हिंदुस्तानी कृति मंडळाच्या संग्रहास ठेविली आहे.

वि. का. राजवाडे

## श्रीसाखी

अबे देख जोग का मारग देख काफर ॥
क्यों भूल पड़ीं मस्त उवाहय ( ! हुआ है ) गव्हा(वाँ)र ॥
जमका चपेटा हय जबर । किसेंकु घुःसा मत्तकरो ॥
घुमपना डर कर । कथनीकी छांड कर ॥
रहनीका रस्ता धर । साधके पाव पर ॥
आप आप तहकी कर । अर्ध मात्राकी मफी कर ॥
तुर्यैका मिळाफ कर । सत्रीधीका पान कर ॥

परामो आसन कर । उन्मनीकी शेज कर ॥
मातुनीकुं तसलीम कर । सत्ताकी सोय धर ॥
जाणीवकी पैछान कर । आधारका विचार कर ॥
स्वाधिष्टानका रुमज कर । मणिपुरसे सलुख कर ॥
अनुहतकु सरु कर । विशुत्धोमे फैल कर ॥
द्विदलका समेट कर । सहस्रदलमो पैठ कर ॥
त्रिकुट श्रीयाटकी छान कर । गोल्हाटकी खबर कर ॥
औठ पीठपर चढाव कर । भ्रमरगुंफमो ठान कर ॥
ब्रह्मरंध्रका भेद कर । पुण्यागिरीका राज्य कर ॥
चिद्रूरवका दरसन कर । आतमनाथकी पूजा कर ॥
लडीकी बुझ कर । पडीकी सुझ कर ॥
खडीको रीझ कर । सोया रहसो वेपर ॥
गाजीमे जागा रहा । अंध पंगूकी काट कर ॥
मुक बधीरकी नजर कर । कुब्जोकी सहल कर ॥
नादकी मुरत धर । बिंदुकी रीत कर ॥
काफाकी सुरत कर । ज्योतका ठिकान कर ॥
पिपीलिका पंथ धर । बिहगका उड्डान कर ॥
मीनकी रह धर । कपीका उलट कर ॥
शेसकी मजल कर । बिडा पिंगलका फेर कर ॥
सुख मनाकुं सेचे कर । कुंडलीनीकुं चेत कर ॥
उलट नयनोका मार कर । जोगकी कमाई कर ॥
ग्यानकी अबादानी कर । बावंनीका बयाज कर ॥
बारासोकी झडती कर । अष्ट्यात्तरकु पार कर ॥
नीरंजनकी भेट कर । काशीनाथकुं राजी कर ॥
सदानंदके पग धर । और शिवानंदसें मिल मिल रह ॥

## १७६ श्रीधर स्वामी नाझरेकर यांचा समाधिकाल व परंपरा

१ रा. ब. काशिनाथ नारायण साने यांनीं भा. इ. सं. मंडळापुढें शके १८३३ मध्यें वाचिलेल्या श्रीधरस्वामीवरील आपल्या निबंधांत, (१) श्रीधरानें चौदा वर्षांच्या वयांत च संन्यास घेतला; व (२) तो पैठण येथें समाधिस्थ झाला ह्या दोन प्रचलित कल्पनांचें निरसन करण्याचा पहिला मान मिळविला. ह्यानंतर त्यांनीं आपला शोध चालू ठेविला च होता. ह्यापुढील शोधाचें दृश्य स्वरूप शके १८३५ मधील आश्वीन महिन्यांत रावबहादूर यांनीं 'श्रीधरस्वामी पुन्हां एकदां' या मथळ्याखालीं वाचिलेल्या निबंधानें इतिहासभक्तांपुढें आलें. या उक्त रोक्त निबंधांत जी बरी च महत्त्वाची माहिती संकलित केली आहे, तींत श्रीधराच्या मृत्युशकावरील चर्चेस अग्रस्थान दिलें पाहिजे. मृत्युशकाचे चर्चेस रावबहादुरांनीं पंढरपूर येथील कुंभार घाटावरील श्रीधराचे समाधीवरील खंडित लेख आधार धरून, श्रीधर शके १६५१ सौम्यवत्सरीं समाधिस्थ झाला असें सिद्ध करण्याचा चांगला प्रयत्न केला. परंतु हा शिलालेख खंडित असा असल्यामुळें, १६५१ हा शक शिलालेखघटनेचा होय, अशी शंका यावर घेतां आली. लष्कर ग्वाल्हेर येथील रा० लक्ष्मण विसाजी वैद्य यांनीं विविधज्ञानविस्ताराचे मे १९१५ चे अंकांत ही शंका घेतलेली आहे. बाकीं समाधिघटनेचा शक समाधीवर कोणी देत नाहींत, आणि तो हि मरणतिथीपासून एक वर्षाच्या आंत तर कोणी ही देणार नाहीं; दिला च तर निराळा च देतील. शोधाअंतीं पंढरपूर येथें रा० कृष्णाजी आपाजी नाझरेकर यांचे संग्रहीं असलेल्या एका बाडाचे ३८५ वे पृष्ठावर श्रीधरसुत दत्तात्रय यानें रचिलेली खालील आरती आढळली.

### आरती

जय देव जय देव श्रीधर गुरु स्वामी ।
जड जिव पावन जाले तव गुणरुपनामीं ॥ धृ० ॥
सुमाघ वद्य त्रितिया शशिवासर उदई ।
सुसौम्यवत्सरिं *सौम्यायनिं विठलपाई ।
सोळा शत एकावन अर्यमउडुसमई ।
पंढरपुर सत्क्षेत्रीं समाधि ते ठाईं ॥ १ ॥ धृ० ॥

---

* सौम्यायनिं = उत्तरायणीं

भारत भागवतादिक रामायण टीका ।
अनुभव पाहतां भासे संसृतिभव लटिका ।
भगवत्स्मरणविरहित न मने पळ घटिका ।
माइक धंदा न मने माइक मठमठिका ॥ २ ॥
आनंद मठ कल्याणीं तो गुरु मठ कुळीचा ।
काया वाचा स्मरणे दिगंबर मुळिचा ॥
सहज पूर्ण दत्तात्रय ब्रह्मान्वय स्थळिचा ।
दत्तात्रय वर श्रीधर नृपत्रिकुटाचळिचा ॥ ३ ॥

या आरतींत श्रीधर शके १६५१ सौम्यवत्सरीं माघ वद्य त्रितीया सोमवार रोजीं समाधिस्थ झाल्याबद्दल स्पष्ट उल्लेख आलेला आहे. गणित करून पाहतां या तिथीस सोमवार येत असून, इंग्रजी तारीख २६ जानेवारी स. १७३० ही येते. श्रीधराचे समाधिकालाविषयीं तत्सुत दत्तात्रय याचा वरील पुरावा इतिहासाचे व प्रमाणशास्त्राचे कसोटीस पूर्णपणें उतरणारा आहे. श्रीधराची पुण्यतीथ दर वर्षी त्याचे घराण्यांत माघ वद्य तृतीयेस साजरी करितात ही गोष्ट हि विचारांत घेतली म्हणजे श्रीधराचे मृत्युकालाविषयीं आतां शंका च उरत नाहीं. कुंभार घाटावरील शिलालेखाचे अखेरीस जो शक दिला आहे तो रा. वैद्य यांचे म्हणण्याप्रमाणें शिलालेखाचे घटनेसंबंधाचा नसून, श्रीधराचे समाधीचा होय, हें अर्थात् च उघड होत आहे.

२ श्रीधरास टाकळी गांव इनाम करून दिल्याबद्दलचें राजपत्र राज्याभिषेक शके ५५ कीलक संवत्सरे माघ शुद्ध अष्टमी भानुवासर ह्म. शके १६५० माघ शुद्ध. ८, ता. २६।१।१७२९ रोजीं मिळालें, व त्यानंतर इंग्रजी तारखेनें बरोबर एक वर्षानें ह्म. ता. २६।१।१७३० रोजीं श्रीधरस्वामी समाधिस्थ झाले. रा. वैद्य यांनीं आपल्या 'पत्रव्यवहारांत' शक वगैरे संबंधानें जो मासलेवाईक घोटाळा उडवून दिला, त्याला कारण त्यांचें इतिहासाचें अज्ञान हें च होय.

३ दत्तात्रयकृत श्रीधराचे गुरुपरंपरेवरील श्लोक त्या च बाडांत पृ. ३८५ वर उपलब्ध झाले; ते श्लोक असेः---

श्रीआदिनारायण क्षीरसागरीं । नमो विधाता कनकाद्रिसीखरीं ॥
अत्री सिह्याद्रीवरि सत्य जाणा । श्रीदत्त मातापुरी देव जाणा ॥ १ ॥

सदानंद कृष्णातिरिं च वसणें निंबनगरीं ।
रमे रामानंद इति महास्मशानी सिवपुरी ।

निजानंदीं वृत्ति अमळकुपिनी पै भरी सदा ।
नमूं त्या गंभीरा विचरत चि रामेश्वरी तदा ॥ २ ॥
वसे ब्रह्मानंद अतिनिकट त्या पुंडलिक तळीं ।
असे श्रीकल्याणीं सहज सहजानंद जवळी ॥
इति पूर्णानंद अचल विलसे गोळवणिया ।
स्वसिष्यातें तारी निजशिरीं धरी पायवणिया ॥ ३ ॥
दत्तानंद नाझरे माणदेसी । ब्रह्मानंद स्वामी श्री पंढरीसी ॥
माझा नांदे श्रीधर स्वामि जेथें । दत्तात्रयाराहणे सत्य तेथें ॥ ४ ॥

ह्या चार श्लोकांवरून श्रीधराची परंपरा चांगली लक्षांत येते. श्रीधरानें शिवलीलामृतांत आपला सांप्रदाय दिला आहे, त्यांत व वर दिलेल्या सांप्रदायांत विशेष हा कीं, सांप्रदाया संबंधींचे उत्तरोक्त श्लोकांत त्या त्या गुरूंची समाधि- स्थानें दिलीं आहेत. संशोधकांस ही माहिती उपयोगी अशी च वाटेल.

४ श्रीधरस्वामी कुटुंबी होता, हें आतां निश्चित झालेलें आहे. परंतु त्याच्या बायकोचें नांव काय, हें कोठें वाचण्यांत व ऐकण्यांत आलें नव्हतें. रा. कृष्णाजीपंत नाझरेकर यांचे संग्रहीं श्रीधराचे पुत्र दत्तोबा व मनोहर हे शके १६५९ माघ वद्य दशमी रोजीं विभक्त झाल्याबद्दलची फारखत मिळाली. त्यांत 'या खेरीज पार्वतीबाई मातोश्रीपासी तोळा व मासा आहे तो तीमाघारा दो ठाई करून घ्यावा ' असा मजकूर आहे. फारखत असल आहे. यावरून श्रीध- राच्या बायकोचें नांव पार्वतीबाई असून, ती शके १६५९ नंतर केव्हां तरी वारली असावी, असें सिद्ध होतें.

५ भक्तमंजरीचे आधारें श्रीधराचें चतुर्थाश्रमी नांव 'कान्तानंद' असें असल्याचें रा. चांदोरकर आपल्या महाराष्ट्रीय संत–कवि–काव्यसूचींत लिहि- तात; परंतु श्रीधराचे संबंधींचे असल पत्रांत अथवा त्याचे संबंधींचे शिलालेखादि ठिकाणीं 'कान्तानंद' या नांवाचा कोठें उल्लेख आढळत नाहीं. यावरून श्रीध- राचे ह्या चतुर्थाश्रमांतील नांवाविषयीं शंका येते. माझा कयास असा आहे कीं, श्रीधरानें चतुर्थाश्रम स्वीकारला नसावा व यदाकदाचित् स्वीकारला असल्यास तो आतुरसंन्यास असावा.

पां. न. पटवर्धन

# १७७ श्रीधरस्वामी नाझरेकरकृत संतमाळा व संप्रदायपरंपरा

खालील माहिती श्रीधरस्वामींचे पंढरपूर येथील विद्यमान वंशज रा. रा. कृष्णाजी आप्पाजी नाझरेकर यांचे घरीं असलेल्या एका बाडाचे आधारावरून रा. राजारामपंत देशपांडे यांचे मार्फत आलेली आहे. सदरहू बाड जुनरी कागदाचें असून, त्याचीं ३९० पृष्टें आहेत. पहिलीं १८५ पृष्टें कीर्तनास उपयोगी पडतील अशा मजकुराचीं आहेत. पृ० १८५ ते २६५ पावेतों श्रीधरस्वामींचीं स्फुट पदें आहेत पृ० २६२ ते २६७ श्रीधरस्वामींनीं केलेल्या आरत्या आहेत. पृ० २७१ ते २७४ यांत ब्रह्मानंदस्वामींचीं स्फुट पदें आहेत. व पृ० ३८३ ते ३८५ यांत श्रीधरस्वामींचे चिरंजीव दत्तात्रय, जे आपणास 'दत्तात्रयवर श्रीधर' असें म्हणवितात, त्यांनीं केलेल्या आरत्या आहेत. संतमाळा व परंपरा हीं श्लोकात्मक प्रकरणें ह्या च बाडांतील होत.

श्रीधरस्वामींचे वडील ब्रह्मानंदस्वामी हे शके १६१५ मार्गशीर्ष शु० २ रविवारीं ( श्रीमुखसंवत्सरांत ) समाधिस्थ झाले, ह्यास आधार पुढील श्लोकः—

शाके बाणमहीरसेन्दुप्रमिते वर्षाव्हये श्रीमुखे
मासे मार्गशिरे सिते द्व्यतिथौ भानौ तु याम्यायने ।
श्रीमद्विठ्ठलसंस्थिते पुरवरे भीमातटे सुन्दरे
ब्रह्मानंदयतींद्रयोगपदवीं सौख्ये समाधौ स्थितः ॥

( याम्यायने म्ह० दक्षिणायने )

का. ना. साने

## श्रीधरस्वामीकृत

संतमाळा श्लोक

पिता ब्रह्मानंद* विलसत जगीं एक जनिता
तयाची सावित्री विमल निजशांती सुवनिता ।
तयां पायीं प्रेमें श्रिधर निजभावें करुनिया
सुखें तेणें रंगे अखिल निजमुक्ती वरुनिया ॥ १ ॥

---

* 'ब्रह्मानंदीं' असें असल्यास छंदोभंग न होतां अर्थाची हि पूर्तता होते.

भिमेच्या तिरीं ब्रह्मसाम्राज्य सेजे । समाधिस्त तो चित्सुखानंद मोजें ।
यति ब्रह्ममूर्ती महत्सौख्यराशी । दिनोद्धारणा वास ते पंढरीसी ॥ २ ॥
मतांतरें नाशुनि सर्व पाही । लीलावतारी शिव तो विदेही ।
सच्चित्सुखें चिन्मय मोक्षदानी । आचार्य तो शंकर पूर्ण ज्ञानी ॥ ३ ॥
गीतादिका भागवता वरी हो । केली टिका सुंदर साजिरी हो ।
जे साधका लागुनी सौख्य खाणी । तो श्रीधराचार्य नमूं सुवाणी ॥ ४ ॥
जन्मोजन्मीं साधिता ज्ञानपष्ट* । पोटा आला बाळ तो योगभ्रष्ट ।
आचार्यांसीं बोलिला ज्ञानवाणी । हस्तामळका लागिं हो कोण वानी ॥५॥
कलौ युगीं हो अवतार जाला । मी काय वर्णू हरिनाथलीला ।
मांडीवरी श्रीपदखूण दावी । त्या श्रीहरींतें स्मर एकभावीं ॥ ६ ॥
चातुर्यचूडामणि ज्ञानवक्ता । वाराणसी माजिं निवासकर्ता ।
मुकुंदराजें ध्वज लावियेला । विवेकसिंधू प्रगटार्थ केला ॥ ७ ॥
विवेककाठी धरिली करीं हो । गो इंद्रियें जो दृढ आवरी हो ।
वैराग्य योगें परिपूर्ण शांती । गोरक्ष तो पावन पुण्यकीर्ती ॥ ८ ॥
उत्पन्नज्ञानी परिपूर्ण योगी । पूर्ण स्थिती बाळपणीं विरागी ।
निवृत्तिबोधें मन स्थीर ज्याचें । त्या नीवृतीते स्मर तूं सुवाचे ॥ ९ ॥
वैकुंठराजें निजभक्तकाजा । गीतार्थ केला परिपूर्ण वोजा ।
ज्ञानेश्वराचें निजनाम वाचे । स्मरा स्मरा तो यम काळ कांचे ॥ १० ॥
आपार जीवां प्रति उद्धराया । सुकाळ ज्ञानें सकळां कराया ।
सोपानदेवें निजज्ञान योगें । हे उद्धरीले जिव लागवेगें ॥ ११ ॥
जें ईश्वराची निजशांति पाहीं । ते चित्कळा मुक्त कुमारदेहीं ।
वाटेश्वरा लागुन ज्ञान दाती । मुक्तेश्वरी ते स्मर एकचित्तीं ॥ १२ ॥
पद्मावतीचे गतप्राण आणी । रासक्रिडा वर्णुन चक्रपाणी ।
संतोषवीला निजभक्तियोगें । जयदेवस्वामी स्मर लागवेगें ॥ १३ ॥
जो पंडितां माजिं सुरत्न खाणी । श्रीरामआर्या वदली सुवाणी ।
त्या मुद्गलाचे अवडि स्वभावीं । तजून पावा हरि चाप दावी ॥ १४ ॥
जो पंढरीये निजभक्त मोठा । श्री पांडुरंगीं दृढभाव निष्ठा ।
ज्याशीं सदा श्रीहरि खेळ खेळे । तो नामदेवो स्मर एकवेळे ॥ १५ ॥
जो मल्लवंशावरि वीतरागी । कबीर मृत्युंजयपूर्ण योगी ।
निजात्म ज्ञानें ध्वज लावुनीयां । गेले जनासी रूप दाउनीया ॥ १६ ॥

---

* ज्ञानस्पष्ट ?

जे एकनिष्ठा हरिशीं धरी हो । कल्पांत जाल्या न टळे तऱ्ही हो ।
श्री पांडुरंगें दिधली स्वमाळा । त्या भानुदासा स्मर वेळुवेळा ॥ १७ ॥
एकात्मता साधुन जाण एका । एकादशाची करि शुद्ध टीका ।
जनार्दनाचें प्रिय पात्र पाहीं । त्या एकनाथा स्मर तूं सदा ही ॥ १८ ॥
हरि गुण लीला वर्णित वाचे । अद्भुत बोल रसाळ जयाचे ।
प्रेमळ भक्त सुखार्णव साचे । पाठकनामा वद वद वाचे ॥ १९ ॥
श्री रामकृष्णादि चरित्र ज्याचें । जे वाचितां लागत गोड साचें ।
चातुर्य भक्तीसह बोल बोले । मुक्तेश्वरा त्या स्मर ये सुवेळे ॥ २० ॥
श्रीरामरंगे परिपूर्ण जाला । चातुर्य सिंधू निजभक्त लोला ।
वाचस्पतीची सरि मुद्गलातें । त्या कृष्णदासा स्मर एकचित्तें ॥ २१ ॥
जो भक्ति-ज्ञानीं परिपूर्ण जाला । तुका असें बोलति लोक त्याला ।
तुकावया कोण दुजा तयासी । तुका स्मरे कां तरि ज्ञानराशी ॥ २२ ॥
चिद्व्योमिंचा हा निजसूर्य कैसा । वक्ता अपाडे शुक पूर्ण जैसा ।
ज्याचे पुराणीं निवती सुयोगी । त्या विश्वनाथा स्मर लागवेगीं ॥ २३ ॥
श्रवणीं जयाची स्थिति पूर्ण कैशी । परीक्षितीची निजरीति जैशी ।
प्रेमामृताचा परिपूर्ण भोक्ता । चिंता मनीं त्या भगवंतपंता ॥ २४ ॥
प्रेमामृतें हो मन पूर्ण धालें । बोलें जयाच्या जन हे निवाले ।
यथार्थ ज्ञानें विचरे स्वलीला । त्या केशवातें स्मर वेळवेळां ॥ २५ ॥
निस्सीम शांती परिपूर्ण आंगीं । जो ब्रह्मचारी गुरुभक्त योगी ।
सच्चिद्घनीं जो पहुडे अरामी । स्मरा स्मरा तो जयराम स्वामी ॥ २६ ॥
विरोनिया वृत्ति मुरोनि गेली । सौख्यार्णवीं केवळ लीन जाली ।
पूर्णस्थिती सेवुनि पूर्ण धाला । स्मरें निजानंद गुरूवराला ॥ २७ ॥
ज्ञानाब्धीचा चंद्र तो पूर्ण साजे । ब्रह्मानंदा ज्येष्ठ बंधू विराजे ।
ज्ञानानंदा वर्णु मी जाण काय । बोलें ज्याच्या कल्पना शांत होय ॥ २८ ॥
आकाशिची ते गजढाल जैशी । अगाध विश्वीं निजकीर्ति तैशी ।
निजात्मबोधें विचरे स्वलीले । श्रीरंगनाथा स्मर एकवेळे ॥ २९ ॥
जो कीर्तनीं केवळ मेरु जैसा । प्रतापतेजें तरणी च जैसा ।
नामें तयाच्या भव संहरू हो । श्रीरंग आम्हां चुलता गुरू हो ॥ ३० ॥
वाचस्पती पावत हो सरीसी । दया क्षमा तिष्ठति जाण दासी ।
जो रंगनाथा प्रियपात्र बंधू । त्या विठ्ठलातें स्मर सौख्यसिंधू ॥ ३१ ॥
ज्या सद्गुरूवाचुनि देव नाहीं । असोनि देही परि तो विदेही ।
श्री रामसेवा हृदयीं धरी रे । आनंतमूर्ती स्मर अंतरीं रे ॥ ३२ ॥

निःसीम भक्ती रघुनाथपायीं । वैराग्य योगें विचरे सदा ही ।
त्या रामदासें ध्वज लावियेला । श्री रामनामें जन नीववीला ॥ ३३ ॥
सदा कृष्ण गाये मनीं कृष्ण ध्याये । अहोरात्र जो चिंतितो कृष्णपाये ।
सदा सर्वदा कृष्णरूप चि जाला । रमावल्लभातें स्मरें वेळवेळां ॥ ३४ ॥
श्लोकार्थ ज्याचा बहु गोड लागे । जें ऐकतां आन मना न लागे ।
स्मरें सदां तूं तरि वामनासी । विचार सारा शिकवा मनासी ॥ ३५ ॥
विचार सारामृत पूर्ण जाणे । एकात्मते वाचुन आन नेणे ।
ज्याच्या गुणाची न गणेची सीमा । स्मरें सदा त्या प्रभु शीवरामा ॥ ३६ ॥
जो अंतरीं ठेवुनि पूर्ण दृष्टी । चिन्मात्ररूपें मग पाहे सृष्टी ।
निरंजनाला स्मर तूं सदा रे । विकल्पभेदा न धरीं कदा रे ॥ ३७ ॥
सर्वै रुपें तो हरि एक जाला । नानावतारें हरिची स्वलीला ।
तें ब्रह्म तूं केवळ संत पाहीं । अभंग हो श्रीधरभेद नाहीं ॥ ३८ ॥
जपा सदा हे निजसंत माळा । पाहूनिया चिन्मय रूप डोळां ।
हें श्रीधरें गुंफुनियां स्वभावें । घाली गळां ते स्वसुखानुभावें ॥ ३९ ॥
विहाय तापं सशरं कराग्रं । ग्रहाण पाणौ मणिचारुवेणौ ।
मयूरपिच्छाणि (नि?) कुरु त्वमंगेः । सीतापते त्वां प्रणमामि पश्यात् ( पश्चात् !) ॥

## परंपरा

नमूं त्या श्रीदत्ता तदुपरि सदानंदचरणा
नमूं रामानंदा अमळ गुरु गंभीर सगुणा ।
नमूं त्या सद्भावें सहज गुरुपूर्णा अवधुता
नमूं ब्रह्मानंदा निजगुरु यती पूर्ण भरिता ॥ १ ॥

परंपरेचे मुनिवर्य योगी । पूर्णाद्वयीं जे निज सौख्य भोगी ॥
ऐका तयांची गुणकीर्ति कानीं । पावा तुम्ही चिन्मय सौख्य खाणी २ ॥
जें पूर्ण ब्रह्म निजनिर्गुण सौख्यरूपीं । ज्याचें स्वरूप पहातां पहातां अरूपी ॥
जो योगिया निजगुरू सकळांसि आदी । त्या विष्णुसीं नमुं परात्पर ज्ञानसिद्धी ॥ ३ ॥
तेथूनिया विधि सुपुत्र सुशिष्य जाला । तो गुह्यज्ञान पुसता मग त्या अजाला ।
सुश्लोक चारि गुज भागवताख्य होते । बोधूनि स्वानुभव खुण कथी अहो ते ॥ ४ ॥
ब्रह्मा कथीत मग अत्रिस गुह्य ज्ञान । बोधूनिया करितसे अपणा समान ।
जो शांत दांत सुखसार उर्ध्वरेता । भार्या तया अनुसया मुळ आदिमाता ॥ ५ ॥
गुणत्रयाचा लय जेथ केला । अत्री ऋषीच्या हृद्यासि आला ॥
ज्या पासुनी ज्ञानप्रकाश जाला । श्रीदत्त देवा स्मर वेळवेळा ॥ ६ ॥

सदानंदरूपें सदानंद चाले । सदानंद सौख्यें सदानंद डोले ॥
सदानंदनामें सदानंद गाजे । सदानंदरूपीं सदा तूं विराजे ॥ ७ ॥
आराम जो का सकळां जिवांचा । वर्णू तयाचे गुण केवि वाचा ॥
वाराणसीये निजवास केला । वंदूं तया रामपदांबुजाला ॥ ८ ॥
मळरहित जयाचें रूप तें पूर्ण पाहिं। तम सकळ विनाशी सर्वदा तें चि ध्यायीं॥
यतिवर महाराजा नाम घेई तयाचें । अमळ अमळनामें सर्वदा तूं च साचें॥९॥
ज्याच्या रुपातें चळ तो असेना । ज्याचे स्वरूपीं दुसरें दिसेना ॥
तो गंभिरानंद मुनींद्रराजा । वंदूं तयाचे पदरेणु वोजा ॥ १० ॥
आनंदाची ओतली मूर्ति पाहीं । स्वानंदें तो सर्वदा ही विदेही ॥
ब्रह्मानंदा कोण वर्णील वाणी । चित्सौख्याची अक्षयीं पूर्ण खाणी ॥ ११ ॥
कल्याण जें का सकळां जिवासीं । समाधि तेथें यतिराजयासीं ॥
सहजें जगातें निज खेळ दावी । सहजेश्वरा त्या हृदयांत भावीं ॥ १२ ॥
सदा पूर्ण आनंद जाला जयासी । जया वर्णितां पूर्णता ये मनासी ॥
नसे पूर्ण आपूर्ण ज्याचे स्वरूपीं । स्मरें तो सदा पूर्ण होसी अरूपी ॥ १३ ॥
जें नाझरें माणनदी विराजे । आनंद हें नाम मठासि साजे ॥
समाधि तेथें सुखरूप भोजें । दत्तात्रयाची निजकीर्ति गाजे ॥ १४ ॥
श्रीमुख संवत्सर नाम ज्याचें । मार्गेश्वरीं शुद्धबिजेसि साचें ॥
श्रीपंढरी क्षेत्र अबाध कीर्ती । निवास जाला यतिराजमूर्ती ॥ १५ ॥
श्रीचंद्रभागातिर जेथ आहे । भीमा पुढें वाहत पूर्ण पाहे ॥
समाधि तेथें यतिराजयाची । अनाथबंधू गुरू माझयाची ॥ १६ ॥
संसारसंगें न सिणे कदा ही । विरक्तज्ञानी विचरे विदेही ॥
यतीश्वरा मंडण स्वामि माझा । श्री ब्रह्ममूर्ती गुरुदेवराजा ॥ १७ ॥
सच्छिष्य जे का असतील कोण्ही । परंपरा हे वदती स्ववाणी ॥
हे श्रीधरें गुंफुनि श्लोक साचे । निर्मूळ केलें मुळ या भवाचें ॥ १८ ॥

---

निर्गुणं निर्विकल्पं च निर्विकारं निरामयम् ।
अव्ययं पुरुषं साक्षात् ईश्वरं प्रणमाम्यहम् ॥ १ ॥
ईश्वरात् संप्रदायस्य* दत्तात्रयमहामुने× ।

---

* संप्रदायश्च । × मुनेः ।

नमस्त्रिमूर्तिरूपाय दिगंबरधराय च ॥ २ ॥
दत्तात्रयोपदेशश्च सदानंद महामुनेः ।
सदानंदैकलीलाय महाराजविभूतये ॥ ३ ॥
सदानंदोपदेशस्य रामानंदयतीश्वरं ।
सदानंद समुत्पन्ये अमलानंद सद्गुरु ॥ ४ ॥
अमलोद्भूत गंभीरो महाराजयतीश्वरम् ।
गंभीरात् सततं ब्रह्मयोगिराजं नमाम्यहम् ॥ ५ ॥
ब्रह्मोपदेशसंपन्नो सहजानंदरूपकं ।
कल्याणनामनगरे समाधिस्थो यदृच्छया ॥ ६ ॥
सहजानंदोपदेशस्य पूर्णानंदगुरुस्तथा ।
पूर्णानंदरुपापूर्ण दत्तात्रय महामुनि ॥ ७ ॥
दत्तात्रयसमुत्पन्नो ब्रह्मानंद महायति ।
कैवल्यपददातारं महाराजं नमाम्यहम् ॥ ८ ॥
मार्गमासे सिते पक्षे द्वितीया रविवासरे ।
यदृच्छया समाधिस्थो ब्रह्मानंदमहायतिः ॥ ९ ॥
वत्सरः श्रीमुखो नाम चंद्रभागासरोवरे ।
पांडुरंगमहाक्षेत्रे भीमातीरनिवासिने ॥ १० ॥
नमो ज्ञानवरिष्ठाय ब्रह्मानंद यतीश्वरं ।
सच्चिदानंदरूपाय गुरुनाथाय ते नमः ॥ ११ ॥
आनंदसंप्रदायस्य त्रिकालं पठेत नरः ।
ज्ञानसंपन्नमुक्तो वै यस्य सत्यं न संशयः ॥ १२ ॥
यतः स्तोत्रं कृतं लोका श्रीधरेण यदृच्छया ।
एकभावं पठेद्धीमान् मुक्तः स्यात् सर्वबंधनैः ॥ १३ ॥

## १७८ जयरामस्वामी वडगांवकर यांचे मठासंबंधीं कांहीं कागद

सोबतचे सात लेखांक सदर मठास वेळोवेळीं मिळालेल्या सनदांच्या नकला आहेत. या नकला मला रा. दत्तोपंत भिसे यांचे मार्फत मिळाल्या. यांतील लेखांक ७ चे कागदावरून नारो शंकर राजेबहादर हे प्रतिनिधिपदावर कांहीं दिवस होते हें स्पष्ट होत आहे. तसें च, लेखांक १ यांत संताजी घोरपडे हे जोहार लिहितात ही बाब नमूद करण्यासारखी आहे.

य. चिं. मेहेंदळे

लेखांक १ नकल

श्रीशंकर (चैत्र व. ५ शके १६१९)

जयरामस्वामी

राजश्री सरदार पागा व सिलेदार गोसांवी यांसि

॥ छ अखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्य स्ने ॥ संताजी घोरपडे सेनापति जफ्तनमुलुक जोहार सु ॥ सबा तिसैन अलफ मौजे वडगांउ ता। निंबसोडी हा गांव राजश्री यांचा आहे तरी तुम्ही या गावाच्या वाटे नंव जाणे गेलिया तुमचा मुलाहिजा होणार नाही येसे खरें समजोन या गावाचे वाटे नंव जाणे जाणिजे छ १८ रमजान

श्री राजा
राममक्तस्य ज
फतन्मुलुकस्य च
संताजी + + +
+ + +

लेखांक २ (भाद्रपद वद्य १ शके १६३०)

श्रीराम नकल

जयराम गोसावी

राजश्री अंताजी माहादेव सुबेदार कारकून दि॥ सरदेसमुखी सुभा प्रा सटाव वर्तमान व भावी गोसांवी यांसि

छ अखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्य सेवक नारो प्रलाद आजाहात सरदेशमुख नमस्कार सु॥ तिसा मया अलफ सुबेमजकुरी राजश्री यासि आनछेत्रास इनाम गांव आहेत बि॥

| | |
|---|---|
| मौजे रायेगांव ता॥ | मौजे वडगांव ता॥ निंबसोड |
| आउद हे पुरातन | हे नूतन राजश्री माहाराज |
| १ | स्वामीने पत्र दिल्हें |
| | १ |

वकूण दोन गांव इनाम चालत आहेत त्यास हुजुर राजश्री विठोबा गोसावी येऊन विदित केले की मौजे रायेगांव हे पूरातन आहे त्यास पूर्वापर सरदेसमुखी ही कोण्ही घेतली नाही व हाली मौजे वडगाव तो राजश्री माहाराज स्वामीने नूतन गाव दिल्हे आहे तरी या दो गांवासि सरदेसमुखीचा उपसर्ग न लागे ते गोष्टी केली पाहिजे म्हणून विदित केले येसियांसि पूर्वी राजश्री हिंदुराऊ घोरपडे याचे कारकीर्दीस रायेगावी सरदेशमुखी घेतली नसेल हे मनास आणून तुम्ही सरदेसमुखीचा उपसर्ग न लावणे व नूतन वडगावासि हि सरदेसमुखीचा उसूल न घेणे राजश्री गोसावी याचे चालवणे हे राजश्री माहाराज स्वामीस आगत्य आहे तरी हरदो गावांसि येकंदर उपसर्ग सरदेशमुखीचा न लावणे असल पत्र गोसावी याजवल भोगवटियासिं फिरोन देणे या पत्राची तालिक लेहोन तुम्ही घेणे जाणिजे छ १४ जमादिलाखर हे विनंति

अष्टकोनी
शिक्का-अक्षरें
लागत नाहींत.

मोर्तब
सुद

लेखांक २ (पौष शु. ११ शके १६३०)

श्री नकल

जयराम

राजश्री हवालदार व कारकून व मुकासी मानिहाय पंचमाहाल सुभा खटाउ गोसावी यासि

॥ छ अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य

श्रे ॥ श्रीनिवास माधवराऊ आसीरवाद आनुकर्मे नमस्कार सुहुर सन तिसा मया आलफ राजश्री स्वामी यास मौजे वडगाउ कर्यात निंबसोड-माइणी हा गाउ इनाम आहे तर तुम्ही मौजेमजकुरास येकदर उपसर्ग देत नवजाणे बिलाकुसुर स्वामीकडे चालो देत जाणे हरयेकविषीचा यक रुकियाचा तोसीस न देणे जाणिजे र॥ छ ९ सौवाल हे विनंति

अष्टकोनी
शिक्का अक्षरें
अस्पष्ट

लेखांक ४ (शके १६४९)

श्री नकल

श्रीकृष्णजयराम

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५४ पूर्वंग नाम संवत्सरे अस्विन बहुल पंचमी मंदवासरे क्षत्रियेकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी याणी देशमुख व देशपांडे का। निबसोड-माईणी सुभा प्रांत खटाउ यासि आज्ञा केली

श्री
राजा शंभु छ
त्रपति हर्षनिदान
रघुनाथसुत तिमा
जी पंडीत मुख्य
प्रधान

श्री आई आ
दि पुरुष श्रीराजा
शिवछत्रपाति स्वामि
कृपानिधि तस्य प
रशराम त्र्यंबक
प्रतिनिधि

येसीजे राजश्री रुद्रमुनि संप्रदाय श्री स्वामी याचे मठाकडे अतीत आभ्यागत आन्नछत्राचे आनकूलतेस मौजे वडगाव का। मजकूर हा गांव इनाम सर्वमान्य पहिले पासून चालत आहे त्याप्रमाणे पुढे हि सुरक्षित इनाम चालविल्याने स्वामीस व स्वामीचे राज्यास कल्याणावह याकरिता मौजेमजकूर श्री चे मठाकडे पेसजीपासून इनाम चालत आला आहे त्याप्रमाणे पुढें हि इनाम चालवायाची आज्ञा करून तम्हास हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्ही हे जाणून मौजेमजकूर पूर्ववतप्रमाणें श्री चे मठाकडे इनाम सर्वमान्य चालवीत जाणें प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षप न करणे या पत्राची प्रती लेहून घेउनु असल पत्र भोगवटियास परतोन देणे निदेश समक्ष

मर्यादेयं
विराजते

फ्तरजु सुरनवीस
बार सुरुसुद बार

लेखांक ५ श्री आश्विन वद्य १२ शके १६४९


जयराम नकल

छ मा। अनाम देशमुख व देशपांडिये कर्यात निंबसोड-माईणी सुभा प्रांत खटाव यासी जयसिंग जाधवराउ सेनापती जफ्तनमुल्क सु॥ समान अशरीन मया

अलफ राजेश्री रुद्रमुनी संप्रदाये श्रीस्वामी याचे मठाकडे अतीतअभ्यागतासं अन्नछेत्राचे अनकूलतेस मौजे वडगाउ कामजकूर हा गांव इनाम सर्वमान्ये

श्री
शंभु छत्रप
ति चरणी दृढभा
व सभापति ज
+ सिगजाध
वरा +

हुजरून पहिले पासून चालत आहे त्याप्रमाणें पुढें हि इनाम सर्वमान्य पूर्वतर जे उत्पन्न होत जाईल ते गावास ताकीद करुनु पावीत जाणे साल दर साल ताजे सनदेचा उजर न करणें या पत्राची प्रती लेहुन घेउनु असल पत्र भोगवटीयासि पत्र परतुनु देणेंविशीं हुजरून राजेश्री स्वामीचे राजपत्र हि तुम्हास आलाहिदा सादर आहे त्याप्रमाणे वर्तत जाणें जाणिजे रा। छ २५ सफर



**लेखांक ६** नकल

श्रीसुबराज अश्विन वद्य ७ शके १६४९

(चौकोनी शिक्का)

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री हिंदुराव घोरपडे सरदेसमुख ममलकतमदार तां। मोकदमानी मौजे वडगाव करियात निमसढ–मायणी सुभा प्रांत खटाउ सुहुर सन समान असरैन मया अलफ राजश्री रुद्रमुनि संप्रदाय श्री स्वामीचे मठास अतीतअभ्यागतास अन्नछेत्राबद्दल पहिले पासून चालत आहे हाली मौजेमजकुरचो सरदेसमुखी इनाम करून दिल्ही आहे मौजेमजकुरची खंडणी आकाराप्रमाणे सरदेसमुखीचा हंक दरसदे रुपये १० दाहाप्रा। बिलाउजुर देत जाणे वरूश प्रतिवरुशी नवीन पत्राची अपेक्षा न करिता या पत्राची प्रती लिहून घेऊन मुख्य पत्र भोगवटीयासि परतून देणे छ २० सफर पा। हुजुर रुजु

लेखन
मर्यादा

लेखांक ७ श्री नकल

पौष वद्य १ शके १६८४ गुरुवार

श्री राजारा
म छत्रपति रुपा
निधि नारो शंकर
पंडित प्रतिनिधि

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री नारो शंकर पंडित प्रतिनिधि तं॥ मोकदमानी मौजे वडगांव क॥ निंबसोड-माइणी सु॥ सलास सितैन मया अलफ हरिभक्तपरायण राजश्री माहादेवबावा गोसांवि याजकडे मौजे मजकूर इनाम आहे म्हणून वेदमूर्ती राजश्री रामभट पुराणीक याणी मिरजेच्या मुकामी येऊन विदित केले त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केले असे तरी सालाबाद प्रमाणे भोगवटा चालत आला त्याप्रमाणे मौजेमजकुरचा वसूल संस्थानाकडे सुरलित देत जाणे जाणिजे छ १४ जमादिलाखर निदेश समक्ष

लेखन
सीमा

बार सुरु सुद बार

## १७९ चिमणाजी दामोदर ( मोघे, रिंगणगांवकर )

सातान्यांतील चिमणपुरा चिमणाजी दामोदर यांणीं वसविल्याचा समज आहे. चिमणाजी दामोदर यांजबद्दल माहिती बखरींतून दिलेली आढळते; परंतु यांचें आडनांव काय हें माहीत नव्हतें. हे गृहस्थ थोरले शाहूमहाराज यांचे पक्षास अनुकूल होते, परंतु पुढें ते डभई येथील लढाईंत बाजीरावांचे विरुद्ध का होते, तसें च कोल्हापूरकर शंभुछत्रपति यांचे मुख्य प्रधान कसे झाले, या बाबींचा उलगडा अद्याप होत नाहीं. यांस हैद्राबादकर नबाब यांजकडून मोठ्या उत्पन्नाचा मुलूख मिळाला होता या गोष्टी वरून ते संभाजीचे पक्षास मिळाले होते हें स्पष्ट च होतें. चिमणाजी पंडित या नांवाची एक तत्कालीन ऐतिहासिक व्यक्ति मह-

शूर आहे. ती व हे चिमणाजी दामोदर ह्या भिन्न व्यक्ती होत. चिमणाजी दामोदर यांस "हे पुरातन सेवक याचे चालवणे अवशक जाणून याजवरी स्वामी कृपाळु होऊन मौजे कुरुडगाव पा। चादवड नूतन इनाम वंशपरंपरेने" दिल्याचें कागदोपत्रीं नमूद आहे. सातारा येथील कागदांत सदर इनाम कार्तिक शु० १३ सौम्यवासर शके १६७५ रोजीं मिळाल्याचा उल्लेख छ १२ रमजान सु॥ सन अर्बा अशरीन मया व अलफ रोजींचे एका चिटणिसी टिपणांत आहे. यावरून चिमणाजी दामोदर हे शके १६७५ नंतर संभाजीचे पक्षास मिळाले असावे.

पुढील कागद कै. रामभाऊ लिमये वकील, पुणें, यांजकडून पाहण्यास मिळाले होते. चिमणाजी दामोदर यांचा वंश खान्देशमध्यें रिंगणगांवीं सरंजामी उत्पन्नाचा उपभोग घेत आहे.

खं. चिं. मेहेंदळे

**लेखांक १**

१ पेशवाई मोडली तेव्हा आमचे तीर्थरूप त्रिंबकराव बलाल रिंगणगांवकर असोन त्याजकडे जातीचे संसारबेगमीस सरंजाम चालत होता तो

१ मौजे रिंगणगांव पो चादसर तालुके येरडोल जिल्हा खानदेश ह्रा गांव खेरीज मोकासा करून दरोबस्त आकार रुो ३०००

२ मौजे कुरुडगांव तालुके चांदवड जिल्हा नगर येथील मोकासा साहोत्रा बाबतीसु॥ अमल अकार ४६६॥।~रुपये चादवडचा(ल)

---

सदरहू सरंजामासिवाय पेशवाई मोडली तेव्हां सरंजाम आम्हाकडे कांही चालत नवता

२ सदरहू सरंजामापो मौजे रिंगणगांव हा गाव पूर्वी मोगलाईत चादसर परगणा मिळाला होता त्यांत असोन तेव्हापासून आम्हाकडे चालत असून तो चादसर माहाल पेशवे बालाजी बाजीराव याणी सु॥ आर्बा खमसैन मया व अलफ साली सरकारांत घेऊन रिंगणगांव हा संसाराचे बेगमीस आम्हास त्या च साली वोशपरंपरा दिल्हा आहे व तसे च मौजे कुरुड गांवचा मोकासा वगैरे अमल मोगलाईत पूर्वी मिलाला असोन त्याजबदल फारसी सनद आम्हापासी आहे

३ सदरहू सरजामा पो मौजे रिंगणगांव याची जप्ती पूर्वी जाली असोन कधीं कशाकरितां जाली ते आम्हास माहित नाही त्याची मोकलिक सु॥ सलास सीतेन मया व अलफ साली माधवराव बलाल प्रधान याणी केली व पुढे अणखी

सदरहु गावची जप्ती जाली होती त्याचे कारण आमचे तीर्थरूप त्रिंबक बलाल याजकडील राउत बऱ्हाणपुरास राजश्री नारो कृष्ण याजकडे गेले होते सबब मल्हार जगजीवन याणी केली होती ते मल्हार जगजीवन कोण होते ते आम्हास माहित नाही त्याची मोकलिक माधवराव बलाल प्रधान याणी सुा सबा सीतैन मया व अलफ छ १० जमादिलोवल रोजी केली तेव्हा पासून सदरहू गावची जप्ती पेशवाई अखेरपरीयत कधी जाली नवती व मौजे कुरुडगाव येथील अमल मिळाल्यापासून कधी जप्त वगैरे जाला नाही

४ पहिले कलमात लिहिल्यापेक्षा पूर्वी आम्हाकडे जाजती सरजाम चालत होता तो खाली लिहिल्याप्रमाणे

१ पाो चांदसर माहाल याचे गांव ४६ हे मोगलाईत नबाबाकडून मिळाले असोन त्याजबदल फारसी सनद आम्हापासी आहे त्या ४६ गावातील च मौजे रिगणगाव असोन सदरहू माहाल पेशवे बालाजी बाजीराव याणी त्रिबकराव बलाल लाहान यामुळे अटपण्यास सामर्थ्य नाही याजकरिता घेऊन मौजे मजकूर हा गाव संसारखेरचीकरितां वौशपरंपरा सुा आर्बा खमसैन मया व अलफ साली दिल्हा

(२) पाो अमलनेर माहाल पूर्वी मोगलाईत मिळाला असोन त्याजबदल फारसी अक्षराची सनद आम्हापासी आहे सदरहू माहाल आमचे अजे बलवतराव चिमणाजी लाहान असल्यामुलें सरकारात घेतला तो माहाल किती दिवस चालत होता ती वर्षे अजमासे किती ते माहीत नाही व सदरहू माहालचा आकार १८६५६।।।≈

(३) पाो चादवड हा माहाल पूर्वी मोगलाईत आमचे पणजे चिमणाजी व सिवाजी यासिं मिळाला असोन त्याजबदल फारसी सनद आहे तो माहाल आमचे आजे बलवंतराव आज्ञान असल्यामुळे अटपण्यास कोणी नाही करिता सरकारात घेतला सदरहू माहालाचा आजमासे अकार १०७००० होता

(४) पाो नेर माहाल पूर्वी मोगलाईत मिळाला असोन त्याबद्दल फारसी सनद आम्हापासी आहे तो माहाल बलवतराव आज्ञान असल्यामुळे अटपण्यास कोणी नाही याजकरिता सरकारात घेतला

५ पाो चादसर पाो मौजे दानेगाव खुर्द व मौजे दानेगाव बुा हे दोन गांव पालखीचे खर्चाकरिता व स्वाराचे घोडयास गवतांकारितां चादसर माहाल सरकारांत घेतल्यावर सुा सीतैन मया व अलफ साली पेशवे याजकडून मिळाले होते ते गावची वहिवाट दोन च्यार वर्षे होऊन पुढे दादासाहेब म्हणजे रघुनाथराव पेशवे याणी जप्ती केली ती पुन्हा त्याणी मोकलिक केली परंतु त्याची वहिवाट त्याचे दिवाण सखा-

राम बापू होते त्याणी चालविली नाहीं त्याचे कारण काय ते कलत नाही व ते वेळेस च म्हणजे जप्ती मोकलीक जाल्यावर लागले च दादासाहेब मयत जाले सबब त्याचे दिवाण सखाराम बापू याणीं चालविले नाही ती जप्ती कधी कोणते साली जाली ते आम्हास पक्के माहीत नाहीं

६ मौजे जापी परगणे सोनगीर तालुके धुळे जिल्हा खानदेश हा जापी गाव मूळ बालाजी बाजीराव प्रधान याणी त्रियकराव बलाल यास सुा आर्बा समसैन मया व अलफ साली चादसर माहाल सरकारात ठेऊन संसारखेगमीस हा गाव २५०० रुपये आकाराचा दरोबस्त दिल्हा तेव्हापासून चालत येऊन सुा सलास सीतैन मया व अलफ सालीं पेशवे सरकारातून जप्त जाला होता त्याची मोकलीक त्या च सालीं पेशवे याणी केली त्याची जप्ती कशाकरितां जाली ते आम्हास माहीत नाहीं व पुढें पुन्हा सदरहू गावची जप्ती आमचे तीर्थरूप त्रिंबकराव बलाल याचे स्वार बऱ्हाणपुरास नारो कृष्ण याजकडे गेल्यामुळें मल्हार जगजीवन याणी केली ती कोणते साली केली ते आम्हास माहीत नाहीं व ते मल्हार जगजीवन कोण होते ते हि आम्हास माहीत नाही त्याची मोकलीक पेशवे माधवराव बलाल याणी सुा सबा सीतैन मया व अलफ साली केली तेव्हांपासून सदरहू गाव काळ पडला तेव्हापरियंत चालत येऊन काळ पडल्यामुळे गावची रयत सर्व जाऊन वसती मोडली या मुळे गाव उज्याड जाला तेव्हापासून चालला नाही पुढे पाच च्यार वर्षी सदरहू गावात वसाहत होऊन त्याचा पैसा ते वेलेस तो सोनगीर माहाल विंचुरकर याजकडे असल्यामुळे त्याणी घेतला असी माहिती आहे परंतु काळ पडल्यापासून आमचेकडे सदरहू गाव चालला नाही व जप्ती हि जाली नाही मोघम राहिला येणे प्रो सरजाम पूर्वी आम्हाकडे चालत असोन त्या पौ पो चांदसर व अमळनेर व चादवड हे तीन माहाल चिमणाजी दामोदर व सिवाजी दामोदर यांस मोगल नबाबाकडून जाहगीर मिळालेले आहेत त्याजबद्दल नौकरी वगैरे करावी लागत नवती असे वडिल यांचे सागण्यावरून माहीत आहे व पौ नेर हा माहाल कशाकरिता मिळाला हे आम्हास माहीत नाहीं सदरहू च्यारी माहाल सन ११३२ पासून ते सन ११३८ या सालाचें आत मिळालेले आहेत

## लेखांक २

### वंशावळ

- कृष्णाजीपंत मोघे
  - दामोदरपंत
    - चिमणाजीपंत ( संपादक )
      - बळवंतराव
        - त्रिंबकराव
          - हरिपंत
            - माधवराव
            - बळवंतराव
            - रामभाऊ
    - ( शिवाजीपंत ) संपादक

## लेखांक ३

नकल फाल्गुन शुा ३ गुरुवार श. १६६०

१ मार्च १७३९

श्री

राजश्री कमाविसदार दि॥ मोकासी पा॥ चादवड गो॥

श्री बाजीराव बलाल प्रधान सु॥ तिसा सलासीन मया अलफ मौजे कुरुड गाउ पो॥ मजकुर हा गाउ रा॥ सिवजी दामोदर याजकडे मोकासा देसील बाबती याजकडे पेशजीपासून चालत आले आहे त्याप्रमाणें करार असे तरी तुम्ही मौजेमजकुरास उपसर्ग न देणें फिरोन बोभाट येऊं न देणें जाणिजे छ १ जिल्हेज

आज्ञाप्रमाण

लेखन सीमा

लेखांक ४

नकल

श्री

तीर्थरूप राजश्री शिवाजीपंत काका स्वामीचे शेवेसी

अपत्यासमान चिमाजीने नमस्कार विनंती उपर येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे विशेष पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनश्रवणें करून संतोष जाला ऐसे च निरंतर पत्र पाठऊन सविस्तर कुशल वृत्त लिहित जाणे तेणेकरून समाधान असे वरकड कितेक अर्थ स्वकीये पत्री लिहिला तो सविस्तर कळला मौजें कुरड गांवाचे विशी लिहिले त्यावरून राजश्री देवजी सोमवंशी यासी पत्र लिहिले असे त्याचे तर्फेने कोणेविशी काही उपद्रव लागणार नाहीं त्याजकडून तुमच्या साहित्यास कधीं अंतर होणार नाही कळले पाहिजे बहुत काय लिहिणे लोभ असो दिला पाहिजे हे विनंती

लेखांक ५

नकल

श्री

राजश्री देवजी सोमवंशी हिंदुराव गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

श्री चिमणाजी बलाल आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष मौजे कुरडगाव पा चाकण हा गाव राजश्री शिवजी दामोदर याजकडे मुकासा देखील बाबती आहे तेणे प्रमाणे करार आहे तरी आपले कडील कमाविसदार असतील त्यास ताकीदपत्र देऊन कोणेविशी उपसर्ग न लागता सुरळित चालें तें गोष्टी करणें जाणिजें छ ४ साबान बहुत काय लिहिणे

लेखन
सीमा

• श्री •
राजा शाहु नर
पति हर्षनिधान
बाजीराव बल्लाळ
प्रधान

लेखांक ६ नकल

बुधवार माघ शुा ३ श. १६६०

श्री

राजमान्य राजश्री कमाविसदार पो चादवड गोसावी यांसी

सेवक चिमणाजी बलाल नमस्कार सुा तिसा सलासैन मया अलफ मौजे कुरुढ गाव पो मजकूर हा गाव पेशजी पासून राजश्री बलवतराव चिमणाजी याजकडे मुकासा आहे तेथे तुम्ही उपसर्ग करून मुकासबाबेच्या अमलास खलेल केले आहें म्हणोन कळले तरी याचे अमलास खलेल करावयास तुम्हास प्रयोजन काय याचा मोकासबाबेचा अमल पेशजी प्रमाणें सुरलित चालवणे फिरोन बोभाट येऊ न देणे जाणिजे घेतले असेल ते माघारे देणे छ १ जिल्काद

लेखन सीमा

लेखांक ७ नकल कार्तिक शु० ७ शके १६७४

श्री

छ मा अनाम देशमुख व देशपाडे प्रो
चांदवर प्रो खानदेश यासीं

० श्री ०
राजा शाहुनर
पति हर्षनिधान
बालाजी बाजि
राव प्रधान

बालाजी बाजीराव प्रधान सुा सलास खमसैन मया व अलफ पो मजकूर जागीर रा बळवतराव चिमणाजी याजकडे आहे त्यास माारनिलेची जागीर जफ्त करून तेथील कमाविस रा कृष्णाजी ना रास्ते यास सागितली होती ते दूर करून याची जागीर मोकली असे तरी तुम्ही मारनिलेसी रुजुं राहोन सालाबादप्रो अमल सुरलित देणे जाणिजे छ ६ मोहरम

आज्ञा प्रमाण

लेखन सीमा

लेखांक ८

नकल आश्विन व. १० रविवार १६७५

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री त्रिंबकराव
बलाल स्वामी गोसावी यांसीं

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिा विशेष पो चांदसर प्रो खानदेश हा महाल तुमचे तीर्थरूपा-कडे सरंजामास होता सांप्रत त्याचा काल जाहला नतर माहाल सरकारात येऊन तुमचे संसारबेगमीची नेमणूक सरकारांतून करून दिल्ही रुपये ५५०८ साडे पाच हजार यास गावे सरजामास दिल्ही बिा

३००० मौजे रिंगणगाव पो चांदसर जाहागीर सरदेशमुखी बाबतीखेरीज मोकासा कुलबाब कुलकानुं दरोबस्त

२५०० मौजे जापी पो सोनगीर जागीर सरदेशमुखी बाबती बमय मोकासा दराबस्त कुलबाब कुलकानु

५५००

सदरहू साडे पाच हजाराची गावे तुमचे संसारबेगमीस दिल्ही असे तरी तुम्ही आपले पुत्रपौत्रादिक वौशपरंपरेने खात जाणे सरकारातून कोणेविसी उप-सर्ग लागणार नाही जाणिजे छ २३ जिल्हेज सुा आर्बा खमसैन मया व अलफ बहुत काय लिहिणे

लेखन
सीमा

० श्री ०
राजा शाहु नर
पति हर्षनिधान
बाळाजी बाजी
राव प्रधान

बार

लेखांक ९ नकल शक १६७५

श्री

० श्री
राजा शाहु नर
पति हर्षनिधान
बाळाजी बाजी
राव प्रधान

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाळाजी पंडित प्रधान ताा मोकदम मौजे रिंगणगाव पो चांदसर प्राा खानदेश सुाा आर्बा समसेन मयां व अलफ मौजे मजकूर जांगीर व सरदेशमुखी व बाबती व घासदाणा व फौजदारी दखील जका + व पटीया कुलबाब कुलकानु खेरीज मोकासा राजश्री त्रिंबकराव बलाल याजकडे दिल्हा असे तरी माारनिलेसी रुजू होऊन जागीर व बाबती सरदेशमुखी घासदाणा व पटीया देखील जकात कुलबाब कुलकानु खेरीज मोकासा अमल दरोबस्त खुरलित देणे मोकासीयाचा ऐवज राजश्री सुलतानजी धायभर याजकडे + + खाडे + + + केले असत साल दरसाल सदरहू साडे पाचसे रुपये मोकासी यास + +

प्रमाण + +

बार

नकल

लेखांक १०

श्री

गुरुवार कार्तिक शु० ४ शके १६८८

श्री
मत्माधव ब
ल्लाळरुपा (पात्र) स्य
मुद्रिका नारायण
तनूजस्य त्र्यंबक
स्य विराजते

छ मा अनाम देशमुख व देशपाडे पो चादसर यासी त्रिंबकराउ नारायण सुाा सबा सीतेन मया व अलफ मौजे रिंगणगाव येथील जप्ती सरकारात जाली होती त्यास राजश्री त्रिंबकराव बलाळ याणी श्रीमंताकडून सोडचिटी आणिली त्याजवरून जप्तीची मोकलीक करून दिल्ही असे तरी सुदामतप्रमाणे अमल माारनिलेकडे चालवणे जाणिजे छ ३ जमाास

मोर्तब सुद

मोर्तब
सुद

**लेखांक ११** नकल

श्री

राजश्री आनंदराव सोमवंसी गोसावी यासी

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य

श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित जाणें विशेष मौजे जापी पा सोनगीर हा गाव मोकासासुधा दरोबस्त राजश्री त्रिबकराव बलाल याजकडे पूर्वीपासून आहे त्याप्रमाणे सुद्रामत चालत असतां सालमजकुरी तुम्ही मुकासीयाचा उपसर्ग देऊन खटखट आरंभिली आहे म्हणून विदित जाले औसियासी मौजमजकुर मुकासासुधां माारनिलेकडे असतां तुम्हास खटखट करावयास प्रयोजन काये हाली पत्र सादर केले असे तरी तुम्ही मौजेमजकुरास मोकासबाबेचा उपसर्ग न देणे बोभाट अलियास कार्यास येणार नाही जाणिजे छ ६ रजब बहुत काय लिहिणे

श्री
राजाराम नरप
ती हर्षनिधान माध
वराव बल्लाळ मु
ख्य प्रधान

लेखन
सीमा

**लेखांक १२** बुधवार आश्वीन शु० १२ शके १६८८

सन ११७६ फसली श्री नकल

श्री
राजारामनरप
ती हर्षनिधान माध
वराव बल्लाळ मु
ख्य प्रधान

छ माो अनाम देशमुख व देशपाडे पाो चादसर यासि माधवराव बलाल प्रधान सुाा सबा सीतैन मया व अलफ मौजे रिंगणगाव पाो माार हा गाव राजश्री त्रिंबकराव बलाल याजकडे आहे त्यास मशारनिल्हेकडील राउत बऱ्हाणपुरास राजश्री नारो कष्ण याजकडे गेले होते सबब मौजेमजकुरची जफ्ती राजश्री मल्हार जगजीवन याणी केली होती ते मोकली करावी म्हणोन

याणी विनंती केली त्याजवरुन सद्रहू गावची जप्ती मोकली करून पूर्ववत प्रमाण गाव मशारनिल्हेकडे करार केला असे तरी तुम्ही सुदामतप्रमाणे अंमल गावचा याजकडे देणे जाणिजे छ १० जमाावल आज्ञाप्रमाण

लेखन सीमा

बार

## १७९ पालकरांचें एक पत्र

पुढील पत्र नेताची राजे व नरहर सिंगजी राजे पालकर यांनीं लिहिलेलें आहे. हें शिवछत्रपतींचे कारकीर्दींत प्रसिद्धीस आलेल्या पालकरांचें घराणें होय. कळसकरांचा व पालकरांचा तांदुळी प्रा करडें या गांवासंबंधीं तंटा होऊन, तो गांव पालकरांचा वतनी असल्याचें ठरलें असा या पत्रांत उल्लेख आहे व तो महत्त्वाचा आहे. या गांवावरून नेताजी पालकरांचे घराण्याचा शोध लागावा.

का. कृ. लेले

श्रीरामः

छत्रपती

राजश्री गोपाल शंकर गोसावी यासी

छ अखंडीत लक्षुमी अलंकृत सदा प्रसन्न राजमान्ये

स्नो॥ नेताजी राजे व नरहर सींगजी राजे पालकर राम राम

विनंती उपरी येथील क्षेम जाणून गासावी यांनीं स्वकीय कुशल निरंतर लिहिले पाहिजे विशेष मौजे तांदुळी प्रा करडें हा गांव आपला वतनी आहे प्र (दा?)-गये पासून पिढी दर पिढी आपली वतनाची नीव चालत आली आहे त्यास पूर्वी पातशहा अहमदनगरी होते त्या समयातला कलसकर मुसलमान होऊन अदालतींत फिर्याद जाले तेव्हां पातशहांनी अदालत करून देशमुख व देशपांडीये व जव्हाधेरचे गोत व पांढरी हुजुर बोलावून हक ईनसाब केला तेव्हां वतन पालकरांचे साबुत जालें कलसकर खोटे जालें त्यापासून मुचलका घेतलाजे या उपरी आपण वतनाचें नांव घेऊं तर गर्दन मारले जाऊं ऐसा मुचलका घेऊन कचेरींतून काढून दिधलें त्या उपरी महाराज राजेश्री साहेबाजवल हि फिर्याद जाले होते त्यानीं हि वतनाची कैफियत मनास आणितां कलसकर खोटे जाले व वतन पालकरांचे साबूत जाले त्यास आजीपरीयत आपली वतनाची नीव भोगवटा चालत आला आहे हलीं मागती कलसकर गांवावर येऊन कैफीयतीच्या गोष्टी सांगतात आपण तो या प्रांते सेवे मुले दूर राहिलों हें वतन महाराजांचे आहे

आणि आपण पुरातन सेवक स्वराज्यांतील च अहो वडिला वडिली सेवा केली आहे सांप्रत प्रसंगीं आपण आहेत हरएक विशाई साहिता करून वतनाची नीव चाल- विली पाहिजे भोगवटा वतनाचा चालत आला आहे हे च आपली सनद आहे हे गोष्टीची तहकीकांत आपण हि परस्परे पाहिली पाहिजे ते कोणे सनदेने कैफीयतीच्या गोष्टी सांगशात हें मनास आणिलें पाहिजे विशेष काय लिहिणें हे विनंती

## १८० मानभाव व त्यांचे पंथासंबंधीं महाराष्ट्र-सारस्वतांतील उल्लेख

१ आपल्या अफाट देशांत प्रचलित असलेल्या अनेक पंथांपैकीं हा पंथ आहे. स्थूलरूपानें मानभावांची गणना वैष्णववैराग्यांत केली जाते. या पंथांत श्रीकृष्ण व श्रीदत्त हे उपास्य आहेत. या पंथाचे उत्पादक व प्रचारक चक्रधर, नागदेवभट्ट इत्यादि प्रसिद्ध आहेत. तसें च, या पंथांत लहान मोठे ग्रंथ व ग्रंथ- कार हि झालेले आहेत. असें असतां, आपले कडील संतांत यांचा नामोल्लेख कां नसावा ? इकडील संतचरित्रकार तर सर्वसंग्रही म्हणून प्रसिद्ध. त्यांनीं या कृष्ण- भक्तांस कां वगळावें ? या संबंधांत कांहीं वारकरी पंथांतील लोक व श्रीदत्तसंप्र- दायांतील लोक यांजकडे शोध करितां असें निष्पन्न झालें कीं, पंढरपूर, द्वारका, गाणगापूर, नरसोबाची वाडी वगैरे ठिकाणीं या पंथांतील लोकांस सक्त मज्जाव आहे. तेव्हां या पंथास आपलेकडील सनातन-धर्मानुयायी लोक सनातनधर्मबाह्य ऊर्फ पाखांडी असें मानीत आले असावेत.

२ आद्यप्रवर्तक चक्रधर यानें प्रचलित केलेला महात्मा-पंथ व मातंगकन्येचा परिग्रह करणारा कृष्णंभट यानें प्रचलित केलेला मानभाव-पंथ असा म. दत्तराज आदि महानुभाव ग्रंथकारांनीं अलिकडे प्रचलित केलेला भेद जुन्या मराठी सारस्वतास अज्ञात आहे.

३ सर रिस्ले यांनीं आपल्या Indian Castes या पुस्तकाचे अखेरीस अनुसरलेल्या मार्गानें मानभावपंथांत समाविष्ट असलेल्यांचें परीक्षण करूं लाग- ल्यास मराठी भाषेंत रूढ झालेल्या खालील म्हणी अवश्य विचारांत घेतल्या पाहिजेतः—

१ मानभावाची ऊ; २ मानभावी कावा; ३ सावळा गोंधळ : गडबडगुंडा
४ करणी कसायाची अन् बोलणीं मानभावाची; ५ मानभावाची बायको आणि गाढवाचें जित्रब; ६ कांद्याचें कोरड्यास, मानभावाची बायको आणि गाढवाचें जित्रब ह्यांत श्रम नाहीं.

वरील श्रेणींत या पंथानुयायांबद्दल प्रायः अनादर च कटाक्षित केला गेला आहे.

४ नामदेवाचे गाथ्यांत या पंथाचा अगर प्रवर्तकाचा कोठें हि उल्लेख नाहीं. परंतु आवट्याचा नामदेवगाथा अभंग १९७४ यांतील ११ वें कडवें विचारणीय आहे. एकनाथाचा गाथा अभंग १९६२, ३३४६ (कडवें ९ वें), ३७३६, ३७३७ व ३७३८ यांत या पंथाचे आचारावर व पंथाचा प्रसार करण्यांत अवलंबिल्या जाणाऱ्या असद् युक्त्यांवर कटाक्ष आहे; मात्र एकनाथानें 'गडबडगुंडा' या शब्दानें सूचित होणाऱ्या सहज, उत्कट व प्रतिबंधास न जुमानणाऱ्या प्रेमाचा उपयोग परमेश्वराचे संबंधीं वाटणाऱ्या भक्तीचा परिपोष करण्याचे कामीं करावा एवढा च संग्रह केलासा दिसतो. तुकारामगाथा (बडोदें ग्रंथप्रसारक मंडळी) अभंग २४९५ (दाढी डोई मुंडी मुंडुनिया सर्व इ०) यांत हि या पंथानुयायांबद्दल तिरस्कार च व्यक्त केला आहे. वामनपंडित यांनीं द्वारकाविजय ८⁄१ (महात्मा असा शब्द गीतेंत नाना तया वाचितां ते करीती तनाना । प्रमाणा जयालागिं ओंव्या मराठ्या धरीती करीं काठिया ऊरफाट्या ॥) या ठिकाणीं मानभावांची आपल्या पंथाचे उगम किती लांबवर गेले आहेत हें दाखविण्याची हांव कटाक्षित केली आहे.

५ असो. येथवर प्रसिद्ध ग्रंथांतील उल्लेखांचें दिग्दर्शन झालें. आतां अप्रसिद्ध ग्रंथांतील उल्लेख नमूद करितों:—

(अ) **गिरिधर** (शक १५७५ ते १६५१) हे आपल्या 'वाका' नामक प्रकरणांत या पंथाचा पुढीलप्रमाणें उल्लेख करितातः—

महात्म्याचा पंथ चांगला बहु चांगला तुर्त देव भेटताहे ।
रोकडे टूकडे मिळति बरे गीळति आनंद वाटताहे ॥ ध्रु ॥
कृष्णवर्ण काट जडला योग घडला मुर्ख लोकां कळेना ।
हींसा याचे पंथी नाहीं रे बरें पाही रे कारे चित वळेना ॥ १ ॥
मोटा यासी जाला अनुभव तरि **महानुभाव** मुर्ख लोक नेणाति ।
अवघे देव जेव्हा टाकावे तेव्हां हे फावे भले लोक जाणाति ॥ २ ॥
कर्नाटकि देव अपार रे नाहीं पार तेथें रीघ होईना ।
अवघे देव यासी निंदिति हे ही द्रूषिति तेथें कोण्ही जाईना ॥ ३ ॥
येके दीवसीं तेरा बोडकी माथां सुडाकें घालोनियां सोडिलि ।
गोदावरी जातां वाटे हो येके वाटे हो धरुनियां बोडिलि ॥ ४ ॥
गीरिधर म्हणे सत्य बोलणें परि चालणें मोटें कठिण आहे ।
धडाचि फाडूनि टाकावें ठिगळ द्यावें तरि पंथ हा लाहे ॥ ५ ॥

(आ) दास धोंडा याचें रा. विनायकराव भावे यांचे संग्रहांतील अप्रसिद्ध पदः—

## माणभाव

॥ आम्ही जालो मानुभाव ॥ चीती ठसउना अनुभाव : कृष्णचेरणी द्रुड भाव सद्गुरुरुपे लाधलो ॥ दंड धरती उफराटा नव जाये हींवसा वाटा : कृष्णावीन गाटागोटा क्षुद्र देव भासती ॥ देव देव्हारी आसती । सुवर्ण रुप धातु पुजीती त्याला देउनी मोक्षगली टेखुन कोरका करीतो ॥ भावभक्तीचा लागोडा तोची कुरुण गडबडगुंडा नरहरिवंसी दास धोडा संतचरनी मीरवला ॥ ४ ॥

( इ ) श्री० मुजुमदार यांचे संग्रहीं सुमारें ७५।८० वर्षां पूर्वी लिहिलेलें एक बाड आहे. त्यांत ललिताचें एक प्रकरण आहे. त्या ललितसंग्रहांत एक मानभावपंथीयांचे सोंगाचा भाग आलेला आहे. हल्लीं प्रचलित असलेल्या ललितांमधून हा भाग कां गाळला जावा, याचे कारणाचा शोध लाविला पाहिजे. हा गाळण्यांत येत असलेला भाग खालील प्रमाणें:—

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| १ गुरुजी कांहीं सुखाचा गोष्ट सांगा | १ घर सोडून रानांत जा गा |
| २ राणांत काय सुख आहे | २ उगाच घडीभर जाऊन पाहे |
| ३ वनांत जाऊन काय खावे | ३ निसंग साच फकीर व्हावे |
| ४ फकीरास देखून कुत्रे भुंकती | ४ फिरतोस का म्हणून तोंडावर थुंकती |
| ५ उपदेश करीनो गुरुपुत्रा | ५ भटकत फिरे त्या माणसापरी सुत्रा |
| ६ कुत्र्यास काय आहे विच्यारा | ६ धरील येक ते न सोडी द्वारा |
| ७ पोटभर भाकर मिळे येके द्वारी | ७ वोली कोरडी हाक ना मारी |
| ८ हाकेवीन दुख कोण जाणतो | ८ निश्चये देव बसल्या देतो |
| ९ बसल्यानें कैसा निभाव होतो | ९ अजगर कोठे फिरावयास जातो |
| १० अजगरा नाहीं पाईचे धाके | १० त्याचे संतान कोठून पिके |
| ११ भोळा भट का होये सवेग | ११ असे च वाढे अवघे जग |
| १२ तरी माणसास काय खटपट | १२ म्हणून घेतल लागले झट |
| १३ लागले झट कव्हां पळे | १३ आपण ब्रह्म जरी समूळ गळे |
| १४ होतां जाहला अद्वैत भाव | १४ पूर्ण सुखाची हांचि ठाव |
| १५ तरी वनास जावया काय हाट | १५ तुझे मण जाहले नाही घट |
| १६ मण घट जाहल्या गाव बरा | १६ दुखाचे हाया लागती पोरा |
| १७ दुख तरी तिलमात्र सोसेना | १७ चला राना नको देऊ येना |
| १८ वनांत जाऊन काय खावे | १८ पोटापुरतें भिकेस गावांत यावे |
| १९ गावचे लोक करती उपहास | १९ खाली पाहून गावे घास |
| २० घास न मिळे पडती उपवास | २० सोसीत जावा होऊ नये उदास |
| २१ उदास जाहल्या होईल बोध | २१ रात्र दिवस करावा शोध |
| २२ शोध करी आत्माराय | २२ श्रीसागर गुरुचे पाय |

पद मानभाव

चक्र चाळक बोडक्या दोघी : भिक्षा मागे विषया संगे :
हाती उफराटी काटी : रामनाम ना अयके गोष्टी :
पंथा माजी प्रंथ-सार : वर बोडके तळीं गरवार : ॥ १ ॥
साहीं दरशना माजी कोंडा : जनारदणी गडबडगुंडा :

( ई ) मानभावां संबंधानें केशवस्वामी यांचें श्री० मुजुमदार यांचे संग्रहां-तील पद खालील प्रमाणेः—

श्री

आम्ही मानुभाव जालो ॥ देहबुद्धि विसरलो ॥ १ ॥
त्यान्ही घड्या डोईवरी ॥ भिक्षा मागे संता घरी ॥ २॥
काठी धरली उफराटी ॥ बैसे प्रणवाचे मटी ॥ ३ ॥
देहधर्म संतसेवा ॥ गडबडगुंडा उन्मनि अवा ॥ ४ ॥
केशवस्वामि मानुभाव ॥ तेथे नाही भावाभाव ॥ ५ ॥

खं. चिं. मेहेंदळे

## १८१ जुन्या ज्ञानेश्वरी-संहितेच्या संशोधनाची आवश्यकता

१ मराठी भाषेस केवळ ललामभूत झालेल्या या ग्रंथाच्या दोन संहिता सध्यां प्रचलित आहेतः एक संहिता पैठणकर एकनाथांच्या नांवावर मोडते व दुसरी 'मुकुंदराजी' संहिता प्रसिद्ध महाराष्ट्रेतिहाससंशोधक रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं संपादून प्रकाशित केली आहे. पहिलीचा प्रचार शेंकडा ९९$\frac{७}{८}$ या प्रमाणानें वाचकवर्गांत आहे. या वर्गांतील भरणा बव्हंशीं भाविक वारकरी, सांप्रदायिक आणि विचिकित्सेच्या विशेष भानगडींत न पडणाऱ्या वाचकांचा आहे. बाकी राहिलेल्या अल्पसंख्याक वाचकवर्गाकडून दुसऱ्या संहितेचा आदर होत आहे व ती प्रमाणभूत मानली जात आहे. शक बाराव्या व तेराव्या शतकांतील मराठी ताम्रशिलादिशासनें, मानभावपंथी जुने ग्रंथ व स्टेफेन्सचें ख्रिस्तियन पुराण यांतील भाषेच्या स्वरूपाशीं लावून पाहिल्यास, मुकुंदराजी संहितेंतील भाषेचें स्वरूप त्रयोदशशतककालीन म्हणजे ज्ञानेश्वरकालीन आहे व म्हणून ती संहिता प्रमाण व आदरणीय मानली जावी ही बाब निर्विवाद आहे.

२ पहिली संहिता एकनाथांचे नांवावर मोडते या गोष्टीचें समर्थन करणारें एकादें वाचानिक प्रमाण अद्याप उपलब्ध झालेलें नाहीं. कदाचित् ज्ञानेश्वरीच्या कांहीं प्रतींचे शेवटीं आढळणाऱ्या चार पांच ओंव्या वरील समज प्रचलित करण्यास कारणीभूत झाल्या असाव्या. ओंव्यांची चार यमकी रचना, एकनाथांचे नांवाचा उल्लेख, तसेंच, गणित करून पाहतां, शके १५०६ त येणारा कपिलाषष्ठीचा योग यांवरून एवढें सिद्ध होतें कीं, हुडकून काढलेल्या व आळंदीस मिळविलेल्या 'प्रासादिक* ज्ञानदेवी'चे प्रतीचे शेवटीं एकनाथांनीं या ओंव्या रचून लिहिल्या असाव्या. तेव्हां ही प्रत अगर त्या प्रतीबरहुकूम त्या काळीं केलेली नकल जर कोणा संशोधकास मिळवितां आली तर ज्ञानदेवीची संहिता एकंदर किती ओंव्यांची होती, याचा नक्की हिशेब लागेल. शके १५१५ त भारद्वाजानें नकललेली ज्ञानेश्वरीची प्रत तंजावरचे सरस्वतीमहालांत आहे. तींतील ओंवीसंख्या ९०४७ आहे (राजवाडे-ज्ञानेश्वरी, प्रस्तावना पृ. ७२). या प्रतीवरून नकललेला आठवा अध्याय-कांहीं भाग-मीं पाहिला आहे. त्यांतील भाषा तेराव्या शतकांतील नाहीं. आपले मंडळाचे संग्रहीं श्री. मुजुमदार यांचे मार्फत आलेली शके १५९५ त लिहिलेली ज्ञानेश्वरीची एक संपूर्ण प्रत आहे. ही प्रत एकनाथांचे प्रशिष्य निंबराजबावा पैठणकर यांचे पैठण येथील मठांतील आहे. ही पोथी अत्यंत जीर्ण व कीटकभक्षित झाली आहे. प्रत्येक पानाला सभोंवार कागद चिकटवून जी डागडुजी मूळ पोथी कायम रहावी म्हणून केलेली आहे त्यावरून असें म्हणण्याची प्रवृत्ति होते कीं, ही पोथी कांहीं तरी सांप्रदायिक महत्त्वाची व प्रसादाची असावी. या पोथींतील भाषा तेराव्या व सोळाव्या शतकांतील अशी मिश्र आहे. पोथीची ग्रंथसंख्या ९०६० आहे. रा० राजवाड्यांची मुकुंदराजी संहिता प्रसिद्ध होण्यापूर्वी मौजे गोऱ्हे बुा. ता० हवेली येथील प्रसिद्ध ह. भ. प. विठोबा खिरीड यांचे मठांतील ज्ञानेश्वरीची जुनी पोथी मला पाहण्यास मिळाली होती. या पोथींतील नववा अध्याय आळंदीस हैबतराव बाबा यांचे समाधींत पुरला गेल्याचें विठोबांचे सांगण्यांत आलें होतें. बाकीची पोथी शाबूत आहे. या पोथींत ज्ञानेश्वरकालीन भाषेचें व सोळावे शतकांतील प्रचलित भाषेचें मिश्रण आहे. ही पोथी हैबतराव बाबांचे वाचण्यांत असे. कागद व अक्षराचें वळण यांवरून पाहतां, ही पोथी दोनशें वर्षांपूर्वींचे सुमारास लिहिली असावी.

३ परलोकवासी रामचंद्र विष्णु माडगांवकर यांनीं छापिलेल्या (शके १८२९) ज्ञानदेवींतील क पोथी ही हिशेबांत घेण्यायोग्य आहे. त्याप्रमाणें

* पहा एकनाथांचा अभंग ११ वा-'प्रासादिक ग्रंथ ज्ञानेश्वरी ज्ञान ॥ केलें संपादन गुरुरूपें ॥ ५ ॥ एका जनार्दनीं ज्ञानदेवी ग्रंथ ॥ दिधला समस्त माझे हातीं ॥ ६ ॥-भिंगारकरकृत ज्ञानेश्वरांचा कालनिर्णय व चरित्र, पृ० ६९.

च प. लो. वा. काशीनाथ महादेव थत्ते यांनीं शके १८०२ मध्यें पुण्यास वेदान्तप्रकाश छापखान्यांत छापलेल्या पोथीची योग्यता पाठशुद्धीसंबंधीं विशेष आहे. मशारनिल्हे माडगांवकर यांस एक जुनी ज्ञानदेवीची पोथी उपलब्ध झाली होती. तेलांत भिजविलेल्या झिरझिरीत कागदांवर त्यांनीं तिच्या सहा प्रती तयार करविल्या होत्या. त्यांपैकीं एक प्रत रा. शंकर बळवंत सहस्रबुद्धे बी. ए. यांचे मेहरबानीनें मजला पाहण्यास मिळाली होती. ही मूळ पोथी अठराव्या अध्यायांतील १७३ व्या ओंवी पर्यंत च आलेली आहे. पुढील भाग नाहीं. या मुळें या महत्त्वाच्या प्रतींतील शेवटीं असणाऱ्या माहितीला आपण मुकलों आहों. मुकुंदराजी संहितेशीं या पोथीचें भाषासाम्य, अध्यायवार ग्रंथसाम्य असें पुष्कळ अंशानें सादृश्य आहे. भाषा बहुतेक जुनी आहे. सोळाव्या शतकांतील रूपें अगदीं कचित् च कां होईना परंतु डोकावतात च. सतरा अध्यायांची ग्रंथसंख्या ७१३४ आहे. मुकुंदराजी संहितेंतील सतरा अध्यायांची ग्रंथसंख्या ७१०८ आहे. समासांत मुकुंदराजीसंहितेंतील कांहीं ओंव्या पाठांतरें म्हणून मूळ लेखकानें कचित् दिलेल्या आहेत. या पोथींत लेखकानें प्रत्येक अध्यायाचे आरंभीं व अंतीं जें नमन व अर्पण लिहिलेलें आहे (उ० – श्रीजनार्दनगुरुभ्यो नमः, श्रीनिवृत्तिदासाय ज्ञानदेवाय नमः, इत्यादि; श्रीमज्जनार्दनार्पणमस्तु) त्यावरून ही पोथी एकनाथांस मिळालेल्या पोथीवरून कदाचित् नकललेली असावी असें म्हणण्यास हरकत नसावी. या पोथींतील पंधरावा अध्याय व मुकुंदराजी संहितेंतील पंधरावा अध्याय ताडून पाहिले असतां, रा. राजवाड्यांच्या प्रतींत सुमारें २२ ओंव्या कमी आहेत. रा. गोविंद काशिनाथ चांदोरकर, धुळें, यांस ज्ञानेश्वरीच्या एका प्रतीचा फक्त नववा अध्याय सांपडला आहे. तो त्यांनीं आपल्या मंडळाचे तृतीय संमेलनप्रसंगीं प्रदर्शनार्थ ठेविला होता. आजपर्यंत कागदावर लिहिलेली या पोथी इतकी ज्ञानेश्वरांची जुनी पोथी ही एकच उपलब्ध झालेली आहे. या विषयाच्या दरदी अभ्यासकांनीं बसविलेल्या सिद्धांतांच्या अनुरोधानें असें बेलाशक म्हणावयास हरकत नाहीं कीं, ही पोथी लिपीच्या दृष्टीनें शके तेराशेंच्या अलीकडे खास लिहिली गेली नाहीं. या पोथींतल्या सारख्या लिपींत लिहिलेली ज्ञानेश्वरीची संपूर्ण प्रत जेव्हां उपलब्ध होईल तेव्हां च ती खरी संहिता मानली जाणार हें उघड आहे.

४ ज्ञानेश्वरीसंहितेच्या मूळ स्वरूपांत घुसवाघुसव, छाटाछाट, निस्कळितपणा वगैरे प्रकार झाले होते याचा उल्लेख एकनाथांनीं केलेला च आहे. याचसारख्या प्रकारांचा उल्लेख रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांस मिळालेल्या भास्करकृत ज्ञानेश्वरी-पुरवणीवरून होत आहे. हा भास्कर वडवाळसिद्ध यांचे संप्रदायां-

तील रघुनाथांचा शिष्य होता, व त्यानें ही चारशें ओव्यांची पुरवणी काशी येथें शके १५३२ त गुरुआज्ञेनें केली. हा भास्कर नगर प्रांतांतील रहिवासी होता— ( पहा 'समालोचक' व. २, अंक १ ला पृ. ११ ). हा पुरवणीकार भास्कर ज्ञानेश्वरीची ग्रंथसंख्या १०५०० देतो हें नमूद करण्यासारखें आहे. एकनाथांच्या प्रयत्नाहून या भास्कराचा प्रयत्न स्वतंत्ररीतीचा व जास्त साक्षपी असा झालेला असावा. शके १६१३ त गोविंद यानें केलेल्या **ज्ञानेश्वरीपद्धतींतील** संहितेची परंपरा एकनाथांच्या संहितेहून भिन्न आहे— ( भा. इ. सं. मं. चा अहवाल शके १८३४, पृ० १४५।१४६ ). महिपतीकृत भक्तलीलामृतांतील श्रीतुकारामचरित्र अध्याय ७ ओंवी * ४३ वरून असा ध्वनि निघतो कीं, तुकारामबुवांस ज्ञानेश्वरीच्या शुद्ध प्रतीचें अगत्य वाटत होतें व तशी प्रत त्यांना सहजगत्या कांहीं मिळाली नसावी.

५ येथ पर्यंत केलेल्या प्रपंचाचा निष्कर्ष एवढा च कीं, ज्ञानेश्वरी-संहिता शुद्ध, निर्भेळ व संपूर्ण अशी आज उपलब्ध नाहीं. सांप्रदायी मठपतींची गोपनाची व संगोपनाची बुद्धि हें च या अनुपलब्धीचें कारण असावें. या बुद्धीचें एक चमत्कारिक उदाहरण पंढरपुरास दिसून आलें. तेथील नामदेवांच्या मुलीच्या वंशाचे मठांत नामदेवांच्या गाथ्याच्या जुन्या वह्या तळघरांत आहेत. त्या कोणीं पाहून वाचल्या तर त्याचा वंशच्छेद होतो म्हणून त्या दृष्टीआड च ठेविल्या पाहिजेत; त्यांना सूर्यदर्शन करवावयाचें नाहीं ही मठपतीस परंपरया शपथ आहे! ही विपरीत फलप्राप्ति त्या वह्या लिहिणाराच्या प्रयत्नाच्या माथीं मारणारांची धन्य म्हणावयाची इतकें च.

६. अशा एकंदर तिरक्या व प्रतिकूल परिस्थितींत जरी मराठी जुनें सारस्वत पडलें असलें तरी वळणावळणानें क्वचित् प्रसंगीं कांहीं धागासूत्र लागून कांहीं महत्त्वाची माहिती लागते. ज्ञानेश्वरी-संहितेच्या एका जुन्या व सांप्रदायिक प्रतीची माहिती कै. अण्णाबुवा आळंदीकर यांचे जवळील जुन्या बाडांत लिहिलेली पाहिली. या च बाडांत दिलेली श्रीक्षेत्र आळंदीच्या पंचक्रोशीची माहिती रा· द· वा· पोतदार यांनीं माझे टिपणावरून मंडळास सादर केली च आहे– ( भा· इ· सं· मं· अहवाल, शके १८३४ पृ० ३०४ ). ही माहिती त्या बाडावरून मीं डोणजे येथें शक १८२९ सालीं उतरून घेतली होती; व त्या बाडाचीं पुढील पानें चाळून कांहीं टिपणें करून घ्यावयाचा उपक्रम करणार तों च बुवांची लहर

---

* आणीक अध्यात्मग्रंथ थोर। स्वमुखें वदले ज्ञानेश्वर।
त्याची शुद्ध प्रती साचार। वैष्णववीरें मिळविली ॥ ४३ ॥

फिरली व त्यांनी बाड परत मागून घेतलें. दुसरे दिवशीं डोणने सोडून बोचा ऑपीस चालते झाले !

७. बाडांत दिलेली जुन्या ज्ञानेश्वरी-संहितेची माहिती अशीः-' मोगलाईत बीड जिल्ह्यांत वाशी येथ तुळशीवृंदावन आहे त्यात जुनी ज्ञानेश्वरी प्रती पुरली आहे. '

खं. चिं. मेहेंदळे

## १८२ आई आदिपुरुष व श्रीसमर्थ

श्रीसमर्थांची कविता भाग १ ला ( धुळें ) पृष्ठ २९१ वर स्फुट ओंवी संख्या २४३ मध्यें आई आदिपुरुषाचा उल्लेख आहे.

"आई आदिपुरुष हेंची विचारावें । आपुलें करावें समाधान" ॥ १ ॥

द. वा. पोतदार

## १८३ कान्हो पाठकाचा गुरू

रा. चांदोरकर यांनीं कान्हो पाठकाचा गुरू वडवाळ सिद्ध नागेश असावा असें अनुमान केलें होतें. कान्हो पाठकाचा एक अभंग संताजीच्या वहीतून उतरलेला मंडळाचे शके १८३५ चे अहवालांत छापला आहे. त्यांतील पुढील उल्लेख या कामीं निर्णयास बरी च मदत करील म्हणून येथें देतोंः--

" तरी हृदेंई धरीं नागेश ॥ म्हणे कान्हो पाठकः अरे जना ॥ छ. छ. छ. ॥

हा खुद्द कान्हो पाठकाचा पुरावा आहे.

द. वा. पोतदार

## १८४ जयराम दासी

शिळेवर छापलेलें एक छोटें पुस्तक जुन्यां बाजारांत मीं घेतलें. त्यांत जयरामदासीची कविता-अभंग-पदें-आर्या- आहेत. कविता तुकोबाच्या वळणांतली असल्यामुळें हृदयभेदक आहे.

छापील बाडाचीं पानें १२८ आहेत पण तेथें तें पूर्ण झालेलें दिसत नाहीं.

जैरामदासी-दासी असे उल्लेख जरी फार आहेत, तरी बाडांत जयरामसुत-दास असे उल्लेख हि कित्येक आहेत.

शिळेवरील छपाई आहे म्हणून हस्तदोष पुष्कळ आहेत.

गुरूवरील अभंगांत दासीनें माता पिता, कुलदैवतें सांगितलीं आहेतः—

विठ्ठल माझा पिता । माता भागीरथी ॥ जन्म तया कुशीं घेतलासी ॥ माझें दैवमार्तंड गुण त्याचे प्रचंड ॥ काय वर्णू ॥ गुरुराया रुपेनें हरीनाम गावें ॥ तेणें सुखें राहूं सर्वकाळ ॥ जैरामाची दासी मतीहीन आहे ॥ करा तिचें साह्य रुपा करूनी ॥ १ ॥ छ ॥

पुढें येके ठिकाणीं ( बाड पृ. ५० ) दासीनें पुंडलीक माझा भाऊ, विठ्ठल माझा पिता, चंद्रभागा माझी बहीण म्हणून वर्णिलें आहे; पण हीं वर्णनें अर्थात् विश्वबंधु विश्वपिता व विश्वभगिनी यांचीं आहेत !

दासींच्या काव्यांत 'ढेंकणाच्या संगें हिरा भंगलाशी' 'लहानपण दे गा हरी' ( बा. पृ. ६०।६१ ) वगैरे तुकारामादींच्या प्रसिद्ध उक्ती पुष्कळदां थोड्या फार फरकानें आढळतात.

निरनिराळ्या वारांकरितां मार्तंड, शंकर, दत्त वगैरेवर केलेलीं कवनें यांत बरीं च आहेत.

पृ. ४८ वर कुलस्वामिनी माहुर व तुळजापूरवासिनी इचा स्तव आहे.

पृ. ३३ वर जैराम महाराज अधिकारी ॥ बस्ती ज्याची **अहमदनगरी** ॥ असा उल्लेख आहे.

'कां मनि धरिली आढी' या धर्तीवर एक पद असून त्यांत कित्येक संतांचा उल्लेख आहे. त्यांत कालानुक्रम पहातां तुकाराम शेवटचा आहे.

दासी म्हणते

' तुकारामाच्या वह्या बुडाल्या ॥ उदकीं कस्या तरल्या ॥ १ ॥ '

यावरून दासी तुकारामोत्तरकालीन हें खास.

शेवटीं कवितेचे मासले देऊन पुरे करितों.

( पृ. ४ )

चर्चा करूनी घाली वाद ॥ म्हणे कोठें देव सांग ॥ नाहीं सुगडाचें ज्ञान ॥ केसा घडावा रांजण ॥ २ ॥ नाहीं पायरी ठावकी ॥ कैसे जावे इमारती ॥ ३ ॥ गुरुसेवा करी बापा ॥ चित्त मन तेथें अर्पा ॥ ४ ॥ नाहीं परमार्थाची गोडी ॥ **दासी** म्हणे उरफोडी ॥ ८ ॥ छ छ ॥

( पृ. ५८ )

जन्म वायां गेला माझा । नको धावूं पंढरीराजा ॥ १ ॥ तुला कशाची करुणा ॥ मारिलाशी सखा मामा ॥ २ ॥ आम्ही धरिली तुझी कास ॥ आतां धुडवी सावकाश ॥ ३ ॥ आम्हां पुसेल यमराव ॥ दासी सांगील तुझें नांव ॥ ४ ॥

पृ. ७०

रवीकुळीं अवतरला ॥ हर्ष रावण्याला जाला ॥ १ ॥ माझ्या भाग्या नाहीं पार ॥ दृष्टी पाहिन रघुवीर ॥ २ ॥ घरीं आणिन सीताबाई ॥ राम येतील अपुले पायीं ॥ ३ ॥ आधीं दाविन बाहूबळ ॥ मग पाहीन चरणकमळ ॥ ४ ॥ दासी म्हणे विरुध भक्ती ॥ केली रावणानें युक्ती ॥ ५ ॥

महाराष्ट्रांत ग्रंथमुद्रणाला प्रारंभ झाला तेव्हां पासून आतापर्यंत शिळेवर वगैरे पुष्कळ छोटीं छोटीं चोपडीं प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांत काहीं आज अप्रसिद्ध असलेल्या कवींची कविता हि आढळते. तरी असलीं सर्व बाडें जमवून त्यांचा हि परामर्श घेणें जरूर आहे. इतकी संशोधकांस विनंती आहे.

द. वा. पोतदार

## १८५ शामाराध्य कवि

मराठी भाषेंत ज्यांनीं बरी च मोठी ग्रंथरचना केली आहे असे जे कवी आहेत त्यांपैकीं च शामाराध्य हे एक होत. शामाराध्य यांची सर्व कविता अप्रसिद्ध आहे म्हणजे यांची कोणती ही कृती छापलेली नाहीं व पुष्कळशी कृती अनुपलब्ध आहे. यांनीं भारत, भागवत, रामायण, यांपैकीं बहुतेक आख्यानांवर रचना केली. किंबहुना भारत रामायणादि ग्रंथ यांनीं संपूर्ण रचले असावे. गीतेवर यांची एक पदार्थमाला नांवाची टीका आहे. ज्ञानेश्वरीवर हि त्या ग्रंथांतील कठिण शब्दांचा अर्थ सांगणारा असा एक कोश आहे. तसें च १ अश्वलायन प्रश्नमाला २ नित्यानित्यविचार ३ ज्ञानोदय सिंधु हे हि ग्रंथ यांनीं रचलेले मीं पाहिले आहेत. शामाराध्य यांचे मूळ नांव शामजी असें असावें. यांचें उपनांव आराध्ये. हल्लींचे आराध्ये हे यांचें च वंशज असावेत. आराध्यांच्या संबंधानें कांहीं माहिती गुरुचरित्रांत आली आहे. आराध्ये यांच्या वंशांत एक गोष्ट विशेष आहे. ती अशी कीं त्यांच्यापैकीं कोणी हि पुरुष काशीयात्रेस जात नाहीं. गाणगापूर ही च ह्यांची काशी. ह्या व्यतिरिक्त हे काशी ओळखीत नाहींत. ह्यांच्यापैकीं श्रीकाशीक्षेत्रास कोणी गेले असतां त्यास महारोग होतो व त्याचा कुळक्षय होतो अशी समजूत चालत आली आहे. शामाराध्य यांचा काळ कोणता असावा हें नक्की सांगतां येत नाहीं. मजजवळच्या पदार्थमाला या गीतेवरील पदबोधिनी टीकेच्या शेवटीं लेखन शके १६५९ पिंगळनाम संवत्सरे भाद्रपद शु॥ २ भोमवासरे असा प्रत लिहिण्याचा काळ दिला आहे. तेव्हां शामाराध्य या पूर्वीं च होऊन गेले असावे हें उघड आहे.

शामाराध्याचे ग्रंथ बार्शी व पंढरपूर येथें तपास केला असतां अवश्य सांपडतील. यांचे अनेक ग्रंथ, पदें अभंग वगैरे मीं पाहिले आहेत. ग्रंथरचना जितकी अवाढव्य आहे तितकी ती उत्तमांतील नाहीं.

वि. ल. भावे

# १८६ विष्णुदासनामा

१

तुम्हि सांडा तुम्हि (पु)ण आम्ही सांडु आम्हीपण ॥ १ ॥
करू हरिनाम स्म(र)ण तोडु संसारबंधन ॥ २ ॥
व्रततपा शिरोमनि राम अक्षरे हि दोन्ही ॥ ३ ॥
नामा म्हणे **विष्णुदासाचा** धरा विश्वास नामाचा ॥ ४ ॥

२

सुख सुखा भेटू आले । चित्तचैतन्य मिळालें ॥ १ ॥
जाला आनुभव नामाचा । ठेवा जोडिला प्रेमाचा ॥ २ ॥
जन्ममरणाची काजळी । तुटुन गेली तयावेळी ॥ ३ ॥
शून्य जाले भवभाव । अवघा आतुडला केशव ॥ ४ ॥
नामा म्हणे **विष्णुदासाचा** ॥ मज विश्वास नामाचा ॥ ५ ॥

या दोन्ही अभंगांवरून विष्णुदासाचा नामा म्हणजे विष्णुदास नांवाच्या गुरूचा शिष्य नामा असा होतो. शिष्य आपल्या नांवाच्या अगोदर गुरूचें नांव लावीत असतात अशीं उदाहरणें आपणांस माहीत आहेत च. म्हणजे विष्णुदास नामा याचा अर्थ विष्णुदासाचा शिष्य नामा असा च घ्यावा लागतो.

गं. ना. मुजुमदार

# १८७ प्रेमदास

ह० प० सखारामबोवा देठणकर यांचे संग्रहापैकी बाडांक २७ यांत प्रेमदास कवीतें केलेलें एक पद आहे. लेखनशक शके १६४० असल्यामुळें कवीचा तो किंवा तत्पूर्वीचा काल धरावा लागतो. तें पद असें:—

संतचरणरज यालागी वंदी ॥ धृ० ॥
कृष्ण म्हणे उद्धवा । त्रैलोक्य आपण आघवा । अनुभवे करूनि माहावा ॥ १ ॥
भावे करूनी भक्ति साधावी हे मुक्ती । अन्यथा नव्हे मुक्ति उद्धवारे ॥ २ ॥
अन्वयभक्तिरे माजी सांपडे सव्विदा । व्यतीरेक कैवल्यपद शुद्ध ॥ ३ ॥
नलगे देहदंडणा नलगे भगवे मुंडणा । निश्चय नाहीरे मना ॥ उ० ॥ ४ ॥
कीती करीसी साधन वेर्थ तीर्थ यात्रा दान । सद्गुरुकृपेवेविण न कळे ॥ उद्धवारे ॥ ५ ॥
जहल्लक्षणें करूनिया अविद्येचा त्यागु । अजहल्लक्षणे अत्याग ॥ ६ ॥
जहदाजहल्लक्षणें नाही त्यागात्यागु । त्रीविधलक्षण भागु ॥ ७ ॥

एकोनिशां कृष्णावचन मन जालें उन्मन । जनवन सहजसमान ॥ ३० ॥ ८ ॥
प्रेमदासा प्रेम लाधले संपूर्ण । संती दाविली खुण ॥ ९ ॥
पूर्णब्रह्म तेथें नाही भेदाभेद । परतोनी माहता निर्भेद ॥ १० ॥

वरील " प्रेमदासा........संती दाविली खुण " असें आहे येथें 'संती' हें विशेषनाम समजायाचें किं काय ? तसें समजल्यास 'संत' हें प्रेमदासाच्या गुरूचें नांव समजावें लागेल.

गं. ना. मुजुमदार

## १८८ शामदासविरचित गरुडाख्यान

का। नेवासे बु० जि० नगर येथें रा. एकनाथ मार्तंड महादणी यांजकडील संग्रहांत वरील प्रकरण मिळालें. सदर पोथीचीं पानें २१ आहेत. प्रकरण ओंवीबद्ध असून संख्या १६८ आहे. शामदासाचा गुरु, काल, स्थल वगैरे कांहीं च समजत नाहीं.

अंतः—

ऐसा भक्ताचा वीलास । वीनवी कींकर शामदास ॥
माझा तुटला गर्भवास । श्रीनीवास तुष्टला ॥ १६८ ॥

इति श्रीगरुड आख्यान संपुरनमस्तु ॥

गं. ना. मुजुमदार

## १८९ स्वरूपानंदविरचित गर्भगीताटीका

का। नेवासे बु०, जि० नगर, येथें वे. रा. सखारामभट जोशी यांच्या संग्रहांत सदर प्रकरण मिळालें. पृष्ठें १६ असून ओंवीसंख्या १०५ आहे.

अंतः—

भवभंगु केला सद्गुरुचिद्रानंदें ।
गर्भगीता निरोपिली आनंदें ॥
तेथें स्वरूपानंद आरला विनोदें ।
आत्मकंदें मिश्रीत होऊनिया ॥ ४ ॥

... ... ... ... ... ...

रा. चांदोरकरांच्या कविकाव्यसूचींत पान १४३ वर 'स्वरूपानंद' यांचे गुरु सच्चिदानंद असें आढळतें. परंतु वरील उताऱ्यावरून चिदानंद गुरु असावेत असें वाटतें. कदाचित् हे स्वरूपानंद वेगळे असतील.

ग. ना. मुजुमदार

## १९० वडवाळ-सिद्धाची अष्टपदी

सदर अष्टपदीचीं दोन पत्रें जुन्या बाजारांत मिळालीं. ही ओंवीबद्ध असून संख्या आठ नसून फक्त सहा च आहे. ती अशीः—

॥ श्री ॥

॥ श्रीवडवाळसिधयाची आष्टपदी ॥ सिध्ध ॥

गेले दिवस उरले थोडे । येतील दक्षनेत स्वार घोडे ॥
मिळतील राजे आणि रजवाडे । धारन महाग होईल की ॥ १ ॥
शत्रु करतिल बंदोबस्त । वैरी करतिल बंदोबस्त ॥
भोई आढकरा चिजबस्त । तेहि दैवे वाचल कीं ॥ २ ॥
होनार भविष्य कथीले पुडे । पडेल सर्वत्रासि गुड ॥
ज्याचे कुडे त्याचे पुडे । रानोमाळ पळतील की ॥ ३ ॥
वैरे अथवा श्रेहे । होईल सख्यानो राहा निर्भय ।
जाईल सर्वत्राचे भय । सर्व सुखी होतिल की ॥ ४ ॥
शके सत्रासे सावर पाच । संवत्छराचे फळ हे साच ॥
तुटेल सर्वत्राचा काच । आनंद वाद्ये झडतिल कीं ॥ ५ ॥
कर्ता हर्ता परमेश्वर । कृपा करिल वीस्वबर ॥
साहे जाले ज्ञानेश्वर । वडवाळ सिद्धे कथिले की ॥ ६ ॥

वर उल्लेखिलेला शक १७११ किंवा १७६५ असा हि होऊं शकेल. कसें हि समजलें तरी या भविष्यकथनाची सत्यता कशी पटावी !

ग. ना. मुजुमदार

## १९१ गोपाळ रघुनाथ विरचित चंद्रावळी आख्यान

सदरहु आख्यानाचें एक पान क॥ नेवासे बु॥ जि० नगर येथें वे० रा० सखारामभट जोसी यांचे संग्रहांत मिळालें. सदरहु पानावर या आख्यानाचा पहिला प्रसंग पूर्ण झालेला आहे. याचे एकंदर प्रसंग किती असावेत हें समजत नाहीं. पहिल्या प्रसंगाचा उतारा खालील प्रमाणें आहेः—

पदिं उंधळुंनिया मोचे । खोविले पीतांबराचे कोंचे ॥
साहे करणें पेंधियाचे । आसे धाविन गोपाळु ॥ ९१ ॥
येथुनि आतां पुढें जाण । करिल पेंधियाचि सोडवण ॥
देईल गोपिकासि दर्शण । लघुलाघवी श्रीकृष्ण ॥ ९२ ॥
म्हणे **गोपाळ रघुनाथ** । उत्तम कृष्णकथामृत ॥
श्रवण करीतां होति पुनित । महापातकें नासती ॥ ९३ ॥
ईतिश्रीचंद्रावळी आख्यानः प्रसंग पहिला ॥ १ ॥ ७४ ॥

ह्या कवि केव्हां होऊन गेला याबद्दल कांहीं च समजत नाहीं.

**गं. ना. मुजुमदार**

# १९२ ग्रंथांची एक जुनी यादी

कालगांव, ता० कऱ्हाड जि० सातारा, येथील आचार्यांच्या घराण्यांत नरसिंहाचार्य ( हे शके १६७७ त हयात होते ) म्हणून मोठे विख्यात माध्व पंडित ग्रंथकर्ते व विद्यागुरू होऊन गेले; त्यांचा अतिशय मोठा ग्रंथसंग्रह होता, तो त्यांच्या पांच नातवांमध्यें वाटला गेला. त्या पांचा पैकीं तिघांचा निर्वंश झाला आहे व दोघांचा वंश चांगल्याशा स्थितींत नाहीं. त्यामुळें तो ग्रंथसंग्रह वाताहतीनें नष्टप्राय झाला आहे. ह्या वंशजांपैकीं एकाच्या घरचा गळाठा चाळीत असतां ही यादी सांपडली.

ही यादी म्हटली म्हणजे नरसिंहाचार्यांच्या ग्रंथसंग्रहाच्या यादीचा एक अवशेष होय.

ह्या यादींत १ पुराणें, २ उपपुराणें, ३ अन्यपुराणें, ४ काव्यें, ५ इतिहास, ६ मंत्र, ७ उपागम व ८ खेरीज अशीं आठ सदरें करून त्यांखालीं ग्रंथांचीं नांवें लिहिलीं आहेत. ह्या सदरांत अनुक्रमें १८, १८, २७, २२, २, ९, १३७, ३ ह्याप्रमाणें ग्रंथांची संख्या २३६ अशी दिलेली आहे.

पुराणें, उपपुराणें व अन्यपुराणें ह्यांच्या यादी विचार करण्यासारख्या आहेत. भागवतपुराण हें मुख्य पुराणांत दिलें असून, ह्याच्याशीं स्पर्धा करणारें देवीभागवत मुख्य पुराणांत तर नाहीं च, परंतु उपपुराणांत नसून अन्यपुराणांत दिलें आहे. महाराष्ट्रांत बरें च पुढें सरलेलें गणेशपुराण हि अन्यपुराणांत च गणलेलें आहे. वायुपुराण हें मुख्य पुराणांच्या यादींत गणतात परंतु ह्या यादींत तें अन्यपुराणांत धरिलें आहे. स्कंदपुराण व ब्रम्हांडपुराण ह्या मुख्य पुराणांची ग्रंथसंख्या कोटीनें गणली आहे; आणि शिवाय उपपुराणांत स्कांद्

व ब्रह्मांड अशीं पुराणें लिहिलीं आहेत. परंतु त्यांची संख्या २५ पंचवीस हजार व १० दहा हजार दिली आहे. यावरून स्कंद व स्कांद हीं दोन्हीं पुराणें भिन्न आहेत व ब्रह्मांड नांवाचीं पुराणें दोन असून एक मुख्य व एक उपपुराण आहे. ह्याप्रमाणें ह्या पुराणांच्या बाबतींत बऱ्या च विचारणीय गोष्टी आहेत.

काव्याच्या सदरांत रामायणाचे २२ ग्रंथ दिले आहेत. ह्यां पैकीं ४।५ ग्रंथ फार तर प्रसिद्ध आहेत बाकीचे अश्रुतपूर्व असावे असें मला वाटतें.

इतिहासग्रंथांत इतिहाससमुच्चय नांवाचा एक ग्रंथ ह्या यादींत आहे, हा हि न ऐकल्यापैकीं च आहे. तथापि वे. शा. सं. रंगाचार्य रड्डी हे आपल्या घरच्या ग्रंथ-संग्रहांत हा असल्याचें सांगतात. प्रत्यक्ष पुढें येऊन त्यांतील विषयज्ञान होईल तेव्हां खरें !

ज्या मनुष्याकडे ही यादी सापडली त्याच्या घरीं ह्यां पैकीं कांहीं ग्रंथ नाहींत असें दिसतें. मी भाऊबंद असल्यामुळें त्याचे घरीं असलेला गळाठा मात्र मला दाखविला व ग्रंथ त्याच्या संग्रहीं असून हि दाखविले नाहींत असें त्याच्या घराण्यांतील एका विद्यार्थी मुलाकडून नुकतें च मला समजलें आहे. शोध करून पाहिलें पाहिजे.

अस्सल सापडलेली यादी मंडलाच्या संग्रहीं ठेविली आहे.

कृ. वि. आचार्य कालगांवकर

## ग्रंथांच्या एका यादीचा अवशेष

यादी पुस्तकांचा झाडा शके १७६८ पराभव नाम संवत्सरे भाद्रपद व॥ १०

### पुराणें १८

| | पुराणाचें नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | ब्रह्मपुराण ... ... ... ... | सहस्रदर्शक आंकडा फाटला आहे |
| २ | पद्मपुराण ... ... ... ... ... | ५५००० |
| ३ | विष्णुपुराण ... ... ... ... ... | २३००० |
| ४ | शिवपुराण ... ... ... ... ... | २४००० |
| ५ | भागवतपुराण ... ... ... ... | १८००० |
| ६ | नारदपुराण... ... ... ... ... | २५००० |
| ७ | मार्कंडेय ... ... ... ... ... | ९००० |
| ८ | भविष्य ... ... ... ... ... | १४००० |
| ९ | अग्निपुराण ... ... ... ... ... | १६००० |
| १० | ब्रह्मवैवर्त ... ... ... ... ... | १८००० |
| ११ | लिंगपुराण ... ... ... ... ... | ११००० |

| | | |
|---|---|---|
| १२ | वराहपुराण | २४००० |
| १३ | स्कंदपुराण | ८१०००१०० |
| १४ | वामनपुराण | १०००० |
| १५ | कूर्मपुराण | १७००० |
| १६ | मच्छपुराण | १४००० |
| १७ | गरुडपुराण | १९००० |
| १८ | ब्रह्मांडपुराण | १२०००२०० |

## उपपुराणें १८

| | पुराणाचें नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | सनत्कुमार | १५००० |
| २ | नारसिंहपुराण | १०००० |
| ३ | स्कंदपुराण | २५००० |
| ४ | शिवधर्माख्य | २१००० |
| ५ | दुर्वासपुराण | १९००० |
| ६ | कपिलपुराण | १०००० |
| ७ | नारदी(य)पुराण | २५००० |
| ८ | मानवपुराण | ८००० |
| ९ | उशनसपुराण | १७००० |
| १० | ब्रह्मांडपुराण | १०००० |
| ११ | कंकालपुराण | ३१००० |
| १२ | माहेश्वरपुराण | ९००० |
| १३ | सांबपुराण | ३०००० |
| १४ | सूर्यपुराण | ३०००० |
| १५ | पराशरपुराण | ४०००० |
| १६ | मारीचपुराण | ३३००० |
| १७ | भार्गवपुराण | ४०००० |
| १८ | कौर्मपुराण | २७००० |

भा. इ.-४४

## अन्यपुराणें

१ गणेशपुराण
२ कल्किपुराण
३ वन्हिपुराण
४ देवीपुराण
५ कालिकापुराण
६ देवीभागवत
७ वायुपुराण
८ आदित्यपुराण
९ भागवतटीका
१० मधुसूदनी "
११ श्रीधरी "
१२ गोवर्धनी "
१३ राधावल्लभी"
१४ भागवतकथा
१५ काशीपुराण
१६ आदिपुराण
१७ काशीमाहात्म्य
१८ गदापुराण व महिमा
१९ गयामाहात्म्य
२० प्रयागमाहात्म्य
२१ आत्मपुराण
२२ ब्रम्होत्पत्तिपुराण
२३ कौमारपुराण
२४ दुर्वासपुराण
२५ औशनस
२६ वारुणपुराण
२७ नंदीपुराण

## मंत्र ( ग्रंथ )

१ सौभाग्यरत्नाकर
२ शारदातिलक
३ मंत्रमहोदधि
४ यंत्रचिंतामणि
५ मंत्रमुक्तावली

( ह्यापुढें तत्त्वकौस्तुभ असें नांव लिहून सोडलें आहे. )

६ प्रपंच्यसार
७ तंत्रसार
८ बीजकोश
९ दुर्गोत्सव

( ७।८।९ हे अनुक्रमांक आम्हीं नक्कल करणारांनीं दिले आहेत. )

## काव्य ( ग्रंथ )

### ( रामायणें )

१ वाल्मीकरामायण
२ व्यासरामायण
३ वसिष्ठरामायण
४ शुकरामायण
५ नाटकरामायण वाल्मीककृत
६ बिभीषणरामायण
७ ब्रह्मरामायण
८ शिवरामायण
९ अगास्तिरामायण
१० शेषरामायण
११ अध्यात्मरामायण
१२ शैवरामयण

१३ आगमरामायण
१४ कर्मरामायण
१५ स्कंदरामायण
१६ पौलस्त्यरामायण
१७ अरुणरामायण
१८ भरतरामायण
१९ धर्मरामायण
२० अद्भुतरामायण
२१ मंत्ररामायण
२२ संग्रहरामायण

**इतिहास ( ग्रंथ )**

१ भारत १०००००
२ इतिहाससमुच्चय

खेरीज

१ हरिवंश २४०००
२ विष्णुधर्मोत्तर
३ शेषधर्म

**उपागम ( ग्रंथ )**

१ नारसिंहागम
२ भैरवोत्तरागम
३ उत्तराख्यागम
४ कारणाख्यागम
५ पापनाशागम
६ मारणागम
७ सोलभ्यागम ?
८ महेशागम
९ चंद्राव्हयागम
१० भीततंत्रागम
१२ परोद्भुतागम
१३ पारवती( ?पार्वती )यागम
१४ प्रभूतागम
१५ आ( ?अ )जितागम
१६ वामतंत्रागम
१७ पापनाशनागम
१८ सुभगाख्यागम
१९ चिंत्यागम.
२० सर्वोद्भवागम
२१ अमृताख्यागम
२२ विणुतरागम ?
२३ सौत्यागम
२४ स्यांत्यागम ?
२५ सिखेतरागम
२६ आं( अं?)त्ययागाख्यागम
२७ अप्रमेयागम
२८ तुलागम
२९ आनताख्यागम
३० अद्भुतागम
३१ भागाख्यागम
३२ माधवोद्भुतागम
३३ वास्वागम
३४ आ(?अ)मितोज्यागम
३५ सख्यागम
३६ संवीतागम
३७ शुद्धागम
३८ ळलितागम
३९ शामलागम
४० हस्तागम
४१ जातिभेदागम
४२ विभुदागम
४३ आ(?अ)लंकारागम
४४ प्रमेयागम
४५ सुप्रबुद्धागम
४६ विद्यागम
४७ पुराणार्थागम
४८ भास्वरागम

४९ सुतीर्थागम
५०
५१ कि(?किं)कराख्यागम
५२ ि.वभेदागम
५३ रुद्रभेदागम
५४ सुवर्धनागम
५५ शुक(?का)गम
(शुलागम ?)
५६ नदा(?नंदा)गम
५७ रूपभेदागम
५८ पंचभेदागम
५९ प्रापंचभेदागम
६० संकी(?संकी)र्णाख्यागम
६१ लिंगागम
६२ सौम्यतंत्रागम
६३ आ(?अ)घोरतंत्रागम
६४ नीललोहिततंत्रागम
६५ प्रकर्णा(?रणा)गम
६६ महाघोरागम
६७ मृत्युनाशकागम
६८ कुबेराशागम
६९ वैमलागम
७० प्रस्तराख्यागम
७१ प्रभुरागम
७२ बाध(?बोध)नागम
(बंधनागम ?)
७३ प्रबोधाख्यागम
७४ समयागम
७५ आमोहसंज्ञागम
७६ शाकटेयागम
७७ विलेखनागम
७८ वरिागम
७९ शकटागम
८० हल(?चल)संज्ञागम
८१ भद्रागम
८२ निश्वासकार्यागम
८३ निश्वासनयनागम
८४ गुह्यागम
८५ निश्वासागम
८६ सौख्यागम
८७ निश्वासाता(?सत)रागम
८८ सौख्यागम
८९ आ(?अ)नलागम
९० स्वार्यभूतागम
९१ पद्मतंत्रागम
९२ प्राज्यापत्यागम
९३ फालागम
९४ महाकालागम
९५ महारुद्रागम
९६ कौमारागम
९७ कालदाहानलागम
९८ मुकुटाख्यागम
९९ मुकुटोत्तारकागम
१०० चतुरमु(?मुं)खागम
१०१ विंबागम
१०२ अर्थालंकारागम
१०३ महायोगागम
१०४ स्तोत्रागम
१०५ मन्या(?ज्या)गम
१०६ वायुतंत्रागम
१०७ महाविद्यागम
१०८ वर्गशिखरागम
१०९ तुलायोगागम
११० कौतुकागम
१११ सौरागम
११२ कुतुपनिकरागम

११३ तुलाभृत्तागम
११४ वीरभद्रागम
११५ नीलभद्रा(?द्र)तंत्रागम
११६ कालभेदागम
११७ नंदीसंवितागम
११८ पुराणाख्यागम
११९ देवीमतागम
१२० नंदीश्वरागम
१२१ स्ता(?स्था)णुसंहितागम
१२२ स्थिरतंत्रागम
१२३ प्रबुद्धागम
१२४ त्रैविक्रमागम
१२५ कालसंज्ञागम
१२६ वायुलोकोत्तरागम
१२७ प्ररोचितागम
१२८ बाधुलागम
१२९ विश्वकागम
१३० शुद्धागम
१३१ महानागागम
१३२ विश्वात्मकागम
१३३ सर्वाष्टकागम
१३४ सर्वागम
१३५ नित्यागम
१३६ श्रेष्ठागम
१३७ वैष्णवागम

* ८६ व ८८ हीं दोन्ही नांवें एका च ग्रंथाचीं; अगर एक सांख्यागम व दुसरा सौख्यागम, कारण सा यो मोडी अक्षरावर मूळांत रफारसारखी खूण आहे, ह्या दोन मात्रा आहेत किंवा अनुस्वार आहे असें म्हणतां येईल.

यादींतील जीं नावें लागलीं नाहींत त्यांचा अनुक्रमांक देऊन नांवाची जागा कोरी सोडली आहे.

## १९३ कृष्णराव खटावकर यांची माहिती

१ निजामच्या राज्यांत बाराहळ्ळी म्हणून एक गांव आहे तेथचे पाटील हे कृष्णराव खटावकराचे पूर्वज. राघो मंबाजी व कृष्णाजी मंबाजी हे दोघे बंधु. हे दोघे धार्मिक होते. ते व्यंकोबाच्या गिरीवर अनुष्ठानास गेले, हे माध्वमतानुसारी वैष्णव होते. त्यांस दिल्लीच्या बादशहाकडे जाण्याचा देवाचा दृष्टांत झाला. त्यांपैकीं कृष्णरावास खटावाची ठाणेदारी मिळाली. दुसरा भाऊ राघो मंबाजी हा मोठा विद्वान् पंडित होता. कृष्णरावाचे वंशज कशामुळें हें समजत नाहीं परंतु बाराहळ्ळीच्या पाटीलकीवर गेले व राघो मंबाजी ऊर्फ राघवपंडित याचा पुत्र भगवंतराव हा ठाणेदारी करूं लागला. हा भगवंतराव मोठा शूर पुरुष होता. त्याचा पुत्र प्रसिद्ध कृष्णराव होय. चुलत आजाचें नांव त्यास ठेविलें.

२ खटावगांवाभोंवतीं गांवकुसूं होतें व आंत कोट होता. ह्या कोटांत मुसलमानांच्या वेळची मशीद होती. कृष्णरावानें ती मशीद पाडून कोटाच्या बाहेर मुलमानांकडून बांधविली व मशिदीच्या जागीं दत्ताचें मंदिर बांधलें. ह्या दत्तमंदिरांत कृष्णरावाची पुस्तकशाला होती. नवीन ग्रंथ उतरून घेण्याकरितां बारा लेखक निरंतर बसलेले असत. कृष्णराव हा व्याकरण व न्याय ह्या दोन शास्त्रांत निष्णात असून मोठा शूर होता. विष्णुमूर्ती खटावास आहे ती विष्णुमूर्ती आडांत टाकलेली होती. ती काढून तिची स्थापना कृष्णरावानें केली*.

३ जेजुरीचा खंडोबा हा बाराहळ्ळीकरांचा कुलस्वामी होय. अशी आख्यायिका आहे कीं त्यांच्या घरीं देव्हाऱ्यांत पुष्कळ देव होते ते सर्व मल्हारतीर्थ म्हणून आहे त्यांत टाकून दिले. त्यांतून दोनमात्र टाकतांना राहिले एक व्यंकटेश व दुसरा खंडोबा. जेजुरीच्या खंडोबाचें देऊळ कृष्णराव खटावकरानीं बांधलेलें आहे. हें टेकडीवर आहे. ही टेकडी खटावकरांनीं बांधून काढली होती. हिला सामन्यतः जेजुरगड म्हणतात. पुढें अहल्याबाई व तुकोजीराव यांच्यावेळीं होळकरांनीं फक्त मधलें कृष्णराव खटावकरानीं बांधलेलें देऊळ कायम ठेऊन बाकीचीं जेजुरगडचा तट व ओंवऱ्या व आणखी कांहीं बांधकामें केलीं. पूर्वीचा तट सामान्य होता तो पाडला. देऊळ पाडून नवें मोठें देऊळ बांधावें असें होळकरांच्या मनांत होतें परंतु तसें करण्याबद्दल देवानें कौल दिला नाहीं त्यामुळें खटावकरांनीं बांधलेलें देऊळ कायम ठेविलें. चंपाषष्ठीच्या दिवशीं पहिला नैवेद्य खटावकरांचा च झाला पाहिजे असा मान आहे. तेथील त्यांचे क्षेत्रोपाध्याय लोणकर हे खटावकरांचा नैवेद्य देवास नेतात. त्यांस कृष्णराव खटावकरानीं देवास दिलेल्या इनाम जमिनींत हल्लीं स्टेशन झालेलें आहे. खटावकरांचें एक घर होतें तें उपाध्यायांनीं कमेटीस विकलें. तेथें हल्लीं दवाखाना आहे. चंपाषष्ठीच्या वेळीं व पौष मासीं देवाचें लग्न होतें तेव्हां अगोदर कांहीं दिवस देवास तेल लागतें त्या प्रसंगीं तेल लावण्याचा पहिला मान खटाकरांचा आहे. तो मान त्यांच्या उपाध्यायाकडे आहे.

कृ. वि. आचार्य कालगांवकर

---

* ह्या बाबतींत भारतवर्ष मासिकांत आम्हीं माहिती दिलेली आहे तिच्याहून निराळी माहिती मिळाली ती ह्या टाचणांत देत आहों. ही सर्व माहिती तोंडी आहे. जुन्या माहितगारांपासून मिळाली तसतशी दिलेली आहे.

# १९४ कारस्कर

इतिहास मंडळाच्या शके १८३४ च्या इतिवृत्तांत मीं असें विधान केलें होतें कीं कारस्कर हा देश व वृक्ष व लोक पाणिनीला माहीत असावे व हा देश नर्मदेच्या दक्षिणेस असावा. ह्या विधानाला वनस्पतिशास्त्रांतून एक दुजोरा मिळाला आहे. कारस्कर हा शब्द निघंटूंत कुचल्याचा म्हणजे Nux vomica चा वाचक आहे. कुचला सह्याद्रींत नाशका पासून गोंवा–मलबार पर्यंत सांपडतो असें वनस्पतिशास्त्रज्ञ म्हणतात. कुचल्याची मूळ–भूमि सह्याद्रींचा हा प्रांत असावा. कुचला हें औषध व वनस्पति नर्मदेच्या उत्तरे कडील आर्यांना जेव्हां कळली, तेव्हां ही विषारी व औषधी बी ती ज्या देशांतून येई त्या देशाच्या नांवानें ते ओळखूं लागले. मूळ देशाचें व लोकांचें नांव कारस्कर होतें व कारस्कर देशांतून येणाऱ्या ह्या अपूर्व व तेजस्वी वनस्पतीचें नांव हि उत्तरे कडील पाणिनीयकालीन आर्यांनीं कारस्कर असेंच ठेविलें. तात्पर्य, कारस्कर हा दक्षिणेकडील देश आहे, असें निःसंशयपणें म्हणण्यास आतां हें एक आणीक प्रमाण मिळालें आहे व पाणिनीला नर्मदेच्या खालील कुचला ज्या प्रांतांत मूळचा होत असे तो प्रांत नांवानें तरी चांगला माहीत होता असें कबूल करणें भाग पडतें. कारस्कर हा मूळचा संस्कृत शब्द नाहीं. हा सह्याद्रींत रहाणाऱ्या नाग लोकांच्या भाषेंतील शब्द असावा. तो नागसंसर्गानें आर्यांनीं संस्कृतांत रूढ केला आणि कालान्तरानें तो अत्यन्त रूढ झाल्यावर त्याची व्युत्पत्ति पाणिनीसारख्या सूक्ष्मदृष्टि वैयाकरणाला करावी लागली. प्रायः परभाषेंतून घेतलेले शब्द स्वभाषेच्या स्वभावा प्रमाणें व नियमांना धरून व्युत्पादण्याचा प्रयत्न थोडासा हास्यास्पद च आहे. परंतु, पाणिनीनें ज्या अर्थी तो संस्कृत शब्द म्हणून व्युत्पादण्याचा प्रयत्न केला आहे, त्या अर्थीं पाणिनीच्या आधीं कित्येक शतकें हा शब्द संस्कृतांत इतका रूढ होऊन बसला होता कीं तो मूळ संस्कृत आहे कीं नागभाषेंतील आहे, या बाबीची आठवण सुद्धां पाणिनीच्या कालीं बुजाली होती. अशी स्थिति असल्या मुळें कारस्कर शब्दाची कृत्रिम व्युत्पत्ति करण्यास पाणिनि प्रवृत्त झाला व कार व कर या दोन संस्कृत शब्दांचा समास होतांना सुडागम मध्यें येतो, असें सूत्र त्यानें साहजिक च ठेवून दिलें. सिंधप्रदेशांत ज्याला पारकर प्रांत म्हणतात त्याला पाणिनि पारस्कर म्हणे व तेथें हि सुडागमाचा च उपयोग पाणिनीनें केला आहे. प्रायः पारस्कर हा शब्द सिंधप्रांतांत आर्यांच्या अगोदर जे कोणी लोक रहात असतील त्यांच्या भाषेंतील मूळचा आहे, असा माझा तर्क आहे.

वि. का. राजवाडे

## १९५ पेशव्यांचें पंचांग

पेशव्यांचीं पंचांगें बहुधां ग्रहलाघवावरून तयार करण्यांत येत असावीं व त्यांतील मित्या ठरवितांना दीक्षितांची जंत्री उपयोगांत आणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. पण क्वचित् ग्रहलाघव व पेशव्यांचें पंचांग यांत अंतर पडतें असा संशय येतो. पेशव्यांची शकावली पृ. २५ मध्यें 'अधिक भाद्रपद साबान महिन्यांत आला होता' असें मुद्दाम सांगितलें आहे, पण दीक्षितांच्या जंत्रीवरून व ग्रहलाघवावरून शके १६३६ मध्यें आषाढ अधिक होता असें ठरतें. जंत्रीवरून साबान महिन्यांत श्रावण येतो. शकावलींत हें वाक्य चुकून पडलें असण्याचा संभव हि फारसा दिसत नाहीं. शके १६३६ च्या मागें पुढें बरीच वर्षें पर्यंत अधिक भाद्रपद व साबान यांचा मेळ बसत नाहीं. पण या एका उल्लेखामुळें पेशव्यांच्या दरबारीं ग्रहलाघवावरून पंचागें करीत नव्हते असें म्हणतां येत नाहीं. या उल्लेखाचा जंत्रीशीं विरोध येतो येवढें च सध्यां नमूद करावयाचें आहे.

वि. रा. सरज्योतिषी

## १९६ वडूथ येथील शंकुतेश्वर

पुढील सनद शंकुतेश्वर–वडूथ संबंधाची असून ती रा. रा. गंगाधर गोपाळ खरे, वडूथ, यांजकडून मिळाली. तींत विशेष हक्कांचा उल्लेख असल्यामुळें तिचा संग्रह केला आहे. शंकुतेश्वराच्या स्थापनेसंबंधानें पेशव्यांचे शकावलींत दाखला आहे. ठिकाण रम्य असून, पहाण्यासारखें आहे.

पां. न. पटवर्धन

शके १६८९ — श्री

10954 — Inam × H × Commission — शंकुतेश्वर

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ९४ सर्वजित नाम संवत्सरे माघ शुद्ध सप्तमी भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपती स्वामी यांणी समस्त राज-

कार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित प्रतिनिधी यांसी आज्ञा केली ऐसी जे वेदशास्त्रसंपन्न राजश्री विश्वनाथभट बिन रामचंद्रभट उपनाम खरे गोत्र कौशिक शाखा तैतिरीय सुत्र हिरण्यकेसी याणी किले सातारा येथील मुकामी स्वामी संन्नीध येऊन विनंती केली की कसबे पुणे येथील मुकामी राजश्री माधवराव पंडित प्रधान याजपासी आम्ही विदित केले जे मोजे वडूथ संमत निंब प्रांत वाई येथे श्रीकृष्णातीरी श्री याचे देवालयाचा जीर्णोद्धार आपण करून श्रीचे पूजा नैवेद्य व नंदादीप व उत्साहानिमित्त ब्राह्मण श्री संन्निध कुटुंब सहवर्तमान नेहमी घरे बांधोन राहतील त्याचे योगक्षमार्थ मोजे मजकूर दरोबस्त दुतर्फा कुलबाब कुलकानू कैलासवासी मातुश्री आईसाहेब याजपासून इनाम अग्रहार देवा ब्राह्मणाकरितां आपुण करून घेतला आहे त्यास आम्ही कुटुंबवछल आहो योगक्षमार्थ काही भूमि वृत्ती दिल्हीया आम्ही घर बांधोन कुटुंबसहवर्तमान नेहमी श्रीसंन्निध कृष्णातीरी वास करून स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतन राहू म्हणून त्यावरून पंडितमशारनिल्हे याणी आमच्या कुटुंबाच्या योगक्षेमार्थ मौजेमजकुर पैकी जिरायत जमीन चावर १ एकूण बिघे एकसे वीस स्वराज्य मोगलाई एकून दुतर्फा देखील इनामतिजाई व चौथाई व सरदेशमुखी व साहोत्रा व नाडगौडी व धारकरी पाटील व देशमुखी वगैरे अमल कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तरपटी जलतरु तृण काष्ट पाषाण निधिनिक्षेपसहित खेरीज हकदार दरोबस्त नूतन इनाम वंशपरंपरेनें करून देऊन शके १६८३ वृषानाम सवछरे छ ७ सफर सुा इसने सितैनची पत्रे करून दिल्ही आहेत तरी माहाराजानी कृपाळू होऊन भोगवटियास राजपत्रे करून देऊन वंशपरंपरेने चालविले पाहिजे म्हणून विनंति करून सदरहू प्रमाणे पत्रे आणून दाखविली त्यावरून मनास आणून हे थोर ब्राह्मण सत्पात्र स्नानसंध्यादि शट्कर्मे आचरोन स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून आहेत याच्या कुटुंबाचा योगक्षेम चालविलीया श्रेयस्कर ऐसे जाणून स्वामी याजवर कृपाळू होऊन यासी पंडितमशारनिले याणी मौजेमजकूरपैकीं जिराईत जमीन एक चावर एकून एकसे वीस बिघे अवल दुम सीम तीन प्रतीची स्वराज्य व मोगलाई एकून दुतर्फा देखील इनामतिजाई व चवथाई व सरदेशमुखी व साहोत्रा व नाडगौडी व धारकरी पाटील व देशमुखी वगैरे अमल कुलबाब कुलकानू हलीपटी पेस्तर-पटी जल तरु तृण काष्ट पाषाण निधिनिक्षेपसहित खेरीज हकदार नूतन इनाम वंशपरंपरेने दिल्हा आहे त्याप्रमाणे हुजुरून यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने करार केला असे तरी तुम्ही मौजेमजकूरपैकी जिराइत जमीन चावर एक एकून बिघे एकसे वीस चतुःसीमापूर्वक याचे दुमाला करून सदरहू प्रमाणे यासी व याचे वंशपरंपरेने इनाम चालवणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे या

पत्राची प्रती लेहून घेऊन हे असल पत्र भोगवटियास भट गोसावीयाजवळ परतोन देणे जाणिजे बहुत लिहिणे तरी सूज्ञ. असा

मर्यादेयं राजते

बार

10954

# १९७ नगरचे किल्ल्यासंबंधानें कांहीं नवीन माहिती

पुढील यादी डॉ. कराडी, अहमदनगर, यांचे कृपेनें मिळाली. त्यांस ती भिंगारास एका देशमुखाचे घरीं गळाठ्यांत आढळली. असल्या याद्या इतिहासोपयोगी असतात हें खरें; परंतु त्यांचा दुय्यम दर्जा होय, हें हि तितकें च खरें आहे. तरी पण नगरचे किल्ल्यासंबंधानें इतकी तपशीलवार हकीकत कोठें वाचण्यांत न आल्यामुळें, ती संग्रहीत केली आहे. मुसलमानी 'मुज्दे अहमदनगर' नामक एक तवारीख माझे स्नेही श्री० ना. य. मिरीकर वकील, अहमदनगर, यांचे घरीं पाहण्यांत आली होती. परंतु त्या तवारिखेंतील माहितीपेक्षां पुढील माहिती जास्त तपशीलवार आहे.

पां. न. पटवर्धन

श्रीगज्यानन

असल चमोजी नकल शके १३६५ दुदभी नाम सवछरे वैशाख शु॥ १३ वार गुरुवार तेरीख छ ११ रोज पनसबे माहे राखर सन हजार ८५३ आहमद बहेरी निंजामशा पातशाहा आमदानगरास येऊन शहरची वस्ती केली सेहरच पाया रचला मग कोटाचा पाया सिनेचे काठी रचिला शहर वसाती केली सेहरास बाजार २७ सतावीस करून आबादानी केले पातशाहीचैन आमल जालियावर हजरत बहेरी निज्यामशाहा सिकारीस निघाले ते भिंगारचे नदीचे काठी ससा उठला त्याजवर कुत्रे सिकारीस सोडिले तो ससा कुतरियाचे पाठी लागला तो पातशाहाजीस अचंबा जाला त्याजवरून हजरती विचारे करून जे जागा ससा उठला होता तेथे कोटास आरंभ केला आणि सिनेच्या काठीचा पाया महकुब करून के॥मजकूरच्या नदीच्या काटी पायास आरंभ केला ते समई शके १३९१ चित्रभानू नाम संवत्सरे चैत्र शु. १ सोमवार नक्षत्र रेवती तेरीख माहे रबिलावल रोज दुसबे सन ८७९ चे रोजी कोटास पाया घातला ते वेळेस भिंगा

महार जीत च आणून पायाखाली घातला मग पाया रचला कोटाचा घेरा गज सुमारी १६२७

दोरी विघे

१६८१॥ ५।=

८०।१।

५॥२॥

८५॥।३॥।

बुरूज कोटाचे पंचवीस दरवाजे सुमारी ४ च्यार पे॥ चिणले तीन पश्चिमेकडून उत्तरमुख दरवाजा वागती विल्हेई बुरुजात पीर बागनि नाम असे ह्या दरवाजास तीन दरवाजे बुरूजाची नावानिर्सी

१ बुरूज इलाई दरवाजाच्या बुरुजापासून उत्तरेस बुरुजाची चाल इलाई गज घेरा गज सुमारी ५० नाले ३

१ नारगी बुरूज गुरचीपासून ४४॥। घेरा गज सुमार २४ कोटाचे दिवालीस नाले २

१ राज बुरूज निमकियापासून गज ८८॥ घेरा गज सुमारी २४ नाला १

१ दौलतखानी बुरूज छेनेबुरुजापासून गज सुमारी ४६ व घेरे गज २४ कुलबुरूज दर बुरुजास आहे नाला १

१ अतशखाणी बुरूज पोलादी बुरुजापासून गज ४६ व नाला १

१ शाहा बुरूज रदमानी (?) एकंदर दिवालीसी आहे नाले २

१ सुरकी बुरूज बुरुजापासून बाहेरी बुरूज गज सुमारी ५० नाला १

१ सुभाणी बुरुजापासून विसाफखाणी गज सुमारी ४५ नाला १

१ जाहागिरी बुरुजापासून फरादखाणी गज सुमारी ४४ नाला १

१ दौलत बुरुजापासून फरीद बुरूज गज सुमारी ४५ नाला १

१ गावछज्यापासून बाहादडगांव गज ७८ नाले ३

१ असेरफखानी बुरुजापासून मुकरब खाणी गज सुमारी ४० नाले २

१ गुरची घेरा गज २४ इलाइदीपासून गुरची गज भिंतीस लग गज ४६ नाले २

१ निमका बुरूज नारगीपासून गज ४५॥ घेरा कोटाचे दिवालीस गज सुमारी २४

१ छेजे बुरूज राजबुरुजापासून गज ९३ घेरा गज सुमारी २४ नाला १
१ पोलादी बुरूज दौलता बुरुजापासून गज सुमारी ५२ नाला १
१ रदमानी बुरूज आतशखानीपासून गज सुमारी ८० नाला १
१ हुशेनी बुरूज शाहा बुरुजासी आहे यापासून सुरदीबुरूज गज ४८ नाला १
१ बेदरीपासून सुभान बुरूज गज ४३ नाला १
१ विसाफखाणी बुरुजापासून जाहांगीर गज सुमारी ४५ नाला १
१ फत्ते बुरुजापासून गाव सरज्याबुरूज गज ९७ नाले २
१ रबडद्या बुरुजापासून असरफखाणी गज सुमारी ११२॥ नाले ३
१ दुलारबीखाणीपासून काबिलखाणी गज सुमारी ४५ नाले २
१ काबीलखाणीपासून विलाई मसलाल दरवाजे बुरुज गज १२ नाले २

२५ बुरुज नाले सुमारी ३७

सदरहू बुरुज चोवीस व लगत बुरूज १ एकूण बुरुज २५ पंचवीस गज गणितासुद्धा नावनिसीवार

किलेदार सुभे जाले येणे प्रे॥ नावनिसीवार शके १३९१ पासून

१ इसमालखान शके १३९१ ता। शके १३९८ वर्षे सात
१ खोजे बेग शके १४०७ वर्ष ९ नव जाले
१ जाहनखान शके १४०७ ता। शके १४१५ वर्षे आठ
१ जाहांगीर बेग शके १४१५ ता। शके १४२४ वर्षे नव
१ ( पुनः ) खोजे बेग सके १४२४ ता। शके १४३४ दहा वर्षे जाले

( पुढील पान गहाळ )

१ सेद आहमीद शके १६६१ तहत शके १६६९ वर्षे आठ जाले
१ कवीजंग नबाब शके १६६९ ता। शके १६८१ वर्षे १२ महिने आठ जाले नंतर फितूर करून पंत प्रधान याजकडे अमल जाला

३५

येणे प्रमाणें सुभे जाले पस्तीस शके १६८१ पर्यंत पुढे गणिमाकडे किला दिल्हा

श्रीमंतांकडे किला जाला सके १६८१ प्रमाथी नाम संवछरे कार्तिक वद्य ५ छ १८ सुभे नावनिसीवार

१ विसाजी कृष्ण सके १६८१ तहत सके १६८२ वर्ष एक

१ गणेश विठल सके १६८२ ता। सके १६८७ वर्षे पाच

५ नारो बाबजी

१ नारो बाबजी शके १६८७ तहत सके १६९२ वर्षे पांच

१ ( पुनः ) गणेश विठल एक वर्ष

१ दुसऱ्याने नारो बाबजी शके १६९३ तहत सके १७०५ वर्षे १२

१ माधवराव नारायण सके १७०५ तहत १७१२ वर्षे सात जाले

१ रामचंद्र माधवराव शके १७१२ ता। सके १७१७ वर्षे पांच जाले

---

५

सद्रहू सहा सुभे जाले आमल पंत प्रधानाकडे छत्तीस वर्षे जाला पुढे नाना फडणीस यानी गोमाजी अनंत याजला पाठवून मोजदाद करून दौलतराव शिंदे यास दिला शके १७१७ माहे श्रावण शुा १ प्रतिपदेस दिल्हा गोमाजी अनंत याणी किल्यांत तीन रोज आमल केला उपरातीक दौलतराव शिंदे याजकडे अमल किल्यांतील दिला त्याच्या सुभ्याची नावनिशी

१ शके १७१७ श्रावण शुध प्रतिपदेस कृष्णराव गोपाळ चिचोरकर श्रीगोंदेकर आमल शके १७१७ श्रावण तहत कार्तिक वद्य मास चार

१ कार्तिकापासून मल्हार धोंडदेव सोनेहीकर मास ६
रामजी सेटे शके १७१७ कार्तिक तहत शके १७१८ वैशाख

१ उपरांतिक रामचंद्र गंगाधर महिने चार वैशाख तहत श्रावण पे॥ उपर मैत जाले

१ उपर राजाराम गंगाधर महिने सात शके १७१८ फाल्गुन

१ उपर शके १७१८ तहत शके १७१९ तहतशके १७२५ वर्षे ७॥ अमल मल्हार धोंडदेव ई॥ विठलपंत फडणीस उपरांतिक फिरंगी याजकडे सके १७२५ रुधिरोद्गारी नाम सवछरे श्रावण व॥ ७ सोमवारी फिरंगी याजकडे किला जाला त्याचे आमलदार नावनिसीवार

शके १७२५ रुधिरोद्गारी नाम संवत्सरे श्रावण वद्य ७ वार सोमवारी नंतर शुक्रवारी किलावर आमल फितूर करून घेतला वसलीसो याणे ठाणेदार तीन वर्षे शके १७२५ ता। १७२८ आषाढ

१ गिरमसाहेब शके १७२५ ता शके १७२६ रक्ताक्षीनाम सवत्सरे
१ उपरांतिक प्रेजरसाहेब शके १७२६ मास ६ माघारीयेत उपरांतिक
१ जोखीणसाहेब शके १७२६ तहत

२

१ शके १७२७ जेष्ठमास परियंत टरटरसाहेब मास पाच
१ उपरांतिक वारणसाहेब ३
१ याणे आमलटणसो येऊन दिल्हा नंतर शके १७२७ पौष वद्य ९
१ पुन्हा वार्गन सो आला तो परभारा आकोळनेराहून पाहणी करावयास वाळकीवरून नारायणडोहावरून मेहेकरी वगैरे तिकडून येऊन मोहीबागेत मुकाम केला मास सके १७२७

७

ता सके १७२८ आषाढ वद्य १० प्रो आमल दिल्हा मास होते ५ पुढे वर्ष फिरंगीयाकडे तीन वर्ष
आमल श्रीमंताकडे बाजीरावसाहेब याजकडील आमलदार
१ परशुरामपंत मालुजकर याजकडे आन्याबा राहतेकराकडील सके १७२८ क्षयी नाम सवछरे आषाढ वद्य १० प्रहरा रात्री आमल जाला रोज शुक्रवार

## १९८ नरहरी मोरेश्वराचा गुरु कोण ?

भारतावर मराठींत रचना करणारा कवी नरहरी मोहेश्वर ऊर्फ बच्याजी देशपांडे हा आपल्या परिचयांतील आहे; पण याचे गुरु जे भीमस्वामी ते कोठील याचा निर्णय अद्याप झालेला नाहीं. श्रीसमर्थसांप्रदायांत जे चार भीमस्वामी आढळले, त्यांपैकीं भीमस्वामी तंजावरकर यांचा काल व कवीचा काल साधारणपणें एक च दिसल्यामुळें, रा. अजगांवकर यांनीं आपल्या 'महाराष्ट्र-कविचरित्रांत (भाग २ पृ. २७) तंजावर-भीमस्वामी हे प्रस्तुत कवीचे गुरु असावेत असा तर्क केला आहे. परंतु कवीचें रहाण्याचें व वतनदारीचें ठिकाण व तंजावर-मठपतीचें ठिकाण यांमधील अंतर हीं लक्षांत घेतां हा तर्क अप्रतिष्ठित दिसतो. रा. आजगांवकरानीं दिलेल्या चार भीमस्वामींहून भिन्न व ते हि खुद्द कवीच्या रहाळांतील, असे एक पांचवे भीमस्वामी होऊन गेलेले आहेत. यांचा परिचय आपणास रा. शंकर श्रीकृष्ण देव यांनीं रामदास व रामदासी मालेंतील श्रीगिरि-

धरकृत 'श्रीसमर्थप्रताप ' या ग्रंथाचे प्रस्तावनेंत पृ. ६३ वर बीड येथील मठाची माहिती देतांना करून दिलेला आहे. हे भीमस्वामी अगर भीवाजीबावा म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून 'प्रताप'कार गिरिधर यांचे धाकटे बंधू भीम हे असून यांचा मठ हि बीडास सांप्रत विद्यमान आहे. यांच्या समाधिकालाचा निर्णय करितांना 'शक १६९२-९३ दरम्यान भिवाजीबावा समाधिस्थ झाले असावे' असें रा. शंकरराव देव यांनीं मठांतील कागदपत्रांवरून प्रस्तावना पृ. ६४ वर लिहिलें आहे. शके १६९२-९३ हा काल व नरहरी मोरेश्वरानें आपल्या उद्योगपर्वाचे शेवटीं दिलेला शक १६८१ हा रचनाकाल हे पाहतां, व कवींचें वसतिस्थान व बीड येथील भीमस्वामी यांचें रहाण्याचें ठिकाण हीं पाहतां, बीडकर भीमस्वामी हे च नरहरी मोरेश्वराचे गुरु होत असें निःसंदिग्ध म्हणतां येतें.

पां. न. पटवर्धन

---

## १९९ महीपति उज्जनीकर

उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांचा प्रवेश झाल्या नंतर ज्या महाराष्ट्रीय संतकवींनीं तिकडे स्वधर्माचा प्रसार करण्याची अपूर्व कामगिरी बजाविली, त्यांत च महीपतीचें हि नांव मोडतें. भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या शके १८३३ च्या अहवालांत रा० राजवाडे ह्यांनीं संतचरित्रकार महीपतिबोवा ताहराबादकराचे गुरु नरहरिनाथ होते असें लिहिलें आहे. पुढें शके १८३४ च्या मंडळाच्या अहवालांत रा० भावे ह्यांनीं असें प्रतिपादिलें आहे कीं, संतचरित्रकार महीपति हा नरहरीचा शिष्य नसून त्याचा शिष्य महीपति हा एक निराळा च महीपति आहे. प्रस्तुत संत कवि महीपति तो च म्हणजे नरहरिशिष्य होय. उज्जनी येथें दत्त भाऊ नांवाच्या एका नाथपंथीय साधूचा मठ आहे. ते दत्तात्रय भाऊ ह्या महीपतीचे आश्रयदाते होत. प्रस्तुत माहिती मला त्यांच्या मठांतून च मिळाली आहे. ह्या कवीचा उज्जनी व ग्वालेर येथें बरा च मोठा शिष्यसंघ असून ग्वाल्हेर येथें त्याची समाधी आहे. महीपतीनें आपल्या आयुष्याचे अधीक दिवस उज्जनीस च घालविल्या मुळें मीं त्यास उज्जनीकर म्हटलें आहे. पण त्याचे शेवटचे कांहीं दिवस ग्वाल्हेरिस गेल्या मुळें व त्याचा मृत्यु तेथें झाला म्हणून त्याची समाधि तेथें च असल्या मुळें त्याच्या सम्प्रदायाची गादी तेथें च सुरू झाली. ग्वाल्हेर येथें हल्लीं असलेले श्रीढोलीबुवा हे महीपतिच्या च शिष्यपरंपरेंतले होत. ढोली बुवांचा पारम्परिक पोशाख विचित्र असल्यामुळें मी त्यांचें पोषाखासुद्धां काढविलेलें चित्र मंडळाच्या संग्रहीं ठेवीत आहे. असो.

प्रस्तुत कवि महीपति पैठण येथील राहणारे असून जनार्दनस्वामीचे वंशज होते. पण ते शिवदिन केसरीशिष्य नरहरीचे अनुयायी असल्या कारणानें च त्यांचा कवनाच्या शेवटील चरणांत **नरहरिशिष्य महीपति** असा उल्लेख सांपडतो. ते पैठणहून काशीयात्रेच्या निमित्तानें उत्तर हिंदुस्थानांत जाण्यास निघाले. तों रस्त्यांत बडोद्यास हि कांहीं दिवस राहिले. तेथें त्यांची प्रतिभा पाहून बऱ्या च मंडळींनीं त्यांस तेथें च राहण्या विषयीं आग्रह केला. पण ते तेथें न राहतां इंदुरास गेले. तेथील लोकसमाजांत हि त्यांची बरी च वाहवा झाल्यामुळें पुढें त्यांस राजाश्रय मिळाला व यशवंतराव होळकरांनीं त्यांज पासून गुरुमंत्र घेतला. पण कांहीं कारणामुळें त्यांस इंदूर सोडावें लागलें. इंदुरहून ते तडक काशीस जावयास निघाले. तोंच रस्त्यांत भोपाळ नजीक त्यांस उज्जनीस असलेल्या दत्तात्रय भाऊ नांवाच्या संता विषयीं माहिती कोणीं सांगीतली. तेव्हां त्यांनीं उज्जनीस च जाण्याचा बेत केला. पुढें त्यांना दत्तभाऊंचा आश्रय मिळाल्या मुळें त्यांनीं तेथें च कीर्तन व काव्यरचनेशिवाय कांहीं एक केलें नाहीं. दत्तभाऊंच्या मठांत महीपतीची अद्यापि बरी च अप्रकाशित हिंदी व मराठी कविता आणि ग्रंथ असून मठाधिकाऱ्यांनीं त्यांची कविता मला देण्याचें वचन हि दिलें आहे. पुढें त्यांस उज्जनीची राजधानी ग्वाल्हेर हें शहर पाहण्याची इच्छा झाली म्हणून ते तेथें गेले. मठाधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून कळतें कीं, त्यांस दौलतराव शिंद्यांनीं निमंत्रित केलें होतें. ग्वाल्हेरीस तर त्यांचें माहात्म्य फार च वाढलें. पण पुढें लवकर च म्हणजे शके १७४४ त पौष शुद्ध १३ स त्यांनीं समाधी घेतली म्हणून त्यांच्या अनुयायांनीं तेथें त्यांची समाधी बांधून गादी हि स्थापन केली. ती गादी अद्यापि ग्वाल्हेर येथें चालू आहे. वरील तिथीस ग्वाल्हेरीस महीपति नाथांचा मोठा भंडारा होत असतो. ग्वाल्हेर संस्थानाकडून महीपति उर्फ ढोलीबुवांच्या संस्थानास मोठें उत्पन्न हि चालू आहे.

भास्कर रामचंद्र भालेराव

## २०० खंडेराव हरींची छत्री

उत्तर हिंदुस्थानांत अचल मराठेशाही स्थापन करण्यास "हर हमेश शत्रुंशीं दावा करून हिंदुस्थान जिंकणाऱ्या" महादजी शिंदे उर्फ पाटीलबोवांच्या स्वामित्वा खालीं ज्या शूर ब्राह्मणांनीं अत्यंत धाडसाचीं कृत्यें केलीं, त्यांत खंडेराव हरींचें नांव प्रमुखतेनें आढळतें. माळव्यांत उत्कृष्ट मुत्सद्देगिरी पूर्वजांचे वळणानें बजावून, भोपाळवाल्यास जेर करून त्यांचेकडून भेलसा मुलुख घेऊन, ज्यांनीं गोहद, दिल्ली,

पुरनिया, जयपुर, आग्रा, मेरठ वगैरे ठिकाणीं वीरोचित कामें करून दिल्लीस मराठ्यांचा चांगला प्रभाव स्थापन केला, इतकें च नव्हे, तर स्वतः दिल्लीच्या किल्ल्याचा अधिकार आपणांकडे ठेवून डभोई ( De Boigne), जॉर्जटॉमस ऊर्फ जहाज फिरंगी वगैरे युरोपियनांस आश्रय दिला आणि उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांचा खरा दरारा बसविण्याचें श्रेय संपादिलें. त्यांच्या मृत्यू संबंधीचीं युरोपियन इतिहास लेखकांचीं विचित्र विधानें पाहून मला त्यांच्या मृत्यूचा काल व स्थल यां संबंधीं माहिती मिळविण्याची इच्छा झाली. त्या प्रमाणें मला जी कांहीं तत्सम्बधीं माहिती मिळाली ती थोडक्यांत खालीं लिहीत आहें.

खंडेराव हरींच्या, सध्यां मी लिहीत असलेल्या, चरित्रावर पूर्ण प्रकाश पाडणारीं बरीं च अस्सल कागदपत्रें मज जवळ असून हि मीं जेव्हां त्यांच्या बद्दलची माहिती मराठी व इंग्रजी ग्रंथांत पाहण्याचा प्रयत्न केला, तेव्हां मला विशेष महत्त्वाची माहिती मिळाली नाहीं. ज्या ज्या ठिकाणीं महादजींच्या फौजेचा किंवा एकाद्या स्वारीचा उल्लेख येतो, तेव्हां मात्र खंडेराव हरींचा इटकून उल्लेख येतो च. पण महादजींच्या दरबारी कारस्थानांत ( Home politics ) त्यांचा क्वचित च उल्लेख येतो. आणि ते सर्वदां जर मराठ्यांची राज्य-सीमा वाढविण्यांत च नियुक्त असत, तर मग त्यांच्या नांवाचा अधिक उल्लेख नसणें साहजीक च आहे. पण मला एका इंग्रजी पुस्तकांत त्यांचें पूर्व चरित्र आटोपशीर असलेलें व उत्तर चरित्र किंचित् विस्तृत प्रमाणावर पहावयास सांपडलें. त्यांत लेखकानें ज्या ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे, त्या संबंधीं मला या वेळेस च कांहीं एक सांगावयाचें नाहीं. मात्र त्यांत त्यानें खंडेराव हरींच्या मृत्यूचा जो उल्लेख केला आहे तो घोड चुकीचा अतएव भ्रमोत्पादक आहे. म्हणून त्याचें निराकरण करीत आहें.

Herbert Compton नें आपल्या Particular account of the European Military adventurers of Hindustan नांवाच्या पुस्तकांत १३२ – १३३ पृष्ठांवर लिहिलें आहे कीं Khanderao committed suicide by drowning into the Jamna. हें वाचून मला तर अत्यन्त आश्चर्य वाटलें. मला आश्चर्य वाटण्याचें एक आणखी कारण होतें तें हें कीं माझ्या येथें अजून हि त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव आषाढ शुद्ध प्रतिपदेस पाळण्यांत येतो. पण आजपावेतों आत्मघात केलेल्यांची पुण्यतिथि पाळत असल्याचें माझ्या कोठें हि ऐकिवांत नसल्यामुळें माझ्या आश्चर्याची परमावधि झाली. पुढें माझ्या घरचीं कागदपत्रें चाळल्यावर मला त्यांच्या मृत्युकालाची पूर्ण माहिती मिळाली. ती अशी कीं – " खंडेराव हरीनें आपल्या प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें कनौड किल्ल्याहून दिल्लीस येऊन संन्यास

ग्रहण करून आषाढ शुद्ध प्रतिपदा शके १७१९ म्हणजे रविवार ता. २५ जून सन १७९७ ह्या दिवशीं यमुनेंत जल-समाधी घेतली. त्या ठिकाणीं म्हणजे दिल्लीस निगमोदाचे घाटावर छत्री बांधून त्याचे नैवेद्य वगैरेची व्यवस्था त्यांचे चिरंजीव वामनाजी खंडेराव ह्यांनीं केली. ती आजपावेतों चालत आहे. " ह्यावरून कामटनचें म्हणणें कितपत खरें आहे; हें नीट दिसून येतें. अशी हि एक शंका घेण्यांत येतें कीं, इंग्रज लेखकाला जलसमाधी संबंधी कांहीं ठाऊक नसल्यामुळें कदाचित् त्यानें तसें लिहिलें असेल. परंतु, त्यानें त्यांच्या आत्मघाताचें जें कारण दिलें आहे, तें हि मोठें विचित्र व अप्रामाणिक आहे. तो म्हणतोः George Thomas proved very useful to him, but their friendship ended in a serious misunderstanding and Khanderao committed suicide. ह्याशिवाय लेखकानें त्यांच्या गुणांचा उल्लेख करून शेवटीं एक खोटें विधान पक्षपातपूर्ण दृष्टीनं लिहिलें आहे कीं, He was a typical Mahratta whose mind was never free from intrigue and treachery. तेव्हां या आक्षेपास काय उत्तर द्यावें ? जार्ज टामसाची आसुरी महत्वाकांक्षा झांझर येथें आपली जाहगीर स्थापन करून च तृप्त झाली नाहीं तर उलट त्यानें स्वतःची फौज उभारून तो शिरजोर बनला; व ज्या खंडेराव हरींनें त्यास आपल्या पदरीं बाळगून नांवालौकिकास आणलें, त्यांच्या च विरुद्ध टामस पुढें झाला। तेव्हा treacherous खंडेराव हरी होते किंवा जार्ज टॉमस होता ह्याचा विचार त्याच्या चरित्रलेखकानें केला होता काय ? ह्या प्रकरणाचें पूर्ण विवेचन मी लिहीत असलेल्या चरित्रांत करणार च आहे. पण या वेळीं इतकें च पुरे आहे कीं, युरोपीय इतिहासकार आपल्या जातभाईचा पक्ष घेऊन ऐतिहासिक सत्यावर कुठारघात कसे करतात ।

भास्कर रामचंद्र भालेराव

# २०१ कांहीं शब्दांची व्युत्पत्ति

( अ ) प्रो० शि. म. परांजप्ये

## (१) अघोट

हा शब्द पावसाळ्याच्या आरंभाच्या वेळेला लावतात. याच अर्थी कोठें कोठें ' अभोट ' असा हि प्रयोग केलेला आढळतो. हा ' अभोट ' शब्द मूळाच्या ज्यास्त जवळ आहे; व त्यावरून ' अभ्र ' या पासून च त्याची उत्पत्ति झालेली असली पाहिजे असें व्यक्त होतें. ' अघोट ' हा शब्द जसा पावसाळ्याच्या सुरवातीला लावतात तसा 'सराई' हा शब्द पावसाळा संपल्या नंतरच्या दिवसांना लावितात. तो ' सराई ' हा शब्द संस्कृत शरद् = प्राकृत सरओ यापासून निघालेला आहे. खुद्द पावसाळ्याला ' बरसात ' हा जो शब्द लावतात, तो संस्कृत वर्षर्तु = प्राकृत वासारत्तो ( प्रा. पिं. ) या पासून झालेला असावा असें दिसतें. आणखी एका ऋतूच्या नांवापासून मराठीमध्यें कांहीं शब्द उत्पन्न झालेले आहेत. ' शिशिर ' याचें प्राकृतांत ' सिइर ' असें रूप होतें. व त्याचीं हि पुढें आणखी रूपांतरें होतात. ' थंडीची शिरशिरी आली ' यांतील ' शिरशिरी ' हें शिशिर याचें च द्विरुच्चारित रूप होय. ताप भरते वेळीं अंगावर जे थंडी वाजून ' शहारे ' येतात ते हि 'शिशिर' पासून च होत. तसें च थंडीनें एखादा मनुष्य 'सैरभैर ' झाला असें म्हणतात, त्या ठिकाणीं ' सैर ' म्हणजे शिशिर आणि ' भैर ' म्हणजे बधिर असा च अर्थ होय. ग्रीष्म या ऋतूचें रूपांतर एका गांवाच्या नांवामध्यें आढळून येतें. ग्रीष्मवन = गिम्हवणें. या नांवाचें गांव कोंकणांमध्यें आहे; व गौतमबुद्धाच्या पाली भाषेतील गोष्टींमध्यें हि ' गिम्हवण' हा शब्द पुष्कळ वेळां येतो.

## ( २ ) अट

संस्कृतांतील ' अर्थ ' या शब्दाचें प्राकृतांत ' अट्ट ' असें रूप होतें. व त्यावरून मराठींतील ' अट ' हा शब्द निघालेला असावा.

रुक्खदेवते अम्हाकं अट्टं परिच्छिन्दाहि ।

## ( ३ ) अलीकडे, पलीकडे

यांतील ' अली ' आणि ' पली ' हे काय शब्द आहेत? वर दिलेले च शब्द कोंकणांतील अडाणी लोकांच्या भाषेंत ' ऐलीकडे, पैलीकडे ' असे उच्चारण्यांत येतात. ' ऐलतीर, पैलतीर ' यांत हि तीं च रूपें आहेत. आणि बहुतकरून ' ऐस पैस ' या शब्दांत सुद्धां 'ल' च्या ऐवजीं ' स ' हा प्रत्यय लागलेला आहे, एवढा च काय तो फरक असावा. सादृश्यावरून अनुमान काढण्याला ज्यास्त सोईस्कर पडावें म्हणून 'ऐलमा पैलमा गणेसदेवा', ' आइलें नमन पइलें नमन गणेस देवा ' हे अडाणी लोकांच्या

गाण्यांतील प्रसिद्ध चरण हि येथें नमूद करणें जरूर आहे. प्राकृत पिंगलामध्यें संस्कृत 'आदि' याचें 'आइ' असें रूप अनेक वेळां येतें. त्याला च 'ल' हा प्रत्यय लागून वरील अवतरणांतील 'आइल', 'ऐल' हीं रूपें सिद्ध झालेलीं असावीत, असें दिसतें, तसें च प्रा.— थि बि सल्ल पहिल्लिअ तुरह वहिल्लिअ।

सं.— द्वौ द्वौ शल्यौ प्रथमं तुरगं स्थापयित्वा।

या प्राकृत पिंगलांतील एका लक्षणांत 'प्रथम' याचे ऐवजीं प्राकृतामध्यें जो 'पहिल्लिअ' हा शब्द आलेला आहे, त्यावरून च 'पइल' 'पैल' हे शब्द मराठींत आलेले असले पाहिजेत हें उघड आहे. यां व्युत्पत्ती प्रमाणें 'आइल' आणि 'पइल' हे दोन्ही शब्द एका च अर्थाचे होतात, व तशा एका च अर्थानें ते 'आइलें नमन पइलें नमन गणेस देवा' या चरणामध्यें उपयोजिलेले दिसतात. परंतु शब्द दोन निरनिराळे, तर त्यांचा अर्थ एक च कसा असूं शकेल, आणि 'आइल' याचा जर 'आधींचा' असा अर्थ उघड आहे, तर 'पइल' याचा अर्थ अर्थात च 'मगचा', 'नंतरचा', 'दुसरा' असा असला पाहिजे. या किंवा दुसऱ्या अशा च कांहीं तरी समजुतीनें 'पइल तीर', 'पइली कड' इत्यादि ठिकाणीं 'पइल' म्हणजे दुसरा, पुढला, दूरचा, पलीकडचा, असे अर्थ निष्पन्न होऊं लागले असावेत.

## (४) अवदसा

हा शब्द बायकांच्या तोंडीं पुष्कळ वेळां येतो. व अवदशा, अपदशा, इत्यादि शब्दांपासून याची उत्पत्ति झालेली असल्याचें कित्येक ठिकाणीं सांगितलेलें आहे. परंतु भास कवीच्या बालचरित नाटकांत एका प्रसंगीं असें वर्णन आलेलें आहे कीं, कंस राजाला एकदां अलक्ष्मी, खलती, कालरात्रि, महानिद्रा, पिंगलाक्षी इत्यादि चंडाल-युवती दिसूं लागून नाहींशा होतात. तेव्हां त्यांना उद्देशून कंस म्हणतोः—

आ अवध्वंसाः। कथं सहैव नष्टाः।

या ठिकाणीं अवध्वंसाः हा जो शब्द आलेला आहे तो आणि मराठींतील अवदसा शब्द यांच्या रूपांमध्यें तर साम्य आहे च; परंतु त्याच्या पेक्षां हि त्यांच्या अर्थांमध्यें अतिशय साम्य आहे. इतकें साम्य अवदशा आणि अवदसा यांच्या अर्थामध्यें नाहीं. म्हणून अवदसा हा शब्द वरील अवध्वंसा या शब्दापासून झालेला असावा, असें अनुमान काढण्याला वरील प्रत्यक्ष प्रयोग हें एक जास्त कारण आहे.

## (५) आटपाट

बायकांच्या कहाण्यांच्या प्रारंभीं बहुतकरून 'एक आटपाट नगर होतें,' असें वाक्य येतें. यांतील 'आटपाट' याचा अर्थ काय ? मृच्छकटिक नाटकाच्या चवथ्या अंकांत विदूषक वसंतसेनेच्या वाड्यांतील आठव्या चौकापर्यंत गेल्यानंतर असें एक वाक्य म्हणतोः 'एवं वसन्तसेनाया बहुवृत्तान्त-मष्टप्रकोष्ठं भवनं प्रेक्ष्य यत्सत्यं

जानाम्येकस्थमिव त्रिविष्टपं दृष्टम्. ' यांतील ' अष्टप्रकोष्ठम् ' याचें प्राकृत रूप ' अट्टपओट्ठं ' असें झालेलें आहे. आणि याच्यावरून पुढें थोडें जास्त अपभ्रंश होऊन मराठींतील ' आटपाट ' हा शब्द झालेला असावा. ' आटपाट ' नगर म्हणजे ज्याला आठ चौक आहेत किंवा ज्याला आठ तट आहेत, असलें कांहीं तरी एखादें मोठें नगर असा अर्थ होय.

## ( ६ ) आळवणें

प्रा. — मं अणालवीअ पच-लिदासि ।

सं.— मामनालप्य प्रचलितासि ।

संस्कृत ' आलप् ' या सोपसर्ग धातूचें प्राकृतांत ' आळव् ' असें रूप होऊन त्यापासून मराठींत ' आळवणें ' हा धातु आलेला आहे. तेव्हां ' आळवणें ' याचा मूळचा अर्थ ' बोलणें ' एवढा च होय. परंतु पुढें लक्षणेनें अर्थ बदलतात. ' देवाला भक्तीनें आळविणें, ' ' विक्रमराजा दीपराग आळवित होता ' इत्यादि प्रयोगांत लक्षणेनें थोडे अर्थ बदलले आहेत. ' आ ' च्या ऐवजीं ' लप् ' धातूला ' वि ' हा उपसर्ग लागला असतां प्राकृतांत ' विळव ' असें रूप होऊन वर्णव्यत्यासानें मराठींत ' विवळणें ' असा धातु विलाप करणें या अर्थी च आलेला आहे. कदाचित् ' विव्हल ' पासून हि ' विवळणें ' हा शब्द निघालेला असणें अशक्य नाहीं.

## ( ७ ) उजू

प्रा.—ता उज्जुअं जेव्व किं ण भणीअदि देवीए । सं.— तदृज्वेव किं न भण्यते देव्या ।

यावरून संस्कृत ' ऋजु ' पासून मराठी ' उजू ' हा शब्द झालेला आहे हें उघड होतें. म्हणून उजू बोलणें म्हणजे सरळ बोलणें असा अर्थ होतो. आणि कोणत्या हि कामाला डाव्या हातापेक्षां उजवा हात ज्यास्त सरळ आणि सोई-स्कर पडतो, म्हणून त्याला उजवा हात असें म्हणतात. लहान मुलामु-लींच्या खेळांत चकणें आणि उज-वणें असे शब्द येतात. तेथें हि चाकी-च्यांचे हात उलटे सुलटे पडून चकत असतांना ज्याचे हात पाहिजे तसे सरळ पडतात ते उजवले, म्हणजे ऋजु झाले, असा अर्थ होय.

## ( ८ ) ओलीस ठेवणें

विद्धशालभंजिके मध्यें ' ओल्लागन ' असा एक शब्द आलेला आहे. व 'करादिदानपर्यंतं तद्बंधकत्वेन स्थापितः मनुष्यः' असा त्याचा अर्थ टीका-कारानें दिलेला आहे. व या च अर्थी हा शब्द मराठींत हि उपयोगांत आहे.

## ( ९ ) कचाटींत सांपडणें

याच्याबद्दल कोणी कोणी केव्हां केव्हां ' किचाटींत सांपडणें ' असें हि म्हणतात. आणि व्युत्पत्तीच्या दृष्टीनें ' किचाटी ' हा शब्द मूळाला जास्त जवळ आहे. संस्कृत ' कृच्छ्र ' याचें प्राकृतांत ' किच्छ ' असें रूप होतें. त्यावरून मराठींत ' किचाटी ' ' कचाटी ' हे शब्द आलेले असावेत. संस्कृतांत ' कृच्छ्र ' याचा ' संकट ',

' अडचण ' असा जो अर्थ आहे तो च मराठींतील त्याच्यापासून निघालेल्या वरील शब्दामध्यें कायम आहे.

## ( १० ) कडाका, तिखें

' थंडीचा कडाका पडला आहे, ' वगैरे ठिकाणीं आपण या शब्दाचा उपयोग करतो. प्राकृत पिंगलांत भुजंगप्रयाताचें उदाहरण म्हणून पुढील श्लोक दिला आहे :—

मह्ममत्तमाअंग पाए ठवीआ तहा
तिक्खबाणा कडक्खे धरीआ ।
भुआफास भोहा धनूहा समाणा
अहो णाअरी कामराअस्स सेणा ॥

महामत्तमातंगः पादे स्थापित
स्तथा तीक्ष्णबाणा कटाक्षे धृता:।
भुजापाशानि भ्रुवो धनुषा समाना
अहो नागरी कामराज्यस्य सेना ॥

यांत संस्कृत कटाक्ष या शब्दाबद्दल प्राकृतांत जें ' कडक्खो ' हें रूप आलेलें आहे, त्यावरून मराठींतलि कडाका हा शब्द निघालेला आहे असें दिसतें; मात्र संस्कृत ' कटाक्ष ' आणि मराठी ' कडाका ' यांच्या अर्थांमध्यें जो फरक पडलेला आहे, तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. कटाक्षांत अल्पत्वाचा अर्थ आहे आणि कडाक्यांत अधिकत्वाचा अर्थ आहे.

पोलाद या अर्थी मराठींत तिखें या शब्दाचा उपयोग करितात. वरील प्राकृत श्लोकावरून असें दिसतें कीं, संस्कृत 'तीक्ष्ण' याचें प्राकृतांत 'तिक्ख' असें रूपांतर होतें. आणि पोलाद म्हणजे तरी तीक्ष्ण केलेलें च लोखंड, आणि म्हणून ' तिखें ' होय. तिखें हें जें एक आडनांव आहे, तें हि यापासून च होय. ' मृदु ' पासून जसें 'मवाळ' हें आडनांव निघालें आहे, तसें च ' काळे, गोरे ' या परस्पर विरोधी आडनांवांप्रमाणें ' तीक्ष्ण ' पासून ' तिखे ' हें आडनांव निघालें आहे. तिखट हा शब्द संस्कृत ' तिक ' पासून जरी निघालेला आहे असें मानिलें, तरी ' तीक्ष्ण ' यापासून हि त्याची उत्पत्ति होणें अशक्य आहे असें नाहीं.

## (११) कसोटी

कषपट्टिका = कसवट्टिअं = कसवटी, कसोटी.

प्रा.— ण सुवण्णं कसवट्टिअं विणा सिलापट्टए कसीअदि ।

सं.— न सुवर्णं कषपट्टिकां विना शिलापट्टके कष्यते ।

## ( १२ ) कानशील

यांतील 'शील' या पदाचा कांहीं च अर्थ होत नाहीं. कोणी कोणी कानसूल असें म्हणतात. तुकारामाच्या एका अभंगांत हि ' कानसूल ' हें च रूप आलेलें आहे. तें येणें प्रमाणें :

याचे कानसुलीं मारितसें हाका ।
मज घालूं नका आतां मधीं ॥

या रूपाची कांहीं व्युत्पत्ति लागणें शक्य दिसतें. ' कर्णशष्कुली ' हा समास संस्कृतांत पुष्कळ प्रचारांत आहे. त्यांतील ' शष्कुली ' या भागापासून प्राकृतांतील फेरफारांच्या योगानें

मराठींत ' सूल ' या रूपाची निष्पत्ति होणें अगदीं शक्य आहे.

### ( १३ ) किटाळ

सं. नीलप्रहस्ताभ्यां सेनापतिभ्यां कृष्टयोरन्तरदण्डयोः ।

प्रा. नीलपहत्थेहिं सेणावइहिं किट्टएसु अंतरदण्डेसु ।

प्रा. पिं. पान ४८५

येथें ' कृष्ट ' याचें ' किट्ट ' असें रूप झालेलें आहे. एखादी वस्तु दुसऱ्या वस्तूवरून नेहमीं ओढली गेल्यामुळें घर्षणाच्या योगानें तेथें ' कीट ' बाजतें असें आपण म्हणतों, यांतील ' कीट ' हें ' कृष्ट ' पासून च होय. आणि बाजणें हें संस्कृतांतील 'बंध' या धातुपासून आलेलें असावें. ' फळ बाजलें आहे ' असें मराठींत म्हणतात व ' फलं बध्नाति ' अशा सारखे प्रयोग संस्कृतामध्यें पुष्कळ वेळां येतात. ' तेलकट ', ' मेणकट ', ' मेणचट ' इत्यादि ठिकाणचा शेवटचा ' कट ' हा शब्द हि ' किट ' यापासून च असावा किंवा कदाचित तो प्रत्यय हि असूं शकेल. 'किट' पासून च 'किटाळ' हा शब्द झालेला आहे. ' किट ', ' किटाळ ' हे शब्द जरी संस्कृतकोशामध्यें सांपडतात, तरी वास्तविक ते संस्कृत शब्द नसून तीं त्यांचीं केवळ प्राकृत रूपें असून फिरून ते नवीन संस्कृत शब्द म्हणून संस्कृतकोशांतून आलेले आहेत व अशीं दुसरीं हि कित्येक उदाहरणें आढळतात.

### ( १४ ) कोड

' कोड पुरविणें ' वगैरे ठिकाणीं जो कोड शब्द येतो, तो संस्कृतांतील ' कुतूहल ' या शब्दाबद्दल प्राकृतांत ' कोड ' असा जो आदेश येतो तो होय.

प्रा.-देइव्व दोलदोलणरेहाओ णगणकोडेण ।

सं.-ददातीव दोलांदोलनरेखा गगनकौतुकेन ।

रोग विशेषवाचक ' कोड ' हा शब्द ' कुष्ट ' पासून होय.

### ( १५ ) खितपणीस पडणें

संस्कृत ' क्षिप्त ' याचें प्राकृतांत ' खित्त ' असें रूप होतें; व त्या ' खित्त ' याला मराठी भाववाचक नामाचा ' पण ' हा प्रत्यय लागून पुढें खितपणीस पडणें अशासारखे शब्दप्रयोग उपयोगांत आलेले आहेत.

### ( १६ ) खिंड

डोंगराच्या दोन उंच टोकांच्यामधून जाण्यायेण्याकरितां जी सरळ वाट पडलेली असते तिला हल्लीं खिंड असें म्हणतात. परंतु या शब्दाचें मूळ आणि शुद्ध रूप ' खिंड ' हें नसून ' खंडी ' असें आहे असें ' सज्जयत भग्नं प्राकारखंडीमार्गम् ' या वाक्यावरून दिसतें.

### ( १७ खुमखुम

संस्कृतांतील ' सूक्ष्म ' याचें प्राकृतांत ' सुखुम ' असें रूप होतें. त्यांतील पहिल्या 'सु' चा लोप होऊन बाकी राहिलेल्या 'खुम' ह्या पदाच्या द्विरुक्तीनें 'खुमखुम' हा शब्द उत्पन्न

झाला असावा असें दिसतें. ' त्याची खुमखुम मोडली पाहिजे, ' याचा मूळचा अर्थ ' त्याच्या मनांतील सूक्ष्म सूक्ष्म असे जे कांहीं मनोविकार असतील ते नाहींसे केले पाहिजेत, ' असा असावा. आणि त्यावरून पुढें लक्षणेनें दुसरे अर्थ उत्पन्न झाले असावेत.

## ( १८ ) खुळा व घालणें

प्राकृत:—चेज सहज तुहुँ चंञ्चला सुन्दरिह्रदहिँ वलन्त । पअउ ण घल्लसि खुल्लुणा कीलसि उण उह्लसंत ॥

संस्कृत:—चेतः सहजेन त्वं चंचलं सुंदरीन्हृदे वलत् । पदमपि न ददासि अधम क्रीडसि पुनरुल्लसत् ॥

प्राकृत पिंगलसूत्र

यांतून मराठींतील दोन शब्दांच्या व्युत्पत्ती सिद्ध होतात. 'ददासि' बद्दल 'घल्लसि' असें रूप वरील प्राकृतांत आलेलें आहे. व त्यावरून च मराठींत 'घालणें' हा शब्द निघालेला आहे. आतां वरच्या कवितेंतील दुसरा शब्द जो 'खुल्लुणा' त्याच्याबद्दल रविकर-नामक टीकाकाराची अशी एक टीप आहे कीं,

खुल्लणा इति देशी अज्ञे वर्तते ।

आणि मराठींत अज्ञ, वेडा, या अर्थी च खुळा हा शब्द वापरला जातो. व यावरून च पुढें 'खुळगा' वगैरे शब्द निघालेले आहेत.

## ( १९ ) खुर्द आणि बुद्रुक

एका च नांवाचीं दोन खेडेगांवें जवळ जवळ असलीं, म्हणजे त्यांपैकीं लहान असेल त्याला 'खुर्द', व मोठें असेल त्याला 'बुद्रुक' असें म्हणतात. हे दोन्ही शब्द कोशामध्यें पर्शिअन भाषेमधून आलेले असल्याचें सांगितलें आहे. परंतु वास्तविक तसें नसून 'खुर्द', हा संस्कृत 'क्षुद्र' पासून व 'बुद्रुक' हा संस्कृत 'वृद्ध' पासून झालेला आहे. 'क्षुद्र' याचें प्राकृतांत बहुधा खुद्द असें रूप होतें परंतु 'खुर्द' या शब्दांत 'क्षुद्र, या शब्दांतील मूळचा 'र्' रेफाच्या स्वरूपानें दृग्गोचर होत आहे. किरकोळ पैशांना 'खुर्दा' असें म्हणतात याचें कारण हि रुपयाच्या मानानें तो 'क्षुद्र' असतो हें च होय. 'खुर्दा' म्हणजे जसे रुपयाचे लहान लहान तुकडे तसें फार ठेंचलेल्याच्या योगानें वगैरे जेव्हां अंगाचे जणूं काय लहान तुकडे च झालेले आहेत इतकी इजा होते तेव्हां 'अंगाचा अगदीं खुर्दा झाला आहे, असें आपण म्हणतों.

## ( २० ) गोत्यांत पडणें

' गोत्यांत पडणें ' म्हणजे घोटाळ्यांत पडणें, अडचणींत पडणें असे अर्थ आहेत. ' गोता खाणें ' या शब्दप्रयोगाचा हि अडचणींत येणें असा च अर्थ होतो. या सर्व ठिकाणचा जो ' गोता ' हा शब्द तो संस्कृतांतील ' गोत्र ' या शब्दापासून निघालेला आहे.

प्रा० हं हो गरुत्मद् गोत्तालंकरण ।

सं० हं हो गरुत्मद् गोत्रालंकरण ।

गोत्र याचें प्राकृतांत ' गोत्त ' असें रूप होतें. ' नात्यागोत्याचा ' यांत गोत्याचा म्हणजे गोत्राचा हा अर्थ स्पष्ट च दिसून येत आहे. तेव्हां ' गोत्यांत

पडणें ' म्हणजे गोत्रांत पडणें. आणि सगोत्रत्वामुळें अशौचाचा वगैरे संबंध प्राप्त झाला असतां जो कोणी त्या गोत्रांत पडतो, तो अशौचाच्या वगैरे संबंधानें त्या गोत्यांत पडतो, म्हणजे संकटांत, अडचणींत, घोटाळ्यांत पडतो असा अर्थ उत्पन्न झाला असावा. ' गोता ' याचें च पुढील रूपांतर ' गुंता ' असें झालें असावें. ' गुंता आला आहे ' हा शब्दप्रयोग अशौचाच्या च संबंधानें विशेषतः करण्यांत येतो. ' गुंतावळ झाली ' असें हि जें आपण म्हणतों, तें ' गोत्रावळी ' पासून होय. ' त्याचा गोतावळा फार आहे ', असल्या वाक्यांतून हि ' गोत्रावळी ' म्हणजे ' गोत्रांतील मंडळीचा पसारा ' फार आहे असा च अर्थ अभिप्रेत असतो. ' गुंता ' हा शब्द जर ' गोत्र ' पासून आहे, तर 'गुंतागुंत', ' धागा गुंतवणें ', ' कामांत गुतणें ' इत्यादि त्याचीं पुढील रूपांतरें हि ' गोत्र ' पासून च होत हें उघड आहे.

## ( २१ ) चक्क

संस्कृत ' चक्र ' याचें प्राकृतांत ' चक्क ' असें जें रूप होतें, तो च मराठींतील 'चक्क' हा शब्द होय. 'डोळ्यांपुढें चक्क झालें ' याचा मूळचा अर्थः ' डोळ्यापुढें एक तेजाचा बिंदु उत्पन्न होऊन त्याचे किरण वीचितरंग न्यायानें सर्व बाजूंनीं वाटोळे पसरून त्यांचें एक चक्र च डोळ्यांपुढें निर्माण झालें.' तसें च ' चक्क उजेड ' याचा हि मूळचा अर्थ ' चक्रवत् चोहोंकडे पसरलेला उजेड असा च होय.

## ( २२ ) चमकणें

संस्कृत ' चमत्कृत ' याचें प्राकृत रूप ' चमक्कन्त ' असें होतें. त्यावरून मराठींत ' चमकणें ' हा शब्द आलेला आहे. ' तो मनांत चमकला ' म्हणजे त्याला आश्चर्य वाटलें, अशा अर्थी या शब्दाचा मराठींत हि उपयोग होतो. काजवा ' चमकला ' म्हणजे प्रकाशला, हा अर्थ त्याच्या पुढील लाक्षणिक असावा. ' चमकावणें ' म्हणजे उद्दीपित करणें. चमकणें, चमकावणें, डोळे मिचकावणें इत्यादिकांमध्यें जो तेजाचा अर्थ आहे, तो च 'चमक' यांत हि आहे. ' कमरेंत चमक भरली ' या ठिकाणीं हि 'चमक' म्हणजे ' तेज ', ' विजेची लाट ' असा च अर्थ आहे. कारण ही च तेजाची अगर उष्णतेची कल्पना ' कंबरेंत उसण भरली ' या समानार्थक वाक्यांत हि दिसून येते. कारण उसण म्हणजे उष्ण च होय.

## ( २३ ) चोख

चोख माल, चोख वर्तन, इत्यादि ठिकाणीं जो चोख हा शब्द येतो, त्या चोख शब्दाची ही व्युत्पत्ति आहे. चोखणें ( चुष् ) यापासून निघालेला चोख शब्द निराळा. भासकवीच्या नवीन उपलब्ध झालेल्या बालचरितनामक नाटकामध्यें पुढीलप्रमाणें एक प्राकृत वाक्य आहे.

नंदगोपः–तेण हि अह्माणं घाषष्य उइदं पङ्कुणा चोक्खं कलेमि ।

याचें संस्कृत भाषांतर पुढें दिल्याप्रमाणें आहे.

तेन ह्यस्माकं घोषस्योचितं पांसुना शौचं करोमि ।

या ठिकाणीं शौच या भाववाचक नामाचें चोक्ख हें रूपांतर आहे हें खरें. परंतु त्यांतील शुचि या विशेषणावरून हि प्राकृतांतून कांहीं मधल्या परंपरांनीं चोख हें रूप व्युत्पन्न होणें शक्य आहे, हें वरील भासकवीच्या प्राकृत वाक्यावरून स्पष्ट दिसत आहे. चोखटें, चखोट, हे शब्द हि शुचीचे च वंशज होत.

## ( २४ ) छडा काढणें

एखाद्या वस्तूचा तपास लावणें या अर्थीं वरील शब्द उपयोगांत येतात. त्यांपैकीं ' छडा ' हा संस्कृत ' छटा ' = प्राकृत ' छडा ' पासून उत्पन्न झालेला असावा. एखाद्या किरणाची छटा कोठें पडलेली असली, तर तेथपासून त्या किरणाला अनुसरून मागें जात चालल्यास त्या किरणाच्या उगमस्थानाचा आपल्याला शोध लागतो; ह्या अर्थाच्या अनुरोधानें 'छडा लावणें, छडा काढणें,' हे शब्दप्रयोग प्रचारांत आलेले असावेत असें दिसतें.

## ( २५ ) छेल

प्रा.–अण्णाणं वि परं पअट्टदु वरा वाणी छइल्लप्पिआ ।

सं.–अन्येषामपि परं प्रवर्ततां वरा वाणी विदग्धप्रिया ।

येथें 'विदग्ध' या संस्कृत शब्दाबद्दल प्राकृतामध्यें 'छइल्ल' असा आदेश आलेला आहे. मराठींत 'छेलबटाउ आणि मोहनाराणी' या एका गोष्टीच्या नांवामध्यें जो 'छेल' हा शब्द येतो तो विदग्ध या अर्थी ' छेल्ल ' यापासून च झालेला आहे. शेला=चांगलें वस्त्र, शेलका=चांगला, इत्यादि मराठींतील इतर शब्द हि यापासून च झालेले असावेत. शिलाहार नामक राजांच्या पासून ' शेलार ' हें नांव आलेलें आहे. त्यांच्या वेळच्या स्त्रियांनीं नेसावयाचें जें वस्त्र, त्याला ' शेलारी ' असें नांव पडलें असावें. तो 'शेलारी' शब्द हि मराठीमध्यें प्रचारांत आहे. त्यावरून हि 'शेला' हा शब्द उत्पन्न झालेला असणें संभवनीय आहे. संस्कृतमध्यें 'छेक' हा शब्द छेकानुप्रास, छेकापन्हुति, इत्यादि ठिकाणीं व इतरत्र हि आढळतो. त्याचा हि अर्थ विदग्ध असा च आहे. त्यापासून कदाचित् प्राकृतांतील वरील 'छइल्ल' हा शब्द निघालेला असेल.

## ( २६ ) छोटी ( लहान ), चाहणें

प्राकृतः–अरेरे वाहहि कान्ह णाव छोटि डगमग कुगति ण देहि । तइ इथिं णदिहिं संतार देइ जो चाहसि सो लेहि॥

संस्कृतः–अरेरे वाहय कृष्ण नावं सूक्ष्मां डगमग कुगतिं न देहि । त्वमस्यां नद्यां संतारं दत्त्वा यदपेक्षसे तद् गृहाण॥

प्राकृतांतील ' छोटि ' या शब्दाचें ' सूक्ष्म ' असें जरी वर भाषांतर दिलेलें आहे, तरी रविकर हा टीकाकार 'छोटि' याला 'क्षुद्रां' असा प्रतिशब्द

देतो, आणि ' क्षुद्र ' यापासून प्राकृतांतील फेरफारांच्या नियमांनीं छोटा, छोटी हे शब्द उत्पन्न होणें शक्य आहे. आणि क्षुद्र या अर्थीं च मराठीमध्यें त्यांचा उपयोग होतो. आवडणें, वाटणें, अशा अनेक अर्थीं जो चाहणें हा शब्द, मराठींत आलेला आहे, तो हि संस्कृतांतील अपेक्षा, आकांक्षा, या शब्दांच्या ऐवजींचा प्राकृतांतील एक प्रतिशब्द आहे, असें दिसतें.

## ( २७ ) २ च, चि

' तो च मनुष्य, ' ' तो चि साधू ओळखावा, ' इत्यादि ठिकाणीं हे वर दिलेले शब्द येतात. यांच्याबद्दलचा संस्कृत शब्द मूळचा ' एव ' ( स एव मनुष्यः ) हा होय. त्या ' एव ' बद्दल प्राकृतांत ' च्चिअ ' असें रूप येतें, व पुढें त्यांतील ' अ ' गळून जाऊन ' चि ' एवढें च रूप राहतें, व त्याचें च ' च ' हें रूप होतें.

प्रा.– अत्थणिएसा ते च्चिअ सद्दा ते च्चेअ ।

सं.– अर्थनिवेशास्त एव शब्दास्त एव ।

## ( २८ ) जानोवसा

प्रा. – भोदिओ संबंधिअस्स जण्णवासभोज्जे किमुत्तरं ।

सं.– भवत्यः संबंधिनो जन्यवासभोज्ये किमुत्तरम् ।

कर्पूरमंजरीचा कर्ता राजशेखर हा कवि खिस्ती शक ८८४ च्या नंतर व ९५९ च्या आधीं केव्हां तरी होऊन गेलेला असावा, असें ठरविण्यात आलेलें आहे; म्हणजे हल्लीं त्याला जवळ जवळ एक हजार वर्षें होत आलेलीं आहेत. त्याच्या

प्रा.– जादं कुंकुमपंकलीढमरठीगंडप्पहं चंपअं ।

सं.– जातं कुंकुमपंकलीढमरठीगंडप्रभं चंपकम् । क. मं. पान १४

या एका श्लोकाच्या चरणांत 'महाराष्ट्री स्त्री ' या अर्थीं ' मरठी ' असें रूप आलेलें आहे. ( प्राकृत पिंगलांत पान ७० त ' मरहट्टा ' असें रूप ' महाराष्ट्राः ' याच्याबद्दल आलेलें आहे. ) महाराष्ट्रांतील आपल्या लोकांच्या राष्ट्रीयत्वाचें, भाषेचें वगैरे द्योतक असें जें प्रचलित ' मरठी ( मराठी ) ' हें रूप तें हजार वर्षांपासून अस्तित्वांत आहे, असें यावरून दिसतें. तसें च, ' हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे ' ही जी म्हण आणि तिची कल्पना आपल्यामध्यें हल्लीं आहे, ती हजार वर्षांची जुनी आहे, असें कर्पूरमंजरींतील पुढील वाक्यावरून स्पष्ट होतें

हत्थकंकणं किं दप्पणेण पेक्खीअदि । ( पान १७ ).

## ( २९ ) डवी

यावज्जीवं पि चे बालो पंडितं पयिरुपासति ।

नसो धम्मं विजानाति दब्बी सूपरसं यथा ॥ धम्मपद, बालवग्ग ५.

येथें संस्कृत ' दर्वी ' याचें प्राकृतांत ' दब्बी ' असें रूप झालेलें आहे. पाट

डब्य झालें. त्यावरून च मराठींतील 'डबी' हा शब्द झालेला असावा.

## (३०) तलफ

हा शब्द लहर, खुषी, मर्जी इत्यादि अर्थी उपयोगांत येतो. याची व्युत्पत्ति सहसा लक्षांत येण्यासारखी नाहीं. संस्कृतांतील 'स्फुरति' या क्रियापदाबद्दल प्राकृतांत 'तलप्फइ' असें रूपांतर येतें. आणि त्यावरून तलफ म्हणजे स्फूर्ति हा शब्द मराठींत आलेला आहे.

प्राकृत–जह्वा दुद्धवर मुद्धफेण फंफाइ तलप्फइ ।

संस्कृत–यथा दुग्धवरे मुग्धफेनः फफाइ स्फुरति ।

प्राकृत पिंगलसूत्र.

## (३१) तवसें

कोंकणांत कांकडीला 'तवसें' असें म्हणतात. हा शब्द संस्कृत 'त्रपुस' याचें प्राकृतांत 'तिउस' असें रूप होऊन त्यापासून मराठींत आलेला आहे.

प्रा.–जे णवस्स तिउसस्स कंटआ ।

सं.–ये नवस्य त्रपुसस्य कंटकाः ।

## (३२) थकणें

प्रा. जो पुण परक्षआर विरुज्झइ तासु जणणि किं ण थकइ वञ्झइ ।

सं.–यः पुनः परोपकारं विरुध्यते तस्य जननी किं न तिष्ठति वंध्या ।

प्रा. पिं. पृष्ठ १६०

येथें संस्कृत 'तिष्ठति' बद्दल प्राकृतांत 'थकइ' असा जो आदेश आलेला आहे, त्यावरून मराठींतील 'थकणें' हा धातू उपयोगांत आलेला आहे. 'उभा थाकणें, उभा ठाकणें' वगैरे प्रयोग जुन्या मराठी कवितेंत 'तिष्ठ' उभा रहाणें' या अर्थी पुष्कळ वेळां येतात. कधीं कधीं जो दमलेला असतो, तो उभा रहातो, थांबतो; म्हणून थकणें, ठकणें याचा दमणें असा हि अर्थ होऊं लागला. ठकणें याचें च प्रयोजक रूप ठकविणें हें आहे. या ठकाविणें शब्दाचा फसविणें असा जो अर्थ होता, तो हि वरील व्युत्पत्तीला धरून च आहे. कांहीं एका उद्दिष्ट हेतूकडे दोघे जण चालले असतां त्यांतील एकजण जेव्हां दुसऱ्याला आपल्या युक्त्यांनीं आणि लुच्चेगिऱ्यांनीं थकवितो, दमवितो, किंवा थांबावयाला भाग पाडतो तेव्हां तो त्याला ठकवितो म्हणजे फसवितो, असें आपण म्हणतों.

## (३३) थावटणें

'त्यानें आपला संसार चांगला थावटला' अशा ठिकाणीं 'थावटणें' हा शब्द उपयोगांत येतो. संस्कृत 'स्थाप' याचें प्राकृतांत 'थाव' असें रूप होऊन त्यापासून 'थावटणें' हा शब्द मराठींत आलेला आहे.

एदं पवहणं अज्ज चालुदत्तश्श लुक्खवाडिआए पक्खदुआलए थावेमि ।

## (३४) थोंबाळणें

'थोमेंति=पसंसांति' असें रुप प्राकृतांत येतें. हें संस्कृतांतील 'स्तु' या धातूपासून निघालेलें आहे हें उघड आहे. या प्राकृतांतील 'थोमेंति' पासून मराठींतील 'थोंबाळणें' हा शब्द निघा-

लेला असावा. ' चोंबाळणें ' असा हि आणखी एक शब्द मराठींत आहे तो याच्या पुढील अपभ्रंश होय.

## ( ३५ ) दाढी भाजणें

शेतांत भात पेरण्याच्या पूर्वीं तेथील जागा भाजतात, त्याला दाढी भाजणें असें म्हणतात. संस्कृत दग्ध याचें प्राकृतांत 'दड्ढ' असें रुप होतें. त्यापासून दाढी भाजणें हा प्रयोग मराठींत प्रचारांत आलेला आसावा.

## ( ३६ ) दाणादाण

संस्कृत 'ध्वनि' याचें प्राकृतांत 'धणि' असे रूप होतें. त्यापासून वरील शब्द निघालेला असावा. त्याचें धाबें दणाणलें, किंवा दणकलें या ठिकाणीं 'दणाणणें' किंवा 'दणकणें' यामध्यें ध्वनि हा च मूळ शब्द असला पाहिजे असें 'त्याचें धाबें गडगडलें' असा जो दुसरा समानार्थक प्रयोग आढळतो त्यावरून दिसून येतें.

## ( ३७ ) दीड

संस्कृत ' द्व्यर्ध ' याचें प्राकृतांत ' दियड्ढ ' असें जें रूप होतें त्यापासून मराठींतिल ' दीड ' हा शब्द झालेला असावा. याच्याप्रमाणें च ' अडीच ' हा शब्द हि संस्कृत ' अर्ध तृतीय ' याचें प्राकृतांत ' अड्ढतीय ' असें जें रूप होतें त्यापासून आलेला असला पाहिजे व त्यावरून पुढें अडीचावा हिस्सा ज्या दुकानीं नफ्यादाखल घेतला जातो तें अडतीचें दुकान वगैरे शब्द आलेले असावेत. गड्यांना वेगर जो शिधा देतात त्याला ' अडीसरीं ' असे म्हणतात. त्याचा अर्थ अडीच शेराचा शिधा असा होय. ' डेचके ' हा शब्द एका प्रकारच्या भांड्याला लावतात. त्याचा अर्थ अडीच शेर जिन्नस ज्यांत राहूं शकेल असें भांडें.

## ( ३८ ) निन्नु

' निन्नधाळ, ' ' नन्नुबाळ ' वगैरे शब्द मराठींत ' लहान मूल ' या अर्थी उपयोगांत येतात. संस्कृतांतील ' निम्न ' याचें प्राकृतांत ' निन्न ' असें रूप होतें. आणि त्यापासून मराठींतील हीं सर्व वर दिलेलीं रूपें प्रचारांत आलेलीं आहेत.

## ( ३९ ) निपट

' निपटनिरंजन ', ' निपटनिलाजरा ', ' निपटणें ' इत्यादि ठिकाणीं जो ' निपट ' हा शब्द येतो, तो संस्कृतांतील ' निष्पष्ट ( नितरां स्पष्ट ) ' या शब्दावरून मराठीमध्यें आलेला आहे. निपटणें म्हणजे चांगलें स्पष्ट करणें, स्वच्छ करणें.

प्रा.–फणिलदाणिप्पट्टणट्टावआ ।

सं.–फणिलतानिष्पष्टनर्तकाः ।

## ( ४० ) नेसणें

प्रा.–राअसुअपिच्छणीलं पट्टंसुअजुअलअं णिअसिदा सा ।

सं.–राजशुकपिच्छनीलं पट्टांशुकयुगलकं निवासिता सा ।

ह्या चरणावरून असें दिसतें कीं,

निवस्' या धातूपासून मराठींताल नेसणें हा शब्द उत्पन्न झाला असला पाहिजे.

## (४१) पछाडणें

प्रा.–जंवा तंवा भोदु ण पच्छादइस्सं।

सं.–यद्वा तद्वा भवतु न प्रच्छाद्‌यिष्ये।

## (४२) पडदणी

प्राकृतः–जसु चंद सीस पिंधणह दिस।
सो संभु एस तुह सुब्भ देऊ॥
संस्कृतः–यस्य चंद्रः शीर्षे पिधानं दिशः।
स शंभुरेष तुभ्यं शुभं ददातु॥
प्रा. पिं. सू.

येथें पिधान या संस्कृत शब्दाबद्दल प्राकृतांत पिंधणह असें जें रूप आलें आहे, त्यावरून मराठींत पडदणी हा शब्द आला असावा असें दिसतें. कदाचित् मराठींतील इतर शब्दांतल्याप्रमाणें 'पडदणी' या शब्दांतील 'पड' हा भाग संस्कृतांतील 'प्रति' या उपसर्गापासून निघालेला असणें शक्य आहे. परंतु तसें मानलें, तरी बाकीचा जो 'दणी' हा भाग राहिला, त्याचें मूळ 'पिधान' यांत च असलें पाहिजे, हें उघड दिसतें.

## (४३) पण

मराठीमध्यें 'पण' हा शब्द 'परंतु' या अर्थी उपयोगांत येतो. हा शब्द संस्कृतांतील 'पुनः' ह्याच्यापासून प्राकृतांतील रूपांतरानें झालेला आहे. या दोन संस्कृत आणि मराठी शब्दांमध्यें रूपसादृश्य आहे हें उघड च आहे. परंतु त्यांच्या मध्यें अर्थसादृश्य हि आहे. संस्कृतांत 'पुनः' हा शब्द 'परंतु' या अर्थी हि उपयोगांत येतो. उदाहरणार्थ:– उत्तररामचरितांत

प्रसाद इव मूर्तस्ते स्पर्शः स्नेहार्द्रशीतलः।

अद्याप्यानंदयति मां त्वं पुनः क्वासि नंदिनि॥ ३-१४

असे दोन चरण आलेले आहेत. यांत 'पुनः' याचा अर्थ 'परंतु' असा स्पष्ट आहे. आणि या च पुनः या शब्दाचें प्राकृतांत जें 'पन' असें रूप होतें तें हि 'परंतु' या अर्थी उपयोगांत आलेलें आढळून येतें.

तसें च 'पण' याचा 'तूं पण ये' अशा ठिकाणीं जो 'देखील' असा मराठीमध्यें अर्थ होतो त्या अर्थी हि प्राकृतामध्यें 'पन' याचा उपयोग केलेला आढळून येतो.

## (४४) परिस

'लोह परिसासी रूसलें' इत्यादि अनेक ठिकाणीं परिस हा शब्द येतो. पिंगलसूत्रामध्यें पुढील चरणांत या च परिसाचा उल्लेख आलेला आहे.

सुरअरु सुरही परसमणि ण हि वीरेससमाण।

सं०–सुरतरुः सुरभिः स्पर्शमणिर्न हि वीरेशसमान।

यावरून दिसून येईल कीं, संस्कृतांतील स्पर्शमणि यांतील स्पर्श याच्यापासून परिस हा शब्द निघालेला आहे. संस्कृतांतील स्पर्शमणि आणि इंग्रजी-

तील Touch-stone यांच्यामध्यें फार शब्दावयवसाम्य आहे.

## ( ४५ ) पसा

दोन्ही हातांच्या मिळून झालेल्या ओंजळीला पसा असा जो शब्द लावण्यांत येतो, तो संस्कृत 'प्रसृति' ( प्रा. पसइ ) पासून निघालेला आहे.

प्रा.-नअणाइं पसइसरिसाइं झत्ति फुल्लाइं ।

नयने प्रसृतिसदृशे झटिति फुल्ले ।

## ( ४६ ) पहिली वहिली

' पहिली वहिली मुलगी ' इत्यादि ठिकाणीं ' वहिली ' या शब्दाचा उपयोग मराठींत करण्यांत येतो. आणि गुजराथींत ' वहिली ' म्हणजे आवडती याअर्थीं या शब्दाचा उपयोग केलेल पुष्कळ वेळां आढळतो. असा हा ' वहिली ' शब्द काय आहे, हें प्राकृत पिंगलांतील पुढील चरणावरून ठरवितां येण्यासारखें आहे.

प्रा.-हसइ परणिअलआ असइ धुअ
बहुलिआ ।

सं-हसति परनिकटेऽतोऽससी ध्रुवं
वधूटिका ।

संस्कृत ' वधूटिका ' याचें प्राकृतांत जें ' बहुलिआ ' हें रूप झालेलं आहे, त्यापासून च ' वहिली ' हा मराठींतील आणि गुजराथींतील शब्द उत्पन्न झालेला असला पाहिजे. मराठींतील ' बाहुली ' हा शब्द हि ' बहुलिआ ' यापासून च उत्पन्न झालेला असला पाहिजे.

## ( ४७ ) पहीपाहुणा

यांतील ' पाहुणा ' शब्द संस्कृतांतील ' प्राघुणिक ', ' प्राघूर्णिक ' यांपैकीं कोणत्या तरी शब्दापासून व्युत्पन्न झालेला आहे हें उघड आहे. परंतु त्याच्या पूर्वीचा जो ' पही ' हा शब्द त्याची व्युत्पत्ति चटकन् लक्षांत येण्यासारखी नाहीं. संस्कृतांतील ' पथिक ' याचें प्राकृतांत ' पहिअ ' असें रूप होतें आणि त्यांतील शेवटचा ' अ ' हा लुप्त होऊन त्याचा ' पही ' एवढा च भाग पाहुणा याच्या पाठीमागें लागून राहिलेला आहे.

## ( ४८ ) पाउस व चेव आणणें

सो मह कंता दूर दिगंता
पाउस आवे चेउ डुलावे ॥

स मम कांतो दूरे दिगंते
प्रावृडागता चेतश्चालयति ॥

यांत ' प्रावृट् ' याचें ' पाउस ' हें रूपांतर झालेलें स्पष्ट च आहे. तसें च ' चल् ' धातूबद्दल ' डुलणें ' हा आदेश झालेला हि येथें आढळून येत आहे. परंतु या श्लोकांमधील जास्त महत्त्वाचा प्राकृत शब्द म्हटला म्हणजे ' चेउ ' हा होय. ' चेउ ' म्हणजे संस्कृतांतील ' चेतस् ' होय, आणि ह्या ' चेउ ' पासून च मराठींतील ' चेव ' हा शब्द उत्पन्न झालेला आहे. एखाद्याला एखाद्या गोष्टीबद्दल चेव आणणें म्हणजे त्या गोष्टीच्या मुद्यावर

त्याचें सगळें चित्त आणून लावणें, असा मूळचा अर्थ होय. अतिशय त्रास होण्याइतकें चित्त जागृत आणि उत्तेजित होणें, या अर्थी मराठींत जो 'चिवचिवाट' हा शब्द आहे, तो हि 'चेउ' पासून च झालेला असला पाहिजे. 'चवताळणें' हा शब्द जरी या च वंशांत उत्पन्न झाल्यासारखा दिसतो तरी त्याचा जन्म अगदीं निराळ्या कुळांत झालेला आहे. गाण्यांतील तालांत एकताल, दादरा, त्रिताल हे जसे ताल आहेत, तसा च चैताल या नांवाचा एक ताल आहे. त्या तालांत म्हटलीं जाणारीं पद्यें बहुधां घाईनें आणि आवेशानें म्हटलीं जातात. तशी चैतालावर गाणाऱ्या माणसासारखी जेव्हां एखाद्याची आवेशयुक्त स्थिति होते, तेव्हां तो चवताळला आहे असें म्हणतात.

## ( ४९ ) पारध

प्रा.– पारद्धिरण्णं वम्मथवाहस्स ।

सं.– पापर्द्धिरण्यं मन्मथवाहस्य ।

सं. पापर्द्धि ( मृगया ) = प्रा. पारद्धि = म. पारध.

सं. अरण्य = प्रा. रण्ण = म. रान.

## ( ५० ) पेलणें

'जोडी पेलणें', 'इतकी मोठी तरवार या लहान मुलाला पेलत नाहीं' इत्यादि वाक्यांतून जो 'पेलणें' हा शब्द येतो, तो संस्कृतांतील 'प्रेरणें' या धातूपासून आलेला आहे, हें

प्राकृतः– मलअकुहरे णउवल्लि पोल्लिअ ।

संस्कृतः– मलयकुहरे नववल्ली प्रेरयित्वा ।

या प्राकृतपिंगलसूत्रांतील अवतरणावरून स्पष्ट होत आहे. 'बीं पेरणें' यांतील 'पेरणें' हें देखील 'प्रेरणें' म्हणजे फेंकणें यापासून च होय. 'जोडी पेलणें' याच्याऐवजीं 'जोडी फेंकणें' असें हि म्हणण्याचा रिवाज आहे. यावरून हि 'प्रेरणें' म्हणजे फेंकणें यापासून च 'पेलणें' हा शब्द निघाला आहे, हें उघड होतें. 'त्याला तरवार पेलत नाहीं' हें वाक्य मात्र आतां या व्युत्पत्तीच्या दृष्टीनें थोडेसें अशुद्ध होतें. 'त्याच्यानें तरवार पेलवत ( = प्रेरवत = फेंकवत ) नाहीं' असें तें पाहिजे. परंतु रूढीला सर्व चालतें.

[ तरवारीची फेक हा पदसमूह हि रूढ आहे.––संपादक ]

## पैरण

सदरा वगैरे अंगांत घालण्याच्या एका कपड्याला पैरण हा शब्द लावितात तो 'पेहेरणें' ( =कपडा घालणें ) या धातुपासून निघालेला आहे आणि 'पेहेरणें' हा शब्द कसा निघाला आहे, हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येतें.

प्राकृत :– गिम पिहिरअ फणिहारा।

संकृतः– ग्रीवायां परिधृतः फणिहारः ।

प्रा. पिं. सू.

## ( ५२ ) फंद

स्पंद याचें प्राकृतांत जें ' फंद ' असें रूप होतें तो च हा मराठींतील शब्द होय. स्पंद, स्पंदन = चलनवलन, हालचाल असे मुळचे अर्थ आहेत. यावरून पुढें ' मनाची विशेष वृत्ती ', ' नाद ' असे अर्थ उत्पन्न होऊन ' फंदांत पडणें ', ' फंद फितुर ' इत्यादि प्रयोग अस्तित्वांत आलेले आहेत.

## ( ५३ ) फन्ना

' फन्ना पाडणें ', ' फन्ना उडवणें ' इत्यादि ठिकाणीं ' फन्ना ' हा जो शब्द मराठींत येतो, तो संस्कृतांतील ' निष्पन्न ' याचे बद्दल प्राकृतांत जें ' निष्पन्न ' असें रूप येतें त्यांतील ' नि ' चा लोप होऊन झालेलें असावें. निष्पन्न = निप्फन्न = फन्न = निष्पन्न झालेलें, पुरें झालेलें, संपलेलें असे अर्थ येत येत ' फन्ना पाडणें ', म्हणजे संपवणें, खलास करणें, असा अर्थ शेवटीं या शब्दाला प्राप्त झाला असल्याचें दिसून येतें.

' यथा पन दास आदिहि निप्फनानि तानि तानि भंडानि दारुमयादीनि नाम होन्ति । '

## ( ५४ ) बट्टा

प्रा.– जदो एदाणं मिलिदं कुटुम्बं वट्टदि ।

सं.– यत एतासां मिलितं कुटुम्बकं वर्तते ।

येथें ' वर्तते ' या संस्कृत क्रियापदा-बद्दल प्राकृतांत ' वट्टदि ' असें रूप आलेलें आहे. त्यावरून हें उघड होत आहे कीं, मराठींतील बट्टा, बटवडा वगैरे शब्द संस्कृतांतील ' वृत् ' धातू-पासून निघालेले असले पाहिजेत. याल आणखी एक प्रत्यंतर असें आढळतें कीं, मराठींत ' बट्टा ' याला च ' वर्तावळा ' असा प्रतिशब्द आहे. ' बटावणें ' हा धातु हि ' वृत् ' पासून च होय. हुंडी बटावणें म्हणजे हुंडी वर्तविणें, हुंडी चालविणें, तिचे पैसे मिळविणें, असा अर्थ होय. अडचणीच्या जागेंतून ' गलबत बटावणें ' म्हणजे तेथून गलबत चालवून सुरक्षितपणें बाहेर आणणें, असा अर्थ होय. संस्कृतांतील वृत् धातूपासून च वार्ता हा जो शब्द झालेला आहे, त्याबद्दल प्राकृतांत ' वत्ता ' असें रूप होऊन त्यापासून च मराठींमध्यें ' बात ' ' बातमी ' हे शब्द उत्पन्न झालेले आहेत.

## ( ५५ ) बत्ता

मृच्छकटिकांतील चवथ्या अंकांत विदूषक वसंतसेनेच्या दासीला विनोदानें विचारतो ' भवति किं युष्माकं यानपात्राणि वहन्ति '; यांतील ' यानपा-त्राणि ' याच्याबद्दल प्राकृतांत ' जाण-वत्ता ' असें रूप आलेलें आहे. यांतील ' वत्ता ' हें ' पात्राबद्दल होय. आणि ' वत्ता ' याचें च ' बत्ता ' असें रूप होतें. पाणी सांठविण्याच्या एखाद्या मोठया भांड्याला ' बत्तो ' असें म्हणतात च. ' खलबत्ता ' यांतील ' बत्ता ' या शब्दाचा अर्थ खल

करण्याचें पात्र असा च होय. ' बतेला असा शब्द एक जातीच्या गलबताला हि लावितात च.

## ( ५६ ) बनणें

' हा माल आपल्या देशांत बनलेला आहे ', इत्यादि वाक्यांतून ' बनलेला ' म्हणजे ' झालेला ' असा अर्थ होतो. हा अर्थ कसा होतो, हें पुढील प्राकृत वाक्यावरून लक्षांत येतें.

प्रा.– कआ भनु दुव्वर तज्ज गरास।

सं.– कायो भूतो दुर्बलस्त्यक्तो ग्रासः। प्रा. पिं. पृ. १५०.

येथें संस्कृत ' भूत ' ( झालेला ) ह्याच्याबद्दल प्राकृतांत ' भनु ' असें रूप आलेलें आहे. आणि त्यावरून च मराठींत ' बनणें ' हा धातु निघालेला असावा, असें दिसतें. ' खेळायला जायला बनत नाहीं, ' असल्या वाक्यांतून ' बनणें ' याचा अर्थ कांहीं भिन्न असल्यासारखा वाटतो मात्र. परंतु त्या च वाक्याबद्दल ' खेळायला जायला होत नाहीं, ' असें हि आपण म्हणतों. यावरून येथें हि ' बनणें ' म्हणजे ' होणें ' असा च अर्थ होतो.

## ( ५७ ) बिदी

जुन्या मराठी कवींच्या कवितेमध्यें ' बिदी ' हा शब्द रस्ता या अर्थी पुष्कळ वेळां येतो. संस्कृतांतील ' वीथि ' या शब्दापासून हा शब्द निघालेला असावा. वीथि = वीदि = बिदी.

## ( ५८ ) बुबुळ

संस्कृत ' बुद्बुद ' याच्यापासून मराठींत ' बुडबुडा ' हा शब्द ज्या प्रमाण आलेला आहे, त्या च प्रमाणें ' बुद्बुद ' याचें प्राकृतांत जें ' बुब्बुल ' असें एक रूप होतें, त्यापासून ' बुबुळ ' हा शब्द मराठींत आलेला आहे. डोळ्याचें बुबुळ हा एक बुडबुडा च आहे, ह्या व्युत्पत्तिमूलक कल्पनेमध्यें एक प्रकारचें काव्यसौंदर्य आहे, हें कोणाच्या हि लक्षांत येईल.

## ( ५९ ) बोहारी

उद्योगधंदा या अर्थी संस्कृतांत जो ' व्यवहार ' हा शब्द आहे त्याचें प्राकृतांत ' बोहार ' असें रूप होतें. त्यावरून पुढें जो बोहार म्हणजे व्यवहार करतो तो बोहारी असा शब्द मराठींत उपयोगांत आला असावा.

## ( ६० ) बोळकें ढळणें

प्रा.– ससिबोलअहिं ढलिओ जोण्हाखडिआरसो।

सं.– शशिमषीपात्रात्स्यंदितो ज्योत्स्नाखडिकारसः।

येथील प्राकृतांतील ' बोलअ ' यापासून मराठींतील ' बोळकें ( मुलींच्या खेळांतील बोळकें, तोंडाचें बोळकें इ. ) हा शब्द निघालेला आहे. प्राकृतांतील ' बोलअ ' हा देशी शब्द आहे, असें टीकाकारानें लिहिलें आहे. ' बोळ ' (अरुंद रस्ता) यांतील आकुंचितपणाचा जो अर्थ आहे, तो च ' बोळकें ' (लहान भांडें ) यामध्यें हि कायम आहे. ' स्यंदुन, ' सांडणें याच्याबद्दल येथें प्राकृतांत ' ढलिअ ' असें जें रूप आलें

आहे त्यावरून मराठींतील 'ढळणें' हा धातू निघालेला आहे.

## ( ६१ ) बोळवणें

बोळवणें म्हणजे घालविणें अशा अर्थीं या शब्दाचा मराठमिध्यें एक प्रयोग होत असतो. 'देवी बोळाविणें,' 'त्याची बोळवण केली,' 'विडा दक्षणा देउनी बोळवीले,' इत्यादि सर्व ठिकाणीं घालविणें हा च अर्थ आहे. या अर्थाचा बोळविणें हा शब्द प्राकृतामधून मराठीमध्यें आलेला आहे, असें पुढील उताऱ्यावरून दिसतें.

प्रा.— हत्थच्छत्तणिवारिदेंदुकिरणा-येोह्लेइ सा जामिणीं ।

सं.— हस्तच्छत्रनिवारितेंदुकिरणा-तिवाहयति सा यामिनीम् ।

येथें 'अतिवाहयति' 'निवारयति,' अशा कोणत्या तरी एखाद्या संस्कृत शब्दाबद्दल प्राकृतांत 'बोल्हेइ' हा आदेश झालेला आहे.

प्राकृत पिंगलामध्यें 'वुल्लउ भम्मर' ( पान १५१ ) असें एक वाक्य आलेलें आहे. त्याची संस्कृत छाया 'कूजतु भ्रमरः' अशी दिलेली आहे. मराठींत 'भ्रमर बोलो, गुंजारव करो' असा त्याचा अर्थ होतो. मराठींतील 'बोलणें' हा धातु वरील प्राकृतांतील 'वुल्लउ' यापासून च निघालेला असला पाहिजे. 'बोलणें' या मूळरूपापासून 'बोलविणें,' 'बोलणें,' हीं प्रयोजकरूपें निघालेलीं आहेत, यांचा अर्थ 'हांक मारणें, पाहुण्याला आपल्या घरीं आणणें' असा असतांना 'बोळवणें' याचा च अर्थ 'पाहुण्याला आपल्या घरून घालवणें' असा उलटा कसा होतो, हा एक प्रश्न आहे. परंतु याचें समाधान असें दिसतें. 'गम्यतां पुनरागमनाय' असें संस्कृतांत पुष्कळ वेळां येतें. आणि हल्लीं हि शिष्टसंप्रदायाप्रमाणें आपल्या येथून कोणी पाहुणा जाऊं लागला, तर त्याला 'जा' असें न म्हणतां 'या' असें आपण म्हणतों. या पद्धतीला अनुसरून च विपरीत लक्षणेनें बोलवणें म्हणजे घालवणें असा उलटा अर्थ झाला असला पाहिजे, असें दिसतें.

## ( ६२ ) बंभोला, बंमहादेव

हे शब्द पुष्कळ वेळां उच्चारण्यांत येतात, परंतु यांतील बं याचा अर्थ काय, हें फार च थोड्यांच्या लक्षांत येत असेल. प्राकृत पिंगलसूत्रामध्यें पुढीलप्रमाणें एक कवितेचा चरण आहे.

अद्धा कइ पिंगल कहइ चलइ ण
हरिहरबंभ ।

याची संस्कृतच्छाया येणेंप्रमाणें आहे—

सत्यं कविः पिंगलः कथयति चल-
ति न हरिहरब्रह्मभिः ।

यावरून दिसून येत आहे कीं, संस्कृत ब्रह्म पासून प्राकृतांत बंभ होऊन त्यांतील 'भ' चा हि मराठींत लोप झालेला आहे.

## ( ६३ ) भांडवल

हा शब्द संस्कृतांतील 'भांडमूल' यापासून आलेला आहे.

ननु अम्हाकं द्विन्नंपि भंडमूळंपि
गोणादयोपि समसमाचेव ।
त्वं कस्मा द्वे कोट्ठासे लद्धुं अरहसीति ।

## ( ६४ ) महाल, भूपाळी

प्रा.— मंतिविणिम्मिदमहाराअवास-हरपेरंतणिवासी महल्लअलोओ तुम्हे भणादि। को विअ कालो विउद्धस्स विज्जाहरमल्लदेवस्स। ता कीस पभादभोआवलिं ण गायध त्ति।

सं.—मंत्रिविनिर्मितमहाराजवासगृहपर्यंतनिवासी अंतःपुरलोको युष्मान् भणति। क इव कालो विबुद्धस्य विद्याधरमल्लदेवस्य। तत्किं प्रभातभोगावलिं न गायत इति। वि. शा. भं. पृष्ठ १२.

येथें प्राकृतांत ' महल्लअ ' व ' भोआवलि ' असे दोन शब्द आलेले आहेत. पैकीं टीकेमध्यें पहिल्याबद्दल ' महल्लेत्यंतःपुरे देशी ' असें म्हटलें आहे. त्या ' महल्ल ' पासून मराठींतील ' महाल ' हा शब्द निघालेला दिसतो. दुसरा शब्द जो ' भोआवलि ' त्याचा अर्थ टीकाकारानें ' प्रातःकाले बंदिपाठ्या राजबिरुदावलिरूपा राजस्तुतिः ' असा दिला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, मराठींतील प्रातःकाळीं म्हणावयाची ' भूपाळी ' ही यापासून च निघालेली असावी. गाण्यांतील भूपरागाला अनुलक्षून कोणी व्युत्पत्ति करील, तर भूपराग हा संध्याकाळीं गाण्याचा आहे, सकाळचा नाहीं. भूप म्हणजे राजे यांची आवलि म्हणजे पंक्ति असा अर्थ करून हि कांहीं फलनिष्पत्ति होत नाहीं. आणि शिवाय निराधार व काल्पनिक व्युत्पत्तीपेक्षां जिला प्रत्यक्ष प्रयोगाचा आधार आहे ती च ज्यास्त ग्राह्य होय. भूपाळी असें जें पहाटच्या एका रागाचें नांव आहे, तें हि यावरून च कदाचित् पडलें असेल.

## ( ६५ ) मांजा, शेंदुरानें मांजणें

हा शब्द ( भांडीं वगैरे ) ' घासणें, ' ' स्वच्छ करणें, ' याअर्थी गुजराथी व हिंदीभाषेंत पुष्कळ वेळां येतो. तो संस्कृतांतील ' मार्ज् ' या धातूपासून निघालेला आहे, असें पुढील उताऱ्यावरून दिसतें.

प्रा.— तेलमंजिदकज्जलपुंजसंजाणिदं व्व।

सं.—तैलमार्जितकज्जलपुंजसंजनितमिव।

टीका:—मंजिदेति मिश्रिते परिमार्जिते वा देशी। ( वि. शा. भं. पृष्ठ ८८ ).

## ( ६६ ) मूग गिळणें

' मूग गिळणें ' या मराठी म्हणीचा अर्थ मुकाट्यानें बसणें, मौन धारण करणें असा आहे. या अर्थी संस्कृतांतील जो ' मूक ' शब्द त्याचें प्राकृतांत ' मूग ' असें रूपांतर होतें. तसें च तोंडांत कांहीं तरी पदार्थ गिळला जाण्याच्या अवस्थेंत असला म्हणजे त्यावेळीं हि बोलतां येणें अशक्य असतें. त्यामुळें ' गिळणें ' याचा ' मौन धारण करणें ' असा अर्थ अवश्यप्राप्त च होतो. आतां पुढें ' गिळणें ' हें सकर्मक क्रियापद असल्यामुळें व त्याला कांहीं तरी गिळावयाला योग्य अशा खाण्याच्या पदार्थाच्या कर्माची आकांक्षा असल्यामुळें व ' मूग ' हें धान्य खाण्याचा च एक पदार्थ असून शिवाय त्यांत मूकभावाच्या अर्थाचा हि अंतर्भाव होत

असल्यामुळें या अनुकूल श्लेषाला अनुलक्षून ' गिळणें ' या क्रियापदाला ' मूग ' हें कर्म जोडण्यांत येऊन ही म्हण प्रचारांत आली असावी.

## ( ६७ ) मेतकूट

संस्कृतांतील ' मैत्र ' याचें प्राकृतांत ' मेत्त ' असें रूप होतें. त्याचे पुढें ' रासकूट ( राशिकूट ) ' वगैरे शब्दांतल्याप्रमाणें ' कूट ' हा शब्द लागून ' मेतकूट ' हा शब्द झालेला असावा. दोघा मित्रांचें फार सख्य जमलेलें असलें तर त्या ठिकाणीं ' त्यांचें मेतकूट जमलें आहे ' असें म्हणण्याचा जो परिपाठ आहे त्याचा अर्थ या व्युत्पत्तीवरून स्पष्ट होतो. खाण्याचें मेतकूट हें मेथ्यांचें कूट होय.

## ( ६८ ) रहंवर

' सारथ्यासी सांगे हांकी हा रहंवर। पाहियेलें तीर यमुनेचें ' ॥ ( नामदेवाचे बालक्रीडेचे अभंग ) इत्यादि ठिकाणीं ' रहंवर ' हा शब्द जुन्या मराठी कवितेमध्यें पुष्कळ वेळां येतो. तो संस्कृतांतील ' रथवर ' याचें प्राकृतांत ' रहवर ' असें जें रूप होतें त्यापासून आलेला आहे.

सं.- प्रभंजननंदनोऽपि वानरेन्द्रोऽनूत्पतितो मेघनादस्य रथवरम् ।

प्रा.- पभंजणणंदणो वि वाणरिंदो अणुप्पडिओ मेहणादस्स रहवरं । -

मराठींत येतांना ' रहंवर ' यानें आपल्याबरोबर एक अनुस्वार मात्र जास्त आणलेला आहे.

## ( ६९ ) रुळणें

' तो अजून रुळला नाहीं ', ' तो रुळला म्हणजे चांगला होईल ' इत्यादि वाक्यांतून ज्या रुळणें या धातूचीं हीं रूपें येतात तो धातु संस्कृतांतील ' रूढ ' शब्दाचें प्राकृतांत जें ' रूळह ' असें रूप होतें त्यावरून मराठींत आलेला आहे. जसें ' रूढ ' याचें ' रूळह ' असें रूप होतें तसें च ' मूढ ' याचे ' मूळ्ह ' असें रूप होतें. या ' मूळ्ह ' पासून मराठींत आलेला जो ' मूळ ' शब्द तो ' मुळ मुळ रडणें ' वगैरे ठिकाणीं प्रचारांत आलेला असावा असें दिसतें.

## ( ७० ) रोषणाई

प्रा.- रोसाअणं कुडं ता कंचणमअवालिआरूवम् ।

सं.- उज्ज्वलीकृतं तत्कांचनमयबालिकारूपम् । ( क. मं. पृष्ठ ४८ )

येथील प्राकृतांतील ' रोसाअणं ' याच्यावर ' रोसाअणमित्युज्ज्वलार्थे देशी ' अशी टीकाकारांनीं टीप दिलेली आहे. त्यावरून ' रोषणाई ' वगैरे फारशी मधून आल्यासारखे दिसणारे शब्द आपल्यामधील च मूळचे असले पाहिजेत, असें दिसतें. वरील प्राकृत अवतरणामध्यें ' बालिका ' या संस्कृत शब्दाचें ' वालिआ ' असें रूपांतर झालेलें आहे. मराठींत लहान मुलींचें आणि बायकांचें ' वाली ' असें जें नांव येतें, तें यावरून च असलें पाहिजे.

## ( ७१ ) लडिवाळ

प्रा.- लाडीण लीलागुरू ।

सं.- लाटीनां लीलागुरुः ।

लाटदेशीय स्त्री जी लाटी तिच प्राकृतांत 'लाडी' असें रूप होतें. मराठींत 'लाड' हें आडनांव आहे च, व 'लाडी' हें कांहीं बायकांचें नांव असतें. जी 'लाडी' ती च 'लाडकी.' व त्याचपासून पुढें 'लाड,' 'लडिवाळ' वगैरे शब्द निघालेले असावेत. कोणी यांत 'लल्' धातु असेल, असें मानितात.

## ( ७२ ) लाट

प्रा.– णीसासा हारलट्ठीसरिसपसरणा चंदणं फोडकारी ।

सं.– निःश्वासा हारयष्टिसदृशप्रसरणाश्चंदनः स्फोटकारी । (क.मं.पृष्ठ४६)

'यष्टि' बद्दल प्राकृतांत 'लट्ठी' असा आदेश होतो. हिंदी भाषेंत काठीला 'लाठी' असें च म्हणतात. तेल्याची लाट अगर बगाडावर 'लाट' फिरते, ती देखील लांकडाची च एक दांडी असते. लोखंडाच्या एखाद्या स्तंभाला हि 'लाट' म्हणतात, तें याच अर्थानें. आणि पाण्याची लाट ही तशी च यष्टिवत् दिसते, म्हणून तिला हि 'लाट' हा शब्द लावण्यांत येत असावा. त्या लाटेप्रमाणें वाटोळें फिरतें तें लाटणें. 'पाणलोट' वगैरे ठिकाणीं 'लुट्' धातु असावा. 'अंगलट' या शब्दांतील शेवटचा 'लट' हा जो अवयव आहे, तो हि 'यष्टि' 'लट्ठी' यापासून च होय, हें पुढील अवतरणावरून स्पष्ट होत आहे.

प्रा.–मंजिट्ठी ओट्ठमुद्दा णवघडणसुवण्णुज्जला अंगलट्ठी ।

सं.– मांजिष्ठी ओष्ठमुद्रा नवघटनसुवर्णोज्ज्वला अंगयष्टिः । (क.मं. पृष्ठ६०)

## ( ७३ ) व

'आणि' या अर्थीं मराठींत जो 'व' हा शब्द येतो तो संस्कृतांतील 'वा' या शब्दापासून निघालेला असावा. 'वा' याचें प्राकृतांत 'व' असें रूप होतें, आणि तें च प्राकृतांतून मराठींत आलेलें असावें. 'वा' याचा संस्कृतांतील अर्थ 'किंवा' असा मूळचा आहे. परंतु तो विकल्पाचा मूळचा अर्थ जाऊन मराठींतील 'व' ला समुच्चयाचा अर्थ प्राप्त झालेला आहे. हा 'व' चा समुच्चयाचा अर्थ प्राकृतांत हि दृष्टोत्पत्तीस येतो. इतकें च नव्हे तर मराठींतल्याप्रमाणें प्राकृतांत 'व' हें उभयान्वयी अव्यय ज्या दोन शब्दांचा अन्वय करावयाचा असेल त्यांच्या मध्यें आलेलें हि आढळून येतें.

## ( ७४ ) वावर

वावर म्हणजे शेत. अशा अर्थीं वावर या शब्दाचा उपयोग करण्यांत येतो. 'घरांत वावरणें,' 'हल्लीं त्याचा या जागेंत वावर नाहीं,' इत्यादि ठिकाणीं हि वावर ह्या शब्दाचा प्रयोग केलेला आढळतो. हा शब्द संस्कृतांतील 'व्यापार' याचें प्राकृतांत 'वावर' असें जें रूप होतें त्यापासून निघालेला आहे.

प्रा.– तादोवि नाम उवसमेक्कधणो धणुं वावरिदि ।

सं.– तातोऽपि नाम उपशमैकधनो धनुर्व्यापारयति ।

## ( ७५ ) वृद्धकपि

हा शब्द म्हाताऱ्या मनुष्याला लावतात. परंतु यांतील ' कपि ' याचा अर्थ काय हें सहज लक्षांत येण्यासारखें नाहीं. प्राकृतांत ' कल्प ' या संस्कृत शब्दाचें ' कप्प ' असें रूप होतें. व ' कल्प ' या पासून ताद्धितानें झालेलें विशेषण जें ' कल्पीय ' त्याचें प्राकृतांत ' कप्पिअ ' असें रूप होतें. ' कप्पिअ ' याचा अर्थ ' कल्पांतरींचा, फार जुना, ' असा असल्यामुळें ' कप्पिअ ' यांतील शेवटच्या अ चा लोप होऊन बाकी राहिलेला ' वृद्धकपि ' या ठिकाणीं दृग्गोचर होणारा जो कपि शब्द त्याचा हि अर्थ फार पुरातनकाळचा असा होतो. कल्प या प्रत्ययापासून हि ही सिद्धि संभवनीय आहे.

## ( ७६ ) शकुन

संस्कृतांत ' शकुन, ' या शब्दाचा ' पक्षी ' असा एक अर्थ आहे. व ' भावीगोष्टीचें पूर्व चिन्ह ' असा हि त्याचा दुसरा अर्थ आहे. यांत व्युत्पत्तीच्या दृष्टीनें सांगण्यासारखी महत्त्वाची अशी गोष्ट कांहीं नाहीं. परंतु वरील दोन्ही अर्थ असलेला ' शकुन ' शब्द इंग्रजींतील Augury या शब्दाशीं तुलना करण्यासारखा आहे. इंग्रजींतील Augury ह्या शब्दामध्यें हि ' पक्षी ' आणि ' भविष्यकथन ' यांचा संबंध एकत्र समाविष्ट झालेला आहे.

## ( ७७ ) सकट घोडे

' सकट घोडे बारा टक्के ' अशी मराठींत एक म्हण आहे. संस्कृत ' शकट ( रथ ) ' याचें प्राकृतांत ' सकट ' असें रूप होतें. त च ' सकट घोडे ' या ठिकाणीं असलें पाहिजे, असें ' घोडे ' या शब्दाच्या सांनिध्यावरून दिसतें. तेव्हां ' सकट घोडे ' याचा अर्थ ' रथ आणि त्याला जुंपलेले घोडे ' असा होतो. या दोघांची मिळून किंमत कोणीं बारा टक्के केली तर ती फार कमी होते, असा मूळचा अर्थ लक्षांत आणून पुढें लक्षणेनें या वाक्याचे निराळे अर्थ झालेले असावेत. ' टक्का शेर भाजा आणि टक्का शेर खाजा ' ही म्हण वरील म्हणीशीं तुलना करण्यासारखी आहे.

## ( ७८ ) सल्ला

संस्कृत ' संलाप ' याचें प्राकृतांत ' सल्लाअ ' असें रूप होतें. त्यावरून हा शब्द मराठींत आला असावा. ' सलोखा ' हा शब्द हि याप्रमाणें च संस्कृत ' संलक्ष ' याचें प्राकृतांत ' सलक्ख ' असें रूप होऊन त्यापासून निघालेला असावा.

## ( ७९ ) साजूक

न हि पापं कतं कम्मं सज्जुखीरं व मुच्चति । ध. बा १२.

येथें ' सज्जुखीरं ' असे जे शब्द आलेले आहेत, त्यांचा अर्थ " ताजें काढलेलें कढत कढत दूध " असा आहे. संस्कृत ' सद्यः ' याच्यावरून ' सज्जु ' हें प्राकृतांतील रूप झालेलें आहे. व यावरून च पुढें मराठींतील ' साजुक ' हा शब्द उत्पन्न झालेला असावा.

## ( ८० ) साडी

शाटिका=साडिआ=साडी.

प्रा.– तहिं गच्छ जहिं मे, पढमा साडिआ गदा । ( क. मं. पृष्ठ २१ )

सं.– तत्र गच्छ यत्र मे प्रथमा शाटिका गता ।

## ( ८१ ) सांगणें

'सम्' पूर्वक 'ख्या' या संस्कृत धातूचें 'संघ्' 'संग्' असें प्राकृतांत रूप होऊन त्यापासून मराठींतील 'सांगणें' हें क्रियापद निघालेलें आहे. 'संख्यान' म्हणजे मोजून दाखविणें, वर्णन करणें, इत्यादि जे मूळचे अर्थ आहेत, त्यापासून च पुढें 'सांगणें' हा अर्थ निघालेला आहे.

## ( ८२ ) स्वार

प्रा.– अस्सवारकरवालव्व णिअम्ब-बिम्बे दोलन्ति ।

सं.– अश्ववारकरवाला इव नितंब-बिंबे दोलंति । ( बाल रा० पृष्ठ ५३१ )

हिंदुस्थानी वगैरे भाषांतून 'अस्वार' असा शब्द आढळतो. तो मुळाच्या ज्यास्त जवळ आहे. मराठींत 'अ' चा हि लोप होऊन फक्त 'स्वार' येवढें च रूप राहिलेलें आहे.

## ( ८३ ) हाकारणें, हांक मारणें

प्रा.– हक्कारिऊण मअणं पासम्मि णिवेसअंति व्व ।

सं.– आकार्य मदनं पार्श्वे निवेशयं-तीव ।

## ( ८४ ) हेटकरी

सह्याद्रिपर्वताच्या पायथ्याच्या मुलखांत राहणाऱ्या लोकांना हेटकरी असें म्हणतात. याचें कारण असें कीं, संस्कृत 'अधः' बद्दल प्राकृतांत 'हेठ' असा आदेश होतो. तेव्हां 'हेठ' म्हणजे खालचा, तळकोंकणचा जो भाग, त्यांत रहाणारे ते हेटकरी.

## ( ८५ ) हेर

गुप्त हेर, चार, या अर्थी जो हेर शब्द मराठींत उपयोगांत येतो, तो 'हेरणें' या धातूपासून निघालेला आहे. आणि 'हेरणें' हा 'दृश्' या संस्कृत धातूबद्दल प्राकृतांत आदेश म्हणून येतो, असें प्राकृत पिंगलांतील पुढील अवतरणावरून दिसून येतें:—

प्रा.– पच्छा हेरि कइत्त करु ।

सं.– पश्चाद् दृष्ट्वा कवित्वं कुरु ।

# २०१ व्युत्पत्त्या

(अ) वि. का. राजवाडे

अख्ख (खें-खा-खी)

अस्कन्न=अक्खण्ण=अख्ख (खा-खी-खें)

अस्कन्न = न फुटलेलें, न फाटलेलें, पूर्ण.

अथाक (अति खोल)

अस्थाग=अथाक, अथांग

आचारी

आर्य-वैद्यकांत आचारिकं म्हणजे आरोग्यरक्षणार्थ अन्नपाण्याच्या ग्रहणाचे नियम ज्यांत सांगितले आहेत तें प्रकरण. ह्या प्रकरणांतील नियमाप्रमाणें जो अन्नादि पदार्थ तयार करण्याची कला उत्तम जाणतो तो आचारिकिकः; त्यापासून मराठी आचारी. आचारिन् या शब्दाशीं मराठी आचारी या शब्दाचा कांहीं येक संबंध नाहीं.

आळ- (प्रत्यय)

हेळणं, हेडनं = हेळणें = हेटाळणें

पिटनं = पिटणें = पिटाळणें

कंठनं = कंठणें = कंटाळणें

स्फिटनं = फेडणें = फेटाळणें

वेष्टनं = वेट्टणँ = वेटाळणें

मोटनं = मोडणें = मोटाळणें

इंद्रावण

इंद्रवारुणी = इंद्रावण (वनस्पति)



उकडणें

उत्क्वथनं = उक्कढणँ = उकडणें

उकलणें

उत्कलनं = उकलणें

उकळी

उत्कलिका = उक्कलिआ = उकळी

उत्कलिका म्हणजे उत्कंठा

उच्छाद

उत्सादः = उच्छाद

उत्साद म्हणजे नाश करणें

उछाव

उत्सव = उछाव

उत्सव शब्दाचा उछाव असा उच्चार अशिष्ट करतात.

उछाह

उत्साह = उछाह

उजावणें

उज्जापनं = उजावणें = उजवणें

सोंगटी उजवली म्हणजे जय पावून गेली.

उपडा

उत्पादः = उप्पाडा = उपडा

उत्पादः म्हणजे वर पाय केलेला. उपडा म्हणजे वर पाय करून पडलेला.

## उपळा

उत्प्लवः = उपळा

उत्प्लव म्हणजे वर तरंगणें, येणें; पाण्याचा उपळा म्हणजे वर येणें

## उफाडा

उत्फालः = उफाडा

उत्फाल ह्मणजे जोरानें विकास पावणें

## उद्गीर

उदकगिरि = उद्गीर

उद्गीर हें डोंगराचें नांव आहे. ह्या डोंगरांत पाण्याचें झरे फार आहेत. उदयगिरि ह्या शब्दापासून उद्गीर हा शब्द कित्येक व्युत्पादितात, पण तें युक्त दिसत नाहीं.

## उंदीरकानी

( आखुकर्णिका ) उंदूरकार्णिक = उंदीरकानी ( वनस्पति )

## एरणी

अरणी = एरणी ( वनस्पति )

## ओठंबणें

उत्तंभनं = ओठंबणें

## कडेवर

कटिः ककुद्मती श्रोणी नितंबश्च कटीरकं ॥ राजनिघंटुः ॥

कटीरक = कटीकर ( वर्णविपर्यास )
= कडीअर = कडीवर
= कडेवर

कटीरके गृह्न = कडेवरी घे
= कडेवर घे

येथें कडेवर ही सप्तमी आहे.

कडेवर घेणें म्हणजे नितंबावर घेणें

## कऱ्हा - ऱ्हें ( उंट )

करभः-करहः = कऱ्हा, कऱ्हें

उष्ट्रः क्रमेलको धूम्रः करभः दीर्घमार्गगः ॥

कऱ्हा, कऱ्हें हे उंटवाचक शब्द जुन्या मराठींत फार येतात.

## काकडशिंगी

कर्कटशृंगी = काकडाशिंगी

## काच ( जाच )

कच् बंधनें = काच

काच म्हणजे चोहोंकडून अटकाव करणें

## कारली

कारवल्ली = कारली

## कोहळा

कुंभफला = कंहअळा = कोहळा

कुष्मांडिका कुंभफला ।
॥ राजनिघंटुः ॥

## खडी

खटी = खडी

खटी धवलमृत्तिका ।
॥ राजनिघंटुः ॥

## गलतान

गलस्तनः ( बकरें ) = गलतन = गलतान

गलस्तन म्हणजे निरुपयोगी स्तनाकृति अवयव ज्याच्या गळ्याला आहेत ता प्राणी; निरुपयोगी प्राणी

## गालगुंड

गलगुंडिका = गालगुंड

**गोंधळ**

गुंदल ( वाद्यविशेष ) = गोंधळ

गुंदल नांवाचें वाद्य ज्यांत वाजवतात तो गोंधळ

**घोणा**

घ्राणं गंधवहा घोणा ।

॥ राजनिघंटुः ॥

( स्त्री ) घोणा = घोणा ( पुं )

नाकाचा घोणा फुटणें म्हणजे नाकाच्या आंतील दांड्याजवळील शीर फुटणें

**खेचर**

खेचराचें संस्कृत नांव अश्वखरजः. अश्वखरज म्हणजे घोडें व गाढव यांजपासून झालेला. पैकीं अश्व शब्द जाऊन नुसता खरज शब्द या प्राण्याला लागूं लागला. गाढवाला खर हा शब्द आहे. तेव्हां खरज हा शब्द घोडा व गाढव यांच्या संकराला लागूं लागला. वर्णविपर्यास होऊन

खरज = खजर

ज चा च होऊन

खजर = खचर

उच्चारसौकर्यार्थ अ बद्दल ए होऊन

खचर = खेचर

**चित्ता वाघ**

चित्रकः व्याघ्रः = चित्ता वाघ

चित्रकः चित्रकायः स्यात् उपव्याघ्रो मृगान्तकः ॥ राजनिघंटु ॥

**चिमकणें**, मिचकणें, मिचकावणें

श्मीलनं = शिमळणँ=चिमळणँ= =( वर्णविपर्ययानें ) मिचळणें = चिमकणें

( ळ बद्दल क ) मिचकणें, मिचकावणें

**जाचणें**

( जसु ताडने ) जासयति=जाचणें

सासू सुनेस जाचते = श्वश्रूः स्नुषां जासयति

जाच ( नाम ) = जासः

**जुनट, जुनाट**

जूर्णिष्ठ = जुणट, जुनट, जुनाट

जुनाट म्हणजे अति जुनें

**जांब** ( ग्रामनाम )

जांबवं ( पाणिनि २-४-७ )=जांब

रामदासस्वामी ज्या गांवीं जन्मले त्या गांवास जांब म्हणतात व त्याचें मूळ संस्कृत रूप जांबवं होतें.

**टरारणें**

तरुणयति = टरारणें

तरुणयति म्हणजे अतिशयें करून होणें

पुरी टरारून फुगली म्हणजे अतिशयें करून फुगली.

**टारगा**

( टारः ) टारकः( Catamite )= टारगा

( कुत्सितार्थी ) टारगट

**टोंच**

त्रोटि = टोंटि = टोंच ( पक्ष्याचें तोंड )

**टेंटू**

टिंटुकः = टेंटू ( वनस्पति )

### डर

दर (भय) = डर

### डाहद

दात्यूह = डाह्‌द (जलकाक)

### ढोसणें

अभ्यशन = (अलोप) ढोसणें

अभ्यशन म्हणजे भरल्या पोटीं खाणें; दारू ढोसणें म्हणजे वाजवीपेक्षां जास्त दारू पिणें

### तडाका

तटाघातः, तडाघातः = तडाखा, तडाका

तडाघात म्हणजे हत्तीच्या सोंडेचें मारणें. त्यावरून सामान्यतः जोरानें मारणें ह्या अर्थी मराठींत तडाका शब्द योजितात.

### तवंसें, तौसें

त्रपुसं = तउसँ = तवंसें, तौसें (एक प्रकारची काकडी)

### तसनस

तस् (क्षीण होणं) + नस् (अपव्यय करणें–वैदिक) = तसनस

तसनस म्हणजे नासधूस

### तसर

त्रसर (कोळ्याचें सूत) = तसर

### तांदुळजा

तंडुलीयः = तांदुळीजा = तांदुळजा (एक भाजी)

### तिटकारा

तिरस्कारः = तिटकारा

### तिढा

तिरस् = तिढह् = तिढा

तिढा म्हणजे तिरका

र = ढ

### तेड

त्रिवृत् = तिअड् = तेड (वनस्पति)

### तेंढ्र

त्रिपुटा = तिउडा = तेढा = तेंढ्र (श्वेतनिशोत्तर)

### तेंढ्र

त्रिभंडी = तिहंडी = तेंडी, तेंडू (श्वेतनिशोत्तर)

### तोडा

तोडर = तोडअ = तोडा

पायांत घालावयाचा अलंकार विशेष

### तोंडली

तुंडिकावल्ली = तोंडली

### थरू

त्सरु, त्सुरु = थरूँ (सुरीची मूठ)

### थोपणें

स्तुंभ् (थांबणें) =थोप+णें=थोपणें

**दडपणें** (अकर्मक, भिणें या अर्थी)

दर्भयति (दृभी भये) = दरभ = दडब = दडप+णें

माझी छाती दडपली म्हणजे भ्याली.

### दावण

दामनी=दावण (गुरांना बांधावयाची)

### दांडपट्टा

दंडपट्टिश = दांडपट्टा

**दांती** (वनस्पतिविशेष)

दंतिका = दांती

### दारूहळद

दारुहरिद्रा = दारूहळद

## दावें

दामन् = दावें

## धूड

अध्यूढ = धूड

अध्यूढ म्हणजे संपन्न

शरीरानें व मेदानें संपन्न तो धूड

अलोप

## धमासा

धन्वयासः = धमासा ( वनस्पति )

## नकोरे

म खलु = न करु = नकोर=नकोरे

( न )खलु पीत्वा=नकोरे पीऊं=मा पिब.

( न )खलु गत्वा=नकोर जाऊं=मा गमः

प्रथम खलु पीत्वा, खलु गत्वा असा न खेरीज प्रयोग पाणिनि व यास्क यांच्या कालीं होत असे. पुढें पुढें पाठीमागें न लावूं लागले. त्यापासून मराठी नकोरे निघाला आहे.

## नक्कल

( सं. ) नक्कणं = नक्कल

ण = ल

नक्क् म्हणजे निर्मूल करणें

त्याचें नक्कल झालें म्हणजे त्याचें निर्मूल झालें.

## नखरूड ( रोगविशेष )

नखरुज् = नखरुड

ज = ड

## नखरुख ( वृक्षविशेष )

नखवृक्ष = नखरुख

## नडणें व नाडणें

नडनं = नडणें

नाडयति ( णिच् ) = नाडणें

नडणें म्हणजे पडणें व नाडणें म्हणजे पाडणें

मी नडलों म्हणजे संकटांत पडलों.

## नना

( वैदिक ) नना ( आई ) = नना

मराठींत आईला मुलें नना, नानी, या शब्दांनीं हाका मारितात.

## नवट

नविष्ठ = नवट ( तमभाव )

नवट म्हणजे अति नवें

## नागडा

नग्नः = नागा

नग्नाटः = नागाडा = नागडा

संस्कृतांत नग्नाट म्हणजे नागवा हिंडणारा यति

## निचरा, णिचरा

निःस्रावः = निचराअ = निचरा, णिचरा

हा शब्द मराठींत णादि आहे.

## निवडुंग

स्नुहिदंडवृक्षः = निवडंडवृक्ष

= निवडंग

= निवडुंग

दंड मधील ड च्या बद्दल ग झालेला आहे.

## नेभळ ( ळा-ळी-ळें )

नाभिल = नेभळ

भि मधील इ ना कडे नेऊन ने

नाभिल म्हणजे नाभि संबंधानें, फुटल्या बेंबीचा. नेभळें नेसूं नकोस म्हणजे नाभीच्या खालती नेसूं नकोस. हा मनुष्य नेभळा आहे म्हणजे ( मूळार्थ )

हा मनुष्य बेंबट्या आहे. बेंबट्या मनुष्य दिसावयाला ओंगळ व हास्यकारक दिसतो; सबब बेंबळा म्हणजे भोळसर हास्यकारक, ओंगळ इ. इ. इ.

### पडवळ

पटोल = पडवळ

### पतंग ( वृक्षविशेष )

पत्रांग = पतंग ( रक्तचंदन )

### पन्हळ

प्रनाळ = पन्हळ

### पवाडा

अपवादः = ( अलोप ) पवाडा

अपवाद म्हणजे निंदा

ज्ञानेश्वरींत निंदार्थक पवाडा शब्द येतो.

अनिंदार्थक पवाडा शब्द प्रवाद ह्या शब्दापासून निघाला आहे.

### पसरणें ( अकर्मक )

अपसरणें = ( अलोप ) पसरणें

लोक पसरले म्हणजे जनाः अपासरन् परंतु लोकांनीं पाय पसरले = जनाः पादान् प्रासरन्

### पाजी

पज्जः = पाजा = पाजी

पज्जः म्हणजे शूद्र

तूं पाजी आहेस म्हणजे तूं शूद्र आहेस.

प्राचीनकाळीं ब्राह्मणाला शूद्र म्हणणें अपशब्द समजत.

### पाहाड ( मूळ )

पाठा = पाआडा = पाहाड ( वनस्पति )

### पुरुष ( उंचीचें एक मान )

पौरुष ( मस्तकावर सरळ वर हात केलेल्या पुरुषाची उंची ) = पुरुष

ही विहीर सात पुरुष खोल आहे, येथें पुरुष म्हणजे विविक्षित उंचीचें मान आहे व हा पुरुष शब्द संस्कृत पौरुष शब्दापासून निघालेला आहे. प्राकृतांत येतांना संस्कृत शब्दांतील वृद्धि काढून टाकण्याचा प्राकृताचा व मराठीचा स्वभाव आहे. संस्कृत भाववाचक नामें मराठींत व प्राकृतांत अपभ्रष्ट होताना हा विकार दृष्टीस पडतो. पौष = पूस इ. इ. इ.

### पेंढ, पेण

पिण्याक = पेण, पेंढ ( निस्नेह तिलचूर्ण )

### प्रचीति

प्रतीति ( विश्वास ) = प्रचीति

त = च

### प्रेष

प्रेष ( निरोप पाठविणें ) = प्रेष

प्रेष म्हणजे निरोप

प्रेष्य = प्रेष

प्रेष म्हणजे चाकर

मराठींत प्रेष या शब्दाचे चाकर व निरोप असे दोन अर्थ आहेत व ते प्रेष्य व प्रेष या दोन भिन्न संस्कृत शब्दांपासून निघालेले आहेत.

### फस्त

अपहस्त = ( अलोप ) फस्त

अपहस्त म्हणजे लुटलेलें

### फेंगडा

प्रज्ञु, प्रज्ञ + ट = प्रज्ञट

प्रज्ञट = पञ्ड = पेंगड = फेंगड

( डा-डी-डें )

प्रज्ञ, प्रज्ञु म्हणजे ज्याच्या गुडघ्यांत फार अंतर आहे तो.

ट हा कुत्सितार्थक प्रत्यय

### बकाबक

भक्ष्याभक्ष्यं = बक्खाबक्ख=बकाबक

बकाबक खातो म्हणजे बरें वाईट न पहातां खातो.

### बचनाग

वत्सनाभ = वच्चनाह = बचनाग

### बरव ( वा-वी-वें )

परम = वरव = बरव (वा-वी-वें)

बरवा हा शब्द अतिशय-वाचक ऊर्फ तमभाववाचक मराठींत आहे.

### बरें ! ( अव्यय अंगीकारार्थी )

परमं ! = बरें !

### बौर ( ग्रामनाम )

भगुर = बउर = बौर

### बौरे ( आडनांव )

भागुरि = भाउरि = भौरे = बौरे

### बखाटी

वक्षोस्थि =वक्खोट्ठि=बखोटी=बखाटि

पोट बखाटीला गेलें म्हणजे भुकेनें इतकें ओसरलें कीं वक्षस्थलाच्या हाडापर्यंत गेलें.

### बाजारबसवी

भार्याः + उपवेशिनी=बाजारबसवी

दुसऱ्याच्या स्त्रीच्या ठाईं प्रजोत्पादन करणारा असा जो त्याला अनुरक्त जी स्त्री तिला बाजारबसवी म्हणत. दुकानांचा समूह जो बाजार त्याशीं येथें वस्तुतः संबंध नाहीं.

### बिब्या वाघ

द्वीपिन्=बीबिआ=बिब्या=बिब्या

बिब्या नांवाच्या झाडाशीं व त्याच्या फळाशीं ह्या शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं.

व्याघ्रः पंचनखो द्वीपी ॥

### भगदेव

भगदेव म्हणजे बाहेरख्याली, स्त्रीलंपट

### भगभग

भक्ष्यभक्षिका = भकभका= भगभग ( स्त्री. )

भगभग म्हणजे खाखा

### भयाभीत

हा शब्द रामदासांनीं उपयोजिला आहे, उ० " भयाभीत तो अक्षयी मोक्ष देतो," "भयाभीत निश्चिंत ये स्वस्वरूपीं". या समासाचा विग्रह भय+अभीत असा स्पष्ट आहे. परंतु त्यापासून विपरीत अर्थाची निष्पत्ति होते. तेव्हां भियाभीतः —भयाभीत अशा परंपरेनें हा युधिष्ठिर सारखा मराठींत अलुक् समास समजावा.

### भाजणें

ऊन भाजतें, या वाक्यांत जो भाज धातु येतो तो संस्कृत भ्राज् दीप्तौ धातूपासून आला आहे.

भ्राज् = भाज

**भावीण**

भामिनी = भाविणी = भावीण

**भांडवल**

भांडयलं = भांडवल ( मूलधन )

**भिडणें**

अभिडीनं=(अलोप) भिडिणें, भिडणें
अभिडी म्हणजे जवळ उडणें, जाणें

**भिडा ( इच्छा ), भीड**

अभिध्या = भिडा = भीड
अभिध्या म्हणजे इच्छा

भिडा धरूं नको म्हणजे कशाची इच्छा धरूं नको.

**भेटणें**

अभ्यतनं = भेटणें
अभ्यत् म्हणजे भेटणें

**भोपळा**

बृहत्फल: = भोपळा

बृहत्फला राजपुत्री तिक्तबीजा च तुंबिका ।
॥ राजनिघंटु ॥

बृहत् चा अपभ्रंश भो झाला आहे.

कडू भोपळ्याला संस्कृतांत बृहत्फला, कटुतुंबी, हीं नांवें आहेत.

**भोसड**

भसद् ( पश्चाद्भाग, गुद, योनि ) = भोसड

अ = ओ

क्रियापद भोसडणें म्हणजे योनी-वरून शिव्या देणें

**भोंगळ**

भूमंगल=भुवंगळ=भुओंगळ = भोंगळ

**मिशरा ( नायकिणीचें नांव )**

मसूरिका = मिशुरिआ = मिशरा

मसूरिका म्हणजे पण्यस्त्रीयांची मुख्य. मिशरा नायकिण पुण्यांत प्रसिद्ध होती.

**मेढशिंगी**

मेढ्रशृंगी = मेढशिंगी ( वनस्पति )

अजाशृंगी, मेषशृंगी अशीं हि संस्कृत नांवें हीस आहेत.

**मेळा**

मेलक = मेळा

**मोरवेल**

मूर्वावल्लिः=मोरवेल ( वनस्पति )

**रसोई**

रससूदिका = सरहूईआ = रसोईआ = रसोई

षड्-रसांचा जो पाक ह्मणजे सूद ती रसोई

सूद म्हणजे शिजवणें, पाक

**राई ( अळ्यांची ओळ )**

राजि = राई

**राई ( मोहरी )**

राजिका ( कृष्णसर्षप ) = राई

**रांगणें**

रिंगणें = रांगणें

इ = आ

**रोशें गवत**

रोहिषं तृणं = रोशें गवंत

गोअत्तं = गवत्तं = गवत

## लक्ती, रगटी-टें

( लक्तक ) लक्तिका = लक्ती

( फाटकें वस्त्र )

लक्ती = रगटी

## लगतरी

लक्तक + वस्त्र = लगतअअर = लगतर ( री-रें )

लक्तक म्हणजे फाटकें वस्त्र, फटकूर

## लवणें

नमनं = लवणँ = लवणें

न = ल

थोरां पुढें लवावें म्हणजे नमावें.

## वचकणें

उच्चकनं = वचकणें

उच्चकनं म्हणजे आदरानें पहाणें

## वदन्ता ( बातमी )

उदन्ता = वदन्ता

उदन्ता म्हणजे बातमी

## वाळुक ( रोगविशेष )

( पाद- ) वल्मीक = वाळूक

## वांझ करटोली

वंध्या कर्कोटकवल्ली = वांझ करटोली

## विचकणें

विष्कनं ( हिंसा ) = विसकणें, विचकणें

विचकणें, विसकटणें म्हणजे विदारणें

## शिरावेध

सिराव्यधः = शिरावेध

भा. इ.-५०

## शिवण गंभारी

श्रीपर्णी=शिवणी=शिवण (वनस्पति)

## श्रद्धा ( पादणें )

शृधा ( पादणें ) =शर्धा, श्रध्धा

भिक्षुक लोक सोंवळ्यांत असतांना हा शब्द योजतात.

श्रध्धेला गेला म्हणजे अपानद्वारा वायू सोडण्याकरितां गेला.

## साटें

घराचें साटें, गाडीचा साटा इत्यादि शब्दसमूहांत जो साटें, साटा शब्द येतो तो संस्कृत शकट शब्दाचा अपभ्रंश आहे.

शकटः=सअटा=साटा, टें-

शरीरं शकटं देहं पुरं कायं कलेवरं ॥

॥ धन्वंतरीयनिघंटु ॥

## साण, साहाण

शान = साण, साहाण

## साँत

साति = सात = साँत

साति म्हणजे ओळ, पंक्ति

तापाची साँत म्हणजे तापाची ओळ

## सार

तुझ्या बोलण्यांत कांहीं **सार** नाहीं, या वाक्यांत सार या शब्दाचा अर्थ न्यायादनपेतं असा आहे. सार म्हणजे न्याय्यसारं न्यायादनपेतं ( काशिका २-४-३१ )

## साळी

शालिक = साळिअ = साळी

## सावळा गोंधळ

शांभलिकः गोंदलः = सावळा गोंधळ

ज्यांत दुराचारी रांडा गातात असा गोंधळ.

गोंधळ वस्तुतः सदाचारी देवदासी ऊर्फ मुरळ्या यांनीं घालावयाचा असतो. त्यांच्या ऐवजी चाहाटळ मुरळ्या ज्या गोंधळांत आढळतात, त्याला सांवळा गोंधळ म्हणतात. त्यावरून लक्षणेनें कोणत्या हि चाहाटळ, अप्रेक्षणीय व असाधु कृत्याला सांवळा गोंधळ म्हणण्याची चाल महाराष्ट्रांत आहे.

## सुळावरची पोळी

शूलस्य उपरिष्ठा पोलिका = सुळावरची पोळी

शूल म्हणजे मांसादि भाजावयाचा लालभडक लोखंडी खिळा. त्यावरची पोळी काढावयाची म्हणजे हात व तोंड भाजावयाचें. वध करण्याचा सूळ निराळा.

## सैपाक

हा शब्द स्वयंपाक या शब्दापासून अडाणी लोक व्युत्पादितात, परंतु ती व्युत्पत्ति अशास्त्र आहे. खरा संस्कृत शब्द सूदपाक असा आहे. सूद म्हणजे शिजवणें व पाक म्हणजे हि शिजवणें. सूदपाक हा जोड शब्द आहे. जोडींतील दोन्ही अवयवांचा अर्थ एक च. सूद याचा अर्थ मसाला असा हि होतो. पण मसाला ज्यांत नाहीं अशा भाकरीच्या भाजण्याला हि सैपाक च म्हणतात, सबब मसाला हा अर्थ येथें अनिष्ट आहे.

सूदपाक = सूअपाक = सोपाक = सैपाक, सैंपाक

अनुनासिक वैकल्पिक

## सैपाकी, सैपाक्या

सूदपाकिन् = सोपाकी, सैपाकी, सैपाक्या

## सोजी

सूद्या = सोजी (एक प्रकारचा शिजविलेला भात)

सूद् शिजविणें

## सोंगळ

सुमंगल = सुवंगळ = सुओंगळ = सोंगळ

## हिसकणें

हिष्कनं (हिंसा) =हिसकणें, हिसका इ.

## हेटाळणें

हेडनं = हेटाळणें

यद्देवा देवहेडनं देवासश्चकृमा वयं।

(शुक्लयजुर्वेदसंहिता–अध्याय २०–कंडिका १४)

हेड् असा मूळ धातु. त्याला आळ प्रत्यय लागून मराठी हेटाळ. ड् = ट्

हेडनं म्हणजे अपराध

हेटाळणें म्हणजे अपराध करणें, उपमर्द करणें.

# सूची


अकिलखान व झेबुन्निसा १४५
अक्रूरानगरी २८१
अजगांवकर व नरहरी मारेश्वर ३५८
अटक १२५
अताउल्ला १७०
अनंत २८५
अथर्वण गंगाधर २९५
अनंत १९७
अनंतकवि १६१
अबदुलाखान ९९
अमृतराव ९३
अलमखान २७९
अलमगिरी महाल १७०
अल्लाउद्दीन शाह बाहमनी १२४
असदखान रूमी २५६
अहंमदशहाचे शिक्याची नक्षी २६१
आई आदिपुरुष ३३७
आजम १७०
आत्माराम ३३
आनंद ४८।२६४
आनंदराव काशी २१७
आनंदीबाई १२४
आपाजी बावा १२१
आबाजी कृष्ण शाळूकर २१८
आरवी-मुद्गल ५०
आरवी मुद्गलक्षेत्र वर्णन व माहात्म्य ५०
आराध्यासंबंधानें विशेष गोष्ट ३३९
आळंदीची पंचक्रोशी ३३५
इटल ऊर्फ ब्रमल १०२
इतिहाससमुच्चय ३४४
इत्सिंग १३४
इनाम कमिशन खात्यांतील गैर इनसाफ २३५
उदेपूरचा राणा राजसिंग १६७
उद्बोधनाथ १७४
उपाहाणी १८५
उमा पंडित ९९
उरण बहे १२२
एकनाथांचा वंशवृक्ष १५७-१५९
एकादासकृत भगवद्गीतेची आरती ११८
औदुंबर १२३
औरंगाबाद येथील मुकबेरा ७०
औरंगजेबाचा मृत्युकाल १९५
अंगापूर ४८
अंताजीपंत ९२
अंबरापूर १२३
कचेश्वर १२२
कविकलश ११२
कर्णहस्तकी ३६
कनकावति ५१
कमानी मशीद २५६
करणिक ८७

कविजंगाचा मृत्युंकाल २५६
कविजंगाची कबर २५६
कविजंगाची कैफियत २४१;२४६
कविजंगाची वंशावळ २४७
कविजंगाच्या कबरीवरील लेख २५६
कळसकर व पालकर ३२८
कांतानंद ३०७
( श्री ) कान्होबा-मढी २०५
कानड्यांचा पुण्यांतील वाडा १४१
कान्हो पाठकाचा गुरु ३३७
कारस्कर ३५१
काथळे-संग्रह १३८
काशिराजसुत गणेशदास ४७
कासिराम १७७
( श्री ) कासीराज ४८
किले अर्क १७०
कुदरे लायद होला १३७
कुमठे २१४
कुरुडगांव ३१९
कुंभारघाट ३०५
कृष्णदयार्णव १३२
कृष्णदास गोविंद २०१
कृष्णदास ताना २००।२०१
कृष्णराव खटावकर याची माहिती ३४९।३५०
कृष्णाजीपंत ९१
कृष्णाजी बावा १२२
कृष्णाजी भास्कर ९८
कृष्णाप्पा अथवा श्रीकृष्ण ३३
कृष्णाप्पा स्वामी १२१
कृष्णाप्पा स्वामी उरणबहेकर १२०
कृष्णाप्पा न्हावी रामदासी १२०
केदारलिंगाचें अष्टक ११३
केशवस्वामी ३३२
केसरीनाथ शिष्य महिपती २८९
कोठीमाप ११२
कोपरगांव १२२
कोपरडें १३२
कोंडाण्याचा वेढा १९४
कौपर व इनामकमिशन २३४
खराडी २४९
खवासपुर १९४
खाजगीवाले-लिमये २३३
खाजे महंमद खां २४०
खाडे ८४
खुरशेटजी मोदी १४६
खेळण्याचा वेढा १९४
खोपेश्वर १८७
खंडेराव दाभाडे २१९
खंडेराव हरींचा मृत्युकाल ३६२
खंडेराव हरींची छत्री ३६०
खंडोबा गोसावी २३४
ख्वाजे शरीफ २४०
गणनाथ ८५
गणपति कार्तिकस्वामी भांडण ३५
गणपती स्वयंवर ३४
गणेश केशव कानडे १४१
गणेशदास काशिराजसुत ४७
गणेशदास ४८;२७५
गणेश योगी ४५
गर्गाचार्य २५९
गर्भगीता-टीका ३४१
गरुडाख्यान ३४१
गंगाधर त्रिमल १५४
गिरिधर २८०

गिरिधरकृत वाका ३३०
गुलाम मुस्ताफा १७०
( श्री ) गुंडमराउळ ७९
गोजरासाहेब २२६
गोपाळनाथ १६५; २१८
गोपाळपुर १४१
गोपाळबावा १२१
गोपाळ रघुनाथ ३४२
गोपाळराव पटवर्धन १००
गोपाळ स्वामि १२०; १२१
गोपीनाथ कवी २७०
गोविंद १७३
गोविंदतनयगिरि २५९
गोविंद भगवंत पिंगळे १४२
गोविंदराज १३३
गोविंदराव काळ्यांची दिनचर्या ६१
गोविंदसुतनंदन २९४
गोविंद हरी पटवर्धन १००
गोवे नगर ८४
ग्रंथांची एक जुनी याद ३४३–३४९
ग्वाल्हेरचे ढोलीबुवा ३५९
धृष्णेश्वर १५४
चक्रधर ५६
चक्रधराची दिनचर्या ६१
चक्रधराची प्रसादसेवा ७४
चन्नागिरी १३७
चतुरसिंग राजे २२६
चांगदेवो राऊळ ७९
चांदसर महाल ३२०
चित्रदुर्ग १३७
चिंतामण १९५
चिमणाजी दामोदरांची वंशावळ ३१८।३२२।३३८
चिमाजी महाराज १०६
चिमाजी अप्पा ऊर्फ अंताजीपंत ९३
चेन बसवेश्वर ३६
चंदन व वंदन १९४
चंद्रसेन जाधव २१९
चंद्रावळी आख्यान ३४२
छय्याबोवा १५७
जनार्दनसुत २९३
जयरामदासी ३३७
जयरामस्वामी वडगांवकर ३३।३६।३७ १२०।१२१।१९३
जयसिंग जाधव राऊ ३१६
जव्हार-शक १८८
जहानरहाचा बाग १४५
जापी ३२५
जॉर्ज टॉमस ऊर्फ जहाज फिरंगी ३६१
जानकीबाई पालखीवाले १५७
जानोपंत ९२
जानो विश्वनाथ भट ८६
जिजिया पट्टी १६६।१६९
जीवन १७५
जुनीमराठी गीतें १०४
जुन्या ज्ञानेश्वरी संहितेची माहिती ३३६
जुन्या ज्ञानेश्वरीसंहितेचें संशोधन ३३२
जेधे यांची शकावली ३६१
जंगमांचें मत ३७
झणझण्याचें सासवड १९८
झिनतु निसा ऊर्फ पादशाही बेगम १४५
झिनत–अल–मसजित १४५
झेब व झिनत १४५
झेबुन्निसाची कैद १४४
झेबुन्निसाचा जन्मकाल व स्थल १४४

झेबुन्निसाचा मृत्युकाळ १४५
टाड १६७
डभोई ( De Boigue ) ३६१
डुबेरकर बर्वे ८६
डोंबेग्राम ६३
तकरीबखान २९९
तळें ९६
तळेगांव ढमढेरे २२१
ताराबाई १०७
तांदुळवाडी १६५
तिंम ८३
तीन भिंतींचा वाडा १२२
तुका विप्र ४३
तुकेशसुत चैतन्यनाथ ४१
तुरकपूर २४८
तुरकाबाद २४९
तुळशीबाग २३३, २३४
तोरण्याचा वेढा १९५
त्रिपुटीचे गोपाळनाथ २१८
त्रिंबकपंत ९२
त्रीवनंदी चंद्राधर ९९
त्र्यंबक ऊर्फ भोळाराम ११६
दक्षिणी वैश्यांचीं गोत्रें व प्रवर १९०-१९३
दत्तकवी २६१
दत्तभाऊचा मठ ३६०
दयाळनाथ २१८
दाजीराव देशपांडे कोळेवाडीकर २६९
दादाजी कोंडदेवाची वंशावळ
३००–३०१
दाभाड्यांची नगरवर स्वारी २१९
दावर मोदींचें घराणें १४६
दास धोंडा ३३०
दासबाळा २६३
दिगंबर २८०
दिलरस बानू १४४।१७०
दिवाकर भट्ट २६४
दीनकवी २७८
देवदास १२७।२९२
देवपूर १९५
देवस्की १७२
दंडा राजपुरी ८६
धनगराची ओंवी १०२
ध्यानभारती गोसावी १३८
नगर किल्ल्याचा स्थापनाकाल ३५४
नगर किल्ल्याचे बुरुजांचीं नांवें ३५५
नगरचा किल्ला पेशव्यांनीं घेतला त्याची
मित्ती २४०
नगरचे किल्लेदार ३५६।३५७।३५८
नगरचे स्वारीचा काल २१९
नगर शहर स्थापनाकाल ३५४
नरसाबा गोसावी १७८
नरहरी ऊर्फ बच्या १८८
नरहरी मोरेश्वर १८६।३५८
नरहरी मोरेश्वर व रा. पटवर्धन १८६
नरहरसिंगजी राजे पालकर ३२८
नागम्मा ६६।६७
नागेश ३३७
नागेशात्मज विठल २९३
नाथशिष्य रत्नाकर ५१
नाथोबा ६९
नामा पाठक १७१
नारवेनगर ८४

नारायण त्रिमल १५४
नारायण बोवा वडगांवकर १२३
नारायणस्वामी २६९
नारो आप्पाजी खिरे २३३
नारोपंत ९२
नारो महादेव ९१
नारो महादेवाचा वंश ९६
नारो शंकर प्रतिनिधी ३१८
नांदगीर १९४
निर्मळ पाठक १७१
निरंजनपरंपरा ३५
निंबराजबाबा देठणकर ३३३
नीळकंठ ३७
नृसिंह ३३
नृसिंहाचार्य पुराणिक १२४
नृसिंहसरस्वतींचा काल १२३
नेताजी राजे पालकर ३२८
नेमीशहा १८८
नेवासे ७२
रा. पटवर्धन व बाळाजी विश्वनाथांचे बंधू ९४
परमानंद ४६।४८
परमानंद चैतन्य ४३
परळीचा वेढा १९४
पवारांचें मलठण ३००
पन्हाळ्याचा वेढा १९४
प्रश्नसार १२६
प्रसादसेवावर्णन ७४
पंडित २९६
पंचतंत्र ऊर्फ पंचोपाख्यान १७१
पालगड २२६
पांडुरंग २५९
पांडे पेडगांव २२४
पिंपरी येथील मोकाशी २२४
पिंपळगांव २२२
पुरवणीकार भास्कर ३३५
पेशव्यांचें पंचांग ३५२
पेशव्यांच्या देवता ९०
पेशव्यांची वंशावळ ९१
प्रेमदास ३४०
पैठण येथील भोसल्यांचे कुलोपाध्याय १३८
पैठणकर नाथसंहिता ३३२
बखतराम २३४
बसवापट्टण १३६।१३७
बहादुरगड २२३
बहादूरपूर १९४
बहिणाबाईची गुरुपरंपरा २७१
ब्रम्हपुरी ऊर्फ इस्लामपुरी १९४
ब्रम्हानंदाचा समाधिकाल ३०८
ब्रम्हवाकडी १४१
बाजीराव ऊर्फ विसाजीपंत ९२
बाणेरें १५४
बालखंडी भारथी १३८
बालाघाट १८७
बावाजीपंत ९२
बाळकृष्णबावा १२१
बाळकृष्णमहाराज ४०
बाळाजीपंत ९२
बाळाजी विश्वनाथ सरसुभेदार ३०२
बाळाजी विश्वनाथ देसाई ८९
बीड १८७
बीडकर भीमस्वामींचा काल ३५९
बुवासाहेब महाराज २२६
बेगमपूर १४६

बेदिकिरे अगर चेदकिरे १३६
बोपदेव १३३
भगवंतशिष्य शिवदास २८६
भगवंतराव यादव मुनशी १४६
मटांची देशमुखी ८६
भटोबा ५६।६३
भाग्यमगर ४०
भानुदास १५७
भारद्वाजाची ज्ञानेश्वरीची प्रत ३३३
भालगांव मठ १९५
भास्कर ४८
भिका भिक्षुमुनि २८७
भिलवडा १४१
भोसरे २२६
भोसल्यांच्या वस्तीचीं गांवें १३८
श्रीमदन गोपाळ १७७
मध्वनाथ ३९।२७५
मध्वाचार्यकाल १६१
मराठ्यांच्या इतिहासांतील कांहीं मिथ्या १९३–१९५
मरूड–नादगांव ९०
मलिकंबराचें मृत्युस्थान १२३
महकूबसिंग २१९
महात्मापंथ ३२९
महादाजीपंत उर्फ बावाजीपंत ९१
महाबळभटकथन २००
महालिंगदास १७१
माहादेवस्वामी १२१
महीपती उज्जनीकर ३६०
महंमद अदल वलद सेख मैराज महंमद २२४
माणिकप्रभु २८२
माधवनंदन २६६
मातुःश्री येसूबाई २९८
माधवराव ९३
मानभावी अक्षरसंकेत ५५
मानभावींग्रंथ ५३
मानभावपंथ ३२९
मानभावपंथासंबंधीं म्हणी ३२९
मानभावपंथीयाचें सोंग ३३१
मारकीचे रंगनाथ २१८
मासिर–इ–आलमगिरी ३००
म्हापसे ८४
मलिक हसन २२४
मुकरबखान केल्याची तारीख ३०
मुकरबखान केल्याची तारीख ३००
मुज्दे अहमदनगर ३९४
मुद्गलाख्यान ५०
मुनेश्वरस्वामी १२१
मुस्ताइदखान ३००
मुर्शदपूर ऊर्फ शितापखेडें १२२
मोघे यांची कैफियत ३१९।३२०।३२१
मोरेश्वरसुत काशी २८०
यशवंतराव गुजर २२६
यशवंतसिंग १६६
यरगटनहळी १३६।१३७
रघुनाथपंत ९२
रघुनाथ त्रिमल १५६
रघुनाथराव गुजर २२६
रघुनाथराव दादा यांची दहनभूमी १२३
रघुनाथराव दादा यांचे समाधिस्थान १२२
रणदुल्लाखान १००
रत्नकला चरित्र २६४

रत्नाकर ११६
रवळनाथ ११५
रंगोनाथ विश्वनाथ ११५
राघो बल्लाळ गोडबोले २१७
राजगडाचा वेढा १९५
राजमाचीकर ८९
रा. राजवाडे व मुकुंदराजीसंहिता ३३२
राजव्यवहार कोशाचा कर्ता रघुनाथ नारायण १५४
राजाराम कवी २८१
राजेगांव-मलठण ३००
राणे भोंसले २१४
रामकृष्ण ऊर्फ नारायणबावा १२२
रामगीता ( वामनी ) ४९
रामचंद्र गणेश कानडे १४१
रामजोशीकृत सुभद्रेचा पवाडा २६७
रामराव ९२
रामराव नारायण देशमूख ८९
रामा जनार्दन २६३
रामानंद शिष्य रत्नाकर ५१
रामु २५८
रायगडचा पाडाव १९४
राळेज १४६
रुद्रिपूर ७९
रुद्रमुनी ३१६
रुद्राजीपंत ९२
रेणुकानंदन २८३
रेवणासिद्ध २८२
रेवदंड्याची देशमुखी व ढब्बू ९६
रोजा १२३
रंगनाथ ( रामराय ) ४०
लयानंद ४८
लवणाक्ष पुराण ५७
ललितसंग्रह ३३१
लारी ८८
लीळासमुद्र ५६
लीळासंवादांतील संकेत २०२
लोलिंबराजकाल २६५
वदग्राम येथील समाधी १२१
वडगांवमठाची माहिती ११८; १७८
वडवाळसिद्ध ३४२
वडूथ येथील शंकुतेश्वर ३५२
वर्धनगडचा पाडाव १९४
वसंतगडचा पाडाव १९४
वाकिनखेड्याचा वेढा १९५
वाकोजी ढमढेरे २२१
वाक्यपदीयग्रंथ १३४
वामन २९५
वामनाजी खंडेराव ३६२
वारी १२२
व्याडिकृत संग्रह १३४
विटाळशीचा वाडा १२३
विठोबा गोसावी ३१५
विठोबा स्वामी १२१
विठ्ठलपंत ९२
विष्णु काशीनाथ ४५
विष्णुदास नामा २०४।३४०
विश्वनाथभट वलद बहिरंभट मेहेंदळे ८
विश्वासराव ९३
विसाजी सिवजी ९२
वीट परगणा १८७
वीसदेओ १८४
वेरे ८४
वैय्याकरण भर्तृहरी १३४
शककर्ता शिवाजी १७०
शकुनवंती संस्कृत १२७

शकुंतेश्वराची स्थापना ३५३
शामदास ३४१
शामसुंदर २६४
शामाराध्य ३३९
शाहाजी महाराजांची निधनतिथी १३५
शाहाजी महाराजांचें बृंदावन १३५
शाहाजी महाराजांच्या बृंदावनाचें वर्णन १३७
शाहाजी राजे १००
शिवदिन केसरी १९५
शिवदिन नाथांचा वंशवेल १६०
शिवाजीची हकीकती बखर ९७
शिवानंददास १३१
शीघ्रानुभव ४०
शेख निजाम २९९
शंकरदास ३४;३५
शंकराचार्य ४८
शंकराजी केशव ९१
शांतलिंग ३३;३६
शांतलिंग लिंगाईतधर्मी ३६
शांतिरस नाटक १७७
श्रीधरकृत उदाहरण २७१
श्रीधरसुत दत्तात्रय ३०५;३०६
श्रीधरस्वामी कुटुंबी ३०७
श्रीधरस्वामींचा समाधिकाल ३०५
श्रीधरस्वामीकृत संतमाळा ३०८
श्रीधर संप्रदायपरंपरा ३०८
श्रीधराचा काल व रा. वैद्य ३०५
श्रीधराच्या बायकोचें नांव ३०७
श्रीवर्धन ९०
श्रीसाखी ३०३
सखाराम ४६
सखाराम महाराज ४०
सलाबतपूर २१८
सवंदगांव १४१
सहज ४८
सहजानंद ३५
स्वरूपविवरण ४१
स्वरूपानंद ३४१
सातवणे खुर्द १४१
सातारचा वेढा ११४
सातारचे गुजर २२६
सातारा येथील चिमणपुरा ३१८
सावाजीबावा १२०;१२१
सामराज व वृत्तांत ५०
सायंदेववंशज साकरे २७५
स्थानेश्वर १६१
स्वानुभवामृत ४०
सिद्धपालकेसरी २५९
सिवजी दामोदर ३२२
सिवाजी महादेव ९१
सुलतानजी निंबाळकर २१९
सोनाड १०७
सोमाजी सकलकळ्या ५६९
सोमा मालदारा १०२
सोलापूरचे किल्लेदार २२८-२३२
संताजी घोरपडे जफतनमुलुक ३१४
संतुबाई २८४
संभाजीची मृत्युतीथ ११४
संभाजी बिन कावजी ९८
संभाजी राजाचे पंडितराय १११
संभाजी व खेबुन्निसा १४३
हणमंत्यांची वंशावळ १५५

हरभट बावा पटवर्धन यांची समाधी ३०२
हरभट बावांची पुण्यतीथ ३०२
हरिपंत पुरंधरे व होळकरदंगा २३४
हरिहर २९६;२९७
हरीहरेश्वर ९०
हस्तामलक ४८
हृदयनिवास ३४
हाफिजा मरियम १४४
हिरोजी फरजंद सोनमले ९९
हिंगणी १२२
हिंदुराऊ घोरपडे १७९
हुसेन अलीखान २१९
मि. हेग १२३
हेमाडपंत श्रीकरणार्धीप ९५
हैबतराव बावा ३३३
हैबतराव पवार ५३
होदिगिरे १३७
होललकिरे १३७
ज्ञानदेवाचा लखोटा २९०

खजिनदार—(१३) श्रीमंत विनायक नीळकंठ नातू—इनामदार, पुणें

यंदाचे सालाकरितां हिशेब तपासनीस

(१) डॉ० कृष्णाजी केशव जोशी एम्. ए. पी. एच्. डी. लाइफ-मेंबर, डेक्कनएज्युकेशन सोसायटी—पुणें

(२) रा. रा. गणेश सदाशिव मराठे एम्. ए. आय्. ए. ए. ॲक्चुअरी—शनवार पेठ-पुणें

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

## नियम व पोटनियम

(१) मंडळाच्या सभासदांचे वर्गः—

प्रतिवर्षी मंडळास ३०० रु. अगर अधिक वर्गणी देणारा आश्रयदाता सभासद होय.

सालिना १२५ रु. अगर अधिक वर्गणी मंडळास देणारा हितकर्ता सभासद होय.

सालिना २५ रु. देणारास सभासद वर्ग १ म्हणावें.

सालिना १२ रु. देणारास सभासद वर्ग २ म्हणावें.

सालिना ६ रु. देणारास सभासद वर्ग ३ म्हणावें.

सालिना ३ रु. देणारास सभासद वर्ग ४ म्हणावें.

(२) मंडळाच्या कायम झालेल्या कोणत्या हि दोन सभासदांकडून सूचना व अनुमोदन मिळाल्याशिवाय व सदर सूचना मंडळाच्या सभेपुढें येऊन मंजूर झाल्याशिवाय कोणी हि मंडळाचा सभासद होऊं शकणार नाहीं.

(३) कार्यकारी मंडळीचे ठरावानुरूप मंडळाच्या वार्षिक इतिवृत्ताची अगर संमेलनवृत्ताची एक प्रत प्रत्येक सभासदास मोफत मिळेल.

रु. १२ किंवा त्याहून अधिक वर्गणी दरसाल देणाऱ्या सभासदास मंडळातर्फे प्रसिद्ध झालेले कोणते हि पुस्तकाची एक प्रत फुकट मिळेल.

दरसाल ६ रु. व ३ रु. वर्गणी देणारे मंडळाचे सभासदास मोफत मिळणारे ग्रंथाखेरीज त्या सालीं मंडळातर्फे प्रसिद्ध होणारा इतर कोणता हि ग्रंथ अनुक्रमें निम्या व पाउणपट किंमतीस मिळेल.

सभासदांना वरील नियमांप्रमाणें मिळावयाचे ग्रंथ ते ज्या सालीं सभासद मंजर झाले असतील त्या सालापासून च मिळावयाचे.

(४) मंडळाचें वर्ष संपण्यापूर्वी सर्व वर्गण्या रीतसर दिल्या पाहिजेत.

(५) मंडळाचें वर्ष चैत्र शु० १ प्रतिपदेस सुरू होऊन फाल्गुन अमावास्येस

(६) ज्यांच्या वर्गण्या बाकी आहेत अशा सभासदांस मत देण्याचा

ळाचीं पुस्तकें हि मोफत अगर सवलतीनें मागण्याचा

# मंडळामार्फत प्रसिद्ध झालेले ग्रंथ

१ अहवाल शके १८३२ ... ... ... ... किंमत रु. ३
२ अहवाल शके १८३३ ... .. ... ... किंमत रु. ५
३ अहवाल शके १८३४ ... ... ... ... किंमत रु. ५
४ वार्षिक इतिवृत्त शके १८३५ ... ... ... किंमत रु. ६
५ वार्षिक इतिवृत्त शके १८३६ ... ... ... किंमत रु. ३
६ प्रथम-संमेलन-वृत्त ... ... ... ... किंमत रु. ०१२
७ द्वितीय-संमेलन-वृत्त शके १८३६ ... ... किंमत रु. ३
८ तृतीय-संमेलन-वृत्त शके १८३७ ... ...
९ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १२ वा किंमत रु. १०८
१० ,, ,, खंड २० वा किंमत रु. ३
११ सुवंत-विचार ( रा. वि. का. राजवाडे ) ... किंमत रु. २

## महाराष्ट्रीय-सारस्वत-ग्रंथमाला

१२ मुकुंदमहाभाष्य ( वेदांत ) ... ... ... किंमत रु. ०८
१३ मोरोपंतकृत ग्रंथराज ( ,, ) ... ... ... किंमत रु. ०८
१४ स्फुट प्रकरणें, भाग १ ला ... ... ... किंमत रु. ०१२
१५ ,, ,, भाग २ रा ... ... ... किंमत रु. ०१२

## छापत आहेत

१६ मराठ्यांच्या इ. सा. खंडांची बृहत् सूची ...
१७ म. इ. सा. खंड २१ वा ( शिवकालीन पत्रें )
१८ चतुर्थ संमेलन-वृत्त ... ... ... ...
१९ वार्षिक इतिवृत्त शके १८३८ ... ... ...

हें पुस्तक पुणें येथें रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं
आर्यभूषण छापखान्यांत छापिलें व रा. खंडेराव
चिंतामण मेहेंदळे यांनीं पुणें येथें
प्रसिद्ध केलें.

# अनुक्रमणिका.


| विषय | लेखक-वक्ता | पृष्ठ. |
|---|---|---|
| ारतीय आर्यवंश ... ... | रा. राजवाडे | १ |
| हाराष्ट्रांतील गेल्या हजार वर्षांतील वेचारप्रदर्शनाचें साधन ... ... | " | २३ |
| ोडण ... ... ... | " | ३२ |
| ्रेहाळी येथील श्रीरामदासी विद्यापीठ | रा. देव | ३४ |
| ाडी लिपीची उपपत्ति ... ... | रा. चांदोरकर | ४९ |
| संमेलन-वृत्त | | |
| ेलनाची कल्पना ... ... | | ६३ |
| मेलनाचें निमंत्रण ... ... | | ६४ |
| . साने यांचें भाषण ... ... | | ६७ |
| शोधनाचा ठराव ... ... | रा. देव | ६९ |
| " ... ... | रा. राजवाडे | ७० |
| शिवकालीन पत्रव्यवहाराच्या व्यव-थेचा ठराव ... ... ... | रा. राजवाडे | ७१ |
| रा. खरे यांस पत्र ... | | ७२ |
| " ... ... | रा. आचार्य | ७३ |
| " ... ... | रा. केळकर | ७३ |
| रा. खरे यांचीं उत्तरें ... | | ७५ |
| भारत-इतिहास-अर्थशास्त्र-समाजशास्त्र वगैरेच्या अध्ययन-अध्यापनाचा ठराव | रा. राजवाडे | ७५ |
| ... ... | प्रो. लिमये | ७६ |
| ... ... | रा. मेहेंदळे | ७७ |

# अनुक्रमणिका.


| विषय | | लेखक–वक्ता |
|---|---|---|
| ११ महाराष्ट्र-कवि | ... ... ... | रा. देव |
| ,, | ... ... ... | रा. भावे |
| ,, | ... ... ... | रा. आपटे |
| ,, | ... ... ... | रा. राजवाडे |
| ,, | ... ... ... | रा. देव |
| ,, | ... ... ... | रा. भावे |
| १२ रुद्रदासाचा ताम्रपट | ... ... | रा. चांदोरक |

# भारतीय आर्यवंश

## गोत्रें ब्राह्मणादींचीं

१ अपत्यं पौत्रप्रभृति गोत्रं (४-१-१६२) असें गोत्राचें लक्षण पाणिनीनें केलें आहे. सूत्रांतील प्रवराध्यायप्रसिद्ध जीं गोत्रें व प्रवराध्यायाप्रसिद्ध जीं गोत्रें त्या दोन्हींचा अंतर्भाव ह्या पाणिनिप्रोक्त गोत्रशब्दांत होतो असें म्हणतात. नातू आदिकरून जें अपत्य तें गोत्र होय. पुत्रादि जें अनंतरापत्य तें पाणिनीयमतें गोत्र नव्हे. उदाहरणार्थ कुंज हें ऋषिनाम घेतलें, तर अनन्तरापत्यार्थी कौंजि असा तद्धितशब्द साधतो; परंतु पौत्रादि गोत्रार्थक कौंजायन असा तद्धितशब्द होतो. कौंजि हा पुत्र व कौंजायन हे नातवापासून पुढले सर्व वंश्य. एको गोत्रे (४-१-९३) गोत्र विवक्षित असतां अपत्यप्रत्यय एक च होतो. मग शंभर पिढ्या कां होत ना. नाहीं तर फक् व इञ् ह्या प्रत्ययांची परंपरा सुरू होऊन ९९ प्रत्यय होऊं लागतील व अव्यवस्थाप्रसंग गुदरेल, म्हणजे कुंज हें ऋषिनाम घेतलें तर नातवापासून पुढें शंभर दोनशें पिढ्यांपर्यंत जेवढें म्हणून अपत्य होईल तेवढें सर्व गोत्रार्थी कौंजायन-संज्ञक होईल, अशी व्यवस्था पाणिनिकालीं असे. पुत्रार्थक रूपें निराळीं व गोत्रार्थकरूपें निराळीं. आश्वलायन, बौधायन वगैरे जे सूत्रकार झाले त्यांनीं गोत्राचें लक्षण असें केलें आहे:—

विश्वामित्रो जमदग्निर्भरद्वाजोऽथ गोतमः अत्रिर्वसिष्ठः कश्यप इत्येते सप्त ऋषयः। सप्तानामृषीणां अगस्त्याष्टमानां यदपत्यं तद्गोत्रमित्याचक्षते। इति बौधायनः। म्हणजे अगस्त्यासह आठ ऋषींचें जें अपत्य तें गोत्र होय असें बौधायन म्हणतो. बौधायन ऋषींच्या पुत्रादि सर्व अपत्याला गोत्र ही संज्ञा लावतो; स्वतः ऋषींना गोत्र ही संज्ञा लावीत नाहीं, किंवा पुत्राला वगळून नातवापासून च तेवढें गोत्र सुरू होतें असें म्हणत नाहीं. हा शेवटला प्रपंच पाणिनि करतो. पाणिनि सप्तर्षींचें अपत्य कीं कोणाचें अपत्य याचा निर्बंध करीत नाहीं. बौधायन सप्तर्षींचें अपत्य म्हणून निर्बंध करतो. बौधायनादींचें हें लक्षण केवळ सामान्य असून सैल आहे. उदाहरणार्थ,

खुद्द बौधायन ह्या शब्द गोत्रार्थक आहे. मूळपुरुष बुध-त्याचें अनन्तरापत्य बौधिः व गोत्रापत्यें म्हणजे पौत्रादि अपत्य बौधायन. अशी बोलण्याची रीति बौधायनाच्या वेळीं होती; परंतु, शास्त्रीय लक्षण करतांना ती रीति लक्षांत न घेऊन, आठ ऋषींचें जें अपत्य तें गोत्रसंज्ञक होय असें सैल, अव्याप्त व अतिव्याप्त लक्षण बौधायनानें केलें आहे.

२ मूळ आठ ऋषि. अर्थात् ह्या मूळ ऋषींना गोत्रनामें नव्हतीं. ह्यांना पुढें प्रजा झाली. ह्या प्रजेला हि प्रप्रजा झाली व वंशविस्तार होऊन, वंशांत कित्येक प्रख्यात पुरुष उदयास आले. त्यांचें नातू वगैरे त्या त्या प्रख्यात पुरुषाचें नांव आपल्या व्यक्तिनामापुढें लावूं लागले. त्यामुळें असंख्य गोत्रें उत्पन्न झालीं. गोत्रें यद्यपि असंख्य झालीं, तत्रापि कोणत्या गोत्राचे कोण कोण पूर्वज यांची ओळख त्या त्या गोत्राला होती. ह्याचें कारण असें कीं, नित्यनैमित्तिक कर्मांत यजमानाला आर्षांचें प्रवरण अग्नीला उद्देशून करावें लागे. आर्ष म्हणजे अष्ट ऋषींचें अपत्य. त्या अपत्यांचें जें क्रमानें नामसंकीर्तन त्यांचें नांव प्रवरण. अमुतोऽर्वाञ्चो होता। अमुतो मूलभूतादृषेरारभ्यार्वाञ्चोऽर्वाग्जातान्मंत्रदृशः क्रमेण तदपत्यसंबंधेन प्रार्थयते तमग्निम् । मूळ ऋषींपासून पुढें झालेले जे मंत्रद्रष्टे त्यांचें अग्नीकरितां जें नामसंकीर्तन तें प्रवरण. हें प्रवरण अग्निसंबंधानें करावें लागल्यामुळें व अग्नीचें आराधन हें भारतीय आर्यांचें मुख्य कर्म पडल्यामुळें आर्ष प्रवरांची ओळख भारतीय आर्यांना रोज होत असे व आहे. गोत्रें जेव्हां असंख्य झालीं तेव्हां कोणाचे कोण हें ओळखण्याकरितां प्रवरांची मोजणी करावी लागली. ती सुमारें ४९ भरली. द्व्यामुष्यायण घेतले तर दोन चार प्रवर अधिक होतील. कित्येक दहा पांच प्रवर अधिक हि मानीत; परंतु, बौधायनकालीं ४९ प्रवर मानण्याची चाल पडली. तात्पर्य, असंख्य गोत्रें, ४९ प्रवर व ८ ऋषी अशी परंपरा उत्पन्न झाली.

३ गोत्रांचें हें वर्गीकरण दुसऱ्या एका प्रयोजनास्तव हि करणें प्राप्त होतें. भारतीय आर्यांत बहिणभावांचे विवाह इष्ट नाहींत; दैत्यासुरांत आहेत. एका च ऋषीपासून, एकाच पूर्वजापासून जीं स्त्रीपुरुषें निपजलीं त्यांचे शरीरसंबंध अशास्त्र समजण्याची चाल भारतीय आर्यांत फार पुरातनकालापासूनची आहे. गोत्रें जेव्हां असंख्य झालीं, तेव्हां कोण कुल कोणत्या दुसऱ्या कुलांचें सगोत्र आहे व सार्ष ऊर्फ सप्रवर आहे, हें निश्चित मापन करणें जरूर पडलें. कारण समानगोत्र व समानार्ष कुळांत शरीरसंबंध झाला असतां तो व्यभिचार होतो, अशी दृढ समजूत व शास्त्र असे. शास्त्रें व पुस्तकें व ग्रंथ झाल्यावर, हा प्रघात दृढ झाला असें मात्र बिलकुल समजूं नये. प्रघात शास्त्रांच्या व ग्रंथांच्या फार पूर्वीपासूनचा आहे. प्रत्येक ब्राह्मणाला अग्नीचें उपासन करावें लागे. तेव्हां प्रवरांचें संख्यापन आपोआप च होई. समजा

कीं कोणी ब्राह्मण जामदग्न्य-वत्स-गोत्री आहे. तर त्याचे पंचार्षेय भार्गव, च्यावन, आप्नवान, और्व व जामदग्न्य हे होत; व तो जमदग्नीप्रमाणें, उर्वाप्रमाणें, अप्नवाना-प्रमाणें, च्यवनाप्रमाणें, व भृगूप्रमाणें अग्नीची प्रार्थना म्हणजे वरण करी. जामदग्न्या वत्सास्तेषां पंचार्षेयो भार्गवच्यावनाप्नवानौर्वजामदग्न्येति जमदग्निवदुर्ववदप्नवान-वच्यवनवद्भृगुवदिति बौधायनः । यजमानादूर्ध्वान् मंत्रदृग्भिरव्यवहितानां मूलभूतान् दृष्टक्रमेण संकीर्त्य तद्वत्तद्वादिति सादृश्यसंबंधेन अग्निं वृणीते प्रार्थयत इत्यर्थः ।-गोपीनाथदीक्षीत ओक. होता अनुलोम संकीर्तन करी व अध्वर्यु प्रतिलोम संकीर्तन करी. तेव्हां अर्थात् च मूळ गोत्रप्रवर्तक व प्रवरप्रवर्तक यांचें संकीर्तन नित्य होई. अर्थात् आपले आर्ष कोण हें प्रत्येक ब्राह्मणाला माहीत असे. ह्या गोत्रोच्चरणाचा व प्रवरसंकीर्तनाचा प्रघात आज हजारो वर्षें ह्या भरतखंडांत अव्याहत चालला आहे. एका कुळाचे गोत्रप्रवर दुसऱ्या कुळानें घेऊं नये असा निर्बंध होता व आहे. यो वा अन्यः सन् अन्यस्य आर्षेयं वृणीते स वा अस्य तदृषिः इष्टं वीतं वृंक्ते । अशी स्थिति व निर्बंध असल्यामुळें एक ब्राह्मण दुसऱ्या ब्राह्मणाचे प्रवर घेत नसे. मग अनार्य ते घेतील व आपल्याला ब्राह्मण म्हणवितील ही शंका हि यावयास नको हें गोत्रप्रवरसंकीर्तन नित्य होई त्यामुळें त्यांचें सरसहा विस्मरण होणें कालत्रयीं हि संभाव्य नसे, मग शक्य कोठून होणार ?

४ कोणत्या हि गोत्राचा ब्राह्मण वेदाची कोणती हि शाखा स्वीकारी. प्रायः बापाची शाखा मुलगा स्वीकारी परंतु अन्य शाखा स्वीकारण्यास प्रत्यवाय नसे व नाहीं. एक काश्यप गोत्र आहे तर त्यांत आश्वलायन, आपस्तंब, हिरण्यकेशी, माध्यंदिन, काण्व, वगैरे सर्व शाखा आहेत. चरणाचा हि स्वीकार स्वेच्छेवर अवलंबून असे. चरण व शाखा ह्यांचें महत्व गोत्र व प्रवर यांच्या इतकें विवाहादिसंस्कारांत विशेष नाहीं. अर्थात् शरीरसंबंधीं किंवा अग्न्युपासनसंबंधीं कार्यांत शास्त्रकारांनीं चरण व शाखा ह्यांचा निर्देश बिलकुल केलेला नाहीं.

५ पाणिनि, बौधायन, आश्वलायन, आपस्तंब, शौनक, कात्यायन, पतंजलि, हीं गोत्रनामें आहेत, व्यक्तिनामें नाहींत. गार्ग्यनारायण, लौगाक्षिभास्कर, वगैरे जोड नांवांतील गार्ग्य व लौगाक्षि हे शब्द गोत्रवाचक आहेत. गोत्रवाचक आहेत म्हणजे आधुनिक परिभाषेंत बोलावयाचें झाल्यास आडनांवें ऊर्फ उपनामें आहेत. गार्ग्यश्चासौ नारायणः, लौगाक्षिश्चासौ भास्करः, नारायण कोण तर गार्ग्य; व भास्कर कोण तर लौगाक्षि. पांच सातशें वर्षांपूर्वी भारतांत आडनांवें नव्हतीं असें म्हणणाऱ्यांनीं हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं गोत्रें हीं आडनांवें म्हणून ज्यांना म्हणतात किंवा कुलनामें म्हणून ज्यांना म्हणतात तीं च होत. ताम्रशिलापटांत ब्राह्मणांचीं व्यक्तिनामें व गोत्रनामें दिलेलीं आढळतात. पैकीं गोत्रनामें जीं दिलीं

असतात तीं आडनांवें च होत. व्यक्तिनामें व आडनांवें सारखीं च असल्यास किंवा इतर कारणास्तव वैशिष्टीकरणार्थ ग्रामनामें हि व्यक्तिगोत्रनामांना जोडीत. कशी जोडीत तें पहावयाचें असल्यास ते ते ताम्रशिलापट्ट पहावेत. विस्तारभयास्तव व सहजोपलब्धिस्तव त्यांचें संकीर्तन करून व्यर्थ जागा आडवीत नाहीं.

६ बौधायनाच्या कालीं गोत्रसंख्या असंख्य झाली होती. तो म्हणतोः—

गोत्राणां तु सहस्राणि प्रयुतान्यर्बुदानि च ।
ऊनपंचाशदेवैषां प्रवरा ऋषिदर्शनात् ॥

गणसूत्रांत पाणिनि गोत्रनामें देतो तीं सुमारें तीन साडेतीन शें व्हावीं. बौधायनाच्या कालीं गोत्रें अर्बुद झालीं होतीं. अर्थात् पाणिनि व बौधायन ह्यांच्यांत अंतर कित्येक शेंकडों वर्षांचें असलें पाहिजे. सूत्रांतून जीं गोत्रनामें दिलेलीं आढळतात—बौधायन, कात्यायन, आश्वलायन इत्यादि—तीं फार तर शंभर दोनशें भरतील. परंतु, स्मृत्यनुसार जीं गोत्रनामें दिलेलीं आहेत त्यांची संख्या सुमारें ५००० पांच हजार भरते. निरनिराळे ग्रंथ पाहून मीं जीं गोत्रनामें जुळविलीं आहेत त्यांची एकंदर संख्या सुमारें ५००० भरते. पैकीं कांहीं नामें नीट कळलीं नाहींत. नक्कल करणाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळें व गाढ अज्ञानामुळें अनेकांचे उच्चार व अक्षरविन्यास अशुद्ध पडलेले आहेत. नाना ग्रंथांच्या तुलनेनें, श्रौतगृह्यसूत्रें, पाणिनि, पतंजलि, संहिता, ब्राह्मणें, आरण्यकें, पुराणें व इतर धर्मशास्त्रग्रंथ पाहून गोत्रांचे शुद्ध पाठ तयार केले पाहिजेत. ते पाठ तयार करून मग त्यांची तुलना देशस्थांच्या गोत्रांची नोंदी याद तयार करून तिच्याशीं केली पाहिजे. ताम्रशिलापट्टांतून कित्येक अशीं गोत्रनामें आढळतात कीं त्यांचा उल्लेख उपलब्ध गोत्रप्रवरांच्या यादींत सांपडत नाहीं. शिवाय भारतवर्षांत जेवढा म्हणून ब्राह्मण आहे त्या सर्वांचीं गोत्रें जुळविलीं पाहिजेत. म्हणजे जो मोठा गोत्रोदधि तयार होईल, त्यावरून ब्राह्मणवंशावर, वेदाच्या लुप्त शाखांवर व गोत्रप्रवरांवर मोठा जाज्वल्य प्रकाश पडेल. भारतीय वंशशास्त्राचा ह्या पद्धतीनें अभ्यास करणें फार उपयोगाचें असून अगत्याचें झालें आहे. ब्राह्मणांच्या वंशांत अनार्य लोकांचा भ्रष्ट समावेश पूर्वी कधींतरी, कसातरी, व कोठेंतरी झाला असावा, असा शुष्क व सांशयिक तर्क कित्येक उत्कट कापालिकांनीं केलेला आहे. परंतु, विवाहादि संस्कारांत गोत्रप्रवरादिवाचींनीं ब्राह्मणांनीं आपल्या कुलांना इतकें सूक्ष्म बांधून घेतलें आहे कीं ऐतिहासिक कालांत अनार्यांचा ब्राह्मणवंशांत समावेश होणें परम दुर्घट नव्हे तर बिलकुल संभाव्य व शक्य नाहीं. कापालिकांच्या उपरिष्ट विधानाचा ह्याहून स्पष्टतर निषेध करण्याची अवश्यकता नाहीं.

७ भारतवर्षांत इतरत्र गोत्रपरंपरा अद्यापपर्यंत किती राहिली आहे तें सूक्ष्मपणें सांगण्यास जशीं साधनें उपलब्ध व्हावीं तशीं झालेलीं नाहींत. तेव्हां महाराष्ट्रांतील गोत्रपरंपरा तेवढी येथें देतों, सुमारें चारशें गोत्रनामें प्राकृत भाषेंत अपभ्रष्ट झालेलीं मीं जुळविलेलीं आहेत तीं देतों. त्यावरून दिसेल कीं सध्यां देशस्थांत, कऱ्हाड्यांत व कोंकणस्थांत जीं कित्येक आडनांवें आहेत तीं पूर्वींचीं गोत्रनामें आहेत. तात्पर्य गोत्रनामें म्हणजे आडनांवें; दुसरें कांहीं नाहीं. संकृत गोत्रनामें व मराठी आडनांवें यांची यादी :—

१ पिंगला: = पिंगळे
२ व्याघ्रा: = वाघ
३ गार्ग्या: = गर्गे
४ भारजद्वाजा: = भारद्दे
५ बाभ्रव्या: = बरवे
६ चाहवि: = भावे
७ व्यासा: = व्यास
८ वैशंपायना: = वैशंपायन
९ भार्गवा: = भार्गे, भार्गव
१० वैद्या: = वैद्य
११ चारायण: = चारणे
१२ पर्वता: = पर्वते
१३ गांगा: = गांगल ( स्वार्थे ल )
१४ श्याफल्का: = साफळे, सापळे
१५ आत्रेया: = आत्रे, अत्रे
१६ कापिश्यायना: = कापशे
१७ कानीना: = काणे
१८ दात्तेया: = दाते, दत्ते
१९ मांडूकेया: = मंडके, मांडके
२० दोलेया: = डोळे
२१ कौशीतकेया: = कोशे
२२ मैत्रेया: = मैत्रे, मैत्र
२३ धौम्या: = धुम
२४ कौशिका: = कोशे
२५ शौनका: = सोने
२६ अवट्या: = अवटे, औटे
२७ गांड्या: = गांड्ये, गांडे
२८ मांड्या: = मांडे
२९ (गुहल) गौहल्या: = घोल्ये
३० सौन्य: = सोने
३१ कौत्सा: = कोशे
३२ गोकक्ष्या: = गोखले (स्वार्थे ल)
३३ मौद्गल्य: = मोगल
३४ मौसल्या: = मुसळे
३५ भैषज्या: = भिसे, भिशे
३६ पाराशर्या: = पराशरे, पराशर
३७ वैल्या: = बेले, बेल्हे
३८ पांचनदा: = पंचनदीकर
३९ भानोरपत्यं भानवा:=भानू (पतंजलि)
४० चैत्रा: = चित्रे
४१ औपगव: = ओगवे ( औपगवस्य अपत्यं )
४२ बालेया: = बाळ
४३ गौमेया: = गुमे
४४ काणिकेर: = काण्हेरे
४५ नाटेरा: = नाटेकर
४६ कामंडलेया: = कवंडळे
४७ श्यैत्रका: = सित्रे, सिंत्रे
४८ कालेया: = काळे
४९ पाण्डारा: = पांडरे, पांढरे

५० मौंडाराः = मुंडरे, मुंडले
५१ कौसल्यायनिः = कुसळे
५२ वार्ष्याः = वारशे
५३ लौहकारयः = लोहकरे, लोकरे
५४ आयस्कारयः = आसकार
५५ औशीनराः = उसणारे
५६ दैवदत्याः = देव ( एकशेष )
५७ तौल्वलयः = तुळपुळे
५८ दांडिनायनाः = दंडिकर (केर)
५९ आथर्वणिकाः = आथर्वण
६० कातरायणाः = कातरे
६१ कैंकरायणाः = किंकरे
६२ काल्यायनाः = काळे
६३ दौर्गायणाः = दुर्गे
६४ तार्णायनाः = तारणे
६५ हंसकायनाः = हंसे
६६ बादरायणाः = बदरे
६७ लांकायनाः = लंके
६८ आश्वलायनाः = आस्वल
६९ औदुंबरायणाः = उंबरे
७० शौणायनाः = सोनीये, सोणीये
७१ हार्यश्वाः = हार्शे, हर्षे
७२ शारद्वताः = सारवटे, सरवटे
७३ शौनकाः = सोगे, सोने
७४ आगस्त्याः = आगटे
७५ रैभ्याः = लेंभे, रेंभे
७६ बार्हिरिकाः = वहिरे, येहरे
७७ पैटाकाः = पिटके
७८ पैशाः = पिठे, पेठे
७९ कौटाः = कोटे, कुटे, कुंटे
८० खाडाः = खाडे
८१ पौरोहितिकाः = पुरोहित
८२ पौरेयाः = पोरे
८३ मौनाः = मोने
८४ कौठारः = कोठारे
८५ दाण्डाः = दांडे
८६ भौराः = बोरे, भोरे, भुरे
८७ प्रौष्टिकाः = पोटे
८८ मार्जिरकाः = माजरे, मांजरे
८९ रावणाः = रावण
९० जारत्काराः = जरकारे
९१ शौक्रेयाः = शुक्रे
९२ भाग्माः = भर्मे, बर्मे, ब्रह्मे
९३ कार्पूराः = कापरे
९४ आंबिकेयाः = आंबिके
९५ पारिधेयाः = पारधी
९६ साल्वेयाः = साळवे
९७ कौबेरिकेयाः = कुबेर
९८ तैकायनिः = तिके, तिखे, टिके, टिकेकर
९९ वाकिनिकेराः = वाकणकर
१०० ग्लुकुचायनिः = लुचके, गुचके
१०१ बाभ्रव्याः = बाबर
१०२ पैप्पलाः = पिंपळे
१०३ भार्गाः = बर्गे
१०४ वातण्ड्याः = बानाडे
१०५ पैलाः = बैल
१०६ माधव्याः = मध्वे
१०७ फाण्टाः = फाटक
१०८ कौरव्याः = कोरवे, कर्वे
१०९ ऐरक्याः = एडके
११० मौर्याः = मोरे
१११ शाठ्यायनिः = साठे
११२ वरेण्यायनिः = वर्णे
११३ सौदामेयाः = सुदामे

११४ चौलुक्याः = चोळके
११५ शालंकायनाः = साळुंके
११६ श्यापर्णाः = साबणे, सावणे
११७ गोपवनाः = गोफणे
११८ बाह्यस्काः = भाजके
११९ बालाकयः = बगळे
१२० वार्कलयः = बाकरे
१२१ सात्वकिः = सात्ये
१२२ युगंधराः = जोगधर
१२३ लांकायनाः = लंके
१२४ दण्डपायनाः = दुडपे
१२५ काव्याः = कवी
१२६ सौपिशाः = सोपटे
१२७ शालाक्याः = साळके
१२८ नानान्द्राः = णंदे, नंदे
१२९ दौहित्राः = धोत्रे
१३० कौंजायनाः = कुंजे
१३१ पैत्र्याः = पित्रे
१३२ मौलिकायनिः = भोले
१३३ मौंगिकायनिः = भुरे, भोर
१३४ ऐलविलाः = इडबिडे
१३५ वोष्याः = वोशे, ओशे
१३६ काप्याः = कापसे (प्य=पिय=पिज =पिस)
१३७ दार्भायणाः = दाभणे
१३८ रेभाः = लेंभे
१३९ शर्कराक्षाः = साखरे
१४० कण्वाः = कणव, काणव
१४१ औत्साः = अवस्ति
१४२ वृक्षाः = रुखे
१४३ मंडिलायनाः = भाडले
१४४ तृक्षाः = तिखे
१४५ खदिराः = खर, खर
१४६ आथियेयाः = थिटे
१४७ आकशायेयाः = आगाशे
१४८ श्वानेयाः = शाने
१४९ मौंजायनाः = मुंजे
१५० अग्निलोमन् = आगलावे, आगलावे
१५१ (पर्ण) वल्काः = वाकळे, वाकडे
१५२ तितिक्षाः = तिखे
१५३ तरुक्षाः = तुरुक, तोगे
१५४ गुह्लवः = घोले
१५५ ऐलाः = विळे
१५६ कर्मारकेराः = करमरकर
१५७ मुद्गलाः = मुद्गल, मोगल
१५८ जाडायनाः = जडे
१५९ खाडायनाः = खांडे
१६० ग्रैष्मायणाः = गिरमे
१६१ गैरायणाः = गिरणे
१६२ मोखाः = मोखे, मोघे
१६३ कुटः (कौटिः) चासौ भास्करः = कौटिभास्करः
कौटि गोत्रांतील भास्कर
कौटिभास्कराचे वंशज जे ते कौटि भास्कर
कौ = को (कोटिभास्कर)
१६४ (क्षीरह्रद=क्षीरसागर)=क्षीरसागर
१६५ वर्णकाः = बाण
१६६ श्यामगुः = सामग-क
१६७ गौतमाः = गौतम
१६८ क्रौष्टुकिः = कोल्हे
१६९ सात्वतपुत्राः = सातपुते
१७० वाटाः = वाड
१७१ जामदग्माः = जामडे
१७२ रहूगणाः = रोगणे

१७३ ऋक्षाः = रुषी
१७४ आंगिरसाः = आंगरे
१७५ गालवाः = गाडवे
१७६ आश्वलाः = आचवळ
१७७ सार्ष्टिः = साठे
१७८ सार्ष्टेयाः = साठये
१७९ भागवित्तिः = भागवत
१८० सावर्णिः = सावर्णे
१८१ श्रोत्रियाः = श्रोत्री
१८२ सांकराः = साकरे
१८३ शार्कराः = साकरे
१८४ सौमिनिः = सोमण
१८५ पोरिः = पोरे
१८६ बाष्कलिः = बखले
१८७ कावल्याः = कावळे
१८८ मांडिः = मांडे
१८९ कावल्याः = कांबळे
१९० भरुंड = बरुड, बुरुड
१९१ स्वरुंड = सुरूड
१९२ मणसणाः = मसणे
१९३ शांबरायणाः = सांबारे
१९४ देवस्थानिः = देवस्थळी
१९५ औपगविः = ओगवे
१९६ छत्रिणः = छत्रे
१९७ कर्तृणः = कात्रे
१९८ पुत्रिणः = पुत्रे
१९९ कौरंजिः = करंजे
२०० तैलेयः = तेले
२०१ बैलेयः = बेले
२०२ सायणः = साने
२०३ मांगलः = मांगळे
२०४ उलूखलः = उखळे
२०५ अग्निपुत्रः = अग्निपुत्रे
२०६ नारायणाः = नराणे
२०७ गाधिनाः = गायधनि
२०८ हार्करिः = हारकारे
२०९ सैवकाः = सेवक, शेवक
२१० नंदिः = नंदे, नांदे
२११ हंसाः = हंस
२१२ अस्मरथाः = मरठे, मराठे
२१३ कापटुः = कपटे
२१४ पेटकाः = पिटके
२१५ स्वलोक्याः = सुलोखे, सुळाखे
२१६ लुलायाः = लुले
२१७ वागुरुः = वागुल
२१८ बाहुलिः = भोळे, भोले
२१९ मौंजिकाः = मुंजे
२२० पौलाः = पोळ
२२१ शैषयाः = शेषे
२२२ वैश्वामित्राः = विश्वामित्र
२२३ कौशिकाः = कौशिक
२२४ पैठीनस्यः = पेठे
२२५ पानस्यः = पानसे
२२६ जालंधारः = जालंधर
२२७ वाटव्यः = वाटवे
२२८ नपात्यः = नवाथे
२२९ बौलिः = बोले
२३० गोकलिः = गोखले
२३१ अगस्तिः = अगस्ते
२३२ पैंग्याः = पंगे
२३३ दंडिः = दंडे, दांडे
२३४ गाधिनः = गायधनी
२३५ मौंजिकाः = मुंजे
२३६ विलवः = विळे
२३७ अवतानाः = अवतणे
२३८ सालंकायनाः = साळके

२३९ पांडाः = पांडे
२४० सौम्यानिः = सोमण
२४१ वैरडिः = बेरड
२४२ हंसाः = हंस
२४३ पौणमासाः = पुनवं
२४४ पारणाः = पारणे
२४५ पाणिकाः = पाणके
२४६ शंबुः = संबुस
२४७ शैशयः = शेष, शेषे
२४८ संबंधिः = समंध
२४९ गालगिलः = गाडगीळ
२५० रोदकिः = रोडथे
२५१ कृताः = काटे
२५२ नाराटयः = नरटे
२५३ गोधिलिः = गोंधळे
२५४ अधलः = अंधे
२५५ सुनाश्वः = सुलाखे
२५६ मध्यंदिनः = माध्यंदिन
२५७ त्रैशृंगः = तिरशिंगे
२५८ सुराक्षः = सुलाखे
२५९ कर्णायनः = काणे
२६० दावालः = दावल, दावालश्चासौ भक्तश्च दावलभक्त
२६१ दाकायनाः = डाकण, डेकणे, ढेकणे
२६२ बाहुलिः = भोळे, भोळे
२६३ कोहलः = खोले
२६४ पैप्पलः = पिंपळे
२६५ गर्धभः = गद्रव
२६६ चौवलः = चौबळ
२६७ अंधकः = अंधे
२६८ घोटमुखाः = घोडमुखे
२६९ कथकाः = काथे

२७० महात्रेयः = म्हात्रे
२७१ बौधाक्षाः = बुडाखे=बुलाखे
२७२ नृत्ययनाः = नाचणे
२७३ कावल्यः = कावळे
२७४ कंबलायनः = कामळे
२७५ अधिकारिः= अधिकारी, अदकारी
२७६ वाटः = वाड
२७७ मुग्रिः = मोग्रे
२७८ राक्षायणः = राक्षे
२७९ प्रात्तायनाः = पाठाण, पठाण
२८० द्रुमत्याः = दिमोटे
२८१ धवलाः = ढवळे
२८२ नवग्रामाः = नवघरे
२८३ पुलहाः = फुले
२८४ आचर्याः = आचार्य, आचारी
२८५ औकुलाः = ओगुले, ओगले
२८६ दामा = दामले
२८७ कार्णाटाः = कानडे
२८८ मैत्राण्याः = मैत्रायणी
२८९ मषणाः = मसणे
२९० देवाः = देव
२९१ वलभोकिः = बडभोक=भाडभोके
२९२ भामाण्याः = भनान्ये
२९३ दार्भिः = दर्भे
२९४ मत्साः = माचे
२९५ पार्षतिः = पारसइ=पारसी
२९६ कालाकिः = कळके
२९७ कहोलाः = खोले
२९८ लालाटिः = लाटे
२९९ उच्चैर्मन्यवः = उंचमाने, हुचमणे
३०० धौलाः = ढोले
३०१ स्थोलाः = ठोले
३०२ माधव्याः = माधवे

३०३ कनिष्ठयः = कानिट (करः)
३०४ साद(मा)नाः = साडमाने =
सांद्रमाणिः
३०५ योगालिः = जोगोळि (कर)
जोगळेकर
३०६ शिखापात्तिः = शिखावत, शेखावत
३०७ कृत्स्नः = कुसे, कुंचे
३०८ पलतः = पलित
३०९ हापत्तिः = हाबडे
३१० शाल्यावनिः = साळवणी
३११ नृत्यायनाः = नाचण
३१२ बोधायनाः = बोधनी
३१३ नैकटिः = नकटे
३१४ बिदाः = भिडे
३१५ ताम्रायणाः = ताम्हणे, तांबे
३१६ कामलाः = कावळे
३१७ शैताः = सेटे = श्रेष्टिः
३१८ मौकाः = वोक
३१९ वाभ्रियः = भाव्ये
३२० सिद्धाः = सिधये
३२१ मृदंगीयः = मदंगे
३२२ सैन्धवाः = सेंडे
३२३ सौमिनिः = सोवनी, सोहनी
३२४ मूलपाः = मुळ्ये
३२५ खरिकाः = खरे
३२६ कौमंडाः = गोवंडये
३२७ काक्षीवताः=काखवटे, काथवटे
३२८ स्वारग्रीविः = बारगीर
३२९ श्रीपथाः = शिरवटे, सरवटे
३३० भिंदिः = भेंडे
३३१ लदिः = लड्डू
३३२ कालशार्पिः = कालरस
३३३ गोरिकिः = घोडके
३३४ काथकाः = काठे
३३५ भाणवेशाः = भाणवसे
३३६ कौकंटिः = कुकडे
३३७ कोकिलाः = कोकीळ
३३८ कौरंडजाः = कोरडे
३३९ गुग्गुलिः = गोंगले
३४० गाथिनाः = गाथ-गात
३४१ प्रभुः = प्रभू
३४२ आंगिरसाः = आंगरे
३४३ मात्साः = मत्से
३४४ माल्याः = माळी
३४५ गणपुळे = गणपतीच्या पुळ्याचे
रहाणार
३४६ पवनाशाः = पोंक्षे
३४७ बुयादुलाः = बुद्ले
३४८ बलिः = वळे
३४९ महोडकिः = मोडक
३५० असित = चितळे
३५१ मानेयाः = माने
३५२ कारपूरयः = घारपुरे
३५३ मारायणाः = मारणे
३५४ गाधरायणाः = गद्रे
३५५ लव्यारदंडिः = लवाटे
३५६ दाभ्रेकपिः = धाकरस
३५७ शौनरयः = सुनरे, सुंदर
३५८ त्वाष्ट्राः = वष्ट
३५९ जामदग्न्याः = जमदग्नि
३६० मानव्याः = मानवी
३६१ महावाल्याः = म्हाबळ
३६२ ताकीः = नाटके
३६३ आद्यहयाः = आद्ये
३६४ लोपकृतः = लवकर

| | |
|---|---|
| ३६५ धौर ( कुलिकाः ) = ढोर | ३७९ काठकाः = कटके |
| ३६६ भ्राजाः = वर्जे | ३८० हारीताः = हान्ये |
| ३६७ औलोप्याः = ओरपे | ३८१ गोलेयाः = गोळ्ये |
| ३६८ बलाकयः = बलाके | ३८२ वधिकाः = वझे |
| ३६९ भाषण्याः = भासल | ३८३ नैकर्णिः = नेकणे |
| ३७० नैकरिः = नाखरे | ३८४ प्रागे ( हयाः ) = पागे ( एकशेष ) |
| ३७१ पालाशिनः = पळशे | ३८५ बोधाक्ष = ( बोडास ) बोडस |
| ३७२ अजाः = आज्ये | ३८६ ब्राभ्याः = भाभे |
| ३७३ कासलयः = काजळे | ३८७ लैलेभिः = लेले |
| ३७४ किकायनाः = कैकेणी | ३८८ परश्वासौ जपःश्च =परजपे, परांजपे |
| ३७५ औदुलाः मन्याः च =ओडलमने | ३८९ निचोराणिः = निचुरे, निल्धुरे |
| ३७६ दिश्याः = डिके | ३९० हैयुराः = हेर |
| ३७७ ललाटिः = रटाटे | ३९१ भोगलाः = भोगळे |
| ३७८ ( इद्व ) हव्याः = हवे | |

८ वरील यादींत देशस्थ, कऱ्हाडे व कोंकणस्थ, मराठे व प्रभू यांचीं आडनांवें ऊर्फ गोत्रनामें दिलीं आहेत. जयवन्त हें आडनांव प्रभूंत आहे. हें आडनांव येणे-प्रमाणें साधलें आहे.

द्रोणपर्वतजीवन्तादन्यतरस्याम् ( ४-१-१०३ )

एभ्यो गोत्रे फग् वा । जैवंतायनः जैवन्तिः वा ।

जीवन्त नामक मूळ गोत्रोत्पादक पुरुषापासून जे उत्पन्न झाले ते जैवन्तायन किंवा जेवन्ति. जैवन्ति शब्दाचा मराठी अपभ्रंश जेवन्त किंवा जयवन्त. जय ( जिंकणें ) या शब्दाशीं जयवंत, जेवंत या प्रभुआडनांवाचा कांहीं एक संबंध नाहीं. तसें च, गुप्ते हें प्रभुआडनांव गौप्तेय ह्या गोत्रनामापासून आलेलें आहे. शालिवाहनाच्या चौथ्या शतकांतील गुप्त सम्राटाशीं या आडनांवाचा संबंध दिसत नाहीं. चित्रे व चौबळ हीं प्रभुआडनांवें चैत्रेयाः व चौवलाः या गोत्रनामांपासून निघालेलीं आहेत. अधिकारी, अधकारी, अद्कारी हें हि प्रभु आडनांव अधिकारि या गोत्रनामापासून निघालेलें स्पष्ट दिसतें. तात्पर्य, सध्यांच्या प्रभुलोकांत निरनिराळीं गोत्रनामें ऊर्फ आडनावें आहेत. प्रभू तेवढे सर्व दाल्भ्यगोत्री, हें मत इतिहासानभिज्ञ भटांचें व तदनुयायी प्रभूंचें आहे. ब्राह्मण व प्रभू दोघे हि खऱ्या इतिहासाला पारखे होऊन, वृथा वाद माजवून राहिलेले आहेत. जेवन्त, गुप्ते, चौबळ हीं आडनांवें जेवन्ति, गौप्तेय, चौवल या गोत्रनामांपासून ज्याअर्थी निघालेलीं आहेत, त्याअर्थी एके काळीं हीं तिन्हीं आडनांवें ऊर्फ गोत्रें ब्राह्मणांत होतीं हें निर्विवाद आहे.

ब्राह्मणांत हीं गोत्रें ऊर्फ कुळें सध्यां लुप्त झालेलीं दिसतात; फक्त प्रभूंत मात्र तीं हयात आहेत.

अवटे, घोल्ये, मांडे, काळे, पांढरे, कुटे, बाभर, भोर वगैरे आडनांवें अवट्याः, गोहल्याः, मांड्याः, कालेयाः, पाण्डाराः, कौटाः, बाभ्रव्याः, भौराः, या गोत्रनामां-वरून प्राकृतांत आलीं हें उघड आहे. पोरे हें शिंपी लोकांत आडनांव आहे व तें पौरेयाः या गोत्रनामापासून निघालेलें आहे, हें कोणी हि कबूल करील. ह्या व्युत्प-त्तीचा अर्थ काय ! ह्याचा अर्थ इतका च कीं पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व संकर ह्या सर्वांचीं समान गोत्रें असत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व ह्या तिन्हींचे अनुलोम व प्रतिलोम संकर मिळून एक कुळ होई व त्या कुळांतील सर्व व्यक्तींचा त्या कुळाच्या गोत्रनामावर हक्क असे. पैकीं ब्राह्मणादि वर्णांचा क्षय झाला असतां, प्रभू, शिंपी वगैरे जातींत हीं गोत्रनामें ऊर्फ आडनांवें अद्याप हयात असलेलीं आढळ-तात. ह्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील अठरापगड जातींतील सर्व आडनांवें गोळा केलीं असतां आर्यवंशाच्या इतिहासावर फार प्रकाश पडेल. कोटीवरी गोत्रें होतीं म्हणून बौधायन सांगतो. त्यांपैकीं गोत्रप्रवर ग्रंथांत व पुराणांत सुमारें ५००० पांच हजार सांपडतात. बाकींचीं लक्ष्यावधि गोत्रें गेलीं कोठें ! असा अंदाज आहे कीं, ब्राह्म-णांत लुप्त झालेलीं हीं हजारों गोत्रें इतर जातींच्या आडनांवांत बरींच सांपडतील.

९ उपरिष्ट गोत्रमालिकेंत बरींच आडनांवें ऊर्फ गोत्रनामें देशस्थांचीं आहेत. पिंगळे, वाघ, गर्गे, भारदे, व्यास, भार्गव, पर्वते, अत्रे, कोशे, धुमे, गांडे, मांडे, भोगल, हरकारे, गायधनी, पराशरे, आसकारे, उसणारे, देव, आथर्वण, हंस, दुर्गे, पिटके, पारधी, पारखी, पिंपळे, मध्वे, कवी, नंदे, धोत्रे, मोळे, तिखे, मुंजे, तोगे, वगैरे शेंकडों आडनांवें ऊर्फ गोत्रनामें देशस्थांत आढळतात. महाराष्ट्रांतील जे देशस्थ लोक त्या सर्वांचीं जुनीं आडनांवें जमविण्याचा उद्योग मी चालविला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, शेंकडों गोत्रनामें आडनांवें झालेलीं ह्या लोकांत आढळतील. जोशी, कुळकर्णी, देशपांडे, देशमुख, पाटील, मुश्रीम, पेशवे, मुजुम-दार वगैरे धंद्यावरून पडलेलीं आडनांवें व गांवावरून न रप्रत्ययान्त आडनांवें देशस्थ लोकांत बरींच आहेत. तीं वगळलीं असतां, बाकीचीं जीं आडनांवें रहातात तीं सर्व गोत्रनामांवरून निघालेलीं आहेत. देशस्थांत गोत्रें शेंकडों आहेत. त्याहून कऱ्हाड्यांत व कोंकणस्थांत गोत्रें अगदीं च कमी—कऱ्हाड्यांत २४ चोवीस गोत्रें आहेत व कोंकणस्थांत १४ चौदा गोत्रें आहेत.

१० पैकीं गोत्रनामांवरून कऱ्हाड्यांत जीं आडनांवें आलेलीं मला ओळख-ळलीं त्यांची यादी येथें देतोः—

१ देवाः = देव
२ अधिकारिः = अधिकारी
३ वैद्याः = वैद्य
४ कार्णाटाः = कानडे
५ दात्तेयाः = दत्ते
६ भागवित्तिः = भागवत
७ मौंडाराः = मुंडले
८ हार्यश्वाः = हर्षे
९ औदुंबरायणाः = उंबरे
१० बादरायणाः = बद्रे, बंद्रे
११ शारद्वताः = सा(वटे, सरवटे
१२ आगस्त्याः = आगटे
१३ लोहकारयः = लीकरे
१४ पौरोहितिकाः = पुरोहित
१५ कालेयाः = काळे
१६ कावल्याः = कावळे
१७ शाक्राः = साखरे
१८ भाष्ट्रेयाः = भाटे
१९ वाकिनिकेराः = वाकणकर
२० पैन्याः = पिंत्रे
२१ पिप्पलाः = पिंपळे
२२ बौध्याः = वोझे
२३ कौरव्याः = कर्वे ( कोर्वे )
२४ कौटिश्वासो भास्करः = कोटिभास्कर
२५ श्रोत्रियाः = श्रोत्री
२६ कर्तृणः = कात्रे
२७ मात्साः = मत्से
२८ नपात्याः = नवाथे
२९ पांडाः = पंडित
३० पारणाः = प्राणी
३१ धवलाः = ढवळे
३२ कालाकिः = कळके
३३ आचर्याः = आचार्य
३४ कनिष्ठयः = कानेटकर ( केरः )
३५ धौलाः = ढोले
३६ सुराः = सूर
३७ मूलपाः = मुळ्ये
३८ देवस्थानिः = देवस्थळी
३९ पानस्याः = फणशे
४० पिंगाः = पिंगे
४१ (प्राचीन) योगाः = योगी
४२ कोष्टुकिः = कोले, कोल्हे
४३ बाष्कलिः = बखले (बाखले)
४४ मौखाः = मोघे
४५ जाडायनः = जडे
४६ साडायनाः = साडे ( कर )
४७ वार्कलिः = बाकरे
४८ गौराः = गोरे
४९ गालगिलाः = गलगिल्ये
५० गुग्गुलिः = घुगरे
५१ क्राथकाः = काठे, काटे
५२ माल्याः = माळी
५३ ताम्रायणाः = तांबे
५४ गोदायनाः = गोडे
५५ खेलकः = खेर
५६ बुयादुलाः = बुदले
५७ जायनिः = जन्ये
५८ शांडिलाः = सांधले, साधले
५९ कापटुः = कापडी
६० दाध्रेकछिः = धाकरस
६१ भ्राजाः = बर्जे, वर्जे
६२ धौर (कुलिकाः) = ढोर
६३ लोपरुतः = लवकर
६४ आयहेयाः = आये
६५ औलोप्याः = ओरपे

६६ बालाकयः = बळाके
६७ भाषण्याः = भासल
६८ नैकरिः = नाखरे
६९ तार्काः = तातके
७० अजाः = आज्ये
७१ कासलयः = काजळे
७२ कांडोदरिः = कांडदरे
७३ करायणाः = किराणे

शोधिले तर आणीक हि दहावीस अपभ्रंश निघतील. गोत्रनामांचे अपभ्रंश होऊन जीं हीं पाऊणशें आडनांवें निघालीं आहेत त्यांहून बाकीचीं आडनांवें गांवावरून किंवा धंद्यावरून पडलेलीं आहेत. अंचार्डेकर, मणेरकर, हिंगणकर, फणसळकर, वगैरे करप्रत्ययान्त नांवें ग्रामनामांवरून तत्रस्थ ह्या अर्थी पडलेलीं आहेत. सबनीस, शेखदार, सरदेसाई, पतकी, जोशी, पटवर्धन, दीक्षित, हुजूरबाजार वगैरे फारशी, व हिंदी नांवें धंद्यावरून पडलेलीं आहेत.

११ कऱ्हाड्यांच्या प्रमाणें च कोंकणस्थांच्या आडनांवाची त्रिविध स्थिति आहे. कांहीं आडनांवें धंद्यांवरून, कांहीं गांवांवरून व बाकीचीं गोत्रांचे अपभ्रंश होऊन पडलेलीं आहेत. पैकीं गोत्रोत्पन्न आडनांवें ओळखवलीं तेवढीं नमूद करतों.

१ बाहविः = भावे
२ बाभ्रव्याः = बरवे
३ वैशंपायनाः = वैशंपायन
४ वैद्याः = वैद्य
५ गांगाः = गांगल (स्वार्थे ल)
६ काण्वाः = काणे
*७ कानीनाः = काणे
८ दातेयः = दाते
९ शौनकाः = सोने
१० सौन्याः = सोने
११ गोकक्ष्याः = गोखले (स्वार्थे ल)
१२ गोकालिः = गोखले
१३ भानवः = भानू
१४ बालेयाः = बाळ
१५ काणिकेराः = कान्हेरे
१६ श्वैत्रकाः = शिंत्रे (अनुनासिक आगंतुक)
१७ कालेयाः = काळे
१८ देवाः = देव
१९ तौल्वलयः = तुळपुळे
२० दांडिनायनाः = दांडे (कर, केर प्रत्ययापासून)
२१ शौणायनाः = सोनिये, सोन्ये
२२ बाहिरिकाः = बेहरे
२३ पैष्ठाः = पेठे
२४ कौटाः = कुंटे (मूळ कुटे, अनुनासिक आगंतुक)
२५ मौनाः = मोने
२६ दांडाः = दांडे
२७ कार्पूराः = कापरे
२८ फाण्टाः = फाँटक, फाटक
२९ कौरव्याः = कर्वे (कोर्वे)
३० सार्ष्टिः = साठे
३१ सार्ष्टयाः = साठये
३२ युगंधराः = जोगधर
३३ कापिश्यायनाः = कापशे

३४ शार्कराः = साखरे
३५ आकशायेयाः = आगाशे
३६ श्वानेयाः = साने
३७ कर्मारकेराः = करमरकर
३८ वाटाः = वाड
३९ आश्वलाः = आचवल
४० भागवित्तिः = भागवत
४१ सांकराः = साकरे
४२ सौमिनिः = सोमण
४३ छात्रिणः = छत्रे
४४ सायणाः = साने
४५ नाराणाः = नराणे
४६ आश्मरथ्याः = मराठे
४७ वाटव्याः = वाटवे
४८ ( गौड ) चोलयः = गाडचोले
४९ गालगिलाः = गाडगीळ
५० रोदाकिः = रोडये
५१ गौधिलिः = गोंधळे
५२ कर्णायनाः = काणे
५३ आचर्याः = आचार्य
५४ दामाः = दामले ( स्वार्थ ल )
५५ कार्णाटाः = कानडे
५६ बलभांकिः = भाडभोके
५७ पार्षतिः = पारखी
५८ लालाटिः = लाटे
५९ कनिष्टिः=कानिटकर(कर प्रत्यय)
६० योगोलिः =जोगळेकर(केर प्रत्यय)
६१ पिंडिकाक्षाः = पेंडसे
६२ मेल्हिः = मेंडे
६३ विदाः = भिडे
६४ मौकाः = वांक
६५ वाभ्रियाः = भाम्र्ये
६६ सिद्धाः ( सिद्धेयाः ) = सिधये
६७ मृदंगीयाः = मटंग
६८ सैंधवाः = सेंडे
६९ सौमिनिः = सोवनी, साहनी
७० खारिकाः = खरे
७१ कौमंढाः = गोवंडचे.
७२ गाथिनः = गाथ
७३ माल्याः = माळी
७४ पवनाशाः = पोक्षे
७५ महोडाकिः = मोडक
७६ असिताः = चितळे ( अळाप; स्वार्थ ळ )
७७ कारपूरयः = घारपुरे
७८ गाधरायणाः = गद्रे
७९ लव्यारदंडिः = लवाटे
८० ज्ञानायनाः = गानू
८१ ( प्राचीन ) योगाः = जोग
८२ भ्राष्ट्रेयाः = भाटे
८३ परिकुराः = परचुरे
८४ वागुरुः = बागुल
८५ कौकंटिः = गोगटे
८६ बाभ्याः = भाभे
८७ महेंद्राः = मेहेंदळे
८८ पानस्याः = फणसे
८९ टैकायणाः = टेणे
९० गांधारायणाः = गांधारे
९१ स्कांभायणाः = खांबेटे
९२ जायनिः = जाइल
९३ वाम (देवाः ) = बाम
९४ ( अष्ट ) पैलाः = आठवेले
९५ गौराः = गोरे
९६ देवमायाः = मायदेव
९७ व्यासाः = व्यास

९८ औकुलाः = ओगले
९९ श्वाफल्काः = सापळे
१०० सांद्रमणिः = साठमाना
१०१ वापिकाः = वापट्ये
१०२ पर्वताः = पर्वते
१०३ गुहिलाः = घुले
१०४ दार्भिः = दर्वे
१०५ कातरायणाः = कानरणे
१०६ ललाटिः = रटाटे
१०७ (इद्र) हव्याः = हर्वे (एकशेष)
१०८ भामाण्याः = भवान्ये
१०९ काठकाः = कटके
११० गांगायनाः = गांगल
१११ लैलेहिः = लेले
११२ हारीताः = हार्न्ये
११३ गौरव्याः = गोळ्ये
११४ नैकार्णिः = नेकणे
११५ वधिकाः = वढ्ये
११६ पांडयाः = पंड्ये
११७ प्रागे (हयाः) = पागे (एकशेष)
११८ महावाल्याः = महाबळ, म्हाबळ
११९ शार्ङ्ग (रवाः) पाणिः च = शार्ङ्ग-पाणि
१२० गणपाः = गणपुले (स्वार्थे ल)
१२१ दात्रेयाः = दातार
१२२ देवलः = देवल
१२३ वैहीनरयः = (वेनरे) वैद्र
१२४ स्थौलेयाः = ठोके
१२५ नैकरिः = (नेअरि) नेवरे
१२६ भस्मायनाः = भस्मे
१२७ बौधाक्षाः = बोडास, बोडस
१२८ लिगुः = लागू
१२९ पटिकाः = बडिवे
१३० मल्लकाशाः = मालसे
१३१ लायनाः = लेणे

गोत्रनामांपासून निष्पन्न झालेलीं आणीक हि दहा पांच आडनांवें देतां येतील. त्यां व्यतिरिक्त बाकीचीं आडनांवें गांवावरून किंवा धंद्यावरून पडलेलीं आहेत— पळणिटकर, पाटणकर, नगरकर, पिटकर, भुस्कुटे, मंगरूरकर, मालकर, चिपळोणकर वगैरे कर किंवा इये, ए प्रत्ययान्त आडनांवें ग्रामनामावरून निघालेलीं आहेत. मंडलिक, वर्तक, पटवर्धन, भट, पुराणिक, पोतनीस, पेशवे, फडणीस, मुजुमदार, जोशी, राजवाडे, दीक्षित, देशमुख वगैरे आडनांवें धंद्यावरून पडलेलीं आहेत. देशस्थ-कऱ्हाड्यांच्याप्रमाणें च कोकणस्थांचा हि प्रघात असलेला दिसतो.

मूळ कोंकणस्थांचीं १४ गोत्रें— १ काश्यप, २ शांडिल्य, ३ वासिष्ठ, ४ विष्णुवर्धन, ५ कौंडिन्य, ६ अत्रि, ७ कौशिक, ८ भारद्वाज, ९ गार्ग्य, १० कपि, ११ जामदग्न्य, १२ वत्स, १३ नितुंद्रिन, १४ बाभ्रव्य. पैकीं जामदग्न्य व वत्स; भारद्वाज, कपि व गार्ग्य; कौशिक व बाभ्रव्य; वासिष्ठ व कुंडिन; काश्यप व शांडिल्य; आणि विष्णुवर्धन व नितुंदिन; हीं समानप्रवर म्हणजे एका च मूळ ऋषीपासून उत्पन्न झालेलीं आहेत. जामदग्न्य व वत्स हीं भृगूपासून; भारद्वाज, कपि व गार्ग्य हीं भरद्वाजापासून; कौशिक व बाभ्रव्य हीं विश्वामित्रापासून; वासिष्ठ व

कुंडिन हीं वसिष्ठापासून; काश्यप व शांडिल्य हीं कश्यपापासून; आणि विष्णुवर्धन व नितुंदन हीं अंगिरसापासून जन्म पावलीं, अशी परंपरागत समजूत आहे. अत्रिगोत्र अत्रिऋषीपासून उद्भवलें. अगस्तीपासून जन्मलेलें एक हि गोत्र कोंकणस्थांत नाहीं.

हीं १४ गोत्रें ऊर्फ कुळें परशुरामानें प्रथम कोंकणांत वसविलीं. परशुराम दाशरथि रामाचा समकालीन होता असें पुराणें व इतिहास सांगतात. तें मान्य केल्यास, रामाच्या वेळेपासून चित्पावनांची वस्ती कोंकणांत आहे, असें होतें. तें कांहीं हि असो, कोंकणस्थांचीं प्रथम १४ गोत्रें होतीं. तीं वाढत वाढत कालान्तरानें ६० झालीं. साठ्ये हें ६१ वें कुळ आहे, असें कित्येक म्हणतात. परंतु, तें साधार आहे, असें म्हणण्याला जितका पुरावा मिळावा तितका मिळालेला नाहीं. साठे म्हणजे साठ व साठ्ये म्हणजे ६१ वा, असा अर्थ करून कित्येक लोक आपली स्वतःची फसवणूक करून घेतात इतकें च. साठे या शब्दाचा अर्थ साठ नसून, हा शब्द सार्ष्टि या ऋषिनामापासून निष्पन्न झालेला आहे, हें मागें दाखविलें च आहे, असो. हीं मूळचीं साठ कुळें येणेंप्रमाणें:—

१ **काश्यप**—१ लेले, २ गानू, ३ जोग, ४ लवाटे, ५ गोखले

२ **शांडिल्य**—१ सोमण, २ गांगल, ३ भाटे, ४ गणपुले, ५ दामले, ६ जोशी, ७ परचुरे

३ **वासिष्ठ**—१ साठे, २ बोडस, ३ वोक, ४ बापट, ५ बागुल, ६ धारू, ७ गोगटे, ८ भाभे, ९ पोंगशे, १० विंझे, ११ साठ्ये, १२ गोंवंड्ये

४ **विष्णुवर्धन**—१ किडमिडे, २ नेने, ३ परांजप्ये, ४ मेहेंदळे

५ **कौंडिन्य**—१ पटवर्धन, २ फणशे

६ **नितुंदन**—१ वैशंपायन, २ भाडभोके

७ **भारद्वाज**—१ आचवल, २ टेणे, ३ दर्वे, ४ गांधारे, ५ घांगुरडे, ६ रानड्ये

८ **गार्ग्य**—१ कर्वे, २ गाडगीळ, ३ लोंढे, ४ माटे, ५ दाबके

९ **कपि**—१ लिमये, २ खांबेटे, ३ जाईल, ४ माईल

१० **जामदग्नि**—१ पेंडसे, २ कुंटे

११ वत्स—१ मांलशें

१२ बाभ्रव्य—१ बाळ, २ बेहेरे

१३ कौशिक—१ गद्रे, २ बाम, ३ भाव्ये, ४ वाड, ५ आपटे

१४ अत्रि—१ चितळे, २ आठवेले, ३ भाडभोळे,

एकूण उपनांवें ६०

ह्या साठ आडनांवांपैकीं बापट, धारू, किडमिडे, नेने, लिमये, माईल व भाडभोळे हीं आडनांवें ज्या गोत्रांपासून निघालीं तीं गोत्रें मजजवळील पांच हजार गोत्रांच्या यादींत नाहींत किंवा त्यांचा पत्ता मला लावतां आला नाहीं. बाकींच्या ५३ आडनांवांचा पत्ता लागला आहे. त्यावरून असें म्हणतां येतें कीं, ज्या कालीं गोत्रनामें प्रचारांत होतीं, परंतु तीं प्राकृत होत होतीं त्या कालीं हीं ५३ आडनांवें ऊर्फ गोत्रनामें सुरू झालीं. प्राकृत भाषा सुरू झाल्यानंतरचीं हीं साठ आडनांवें ऊर्फ गोत्रनामें आहेत. म्हणजे आजपासून अडीच हजार वर्षांपलीकडील हीं साठ आडनांवें नाहींत. मूळचीं चौदा गोत्रें संस्कृत आहेत, प्राकृत नाहींत. अर्थात् तीं अडीच हजार वर्षांपूर्वींचीं आहेत. चौदा गोत्रांचा एकेक पुरुष परशुरामानें कोंकणांत वसविला ह्या दंतकथेशीं वरील निगमन चांगलें जुळतें. ह्या साठ आडनांवांचीं पुढें सुमारें अडीचशें आणीक आडनांवें कोंकणस्थांत झालीं. तीं सर्व सापेक्ष दृष्टीनें कमजास्त अर्वाचीन आहेत. ह्या अर्वाचीनांत हि जीं आडनांवें गोत्रनामांपासून निघालेलीं दाखविलीं आहेत, तीं अर्वाचीनांतील अत्यन्त प्राचीन व प्राचीनांतील अत्यंत शेवटलीं होत. ह्या अर्वाचीनांतील प्राचीन आडनांवाचा काल शक ७०० पासून शक १३०० पर्यंतचा धरण्यास कांहीं हरकत नाहीं. घैसास, गोळे, गोरे, वगैरे गोत्रोत्पन्न आडनांवें ह्या अर्वाचीनांतील प्राचीन आडनांवांपैकीं होत. गांवांवरून पडलेलीं नांवें गोत्रांवरून पडलेल्या आडनांवांनंतरचीं होत. फारशी नांवें अलीकडील दोनशें वर्षांतील आहेत. सध्यां इंग्रेजी आडनांवें पडण्याचा संभव आहे. मूळ चौदा गोत्रनामांपासून उत्पन्न झालेलें एक हि आडनांव कोंकणस्थांत नाहीं. गोत्रनामांपासून उत्पन्न झालेलीं आडनांवें देशस्थांत अति आहेत. मूळ चोवीस गोत्रनामांपासून निघालेलीं आडनांवें कऱ्हाड्यांत हि नाहींत. उदाहरणार्थ, आत्रे हें आडनांव देशस्थांत आहे. कोंकणस्थांत व कऱ्हाड्यांत हें अत्रिगोत्र आहे, परंतु उपनाम नाहीं. आत्रेय ऊर्फ आत्रे हें आडनांव बरींच शतकें चालू झाल्यावर तें घेऊन देशावर ब्राह्मण आले. तें घेऊन कोंकणांत किंवा कऱ्हाडप्रांतांत ब्राह्मण आले नाहींत. अर्थात्, कोंकणस्थांची व कऱ्हाड्यांची वस्ती कोंकणांत व कऱ्हाडप्रांतांत देशस्थांची वस्ती देशावर होण्याच्या पूर्वींची

आहे, हें उघड आहे. आर्यांनीं सध्यांच्या महाराष्ट्रांत म्हणजे पूर्वीच्या दंडकारण्यांत वस्ती कोंकण व कऱ्हाडप्रांत ह्यांत वस्ती केल्यानंतर केली, हें कित्येक वर्षांपूर्वी इतर आधारांनीं मीं सिद्ध केलें आहे. त्या सिद्धीला ह्या गोत्रविवरणानें हि पुष्टि मिळते.

करवीर, कोकणे व भुसकुटे हीं आडनांवें प्रांतांवरून पडलेलीं आहेत व हीं आडनांवें मूळ चौदा गोत्रांची वस्ती अपरान्तांत झाल्यावर, त्यांच्या वंशजांपैकीं त्या त्या प्रांतांत ज्या कोणीं वस्ती केली त्यांना मिळालेलीं दिसतात. जें चित्पावन कुल करवीर प्रांतांत जाऊन राहिलें त्याला करवीर हें आडनांव पडलें. चित्पावनप्रांतांतून जें कोंकणांत राहिलें त्याला कोकणे हें विशिष्ट उपनाम प्राप्त झालें. आणि भोजकट नामक जो देश तापीतीरीं विंध्याच्या दक्षिणेस होता त्यांत जो पुरुष चित्पावनप्रांतांतून जाऊन राहिला त्याला भोजकटीय, भोजकटे, भोसकटे, भुसकुटे हें आडनांव ऊर्फ आणणांव मिळालें. मूळ चित्पावनप्रांतांतून गांवोगांव चित्पावनांचा जसजसा प्रसार होत गेला, तसतशीं ग्राम-नामोत्पन्न आडनांवें प्रचलित झालीं. गोंधळेकर, कार्लेकर, कापरेकर, केतकर ह्या आडनांवांत गोंधळी, कार्लें व केतकी या ग्रामनामांचा निर्देश होतो. येथें कर प्रत्यय केर या प्राकृत प्रत्ययाचा मराठी अपभ्रंश आहे. प्रथम ह्या आडनांवांचा उच्चार गोंधळीकेरः, कार्लेकेरः, कापरेकेरः व केतकीकेरः असा होत असे. महाराष्ट्री प्राकृत लुप्त झाल्यावर ह्या आडनांवांतील केर प्रत्ययाचा कर असा उच्चार होऊं लागला. केर हा प्रत्यय तत्संबंधवाचक आहे. केतकर म्हणजे केतकीगांवचा. हा केर प्रत्यय स्मृत्यनुसार जे गोत्रनिर्णायक ग्रंथ झाले त्यांत कर्मारकेराः व वाकिनिकेराः म्हणून जीं गोत्रनामें येतात त्यांत दृष्टीस पडतो. आतां येथें असा प्रश्न उद्भवतो कीं, केतकी गांवावरून केतकर हें आडनांव पडलें कीं कितवाः ह्या गोत्रनामावरून केतकेराः हें आडनांव निघालें? कितवकेराः म्हणजे कितवगोत्राचे. कितवगोत्राचे जे ते कितवकेर. कितवकेर=केतकेर = केतकर, अशी हि परंपरा असूं शकेल. म्हणजे गार्ग्यगोत्रांत म्हणजे कुळांत कोणी कितव नांवाचा पुरुष झाला व कर्तेपणामुळें त्याच्यापासून कितव हें उपनाम सुरू झालें. त्या कितवानें कैत ऊर्फ केत हें नवीन गांव वसविलें व त्या गांवाला आपलें नांव दिलें म्हणजे गोत्रपुरुषनामावरून गांवाचें नांव पडलें, गांवावरून पुरुषाचें नांव पडलें नाहीं, असा अर्थ होतो. आणि हेंच जास्त संभवतें. गावावरून पुरुषाचें व तदुत्पन्न वंशाचें नांव पडलें असें धरल्यास, केत ह्या पुरुषाच्या अगोदर केत हें गांव होतें असें गृहीत धरावें लागतें. अपरान्तांत हें केत गांव केतकरांच्या अगोदर कोणीं वसविलें? आर्यांच्या पूर्वी अपरान्तांत नागांची वस्ती होती. त्यांनीं हें गांव वसविलें असें म्हणण्यास विशेष कांहीं आधार दिसत नाहीं. तेव्हां, गावाच्या अगोदर तें गांव स्थापणारा पुरुष होता, हें मान्य करणें हा एक पक्ष रहातो. कितव नांवाचा गोत्रनामप्रवर्तक कोणी एक पुरुष गार्ग्य-

गोत्रांत झाला. त्याचे जे वंशज त्यांना केतकर व त्यानें जें गांव वसविलें त्याला केत हें नांव पडलें. केत ह्या नांवाला सुबकपणा आणण्याकरितां केतकीग्राम असें त्या गांवाला कोणी कवित्वसंपन्न वंशज म्हणूं लागले. मूळ नांव केतग्राम, केतकीग्राम नव्हे. मूळनाम केतकी असतें तर केतकीकर असें आडनांव प्रचलित असतें. परंतु, आडनांवाचा उच्चार केतकर असा आहे. तेव्हां मूळग्रामनाम केत हें च खरें व तें ग्राम गार्ग्यकुलोत्पन्न कितव या प्रख्यात व कर्त्या पुरुषानें वसविलें. मेहेंदळी, गोंधळी, हीं हि ग्रामनामें महेंद्र, गोधूलि, ह्या गोत्रप्रवर्तक म्हणजे आडनांव-प्रवर्तक पुरुषांपासून निघालेलीं आहेत. ह्या प्रकार प्राचीन ग्रामनामें व ग्रामनामप्रवर्तक गोत्रपुरुषासंबंधानें झाला. अर्वाचीनकालीं पुण्यास रहाणारा तो पुणेकर व मुंबईस रहाणारा तो मुंबईकर, असा प्रघात आहे. पुणें व मुंबई यांच्या स्थापनेशीं या पुणेकराचा किंवा मुंबईकराचा बिलकुल संबंध नाहीं. प्राचीनकाळीं मूळवसाहती च जेथें स्थापावयाच्या होत्या, तेथें मूळ गोत्रप्रवर्तक पुरुषाचें नांव व नंतर त्यानें स्थापिलेल्या गांवाचे नांव, असा प्रघात होता.

वर्तक, जोशी, देशमुख, भट, पटवर्धन, हीं कोकणस्थांचीं आडनांवें धंद्याचीं दर्शक आहेत. पैकीं पट्टवर्धन ह्या कुलाचें नांव प्राचीन ताम्रपटांतून येतें. एका प्राचीन ताम्रपटांत एक नायकीण पट्टवर्धन कुलांत जन्मली म्हणून उल्लेख असल्याचें आठवतें. संदर्भपुस्तकें जवळ नाहींत म्हणून संदर्भ दिला नाहीं. पट्टवर्धनाचें काम ताम्रपट कापण्याचें व तयार करण्याचें असावें. हें कुलनाम होतें त्या अर्थीं त्या कालीं ह्या ताम्रपट तयार करण्याचा धंदा पिढीजाद होऊन बसला होता, हें उघड आहे. तसें च पट्टवर्धन ब्राह्मण च होते असें दिसत नाहीं. ब्राह्मणेतर हि होते. कालान्तरानें धंद्याचा लोप होऊन, हें केवळ कुलनाम ऊर्फ आडनांव झालें.

रानड्ये हें गोत्रनाम आहे. मूळ गोत्र अरण्यवाटाः; त्याचा अपभ्रंश रण्णवाड. त्याचें प्राचीन मराठी राणवडे. त्याचें अर्वाचीन मराठी रानडे. रानडे यांच्या वंशांत उत्पन्न झाले ते रानड्ये. वाटाः हें गोत्रनाम प्रसिद्ध आहे. परंतु, अरण्यवाटाः हें प्रसिद्ध नाहीं, म्हणजे गोत्रप्रवरग्रंथांत नाहीं. लक्षावधि जीं गोत्रें होतीं त्यांत हें गोत्रनाम असावें. मनोहर, मधुमत्ते, भैरव, भोगले, फफे, पघे, नवांके, फाळके, फडके वगैरे हि अप्रसिद्ध गोत्रनामें असावीं. ह्या लक्षावधि अप्रसिद्ध गोत्रांचा निर्देश गोत्रप्रवरग्रंथांत करणारा पुरुष प्राचीन काळीं कोणी निपजला नाहीं, हें मोठें दुर्भाग्य होय. तत्रापि अशीं गोत्रें होतीं, हें अर्वाचीन कालांत उपलब्ध होणाऱ्या मराठी आडनांवावरून निःसंदेह ताडतां येतें.

राजवाडे हें आडनांव दोन तऱ्हांनीं व्युत्पादितां येईल. राजवाटाः असें गोत्र असावें. किंवा राजवाड्यांतील अधिकारी अशी दुसरी व्युत्पत्ति होईल. पैकीं दुसरी

व्युत्पत्ति दिनकरराव राजवाडे यांच्या चरित्रांत दिली आहे. शिवाजीच्या राजवाड्यांत राजवाड्यांच्या कोण्या एका पूर्वजाला कांहीं एक अधिकार होता, त्यावरून त्याच्या सर्व वंशजांनीं राजवाडे हें आडनांव पिढीजाद लावून घेतलें. राजवाड्यांचें मूळ आडनांव जोशी. हे शांडिल्यगोत्री जोशी मूळचे राहणार निवें म्हणून गांव रत्नागिरीजवळ आहे तेथचे.

अगस्तींसह एकंदर ऋषि आठ व प्रवर एकूणपन्नास. ह्या एकूणपन्नास प्रवरांखालीं लक्षावधि गोत्रें पडतात. एक भागवित्ति किंवा भागवित्तायन गोत्र घेतलें तर तें गार्ग्य, कपि, जामदग्नि व कौशिक ह्या चार मुख्यगोत्रांखालीं पडतें. म्हणजे भागवित्ति ऊर्फ भागवत जसे गार्ग्यगोत्री आहेत, तसेच ते कपिगोत्री, जामदग्निगोत्री व कौशिकगोत्री हि आहेत. कऱ्हाड्यांत भागवत काश्यपगोत्री व भारद्वाजगोत्री हि आहेत. म्हणजे एकंदर भागवत सहा निरनिराळ्या गोत्रांचे आहेत. ह्या सहा गोत्रांप्रमाणें भागवित्ति ऊर्फ भागवत हें हि गोत्रनाम च आहे. इतकें च कीं कोंकणस्थांत व कऱ्हाड्यांत तें आडनांव झालें आहे. गोत्रप्रवरग्रंथांत सांगितलेलीं दोन हजार गोत्रें त्या दोन हजार गोत्रांपैकीं प्रत्येकाखालीं पडतील. ह्याचा अर्थ इतका च कीं, हीं गोत्रनामें संस्कृत भाषा जेव्हां सररहा प्रचलित होती त्या कालीं ऋषिनामें ऊर्फ व्यक्तिनामें होतीं व तीं पुढें प्रजा जशी वाढत चालली तशीं कांहीं प्रत्यय लागून गोत्रनामें ऊर्फ आडनांवें झालीं. हीं आडनांवें सध्यां हि प्राकृत रूपानें महाराष्ट्रांत चालू आहेत. भाटे हें आडनांव शांडिल्य, कपि, गार्ग्य, जामदग्नि, अत्रि, भार्गव व गौतम, इतक्या गोत्रांत आहे. भाटे म्हणजे भ्राट्रेयाः. गोडशे, गोरे, खुळे, आचार्ये, फणशे, मुळ्ये, वगैरे अनेक आडनांवें अशीं अनेकगोत्री आहेत. खुद्द गोत्रप्रवरग्रंथांत तीं च तीं गोत्रनामें निरनिराळ्या गणांत येतात. तो च प्रकार सध्यां हि दृष्टीस पडतो. ह्यावरून एक गोष्ट निष्पन्न होते, ती ही कीं, पांच हजार गोत्रांपैकीं प्रत्येक गोत्राखालीं जर सारीं च पडूं शकतात, तर एकंदर गोत्रें ५०००×५०००=२५०००००० दोन कोट पन्नास लाख होतात. बौधायन तर म्हणतो कीं गोत्रें अर्बुद आहेत. वरील गणित पहातां बौधायनाचें म्हणणें साधार दिसतें व बौधायनकालीं ब्राह्मणसंख्या किती मोठी होती त्याचा स्थूल अंदाज होतो.

देवरुखे, पळशे, सवाशे, शेणवई, तिर्गूळ, गोळक, वगैरेंच्या आडनांवांची हि वरीलप्रमाणें च व्यवस्था असलेली दिसेल, ह्यांचीं गोत्रें मीं अद्याप जमविलीं नाहींत.

क्षत्रिय दोन प्रकारचे, सार्य व अनार्य. पुरोहितप्रवरो राज्ञां, असें आश्वलायन श्रौतसूत्रांत म्हटलेलें आहे. तत्रापि, शुंग, मौर्य, गुप्त, शालिवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, बाण, इंद्र, चालुक्य, चौलुक्य, गुहिल, गांग, गुत्त, सिंद, वगैरे आडनांवें गोत्रनामें

असलेलीं स्पष्ट दिसतात. ताम्रशिलापट्टांत हारीत, आंगिरसहारीत, काश्यप, कौंडिन्य, मानव्य, वगैरे गोत्रें क्षत्रियांचीं दिलेलीं आढळतात. वासिष्ठीपुत्र, गौतमीपुत्र, माठरीपुत्र, वगैरे नांवें जशीं शातवाहनवंशांत सांपडतात तशीं ब्राह्मणांतील आचार्यवंशपरंपरेंत हि सांपडतात. काळे, पांढरे, गोरे, गोळे, गाडवे, साठे, वगैरे गोत्रनामोत्पन्न आडनांवें मराठ्यांत अद्याप आहेत. त्यावरून असें दिसतें कीं, मराठ्यांत ऊर्फ क्षत्रियांत ब्राह्मणांच्या प्रमाणें च गोत्रें आहेत. परंतु, इतकें खरें कीं, क्षत्रियांचीं गोत्रें व प्रवर त्यांना तोंडपाठ असण्यापेक्षां त्यांच्या पुरोहितांना जास्त तोंडपाठ असत. उघड च आहे, इतर विवंचनेपुढें गोत्रांकडे लक्ष्य देण्यास त्यांना वेळ नसे. ब्राह्मणानां राजार्पितानां राज्ञां वा ब्राह्मणार्पितानां, असें सूत्रवचन आहे. राजाला अर्पण केलेल्या ब्राह्मणाचें गोत्र जें राजाचें तें, व ब्राह्मणाला अर्पण केलेल्या राजाचें गोत्र जें ब्राह्मणाचें तें, असा प्रघात असे. वैश्यांची हि ही च तऱ्हा. जैन लोकांत गोत्रें आहेत. तीं हि गोत्रांचा अभ्यास करणाऱ्याला जुळविणें मोठें फलप्रद होईल यांत संशय नाहीं.

गाणगारि वगैरे तांडिन आचार्य सर्ववर्ण एकार्षेय मानीत. सर्ववर्णांचें आर्ष 'मानव' असें तें म्हणत. त्याला आधार, मानव्यो हि प्रजा इति हि ब्राह्मणं । हा देत. परंतु, हें एकप्रवराचें व एकगोत्राचें मत श्रौतकर्मवरणांत मान्य करीत, विवाहादिसंस्कारांत मान्य करीत नसत. कारण, तसें केल्यास समानप्रवऱ्यांचा विवाह होऊं लागेल अशी अडचण येई व समानप्रवरांचा विवाह आर्यांना केव्हां हि मान्य नसे. तात्पर्य, एकप्रवरत्वाचें हें मत सर्वसंमत होण्यासारखें नव्हतें. तत्वतः सर्व प्रजा मनूपासून निघाली असें मानीत. परंतु व्यवहारांत असंख्य गोत्रें व असमानप्रवरविवाह चालू असत.

१२ येणेंप्रमाणें कऱ्हाडे, कोंकणस्थ व देशस्थ यांच्या गोत्रांची परंपरा आहे. सप्तर्षींपर्यंत यांचीं गोत्रें जातात व तेथपासून आतांपर्यंत व आपल्यापर्यंत वंश आणून भिडवितां येतो. अशा ह्या वंशांत अहिंदूंचा समावेश होण्याचा बिलकुल संभव व शक्यता नाहीं. अगस्तीसह आठ ऋषि, ४९ प्रवर व अर्बुद गोत्रें, नंतर प्राकृत गोत्रें व नंतर मराठी आडनांवें, अशी अव्याहत परंपरा आहे. भारतीय आर्यांचा वंश येणेंप्रमाणें महाराष्ट्रांत बिनतूट व अस्खलित चालत आलेला आहे. वंशेतिहासाचीं आपल्या इकडे जितकीं साधनें आहेत तितकीं विपुल साधनें अन्यदेशांत व अन्य समाजांत क्वचित् च सांपडतील.

वि. का. राजवाडे

॥ ॐ वेदपुरुषाय नमः ॥

# महाराष्ट्रांतील गेल्या हजार वर्षांतील विचारप्रदर्शनाचें साधन

१ व्यक्ति व समाज यांच्या ठिकाणीं जे अनेक अभिमान दृष्टीस पडतात त्यां-पैकीं एक स्वभाषाभिमान आहे. अभिमान म्हणजे ममत्वाचें उत्कट ज्ञान. वस्तू नित्य जवळ आहे व तिचा हरघडीस आपण उपयोग करीत आहों, अशी जरी स्थिति असली; तत्रापि त्या स्थितीला त्या वस्तूचा अभिमान म्हणतां येत नाहीं. ती वस्तू माझी आहे, ती राखण्याकरितां मी जिवापाड श्रम करीन व इतर वस्तूंच्या मोहानें तिची मीं हेळसांड करणार नाहीं, हेळसांड केली तर मी आपली स्वतःची हेळसांड केली अशा प्रकारचें जें उत्कट ममत्व व ममत्वाचें ज्ञान त्याला त्या वस्तूचा अभिमान म्हणतात. असल्या प्रकारचा अभिमान, असल्या प्रकारचें सज्ञान ममत्व, आपल्या ह्या देशांत कांहीं काल लुप्त झाल्यासारखें दिसत होतें, तें अलीकडे तीस चाळीस वर्षें पुनः उदयास येत असलेलें आढळतें. तो तरी सार्वत्रिक उदय झाला आहे असें नाहीं. उदय फार थोड्या प्रमाणावर झाला आहे. फार तर पांचसहाशें व्यक्तींच्या ठायीं हें उत्कट ममत्व उदित झालेलें दिसतें. तें हि प्रायः पुसट च आहे. उत्कट ममत्व आहे, परंतु संपूर्ण वस्तूविषयीं नाहीं. संपूर्ण वस्तूच्या एका च अंशाविषयीं अभिमान उत्पन्न झालेला दिसतो.

२ महाराष्ट्रांत स्वभाषा म्हणजे मराठी भाषा, असा सार्वत्रिक समज आहे व तो अंशतः बरोबर आहे. पूर्णपणें बरोबर होण्यास, ह्या समजास एक जोड दिला पाहिजे. महाराष्ट्रांत गेलीं एक हजार वर्षें स्वभाषा म्हणजे केवळ मराठी भाषा नव्हे; तर स्वभाषा म्हणजे मराठी व संस्कृत अशा दोन भाषा. गेलीं एक हजार वर्षें महाराष्ट्रांत मराठी भाषेच्या द्वारें हि विचारप्रदर्शन होत आहे व संस्कृत भाषेच्या द्वारें हि विचारप्रदर्शन होत आहे. वेदान्त, तर्क, न्याय, व्याकरण, ज्योतिष, धर्म, नाटक, काव्य, पुराण, वैद्यक, ह्या विषयांवर गेल्या एक हजार वर्षांत महाराष्ट्रांत विचारप्रदर्शन मोठें नामांकित झालें आहे. अपरार्क, हेमाद्रि, बोपदेव, आपदेव, नारायणभट्ट, नागोजीभट्ट, गागाभट्ट, भास्कराचार्य, सूर्यज्योतिषी, गणेशदैवज्ञ, पायगुंडे, पाध्ये, शेष, लौगाक्षिभास्कर, त्र्यंबक वैद्य वगैरे बड्या बड्या धेंडांनीं संस्कृत-द्वारा थोर विचारांचें प्रदर्शन केलेलें आहे. हें विचारप्रदर्शन लहानसहान झालेलें

नाहीं. ह्याच्या तोडीचें प्रदर्शन पश्चिमेकडील किंवा पूर्वेकडील देशांत तत्कालीं क्वचित् च झालेलें आढळेल. संस्कृतभाषेच्या द्वारा जसें विचारप्रदर्शन झालें तसें च मराठी भाषेच्या द्वारा हि गेल्या हजार वर्षांत नांवाजण्यासारखें विचारप्रदर्शन झालेलें आहे. वेदान्त, ज्योतिष, इतिहास, धर्म, वैद्यक, काव्य, इत्यादि विषयांचें उद्घाटण मराठींत छायारूपानें सडकून झालेलें असून, कित्येक मराठी ग्रंथांच्या तोडीचे ग्रंथ तत्कालीन संस्कृत सारस्वतांत नाहींत. बाकी, इतकें मात्र खरें कीं, बहुतेक मराठी ग्रंथ संस्कृत ग्रंथांच्या विस्तृत किंवा संक्षिप्त छाया आहेत. तात्पर्य, मुख्य विचारप्रदर्शन संस्कृतांतून झालें आहे व त्याचें प्रतिबिंब मराठींतून पाडलेलें आहे. विद्वान् ब्राह्मण संस्कृतांत इतर विद्वानांकरितां विचारप्रदर्शन करीत व स्त्रीशूद्रांकरितां त्याचें च प्रतिबिंब मराठींत उठवीत. थोर व गंभीर म्हणून जेवढा विचार तेवढा सर्व संस्कृतांतून बाहेर पडे. त्यांपैकीं स्त्रीबालशूद्र यांच्या योग्यतेचा जो विषय तो प्रतिबिंबरूपानें मराठींत उतरे.

३ महाराष्ट्रांत विचारप्रदर्शन असें हें दुहेरी तऱ्हेनें बिंबप्रतिबिंबरूपानें झालेलें आहे. पैकीं एका च भागाकडे किंवा तोंडाकडे अनुसंधान लावून, म्हणजे मराठी तोंडाकडे च तेवढी दृष्टि देऊन कित्येक लोक महाराष्ट्रांतील सारस्वताचा विचार करतात व किंचित् हिरमुसले होतात. युरोपियन तोडीचें सारस्वत मराठींत नाहीं, मराठींत नाटकें, कादंबऱ्या, शास्त्रीय ग्रंथ वगैरे कांहीं एक नाहीं, असा शेरा हे एकतोंडचे लोक देतात. अर्थात् च मराठीचें क्षुल्लकत्व किंवा अपूर्णत्व तेवढें प्रतीत होऊन, मराठी भाषा—आपली स्वभाषा, आपली अभिमानविषयक स्वभाषा बरीच दरिद्री व कंगाल आहे असा सिद्धांत ते जगजाहीर करतात व एकतोंड्या पाश्चात्यांच्या म्हणण्याला मान तुकवितात. परंतु असला हीनपणा पत्करण्याचें कांहीं एक कारण नाहीं. आधुनिक युरोपियन देशांतल्या प्राकृत भाषांची स्थिति व महाराष्ट्रांतलि प्राकृत भाषेची स्थिति ह्यांत महदन्तर आहे. युरोपियन प्राकृत भाषांच्या स्वभावाचें, स्थितीचें, परिस्थितीचें व कार्याचें साम्य महाराष्ट्रांतील प्राकृत भाषेला लावण्यांत येतें तें शास्त्रशुद्ध नाहीं. महाराष्ट्रांतील मराठी भाषेचा स्वभाव, परिस्थिति, स्थिति, वागणूक, व्याप्ति वगैरे इतकी विषम आहे कीं युरोपियन प्राकृत व प्रचलित भाषाच्या विषयीचे सिद्धान्त मराठी भाषेस लावण्यांत बिलकुल स्वारस्य नाहीं. युरोपांतील आधुनिक प्राकृत भाषा तत्तद्देशस्थ सर्व लोक सरहा वापरतात व त्या भाषांत शास्त्रीय व अशास्त्रीय विषयांवरील विचारांचें व विकारांचें प्रदर्शन करतात. तसा प्रकार महाराष्ट्रांतील आधुनिक प्राकृत भाषा जी मराठी तिचा गेल्या हजार वर्षांत नाहीं. शांत, गंभीर, शास्त्रीय व उच्च दर्जाचें जेवढें सारस्वत तें सर्व ह्या देशांत संस्कृतभाषेच्या द्वारें आविष्कृत झालेलें आहे व ह्या सारस्वतांपैकीं बालस्त्रीशूद्रादि अविद्वान् लोकांना योग्य तेवढा भाग मराठीच्या द्वारा छायारूपानें बाहेर पडलेला आहे.

अर्थात् च युरोपियन प्राकृत भाषांतील सारस्वतांत व महाराष्ट्रांतील मराठी प्राकृतांतील सारस्वतांत नाना प्रकारें वैषम्य आहे. तेव्हां युरोपियन प्राकृत सारस्वताशी मराठी सारस्वताची तुलना करणें मूळांत च अशास्त्रीय आहे.

४ मराठी भाषेच्या स्वभावांत व कार्यांत आणि युरोपियन आधुनिक प्राकृत भाषांच्या स्वभावांत व कार्यांत हा असा फरक कां ? तर त्याचें कारण असें आहे. युरोपियन आधुनिक प्राकृत भाषांनीं लॅटिन, ग्रीक वगैरे पुरातन अभिजात भाषांचा वरपगडा बहुतेक अजीबात झुगारून दिला आहे; तसा उद्धत प्रकार मराठीनें केला नाहीं. तरुणांनीं वडिलांना जो मान दिला पाहिजे तो मराठी संस्कृताला देत आली आहे. कारण, संस्कृत ही मराठीची साक्षात् आजी आहे, ह्या दोन भाषांचा केवळ पौर्वापर्यरूपाचा बादरायण संबंध नाहीं. तशांत ही आजी साक्षात् अद्याप हि जिवंत आहे, मेली नाहीं. असा प्रकार युरोपियन आधुनिक प्राकृतांचा नाहीं. आधुनिक युरोपांत चार प्रकारच्या प्राकृत भाषा प्रचलित आहेतः—( १ ) जर्मानिक प्राकृत भाषा, ( २ ) लॅटिनोद्भव प्राकृत भाषा, ( ३ ) स्लाव्ह प्राकृत भाषा, व ( ४ ) ग्रीकोद्भव प्राकृत भाषा. पैकीं जर्मानिक प्राकृत भाषांचा आणि ग्रीक व लॅटिन ह्या दोन पुरातन अभिजात भाषांचा शरीरसंबंध मुळीं च नाहीं. त्यामुळें ह्या आधुनिक युरोपियन प्राकृतांत व लॅटिन, ग्रीक वगैरे पुरातन अभिजात भाषांत मायेचा अंश बिलकुल नाहीं. लॅटिन मेली काय किंवा ग्रीक उलथली काय, जर्मानिक भाषांच्या डोळ्यांना थोडेंच पाणी येणार! ह्या च कारणास्तव, ग्रीक व लॅटिन भाषांचा पगडा दुःसह होऊन, जर्मानिक भाषांनीं लॅटिन व ग्रीक भाषांतील बायबलाचीं भाषांतरें स्वशब्दांत करून राजरोस किंचित् हि दुःख न होतां त्यांची आपली फारकत करून घेतली. जर्मानिक भाषांची जी वागणूक ती च स्लाव्ह भाषांची. लॅटिन, ग्रीक वगैरे भाषांशीं ह्या स्लाव्ह भाषांचा शरीरसंबंध नाहीं. आतां राहिल्या फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज, इतालियन वगैरे लॅटिनोद्भव भाषा. ह्यांच्यावर लॅटिनचा कांहीं काल थोडासा दाब होता. परंतु हे हि लोक लॅटिन भाषा बोलणारे जे रोमनादि लोक त्यांचे निर्भेळ असे साक्षात् वंशज नव्हत. आधुनिक फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज, इतालियन वगैरे लोकांत गॉल, केल्ट, व्हांडाल वगैरे लॅटिनेतर लोकांचें रक्त अत्यंत मिश्र होऊन अकर्माशेपणा फार आलेला आहे. त्यामुळें लॅटिन भाषेवर निर्भेळ प्रेम ह्या लोकांचे ठायीं यथातथा च आहे. ज्या मानानें वंश अकर्माशा, त्या च मानानें त्यांच्या भाषा हि अकर्माशा. अर्थात् रोमन लोकांच्या लॅटिन भाषेची माया ह्या फ्रेंचादि लोकांत अनिवार अशी कशी रहाणार ? ह्यांनीं हि शेजारच्या व भोंवतालच्या जर्मानिक लोकांप्रमाणें च दूर व अस्पष्ट संबंधाची जी लॅटिन भाषा तिला कालांतरानें तिलांजली दिली व आपल्या अकर्माशा भाषांना मुख्य व अनन्य प्राधान्य दिलें. आणि हा असा प्रकार झाला च पाहिजे. बऱ्याच अंशानें

४

वंशशुद्धीवर भाषाशुद्धि अवलंबून आहे. बऱ्याच अंशानें आचारशुद्धीवर भाषाशुद्धि अवलंबून आहे. जेथें वंश व आचार अशुद्ध अथवा भ्रष्ट झाले तेथें भाषा हि अशुद्ध व भ्रष्ट होते. वंशशुद्धीकडे व आचारशुद्धीकडे आधुनिक युरोपियन भाषांची तरफदारी करतांना युरोपियन भाषाशास्त्रज्ञ विशेष लक्ष जितके देतील तितकें थोडेंच होईल. आधुनिक लॅटिनोद्भव भाषांप्रमाणें च आधुनिक ग्रीकोद्भव भाषांचें चरित्र आहे. त्यांच्यांत हि ग्रीकेतर लोकांचें रक्त प्राधान्यानें खेळत आहे. अर्थात् मृत ग्रीकचा अभिमान व माया त्यांच्या ठायीं तितपत च गोचर होणार. तात्पर्य, (१) जर्मानिक, (२) स्लाव्हिक, (३) लॅटिनोद्भव, व (४) ग्रीकोद्भव अशा ज्या चार प्रकारच्या आधुनिक युरोपियन प्राकृत भाषा त्यांची हालहवाल अशी उद्धत, तुटक व स्वैर आहे.

५ तसा व तितका उद्धट व अकर्माशा प्रकार महाराष्ट्रांतील मराठी प्राकृताचा नाहीं. कारण संस्कृताचा व मराठीचा संबंध अद्यापपर्यंत जन्यजनकत्वरूप असून शुद्ध आहे. महाराष्ट्रांतील आर्यवंशांत वंशशुद्धि व आचारशुद्धि बहुतेक जशीची तशीच आजपर्यंत निर्मळ राहिलेली आहे. युरोपियन किंवा मुसलमान लोकांप्रमाणें वंशाची किंवा आचाराची खिचडी झालेली नाहीं. अर्थात् संस्कृताशीं निकट संबद्ध असल्यामुळें, साहजिकपणें च मराठीच्या ठायीं संस्कृताविषयीं माया राहिली आहे. अथवा नीटपणें सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्रांतील प्राकृत लोकांचा सामान्य व्यवहारांत जसा मराठी प्राकृताचा आश्रय करण्याचा स्वभाव दृष्टीस पडतो तसा च शास्त्रीय व सामान्येतर व्यवहारांत संस्कृताचा आश्रय करण्याचा स्वभाव गोचर होतो. अलीकडे पन्नास पाऊणशें वर्षें, मायभाषा म्हणजे मराठी भाषा, ही च काय ती आपली स्वभाषा व हिचा च तेवढा अभिमान बाळगणें श्रेयस्कर, अशी एकतर्फी कल्पना कित्येक अर्धवट विचार करणाऱ्या व युरोपियन विचारांची व सिद्धांताची अनाठायीं री ओढणाऱ्या लोकांनीं करून घेतली आहे. परंतु तींत काडीचें हि तथ्य दिसत नाहीं. वस्तुस्थिति ह्या एकतर्फी व अर्धवट कल्पनेच्याहून अगदीं निराळी असलेली स्पष्ट दिसते. संस्कृत ही महाराष्ट्रांत मेलेली भाषा नाहीं, जिवंत भाषा आहे. वैयाकरण, ज्योतिषी, वेदांती, पौराणिक, वैद्य ह्या विद्वान् लोकांची अद्याप हि संस्कृत ही च ग्रंथभाषा आहे. आणि स्त्रीशूद्रबालादींची विचारप्रदर्शन व विकारप्रदर्शन करण्याची मराठी ही प्राकृत भाषा आहे. तात्पर्य, गेल्या एक हजार वर्षांत महाराष्ट्रांत दोन भाषा प्रचारांत आहेत, संस्कृत व मराठी; आणि ह्या दोन्ही भाषा स्वभाषा व मायभाषा आहेत. नुकतां परवां केतकर यांनीं आपला ज्योतिषावरील ग्रंथ संस्कृतांत प्रसिद्ध केला आणि सातारच्या माट्यांनीं आपला धर्मावरील ग्रंथ संस्कृतांत लिहिला. युरोपांत जर्मानिक भाषांनीं लॅटिनादि पुरातन भाषापासून फारकत करून घेतली. कारण वस्तुतः त्यांशी मूळापासून च फारकत झालेली होती. रोम येथील पोपाच्या

धर्माधिकाऱ्याच्या भुरळामुळें लॅटिनचा कांहीं काळ बडीजाव जर्मानिक राष्ट्रांत चालला. परंतु दृष्टि विमल झाल्यावर लॅटिन ही आपली कोणी नव्हे हें कळल्यावर, वरील भुरळ उडून गेलें. गेल्या पन्नास वर्षांत आपल्याइकडे याच्याहून उलट प्रकार झाला; जननी जी संस्कृत भाषा तिची फारकत करून घेतल्याशिवाय व मराठींत सर्व व्यवहार केल्याशिवाय युरोपियन लोकांप्रमाणें आपली प्रगति होणार नाहीं अशी अनुकरणात्मक विपरीत कल्पना कित्येक हंडीबाग्यांना प्रथम प्रथम शिवली, व प्राकृत जी मराठी भाषा तिच्याकडे च सर्व दृष्टि देण्याचें भुरळ पडलें. पण हें भुरळ पूर्वेतिहासाच्या विरुद्ध होतें व आहे, हें नुकतें च कोठें कळूं लागलें आहे व कालांतरानें ह्या सिद्धांताची प्रतीति जास्त जास्त येऊं लागेल ह्यांत संशय नाहीं.

६ जसे लोक तशी भाषा, जितपत वंशशुद्धि तितपत पूर्वभाषेची माया, हा सिद्धांत आहे. महाराष्ट्रांत आर्यवंश शुद्ध आहे. त्यामुळें मूळ संस्कृताची माया देशांत कायम आहे. गेल्या एक हजार वर्षांत संस्कृत व मराठी अशा दोन भाषा महाराष्ट्रांत नांदत आहेत. आणि ह्या दोन्ही भाषांत मिळून जें विचारप्रदर्शन झालें तें महाराष्ट्रांतील सबंद सारस्वत होय. बाराशें वर्षांमागें एक हजार वर्षें महाराष्ट्रांत संस्कृत व महाराष्ट्री अशा दोन भाषा प्रचलित होत्या व ह्या दोन्ही भाषांत सारस्वत निर्माण होत असे. म्हणजे विचारप्रदर्शन व विकारप्रदर्शन होत असे. शकपूर्व ८०० वर्षांपासून सुमारें शकोत्तर ४०० पर्यंत संस्कृतांत व महाराष्ट्रींत मिळून सारस्वत उत्पन्न झालें. पुढें महाराष्ट्री मरून आस्तेआस्ते अपभ्रंशद्वारां मराठी उत्पन्न झाली व संस्कृत आणि मराठी अशी जोडी महाराष्ट्रांत नांदूं लागली. महाराष्ट्री यद्यपि मेली व तिची मुलगी किंवा नात जी मराठी ती यद्यपि नांदूं लागली, तत्रापि संस्कृत ही तशीच कायम राहिली. संस्कृत ही ह्या देशांतील स्थिर, कायम, चिरंजीव व अमर भाषा आहे. आणि प्राकृत ही चंचल, बदलणारी, विकारी, अल्पायुषी व मर्त्य अशी भाषा आहे. पूर्वी महाराष्ट्रीरूपानें जी प्राकृत जन्मली तींत काव्यनाटकादि क्षुल्लक ग्रंथरचना सडकून होऊन, तिचा संसार बाराशें वर्षांपूर्वीं संपला. अलीकडे बाराशें वर्षें मराठीचा संसार चालू आहे. तो हि महाराष्ट्रीच्या प्रमाणें च कालान्तरानें योग्य समयीं समाप्त होईल. मराठी ही मर्त्य व मुमुर्षू भाषा आहे. तिच्यांत शास्त्रीय, गंभीर, भारदस्त व दीर्घायुषी असें सारस्वत उत्पन्न होईल, असा संभव फार थोडा आहे. शास्त्रीय, गंभीर व दीर्घायुषी सारस्वत लोकांच्या आंगांत रग, तकवा व जीव राहिला असेल तर अमर जी संस्कृत भाषा तिच्या द्वारां पूर्वीप्रमाणें आतां व पुढें हि होईल.

७ एकूण सांगण्याचा मुद्दा काय कीं महाराष्ट्रांत सदा दोन स्वभाषा चालत आहेत. एक अमर व दुसरी मर्त्य. ह्या दोन भाषांत मिळून जें सारस्वत तें महाराष्ट्रांतील सबंद सारस्वत होय. एकट्या संस्कृताकडे च लक्ष्य देऊन महाराष्ट्रांतील

विचारप्रदर्शनाचा ऊर्फ सारस्वताचा अहवाल पहाणें जितकें चुकीचें तितकें एकट्या मराठीकडे किंवा महाराष्ट्रीकडे पाहून सारस्वताची परीक्षा करणें चुकीचें व भ्रामक होईल. दोन्ही भाषांतिल सारस्वताचा परामर्श जेव्हां घ्यावा तेव्हां महाराष्ट्रांतील संपूर्ण सारस्वताचा विस्तार कळतो. आणि मग विचारी व अभिमानी मनाला संतोष होतो व समाधान वाटतें. ह्या दोन्ही स्वभाषांत झालेल्या सारस्वताचा इतिहास मोठा उमदा, उत्तेजक व अभिमानजनक असा आहे. पृथ्वी गोल आहे व तिच्यांत गुरुत्वाकर्षणशक्ति आहे, हें संस्कृतांत सांगणारा पाटणचा भास्कर हि स्वभाषा जी संस्कृत तींत सखोल विचारप्रदर्शन करतांना दिसतो व अभिलषितार्थचिंतामणींतील गोड पदें मराठी भाषेत गाणारा अनामककवि हि दुसरी स्वभाषा जी मराठी तिचा आश्रय करतांना आढळतो. पाटणास भास्कराचार्यांच्या नातवानें आपल्या आजाच्या कीर्तीचा स्तंभ शिलालेखरूपानें उभारिला आहे त्यांत तर ह्या आपल्या दोन्ही स्वभाषांचा जो उपयोग केला आहे तो तर स्वभाषाद्वयत्वाच्या सिद्धान्ताचा नामी निदर्शक आहे. ह्या शिलालेखांत प्रथम संस्कृत स्वभाषेचा उपयोग केलेला आहे आणि शेवटीं मराठी स्वभाषेचा आश्रय केला आहे. देवगिरीच्या हेमाडपंतानें चतुर्वर्गचिंतामणी नामक प्रचंड ग्रंथ संस्कृतांत लिहिला व आयव्ययाची पद्धति मराठींत प्रविष्ट केली. दासोपंतांनीं लक्षावधि पदें मराठींत गाइलीं व उपनिषद्भाष्यें संस्कृतांत लिहिलीं. रामदासांनीं तर तीन भाषांचा आश्रय केला. दासबोध मराठींत लिहिला; किस्ता महाराष्ट्रींत वळविला; व भक्तिमार्गाचा एक ग्रंथ संस्कृतांत सांगितला. मयूरपंडितांनीं ऊर्फ मोरोपंतांनीं अशी च मराठींत व संस्कृतांत ग्रंथरचना केलेली सर्वश्रुत च आहे. ही दुभाषी पद्धती वामनपंडितांनीं हि स्वीकारिलेली आहे. हे सर्व दाखले शंभर वर्षांपूर्वीचे झाले. अलीकडील काळांत हि हा प्रघात चालू असलेला च दिसतो. शंकर दीक्षित भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास मराठींत लिहितात; तर केतकर आपल्या केतकीचा सुवास गीर्वाणकूपिकेंत सांठवितात. केरोपंत ग्रहांचें लाघव मराठींत दाखवितात, तर बाळशास्त्री यूरोपीयन गणित संस्कृतांत बोलतात. विष्णुशास्त्री स्वाभिमान मराठींत शिकवितात; तर दामले शास्त्री तें च काम संस्कृतांत करतात. आमचे विद्वान् मित्र भाऊशास्त्री वांईकर धर्मप्रवचन मराठींत करतात, तर तो च उद्योग आमचे दुसरे विद्वान् मित्र विद्यावाचस्पति राशिवडेकर संस्कृतद्वारां प्रकटितात. असे एक ना दोन शेंकडों दाखले देतां येतील.

८ तात्पर्य, आपलें हें महाराष्ट्र दुभाषी आहे, एकभाषी नाहीं. अर्थात् च आपलें सारस्वत दोन भाषांत आहे, एक भाषेंत नाहीं. तेव्हां ओघास च येतें कीं, जर आपल्या देशांतील सारस्वताचा इतिहास लिहिणें आहे, तर तो संस्कृतांत झालेल्या सारस्वताचा व मराठींत झालेल्या सारस्वताचा मिळून लिहिला पाहिजे, तुटक लिहून काम भागणार नाहीं. तुटक लिहिला तर अर्धवटपणा पदरांत येईल व नसता

कमीपणा पाठीस चिकटेल. तुटक लिहिला, तर महाराष्ट्रांतील विचारांच्या व विकारांच्या प्रदर्शनाचा इतिहास भ्रामक वठेल व दिशाभूल होईल. यूरोपांतल्याहून आपल्या इकडील सर्व च गोष्टी भिन्न आहेत. तिकडे वंशभ्रष्टता आहे, इकडे वंश-शुद्धि आहे.. तिकडे एकवर्ण आहे, इकडे चातुर्वर्ण्य आहे. तिकडे रानटीपणांतून संस्कृतींत प्रवेश होत आहे, इकडे आपल्या महाराष्ट्राला रानटीपणाची स्थितीच माहीत नाहीं. तिकडे तामस व राजस गुणांचा ताप आहे; इकडे सात्विक व राजस गुणांचें चांदिणें आहे. ते समाज मर्त्य आहेत, हा समाज अमर आहे. ते लोक बहिर्दृष्टि आहेत, आपण लोक प्रायः अंतर्बहिर्दृष्टि आहोंत. त्यांच्या चरित्रांतील नियम आपल्या चरित्राला लागू पडणार नाहींत. आपल्या चरित्राचे नियम आपण आपल्या बुद्धीनें शोधून जेव्हां काढूं, तेव्हां ते आपल्या हिताचे होतील आपल्याला निःश्रेयसाला नेतील.

९ महाराष्ट्रांतील प्राकृत भाषेचा ऊर्फ मराठीचा इतिहास व मराठीभाषाद्वारां झालेल्या विचारविकारप्रदर्शनाचा इतिहास स्वतंत्रपणें लिहितां येईल. तो लिहिण्या-पासून कांहीं सिद्धान्त हि उपलब्ध होतील. परंतु तो इतिहास म्हणजे महाराष्ट्रांतील सर्व विचारांच्या व विकारांच्या प्रदर्शनाचा इतिहास नव्हे. सर्व विचारांच्या व विकारांच्या प्रदर्शनाचा इतिहास हवा असेल तर संस्कृतांत व मराठींत जेवढें म्हणून विचारप्रदर्शन व विकारप्रदर्शन झालें असेल तेवढ्या सगळ्याचा इतिहास दिला पाहिजे. आणि असा सर्वांगीण इतिहास किती मनोहर होईल म्हणून सांगावें. गेल्या हजार बारांशें वर्षांत अद्वैत व द्वैत वेदान्त, षड्दर्शनें, व्याकरणशास्त्र, ज्योतिषशास्त्र, धर्मशास्त्र, रसविद्या, वैद्यक, गणित, वस्तुशास्त्र, भक्तिमार्ग, इतिहास, काव्यें, नाटकें, वगैरे विषयांवर मोठी नामांकित विचारसंपत्ति आपण कमाविलेली आहे, अशी कीं तिजकडे पाहून सर्व जगाला कौतुक वाटावें व असलेल्या संपत्तींत विपुल भर टाकून मनुष्यजातीच्या ऐहिक व पारमार्थिक सुखाची परमावधि गांठण्याला आपणाला निरलस प्रोत्साहन यावें.

१० आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, हा द्विभाषात्वाचा चमत्कार आपल्या इकडे च कसा उद्भवला ? तर याचें उत्तर असें. आपल्या इकडे वेदकालापासून च शिष्ट व अशिष्ट असे भाषेचे दोन प्रकार उद्भूत होते. सुविद्य लोक शिष्ट भाषा वापरीत व अविद्य लोक अशिष्ट भाषा बोलत. सुविद्यांची जी शिष्ट संस्कृत भाषा ती त्या लोकांच्या स्वभावाप्रमाणें स्थिर, व्यवस्थित व अमर अशी झाली. आणि अविद्यांची जी अशिष्ट भाषा ती त्या लोकांच्या स्वभावाप्रमाणें अस्थिर, अव्यवस्थित व मर्त्य अशी झाली. वेदकालापासून आतांपर्यंत अशिष्ट जी प्राकृत भाषा ती तीनदां मेली आहे व सध्यां मराठीच्या रूपानें तिचा चौथा जन्म चालू आहे. हा हि चौथा जन्म

संपून, ही अशिष्ट भाषा कालांतरानें पांचवा जन्म घेईल. परंतु अमर जी संस्कृत ती तेव्हां हि अमरनदी जी गंगा तिजप्रमाणें अस्खलित वहात राहील. मराठींत आजपर्यंत जें सारस्वत झालें आहे व पुढें कांहीं काल होईल तें महाराष्ट्रींतल्या व अपभ्रंशांतल्या सारस्वतामध्यें मरून जाईल परंतु संस्कृत सारस्वताचा ओघ पूर्वीप्रमाणें व आतांप्रमाणें च पुढें हि असा च अव्याहत चालत राहील. ऋषिपुत्र आहोंत. आपल्याला दोन अंगें आहेत; एक अमर व दुसरें मर्त्य. मर्त्य अंग जें आहे तें स्वभावानुरूप जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत फिरत राहील. अमर अंग, मात्र कालाच्या परमावधीपर्यंत स्थिर च राहील. ह्या द्विभाषात्मक चमत्काराचें कारण अन्य शब्दांनीं द्यावयाचें झाल्यास असें देतां येईल. 'न ब्राह्मणेन म्लेछित वै' अशी श्रुति आहे. ही श्रुति असुरांना अनुलक्षून आहे. परंतु, ती अब्राह्मण हिंदूंना हि लावतां येईल. ब्राह्मणेतर अशुद्ध व अपभ्रष्ट बोलले तरी चाले. परंतु, ब्राह्मणानें संस्कृत व शुद्ध च बोललें पाहिजे अशी श्रुति आहे. अर्थात् ब्राह्मण संस्कृत बोलत व लिहीत आणि प्रायः द्विजेतर अपभ्रष्ट प्राकृतांत व्यवहार करीत. अर्थात् दोन भाषा फार पुरातन कालापासून ह्या चातुर्वर्ण्य समाजांत नांदत आल्या आहेत. पैकीं संस्कृत, ब्राह्मणांचें संस्कृत टिकाऊ, कायम व अमर आहे. ब्राह्मणेतरांचें प्राकृत, चल व मर्त्य आहे. अनेक द्विजांनीं प्राकृतांत ग्रंथरचना केली आहे. परंतु कोण्या शूद्रानें संस्कृतांत ग्रंथरचना केलेली प्रायः महशूर नाहीं.

११ हें मर्त्य अंग कालावछेदानें जसें बदलतें तसें च देशावछेदानें हि बदलतें. बंगाली, हिंदी, गुजराथी वगैरे सर्व गौड भाषा देशावछेदानें उत्पन्न झालेल्या आहेत. त्यांचें हि चरित्र मराठीप्रमाणें च आहे. त्या त्या प्रांतांतील सारस्वताचा इतिहास म्हणजे संस्कृत भाषेंतील सारस्वताचा इतिहास व त्या त्या प्रांतिक भाषेंतील सारस्वताचा इतिहास.

१२ प्रांतिक भाषा भिन्न आहेत व मर्त्य आहेत. परंतु, अमर जी संस्कृत ती भारतीय आर्यांना समान आहे. सर्व भरतखंडांत एकभाषेनें व्यवहार होणें जर आवश्यक असेल व आहे, तर तो व्यवहार संस्कृत भाषेनें होत आहे व होईल. इंग्रजी, उर्दू, हिंदी ह्यांपैकीं एकीची हि लायकी सर्वसामान्य व सार्वभारतीय होण्याची नाहीं. तें काम सर्वप्रिय, सर्वमान्य व सम्राट् अशी जी संस्कृत भाषा ती आजपर्यंत करीत आली आहे व पुढें हि करीत राहील. संस्कृत भाषा हें महद्भूत आहे. महद्भूतांत क्षणोक्षणीं मज्जन करीत असून, प्राणिमात्राला त्याचें भान नसतें. तद्वत् च संस्कृत भाषारूपी महद्भूतानें आज हजारों वर्षें पछाडलें असून, बिचारीं भ्रांत मानवें एकभाषेच्या शोधार्थ भटकत आहेत. वामन म्हणतातः—

**वळख तूं आपणास चि आपण**

१३ महाराष्ट्रांतील स्वभाषा ज्या संस्कृत व मराठी त्यांचा विचार येथपर्यंत असें अधिष्ठान कल्पून केला कीं महाराष्ट्रांतील प्रजा चातुर्वर्ण्यनिष्ठ शुद्धवंशी व सनातनधर्मी आहे. परंतु, ब्रिटिश राज्य, ब्रिटिश शिक्षण व ख्रिस्ती धर्म यांच्या प्रसारानें, तसें च सुधारक म्हणविणाऱ्यांच्या चळवळीनें ह्या भाषांवर काय परिणाम होईल तें हि पहाणें अगत्याचें आहे. ज्याचें राज्य त्याची भाषा, हा एक सिद्धान्त आहे. त्याप्रमाणें इंग्रजी शिकलेल्यांनीं अनेक व्यवहारांत इंग्रजी भाषा स्वीकारिलेली आहे. कॉंग्रेसेस्, कॉन्फरन्सेस्, कोर्ट्स्, स्कूल्स्, कॉलेजेस् व कौन्सिल्स् ह्यांत सर्वत्र इंग्रजी भाषा चालणार व तेवढ्या अंशानें संस्कृतमराठींची पिछेहाट होणार हें निश्चित आहे. पुढारी म्हणविणाऱ्यांत व लोकांत असा कांहीं हट्ट ऊर्फ अभिमान दिसून आलेला नाहीं, कीं सर्वत्र आपण स्वभाषा च वापरणार व स्वभाषेवांचून इतर भाषा वापरणार नाहीं. तात्पर्य, ब्रिटिश राज्य व ब्रिटिश शिक्षण यांनीं संस्कृतमराठींचा संकोच होईल व होत आहे, हें स्पष्ट आहे. ख्रिस्तीधर्मप्रसारानें निराळें च एक कार्य होईल. जो जो म्हणून ख्रिस्ती होतो त्याची इकडील वैदिक परंपरा तुटते, अर्थात् संस्कृत भाषेला व परंपरेला तो पारखा होतो. कांहीं काल व एकदोन पिढ्या त्याचा व्यवहार भ्रष्ट मराठींत चालेल. परंतु असा एक काल लवकरच येईल कीं हिंदुस्थानांतील ख्रिस्ती बाट्यांना आपली स्वतःची अशी एक सामान्य भाषा निर्माण करावी लागेल. तामील, तेलगू, कानडी, मराठी, गुजराथी, पंजाबी, हिंदी, बंगाली, खोंडी, वगैरे विसदृश भाषा बोलणारे कनिष्ट जातींचे लोक ख्रिस्ती होत आहेत. त्यांच्यांत शरीरसंबंध वाटतील तसे होत आहेत व होतील. ह्या स्थित्यंतराचा शेंदोनशें वर्षांत असा परिणाम होईल कीं, ह्या भिन्न भाषा बोलणाऱ्या ख्रिस्त्यांत उर्दूसारखी एक इंग्रजीमिश्रित सामान्य भाषा अस्तित्वांत येईल, किंवा हे बाट्ये लोक सररहा ख्रिस्ती नीग्रोंच्याप्रमाणें धेडगुजरी इंग्रजी भाषा बोलूं लागतील. कोणती हि तऱ्हा अमलांत आली, तत्रापि संस्कृतमराठींचा संकोच च होईल. सुधारक म्हणविणाऱ्यांची चळवळ हि चातुर्वर्ण्यविरुद्ध, वंशशुद्धिविरुद्ध व सनातनधर्माविरुद्ध असल्यामुळें त्यांचे अनुयायी संस्कृताला सहजच गचांडी देतील व मराठींत विशेष तथ्य नसल्यामुळें, राजभाषा जी इंग्रजी तिचा स्वीकार करतील. हा विकार आज च पांच पन्नास वर्षांत दृष्टीला दिपवून टाकील असें नव्हे. परंतु शंभरसवाशें वर्षांत सुधारकचमू सनातनधर्माबरोबर संस्कृतमराठींना लत्ताप्रहार मारील यांत काडीचा हि संशय नाहीं. ब्रिटिश साम्राज्य रोमन साम्राज्याचें अनुकरण करीत आहे हें जर खरें मानलें व रोमन साम्राज्याची हयात ब्रिटिश साम्राज्याला दिली, तर येत्या पांचशें वर्षांत संस्कृतमराठींचा नायनाट होऊन, इसवी सन २५०० त एक धेडगुजरी इंग्रजी भाषा महा-

राष्ट्र नांवाच्या देशांत प्रचलित असलेली दिसेल. त्या कालीं वेद, सनातनधर्म; संस्कृतवाणी व मराठी भाषा, हे केवळ पुरातन इतिहासाचे विषय होऊन बसतील अथवा कदाचित् अमेरिकन इंडियनांच्या भाषेची स्थिति मराठीला आलेली तत्कालीन संशोधकांच्या नजरेस पडेल!

वि० का० राजवाडे

## ३ बोडण

नित्य जे वार्षिक कुलाचार व नैमित्तिक जे विवाहादि संस्कार ह्यांच्या प्रारंभीं किंवा अंतीं बोडण भरण्याची चाल कोंकणस्थांत आहे. बोडण भरणें म्हणजे कोणत्या हि शुभ धातूची देवीची प्रतिमा अथवा प्रतीक घेऊन, तिला अन्नाचे, प्रायः कणकेचे अलंकार घालून, अन्नाचा प्रायः दहीदुधाचा अभिषेक करून, अन्नाचा म्हणजे पुरणाचा नैवेद्य दाखविणें. नैवेद्य दाखविल्यावर, मूर्तीसुद्धां सर्व संभार सुवासिनी एकत्र कालवितात आणि शेवटीं उत्तरपूजेकरितां प्रतिमा काढून घेऊन, नंतर त्या कालविलेल्या संभारांतून भोजनास आलेल्या सर्व कुलस्त्रियांस, कुलपुरुषांस व कुलबालकांस प्रसाद वांटतात. असा हा बोडणाचा विधि आहे. हा विधि श्रुतिस्मृतिशास्त्रोक्त नाहीं, तंत्रोक्त आहे. गोपीनाथ दीक्षित ओक यांनीं शक १६८७ त समाप्त केलेल्या संस्काररत्नमाला नामक ग्रंथांत, हा बोडणाचा कुलाचार सांगितला आहे. हा संस्काररत्नमाला ग्रंथ–आनंदाश्रम–संस्कृत ग्रंथावलींत छापून आलेला आहे. त्याच्या २६५ पृष्ठावर गोपीनाथ दीक्षित म्हणतातः—

" यदि मोटनाचारश्चेत् सोपि कार्यः । तच्च मोटनं उक्तं मेरुतंत्रे—

अथ मोटनकं वक्ष्ये देवाविर्भावकारणं ।
पाकक्रिया प्रकर्तव्या चतुर्भक्ष्यसमन्विता ॥
भार्यया साधकेन्द्रस्य पातिव्रत्यादियुक्तया ।
अप्रसूताः स्त्रियः पंच आहूय सुकुमारिकाः ॥
अलंकृताः पवित्रास्ता एकपंक्त्योपवेशयेत् ।
तत्रादौ विघ्नपस्थानमंत्रे तु वटुकस्य च ॥

चकारात्कुलदेवतायाः

ताः संपूज्य महापात्रे पवित्रे तत्र चार्पयेत् ।
क्रमाद्वृद्धिगुणमानेन मध्वाज्ये च सितादधि ॥

दुग्धं च निक्षिपेत्तत्र नैवेद्यं तत्र निक्षिपेत् ।
कुमारिकायाहस्तेन मन्थयेयुः स्त्रिय श्च तत् ॥
स्त्रीभि स्तस्मिन् मथ्यमाने देवावेशः प्रजायते ।
देवावेशे जायमाने सुगंधो वाति मारुतः ॥
सर्वं मनोगतं वक्ति देवताशु प्रसीदति ।
सिध्यंति सर्वकार्याणि मोटनानां शतेन च ॥
नखै र्भवेद्विवाहस्तु पंचाशद्भिः सुतस्तथा ।
नखै विंशैरित्यर्थः । पंचाशद्भिः सुतलाभ इत्यर्थः ।
अशीत्या गतराज्याप्ति र्विंशत्या लभते धनं ।
अष्टोत्तरशतेनापि असाध्येन तु मेलयेत् ॥
कौमारिका चेष्टदेवं कौमार्यां ईरितो विधिः । इति ।
कौमारी योगेश्वरी । तदुद्देशेन विधिर्भवतीत्यर्थः ।

सैंपाक करावा, पांच अप्रसूत स्त्रिया पांच कोंवारणींसह बोलवाव्या, जोगेश्वरीची प्रतिमा घ्यावी, मोठी परात घ्यावी, तींत मध, धूप, साखर, दहीं, दूध व नैवेद्य घालावा व त्या स्त्रिया व कोंवारणीं ह्यांच्याकडून तो संभार कालवावा. कालवतांना देवी अंगांत येते व सर्व मनोगत बोलते. शंभर बोडणांनीं सर्व कार्यें सिद्ध होतात. वीस बोडणांनीं लग्न होतें. पन्नासांनीं पुत्र होतो. ऐशींनीं गतराज्य मिळतें. वीसांनीं धनसंपत्ति मिळते. अष्टोदर्शांनीं असाध्यसिद्धि होते.

असा हा मेरुतंत्रोक्त विधि आहे. कित्येक तंत्रोक्त विधि श्रुतिस्मृत्युक्त असतात. त्यांपैकीं हा हि विधि कदाचित् असेल.

मोटन = बोडण = बोडण

गोपीनाथ दीक्षित कोंकणस्थ पडले. तेव्हां त्यांनीं ह्या आचाराचा उल्लेख केला. नारायण दीक्षितादि देशस्थ धर्मशास्त्रकार ह्या विधीचा उल्लेख करीत नाहींत. गोपीनाथ दीक्षित ओक आनंदीबाई पेशवीण इचे संबंधी होते म्हणतात.

विप्रांचें मोटन ऊर्फ बोडण ज्या आचारानें होतें त्या आचाराचें नांव बोडण.

ज्या आचारांत अन्नादि संभार मोडून चूर्ण करावयाचा असतो तो बोडण विधि होय.

वि० का० राजवाडे

५

॥ श्रीरामसमर्थ ॥

# ४ येक्केहाळी येथील श्रीरामदासी विद्यापीठ

## ( श्रीरामदासविश्रामधाम )

दासविश्रामधामरंगणीं । साधुसंतांच्या बैसल्या श्रेणी ।
आत्माराम जो त्रैलोक्यधणी । सांभाळावया सिद्ध असे ॥

**श्रीरामसमर्थ** म्हटलें म्हणजे उभयतांचें हि स्मरण एकदम अनायासें होतें. तें स्मरण नमनपूर्वक करून आज एका श्रीरामदासी विद्यापीठाची हकीकत सादर करीत आहें.

**श्रीसमर्थांचे** प्रमुखांतले प्रमुख शिष्य श्रीकल्याणस्वामी होत. त्यांचा मठ श्रीक्षेत्र डोमगांवीं आहे. कुरडूच्या वाडीपासून उत्तरेस सात कोस सीना नदीचे कांठीं डोमगांव आहे. शके १६३६च्या आधिक आषाढ शुद्ध १३ ला श्रीकल्याणस्वामींनीं समाधि घेतली. त्यांच्या शिष्यांत मुद्गलस्वामीशिवाय तडवळ्याचे जगन्नाथ व आपचंदचे शिवराम हे दोघे शिष्य प्रमुख होत. शिवरामांनीं शके १६४८ च्या मार्गशीर्ष शुद्ध ७ स आपला देह ठेविला. त्यांची समाधि आपचंदास आहे. त्यांचे शिष्य रामचंद्र यांनीं शके १६९९ त आपलें अवतारकृत्य संपविलें. आपचंद मठाची हि हकीकत स्वतंत्रपणें केव्हां तरी सांगण्यासारखी आहे. या रामचंद्रांचे शिष्य श्री आत्माराम महाराज होत. वर दिलेली परंपरा आपल्या स्मरणांत रहावी म्हणून आत्मारामहाराजांनीं परंपरेवर आरती केलेली आहे, ती येथें देतोः—

जय जया पारंपरा नारायणा श्रीवरा ।
आरती वोवाळीन हृदयसिंधुविहारा ॥ ध्रु० ॥
विष्णु वैकुंठवासा हंस देव सर्वेशा ।
बोध वेध पूर्ण ब्रह्मा सत्यलोकनिवासा ॥ १ ॥
वसिष्ठ ज्ञानदातया जय श्रीरामराया ।
हृत्तापशोकहरणा जय अंजनीतनया ॥ २ ॥
रामदास दासपोषका जय कल्याणसखा ।
बावा शिवरामस्वामी रामचंद्र देशिका ॥ ३ ॥
ऐसी हे दिव्य नामें नित्य जपे जो प्रेमें ।
भेदभाव निरसोनिया स्वयें होय आत्माराम ॥ ४ ॥

आत्माराम महाराज कांहीं काळ आपचंदास राहून नंतर येक्केहाळीस राहावयास गेले. गुलबुर्ग्यापासून उत्तरेस सहा कोस आपचंद आहे व बेदरच्या दक्षिणेस आठ नऊ कोस येक्केहाळी आहे. येक्के म्हणजे एक व हाळी म्हणजे खेडें. येक्केहाळीस आत्मारामहाराजांची समाधि आहे. या येक्केहाळी मठाची थोडीशी हकीकत आज आपणांस सांगावी असें योजिलें आहे. आत्माराममहाराजांचें स्वतःचें चरित्र अन्य प्रसंगीं सांगूं. आज मित्तीला मठाचें स्वरूप कसें आहे, मठांत ग्रन्थसंग्रह काय उरला आहे, वगैरे हकीकत आपणांस सांगावी व त्यावरून ज्या काळीं मठांत आत्मा नांदत होता त्या काळीं मठाचें वैभव कसें असलें पाहिजे याची कल्पना करण्याचें काम आपणांवर सोंपवावें असा हेतु आहे.

येक्केहाळी मठांत एकंदर लहानमोठ्या १३१ पोथ्या मिळाल्या व १७ बाडें मिळालीं. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, येकनाथ, तुकाराम, श्रेष्ठ, केशवस्वामी, जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, उद्धवचिद्घन, मुक्तेश्वर, पूर्णानंदाचे शिवरामस्वामी, वामन, देवदास, आनंदतनय, गोसावीनंदन, शिवादिनकेसरी, उद्धवसुत, अमृतेश्वर, माधवदास, श्रीधर, रत्नाकर, पुरंधर विठ्ठल, नरसिंह विठ्ठल, कचेश्वर, होनाजी बाळ, बस्वलिंग इत्यादि आपल्या परिचयाच्या साधुसंतांचे ग्रन्थ आज हि या मठांत आहेत. श्रीसमर्थांचे बहुतेक ग्रन्थ आहेत हें सांगितलें च पाहिजे असें नाहीं. या सर्व ग्रन्थांचें महत्व फार आहे, पण त्यांचा आज विचार करण्याचा हेतु नाहीं. तसें च मठांत कांहीं ग्रन्थ अपूर्ण असल्यामुळें किंवा त्यांवर नामनिर्देश नसल्यामुळें ते कोणीं केलेले आहेत हें सांगण्याला मार्ग नाहीं. असे हि ग्रन्थ आज बाजूस ठेवतों. अशा ग्रंथांपैकीं एक एकनाथकालीन श्रीमत् भगवद्गीतेवर टीका आहे ती फार महत्त्वाची आहे. आज येथें फक्त आजपर्यंत ऐकून हि ठाऊक नसलेल्या सत्पुरुषांचा व ठाऊक असलेल्या सत्पुरुषांच्या अप्रकाशित ग्रन्थांचा उल्लेख करावयाचा आहे. पूर्णानंदांच्या शिवरामस्वामींचे जे ग्रन्थ या मठांत मिळाले, त्यांचें टांचण अन्य प्रसंगीं* केलेलें च आहे, तेव्हां येथें त्याची पुनरुक्ति करीत नाहीं.

## ( १ ) जीवन्मुक्त

येक्केहाळीच्या दक्षिणेस सुमारें दहा कोस अन्वार म्हणून गांव आहे, तेथें या जीवन्मुक्तांचा मठ आहे. त्या प्रांतीं जीवन्मुक्तांचें नांव पुष्कळ ठिकाणीं ऐकूं येतें. तिकडे यांना मुक्तेश्वर हि म्हणतात, यांचे दोन ग्रन्थ येक्केहाळी मठांत मिळाले.

( पहिला ):— **जीवन्मुक्ती ऊर्फ गीताप्रभाकर** ( अनुक्रमांक ३ )

ही श्रीमत् भगवद्गीतेवर टीका आहे. प्रथम मूळ संस्कृत श्लोक एक एक देऊन त्यावर टीका। एक श्लोक व एकादुसरें पद असावयाचें, असा या ग्रन्थाचा क्रम आहे. उदाहरणार्थ :—

* भा. इ. सं. मंडळाचा अहवाल शके १८३४ चा, लेखांक ४६ पहा.

श्लोकः—स एवायं मया तेद्य योगः प्रोक्तः पुरातनः।
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ३

टीकाः—तो हा चि आजी तुजलागि पार्था।
सांगीतला योग अनादि आतां।
तूं भक्त माझा जिव तूं जिवाचा।
रहस्य हें उत्तम गा त्रिवाचा ॥

पद्–जिवलग निजभक्त तूं असुचा। म्हणउनि सुमति साचा ॥ १ ॥
तुज म्यां सांगितला तो आतां। योग पुरातन निरुता ॥ ध्रु०॥
सकाळ गुह्याचें निजसार। सर्वोत्तम अविकार ॥ २ ॥
जीवन्मुक्ताचें जिव्हार। अद्वय सुखभांडार ॥ ३ ॥

( दुसरा ):—**जीवन्मुक्तिवाक्य** ( अनुक्रमांक १० )

हा ग्रन्थ गद्यात्मक आहे. ग्रन्थ लहान आहे, छापल्यास शंभर पृष्ठें च भरतील, पण फार महत्त्वाचा आहे. यांत दुर्गम तत्त्वें सोप्या भाषेंत सुगम करून सांगितलीं आहेत. १ क्षराक्षर, २ बद्ध, ३ मोक्ष, ४ शब्दव्याख्यान, ५ त्रिताप, ६ ज्ञानभक्तिवैराग्य, ७ सप्तावस्था, ८ साधक, ९ संसारवृक्ष, १० वाक्यार्थ, ११ द्वैताद्वैतातीत, १२ निश्चय, १३ ज्ञानी, १४ त्रिपुटी, १५ प्रकृतिपुरुष, १६ सर्वसाक्षित्व, १७ दैवासुरमाया, १८ सुलभउपाय, १९ देशकालवस्तुपरिच्छेद, २० पंचविध भेद, २१ अन्वयव्यतिरेक, २२ ज्ञान, २३ अन्यथाज्ञान, २४ निरभिमान दशा, अशीं या ग्रन्थचीं प्रकरणें आहेत. उदाहरणार्थ आठवें प्रकरण देताः—

साधक प्रकरण प्रारंभ ॥ साधक जो आहे तेणें ब्रह्मस्वरूप पाहावें ॥ म्हणउन अपेक्षा असली तर त्यानें हे साधना करावी ॥ तें साधन सांगताहेत ॥ स्थूळ सूक्ष्म देहद्वयास मागें टाकून अंतर्मुख होऊन निश्चळ मन करून उगेंच पाहावें ॥ पाहतां पाहतां अंधार दिसतो तो अंधार पाहावा ॥ तो अंधार पाहतां पाहतां अंधार जातो ॥ प्रकाश होतो ॥ तो प्रकाश पाहतां पाहतां प्रकाशामधें केवळ चैतन्यस्वरूप आहे ॥ तें च आपण आहे ॥ ऐसें जाणितल्यानें तो प्रकाश माघें पडतो ॥ स्वयंप्रकाश स्वयंज्योति परिपूर्ण चैतन्य आपण आहे ॥ ऐसा निश्चय होतो ॥ तत्त्वमसि महावाक्येकडून माया अविद्या जीव ईश्वरपण जाऊन केवळ चैतन्य उरतें ॥ तें चैतन्य या अंतर्दृष्टीकडून अंधार प्रकाश दोन्ही जातां उरलें तें स्वयंप्रकाश स्वयंज्योति चैतन्य ॥ तें चि केवळ चैतन्य ॥ त्या केवळ चैतन्यास परब्रम्ह म्हणावें ॥ तें च आपुलें स्वरूप ॥ तें च ईश्वराचें स्वरूप ॥ ऐसें जाणोन त्या स्वरूपस्थितीनें असावें ॥ ते चि सायुज्यमुक्ति ॥ इत्यादि.

दोन्ही ग्रन्थांत शक कोठें आला नाहीं, त्यामुळें जीवन्मुक्त केव्हां होऊन गेले तें सांगतां येत नाहीं. आणखी शोध केला पाहिजे. परंपरेचा एक श्लोक ग्रन्थारंभीं दिला आहे, तो असाः–

> आदिनाथं च मच्छेंद्रं गोरक्षं गयनीं तथा।
> निवृत्तिं ज्ञानदेवाय जीवन्मुक्ताय ते नमः ॥

## ( २ ) अज्ञान सिद्ध नागेश

हे सिद्ध नागेश कोण याचा उलगडा झाला पाहिजे. वडवाळ सिद्धनागनाथ ते हे नव्हत. वडवाळ सिद्धनागनाथांचा काळ शक १३०० ठरला आहे.

"पंचीकरणप्रमेय अविंध भाषा" असें एक प्रकरण येकेहाळी मठांतील संग्रहांत आहे ( अनुक्रमांक ३८ व त्याची च नक्कल ७० ). प्रकरण फार महत्त्वाचें आहे. त्याचीं पाठपोट आठ पृष्ठें आहेत. तें सबंध प्रकरण केव्हां तरी प्रसिद्ध केलें पाहिजे. डाव्या बाजूला प्राकृत पंचीकरण देऊन उजव्या बाजूला त्याला मुसलमानी पर्याय दिला आहे. उदाहरणार्थः—

| | |
|---|---|
| आवस्छा चारी ४ | हाल ४ |
| १ जाग्रती १ | १ बेदारी |
| १ स्वप्नावस्था २ | १ हालखाब |
| १ सुषुप्ती ३ | १ बेहोसी |
| १ तुर्यावस्छा ४ | १ हालहोसी |
| ४ | ४ |

प्रकरणाच्या अंतीं म्हटलें आहेः—

| | |
|---|---|
| इति मृत्युंजय अज्ञा | इति मृत्युंजयकु अ |
| न सित्ध नागेश पृत्छा | ज्ञान सित्ध नागेश पु |
| निश्चय ॥ | छाया हक्क ॥ |

## ( ३ ) सहजानंद

" ब्रम्हबोध " नांवाचा एक अपूर्ण पण अपूर्व ग्रन्थ या मठांत आहे (अनुक्रमांक १०४ ). ग्रन्थ श्लोकबद्ध आहे. पहिला अध्याय १४८ श्लोकांचा पूर्ण असून दुसऱ्या अध्यायाचे ३१ श्लोक आहेत. आणखी किती श्लोक आणि अध्याय पुढें असावेत कोण जाणें. मीं हे श्लोक वाचले, ते मला फार गोड वाटले. पहाः–

परिस वचन माझें सांगतो ब्रह्मबोध ।
करुनि मन सुचीत ऐक पा आत्मशुद्ध ।
प्रथम त्रिविध भक्ति ज्ञान वैराग्य थोर ।
वदवि गुरु दयाळु श्लोक साक्षात्कार ॥ १/२ ॥
सत्यं ज्ञानमनंतं ब्रम्ह ह्मणतां वेवाद सर्वा मुखीं ।
शास्त्रें वेद पुराण सर्व पढतां पांडित्य वाढेल कीं ।
वस्तु सत्य जगत्य व्याप्य असतां संदेह कां लागला ।
ब्रह्मानंद ठिकाण दावि सहजी सर्वार्थि पैं येकला ॥ १/१० ॥
निर्जीवा दगडाचिया करि पुजा तो काय देईल कीं ।
नरदेवा अपुले मनीं समजणें वस्तु तुझा तूं चि कीं ।
निज देहीं भरला अखंडित कळा भगवंत सर्वा भुतीं ।
श्रुतिसाक्षीवचनें मनें अनुभवी श्रीसद्गुरु सांगती ॥ ७१/२ ॥

ग्रन्थ अपूर्ण असल्यामुळें तो कोणाचा असावा याविषयीं माझी खात्री झाली नाहीं. शिवरामांचे गुरु पूर्णानंद, पूर्णानंदांचे गुरु सहजानंद व त्यांचे गुरु ब्रम्हानंद. हा ग्रन्थ सहजानंदकृत असावा व आपले गुरु जे ब्रम्हानंद त्यांनीं आपणांस केलेला बोध तो ब्रह्मबोध, असा ग्रन्थाच्या नांवांत गर्भितार्थ असावा अशी माझी कल्पना आहे.

## ( ४ ) रामानंद

ब्रह्मोत्तर खंड ( अनुक्रमांक १६ ), कार्तिकमाहात्म्य (१०७), राधामाधवविलास ( ३० ), भारत ( २८ ), भागवत ( २९ ), आणि रामायण ( ७३ ) असे सहा रामानंदीय मोठाले ग्रन्थ या मठांत आहेत. यांपैकीं एक हि ग्रन्थ आजपर्यंत ठाऊक नव्हता , मग छापला जाणें दूर च राहिलें. रामानंदांची हयाती शक १४९० मानण्यांत येते. ती जर बरोबर असेल तर हे सारे ग्रन्थ नाथकालीन असल्यामुळें फार महत्त्वाचे आहेत यांत शंका नाहीं.

ब्रह्मोत्तरखंड व कार्तिकमाहात्म्य हे दोन ग्रन्थ ओवीबद्ध असून प्रत्येकीं ओवीसंख्या सुमारें दोन दोन हजार आहे. बाकीचे ग्रन्थ श्लोकबद्ध आहेत. निरनिराळ्या वृत्तांचे श्लोक आहेत. मधून मधून पदें आहेत. सर्व ग्रन्थ प्रेमळ आहेत व मराठी भाषेला भूषणभूत होऊन राहतील यांत शंका नाहीं.

## ( ५ ) दासोपंत

दासोपंतांची हकीकत अन्यत्र आली आहे. यांचा "ग्रन्थराज" म्हणून एक लहानसा ओवीबद्ध ग्रन्थ आहे. त्याच्या दोन प्रती या मठांत मिळाल्या. ग्रन्थराजाची

ओवीसंख्या अवघी १२०९ आहे, पण ग्रन्थ अत्यन्त महत्त्वाचा आहे. इतरांना हा ग्रन्थ महत्त्वाचा वाटेल च, पण त्यांतल्या त्यांत श्रीसमर्थसांप्रदायिकांना त्याचें महत्त्व कांहीं निराळें च आहे. श्रीसमर्थांनीं या ग्रन्थाचें अवलोकन केलें होतें. श्रीसमर्थांनीं दासोपंतांचा " ग्रन्थराज " ग्रन्थ वाचला होता, ही गोष्ट श्रीसमर्थचरित्रांत नमूद करून ठेविली पाहिजे.

सत्कार्योत्तेजक सभा "महाराष्ट्रधर्मग्रन्थमाला" नांवाची एक माला लवकर च सुरूं करणार आहे. त्या मालेंत ग्रन्थराज छापला जाणार आहे. तेव्हा या ग्रन्थाविषयीं त्या ठिकाणीं जास्त विचार करूं.

## ( ६ ) रामकृष्ण पंडित

रामकृष्णयतींनीं पंचदशीवर जी प्राकृत गद्यात्मय टीका केली आहे तिच्या दोन प्रती मिळाल्या ( अनुक्रमांक ८ आणि ६२ ). पैकीं एक प्रत पूर्ण आहे व दुसरी अपूर्ण आहे.

छापील पंचदशींत प्रकरणाचा जो क्रम आहे तसा या प्रतींत नाहीं. १ चित्रदीप, २ तृप्तिदीप, ३ कूटस्थदीप, ४ ध्यानदीप, ५ नाटकदीप, ६ तत्त्वविवेक, ७ द्वैतविवेक, ८ भूतविवेक, ९ पंचकोश, १० महावाक्याविवेक, ११ योगानंद, १२ आत्मानंद, १३ अद्वैतानंद, १४ विद्यानन्द, १५ विषयानन्द, असा प्रकरणांचा क्रम रामकृष्णयतींनीं स्विकारला आहे.

पूर्ण प्रतींतील ध्यानदीपाचे शेवटीं " स्वहस्तमहीपतिलिखितं " असें आहे.

अपूर्ण प्रतींतील चित्रदीपाचे शेवटीं "हेविलंबि संवत्सर मार्गशीर्ष शुध्द पौर्णिमेच्या दिवशीं ग्रन्थ समाप्त ॥ नारायण लेखक चंदाउरकर ॥ " असा मजकूर आहे व नाटकदीपाचे शेवटीं " नारायणेन लिखितं ॥ हेविलंबि संवत्सर माघ शुद्ध पंचमी सोमवारीं हा ग्रन्थ समाप्त ॥ " असा मजकूर आहे. त्यावरून ही प्रत शक १६९९ तील आहे असें निश्चित ठरवितां येतें.

## ( ७ ) ब्रह्मेन्द्रयति

यांची श्रीमत् भगवद्गीतेच्या पहिल्या तीन अध्यायांवर "प्रबोधचंद्रिका पदपदार्थबोधिनी" नामक प्राकृत गद्यात्मक टीका या मठांत आहे ( अनुक्रमांक ९ ). उदाहरणार्थ एक श्लोक घेऊं.

श्लोकः–एवं बुद्धेः बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना।
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ४३

टीका–हे महाबाहो । अगा अर्जुना ॥ एवं । पुर्वोक्त प्रकारें ॥ बुद्धेः । बुद्धीहून ॥ परं । उत्कृष्ट जो आत्मयातें ॥ बुद्ध्वा । जाणोन ॥ आत्मना । शुद्ध बुद्धि करून ॥ आत्मानं । मनातें ॥ संस्तभ्य । निश्चळ करून ॥ कामरूपं । काम च आहे रूप ज्याचें ॥ दुरासदं । दुःखेंकरून साधाया शक्य असा ॥ शत्रुं । शत्रु जे त्यातें ॥ जहि । मारी ॥ ४३ ॥

## ( ८ ) विठ्ठल

यांनीं गुरुगीतेवर सुंदर टीका केलेली उपलब्ध आहे ( अनुक्रमांक ३२ ). टीका ओवीबद्ध असून ओंवीसंख्या ७३४ आहे. यांची गुरुपरंपरा:–

जगीं च जगदात्मा सद्गुरु । गुरुरूपीं हारपे जगदाकारु ।
नरहरि माझा विश्वंभरु । हरिहर परात्परु गुरु माझा ॥ २१ ॥
परमेष्ठि गुरु सोपानदेव । सुखाचे सोपान स्वयमेव ।
निजानुभव गुरु ज्ञानदेव । निवृत्ति स्वयंभावें श्रीगुरु ॥ २२ ॥
गैनीनाथ अनाथबंधु । गोरक्ष आनंदाचा कंदु ।
मछेंद्रनाथ अनादि सिद्धु । मुळींचा अभेदु आदिनाथु ॥ २३ ॥
सदाशिव तो चि आदिनाथ ।

वगैरे. पुढें

कृष्ण सद्गुरु माधवस्वामी । मज विश्वास त्याचिये नामीं ।

वगैरे. ग्रन्थाच्या शेवटीं हा ग्रन्थ कोणत्या स्थळीं लिहिला गेला त्याबद्दल ओवी आहे, ती अशी :–

गरुडगंगेचिये तटीं । श्रीगुरुभक्तांचिये निकटीं ।
पूर्ण जाली टीका म्हराटी । गुरुगीता घनवृष्टी सुखाची ॥ ७१८ ॥

हे विठ्ठल राहणारे कल्याणीचे दिसतात.

माझा सखा नरहरीस्वामी । माधव श्रीगुरु अंतर्यामीं ।
विठोशी नांदवी कल्याणधामीं । गुरुगीताआरामीं रमविता ॥७३१॥

ग्रन्थांत कोठें शक दिला नाहीं. या टीकेवरून विठ्ठल कवि बऱ्यांपैकीं दिसतात व कल्याणीस त्यांचेविषयीं आणखी शोध केल्यास वायां जाणार नाहीं असें वाटतें.

## ( ९ ) अमृत

आपले सुप्रसिद्ध अमृतराय निराळे. यांचें "**स्वरूपनिर्णय**" नांवाचें ९५ ओंव्यांचें च एक प्रकरण उपलब्ध झालें आहे ( अनुक्रमांक ३६ व ६८ ). या लहानशा पण गोड प्रकरणांत त्यांनीं आपली परंपरा दिली आहे ती अशीः—

उमापति—विष्णु—प्रजापति—वशिष्ठ—पराशर—व्यास—शुकदेव—गौड़पाद—श्रीशंकराचार्य—विश्वाचार्य—बोधधनाचार्य—ज्ञानघन—ज्ञानोत्तम—ज्ञानगिरि—सिंहगिरि—ईश्वरतीर्थ—नृसिंहतीर्थ—विद्यातीर्थसरस्वती—विद्यारण्य—विद्यातीर्थसरस्वती—मलयानंदसरस्वती—देवसरस्वती—यादवेंद्रसरस्वती—कृष्णसरस्वती—नृसिंहसरस्वती—माधवेंद्र—अमृतानंद—गगनेंद्र—माधवसरस्वती ( वास गोदातीर नाभीतीर्थी । म्हणजे बहुधा नांदेड )—विठ्ठलसरस्वती—अंबिकासरस्वती—**अमृत** "स्वरूपनिर्णय" कार.

ग्रन्थांत शक दिलेला नाहीं.

## ( १० ) विश्वनाथ

यांचा "उपदेशरहस्य" नांवाचा ओवीबद्ध ग्रन्थ मिळाला आहे (अनुक्रमांक ६१ ), ग्रन्थाचीं पहिलीं दोन पानें गहाळ आहेत. ग्रन्थाचे बारा अध्याय असून ओवी संख्या सुमारें दीड हजार आहे. ग्रन्थ निःसंशय महत्त्वाचा आहे. जो ग्रन्थ हातीं घ्यावा तो महत्त्वाचा च वाटावा त्याला काय इलाज आहे ? नवव्या प्रकरणांत यांनीं थोडासा स्वतःचा उल्लेख केला आहे.

**मीं हें कांहीं साधन । केलें नाहीं चित्तदमन ।**
**परी मज दीनाचें उद्धरण । करिता संपूर्ण काशीराज॥ ११८ ॥**
**पूर्ण केला अंगिकार । काशीराज हा माझा निर्धार ।**
**येऱ्हवीं मी कोण पामर । परमार्थविचार मज कैंचा ॥ १२१ ॥**
**प्रपंचीं नित्य आसक्त। सदा असे माझें चित्त ।**
**तेथें किंचित ढका लागत । तरि चरफाडित मानस ॥ १२२ ॥**
**ऐशा हें मज । अनुग्रह करिती काशीराज ।**
**देवूनि चिन्मात्र निज । सुखरूप मज त्याहीं केलें ॥ १२३ ॥**
**यालागीं माझें शरण । केवळ काशीराजचरण ।**
**तें चि माझें निजस्फुरण । परम साधन गुरुपदीं ॥ १२४ ॥**

ग्रन्थाच्या शेवटीं परंपरेच्या ओव्या आहेत त्यांत नांवापलीकडे थोडीशी माहिती असल्यामुळें त्या ओव्या च येथें देतों:—

**श्रीशंकराचार्य । तो आह्मां मूळ गुरुवर्य ।**
**तत्परंपरा लिहितां आनिवार्य। म्हणवून वर्य वर्य लिहितो॥ १२७ ॥**
**आदि श्रीवासुदेवानंदसरस्वती । तो साक्षात्सगुण ब्रह्ममूर्ति ।**
**न वर्णवे तयाचि कीर्ती । सगुणमूर्ति परमानंद॥ १२८ ॥**

६

कोण्ही चिदानंद ऐसें म्हणती । कितेक वर्षीं कुरुक्षेत्रीं वस्ती ।
करून देह ठेविला भागीरथी । सागरप्रति गंगासंगमी ॥ १२९ ॥
ब्रम्हग्राम उत्तरतीरीं । तेथ परमानंदादिका बोध करी ।
देह ठेविला भागीरथीतीरीं । ब्रम्हत्व वरि स्वयें आपणें ॥ १३० ॥
तयाचा शिष्य वैकुंठानंद ॥ १३१ ॥
कितेक काळगणना करून । आनंदवनीं वास पूर्ण ।
पश्चात् करावया जनतारण । बद्रिकावनीं निवास करी ॥ १३३ ॥
मग देहविसर्जन केदारीं । केला श्रीआळकानदीतीरी ॥ १३५ ॥
तयाचें शिष्यत्व अंगिकरूनी । स्वयें प्रगटले सारंगपाणी ।
श्रीकृष्णानंद येणें नामें मिरवोनी । जनीं वनीं प्रकाशतु ॥ १३६ ॥
श्रीकृष्णानंदाचा अनुग्रहित । तो हा प्रसिद्ध रंगनाथ* ।
कपिलगोत्रोत्पन्न विख्यात । नाशकीं वसत निजसुख ॥ १३७ ॥
तेणें सुखी केले अपार । सदुपदेश कितेक चतुर ।
कोण्ही ग्रन्थव्याख्यान भव पारावार । तारूनि दुस्तर उद्धरिले ॥
तयाचा पुत्र काशीराज । अजन्मा जन्मला जेवि रघुराज ।
जनतारणीं धरूनि काज । निज रामराज्य द्यावया ॥ १३९ ॥
जनभाग्योदयेंकरून । काशीराजाचें आगमन ।
विजयापुरासी जालें उद्धरण । अधिकारी जन पावले ॥ १४१ ॥
काशीराजें उद्धरिले । ते असंख्य किती जाती लिहिले ।
ते निजस्थितीनें राहिले । सुखी जाले निजसुखें ॥ १४३ ॥
तयांत ही मी येक दीन । शेवटील,बाळक म्हणवून ।
स्नेह करिती सज्जन । विश्वनाथ नाम गुरुकृपा ॥ १४४ ॥
त्या मज श्री भगवंतें । प्रेरिलें ग्रन्थ करावयातें ।
म्हणवून उपदेशरहस्यातें । लिहिलें निरुतें ग्रन्थाधारें ॥ १४७ ॥
जीवन्मुक्त प्रकरण । केलें वियारण्यस्वामीनें ।
तदाधारें ग्रन्थकथन । उपदेशरहस्य जाण लिहिलें ॥ १४८ ॥
तें हें काशीराजचरणीं समर्पिलें । जेथूनि उद्भव तेथें चि पावलें ।

वगैरे. ग्रन्थांत शक दिलेला काहीं. रंगनाथांनीं योगवासिष्ठ ग्रन्थ शके १५३० त म्हणजे श्रीसमर्थ जन्मास आले त्या वर्षी लिहिला तेव्हां, त्यांचे चिरंजीव काशीराज हे श्रीसमर्थकालीन होत. अर्थात् काशीराजांचे शिष्य विश्वनाथ हे विजापूरचे राहणारे असून श्रीसमर्थकालीं होऊन गेले असें ठरतें.

---

*योगवासिष्ठ ग्रन्थाचे कर्ते. वरील परंपरा रंगनाथांच्या योगवासिष्ठांत हि सांपडते. तेथील ओव्या व ह्या ओव्या जवळजवळ शब्दशः एक च आहेत.

## ( ११ ) अवधूत

यांनीं कपिलगीतेवर ओवीबद्ध टीका केली आहे (अनुक्रमांक ११४). कपिलगीतेचे मूळ श्लोक २४० असून टीकेच्या ओव्या १४१० आहेत. शके १६३० त हा ग्रन्थ निर्माण झाला.

शालिवाहन शके माहिमा । सोळासे तीस वरुष नामा ।
सर्वधारी संवत्छर प्रेमा । वसंतसंभ्रमा चैत्र मासु ॥ १३८५ ॥
शुक्ल पक्ष समुदावो । पूर्ण तिथी वो पूर्णिमा ॥ १३८६ ॥
गुरुवार तद्दिनीं प्राप्त ॥ ३८७ ॥
पर्वतामाजी देवगिरी । खडकीग्राम बाईजीपुरी ।
केशवाचिया मंदिरीं । ग्रन्थ निर्धारी संपविला ॥ १३८८ ॥

या कवींनीं आपल्या पूर्वजांची मनोरंजक हकीकत दिली आहे. कवींचे कोणी पूर्वज प्रथम पैठणास राहत होते. त्यांना हरिभक्तीची मोठी गोडी असून पंढरीच्या विठ्ठलाची त्यांनीं निरंतर सेवा करावी. कांहीं कारणानें वैराग्य उत्पन्न होऊन सर्वस्वाचें दान करून नवराबायको प्रयागास जाऊन राहिले. पोटीं संतान नव्हतें म्हणून माउली कष्टी होत्या. देव पावला व गर्भ राहिला. नवमास भरले. पण पहा योगायोग बाई प्रसूत होण्यापूर्वी पति निधन पावले. बाई साति निघाल्या आणि साति गेल्या हि. ईश्वराची करणी, चितेंतून बाळ सुखरूप बाहेर पडलें !

चितेपासुनी जाली उत्पत्ती । ह्मणोनि बोलती चितोत्पत्ती ॥

ते चितोत्पत्तीपंत पैठणास पुनरपि येऊन राहिले. त्यांची पुत्रपरंपरा अशीः-

चितोत्पत्ती–सिद्धेश्वर–विश्वेश्वर–श्रीधर–शामराज–अवधूत (प्रस्तुत ग्रन्थकार.)

अवधूतांना एकनाथांचे ग्रन्थ वाचण्याचा फार छंद होता. पुढें कर्मधर्मसंयोगानें ते पंढरपुरास यात्रेनिमित्त गेले होते, तेव्हां तेथें त्यांना त्यांचे गुरु गोविंद भेटले व त्यांनीं यांस कृतार्थ केलें.

पंढरी संतांचें माहेर । पावन भीमातीर नीर ।
अखंड कीर्तनाचा गजर । जयजयकार विठ्ठलनामें ॥ १३४१ ॥
गोविंद गोविंद ऐसा छंदु । विठ्ठलनामाचा अनुवादु ।
ऐसा होता गजरशब्दु । ध्वनीं उद्बोधु गोविंदनामें ॥ १३४८ ॥
गोविंदु जनीं गोविंदु वनीं । गोविंदु अखंड मनामनीं ।
गोविंदु अखंड ध्यासनीं । नयनाचा नयनीं गोविंदु ॥ १३४९ ॥

गोविंदु अंतर्बाह्य कोंदला । भरोनि विश्व व्यापला ।
ऐसा अखंड संचला । देखणी देखिला देखणिया ॥ १३५० ॥
पूर्ण सद्गुरु भेटला । तेणें अवधूत निधूर्त केला ।
संसार संकल्पीं मुकला । स्वरूपीं भुलविला प्रत्यक्ष ॥ १३५१ ॥
भुरळ घालूनि अवधूतासी । समूळ छेदिलें संसारासी ।

वगैरे. उतारे उतरून घेण्याला सीमा ही पाहिजे च.

## (१२) वीरेश्वर

या वीरेश्वरांचीं कांहीं स्फुट प्रकरणें " महाराष्ट्र कवि " मासिकांत मागें प्रसिद्ध झालेलीं आहेत. त्या वेळीं " महाराष्ट्र कवि " संपादकांनीं प्रस्तावनेंत म्हटलें होतें कीं, हे कवि तंजावर प्रांतांतले राहणारे असून त्यांचेसंबंधीं काहीं एक माहिती उपलब्ध नाहीं.

यांचीं दोन नवीन प्रकरणें या मठांत आहेत, त्यांवरून कांहीं थोडीशी माहिती मिळते ती येथें नमूद करितों.

"लेखनग्रन्थ पंचषष्ठी" असा श्रीज्ञानेश्वरांचा एक ग्रन्थ आहे. त्याला च प्रचारांत " चांगदेवपासष्टी " असें नांव आहे. या ग्रन्थावर वीरेश्वरांची गद्यात्मक टीका आहे ( अनुक्रमांक ४ ) टीका उत्कृष्ट आहे. टीकेच्या शेवटीं वीरेश्वर ह्मणतातः—

" श्रीज्ञानदेवस्वामी ते साक्षद्विष्णु परमात्मा त्याचेया ग्रन्थाचें विवर्ण कोण करूं सकेल ॥ तथापि तो हृदयस्थ त्याच्या चि प्रसादें यथामति वोवियाचा अर्थ कथिला तो संतीं पाहूनि न्यून्याधिक्य असालियां क्षमा करावी हे वीरेश्वर वल्लभ दिक्षिताची विज्ञापना ॥ "

वीरेश्वरांचा दुसरा ग्रन्थ म्हणजे श्रीज्ञानेश्वरांच्या अनुभवामृतावरील गद्यात्मक टीका होय. या टीकेच्या दोन प्रती मठांत आहेत ( अनुक्रमांक ११ व २४ ), उभय प्रतींच्या शेवटीं मजकूर आहे तो असाः—

" इति श्रीनरसिंह दिक्षितनंदन वीरेश्वर वल्लभकृते अनुभवामृतव्याख्याने दशमप्रकरणं संपूर्णम् ॥ शालिवाहन शके १७१७ आनंदनाम संवत्सरीं वैशाख शुद्ध २ गुरुवारीं श्रीज्ञानेश्वरप्रसादें श्रीशंकरनाथ श्रीदेशिकेंद्रानुग्रहें चन्नापट्टणास दक्षिणभागीं वृंदारण्य क्षेत्रीं श्रीयोगानंद लक्ष्मीनृसिंहाचे संनिधीं अनुभवामृतग्रन्थांचे व्याख्यान यथामति

वीरेश्वरें केलें ॥ तें संती परिसोनि अर्थ अधिक उणा असलियां क्षमा करावी ॥ हे वीरेश्वराची प्रार्थना । "

या मजकुरावरून वीरेश्वरांचा काल, त्यांच्या वडिलांचें व सद्गुरूचें नांव, त्यांचें राहण्याचें ठिकाण, हीं कळतात.

अनुक्रमांक २४ या प्रतींत आणखी पुढें मजकूर आहे तो असाः—

श्रीगुरु वीरेश्वराय ब्रह्मणे नमः ॥ इदं पुस्तकं शाहगडकर चिंतामणि भट्टस्य पुत्रः बापुभट्टस्य ॥ शांडिल्यागोत्रोद्भवस्य ॥

यापुढें एक श्लोक आहे :—

ताताभिधा नृहरि माय रमा जयांची ।
वाणी हि ऐकुनि सदैव रमा च याची ।
वीरेश्वर प्रभु ह्मणौनि जयासि नाम ।

पुढें चवथा चरण फाटला आहे, त्याऐवजीं

त्याच्या पदा मि करितों शतशः प्रणाम ॥

अशी आपण पूर्ति करावी. असो. या श्लोकावरून वीरेश्वरांच्या मातुःश्रींचें हि नांव कळतें.

हे वीरेश्वर येक्हेहाळी मठाचे मठपति श्रीआत्मारामहाराज यांचे समकालीन होत.

## ( १३ ) श्रीआत्मारामहाराज

हे या विद्यापीठाचे महंत होत. आत्महित ( अनुक्रमांक २२ ) अक्षरमालिका ( अनुक्रमांक २१ ) व क्रमसार ( अनुक्रमांक ५ ) असे यांचे स्वतःचे तीन ग्रन्थ आहेत. या तिन्ही ग्रन्थांचा विचार पुढें केव्हां तरी करूं. अनुक्रमांक १३८ हें एक बाड असून त्यांत श्रीआत्मारामहाराज एकांतांत बसून चिंतन, स्मरण कशाचें करीत तें दिलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, हे मठपति अखिल भरतखंडांतील क्षेत्रांचें, भरतखंडांत होऊन गेलेल्या देवभक्तांचें, यच्चयावत् गुरुवचनांचें, गुरुप्रेमाचें, त्रैलोक्य-उपासनेचें, साह्यभूत हरीचें परब्रह्माचें अखंड चिंतन करीत । त्याच्या चिंतनाचीं ह्या बाडांतील हीं तेरा पानें मठांतील सर्वसंग्रहांत मला अत्यन्त श्रेष्ठ वाटतात.

रामदासीयांना हीं तेरा पानें श्रीविष्णुसहस्रनामतुल्य आहेत! या चिंतनांतील मधलीं च कांहीं चिंतनस्थळें पहाः—

" चाफळ क्षेत्र पुण्य स्थळ श्रीरामसमर्थ। हंस विधि वशिष्ठमुनि। दास मारुती। गणराज। वृंदावन। देऊळ। दीपमाळ। मांडगंगा। तरु पर्वत घर मठ॥"
आत्मारामहाराजांनीं अन्यत्र एके ठिकाणीं म्हटलें आहे तें शब्दशः खरें आहे.

गुरुक्षेत्रीचे धोंडे पशु पक्षी श्वान। सर्वै पूज्यमान गुरुदासा॥

असो. अशीं सुमारें ६०।७० चिंतनस्थळें आहेत. तीं एकवार केव्हां तरी सर्व च महाराष्ट्रास सादर केलीं पाहिजेत. आणखी दोन तीन येथें देतों:—

" सज्जनगड परळी नाम।रामदास समर्थसमाधी। दत्तऋषिमुनि समुदाव। श्रीकृष्णदेवपरिवार। मारुती। मंगळाई। तीर्थ राम गुंफा विभूति पलंग। पादुका। मठ पीर देवदेवाल्य। सर्वसिध्धि। दासबोध। वोटा द्वार उर्वशी नदी। नाना विश्रांतिस्थळें॥ "

" हृदय आपचंद भुवन। चिदाकाश समाधी। भाव पूजा। रामचंद्र स्वामी समाधी। पादुका भीमलिंग परिवार। विठ्ठलरखुमाई। दशअवतार बारा ज्योतिर्लिंगें। खाणी वाणी योन्या सर्वभूत। पाताळ परिवार। आदी नारायण महाविष्णु। ज्ञानी ९ प्रकारींचे साधु संत राजे भक्त्या मुक्त्या सर्व योग सर्व साधन। सर्व संपती। सकळ कळा सकळ सद्विद्या।भक्तपरिवार।कंठीं स्थान क्षेत्र। मारुतीराय। बावा आत्मा। व्रत तप योग याग उद्यापन वेद शास्त्र पुरण ग्रंथ। सकळ सद्गुण सर्व सुलक्षण सर्व ऐश्वर्य सर्व योग्यता सर्व सिध्धी। राजा बागसर सुखारण्य॥ "

" जोगाई अंबा क्षेत्रादि विस्तार। मुकुंदराज जयत्पाळ। दासोपंत। बुटे दरुडी। सह। जांब सूर्योपंत राणाई गंगाधर बावा समुदाव॥ "

" सिध्द साधु संत मुनी। ब्रह्मनिष्ठ ब्रह्मज्ञानी मुक्त भक्त समाधानी। हरिजन। अनेकविध लीळा। चतुर्विध परी। तारक चर्या। वैद्य कवी गायक शूर हरिदास॥"
इत्यादि.

याशिवाय, आत्मारामहाराजांच्या वेळीं जो श्रीसर्वोत्तमजींचा उत्सव होत असे त्याच्या जमाखर्चाचे व इतर सामानाचे कागद पुर्जे मठांत आहेत ते हि बोधप्रद आहेत. त्यावरून आत्मारामहाराजांचा व्याप व व्यवस्था हीं निदर्शनास येतात. तथापि या सर्वांपेक्षां हि श्रीआत्मारामहाराजांच्या जगड्व्याळ उद्योगाची साक्ष त्यांचा

हा ग्रन्थ देत आहे. या अपूर्व ग्रन्थाचा पहिला खंड प्रकाशित झाला आहे. त्यावरून या ग्रन्थाचें असामान्य स्वरूप आपल्या प्रत्ययास आलें च आहे. इंग्रजी शब्दांनीं या ग्रन्थाचें स्वरूप व्यक्त करणें झाल्यास या ग्रन्थास Encyclopedia Ramadasika ह्मणण्यास मुळीं च प्रत्यवाय नाहीं. आपल्या मराठीभाषेंत इतकें विस्तृत व व्यापक चारित्र दुसरें कोणाचें च लिहिलेलें उपलब्ध नाहीं. हा ग्रन्थ निर्माण करण्याला श्रीआत्माराममहाराजांना किती परिश्रम पडले असतील हें त्यांचें त्यांस माहीत. या ग्रन्थावरून त्यांच्या निस्सीम गुरुभक्तीची प्रतीति येते. शके १७४० पर्यंतचा श्रीसमर्थसांप्रदायाचा हा इतिहास च आहे. श्रीसांप्रदायाचें मूळ स्वरूप ज्याला पहावयाचें असेल त्यानें या ग्रन्थाचें श्रवण मनन करावें. अशा ह्या अलौकिक ग्रन्थाविषयीं याहून मला जें जास्त बोलावयाचें आहे तें पुढें बोलूं.

या प्रचंड ग्रन्थाच्या दोन प्रती मठांत आहेत. पैकीं एक हातभर लांब, एक वीत रुंद व एक वीत उंच अशी आहे व दुसरी हातभर उंच व सुमारें वीत वीत लांब रुंद अशी आहे. प्रतींचें अक्षर सुंदर व अथपासून इतिपर्यंत जणूं काय एका टाकानें लिहिलेलें आहे. वास्तविक हा तेलंगण मुलुख, परंतु तेथें राहून महाराष्ट्रधर्म वाढवावा। भूमंडळीं ॥ या श्रीसमर्थांच्या आज्ञेचें आत्मारामहाराजांनीं यथार्थ पालन केलें.

## उपसंहार

वरील एकंदर विवेचनावरून या विद्यापीठाची आपणांस कांहींशी कल्पना करितां येईल. त्याचें स्वरूप आज मला जसें दिसलें तसें तें आपणांस निवेदन केलें आहे. आजमित्तीला हि जर त्याचें स्वरूप इतकें चित्ताकर्षक आहे, तर खुद्द श्रीआत्मारामहाराजांचे वेळीं त्याचें वैभव कसें असेल हें काय सांगावें! अशीं विद्यापीठें श्रीसमर्थांच्या वेळीं व नंतर कांहीं काळ सर्व भरतखंडभर हजारों होतीं! त्याची कल्पना मनांत आली म्हणजे जे विचारतरंग उठतात ते वैखरी वाणीनें व्यक्त करणें अशक्य आहे! ते महंत गेले आणि त्यांची ती जिवंत वाणी हि गेली. प्राण गेला, आणि आतां नुसती कुडी राहिली आहे. प्राण परत येईल या आशेनें कुडीचें रक्षण केलें पाहिजे.

ही जशी एका मठाची हकीकत, तशी च आणखी शेंकडों मठांची हकीकत आहे. तेव्हां आपणांस व आपल्या मार्फत सर्व महाराष्ट्रास माझा असा सवाल आहे कीं, आपल्या पूर्वजांचें हें जुनें ठेवणें आपण नाहींसें होऊं देणार काय? आपल्या थोर

पूर्वजांचें आपण इतकें हि ऋण लागत नाहीं काय कीं, या सर्व ग्रन्थभांडाराचा आपण एकाद्या सुरक्षित ठिकाणीं, यापुढें जास्त उपेक्षा न करितां, निदान संग्रह करावा ! प्रत्येक क्षणीं या भांडारापैकीं कांहीं भाग नाहींसा होत आहे, अशा स्थितींत नुसतें संरक्षण करण्याचें हि काम आपण लांबणीवर टाकलें तर आपणांस केवढें पातक लागणार आहे, याचा विचार करावा. एक आनंदाश्रम प्राकृत ग्रन्थांनीं खचून भरेल इतका संग्रह अजून राहिला आहे हें च आपलें भाग्य समजलें पाहिजे. काळाच्या पोटांत व अनास्थेच्या तडाक्यांत किती संग्रह गडप झाला असेल याची कल्पना हि करवत नाहीं. भारत-इतिहाससंशोधक-मंडळाला माझी

## पहिली सूचना

अशी आहे कीं, हें काम त्यांनीं त्वारित हातीं घेऊन संरक्षणाचें पुण्य संपादावें. नामदार प्रो. गोखले व श्री० इचलकरंजीकर या मंडळाचे सभासद झाल्याचें वर्तमानपत्रांत वाचलें व चिटणीसांनीं हि कळविलें, तेव्हां मला फार आनंद झाला. त्यांचें साहाय्य या कार्याला मिळाल्यास हें कार्य सिद्ध झालें ह्मणून समजावें. माझी

## दुसरी सूचना

अशी आहे कीं, हें सारें भांडार प्रकाशित करण्याची योजना आजपासून केली पाहिजे. अप्रकाशित ग्रन्थांचीं दरमहा शंभर पृष्ठें छापावयाचीं असा आपण आज संकल्प करीत असाल तर मी आणि माझे स्नेही रा. चांदोरकर व आह्मां उभयतांस गुरुस्थानीं असलेले रा. राजवाडे मिळून उद्यां च आपल्या कचेरींत शंभर वर्षें पुरेल इतका संग्रह आणून टाकूं. माझी

## शेवटची सूचना

अशी आहे कीं, मंडळाचे सभासद वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यांत पांच-पंचवीस सभासद मिळविले पाहिजेत. हल्लीं मंडळाच्या हातून जेवढें काम होत आहे तेवढ्यांत संतुष्ट राहून चालावयाचें नाहीं.

शंकर श्रीकृष्ण देव

# ५ मोडी लिपीची उपपत्ति

सभ्य गृहस्थ हो,

आज हातीं घेतलेल्या विषयाचें विवेचन करण्यापूर्वी मला आपल्यास एक विनंति करावयाची आहे, ती ही कीं, मोडीची उपपत्ति सांगतांना मला कांहीं एखादं दुसरें प्रमेय आपले पुढें मांडावयाचें झाल्यास ती सूचना म्हणून मी आपल्यापुढें ठेवीत आहें, सिद्धांत म्हणून नव्हे, अशी आपण आपली समजूत करून घ्यावी. कारण ती सूचना अथवा तें प्रमेय सिद्धांतदशेस येण्यास लागणारा पुरावा साधनाभावीं आज आपले पुढें ठेवण्यास मजजवळ नाहीं. असो.

सुमार ५।६ वर्षांपूर्वी या विषयाबद्दल म्हणजें मोडीचे उपपत्तीबद्दल एक लहानसें पुस्तक ' आर्यलिपी ' नांवाचें मीं प्रसिद्ध केलें. त्यांत माझ्या मताचा मीं उहापोह केलेला आहे. त्यानंतर एक दोन वर्षें या च विषयावर रा. रा. कोंडोपंत छत्रे व एक मिरज येथील सद्गृहस्थ यांनीं आपापले परीनें विचार केला असल्याचें त्यांच्या त्या त्या वेळीं झालेल्या भाषणांवरून माझे नजरेस आलें. पैकीं मिरजकरांनीं मोडी संबंधीं शास्त्रीयदृष्ट्या विचार केलेला नसोन तिच्या उपयुक्ततेच्या दृष्टीनें विवेचन केलें आहे. रा. रा. कोंडोपंतांनीं मोडीची परंपरा ६ वे शतकापावेतों मागें नेली ज्या वर्षी रा. कोंडोपंतांनीं मोडीची ही मजल सहावे शतकापावेतों नेली त्याचे पूर्वी च मी तिला अशोकाचे कालापावेतों हात धरून घेऊन गेलों होतों. आज हि आपणा सर्वांस तिच्या बरोबर च त्या कालांत मी घेऊन जाणार आहें; व मुक्कामावर पोहोंचल्यानंतर मग आज जी संस्कृति व उपयुक्तता या दोन वस्त्राभरणांनीं युक्त झाल्या कारणानें नीटनेटकी दिसते ती च विवस्त्र व त्यक्तभूषणा कशी दिसते तें आपल्या अनुभवास येईल; व आपण हि ती व ही एक च अशी आपली खात्री करून घ्याल.

या विषयासंबंधीं मला विचारस्फूर्ति होण्याचें कारण रा. ब. गुप्ते यांनीं उपस्थित केलेला वाद होय. तो आज येथें सांगण्याचें कारण इतकें च कीं, त्यानंतर ताम्रपत्रें, शिलालेख, व जुनीं कागदपत्रें यांच्या अवलोकनांत मोडींतील कांहीं अक्षरांची परंपरा लांबवर जात आहे अशी मला वारंवार शंका येऊं लागली व ही माझी साशंक वृत्ति–त्या वेळच्या माझ्या अविकृत मनाची स्थिति लक्षांत घेतां, एक प्रकारचा पुरावा च आहे.


मोडी ही, रा. ब. गुप्ते यांच्या म्हणण्याप्रमाणें, शक १५०० त उत्पन्न झालेली नव्हे. किंवा आधुनिक बालबोध–देवनागरी–इच्यापासून हि तिची उत्पत्ति झालेली

७


नाहीं. शक १५०० चे पूर्वीची तिची उत्पत्ति आहे हें आतां त्या कालापूर्वीच्या मोडी लेखांवरून निर्विवाद सिद्ध होत आहे. मीं आज आपल्यास असें सिद्ध करून दाखवीत आहें कीं, ' मोडी ' ही अशोक मौर्यांचे वेळीं जी ' ब्राम्ही ' या नांवानें प्रसिद्ध होती ( म्हणजे ज्या अशोककालीन लिपीस आम्ही आज ' ब्राम्ही ' हें नांव देतों ) ती च ब्राम्ही ही मोडीची जननी अथवा अधिक बिनचूक वर्णन करणें म्हणजे ती च ही आहे. यावरून मोडीची परंपरा अशोककालीन ब्राम्हीनें खुंटली असा माझे म्हणण्याचा आशय आहे असें कोणीं समजूं नये. मला आज साधनें उपलब्ध नाहींत त्यामुळें अशोकापूर्वी कोणती लिपि प्रचलित होती हें समजत नसल्यानें आजच्या उपलब्ध साधनांवरून मोडीच्या स्वरूपाची आजची पराकाष्ठा अशोकाची ' मौर्यी ' ही आहे इतकेंच माझें म्हणणें आहे. अशोकाचे पूर्वी एकाहून अधिक लिपी प्रचारांत होत्या हें तत्कालीन लेखांवरून उघड दिसतें. ' श ' हा भिन्न ठिकाणीं भिन्न आकृतीचा अशोककालीन प्रस्तरलेखांत आढळतो हें एक महत्वाचें उदाहरण वरच्या माझ्या म्हणण्याचें समर्थन करील, परंतु आणखी हि अशीं उदाहरणें देतां येतील. असो.

तेव्हां अशोककालीं एकाहून अधिक लिपी आर्यावर्तांत प्रचलित होत्या (आ:०–हिमवद्विंध्ययोर्मध्यं ) इतका च संकुचित अर्थ घ्यावा असें मला वाटत नाहीं कारण ' राष्टिक'–रट्टिक-जे तत्कालीं नर्मदा मही या नदीतरीं असत यांच्यांत हि लिपींचा प्रवेश नव्हता असें त्यांच्या व इतर दाक्षिणात्यांच्या प्रस्तर-लेखांत आलेल्या नामनिर्देशावरून वाटत नाहीं ). त्या पैकीं अशोक ब्राम्ही–अशोक मौर्यी इचा व मोडीचा इतका निकट संबंध आहे, त्यांचें स्वरूपसादृश्य इतकें आहे, कीं त्या दोन लिपी मीं आपणांस जवळ जवळ लिहून दाखविल्यानंतर आपण च असें म्हणाल कीं त्या एक आहेत. माझे प्रतिपादनाची वाट पाहणार नाहीं. हें बाह्य रूपाचें सादृश्य दाखविण्यापूर्वी त्यांची अंतर् रचना किती एकमेकाशीं जुळते हें थोडक्यांत दाखविण्याचा प्रथम उपक्रम करतों.

१ अशोक लिपींत ऋ, ॠ, ऌ, ॡ, हे स्वर नाहींत. म्हणजे ' कृष्ण ' हा शब्द ' क्रिष्ण ' असा लिहिलेला आढळेल. ' ऋ ' चे ऐवजीं ' रि ' हें इकारांत व्यंजन आढळतें. मोडींत हि या स्वरांची ही च स्थिति आहे. हें माझें बोलणें आपणांस एकदम पटावयाचें नाहीं म्हणून एक उदाहरण घेऊन त्याचें मी स्पष्टीकरण करतों. 'हृदय' हा शब्द आपण घेऊं. हा शब्द मोडींत आपणांस लिहावयाचा आहे अशी कल्पना करूं. यांत व्यंजनें तीन ह, द, य; या तिन्ही व्यंजनांचीं मोडी रूपें त्यांच्या बालबोधरूपाहून साधारणतः भिन्न आहेत. तेव्हां 'हृदय' हा शब्द मोडींत लिहिण्यास मोडींतील

घर्णांची वाण नाहीं; तथापि आपण मोडी ' हृदय ' '  ' असें च लिहितों. मोडी (  ) यास ' ऋ ' कार जोडतां येत नाहीं, आजपर्यंत जोडल्याचें उदाहरण नाहीं. ' नृप ' हा शब्द '  ' असा कधीं काढ-लेला नाहीं. कारण इतकेंच कीं मोडी अक्षरांत [ अथवा मौर्यींत ] ऋ कार जोडून घेण्याची पात्रता नाहीं; व पात्रता नाहीं याचें कारण तशी संस्कृति तिजवर झालेली नाहीं, व तशी संस्कृति नसण्याचें कारण अवश्यकता भासली नाहीं.

२ याहून हि एका अत्यन्त महत्वाच्या अंतर्विशेषांत मौर्यी व मोडींचें साम्य आहे. ते पाहिलें व पुढें दिलेल्या बाह्यरूपांचें साम्य ध्यानांत घेतलें म्हणजे या दोन एक आहेत याबद्दल मन अगदीं निःशंक होतें. तो विशेष समजून सांगण्यापूर्वी एका गोष्टीचें स्पष्टीकरण प्रथम केलें पाहिजे. ती गोष्ट ही.


संस्कृतांत ' सस्वर ' व्यंजनें व ' अस्वर ' व्यंजनें असा एक महत्वाचा भेद व्यंजनांचा केला आहे. हा असा भेद ' जोडाक्षरें ' बनविण्याच्या कामीं फार महत्वाचा आहे. तो विषय प्रस्तुत विषयाशीं विशेष सुसंगत नसल्यानें तितकाच सोडून पुढें जाऊं. प्राकृत वैय्याकरणांनीं 'प्राकृतें सस्वरव्यंजनं न भवंति' असा नियम दिला आहे; याचा अर्थ सस्वरव्यंजन आणि अस्वरव्यंजन ही असली भानगड प्राकृतांत नाहीं. ' सस्वरत्व ' हें सापेक्ष असल्यानें जेथें सस्वरत्व नाहीं तेथें अस्वरत्व कोठचें हा भाव. हा भेद दिसण्यांत अगदीं साधा दिसतो पण त्यामुळें लिपीचे स्वरूपांत किती फरक होतो तो पहाः–आपण ' रुक्म ' हा शब्द घेऊं. याच्या ' मौर्यी ' च्या स्वरूपाकडे पाहिलें म्हणजे वर दिलेलें विवेचन पूर्ण ध्यानांत येतें. मौर्यींत ' रुक्म ' हें '  ' लिहिलें जाईल. या शब्दाच्या स्वरूपाचा थोडासा विचार करूं पहिलें अक्षर ' र ' असून त्यास उकाराचें चिन्ह आडवी रेघ ही जोडली आहे यांत विशेष कांहीं नाहीं. कारण हें मुळीं सस्वरव्यंजन केलें च आहे. पुढील अक्षर क = , व, म = , मिळून जोडाक्षर झालेलें आहे. येथें संस्कृत व्याकरणनियमानुसार जर लिपि असली पाहिजे असें धरलें तर ' क ' हें व्यंजन प्रथम ' अस्वर ' करून नंतर त्यास ' म ' हें व्यंजन जोडलें पाहिजे हें उघड आहे. देवनागरींत ' क ' या व्यंजनाचें अस्वर रूप नुसतें काढावयाचें असलें तर ' क् ' असें होतें म्हणजे ज्यास आपण ' क ' चा पाय मोडणें

म्हणतों तें होय; परंतु हें पायमोडें रूप व्याकरणशुद्ध नाहीं, हें एक केवळ दर्शक आहे, ही नुसती खूण आहे असें प्रत्यक्ष जोडाक्षरांतील ' क ' चें रूप पाहिलें म्हणजे आपल्या ध्यानीं येईल. जुन्या पोथ्या वाचण्याचा ज्यांस सतताभ्यास आहे त्यांस ( ‿ ) या खुणेचा अर्थ ज्याखालीं ती खूण केली असेल त्याचा उच्चार करणें नाहीं, तें अक्षर बातल असे, असा असतो हें सांगणें नको च; आणि या खुणेचें महत्व काय आहे तें मी पुढें आपणांस सांगेन. असो. हें जोडाक्षरांत ' क ' चें अर्धें रूप ( क् ) न काढतां ' क ' असें काढतात हें सर्वांस माहीत च आहे. तेव्हां ' क ' चें अस्वर रूप ' क ' असें करून व त्याचा उपयोग जोडाक्षरांत, करून, येथें 'क्म' असें अक्षर बनविलें आहे. (वस्तुतः क हें अर्धें रूप म्हणण्याचा प्रघात पडला आहे परंतु ही चूक आहे; व आणखी कांहीं अशा च चुका लिपींत कशा झाल्या आहेत त्याबद्दल मी नंतर विवेचन करीन. ) आतां तें च रूप मौर्यींत व मोडींत कसें असतें तें पहा. सस्वर व्यंजन व अस्वर व्यंजन या भेदानें लिपींत होणारा हा फरक मौर्यींत ( हा भेद प्राकृतांत नसल्यानें ) नाहीं व मोडींत हि नाहीं. उदाहरणार्थ

बालबोध ( आधुनिक ) — रुक्म

मौर्यी —

मोडी —




म्हणजे मोडींत जोडाक्षर ' क्म ' काढणें काय किंवा ' कम' काढणें काय एक च. वर्णाचे स्वरूपांत प्रत्यक्ष कांहीं एक फरक नाहीं याबद्दल डॉ. ब्यूलर यांनीं एके ठिकाणीं असा उल्लेख केला आहे कीं ( माझें म्हणणें व आपल्या नेत्रेंद्रियांनीं झालेलें ज्ञान आपल्यास पटत नसल्यास हा आधार देतों ) अशोक लिपींतील जोडाक्षरें म्हणजे एक अक्षर जसेंचें तसें दुसऱ्या एका मूळ स्वरूपाच्या अक्षराखालीं ठेवून दिलें कीं बनतें. याचें च स्पष्टीकरण आणखी एक उदाहरण घेऊन करूं.

बालबोध — म, ख, य,

मोडी —


मौर्यी —




(डावीकडील दोन टोंकें जोडलेलीं नाहींत उजवेकडचें नाहीं च नाहीं. )

हे तीन वर्ण ज्या शब्दांत जोडाक्षरांसह येतील असा एक शब्द ' मुख्य ' हा आहे. यांचीं रूपें पहाः—

बालबोधी — मुख्य


मोडी — 




मोर्यी — 

यांत विशेष काय आहे तो आपले सर्वांचे नजरेस तेव्हां च आला असेल. बालबोधींत विचारा ' ख ' भग्नांग झाला आहे. तसा तो मोडींत अगर मौर्यींत मुळीं च नाहीं. बालबोधींत ' य ' जसा ' ख ' जवळ आला तसें त्याचें विरूप करून त्यांत मिळाला. मौर्यींत व मोडींत ख व य हे फक्त बंधूप्रमाणें जवळ जवळ बसले. एकमेकांत मिसळले नाहींत. ' ख ' चें पूर्व रूप दोन्ही लिपींत हि कायम आहे.

ह्या बालबोध व मोडी यांच्यांत असलेला फरक अथवा दुसऱ्या दृष्टीनें मोडी व मौर्यी यांच्यांत असलेलें हें साम्य अत्यन्त महत्वाचें आहे. यावरून सूक्ष्म विचार करणारांस इतकें सहज दिसून येईल कीं या दोन लिपि–मोडी अथवा मौर्यी एके बाजूस व बालबोधी एके बाजूस—दोन भिन्न संस्कृतींच्या दर्शक आहेत. या दोन भिन्न भाषांचीं प्रत्यक्ष रूपें आहेत; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे संस्कृताचें दृश्य रूप आधुनिक देवनागरी ( बालबोधी ) ही असून प्राकृत ही मोडीच्या द्वारा व्यवहारांत स्पष्टता पावत असावी. असें अनुमान काढल्यावांचून या वर दिलेल्या दोन लिपींतील अंतर्गत साम्याची अथवा दुसऱ्या दृष्टीनें अंतर्गत भिन्नतेची उपपत्ति नीट लागत नाहीं. असो.

आतां आपण मोडी व मौर्यी यांच्या प्रत्यक्ष बाह्य स्वरूपाकडे वळूं. त्याचें बाह्य स्वरूपसाम्य अशा तऱ्हेनें दाखविण्यापूर्वी आपल्यास येणाऱ्या एक दोन शंकांचें प्रथम निराकरण करतों.

१ बालबोध क्षप् क्षप् लिहिली असतां मोडी अक्षरें उत्पन्न होतात म्हणजे बालबोधी व मोडी यांचा जन्यजनक संबंध आहे म्हणून जो एक प्रवाद आहे तो सर्वथैव खोटा आहे, हें प्रत्यक्ष पहाणें असल्यास आपण ' ख ' चें उदाहरण घेऊं. बालबोध ' ख ' किती हि झपाट्यानें लिहिला, त्यास कसें हि वळण दिलें तरी त्याचा मोडी  कसा होईल हें कोणा हि या जन्यजनक संबंधाच्या अभिमान्यास दाखवितां येणार नाहीं. दुसरें उदाहरण ' ज्ञ ' चें. या ' ज्ञ ' चा हा '  '

कोणत्या वळणानें झाला हें या जन्यजनक संबंधानें सिद्ध होईल काय ? या 'ज्ञ' ची तर आणखी एक मौज आहे. टांक न उचलतां लिहिलेलें बालबोध अक्षर मोडी होतें असें म्हणणाऱ्यांस, अत्यन्त कुंठित करणारें, हें अक्षर आहे. पहा कीं, बालबोध 'ज्ञ' हा निदान अखंड तरी आहे, तो च मोडी '' अत्यन्त विस्कळित व दुखंड आहे. तेव्हां टांक न उचलणाऱ्यांची मोडी  चे बाबतींत उपपत्ति कशी लागू पडावी ? मला वाटतें हा '' त्यांनीं आतांपासून बालबोध म्हणून हा 'ज्ञ' मोडी म्हणण्याचा प्रघात पाडावा.

दुसरी एक वृथा समजूत  या अक्षराबद्दल आहे. मी मघां असें एक विधान केलें आहे कीं, मोडींत 'ऋ' स्वर नाहीं. तेव्हां मग '' या अक्षराची वाट काय ? माझें पहिलें विधान खोटें कीं काय ? हे प्रश्न सहजच उद्भवतात.

माझें विधान खोटें नाहीं. वस्तुतः '' हा मोडी नाहीं; तो बालबोध आहे हें त्याच्या अंतररचनेवरून स्पष्ट दाखवितां येतें. पण आधीं येथें एक नवीन च शंका उद्भवते ती ही कीं, बालबोध कोणती व मोडी कोणती असा कांहीं भेद आहे कीं काय ? या प्रश्नाचे उत्तरादाखल मी माझें मत स्पष्ट देतों तें असें कीं:—


अशोक मौर्याचे कालीं एकाहून अधिक लिपी प्रचारांत होत्या, हें ऐतिहासिक सत्य लक्षांत ठेवून माझें असें विधान आहे कीं, अत्यन्त अत्यन्त प्राचीन कालीं वेदकालीं हि वेदांत उपलब्ध होणाऱ्या अंतःप्रमाणावरून लिपि आमच्यांत होती असें माझें मत आहे. अशी एक लिपि होती कीं, जिच्यावर वैय्याकरणांचा संस्कार होऊन व जिच्यांत सुलभतेकरितां कदाचित् इतर लिपींचे हि अशोकदृष्ट्या वर्ण आणून ( कदाचित् अशोककालीन वर्ण परकीय असतील व आज तीहून भिन्न वाटणारे च पूर्वींचे आमचे असतील. उदाहरणार्थ, 'ख' हा कदाचित् आपल्या पुरातन '' या स्वरूपांतील आमचा वेदकालीन असून '' हा अशोकानें परकीयांचा आणला असेल, कदाचित् उलट हि असेल व साधेपणावरून मला अशोककालीन हा च पुरातन वाटतो, दुसरें उदाहरण 'श' चें. ) तिला सुसंस्कृत केलें ती देवनागरी व जिच्यावर हा संस्कार घडला नाहीं पण जी कदाचित्

मूळ रूपांत च–अंतर्बाह्य–राहिली ती मौर्यी. व तिचें च आधुनिक बाह्यरूप–कारण अंतररूपांत मुळीं च फरक नाहीं–ती मोडी. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मूळ उगमाजवळ मोडी ( मौर्यी, ब्राह्मी ) व बालबोध या एक च, फरक फक्त पुढें झालेल्या संस्कृतीचा; आणि म्हणून च दोन्ही लिपींत बरें च वर्णसाम्य दृष्टोत्पत्तीस येतें. हें लक्षांत ठेवलें म्हणजे मग मीं '  ' संबंधीं वर जें विधान केलें तें समजण्यास सुगम होईल. त्याचा च थोडा विस्तृत विचार करूं:—


ज्यास आज आपण मोडी '  ' म्हणतों त्याची परंपरा अशीः—


रु = 

ही आधुनिक. आतां प्राचीन

 = रु


अशोक कालीं  ( ऋकार ) हें चिन्ह नव्हतें. जेथें चिन्ह च नाहीं तेथें 'रु' कार कोठचा ? व जर मौर्यी ' रु ' नाहीं तर मोडी तरी कोठचा ? पण दुसऱ्या दृष्टीनें याचा विचार करूं. या  ' क ' पासून हा '  ' कसा झाला तें वर दाखविलें परंतु हा बालबोध कशावरून मोडी च कां नाहीं असा प्रश्न राहतो च व त्याचें मला उत्तर देणें भाग आहे.


हें उत्तर देतांना मधां मीं जें संस्कारासंबंधी सांगितलें तें स्पष्ट करण्याची जरूरी आहे; त्याचे योगानें रु =  ' रु ' मधील उजवे हातच्या ' म ' आकृतीच्या उजव्या फांट्याची उपपत्ति लागेल व हा च जो मोडी आणि बालबोध यांच्यांत व्याकरणदृष्ट्या मोठा फरक झाला आहे त्याची समजूत पटेल. आणि मग '  ' हा बालबोध च असला पाहिजे अशी खात्री होईल.




या इतक्या उदाहरणावरून एक लक्षांत येईल कीं देवनागरींत व अशोक मौर्यींत विशेषतः भिन्नता उजवे बाजूच्या रेषेंत—कान्यांत—आहे. हा काना कां आला याचें कारण मघां मीं आपल्यास सांगितलें च आहे कीं जो भेद सस्वर व्यंजन व अस्वर व्यंजन म्हणून वैय्याकरणांनीं संस्कृत भाषेच्या दृष्ट्या केला तो अभिव्यक्त करण्याकरितां या कान्याचा उपयोग त्यांस करावा लागलेला आहे. कान्यानें पूर्णत्व म्हणजे सस्वरत्व दाखविलें आहे व म्हणून जेथें अपूर्णत्व म्हणजे अस्वरत्व दाखवा-


वयाचें तेथें हा काना मोडला आहे. म्हणजे ( । ) असें केलें आहे. ( ~ ) याचा अर्थ असा कीं त्या कान्याचा उच्चार कर्तव्य नाहीं म्हणजे तो काना नसतांना जसें अपूर्णत्व वर्णात होतें तसेंच अपूर्णत्व पूर्ववत् समजावयाचें असा आहे. या दृष्टीनें



 मधील उजवे कान्याची उपपत्ति बरोबर लागते, आणि संस्कृतीची खूण म्हणून जो हा काना त्याचें  या वर्णात अस्तित्व असल्यानें हा वर्ण बालबोध आहे, व प्राचीन रूप म्हणजे असंस्कृत रूप कायम ठेवणारी जी मौर्यी अथवा मोडी तिच्यांतील नाहीं हें उघड होतें. याचा च अधिक खुलासा करावयाचा म्हणजे 'ऋ' काराचें जें चिन्ह ' ृ ' तें आज ज्यास आपण बालबोध व मोडी ' रु ' व ' 


म्हणतों त्या वर्णातून काढून टाकूं व शिलक जीं रूपें राहतील ' क ' ' का ', त्यांचा विचार केला म्हणजे जे मीं सांगितलें आहे–कीं संस्कृतीची खूण ( सस्वर अस्वरत्व दर्शविणारी ) काना ही आहे. त्याची ओळख पटून मोडी रु चें रूप संस्कारजन्य आहे व बालबोध हें असंस्कृत आहे. म्हणून आपली आजची या वर्णापुरती परिभाषा चुकली आहे हें तेव्हांच ध्यानांत येईल. हें च आणखी थोडें जास्त स्पष्ट करतों.

जोडअक्षरांची योग्य व्यवस्था लागावी म्हणजे संधिनियमांत बिघाड होऊं नये म्हणून ' सस्वर ' व ' अस्वर ' व्यंजनें असा भेद करणें वैयाकरणांस जरूर भासलें, हें अनेक वेळ सांगितलें च आहे. आतां हा सस्वर अस्वर व्यंजनांचा घोटाळा फक्त ' अ ' काराच्या बाबतींत च व्हावयाचा, कारण इतरत्र स्वराच्या खुणा अगदीं स्वतंत्र आहेत. तो घोटाळा आधुनिकांनीं एक नियम घालून व एका विशिष्ट चिन्हाचा उपयोग करून घालविण्याचा प्रयत्न केला, परंतु माझ्या मतें त्यामुळें क्वचित् घोटाळा झाला. हें माझें म्हणणें उदाहरण देऊन स्पष्ट करतों.



यांत क, ख, ग, या तीन वर्णांच्या मौर्यी स्वरूपांत व आधुनिक देवनागरी स्वरूपांत कांहीं भिन्नता झाली नाहीं तेव्हां जर स्वरूपांत भिन्नता नाहीं तर त्यांच्या मूल्यांत हि भिन्नता नसली पाहिजे म्हणजे मौर्यींत जसे हे वर्ण सस्वर अस्वर या भेदानें रहित होते तसेच आधुनिक देवनागरींत हि अस्वर सस्वर भेदरहित असले पाहिजेत. फक्त 'घ' मध्यें कान्याचा भेद दृष्टीस पडतो. हा काना 'अ' कार दर्शक असल्यानें यांत सस्वरत्व आलें हें यथायोग्य च आहे. तेव्हां जर क ख ग या तीन वर्णांत सस्वर अस्वरत्व नाहीं व 'घ' मध्यें तें आहे तर चाऱ्ही वर्णांचे पाय मोडून त्यांस समान अस्वरत्व आणणें हें चुकीचें नाहीं का ? जर क, ख, ग, हे जात्याच अस्वर आहेत तर त्यांचे आणखी पाय मोडून त्यांस अस्वरत्व आणणें हें कोठचें व्याकरण ? खरोखर हे वर्ण



**का् खा् गा् घ्** असे पाहिजेत एक, किंवा **क ख ग ड**

असे पाहिजेत; म्हणजे त्यांचें अस्वरत्व स्पष्ट होईल. या माझे म्हणण्यास पुष्टी 'क' या वर्णाच्या रूपावरून हि येईल. 'क्य' व 'ख्य' या दोन वर्णांचें सूक्ष्म निरीक्षण केलें तर आपल्यास असें दिसून येईल कीं 'ख्य' या जोडाक्षरांत 'ख' चें रूपांतर होऊन त्याचें व्यंजन रूप सस्वर व्यंजनाहून भिन्न झालेलें आहे. तसें 'क' चें नाहीं. त्याचें पूर्वरूप च अस्वर व्यंजन म्हणून गणलेलें आहे व त्यास 'य' जोडून दिला आहे. एरवीं 'क्य' मधील क व य यांस जोडणाऱ्या मधील धारक्या आडव्या रेघेची उपपत्ति काय ? तेव्हां 'क' चें हें च रूप जर अस्वर व्यंजन आहे तर सस्वर व्यंजन मीं वर सांगितल्याप्रमाणें 'का्' असें असणें जरूर आहे. तसें कबूल केलें नाहीं तर जोडाक्षर (क्य) चुकीचें आहे असें स्पष्ट होतें व तें बरोबर आहे असें गृहीत धरलें तर सस्वरत्व एका निराळ्या कान्यानें सिद्ध केलें पाहिजे. यावरून मोडी **क** म्हणजे () संस्कृतांची खूण जो काना त्यानें युक्त असा आहे व बालबोध 'क' हें वर्णाचें मूळरूप आहे. हा घोटाळा फक्त 'क' या वर्णाचा च आहे. इतरत्र कांहीं वर्णांत मोडी बालबोधांचें साम्य आहे तर कांहींत मोडीचीं पूर्वरूपें कायम आहेत. असो; अशोक-पूर्वकालीन लिपीचा नमुना आज उपलब्ध नसल्यानें त्या लिपीच्या सापेक्षत्वानें हा वरचा सविस्तर विचार मीं केलेला आहे व आधुनिक मोडी आणि बालबोध यांतील समवर्णांचा

विचार केला असतां अशोकाच्या कालाहून प्राचीन कालची लिपि उपलब्ध झाली तरी मी वर दिलेल्या प्रमेयांस कांहीं बाधा येईल असें मला वाटत नाहीं. येथ-पर्यंत मौर्यी च व मोडी यांच्या सादृश्याचा पल्ला पोंचविल्यानंतर बहुधा आपली सर्वांची खात्री झाली च असेल कीं, हें जें इतकें अंतररचनेंत साम्य दिसतें आहे तें कांहीं केवळ काकतालीय न्यायानें आलेलें नाहीं. आतां हा समज दृढमूल करण्यास मीं दोन लिपींतील आकृतिसाम्य देतों.

हें साम्य देतांना विनाकारण सर्व च वर्ण न देतां साम्याचीं कांहीं विविक्षित उदाहरणें मात्र घेतों. तीं अशीं कीं, त्या वर्णांची उपपत्ति बालबोधीनें कधीं हि लागणें शक्य नाहीं व मौर्यीवांचून लागणें अशक्य आहे:


प्रथम 'ख' हें अक्षर घेऊं.

बालबोध 'ख' च्या कोणत्या हि प्रकारच्या वळणानें मोडी '' बनणें शक्य नाहीं. तेव्हां जन्यजनक संबंध दोन वर्णांचा नाहीं हें उघड आहे. या मोडी '' चें मूळ रूप ज्यास पहाणें असेल त्यानें मौर्यीकडे वळलें पाहिजे. मौर्यी म्हणजे अशोककालीन 'ख' असा  ,  होता या दुसऱ्या 'ख' चें ऑर्नमेन्टल म्हणजे कुसरीचें रूपांतर  असें झालें व तें च आमच्या हल्लींच्या मोडी () चें आहे.

दुसरें उदाहरण 'ब' चें.

| अशोक (मौर्यी) | मोडी | बालबोध |
| --- | --- | --- |
|  |  | ब. |

तिसरें 'श' चें.

| | | |
| --- | --- | --- |
|  | श्च | श. |

चौथें 'ज्ञ' चें.

'ज्ञ' हें जोडाक्षर आहे तें मोडी  असें लिहितात. सकृद्दर्शनीं हें


द + न मिळून झालें असलें पाहिजे असें सहज वाटतें. परंतु हीं याचीं अंगें व्याकरणदृष्ट्या अत्यंत चुकीचीं आहेत. 'ज्ञ' हें जोडाक्षर ज + ञ अथवा 'न' यांपासून झालेलें आहे असें व्याकरण सांगतें तेव्हां तशी 'ज्ञ' ची उपपत्ति जर दाखवितां आली नाहीं तर ती सपशेल चुकीची आहे असें बिनदिक्कत म्हणण्यास हरकत नाहीं. बालबोधी लिपीनें तशी उपपत्ति लागत नाहीं, परंतु मौर्यीनें लागते. मौर्यीतील 'ज' हा '' या आकृतीचा आहे व 'ञ' अथवा 'न' हा वर्ण तर उघड आहे. तेव्हां 'ज्ञ' ची शास्त्रीय उपपत्ति म्हणजे मोडी '' ची शास्त्रीय उपपत्ति मौर्यीनें उत्तम लागते.

आतां स्वर चिन्हांपैकीं 'ई' या स्वर चिन्हाचा विचार करूं.

बालबोधींत ऱ्हस्व दीर्घ हीं चिन्हें बाजूवर अवलंबून आहेत. जसें— कि, की.


म्हणजे ऱ्हस्व 'इ' डावीकडील वेलांटीनें दाखविली जाते तर दीर्घ ई-कार उजवे वेलांटीनें व्यक्त होतो.

मोडींत वस्तुतः ऱ्हस्वदीर्घाचा विचार नाहीं. केला च तर ऱ्हस्वदीर्घ हे डावे उजवे बाजूवर अवलंबून न राहतां एकत्व व द्वित्व यांवर अवलंबून आहे. जसें—



मौर्यीचें अगदीं हुबेहुब मोडीसारखें आहे.

तिच्यांत ऱ्हस्वदीर्घाचा विचार नाहीं केला च तर तो एकत्व, द्वित्व यांनीं दर्शविला जातो. जसें—

 किंवा 

'उ' चे चिन्हांबद्दल विचार करणें अवश्यक नाहीं. कारण बालबोधी व मोडी यांच्या 'उ' काराच्या चिन्हांत फरक नाहीं.

मौर्यींत उकार दाखवीत असत ते असे—

 = गु.

 = ग.

पुढें पुढें हीं चिन्हें अशीं होऊं लागलीं

 = पु

 = पू

 = पु

 = पू

यांवरून च हल्लींचीं ' उ ' ' ऊ ' चीं भिन्न भिन्न चिन्हें निघालीं आहेत.
 = गु प्रमाणें हल्लींचीं रु, फ ( मु जुना ) हीं रूपें आहेत. इतरांबद्दल विवेचन करण्याची जरूर नाहीं. परंतु मोडीचा एक विशेष सांगितला पाहिजे. त्यावरून मौर्यीचें व मोडीचें साम्य फार उत्तम दिसतें.

मोडी गु हा  असा आहे. हें कांहींसें चमत्कारिक दिसणारें अक्षर बाल-बोध ' गु ' चें रूपांतर आहे असें कोणास हि वाटणार नाहीं; व तें योग्य हि आहे. या मोडी  ( गू ) ची प्रतिकृति मौर्यींत आहे. मौर्यींतील प्राचीन ' ग ' हा () वर्ण घेऊन त्यास अर्वाचीन '' उकार जोडला आहे.

असें च दुसरें उकारान्त अक्षर मोडी ' खु '  हें आहे. याची हि प्रतिकृति मौर्यीत च आहे. तथापि यांत व्याकरणदृष्ट्या एक चूक आहे ती ही कीं या अक्षरांत दोन ' उ ' कार आले आहेत. कसें तें बालबोधीनें समजणार नाहीं; त्यास मौर्यींची च कांस धरावी लागणार, ती अशी—

बालबोध मोडी मौर्यी

खु  

या तीन अक्षरांत बालबोधीचा पुढील दोन अक्षरांशी संबंध नाहीं हें एकदां मागें दाखविलें च आहे. आतां पुढील दोन अक्षरांचा सूक्ष्म विचार केला तर असें दिसून येईल कीं मौर्यींतील  खु संबंध जशाचा तसा मोडींत असून शिवाय आधुनिक

उ ची खूण जी  बालबोधींत दिसते तिचा हि पण उपयोग केला आहे म्हणजे

मोडी खु असा झाला आहे

 = मौर्यी +  बालबोधीं आधुनिक उ चें = मिळून मोडी

' खु '.  असो.

इतकें विस्तृत विवेचन केल्यानंतर आतां पुन्हां प्रत्येक वर्ण मोडीचा घेऊन त्याचें पूर्वरूप मौर्यींत आहे असें दाखविण्याची विशेष अवश्यकता राहिली असेल असें मला वाटत नाहीं, म्हणून सर्व सादृश्य यापुढें देण्याचें बंद करतों. तथापि नामसादृश्याचा आतां थोडासा विचार करणें अयुक्तिक होणार नाहीं. ह्या ज्या लिपीचा मीं आतांपावेतों ऊहापोह केला ती मुख्यत्वें अशोकाच्या प्रस्तरलेखांत उपलब्ध होते, तत्पूर्वीचे कालची उपलब्ध नाहीं. अशोक हा मौर्य होता. म्हणून जशी शौरसेनी, मागधी, महाराष्ट्री तशीच ही मौर्या. मौर्याचा अपभ्रंश मोरे तद्वत् मौर्यीचा अपभ्रंश मोरी व मोरीचा मोडी. हीच 'मोडी' या नांवाची उपपत्ति सयुक्तिक आहे. याचें कारण एक तर—

बालबोधीची जी मोड ती मोडी म्हणून ही एक च उपपत्ति आजपर्यंत सुचविली जात होती परंतु तो जन्यजनक संबंध किती भ्रामक आहे हें मीं आतां च स्पष्ट करून दाखविलें आहे; व म्हणून ती खोटी आहे. तसें च, दुसरी कोणती हि उपपत्ति आजपावेतों सुचविण्यांत आलेली नाहीं. व तिसरें मुख्य कारण असें कीं

मौर्यीचें व मोडीचें रूप( अंतर्बाह्य )सादृश्य व रचनासादृश्य मीं इतकें दाखविलें आहे कीं ती व ही दोन्ही एक च आहेत असें निर्विवाद सिद्ध होतें. मग ही जर मौर्यीच आहे दुसरी नाहीं, मौर्यीचा अपभ्रंश जर मोडी होऊं शकतो, हा अपभ्रंश

जर व्याकरणदुष्ट नाहीं. नाहीं, तर तशा अपभ्रंशाच प्रत्यक्ष एक रूप प्रचारांत हि आहे ( मोरे ) व इतर दुसऱ्या उपपत्ति अप्रमाण व सदोष आहेत तर मग ही मोडी मौर्यी नाहीं असें म्हणणारा जो असेल ' त्याचा आग्रहो चि उरे ' असें म्हणणें प्राप्त होतें.

या आतांपर्यंतच्या माझ्या बोलण्याचा मथितार्थ हा च कीं मोडीची उपपत्ति व पूर्वपरंपरा मौर्यींत आहे व आज माहित असलेल्या साधनावरून मोडी ही २२ शें वर्षांच्या अलिकडील नाहीं.

गो. का. चांदोरकर

श्री

# संमेलनवृत्त

भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे सभासद, रा. शंकर श्रीकृष्ण देव, वकील, धुळें, यांनीं मिति फाल्गुन व. ३।१८३४ च्या पत्रांत खालीलप्रमाणें सूचना केली:—

" रा. राजवाडे यांचें म्हणणें आहे व मला तें इष्ट व आवश्यक वाटतें कीं ता. १ मे ला सर्वसाधारण सभा भरविण्याची योजना करावी. सर्व सभासदांना व हितचिंतकांना आग्रहाचीं पत्रें जावीं. सभेंत वाटल्यास कांहीं निबंध वाचण्यांत यावेत, पण या हि पेक्षां पुढील कामाचें स्वरूप निश्चित करण्यांत यावें. हल्लीं मंडळाच्या हातून जें काम होत आहे तेवढ्यानें मंडळाचें समाधान होऊं नये. वगैरे, वगैरे, सभेचा कार्यक्रम ठरवून ता. १ मे ला सभा भरविण्याची तजवीज करावी, ही रा. राजवाडे यांची सूचना आपणांस कशी वाटते तें कळवावें ".

ही सूचना स्थानिक सभासदांपुढें ठेवतां सभा भरवावी असा च बहुतेक सर्व सभासदांचा अभिप्राय पडला. तेव्हां साधारणपणें सर्वांच्या सोईचे असे दिवस ठरवून खालीं दिलेलें विनंतिपत्र मंडळाच्या सर्व सभासदांकडे व ठिकठिकाणच्या प्रमुख हितचिंतक गृहस्थांकडे रवाना केलें.

श्री

भारत इतिहास-संशोधक-मंडळाचें कार्यालय,

४५६ शनिवार पेठ, पुणें शहर.

नमस्कार वि. वि.

महाराष्ट्रांत जे संशोधक व इतिहास-संशोधनाविषयीं विशेष आस्था बाळगणारे गृहस्थ आहेत त्यांस एकत्र आणून इतिहास-संशोधनाचें काम संघटित स्वरूपानें करण्याच्या निश्चयानें ही संस्था काढल्यापासून आज तीन वर्षे आपण यथाशक्ति यथामति जें काम केलें, त्याचा आढावा घेऊन पुढील कामाची दिशा सर्वानुमतें आंखून घेण्याची वेळ आली आहे अशा समजुतीनें चैत्र व० १०।१०।११ (ता. ३० एप्रिल, मे १।२ बुधवार, गुरुवार, शुक्रवार) या तीन दिवशीं वार्षिक सभा व संमेलन भरविण्याचें मुक्रर केलें आहे. या वेळीं काम व्हावयाचें तें सामान्य स्वरूपाचें असून वादविवादासाठीं बरेच महत्वाचे मुद्दे पुढें येणार असल्यामुळें आपल्या अनुभवाचा व माहितीचा फायदा मिळाल्यास पुढील धोरण ठरविणें सुलभ होईल. तरी या तिन्ही हि दिवशीं आपण हजर रहाल अशी उमेद आहे. या समयीं कांहीं सभासद निबंध हि वाचणार आहेत. मंडळाचे अध्यक्ष रा. रा. काशीनाथ नारायण साने हे च या प्रसंगीं अध्यक्ष होणार आहेत.

ज्या परगांवच्या सभासदांची येथें कांहीं सोय नाहीं त्यांची राहण्याची व्यवस्था जरूर करूं. त्यांनीं अगाऊ सुचवावें अशी विनंति आहे.

पहिल्या दिवशीं (बुधवारीं) सभेच्या कामास आप्पाबळवंताचे वाड्यांत दुपारीं ४॥ वाजतां सुरुवात होईल. पुढील कार्यक्रम सर्वांच्या विचारानें ठरविला जाईल. आपण अगत्य येण्याचें करावें. कळावें लोभ करावा हे विनंति.

मिति चैत्र व० २ शके १८३५. }

खं० चिं० मेहेंदळे
चिटणीस

# निबंध

| | |
|---|---|
| *१ इतिहास-साधनावलोकन | रा. वि. का. राजवाडे |
| २ महाराष्ट्रांतील गेल्या सातशें वर्षांतील विचारांचें प्रदर्शन | ” |
| ३ भारतीय आर्यवंश | ” |
| *४ अठ्ठावीस दिवसांचें संशोधन | रा. शं. श्री. देव |
| ५ येक्केहाळी येथील श्रीरामदासी विद्यापीठ | ” |
| ६ मौर्यीतील कांहीं आधुनिक अक्षरांची उपपत्ति | रा. गो. का. चांदोरकर |

## बुधवार

या प्रमाणें सर्वत्रांस विनंति केल्यानंतर मिति चैत्र व॥९।१०।११ (शके १८३५) हे तीन दिवस मंडळाचे कार्यालयांत मंडळाचें संमेलन भरलें होतें. बाहेरगांवचे व स्थानिक पुढील सभासद संमेलनास हजर होते. रा. का. ना साने, रा. वि. का. राजवाडे, रा. शं. श्री. दे , रा. गो. का. चांदोरकर, रा. वि. ल. भावे, रा. ह. ग. गोडबोले, रा. ल. रा. पांगारकर, रा. ह. ना. आपटे, रा. शि. म. परांजपे, प्रो. ह. गो. लिमये, रा. रा. द. पराडकर, रा. द. वा. पोतदार, रा. पां. न. पटवर्धन, रा. द. श्री. जोशी, श्री. म. मो. फडणीस, सरदार गं. ना. मुजुमदार, रा. वामनराव पटवर्धन, रा. ग. स. खरे, रा. न. चिं. केळकर, रा. खं. चिं. मेहेंदळे, वगैरे वगैरे. शिवाय प्रो. पाठक, रा. ब. वा. पु. जोशी, रा. कृ. र. केळकर, रा. व्यं. बा. केतकर, रावसाहेब कोंडोपंत छत्रे, रा. लेले वकील (सोलापूर), रा. वासुदेवराव व शंकरराव जोशी, वगैरे वगैरे सद्गृहस्थ निमंत्रितांपैकीं हजर होते. पहिल्या दिवसाचे कामास बुधवारीं ४॥ वाजतां सुरवात झाली. अध्यक्ष रा. का. ना. साने हे स्थानापन्न झाल्यावर रा. न. चिं. केळकर यांनीं नामदार रा. ब. ग. कृ. साठे, रा. कृ. प्र. खाडीलकर, रा. वि. गो. विजापूरकर, रा. कृ. वि. आचार्य, रा. वि. द. गोखले, रा. रा. वि. पटवर्धन, या सहा गृहस्थांची सभासद म्हणून निवड व्हावी, अशी सूचना केली. तीस सरदार मुजुमदार यांचें अनुमोदन मिळून सूचना पसार झाल्यावर मंडळाचे सभासद व इतर निमंत्रित गृहस्थ ज्यांस हजर राहतां आलें नाहीं अशांचीं पत्रें

* हे निबंध वाचले गेले नाहींत.

मंडळाचे चिटणिसांनीं वाचून दाखविली. सभासदांपैकीं रा. ब. पारसनीस लिहितात "आपले संमेलनास माझी पूर्ण सहानुभूति आहे व त्यास पूर्ण यश येईल अशी आशा आहे. मला प्रत्यक्ष जरी हजर राहतां आलें नाहीं तरी माझें अंतःकरण तेथें आहे असें समजावें." प्रो. भानू लिहितात "मला वाटतें कीं, रा. राजवाड आदि मंडळी जो संग्रह जमा करीत आहेत तो जमविण्याची. मात्र खटपट करावी. छापण्याची करूं नये. कारण गिऱ्हाईक नाहीं. मात्र दर महिन्यास कसले कागद मिळाले याची यादी प्रसिद्ध करावी. मी असतों तर माझें म्हणणें सर्व सांगितलें असतें. असो, पुढले वर्षी इमारतीचे फंडाची खटपट करणें पहिलें काम आहे." रा. मुंडले लिहितात, "संमेलनास हजर रहावें अशी फार इच्छा होती, परंतु अपरिहार्य कामामुळें हजर रहातां येत नाहीं. नाइलाज आहे." रा. अ. सि. साठे यांचें हि अशा च अर्थाचें पत्र आलें. या शिवाय निमंत्रितांपैकीं शेट पु. वि. मावजी यांनीं रा. पारसनीस यांचे मार्फत हजर रहातां येत नाहीं याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली सिंहगडावरून बॅरिस्टर जयकर यांनीं लिहिलें कीं, 'आपल्या मंडळाच्या स्तुत्य उद्योगाबद्दल अभिनंदन करावें तितकें थोडें च. कार्यपरत्वें मला आपल्या संमेलनास येतां येत नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते. आपल्या मंडळाच्या उद्दिष्ट हेतूंबद्दल माझी पूर्व सहानुभूति आहे. व माझ्या सारख्या अनाभिज्ञ माणसास आपल्या मंडळाचा सभासद होऊन कांहीं उपयोगी पडण्यासारखें असल्यास आपल्या पटांत माझें नांव नोंदावें. विषयाची अभिरुचि इतका च माझा अधिकार आहे. परंतु कार्यक्षमत्वाच्या दृष्टीनें सभासद होण्याची पात्रता नाहीं हें मी पूर्णपणें जाणून असल्यामुळें वरील विनंति करीत आहे.' देवासहून श्रीमंत मा. वि. किबे लिहितात, "कामाच्या गडबडीमुळें मला येण्यास सवड होणार नाहीं. तरी हें संमेलन भरविण्याची आपली कल्पना फार चांगली आहे. व तें भरविल्यानें इतिहासाचे कामास मदत होईल यांत शंका नाहीं. सभेंत वाचले जावयाचे निबंध हि महत्वाचे दिसतात. ते कायमच्या स्वरूपांत प्रसिद्ध केले जातील च. व यामुळें ज्यांस कारणपरत्वें प्रस्तुत प्रसंगीं तेथें उपस्थित होतां येत नाहीं, त्यांस त्यांचा लाभ मिळेल." रा. ज. र. घारपुरे वकील (मुंबई) लिहितात 'संमेलनाचें कार्य पूर्णपणें पार पडो, व ईश्वर आपणास यश देवो अशी आशा आहे.' नाशिकाहून रा. ब. त्रि. मो. महाजनी लिहितात 'आपल्या संमेलनाला मला येतां येत नाहीं याबद्दल वाईट वाटतें. ईश्वरकृपेनें व आस्थेवाइकांच्या यत्नानें आपल्या सभेस, संमेलनास व मंडळास यश येईल. माझी पुर्ण सहानुभूति आहे.' मिरजेहून रा. वासुदेव वामन खरे लिहितात 'फार निकडीचें दुसरें काम हातांत असल्यानें या प्रसंगीं मला हजर रहातां येत नाहीं. याबद्दल फार दिलगिरी वाटते. संमेलनाचा उद्देश फार स्तुत्य आहे व त्या बद्दल माझी पूर्ण सहानुभूति आहे.' दापोलीहून रा. पां. वा. काणे वकील लिहितात कीं,

'सभेला हजर रहातां येत नाहीं दिलगिरी वाटते. सभेच्या कामाबद्दल पूर्ण सहानुभूति आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. "

रा. गो. स. सरदेसाई, डॉ. श्री. व्यं. केतकर यांचेकडून हि अशा च अर्थाचीं पत्रें आलीं होतीं. वरील पत्रें वाचून झाल्यावर

### अध्यक्ष रा. का. ना. साने यांचें भाषण

झालें. ते म्हणाले ' भारत–इतिहास–संशोधक–मंडळाचा अध्यक्ष होण्याची माझी लायकी नाहीं. माझ्याहून लायक अशा गृहस्थाची योजना या स्थानीं व्हावयास पाहिजे होती, परंतु आपली सर्वांची आज्ञा पाळणें हें माझें कर्तव्य म्हणून मीं हें स्थान आज पत्करिलें आहे. आजच्या सभेच्या प्रारंभीं मंडळाचे प्रथमचे अध्यक्ष कै. वा. रा. ब. जोशी यांच्या शोचनीय निधनाचा उल्लेख करणें अवश्य आहे. रा. ब. जोशी यांच्यासारखे विद्याव्यासंगीं योग्य गृहस्थ अशा अधिकाराच्या स्थानावर आज असणें इष्ट होतें. त्यांच्यासारख्या विद्वान् गृहस्थाचा लाभ मंडळास फार दिवस झाला नाहीं ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय. इतिहास–संशोधनाचें व प्रकाशनाचें काम व्यक्तिशः स्वतंत्र रीतीनें आज जवळ जवळ ५० वर्षांपासून चालू आहे. प्रथम इ. स. १८५७ च्या सुमारास माधव चंद्रोबा यांनीं सर्वसंग्रह' मासिकाच्या द्वारें मराठी कवितेचें प्रकाशन सुरू केलें. १८६५।६६ चे सुमारास ग्रॅन्टडफचे इतिहासावर कै. रा. ब. कीर्तने यांनीं आपला टीकात्मक लेख प्रसिद्ध केला. सन १८६९।७० च्या सुमारास ' विविधज्ञानविस्तार ' मासिकांतून ऐतिहासिक लेखसंग्रह प्रसिद्ध होऊं लागला. पुढें १८७८ चे सुमारास कै: चिपळूणकर, मोडक व मीं अशा तिघांनीं ' काव्येतिहाससंग्रह ' मासिकाच्या द्वारें इतिहास व काव्य यांचें प्रकाशन सुरू केलें. महाराष्ट्राच्या इतिहासांत बरी च कामगिरी करणाऱ्या परभू घराण्यांच्या इतिहासाची सामग्री यापुढें प्रसिद्ध होऊं लागली. १८९१ मध्यें ' काव्यसंग्रह ' सुरू झाला व १८९६।९७ चे सुमारास ' भारतवर्ष ' चा अवतार झाला. याच सुमारास मिरजेचे रा. वा. वा. खरे यानीं ' ऐतिहासिक लेखसंग्रहास ' सुरुवात केली व तद्द्वारा आजपर्यंत सुमारें ४००० पृष्ठें मजकूर पटवर्धनी दप्तरांतील प्रसिद्ध केला व त्यांचें काम पुढें चालू च आहे. सन १८९८ मध्यें ' मराठ्यांचे इतिहासाच्या साधनांचा ' पहिला ' खंड ' रा. राजवाडे यांनीं प्रसिद्ध केला. आजपर्यंत त्यांचे १५ खंड प्रसिद्ध झाले आहेत. व रा. राजवाडे यांचा दीर्घोद्योग असा च पुढें चालू रहाणार आहे. ' महाराष्ट्र कवी ' च्या द्वारें बरीच अज्ञात अशी कविता रा. भावे यानीं प्रसिद्ध केली 'महाराष्ट्र सारस्वतां' तून दासोपंताचीं कांहीं पदें रा. राजवाडे यानीं प्रसिद्ध केलीं. मुंबईचे रा. घारपुरे, गद्रे वगैरे मंडळींनीं गोविंदराव काळे यांचे दप्तरांतील कांहीं कागदपत्र प्रसिद्ध केले. 'सरस्वती

मंदिरां'तून प्रामुख्यानें रा. राजवाडे यांनीं बरेच संशोधात्मक निबंध प्रसिद्ध केले. 'प्रभात' मासिकांत विशेषतः रा. राजवाडे व चांदोरकर यांनीं बरेच ऐतिहासिक शोध प्रसिद्ध केले. 'रामदास व रामदासी ग्रंथमाले'नें व रा. पराडकर यांनीं फार अपूर्व व अमूल्य अशी कामगिरी चालविली आहे. तुकारामशट यांच्या साहाय्यानें १९०८ मध्यें 'इतिहाससंग्रहाचें' अवघड काम रा. ब. पारसनीस यानीं शिरावर घेऊन चालविलें आहे. या शिवाय कै. न्या. रानडे यांचा 'The rise of the Maratha Power, ग्रंथ प्रसिद्ध झाला व डॉ. सर रामकृष्ण भांडारकर यांनीं Early History of the Deccan' हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. येणें प्रमाणें ठोकळ ठोकळ कामांचें वृत्त आहे. परंतु ही सर्व कामगिरी व्यक्तिशः झालेली व विस्कळित स्वरूपाची आहे. या व्यक्तिशः झालेल्या व होत असलेल्या साहित्य-इतिहास संशोधनांच्या कामाचें केंद्रीकरण करण्याचें पुण्य आपल्या मंडळानें संपादिलें. अशा रीतीनें एकत्र जमण्यानें शंका-समाधान, प्रश्न, विचारपूस तेथल्या तेथें समक्ष करिते ये न व्यक्तिमात्रांच्या विस्कळित प्रयत्नास संकलित रूप मिळून अनुभवशीर लोकांच्या अनुभवजन्य ज्ञानाची तरूण होतकरू लोकांस माहिती होऊन होतकरू शोधकांना कामाची दिशा कळते, व आपणा सर्वांस इष्ट व प्रिय अशा कामाची परंपरा कायम टिकण्याची आशा उत्पन्न होते व हें च सर्वत्रांस इष्ट आहे. आज पर्यंत प्रसिद्ध झालेल्या मंडळाच्या अहवालांवरून मंडळानें बरेंच काम केलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. भारतीय प्राचीन व अर्वाचीन इतिहास, सारस्वत वगैरे विषयांसंबंधानें मंडळापुढें आजपर्यंत सुमारें २०० लेख वाचले गेले व हें एवढें काम मंडळासारख्या संस्थेस निःसंशय भूषणावह आहे. सांप्रत मंडळाच्या कामांत कांहीं दोष आहेत व व्हावयास पाहिजे त्या कामाच्या मानानें झालेलें काम अत्यल्प आहे हें हि खरें. याची आपणांस पूर्ण जाणीव आहे. सांप्रत आपणांस ज्या गोष्टींची प्रमुखत्वानें गरज आहे त्या गोष्टी माझ्या अल्प समजुतीप्रमाणें खालील प्रमाणें आहेत (१) इतिहास संशोधनास सर्वस्वी वाहिलेले गृहस्थ (२) या संशोधकांचीं कांहीं तरी कायमची व्यवस्था (३) संशोधकांनीं मिळविलेलीं साधनें सुरक्षित ठेवण्यासाठीं अग्निबाधाविरहित अशी मंडळाच्या मालकीची इमारत (४) संशोधनास अवश्य असणारा संदर्भ-ग्रंथ-संग्रह (Reference library) व (५) मिळविलेल्या साधनांचें प्रकाशन. या सर्व बाबींतील कोणत्याहि एक किंवा अनेक गोष्टींस ठिकठिकाणच्या विद्वानांनीं सहाय्य करावें अशी माझी विनंति आहे. या बाबतींत मतभेद मानण्याचें कोणतें ही कारण नाहीं. भारत-इतिहासाच्या विविध साधनसंपत्तीचें संशोधन, संग्रह व प्रकाशन करण्यासाठीं च मंडळ अस्तित्वांत आलें.

व तेवढी च मंडळाची इतिकर्तव्यता आहे. आपण आज जो मला बहुमान दिला आहे त्याबद्दल आपले आभार मानून सभेच्या पुढील कार्यक्रमास सुरवात करावी अशी माझी विनंति आहे.'

चिटणिसांनीं शके १८३४ चें वार्षिक-वृत्त वाचल्यानंतर रा. राजवाडे यांनीं 'भारतीय आर्यवंश' हा निबंध वाचला. (पृष्ठें १ ते २२) रा. राजवाडे यांचे निबंधावर थोडीशी चर्चा झाल्यावर रा. देव यांनीं संशोधनाचा ठराव सभेपुढें मांडला. तेव्हां ते म्हणाले आपणांपुढें जो ठराव मांडण्याची मला आज्ञा झाली आहे तो ठराव असाः—

संशोधनाचें काम विशेष रीतीनें व नेटानें मंडळातर्फे योग्य संशोधक नेमून गोदावरीकाठीं पैठण, बीड, वऱ्हाड, नगर, सोलापूर, सातारा, पुणें, ह्या जिल्ह्यांत करण्यांत आलें पाहिजे. या कार्याकरितां वैयक्तिक वर्गणी व मंडळाची मदत मिळून दरसाल सुमारें १००० रु. संशोधकांच्या योगक्षेमासाठीं व इतर खर्चासाठीं जमविले पाहिजेत.

अधुनमधून काम करणाऱ्या माझ्यासारख्या एकाद्या मनुष्यास नेहमीं असा प्रसंग यतो कीं, कोणी 'आज कागदपत्र दाखवितो, असें म्हणून त्या कागदपत्रांच्या शोधार्थ आम्ही गेलों असतां आज सवड नाहीं आणखी दोन दिवसांनीं या.' असें कागदपत्रांचे मालक वारंवार सांगतात. आम्हांस सवड असल्यास ठीक च, नाहीं तर फुरसतीच्या अभावामुळें आम्हांस त्या कागदपत्रांचा नाद सोडावा लागतो. व अशा वेळीं आपणांस या कार्याप्रीत्यर्थ सर्व काळ खर्च करितां येत नाहीं याबद्दल मन खिन्न होतें. अशा वेळीं या कार्यास च सर्वस्वीं वाहून घेतलेले लोक असतील तर त्यांचे अंगावर आम्हांस मिळालेली माहिती टाकून आम्हांस नाहीं प आमच्या स्नेह्यांस तरी तें पुण्य संपादतां येईल. मी आज आतां च येथें आलों व येथें येऊन बसेपर्यंत मला अशा महात्वाच्या ठरावावर प्रतिपादन करावें लागेल असें वाटलें नव्हतें. विषयाच्या महत्वाकडे लक्ष देऊन व मला आपल्या चिटणिसांची आज्ञा मोडवेना म्हणून मी हा ठराव आपणापुढें ठेवण्यास कबूल झालों. जरी आज माझे हातून या विषयाचें योग्य तितकें प्रतिपादन झालें नाहीं तरी आपण या विषयाचें महत्व कमी समजूं नये. अजून जर कोणाची अशी समजूत असेल कीं, किती तरी बखरी प्रसिद्ध झाल्या आहेत, किती तरी कागदपत्र हस्तगत झाले आहेत, व त्याचे अनेक खंड हि आज उपलब्ध झाले आहेत. अशा स्थितींत बहुतेक कार्य झाल्यासारखेंच आहे अशी जर आपली कोणाची समजूत असेल (सभासदः—अशी आमची कोणाची हि समजूत नाहीं. ) तर आपण मोंगलाईंत चलावें व अशा एक नाहीं दोन नाहीं तर दहा संशोधकांस आपलें सर्व आयुष्य घालविण्याइतकी सामुग्री ठिकठिकाणीं पसरलेली मी आपले नजरेस आणून देईन. मी आपणांपुढें माझ्या २८ दिवसांच्या संशोधनाच्या कामाची हकीगत सांगणार आहे.* त्यावरून मी आपली अशी खात्री करून

* निबंध वाचला गेला नाहीं.

देईन कीं, अधून मधून काम करणाऱ्या माणसाच्या हातून जें सहज काम होतें त्या पेक्षां किती तरी पट जास्त काम या कार्यास वाहून घेतलेल्या थोर गृहस्थांच्या हातून होण्यासारखें आहे. मूळ ठरावांत पगारी संशोधक नेमावे असे शब्द होते ते मला गैर वाटले. वस्तुतः या कार्यात पडणाऱ्या मनुष्यास किती तरी शारिरिक व मानसिक क्लेश भोगावे लागणार आहेत; हा धकाधकीचा मामला आहे. हे सद्गृहस्थ आपणावर उपकार करण्यास उद्युक्त झाले आहेत. यांच्या उपकाराची फेड ती आपण काय करणार? म्हणून पगारी हा शब्द गाळा व योग्य संशोधक असें म्हणा असें मीं चिटणिसांस म्हटलें व तें त्यांनीं मान्य केलें. तत्प्रीत्यर्थ सालीना ५० । ७० । १०० । १२५ । १५० । २०० या पैकीं जी रक्कम वर्गणी करून माझे वाट्यास येईल ती मी मोठ्या आनंदानें देईन, आपण हि या कार्यास मदत करावी अशी माझी विनंति आहे.'

या ठरावास श्री. मुजुमदार यांनीं अनुमोदन दिल्यावर मूळ ठरावास पुष्टि देतांना रा. राजवाडे म्हणाले:-

रा. कीर्तने यांची बखरीवरील टीका प्रसिद्ध झाल्यावर विविधज्ञानविस्तारांतून दोन बखरी प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर आपले सन्माननीय अध्यक्ष यांनीं कोणापासून हि कसल्या हि मदतीची अपेक्षा न करितां ४०।४२ बखरी छापल्या. त्या नंतर मिरजेचे रा. खरे आले. त्यांनीं आपलें घरदार विकून पटवर्धनी दप्तर छापण्याचा स्तुत्य उद्योग सुरु केला. रा. ब. पारसनीस हे आपला संसार करून हें काम करीत आहेत. मी हि माझ्या स्नेह्यांच्या मदतीनें वर्षा दोन वर्षांनीं एखादा खंड काढितो. परंतु हे सर्व प्रयत्न सर्वांशीं तुटक झाले व या कार्यात आम्हांस त्या वेळीं प्रसिद्ध असलेल्या अशा कोणा हि मोठ्या मनुष्याचें अगर संस्थानिकाचें अगर इतर कोणाचें साहाय्य झालें नाहीं. आम्हा प्रत्येकास कागदपत्र हुडकून काढण्यापासून तों पुस्तकें विकून पैसे वसूल करीपर्यंतच्या सर्व विवंचना कराव्या लागल्या आहेत. यामुळें वेळाचा किती तरी अपव्यय होतो. व प्रगति तर अति मंदगतीनें होते. तेव्हां आपला झाला परंतु आपणापाठीमागून जे गृहस्थ हें कार्य करण्यास प्रवृत्त होतील त्यांच्या कालाचा अपव्यय होऊन आयुष्य फुकट जाऊं नये व कार्य तर त्वरित व्हावें अशासाठीं काय योजना निर्माण करावी अशा विवंचनेंत मी असतांना माझी व आपले चिटणीस तात्यासाहेब मेहेंदळे यांची गांठ पडली व चमत्कार असा कीं, त्यांनींच होऊन मला विचारलें कीं, संघटित स्वरूपानें काम करण्यासारखी एकादी संस्था निर्माण करितां येईल कां? वस्तुतः हें इतिहासाचें काम पूर्वीच्या इतिहासप्रसिद्ध लोकांच्या वंशजांचें आहे. हें एक प्रकारचें पितृकार्य आहे व तें

करण्यास त्यांच्यांतील च एक मनुष्य तयार झाल्याचें पाहून मला आनंद झाला. अशा रीतीनें आम्हां उभयतांच्या विचारें व आपले पहिले अध्यक्ष रा. ब. गणपतराव जोशी व आपले सध्यांचे सन्माननीय अध्यक्ष यांच्या प्रोत्साहनानें सदरहु संस्था निर्माण झाली. रा. ब. रानडे यांनीं अनेक संस्था निर्माण केल्या परंतु त्यांनीं आपल्या मंडळासारखी संस्था निर्माण केली नाहीं हें खरोखरी च आपलें, आपल्या देशाचें दुर्दैव होय. अशी जर एकादी संस्था त्यावेळीं निर्माण झाली असती व जर अशा संस्थेच्या कृपेच्या छत्राखालीं माझ्यासारख्यास काम करावयास मिळून जितकें जरूर तितकें स्वास्थ्य असतें तर आपणांस अतिशयोक्ति वाटेल म्हणून सहस्रपट म्हणत नाहीं पण शतपट काम मीं सहज उरकलें असतें. यद्यपि आपण आजवर केलेलें काम अति अल्प आहे, तरी संशोधकांनीं आपली जबाबदारी ओळखून सुव्यवस्थित-पणें काम केलें तर आपण खचित हें कार्य लवकरच चांगल्या नांवारूपास आणूं. यद्यपि माझी प्राप्ति अति अल्प आहे—वस्तुतः कांहीं नाहीं असें म्हटलें तरी चालेल—परंतु माझ्या बंधूंच्या कृपेनें मला जो अल्पस्वल्प पैसा मिळतो त्यांतून माझ्या पाठी-मागून होणाऱ्या संशोधकांचा मार्ग सुलभ व्हावा म्हणून मी सालीना २५ रु. ह्या कार्यास देतों.

रा. मेहेंदळेः- या ठरावावर याहून जास्त कांहीं सांगावयास पाहिजे असें मला वाटत नाहीं. इतरांप्रमाणें मी हि ह्या कार्यास सालीना ५० रु. देऊन मूळ ठरावास पुष्टि देतों.

या कामीं वार्षिक वर्गणीचेः—रा. साने ५०, नामदार साठे, ५० श्री, मुजूमदार ५०, श्री. अप्पासाहेब फडणीस ५०, रा. देव ५०, केसरी ऑफिस ५०, रा. राजवाडे २५, रा. पांगारकर १२, रा. मेहेंदळे ५०, असे आंकडे पडून सभेचें पहिल्या दिवसाचें काम संपलें.

## दुसरा दिवस (गुरुवार)

दुसरे दिवशीं कामास सुरवात झाली त्यावेळीं रा. साने हे प्रकृतीच्या अस्वस्थते-मुळें हजर नसल्यामुळें अध्यक्षस्थान रा. रा. हरि गणेश गोडबोले यांस देण्यांत आल्यावर रा. राजवाडे यांनीं शिवकालीन पत्रव्यवहाराच्या व्यवस्थेचा ठराव पुढें मांडिला तेव्हां ते म्हणालेः—मला आपणापुढें जो ठराव मांडावयाचा आहे तो असाः—

शिवकालीन पत्रव्यवहार अत्यंत महत्वाचा असल्यामुळें त्याच्या संशोधनार्थ, संग्रहार्थ व प्रकाशनार्थ कांहीं तरी योजना मोठया प्रमाणावर होणें जरूर आहे. सबब भारत-इतिहास-संशोधक-मंडळानें या कामीं श्रीशिवछत्रपति स्मारक कमेटीकडे सहकारितेच्या स्वरूपानें मदत मागावी व या करितां सोबत जोडलेल्या मसुद्याप्रमाणें सदर स्मारककमेटीच्या अध्यक्षांस विनंतिरूप पत्र पाठविण्यांत यावें.

पत्राचा मसुदा

ग. रा. दाजी आबाजी खरे

अध्यक्ष श्री शिवछत्रपति-स्मारक कमेटी, यांस, साष्टांग नमस्कार वि. वि.

पुणें येथें १८३२ सालीं आषाढ शु॥१ रोजीं भारत-इतिहास-संशोधक-मंडळ नांवाची संस्था स्थापन झाली असून सदर सभेचे हेतु व आजवर तिनें केलेलें काम याची कल्पना या सोबत पाठविलेल्या अहवालांवरून आपणांस करितां येईल. हल्लीं शिवकालीन पत्रव्यवहाराच्या संशोधनाचें, संग्रहाचें व प्रकाशनाचें काम विशेष महत्वाचें म्हणून हातीं घेण्याचें मंडळानें ठरविलें आहे; परंतु मंडळाचे संग्रहीं या कामाला जरूर लागणारें द्रव्य नाहीं.

श्री शिवछत्रपति-स्मारक कमेटीचा हेतु श्री शिवाजी महाराज यांचें स्मारक करण्याचा आहे, व कमेटीनें तें स्मारक करण्याचा प्रकार पूर्व संकल्पावरून कांहीं निश्चित केला असेल तथापि तसा तो निश्चित झाला नसल्यास शिवकालीन पत्रव्यवहार जगप्रसिद्ध करण्यानें स्मारकाचा हेतु एका अंगानें तडीस जाण्यासारखा आहे. म्हणून या अंगानें तो तडीस कितपत व कसा नेतां येईल याचा विचार आपली कमेटी जरूर करील अशी मंडळास आशा आहे. व या कामीं जी माहिती आपल्या कमेटीस लागेल ती पुरविण्यास व आपल्या सहकारितेनें वरील हेतु पार पडण्याकरितां शक्य ती सर्व मदत देण्यास भारत-इतिहास-संशोधक मंडळास मोठा संतोष वाटेल. कळावें बहुत काय लिहिणें हे विनंति. भारत इतिहास संशोधक मंडळाच कार्यालय, शनवार पेठ, घर नंबर ४५६ पुणें शहर.—

शिवाजी स्मारक कमेटीजवळ मूळचे सुमार २४००० रुपये व त्यांचें व्याज वगैरे मिळून आज जवळ जवळ ३६।३७ हजार रुपये झाले आहेत, व या पैशांतून महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार करावा असा मूळचा हेतु होता. परंतु सरकारानें हें काम स्वतःच करण्याचें ठरविल्यामुळें लोकांस रायगडावर महाराजांचें

कोणत्या हि तऱ्हेनें स्मारक करितां यावयाचें नाहीं, परंतु महाराजांचें स्मारक दुसऱ्य हि एका रीतीनें, त्याचें चरित्र प्रसिद्ध करून, करितां येण्याजोगें आहे. शिवकालीन पत्रव्यवहाराच्या संशोधनार्थ मीं जेव्हां प्रवास केला तेव्हां हें काम कष्टसाध्य तर खरें च परंतु विशेष खर्चाचें हि आहे असें माझें प्रत्ययास आलें आहे. किती तरी जुन्या घराण्यांतील लोक आपल्याजवळील कागदपत्र आमचे हवालीं करण्यास नाखुष असतात. अशा पत्रांचे फोटो घेणें जरूरीचें आहे. व अर्थात् हें काम खर्चाचें आहे. सांप्रत महाराजांचें स्मारक रायगडीं मूळ इच्छेप्रमाणें होणें अशक्य झाल्यामुळें स्मारक अन्यठिकाणीं व अन्यतऱ्हेनें होणें प्राप्त आहे. स्मारक कमेटी ज्या वेळीं या पैशाचा विनिमय कोणत्या तऱ्हेनें करावा याचा विचार करील त्या वेळीं स्मारकाचा हा हि एक मार्ग आहे असें आपण त्यांचे पुढें विचारासाठीं ठेवीत आहोंत. पत्रांतील आशय सर्वमान्य होण्याजोगा आहे. तेव्हां आपण सर्वजण या ठरावाबद्दल आपली पसंति मूळ ठरावावर सह्या करून नमूद कराल अशी मला आशा आहे.

मूळ ठरावास अनुमोदन देण्यासाठीं रा. रु. वि. आचार्य यांनीं एक निबंध वाचला. निबंधांत रा. आचार्य यांनीं साताराप्रांतीं इतिहाससाधनें किती विपुल आहेत तें सविस्तर सांगून हीं इतिहाससाधनें मोठ्या अव्यवस्थितपणानें पडलेलीं आहेत तरी तीं मंडळानें लवकर हस्तगत करावीं, म्हसवड येथील भैरवनाथाचे जुनाट देवळापुढें असलेल्या एका मोठ्या कानडी शिलालेखाचें वर्णन करून तो शिलालेख लवकर प्रसिद्ध व्हावा, सातारप्रांतांत व इतरत्र पसरलेलीं इतिहासाचीं साधनें मंडळानें लवकर हस्तगत करावीं अशा आशयाचा निबंध वाचून अनुमोदन दिलें. ( रा. आचार्य हे निबंध वाचीत असतांना सभासदांच्या मूळ ठरावावर सह्या घेतल्या गेल्या. )

रा. न. चिं. केळकरः—आतां मूळ ठरावावर सभासदांच्या सह्या झाल्यामुळें मला कांहीं विशेष सांगण्याचें उरलें च नाहीं. आज सुमार तीस हजारांहून जास्त एवढी रक्कम शिवाजी स्मारक कमेटीजवळ आहे. कमेटीला इष्ट अशी व्यवस्था रायगडास करण्याला पाहिजे तेवढी मोकळीक आतां उरली नाहीं व ती मिळण्याची आशा हि नाहीं. तेव्हां सदर रकमेचा विनियोग आपण विनंति केल्याप्रमाणें व्हावा हें च सर्वथैव योग्य आहे.

रा. शि. म. परांजपेः—मला थोडासा खुलासा करून घ्यावयाचा आहे. रा. रा. केळकर यांचे बोलण्याचा अभिप्राय सर्वच रक्कम कमेटीनें आपणास द्यावी असा आहेसा दिसतो, तरी मूळ ठरावांत तसे शब्द आहेत काय ?

रा. केळकरः—तसे शब्द मूळ ठरावांत नाहींत.

रा. परांजपेः—मी या ठरावावर जी सही केली आहे ती आपण शिवकालीन पत्रव्यवहाराच्या संशोधनार्थ कांहीं मदत मागत आहोंत अशा समजुतीनें केली आहे; सर्वच रक्कम कमेटीनें आपणास द्यावी या समजुतीनें केलेली नाहीं.

रा. केळकरः—आपण आज अमुक एक रक्कम आम्हास द्या असें ठरावांत घातलें नाहीं. व आपण जरी तसें म्हटलें असतें तरी तावडतोब ती रक्कम कोणी द्यावयास काढली नाहीं. कमिटी आपले प्रतिनिधी नेमील, आपण आपले नेमूं व एकमेकांच्या विचारें जें ठरेल तें कायम समजावयाचें आहे. पैसे त्यांचे जवळ व मागणार आपण. तेव्हां ते १ पैशापासून ३६ हजार रु. पर्यंत ते देतील तेवढी रक्कम मला या मंडळाचा सभासद म्हणून घेण्यास हरकत वाटणार नाहीं.

*मूळ ठरावावर खालील गृहस्थांच्या सह्या आहेत

काशीनाथ नारायण साने
हरि गोविंद लिमये
शिवराम महादेव परांजपे
विष्णु दत्तात्रेय गोखले
अनंत विनायक पटवर्धन
गोविंद काशीनाथ चांदोरकर
नरसिंह चिंतामण केळकर
हरि रघुनाथ भागवत
गणेश सखाराम खरे
हरि नारायण आपटे
लक्ष्मण रामचंद्र पांगारकर
कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर
खंडो चिंतामण मेहेंदळे
हरि गणेश गोडबोले
रामचंद्र विनायक पटवर्धन
दत्तो वामन पोतदार
महादेव मोरेश्वर फडणीस
विश्वनाथ काशीनाथ राजवाडे
शंकर श्रीकृष्ण देव
गंगाधर नारायण मुजूमदार
पांडुरंग नरसिंह पटवर्धन
विष्णु गोविंद विजापूरकर
विनायक लक्ष्मण भावे
रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर
दत्तो श्रीराम जोशी

---

* सदरहु ठराव व मंडळाचे अहवाल रा. दाजी आबाजी खरे यांजकडे, शिवाजी महाराजांच्या चरित्राचीं साधनें गोळा करण्यासाठीं फार मोठ्या प्रमाणावर उद्योग करणें अगत्याचें आहे असें मंडळास वाटत आहे, सदरहु ठराव मंडळानें एकमतानें पसंत केला आहे, वगैरे आशयाचें पत्र जोडून पाठविलें. त्यास त्यांचेकडून पुढें लिहिलेप्रमाणें उत्तरें आलीं आहेत.

नंतर रा. राजवाडे यांनीं

" भारतेतिहास, भारतीय अर्थशास्त्र, भारतीय राजधर्मशास्त्र, भारतीय समाजशास्त्र, भारतीय भाषाशास्त्र वगैरेंच्या अध्ययन–अध्यापनाची व्यवस्था भरतखंडांत, तेथील विश्वविद्यालयादि संस्थांच्या द्वारा होणें अत्यवश्यक आहे असें या मंडळाचें मत आहे व या आशयाचीं सूचनापत्रें, विनंतिपत्रें वगैरे निरनिराळ्या विद्यमान नामांकित शिक्षणसंस्थांकडे पाठवावीं "

---

[ मागील पृष्ठावरून ]

श्री सिंहगड.

तारीख ७ माहे मे सन १९१३।

रा. रा. काशीनाथ नारायण साने अध्यक्ष भा. इ. सं. मंडळ

सा. न. वि. वि. आपलें मिति चैत्र वद्य १० चें पत्र मंडळाचे सेक्रेटरी यांचे पत्रासमवेत आलें तें पावलें. व त्यांतील मजकूर कळला. आपलें पत्र मी स्मारक कमेटीचे सभासदांपुढें मोठ्या आनंदानें लवकरच ठेवीन, व कमेटीचा विचार काय होतो तें आपणांस कळवीन. आपणांस मात्र एवढें च सुचविणें भाग आहे कीं, कमेटीचें मत समजण्यास थोडा विलंब लागेल. कळावें, हे विनंति.

आपला,

( सही ) दाजी आबाजी खरे

---

श्री सिंहगड

तारीख ७, माहे मे सन १९१३

श्री. सरदार खंडो चिंतामण मेहेंदळे चिटणीस, भा. इ. सं. मंडळ

सा. न. वि, वि. आपलें मिति चैत्र वा। १४ चें पत्र व त्यासोबत आपले मंडळाचे अध्यक्षांचें पत्र अशीं दोन पत्रें पावलीं. आपलें मंडळाचें म्हणणें मी आमचे कमेटीपुढें ठेवून त्याबद्दल काय विचार होतो तें मी आपणांस कळवीन. कळावें, हें विनंति.

आपला,

( सही ) दाजी आबाजी खरे

या आशयाचा दुसरा ठराव सभेपुढें मांडला. ते म्हणाले:–युरोपियन देशांत अलीकडे–विशेषत: गेल्या दहा वीस वर्षांत–समाजशास्त्र व तदंगभूत अर्थ आदि शास्त्रें यांची फारच प्रगति झाली आहे, व अगदीं लहानापासून थोरापर्यंत सर्वांना त्यांचीं प्रमेयें कळविण्यासंबंधानें हरप्रकारें यत्न होत आहेत. जसा व्यक्तीच्या विकारविचारांचा विचार आपण करतों तसा च तो समाजासंबंधानें हि करण्यासारखा आहे. व्यक्तीला मन आहे तसें समाजाला आहे. परवां च वादळ झालें. विजांचा कडकडाट व मेघांचा गडगडाट सुरू झाल्याबरोबर जो तो मनुष्य आश्रयाचें स्थान पाहून निवाऱ्याची सोय पाहूं लागला. असें कां ? असा कोठून हुकूम झाला होता कीं चला, निवाऱ्याला जाऊन रहा म्हणून ? असा कोणीं उपदेश केला होता ? छे ! प्रत्येक मनुष्याचें मन साहजिक च ती क्रिया करतें झालें व सर्वांनीं एकसमयावच्छेदेंकरून हि अशी एक च क्रिया केली तेव्हां ही क्रिया सामुदायिक किंवा सामाजिक मनाची झाली.

या सामाजिक मनाचें व त्याच्या नानाविध गतिस्थित्यात्मक व्यापारांचें सूक्ष्म अवलोकन करणें फार जरूरीचें व हिताचें आहे. सामाजिक मनाची रचना, त्याचे गुणदोष, त्याचा स्वभाव यथास्थित कळल्याशिवाय राष्ट्राचा प्रपंच सुयंत्र करणें आजकाल शक्य नाहीं. पाश्चात्य देशांत याबद्दल फार नेटानें प्रयत्न होत असून इकडील लोकांना त्याचा गंध हि नाहीं ! या सामाजिक मनाच्या या सर्व चेष्टा जाणणाऱ्याला समाजशास्त्रज्ञ म्हणतात. यांनीं काढिलेल्या सिद्धांतानुसार समाजशास्त्राचा व्यवहारांत उपयोग करून घेणारे ते समाजव्यवहारचतुर पुरुष एक गणपतिपूजा घेतली तर हजारों लोकांच्या झुंडी तिकडे लोटतात हें पाहून त्याचा उपयोग करणारा तो समाजव्यवहारचतुर पुरुष. आपल्याला या सर्वांची आवश्यकता आहे. पाश्चात्यांनीं पौर्वात्य देश, त्यांचे समाज, त्यांतील धर्म त्यांतलि लोकाचार, तेथील लोकांचीं मनें वगैरेंचा केलेला अभ्यासक्रम सर्व विपर्यस्त व भ्रामक आहे. या कामीं आपण च पुढें येणें जरूर आहे. निरनिराळ्या शिक्षणसंस्थांतून हे विषय ठेविले पाहिजेत, शिकविले पाहिजेत. इकडच्या सर्वोच्च पदवीधराला हि ह्या शास्त्रांची जवळजवळ कांहीं च माहिती नसते म्हटलें तरी चालेल. ही शोचनीय स्थिति पालटणें फार अगत्याचें आहे. या बाबतीसंबंधानें हि इकडील विद्वानांत बहुतेक मतैक्य आहे. सूज्ञांना अधिक सांगणेची जरूरी नाहीं. दिग्दर्शन मात्र केलें आहे."

या ठरावास अनुमोदन देतांना प्रो. हरि गोविंद लिमये म्हणाले:— पाश्चात्यांनीं इकडच्या देशांबद्दलचा केलेला विचार एकांगी आहे. त्यांनीं आपापल्या समाजावरून बसविलेले नियम ते जसेच्या तसे च इकडे हि लावूं पाहतात. हा एकांगीपणा नष्ट करण्याचा आपण प्रयत्न करणें जरूर आहे. या कामीं मुख्य लागणारा गुण समतोलपणा होय. आपल्या समाजाबद्दल विचार करतांना आपण

तो " श्रद्धाभक्तिसमन्वित " अंतःकारणानें केला पाहिजे. हा ओलावा पाश्चात्यांचे ठायीं कोठून येणार ! तेव्हां आपल्या संस्कृतीचा, चरित्राचा, धर्माचा आपण च विचार करणें अगत्याचें आहे. वेदांत च घ्या. तो भाकड म्हणून च ज्यांचा पूर्वग्रह त्यांच्या हातून त्याचा योग्य विचार होणें नाहीं. मराठ्यांचा च इतिहास एखाद्या युरोपियनानें लिहिलेला हातांत घ्या. प्रत्येक पानांत दहा वीस वेळां तरी असें वाटतें कीं हें पुस्तक फेंकून द्यावें. अमका लुटारू होता, तमकें तसें च होतें, असा विपर्यस्त प्रकार जेथें तेथें दृष्टोत्पत्तीस यावयाचा च! मला शिक्षणाचा अनुभव आहे, आतां नवीन इंटरमीजिएट परीक्षेला हिंदी किंवा भारतीय अर्थशास्त्र नेमलें आहे. याची पुष्कळ लोक थट्टा करतात ! ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे. इतिहासाची गोष्ट अशीच आहे. तेव्हां सदर ठरावांत लिहिल्याप्रमाणें प्रयत्न होणें जरूर आहे.

रा. मेहेंदळे यांचा दुजोरा मिळून हा हि ठराव मंजूर झाला. दुजोरा देतांना मराठी भाषेचें ऐतिहासिक व्याकरण होणें फार अवश्य असून तें रा. राजवाडे यांचे च हातून झालें तर बरें. तसें त्यांना लिहिण्याची विनंति करून तें छापण्याची जबाबदारी आपण आपल्या एकट्याचे शिरावर घेण्यास तयार असल्याचें हि त्यांनीं जाहीर केलें. त्यावर रा. राजवाडे यांनीं उत्तर दिलें व संमति हि पण जवळजवळ दिली. नंतर प्रसिद्ध झालेल्या मुबलक सामग्रीवरून मराठ्यांचा एक इतिहास लिहिण्याची हि विनंति त्यांस रा. मेहेंदळे यांनीं केली व तो हि छापण्याचें अंगावर घेतलें. "पेशवाईचा इतिहास लिहिण्याजोगी सामग्री आतां खरोखरी च झाली आहे. तरी मजपेक्षां दुसऱ्या कोणीं तरी हें काम करावें. विद्यापीठांतून शिकविणाऱ्या विद्वान् लोकांनीं आतां आळस झाडून सर्व इतर अडचणींना न जुमानतां हें काम अवश्य करावें; असले प्रयत्न १०।१२ निरनिराळे झाले तरी दृष्टिभेदामुळें इष्ट च असल्याचें सांगून या बाबतींत सक्ति न करतां खुषीवर च सोंपवणें बरें, " असें स्वतःसंबंधानें रा. राजवाडे म्हणाले.

नंतर रा. शं. श्री देव यांनीं ' येकेहाळी येथील श्रीरामदासी विद्यापीठ' हा निबंध वाचला ( पृष्ठें ३४ ते ४८ ). निबंधाचे शेवटीं ग्रंथसंग्रहार्थ एक अग्निभयविरहित गृह बांधण्याची अवश्यकता रा. देव यांनीं प्रतिपादिली व अशा रीतीचें एकादें गृह बांधण्याचें ठरल्यास एंजिनियर म्हणून जें जें म्हणून करावयास पाहिजे तें आपण मोफत करूं असें रा. गणेश सखाराम खरे यांनीं सांगितलें. अखेर रा. राजवाडे यांनीं ' महाराष्ट्रांतील गेल्या हजार वर्षांतील विचारप्रदर्शनाचें साधन, ' हा निबंध वाचल्यावर सभेचें दुसऱ्या दिवसाचें काम संपलें.

# तिसरा दिवस (शुक्रवार)

तिसरेदिवशीं अध्यक्ष रा. हरि गणेश गोडबोले स्थानापन्न झाल्यावर सुरवातीस रा. देव यांनीं

'महाराष्ट्र कवि' मासिक पुस्तक बंद होऊन साडे पांच वर्षें झालीं. तें आजपर्यंत चालू असतें तर सुमारें ३००० तीन हजार पृष्ठें आतांपर्यंत छापून निघतीं. तितकीं पृष्ठें छापून काढण्याची जबाबदारी रा. विनायकराव भावे हे आपणावर घेत आहेत. तीन हजार पृष्ठें भरतील इतकी चांगली कविता त्यांस मंडळानें पुरवावी व त्यापुढें 'महाराष्ट्र कवि' मंडळानें चालवावा,

हा ठराव सभेपुढें आणिला.

तेव्हां रा. देव म्हणालेः—काल मीं आपणास येथेहाळी येथील मठाची हकीकत सांगितली, तशी च आणखी शेंकडों मठांची हकिकत आहे. तेव्हां माझा आपणांस असा सवाल आहे का, असल्या उत्तमोत्तम ग्रंथसंपत्तीचा लोकांस परिचय करून देण्याची जबाबदारी काव्येतिहाससंग्रहाची लोकांस गोडी लावणाऱ्या मंडळावर खचित येत नाहीं काय ? मंडळाची सांपत्तिक स्थिति म्हणण्यासारखी समाधानकारक नाहीं. आपण पहिल्या दिवशीं ठराव केल्याप्रमाणें आपले प्रतिनिधि—आपण जे संशोधक नेमणार आहों ते—जेव्हां बाहेर स्वारीवर निघून गाड्यावारी ग्रंथसंपत्ति आणतील, त्याचा अल्पसा तरी परिचय महाराष्ट्रास करून देण्याची जबाबदारी आपणांवर खचित येते. पुणें हें फार पुढें गेलेलें असें शहर आहे. अशा शहरांतून जर शंभर सभासद २५।१२ अगर ६ रुपये वर्गणी देणारे आपण गोळा केलेत तर धुळ्याच्या तर्फे हि पांच पन्नास नवीन सभासद मिळवून देण्याची मी व माझे मित्र रा. चांदोरकर अवश्य खटपट करूं. रा. भावे हे आपणावर ३००० पृष्ठें मजकूर छापून काढण्याची जबाबदारी घेत आहेत ही अत्यंत थोरपणाची गोष्ट आहे. तेव्हां आपण या ठरावास अनुमोदन देऊन आपल्या मंडळाचें कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढविण्याची खटपट कराल अशी मला आशा आहे.

रा. भावेः— हें मासिक बंद पडण्याचें कारण वाईट परिस्थिति, वर्गणीदारांची वाण व मुख्यतः चांगल्या काव्यांची उणीव. मासिक सुरू असतां त्यास अवघे १५०० वर्गणीदार असून वर्षाअखेर ११२ रुपयांपेक्षां अधिक शिल्लक रहात नसे. माझ्याजवळ सध्यां १५०० पृष्ठें होतील इतकी दासोपंताची व आणखी दुसऱ्या

कवींची चरित्रात्मक काव्यात्मक मिळून कविता आहे व आणखी १५०० पृष्ठांची चांगली कविता मंडळानें मला दिल्यास मी ३००० पृष्ठें एकदम छापून प्रसिद्ध करीन व पुढें मात्र या मासिकाची जबाबदारी मंडळानें आपल्या शिरावर घ्यावी.

रा. ह. ना. आपटेः– मी आतां जें बोलणार आहे तें येथें जमलेल्या कांहीं गृहस्थांस रुचणार व पटणार नाहीं असें मला वाटतें. तरी पण मला आपणांपुढें दोन शब्द विचारासाठीं मांडावेसे वाटतात. पुष्कळ वेळां असें होतें कीं, मासिक निघण्याची वेळ आली, जवळ पुरेसा चांगला मजकूर नसला म्हणजे कांहीं तरी मजकूर घालून जागा भरून काढावी लागते. अशा रीतीनें च आजपर्यंत मासिकें चालविल्यानें आपण हि तसें च मासिक काढून ते च प्रकार करावेत असें मला वाटत नाहीं. आपणांस जी चारपांचशें पृष्ठें कविता छापावयाची असेल ती पृथकपणें खंडशः काढावी व हा मजकूर प्रसिद्ध करण्यापूर्वी एकाद्या पाठकमिटी पुढें ठेवावा म्हणजे त्यांतून निवड होऊन चांगला तेवढा च मजकूर प्रसिद्ध होत जाईल.

रा. राजवाडेः– आतांपर्यंतचीं भाषणें ऐकून आपण हि दोन शब्द बोलावे असें मला वाटून मी आपणास दोन शब्द सांगतों त्यांचा विचार व्हावा. आमच्याकडे कविता किती आहे ह्याची थोडीशी कल्पना रा. देव यांच्या निबंधावरून आपणांस आली असेल च. विलायतेमध्यें To be or not to be अशा सारखें एकादें च काव्यरत्न निर्माण होतें व त्यांच्या कवींची कृती हि साधारण बेताची च असते. Lope de vega प्रमाणें उत्कट कृति करणारा एकादा च. तेव्हां त्यांच्या कवींच्या कृतींचे वाटेल तितके चमत्कार करण्यास पुरेशी वाव असते. परंतु आमच्याकडील प्रकार निराळा च. आमच्याकडील एकादा च कवि इतकी कृति निर्माण करून ठेवतो कीं त्याचे सोपस्कार करण्याचें तर राहूं द्या च परंतु ती कविता नुसती छापून काढण्याचें च एकाद्यानें मनांत आणिलें तरी हि एका मनुष्याचा कितां तरी वेळ कामीं लागतो. एकट्या दासोपंताचें च उदाहरण घ्या, व त्याची कविता उत्कृष्ट आहे असें रा. भावे यांस हि वाटतें, तर त्याची हि कविता $\frac{1}{10}$ एकदशांश हि प्रसिद्ध झालेली नाहीं. तसा च शिवराम. तसा च मोरोपंत. आपल्या लोकांतील गुण–दोष काय लागेल तो म्हणा असा आहे कीं, त्यांची कोणती हि कृति उत्कटत्वानें होते. कोठें एकाद अर्धी ओळ लिहावी. फूलपाखरूं, काटेरी झु प, अशा स्वल्प विषयावर सुलभ कविता करावी व मग इतर लोकांनीं त्यांचें कोड कौतुक पुरवावें हें रास्त झालें असतें. यामुळें ह्या

उत्कट कवींची उत्कट कृति लोकांस नकोशी वाटते. मी आपणांस असें खात्रीपूर्वक सांगतों कीं, आपण कविता ग्रंथरूपानें प्रसिद्ध करा, मासिकाच्या द्वारानें प्रसिद्ध करा, काव्यांची वाण केव्हां हि पडावयाची नाहीं. शिवाय निरनिराळीं काव्यें निरनिराळ्या दृष्टीनें पहावयाचीं असतात. कांहींत व्याकरणाचीं जुनीं अशीं रूपें येतात तर कांहींत तात्कालीन धर्मसमजुती नमूद केलेल्या असतात तर कांहींत इतर ऐतिहासिक कथा अगर लौकिक कथा ग्रथित केलेल्या असतात. विषयाचें महत्व काय आहे हें न कळल्यानें एकाद्यास कांहीं भाग टाकाऊ व कंटाळवाणा वाटेल तर तो च दुसऱ्यास मनोरंजक व उपयुक्त वाटेल. एकंदरींत सांगण्याचा मुद्दा इतका च कीं, उत्कृष्ट काव्यांची उणीव केव्हांच पडणार नाहीं व एकाद्या वेळीं एकादा भाग कंटाळवाणा वाटला तरी तो दुसऱ्यास महत्वाचा कां वाटतो हें समजून घेतलें असतां काव्य कंटाळवाणें आहे असें वाटून हिरमुसलें होण्याचें कांहीं कारण उरणार नाहीं

रा. देवः– रा. आपटे कांहीं तरी अप्रिय असें बोलावयास उठले तेव्हां अप्रियें असलें तरी कांहीं पथ्यकर गोष्टी, आपल्या हातून न कळत होणाऱ्या कांहीं चुका, आपल्या निदर्शनास येतील असें मला वाटलें होतें. परंतु त्यांचे म्हणण्यांत अप्रिय किंवा नवीन असें मला कांहीं च आढळलें नाहीं. त्यांचें म्हणणें इतकें च कीं कविता जी छापावयाची ती सळमिसळ करून न छापतां उत्कृष्ट व स्वतंत्रपणें छापावी. व असें च माझें हि पहिल्यानें म्हणणें होतें. रा. भावे यांची हरकत नसेल तर मूळ ठरावांत पुस्तकरूपानें हे शब्द घालण्यास माझी हरकत नाहीं.

रा. भावेः– मी या मासिकाचे सुमारें ५१ अंक काढले तेव्हां आलेला अनुभव व इतर मासिककारांस व स्वतंत्र ग्रंथप्रकाशकांस जो अनुभव येतो त्याचा विचार करून काव्य मासिकपुस्तकद्वारां प्रकाशित करणें किफायतशीर होईल असें मला वाटलें. मी एक व्यापारी आहें व त्या व्यापारांत मला जो अनुभव आला त्याचा आपणांस फायदा मिळावा म्हणून मीं मासिक काढावें म्हणून सांगितलें. आपणांस तें गैरसोईचें व नापसंत असल्यास आपण पुस्तकरूपानें कवी प्रसिद्ध करा. माझी त्यास हरकत नाहीं. आपण आपलें काम सुरू केलें व मला १५०० पृष्ठें चांगली कविता दिली म्हणजे मीं ह्या वाट्याचें शिल्लक राहिलेलें काम तात्काळ प्रसिद्ध करीन.

मूळ ठरावांत पुस्तकरूपानें हे शब्द घालून मूळ ठराव एकमतानें पसंत झाला. नंतर धुळ्याचे रा. गो. का. चांदोरकर यांनीं ' भगवानलाल पंडितां ' नीं वाचलेला एक अस्सल ताम्रपत्र दाखवून पंडितजींचा व त्यांचा कोठें मतभेद आहे तें खालीलप्रमाणें सांगितलें.

# रुद्रदासाचा ताम्रपट

पण्डित भगवान लाल इंद्राजी पी. एच. डी. यांनीं Indian Antiquary नामक मासिकाच्या मार्च १८८७ च्या अंकांत 'रुद्रदासा' चा एक ताम्रपट छापला आहे. सदरचा ताम्रपट अस्सल माझे सहज पाहण्यांत आला. त्यांतलि मूळ पण्डितजींनी दिलेल्या त्यांच्या अवतरणाशीं ताडून पहातां कांहीं ठिकाणीं दुरुस्ती करणें अवश्य वाटल्यावरून, तेवढी दुरुस्ती सकारण देत आहे. तत्पूर्वीं एक दोन महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे.

( १ ) रुद्रदास हा अश्मक ( खानदेश ) देशच्या वाकाटकाच्या राजघराण्यापैकीं एक होता असें जें पण्डितजींचें म्हणणें आहे त्यास कांहीं सबळ पुरावा नाहीं. नांवाच्या शेवटीं 'दास' हा शब्द असल्यानें कोणतें हि निर्णीत प्रमेय निघत नाहीं.

( २ ) विकट्टनक हें गांव कोणतें याबद्दल पण्डितजींस शोध लागला नाहीं; व मला हि तें निश्चित सांगतां येणार नाहीं. कारण शोध करण्यास मला अवसर च मिळाला नाहीं. ता. २१ रोजीं हा ताम्रपट माझे हातीं आला व आज येथें वाचण्याचा प्रसंग आला. यांत च प्रवास वगैरे. तेव्हां जरी निश्चिततेनें सांततां येत नाहीं तरी ताम्रपट ज्या भागांत मिळाला त्यावरून जर कांहीं अनुमान काढणें शक्य असेल तर 'विकट्टनक' हें गांव म्हणजे हल्लींचें 'देवाचें विखरण' हें असावें असें वाटतें; गांव पुरातन आहे यांत संशय नाहीं. कारण तेथें यादवकालीन अगर तत्पूर्वींच्या हि कारागिरीची एक मूर्ति नुकती च सांपडली आहे. तसें च जवळ खोदलें असरां हि पुरातन वस्तीच्या खुणा सांपडतात.

इतकें सांगून आतां जी दुरुस्ती करणें मला अवश्यक वाटतें तिकडे वळतों:—

ही दुरुस्ती मुख्यतः वर्षाबद्दलची आहे. पंडितजींचे मताप्रमाणें पहिलें चिन्ह शंभराबद्दल निःसंशय आहे व त्यामागें एक उभी रेघ हि आहे. परंतु ती कदाचित् चुकीनें झाली असेल, अथवा पंडितजी म्हणतात त्याप्रमाणें ती कदाचित् सार्थ हि असेल. परंतु पुढचें चिन्ह निःसंशय ८ आठांबद्दल आहे व तिसरें चारांबद्दल आहे हें थोडा विचार केला तर तेव्हां च लक्षांत येईल.

या तीन चिन्हांनंतर पुढचीं अक्षरें "रेचे तु ( तृ ) यायः" अशीं आहेत. = हें चिन्ह २ चें दर्शक नसून पहिले ओळींत 'रुद्रदासः' यांतील विसर्गाप्रमाणें विसर्गवाचक आहे असें उघड दिसतें. पंडितजींस अथवा मला आम्हां दोघांस हि बरोबर अर्थ लागत नाहीं.

११

यानंतर रा. चांदोरकर यांना ' मोडी लिपीची उपपत्ति ' या विषयावर फळ्यावर आकृत्या काढून व्याख्यान दिलें ( पृष्ठ ४९ ते ६३). रा. चांदोरकर यांचे व्याख्यानावर थोडीशी चर्चा रा. ह. ना. आपटे व रा. छत्रे यांनीं केल्यावर रा. राजवाडे यांनीं 'बोडण ' या विषयावर निबंध वाचला ( पृष्ठ ३२ ते ३३ ).

नंतर अध्यक्ष रा. गोडबोले यांचे समारोपादाखल भाषण झालें. रा. विजापूरकर व रा. ह. ना. आपटे यांनीं अध्यक्षांचे समयोचित शब्दांनीं आभार मानल्यावर चिटणिसांनीं सर्व निमंत्रितांचे, सभासदांचे, वक्त्यांचे, लेखकांचे, अध्यक्षांचे प्रसंगानुरूप आभार मानले व मंडळाच्या पहिल्या संमेलनाचा समारंभ बरखास्त झाला.

समाप्त